महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

## गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय, नाशिक

### सेवाअंतर्गत पायाभूत प्रशिक्षण कार्यक्रम

# गुन्हे दोषसिध्दीचे प्रमाण वाढविण्याकरिता शास्त्रोक्त पध्दतीने अभ्यासक्रम

संकलन, संपादन व भाषांतर

## (वाचन साहित्य)

(फक्त प्रशिक्षणार्थींच्या उपयोगासाठी)

(फक्त शासकीय उपयोगासाठी)

# प्रस्तावना

राज्य शासनाने सर्व स्तरावर कार्यक्षमता वाढवून गतिमान प्रशासन होण्याकरिता प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी यांना योग्य ते प्रशिक्षण घेण्याची आवश्यकता असून, याबाबत सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याद्वारे प्रशिक्षण धोरण निश्चित करण्यात आलेले आहे.

राज्यात कायदा व सुव्यवस्था राखणे आणि जनतेला जीवित व वित्तहानीपासून संरक्षण देण्यासाठी पोलीस दल कार्यरत असून, बदलत्या सामाजिक, आर्थिक परिस्थितीत आणि विज्ञान व तंत्रज्ञान यातील झालेला बदल विचारात घेता या बदलांना सामोरे जाण्यासाठी पोलीस दलाची कार्यक्षमता वाढविणे व ते सक्षम करणे, गुन्हे दोषसिद्धी वाढविणे ही आजच्या काळाची निकड आहे. या अनुषंगाने पोलीस संबंधित विविध विषयांवर पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये गुन्हे तपासातील निपुणता वृद्धिंगत व्हावी, गुन्हे दोषसिध्दीत वाढ व्हावी या दृष्टिकोनातून श्री. सतिष माथूर मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई व मा. एस् जगन्नाथन, अप्पर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी केंद्रीय गुन्हे अन्वेषण विद्यालयांच्या विशेष प्रशिक्षण अभ्यासक्रमाच्या धर्तीवर गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय, नाशिक येथे अशा प्रकारचे प्रशिक्षण सुरू करावे, असा मानस व्यक्त केला आहे.

**गुन्हे दोषसिद्धीचे प्रमाण वाढविण्याकरिता शास्त्रोक्त पद्धतीने अभ्यासक्रम** या वाचन साहित्यात गुन्हे तपासाच्या दृष्टीने प्रथम खबर ते दोषारोपपत्र, न्याय वैद्यक शास्त्र, न्याय सहाय्यक विज्ञान, अंगुलीमुद्रा शास्त्र, तज्ञांचा अभिप्राय, घटनास्थळाचे फोटो व व्हिडीओ रेकॉर्डींग, संगणकीय गुन्हे तपास, मालमत्तेचे गुन्हे तपास, खुनांचा तपास, लैंगिक गुन्ह्यांचा तपास, पोक्सो ॲक्ट सुधारित कायदा, स्पेशल अहवाल, अपील व रिव्हीजन, केस स्टडीज, सेवन इंटिग्रेटेड फार्म, महत्त्वाच्या गुन्ह्यांच्या प्रमाणभुत कार्यपद्धती, तसेच कोर्टात साक्ष कशी द्यावी याचा समावेश करण्यात आलेला आहे. हे वाचन साहित्य प्रशिक्षणार्थी पोलीस अधिकारी, पोलीस कर्मचारी, पोलीस रायटर्स, तपासी अंमलदार यांना गुन्हे तपासाचा दर्जा गुणात्मकदृष्ट्या उंचावण्यासाठी निश्चितच उपयोगी पडेल. या उपक्रमामध्ये उपप्राचार्य गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय, श्री. राजेंद्र ससाणे, पोलीस निरीक्षक श्री. व्यंकटेश देशपांडे, श्री. भालचंद्र पगार, श्री. रमेश बोठे, श्रीमती विद्या बोरनारे, विधी निदेशक, श्री. विनोद खरात, अंगुलीमुद्रा तज्ञ, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय, नाशिक, श्रीमती शर्मिला शिंदे उपसंचालक, प्रादेशिक न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, नाशिक तसेच डॉ. अनय थिगळे वैद्यकीय अधिकारी, म.पो.अ., नाशिक व येथील अधिकारी यांनी परिश्रम घेऊन संकलन केले आहे.

सदर पुस्तिकेत काही त्रुटी राहिल्यास व त्याबाबत सूचना आल्यास त्याचा निश्चितच विचार केला जाईल.

श्रीनिवास घाडगे

दिनांक ०१/०४/२०१७ प्राचार्य,

III गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय, नाशिक

## अनुक्रमणिका


| प्र.क्र. | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | प्रथम खबर अहवाल | १ |
| २. | पंचनामा | १२ |
| ३. | साक्षीदारांचे जबाब | १९ |
| ४. | विचारपूस तंत्र | २२ |
| ५. | मालमत्ता जप्ती | ३८ |
| ६. | अटक | ४४ |
| ७. | रिमांड | ५४ |
| ८. | आरोपीची ओळख परेड | ५९ |
| ९. | वैद्यकीय प्रमाणपत्र | ६६ |
| १०. | न्याय वैद्यक शास्त्र | ६८ |
| ११. | अंगुली मुद्रा शास्त्र | १२४ |
| १२. | कबुली जबाब/मृत्युपूर्व जबाब | १३२ |
| १३. | तज्ज्ञांचा अभिप्राय | १४४ |
| १४. | गुन्ह्यांचे ठिकाणांचे फोटो व व्हिडिओ रेकॉर्डिंग | १४७ |
| १५. | केस डायरी | १५० |
| १६. | घटनास्थळाचे निरीक्षण, नकाशे व स्केच काढणे. | १५९ |
| १७. | न्यायसहाय्यक विज्ञान | १६९ |
| | 1) D. N. A. (जनुकीय गुणसूत्रे) तपासणी. | |
| | २) ब्रेन मॅपिंग | |
| | ३) आवाजाची तपासणी | |
| | ४) जिवशास्त्र | |
| | ५) विषशास्त्र | |
| | ६) दारुबंदी | |

| | | |
|---|---|---|
| | ७) क्षेपणास्त्र विभाग | |
| | ८) सामान्य विश्लेषण | |
| | ९) स्फोटके | |
| १८. | लैंगिक गुन्हे प्रकरणांचा तपास | १८५ |
| १९. | संगणकीय गुन्हे व तपास | १९६ |
| २०. | पुराव्याचा तक्ता (कॅलेंडर ऑफ इव्हीडंस्) | २०६ |
| २१. | दोषारोपपत्र (पोलीस तपासाचा अहवाल) | २०८ |
| २२. | मालमत्तेचे गुन्हे तपासाबाबत काय कराल? | २१८ |
| २३. | मनुष्यवध तपासकामी धागेदोरे - यादी | २२७ |
| २४. | स्पेशल अहवालाबाबतचे गुन्हे | २३७ |
| २५. | अपील व रिव्हीजन | २४२ |
| २६. | केस स्टडीज | २४५ |
| २७. | कोर्टात साक्ष कशी द्यावी | २७१ |
| २८. | फॉर्म | २७२ |
| | १) प्रथम खबर अहवाल | |
| | २) घटनास्थळ पंचनामा | |
| | ३) इंक्वेस्ट पंचनामा | |
| | ४) मेमोरंडम पंचनामा | |
| | ५) अंतिम अहवाल (चार्जशिट) | |
| | | |

# प्रकरण १

# प्रथम खबर अहवाल

## First Information Report [Cr. P.C. Sec. 154]

## उद्दिष्टे :-

Cr. P.C. Sec. 154 - दखलपात्र प्रकरणांतील वर्दी.

Cr. P.C. Sec. 156 - पोलिसांना दखलपात्र गुन्ह्यांचा तपास करण्याचे वैधानिक अधिकार व दंडाधिकाऱ्यांना १५६ (३) प्रमाणे दखलपात्र गुन्हा दाखल करून तपास करण्याचे आदेश देण्याचा अधिकार आहे. :

१) प्रथम खबरमध्ये कोणकोणते मुद्दे आवश्यक आहेत ते आपण पाहू शकाल.

२) प्रथम खबर व फिर्याद यातील फरक पाहू शकाल.

३) प्रथम खबर विलंबाने घेतली व त्यावर स्पष्टीकरण दिले नाही तर आरोपी निर्दोष सुटतो हे पाहू शकाल.

४) प्रथम खबरीचा पुराव्याच्या दृष्टीने काय उपयोग होतो हे सांगू शकाल.

दखलपात्र गुन्ह्यांची **''प्रथम खबर''** ही पुराव्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असा दस्तऐवज मानला जातो. याचे नावातच सर्व काही आहे. ज्या इसमाने प्रथम खबर दिली असेल त्याच्या म्हणण्याला पुष्टी देण्याकरिता किंवा त्याचे म्हणणे खोडून काढण्यासाठी याचा उपयोग होतो. गुन्ह्याचे निकालाचे भवितव्य याच प्रथम खबर अहवालावर अधिक करून अवलंबून असते. तसेच प्रथम खबरीची नोंदणी केल्याशिवाय दखलपात्र गुन्ह्याचे तपास करण्याचे अधिकार प्राप्त होत नाही. त्याकरिता प्रथम खबर लिहितांना खालील खबरदारी घेणे आवश्यक आहे.

बरेच पोलीस अधिकारी प्रथम खबरीला **''फिर्याद''** म्हणून संबोधतात, मात्र हे चुकीचे आहे. फिर्याद Cr. P.C. कलम २ (ड) प्रमाणे असते व प्रथम खबर सी.आर.पी.सी. कलम १५४ प्रमाणे असते.

कायद्याने पोलिसांना दखलपात्र गुन्ह्यांच्या तपासाचे अमर्याद अधिकार दिलेले असून हे अधिकार वैधानिक स्वरूपाचे (Statutory Powers) आहेत. सी.आर.पी.सी. कलम १५६ (१) प्रमाणे हे अधिकार पोलिसांना प्राप्त झाले असून, त्या अधिकारात वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याव्यतिरिक्त कोणासही हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही. परंतु उच्च व उच्चतम न्यायालयास सी.आर.पी.सी. कलम ४८२ व भारतीय राज्यघटना आर्टिकल २२६ प्रमाणे 'रिट ऑफ मेंडामंस' याचिकेद्वारे मर्यादित स्वरूपात पोलीस तपासात हस्तक्षेप करता येतो. एवढे अमर्याद अधिकार पोलिसांना तपासकामी असूनसुध्दा पोलीस त्या अधिकाराचा पुरेपूर व योग्य वापर करीत नसल्याचे दिसून येते. पोलिसांनी त्यांना असलेले हक्क व जबाबदारी ओळखून तपास केला तर आरोपी निर्दोष सुटण्यास वाव मिळणार नाही व गुन्हे शाबितीचे प्रमाणात निश्चितच वाढ होईल, म्हणून पुढील मुद्यांची सविस्तर माहिती घेणे गरजेचे आहे.

फक्त गुन्हा उघडकीस आणला यातच समाधान न मानता प्रत्येक आरोपीला शिक्षा व्हावी या उद्देशाने मनापासून गुन्ह्याचा तपास करावा. म्हणजे गुन्हे शाबितीचे प्रमाण वाढेल. प्रत्येक पोलीस अधिकाऱ्याने ठरविले तरच हे शक्य आहे.

प्रथम खबर घेताना कोणत्या गोष्टींची काळजी घेणे आवश्यक आहे याची माहिती पोलीस ठाणे अंमलदार म्हणून काम करणाऱ्या पोलीस उपनिरीक्षक, सहायक पोलीस उपनिरीक्षक व पोलीस हवालदार यांना

असणे गरजेचे आहे. प्रथम खबर नोंदवून घेणे हे पोलीस अधिकारी या नात्याने त्याचे प्राथमिक कर्तव्य असूनसुद्धा पोलीस अधिकारी प्रथम खबर नोंदवून घेण्यास टाळाटाळ करतात. कधी कधी त्याचे स्वरूप कमी करणे अथवा वाढविणे किंवा गुन्हा दाखलच न करणे (Burking of Offence) किंवा खबर देणाऱ्यास अर्ज लिहून आणण्यास सांगतात. या सर्वच आक्षेपार्ह घटना असून त्यावरून पोलीस अधिकाऱ्याचा सुरवातीपासूनच नकारात्मक दृष्टिकोन दिसून येतो. म्हणून हा दृष्टिकोन प्रथम बदलणे गरजेचे आहे. अशा प्रकारे वर्तन करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द कठोर पावले उचलणे गरजेचे आहे.

काही पोलीस अधिकारी दखलपात्र गुन्ह्याची प्रथम खबर दाखल न करता अर्ज चौकशी सुरू करतात. ही अत्यंत चुकीची बाब आहे. पोलीस अधिकाऱ्यांना दखलपात्र गुन्ह्याच्या अर्जाची चौकशी करण्याचा अधिकार कायद्याने दिलेला नाही, असे असतानासुध्दा चौकशी करणे बेकायदेशीर आहे. कायद्याने पोलिसांना तपासाचे व मॅजिस्ट्रेट किंवा न्यायाधीशांना व त्यांनी अधिकार प्रदान केलेल्या इसमांना चौकशी करण्याचे अधिकार आहेत.

या बाबतीत माननीय उच्च व उच्चतम न्यायालयाने दिलेल्या निवाड्यात स्पष्ट केलेले आहे. त्यानुसार फक्त ए.सी.बी.चे अधिकाऱ्यांना चौकशीचे अधिकार आहेत, असे पी. सिराजउद्दीन वि. स्टेट ऑफ मद्रास (१९६४ सर्वोच्च न्यायालय) या खटल्यात नमूद आहे. तसेच एस. आर. अग्रवाल वि. स्टेट ऑफ महाराष्ट्र क्रिमिनल रिट पिटीशन क्र. २२९७ / २००६ या याचिकेत न्यायमूर्ती श्रीमती रंजना देसाई व अनुप मोहता यांच्या खंडपीठाने दिनांक ३० एप्रिल २००७ रोजी दिलेल्या निकालात पोलीस अधिकाऱ्यांना दखलपात्र गुन्हा दाखल करण्यापूर्वी जर संशय असेल तर त्याबाबतीत त्यांनी स्टेशन डायरीत नोंद घेऊन, प्राथमिक चौकशी करून चौकशीत गुन्हा घडल्याचे निष्पन्न झाल्यास गुन्हा दाखल करून तपास करावा. प्राथमिक चौकशीत गुन्हा घडल्याचे निष्पन्न होत नसेल तर स्टेशन डायरीत तशी नोंद करून त्याची एक प्रत तक्रारदारास व एक प्रत वरिष्ठांना सादर करावी. शक्यतोवर अशी प्राथमिक चौकशी गोपनीयरित्या करावी, असे नमूद केले आहे.

- **आरोपीला शिक्षा होण्याकरिता खालील मुद्दे लक्षात ठेवावे :**

१. प्रथम खबरमध्ये खबर देणाऱ्या व्यक्तीचे पूर्ण नाव, तसेच टोपण नाव, वय, व्यवसाय, त्याचा पूर्ण पत्ता, दूरध्वनी क्रमांक, मोबाईल क्रमांक, ई-मेल वगैरे न चुकता नमूद करणे गरजेचे आहे. आवश्यकता असेल तेथे प्रथम खबर देणारा व आरोपीच्या जातीचा / पोटजातीचा उल्लेख करावा, त्याकरिता जातीचे मूळ प्रमाणपत्र / वैधता प्रमाणपत्र घ्यावे. झेरॉक्स प्रत किंवा ॲफिडेव्हीट घेऊ नये ते पुराव्याच्या दृष्टीने महत्त्वाचे नाही. फक्त शाळा सोडल्याचा दाखला असणे उपयोगी ठरत नाही.

२. प्रथम खबर उशिरा आल्यास उशिराचे कारण स्पष्ट नमूद करावे.

३. गुन्हा घडल्याचा निश्चित दिनांक, वेळ व ठिकाण नमूद करावे. (माहिती असल्यास) गुन्ह्याचा हेतू, उद्देश व गुन्ह्यात वापरलेले हत्यार हे स्पष्ट नमूद करावे.

४. प्रत्यक्ष घटना पाहणारे साक्षीदारांचे नाव, पूर्ण पत्ता, व्यवसाय व दूरध्वनी / मोबाईल क्र. लिहावा.

५. आरोपीचे नाव वर्णन व्यंग (असल्यास) इत्यादींचा उल्लेख करावा.

६. गुन्ह्यात वापरलेल्या हत्याराची माहिती लिहावी व ते जप्त करावे.

७. मालमत्तेच्या गुन्ह्यात वर्णन, आकार, किंमत, ओळखीच्या खुणा किंवा इतर वैशिष्ट्ये नमूद करावे.

८. रुग्णालयात प्रथम खबर घेताना, खबर देणारा हा खबर देण्याच्या परिस्थितीत असल्याबाबत वैद्यकीय अधिकाऱ्याचा दाखला घ्यावा व त्यावर दिनांक व वेळ न चुकता लिहिण्यास विनंती करावी व त्यांची स्वाक्षरी घ्यावी.

९. प्रथम खबरीत नकारात्मक मजकूर लिहू नये. उदा. मारले तेव्हा अंधार होता, तेथे कोणीही हजर नव्हते,

माझा कोणावर संशय नाही, वाहनाचा क्रमांक माहीत नाही, आरोपींनी तोंडाला रूमाल, मफलर बांधलेले होते इत्यादी.

१०. खाडाखोड करू नये, अक्षरावर अक्षर लिहू नये, व्हाईटनरचा तर मुळीच उपयोग करू नये, पुराव्याच्या दृष्टीने अशी कृती संशयास्पद ठरते व त्याचा फायदा आरोपीलाच मिळतो, चुकून चुकीचा मजकूर लिहिला गेला असेल तर स्पष्टपणे खोडावे व त्या ठिकाणी संक्षिप्त स्वाक्षरी करावी व फिर्यादीची संक्षिप्त स्वाक्षरी घ्यावी.

११. तक्रारदार फितूर होतात. त्यांना विश्वासात घेऊन ते फितूर होणार नाही याची खबरदारी घ्यावी.

१२. प्रथम खबर तत्काळ, साध्या, सोप्या भाषेत व खबर देणाऱ्याच्या शब्दात / भाषेत लिहून घ्यावी. आवश्यक असेल तर दुभाषी वापरावा. त्यामध्ये मोघम विधाने टाळावीत व खबर देणाऱ्यास खबर वाचून दाखवावी.

१२. प्रथम खबर देणारा जरी आरोपी असला तरी त्याची प्रथम खबर घेतलीच पाहिजे व त्याने कबूल केलेल्या घटनेव्यतिरिक्त इतर घटना पूरक अशा पुराव्याने न्यायालयात शाबित करता येतात. म्हणून आरोपीची खबरसुध्दा पुराव्याच्या दृष्टीने महत्त्वाची असते. शक्यतोवर अशी खबर घेताना वैद्यकीय अधिकारी किंवा तालुका दंडाधिकारी यांच्या उपस्थितीत घेतल्यास तिला पुराव्याच्या दृष्टीने अधिक महत्त्व प्राप्त होते.

१३. तक्रारदाराचा पुरवणी जबाबाचा कायद्याच्या आधाराने उपयोग करून घेऊन मूळ खबरीमध्ये असलेल्या त्रुटी काढून टाकाव्यात. ठराविक गुन्ह्यांचे संदर्भात घेण्यात येणाऱ्या पुरवणी जबाबास पुराव्याच्या दृष्टीने महत्त्व असते. अन्यथा इतर पुरवणी जबाबास पुराव्याच्या दृष्टीने महत्त्व नाही. पुरवणी जबाब घेतल्यानंतर जर त्यात इतर पुष्टी करणारा पुरावा उपलब्ध झाला तर त्यास निश्चितच पुराव्याच्या दृष्टीने महत्त्व आहे.

## • आरोपी निर्दोष सुटल्याचे निवाडे :

१. टंकलिखित केलेल्या तक्रारीत हस्ताक्षरात अधिक मजकूर लिहिणे, त्यावर स्वाक्षरी न करणे, आरोपीला अटक केल्याची स्टेशन डायरी, अटक रजिस्टरचे व मुद्देमाल रजिस्टरची मूळ प्रत न्यायालयात हजर न करणे.

२. खबर देणाऱ्याने प्रथम खबरमध्ये आरोपीचे वर्णन नमूद केलेले नव्हते.

३. प्रथम खबर अहवालात विसंगती. उदा. प्रथम खबरीत ७३ बनावट नोटा जप्त केल्याचे नमूद होते तर तपासणीसाठी पाठविलेल्या अहवालामध्ये ८२ नोटा असल्याचे नमूद होते.

४. एकच खबर दोन पोलीस स्टेशनला दाखल झाल्याने दोन्ही प्रथम खबरीमध्ये विसंगती आढळून आल्या.

५. गुन्हा दाखल करण्यामध्ये १५ दिवसांचा झालेल्या विलंबाचे कारण प्रथम खबरीमध्ये स्पष्ट केले नाही.

६. गुन्हा दाखल झाल्यानंतर प्रथम खबरी अहवालाची प्रत विनाविलंब कलम १५७ (१) अन्वये संबंधित न्यायालयाकडे पाठविली नाही.

## कायदेशीर तरतुदी :

### दखलपात्र गुन्हा घडल्याची माहिती (कलम १५४ फौ.प्र.सं.) :

१. दखलपात्र गुन्हा घडल्याची जी खबर पोलीस ठाण्यातील अंमलदाराला तोंडी देण्यात येईल ती खबर त्याने प्रत्येक प्रसंगी लिहून घेतली पाहिजे, किंवा कोणाला हुकूम करून स्वत:च्या देखरेखीखाली त्याच्याकडून लिहून घेतली पाहिजे, अशा हरएक खबरीवर मग ती लेखी असो किंवा वर उल्लेख केल्याप्रमाणे लिहून घेण्यात आलेली असो, ज्या मनुष्याने ती दिली असेल, त्याने त्यावर सही केली पाहिजे आणि त्या खबरीचा सारांश राज्य सरकार ठरवील त्या नमुन्याप्रमाणे अंमलदाराने ठेवावयाच्या पुस्तकात दाखल केला पाहिजे. (समजा जर अशी माहिती एखाद्या पीडित महिलेने दिली असेल, जिच्यावर आय.पी.सी.च्या पुढील कलमाखाली किंवा त्या कलमानुसार

अत्याचार झालेला असेल, ती कलमे-भा.दं.स कलम ३२६ अ, कलम ३२६ ब, कलम ३५४, कलम ३५४ अ, कलम ३५४ ब, कलम ३५४ क, कलम ३५४ ड, कलम ३७६, कलम ३७६ अ, कलम ३७६ ब, ३७६ क, ३७६ ड, कलम ३७६ इ किंवा कलम ५०९ जेव्हा ह्या कलमांनुसार अपराध केला गेला असेल किंवा अपराध घडवण्याचा प्रयत्न केला गेला असेल, तेव्हा त्याची माहिती महिला पोलिस अधिकाऱ्याने किंवा अन्य महिला अधिकाऱ्याने नोंदवावी.)

अ) जेव्हा एखाद्या व्यक्तीच्या बाबतीत गुन्हा खालील कलमांअंतर्गत भा.दं.सं. कलम ३५४, कलम ३५४ अ, कलम ३५४ ब, कलम ३५४ क, कलम ३५४ ड, कलम ३७६, कलम ३७६ अ, कलम ३७६ ब, ३७६ क, ३७६ ड, कलम ३७६ इ किंवा कलम ५०९ आय.पी.सी. घडला असल्यास किंवा गुन्हा घडवण्याचा प्रयत्न केला असल्यास व ज्यामुळे व्यक्तीला तात्पुरते किंवा कायमचे मानसिक किंवा शारीरिक अपंगत्व आल्यास अशा व्यक्तीचा प्रथमदर्शनी अहवाल पोलीस अधिकाऱ्याने तिच्या घरी जाऊन किंवा त्या व्यक्तीला सोयीस्कर अशा ठिकाणी जाऊन व अशा वेळी एखाद्या दुभाष्याला किंवा विशेष शिक्षण तज्ज्ञास, जशी गरज भासेल तसे, बरोबर न्यावे.

ब) अशा अहवालाचे छायाचित्रणदेखील करता येईल.

क) पोलीस अधिकाऱ्याने अशा व्यक्तीचा जबाब न्यायालयीन दंडाधिकाऱ्यासमोर कलम १६४ पोटकलम (५अ) चा खंड(क) नुसार नोंदवावा.

२) अशा प्रकारे पोटकलम १ अंतर्गत नोंदविलेल्या माहितीची प्रत, माहिती देणाऱ्यास विनाशुल्क देण्यात यावी.

३) पोलीस ठाण्यातील अंमलदाराने पोट कलम (१) अन्वये त्याला देण्यात आलेली खबर दाखल करून घेण्यास नकार दिला असेल, तर त्यामुळे ज्या मनुष्यावर अन्याय झाला असेल, अशा मनुष्यास सदरहू खबरीचा लेखी सारांश संबंधित पोलीस अधीक्षक यांच्याकडे पोस्टाने पाठविता येईल आणि जर त्या पोलीस अधीक्षकाची अशी खात्री झाली की, सदर खबरीनुसार दखलपात्र अपराध घडला आहे, असे स्पष्ट होत आहे, तर त्याने अधिनियमान्वये तरतूद केल्याप्रमाणे सदर अपराधाच्या तपासाचे काम स्वत: हाती घेतले पाहिजे किंवा आपल्या हाताखालील कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याकडे काम सोपविण्याचा हुकूम केला पाहिजे, त्या पोलीस अधिकाऱ्याला सदरहू अपराधाच्या बाबतीत पोलीस ठाणे स्वाधीन असणाऱ्या अंमलदारास जे अधिकार आहेत, ते सर्व अधिकार असतील.

## प्रथम खबर अहवाल / F.I.R. कसा नोंदवावा?

१) माहिती देणाऱ्या व्यक्तीला जे सांगायचे असेल तेच अहवाल नोंदविताना लिहावे.

२) खबर शक्यतो अतिशय साध्या व सोप्या भाषेत लिहावी व ती नोंदवणाऱ्याच्याच हस्ताक्षरात, भाषेत, शब्दात लिहावी.

३) कुठलीही तांत्रिक किंवा कायदेशीर भाषा किंवा क्लिष्ट शब्दरचनेचा वापर करू नये.

४) तक्रारीमध्ये कुठलीही खाडाखोड करू नये.

५) खबर जर तोंडी दिली असेल तर माहिती देणाऱ्या इसमाने तोंडी दिलेली माहिती लिहून घ्यावीत त्याला वाचून दाखवून त्याने ती योग्य व बरोबर असल्याबाबत मान्य केल्याबाबत एक वाक्य लिहून शेवटी खबर देणाऱ्या इसमाची सही/अंगठा घ्यावा.

६) खबर देणाऱ्या व्यक्तीने त्यावर स्वाक्षरी करणे गरजेचे आहे.

७) खबर/माहिती लिहून देत असल्यास व ती माहिती खबर देणाऱ्या व्यक्तीखेरीज दुसऱ्या व्यक्तीने लिहिली

असल्यास सदर व्यक्तीची स्वाक्षरी घेणे गरजेचे आहे.

८) आरोपीचे वर्णन, तो तक्रारदाराच्या ओळखीचा असल्यास त्याचे नाव लिहिणे, तक्रारदार व आरोपीचे नातेसंबंध असल्यास उल्लेख करणे.

९) पहिल्या खबरीत नकारात्मक उल्लेख लिहू नये.

१०) मालमत्तेच्या गुन्ह्यात मालमत्तेचे वर्णन, वजन, आकार, किंमत व ओळखीच्या खुणा लिहाव्यात.

११) तक्रारदार हा अन्य भाषिक असल्यास दुभाषकाची मदत घ्यावी व फिर्यादीस त्याच्या भाषेत प्रथम खबर वाचून दाखवावी व समजावून सांगावी तसेच दुभाषकाच्या नावाची नोंद फिर्यादीत घेऊन दुभाषकाचा वेगळा जबाब घ्यावा.

पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्याने मिळालेल्या माहितीचा सखोल उल्लेख स्टेशन डायरीत नोंदवावा. स्टेशन डायरीत नोंदविलेली माहिती पुरावा कायद्याच्या कलम ३५ प्रमाणे ग्राह्य आहे. जेव्हा फिर्यादी पक्ष स्टेशन डायरीतील नोंदी शाबीत करतात तेव्हा असे ग्राह्य धरले जाते की, अशा नोंदी नोंदवल्या गेल्या आहेत.

फौजदारी प्रक्रियेत प्रथम खबरी अहवाल हा तपासाचा अतिशय महत्त्वाचा भाग असतो. फौ.प्र.सं.च्या कलम १५६ अंतर्गत कोणत्याही पोलीस ठाणे अंमलदारास, अधिकाऱ्यास अशा केसचा तपास करण्याचे अधिकार असतात, जी केस फौ.प्र.सं. च्या कलम १५४ अंतर्गत नोंदविली आहे. जेव्हा एखादा पोलिस अधिकारी, कोणतेही वाजवी कारण नसताना, कायद्याने दिलेल्या तरतुदीप्रमाणे काम करायला चुकतो, तेव्हा त्याने भा.दं.सं. च्या कलम १६६ (अ) अंतर्गत गुन्हा केला आहे असे समजले जाते.

## भा.दं.वि.च्या कलम १६६ (अ) अंतर्गत :

सदर कलमातील तरतुदी खालीलप्रमाणे :

कलम १६६ अ : लोकसेवकाने कायद्यानुसार दिलेल्या सूचनांची अवज्ञा करणे.

## लोकसेवक असलेला जो कोणी :

अ) गुन्हे अन्वेषणासाठी किंवा तशा परिस्थितीत एखाद्या व्यक्तीची एखाद्या ठिकाणी उपस्थिती आवश्यक असताना तसे करण्यास मज्जाव करण्याच्या कायदेशीर सूचनेची जाणीवपूर्वक अवज्ञा करील, किंवा ....

ब) गुन्हे अन्वेषणासाठी किंवा अन्य बाबतीत अशा प्रकारे त्याने गुन्हे अन्वेषण करावे या संबंधीच्या कायदेशीर सूचनेचे, संबंधिताचे मन कलुषित करण्यासाठी, जाणीवपूर्वक अवज्ञा करील किंवा....

क) भा.दं.वि. कलम ३२६ अ, कलम ३२६ ब, ३५४अ, ३५४ ब, ३७०, ३७० अ, ३७६, ३७६ अ, ३७६ ब, ३६७ क, ३७६ ड, ३७६ इ किंवा ५०९ च्या अंतर्गत शिक्षापात्र असलेल्या दखलपात्र गुन्ह्यांचे बाबतीत फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ कलम १५४(१) प्रमाणे त्याला दिलेली कोणतीही माहिती नोंदविण्यास कसूर करील त्याला सहा महिन्यांपेक्षा कमी नसलेल्या परंतु व दोन वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या सश्रम कारावासाची शिक्षा होऊ शकेल आणि त्यास प्रसंगी दंड रक्कमही भरावी लागेल.

पोलीस ठाण्यातील पदभार सांभाळणाऱ्या अधिकाऱ्याने प्रथम खबर अहवाल नोंदवताना अधिक काळजी घेणे गरजेचे आहे. पुराव्याच्या दृष्टीने पहिली खबर समर्पक पुरावा नव्हे, असे असले तरी ती खबर देणाऱ्याच्या म्हणण्याचे समर्थन करण्यासाठी किंवा अशी पहिली खबर देणाऱ्याच्या वक्तव्यास तडा देण्यासाठी त्याचा उपयोग करता येतो. (ए.आय.आर. १९६० सु.को. ३९१ पान नं. ३९५) म्हणूनच प्रथम खबर अहवाल हा फौजदारी तपासातील एक महत्त्वाचा भाग मानला जातो. प्रथम खबर अहवाल हा फौजदारी तपासातील एक महत्त्वाचा भाग मानला जातो. प्रथम खबर अहवाल नोंदवणे हे तपासातील प्रारंभीचा भाग असतो.

- सदरची माहिती ही दखलपात्र गुन्ह्याविषयीच असावी.

- सदरची माहिती पोलीस ठाणे स्वाधीन असलेल्या अंमलदारास द्यावी.
- सदरची माहिती लिहिणे गरजेचे आहे, जर ती माहिती आधीच लिहिली असेल तर त्यावर ती माहिती देणाऱ्या व्यक्तीची स्वाक्षरी असणे जरूरी आहे आणि जर सदरहु खबर तोंडी दिल्यास ती लिहून सदर इसमास वाचून दाखवावी व त्यानंतर त्यावर सदर इसमाची स्वाक्षरी घ्यावी.
- सदरची माहिती ही पोलिस ठाण्यातील रजिस्टरमध्ये नोंदवणे गरजेचे आहे. (सार्वजनिक/ठाण्यातील डायरी)

जेव्हा फौ.प्र.सं.च्या कलम १५४ च्या तरतुदीनुसार जबाब नोंदवला जातो त्यास प्रथम खबर अहवाल म्हणजेच एफ.आय.आर. असे संबोधले जाते. प्रथम खबर ही ती खबर आहे जी सर्व प्रथम पोलीस ठाण्यात दिली जाते व त्यावरूनच पोलीस सदर गुन्ह्यांची नोंद कशी करायची हे ठरवून तिची नोंद करतात. (ए.आय.आर.१९७५ सु.को. १४५३)

घडलेल्या दखलपात्र गुन्ह्यांच्या संदर्भात पोलीस तपासात जे दस्तऐवज तयार करण्यात येतात, त्यात प्रथम खबर अहवाल हा सर्व प्रथम दस्तऐवज असतो. एखाद्या माहितीला प्रथम खबर अहवाल असे फौ.प्र.सं. कलम १५४ प्रमाणे मानताना सदरची माहिती दखलपात्र गुन्ह्याच्या संदर्भात असावी व सदरची माहिती ही संदिग्ध नसावी, तसेच अशी माहिती घडलेल्या घटनेला धरून असावी. (आसाम राज्य विरुद्ध यु.एन. राजखोवा १९७५ क्रि.लॉ.ज.३५४ पान नंबर ३७७)

## ठाणे दैनंदिनीत माहितीचा तपशील नोंदविला न जाणे :

जेव्हा प्रथम खबरीतील माहिती स्टेशन डायरीत/रोजनिशीत लिहिली जात नाही व त्यावरील गुन्हेगारांची नावे किंवा साक्षीदारांची किंवा गुन्ह्याची घटना घडल्याचा तपशील ह्या बाबींचीदेखील नोंद केली गेली नसेल तेव्हा असे मानले जाते की, क्रि.प्रो.कलम १५४ च्या तरतुदींची पूर्तता झालेली नाही. जेव्हा प्रथम खबर अहवालाचा तपशील रोजनिशीत नोंदवला जात नाही, तेव्हा त्याचा अर्थ असा होतो की, जेव्हा रोजनिशी तयार केली तेव्हा घटनेविषयी तपशीलवार माहिती उपलब्ध नव्हती. (१९६६ चांद एल.आर. (क्रि.) ४१)

## स्टेशन डायरीतील नोंदींना प्रथम खबर अहवाल मानता येईल :

जेव्हा स्टेशन डायरीत दखलपात्र गुन्हा घडल्याविषयी तपशीलवार माहिती लिहून नोंदविलेली असेल तेव्हा त्यालाच एफ.आय.आर/ प्रथम खबर अहवाल मानता येईल आणि त्यानंतर उशिरा दिलेल्या दखलपात्र गुन्ह्याच्या माहितीला प्रथम खबर मानता येणार नाही.(८७ सी.डब्ल्यु.एन.७२३)

## पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांना केस नोंदविणे बंधनकारक आहे :

कलम १५४ च्या तरतुदींप्रमाणे जेव्हा, सर्व पूर्तता करून माहिती दिली गेली असेल, तेव्हा पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांना त्याची नोंद करणे बंधनकारक असते. (१९९२ क्रि.लॉ.ज. ५२६ : १९९२ सप्लिमेंट (१) एस.सी.सी. ३३५)

पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्याने दखलपात्र गुन्हा नोंदवण्यास केवळ सदरचा गुन्हा त्यांच्या प्रादेशिक अधिकार क्षेत्रात घडला नाही, ह्या कारणावरून नकार देणे म्हणजे तो त्याच्या कर्तव्यात हयगय करत असल्याचे मानले जाते. अशा केसमध्ये सदर पोलीस अधिकाऱ्याने अशी माहिती नोंदवून ज्या पोलीस ठाण्याच्या अधिकार क्षेत्रात सदरची घटना घडली असेल, अशा पोलीस ठाण्याला ती माहिती पाठवावी. (ए.आय.आर. १९९३ सु.को. २६४४ : १९९३ क्रि.लॉ.ज. ३६८४ : १९९४ सु.को.के. (क्रि.) ७३४)

प्रथम खबर अहवाल हा नेहमी पोलीस ठाण्यात दिला पाहिजे. पोलीस अधिकाऱ्याला जर अशा दखलपात्र गुन्ह्याच्या संदर्भात समाधानकारक माहिती मिळाली नसेल, तरीही त्याने सार्वजनिक डायरीत त्याची नोंद

करणे गरजेचे आहे व त्यानंतर त्याने घटनास्थळी जाऊन ज्याला त्या गुन्ह्याच्या बाबतीत सर्व माहिती असेल अशा व्यक्तीकडून माहिती घ्यावी व नंतर तक्रार नोंदवावी. (ए.आय.आर. १९८१ सु.को.१२३०)

## प्रथम खबर अहवाल दाखल करण्यात विलंब झाल्यास त्याचा परिणाम :

माहिती देण्यास उशीर झाल्याचे कारण वाजवी व समाधानकारक असावे. उशीर झाल्याबद्दल समाधानकारक कारण नसेल, तर तक्रारदारास ते हानिकारक ठरू शकते.

उशीर झाल्यामुळे गावात उलटसुलट चर्चा होऊन बनावट गोष्टी तयार होऊ शकतात. उशिराबाबत समाधानकारक स्पष्टीकरण नसेल तर, फिर्यादी पक्षाची केस विश्वासास पात्र होत नाही. (१९७६ क्रि.लॉ.ज. १८८८ सु.को.)

जेव्हा प्रथम खबर अहवाल देण्यास विलक्षण उशीर, असमाधानकारक कारणांमुळे झाला असेल, तेव्हा अशा अहवालाकडे संशयाने बघावे. (१९८३ क्रि.लॉ.ज. ११०५ सु.को.)

## प्रथम खबर अहवालाचे महत्त्व :

गुन्ह्याचे स्वरूप व परिस्थिती यावर प्रथम खबर अहवालाचे महत्त्व अवलंबून असते. माहिती देणाऱ्या इसमाचे स्थळ व असा गुन्हा घडल्याची घटना पूर्णपणे किंवा काहीअंशी बघण्याची त्याला मिळालेली संधी, अर्थात फिर्यादी पक्षाची केस ही पूर्णपणे नाकारण्याचे हे कारण होऊ शकणार नाही की, प्रथम खबर अहवालामधील कारणे पूर्णपणे वेगळी आहेत व अशी खबर देणाऱ्या व्यक्तीने वेगळीच माहिती पुरवली आहे. (१९७३ क्रि.लॉ.ज. ६८० सु.को.) प्रथम खबरीत जर काही घडलेल्या गोष्टी वगळल्या गेल्या, तर त्याचा त्या केसच्या बाबतीतील संभाव्यतेवर परिणाम होतो. (१९९५ सु.को.के.(फौ.)३१३).

प्रथम खबर अहवाल हा सार्वजनिक दस्तऐवज म्हणून मानला जातो. (भा.पु.का.क. ७४ अन्वये) त्याची प्रमाणित नक्कल पुराव्यात हजर करता येते. (भा.पु.का.कलम ७७ अन्वये) (ए.आय.आर. १९५५ अ ११३२५)

## काही गोष्टी वगळल्या गेल्यास त्याचा परिणाम :

गुन्हेगाराचे नाव जर प्रथमदर्शनी अहवालात लिहायचे वगळले गेले तर ते गुन्हेगाराच्या दृष्टीने फायद्याचे ठरेल. प्रथम खबर देणाऱ्याला गुन्हेगाराविषयी माहिती होती, परंतु तो जाणीवपूर्वक त्याचे नाव वगळतो व अशा खबरीने गुन्हेगारास बघितले असण्याचीदेखील शक्यता असते. (१९७४ क्रि.लॉ.ज. १३७८ सु.को.) परंतु जर तक्रार देणाऱ्या इसमाने गुन्हेगाराचे नाव जरी सांगितले नसले तरीही, त्याच्या कामाच्या ठिकाणाविषयी व त्याच्या हुद्याविषयी त्याला असलेली माहिती तक्रारदाराने दिल्यास, त्याला पहिल्या खबरीतून काही गाळल असे म्हणता येणार नाही. (१९७३ क्रि.लॉ.ज.सु.को.)

केवळ साक्षीदार किंवा हल्लेखोराचे नाव प्रथम खबर अहवालामध्ये न लिहिल्यावरून असे मानता येत नाही की, त्याने अपराधाची घटना घडताना पाहिली नाही. जर त्याचे स्पष्टीकरण पटण्यासारखे असेल, जसे माहिती देणाऱ्या इसमाच्या व्यग्र/व्याकुळ मन:स्थितीमुळे तो बेशुद्ध झाला. (१९७७ क्रि.लॉ.ज.४२ सु.को.ऐ.आय.आर. १९७५ सु.को.४६१) तर त्याने घटना घडतांना पाहिल्याचे मानता येईल.

## टेलिफोनने कळविलेला निरोप :

तार अथवा टेलिफोनद्वारे दिलेली माहिती प्रथम खबर नव्हे. कायद्यानुसार अशा पद्धतीने दिलेली माहिती प्रथम खबर मानता येत नाही, कारण त्यात अस्सलपणा नसतो व त्यावर माहिती सांगणाऱ्या इसमाची स्वाक्षरी घेता येत नाही. (ए.आय.आर. १९५४ सौ ५५ ॲक्ट पी. ६०)

एखाद्या संदिग्ध, स्पष्ट व्यक्त न केलेल्या आणि गूढ अर्थ असावा असा निरोप एखाद्याने फोनवरून

दिल्याने तपास अधिकारी घटनास्थळी पोहोचल्यास त्याला प्रथम खबर अहवाल मानता येणार नाही. परंतु सदर परिस्थितीत मृत व्यक्तीच्या जवळच्या नातेवाईकाचे कथन तपास अधिकाऱ्याने नोंदवल्यास त्याला प्रथम खबर अहवाल मानता येईल.(जे.टी.१९९४ (१) सु को ३३).

## प्रथम खबर अहवाल ई-मेलद्वारे देणे :

माहिती व तंत्रज्ञान कायदा २००० कलम ४ आणि ५ अन्वये इलेक्ट्रॉनिक अहवाल आणि डिजिटल स्वरूपात केलेली सही याला कायदेशीर मान्यता आहे. जर एखादी माहिती किंवा विशिष्ट बाब निदर्शनास आणून दिली किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून उपलब्ध करून दिली गेली व जी एखाद्या घटनेचा संदर्भ म्हणून वापरात आणता आली, तर त्यास त्या संबंधीच्या कायद्याची पूर्तता केल्याप्रमाणे मानले जाते. जसे एखादी गोष्ट लिखित किंवा टंकलिखित करून उपलब्ध झाल्याप्रमाणे मानले जावे.

## मृत्युपूर्व जबाबास प्रथम खबर अहवाल गृहित धरणे :

जर एखाद्या व्यक्तीने मृत्युपूर्व जबाब दिला व त्यानंतर नोंदविलेल्या कारणांमुळे किंवा नोंदविलेल्या परिस्थितीनुसार तिचा मृत्यू घडला तर अशा मृत्युपूर्व जबाबास प्रथम खबर अहवाल म्हणून गृहित धरता येईल. (ए.आय.आर. १९६८ सु.को १२८१)

## गुन्हेगाराने नोंदविलेला प्रथम खबर अहवाल - कबुली :

जेव्हा दखलपात्र गुन्ह्यातील गुन्हेगार स्वत:च ठाण्यात येऊन प्रथम खबर देतो, तेव्हा अशी खबर नोंदवून घेणे क्रमप्राप्त आहे. त्यामध्ये गुन्ह्यांचा कबुली जबाब नसेल तर त्याने पुरविलेली इतर माहिती आक्षेपार्ह ठरत नाही. जेव्हा अशी प्रथम खबर जी गुन्हेगार देतो, तेव्हा ती कबुली सरळ साधी कबुली असू शकेल किंवा वास्तविक घटना अशा पद्धतीने वर्णन करून सांगितलेली असेल, ज्यात ती व्यक्ती स्वत:ला दोषमुक्त दाखवू इच्छिते किंवा ती पोलिसांना दिलेली केवळ गुन्हा केल्याबद्दलची माहिती असू शकते.

एखादी प्रथम खबर जी गुन्हेगाराने दिलेल्या कबुली जबाबाप्रमाणे नोंदवली असेल तिला त्या व्यक्तिविरुध्द पुरावा मान्य करता येणार नाही, मात्र सत्य परिस्थितीनुसार गुन्हेगाराने गुन्हा घडल्याबरोबर तसा जबाब नोंदवल्यास की, तो गुन्हा त्याच्या हातून घडला आहे, तेव्हा पुराव्याचा कायदा कलम ८ नुसार अशी माहिती पुरावा म्हणून अपराधाची खबर होते. तसेच त्याने पुरविलेली माहिती जेव्हा सत्य घटनेचा शोध घेण्यास मदत करते, तेव्हा पुराव्याचा कायदा कलम २७ प्रमाणे ते सत्य अपराध होते. (सु.को.अ.अ. ३७/६५ - अघनू नागेसीया वि.बिहार राज्य शासन)
जेव्हा आरोपी स्वत: हजर राहून गुन्ह्याची खबर देतो, तेव्हा पुरावा म्हणून अशा खबर देणाऱ्या इसमाविरुद्ध तिचा स्वीकार म्हणून सिद्ध करता येतो व त्यास प्रथम खबर अहवाल म्हणून आक्षेप नाही. (पुराव्याचा कायदा कलम २१ अंतर्गत.)

## प्रथम खबर अहवाल दंडाधिकाऱ्यांकडे कसा सादर करावा? :

प्रथम खबर अहवाल ताबडतोब पाठविण्याचा हेतू हा क्रि.प्रो.को. च्या कलम १५७ व १५८ मधील तरतुदी एकत्र केल्यास त्यात निर्देशित केला आहे. प्रथमत: फिर्यादी पक्षाने मूळ घटनेची वास्तविकता जास्त सुधारित पद्धतीने लिहू नये आणि इतर कुणाच्या सल्ल्याने किंवा काही हेतूने घटनेची सत्यता बदलू नये आणि दुसरी तरतूद म्हणजे तपास कामावर सदर केसचे काम बघणाऱ्या दंडाधिकाऱ्यांना लक्ष ठेवता यावे. (१९९४ सु.को.के. (फौ) १५५१).

क्रि.प्रो.को.कलम १५७ अन्वये, पोलीस ठाण्याच्या अंमलदारास प्रथम खबर मिळाल्यावर तो अहवाल त्वरित दंडाधिकाऱ्यांकडे पाठविणे क्रमप्राप्त आहे. पोलिसांनी प्रथम खबर अहवाल दंडाधिकाऱ्यांकडे पाठवण्यास उशीर करता कामा नये व अशा दंडाधिकाऱ्यांनीदेखील ताबडतोब त्या अहवालाचे अवलोकन करावे. (१९७४

क्रि.प्रा.को. १३१३ सु.को)

प्रथम खबरीचा अहवाल सादर करण्यास दहा दिवसांपेक्षा जास्त उशीर झाल्यास त्यास विलक्षण उशीर मानला जातो व मग अशा अहवालाविषयी संशय निर्माण होतो. म्हणूनच प्रथम खबर देण्यास विलंब झाल्यास त्या विलंबाचे स्पष्टीकरण प्रथम खबरीमध्ये अंतर्भूत करण्यात यावे. असे स्पष्टीकरण संयुक्तिक अगर वाजवी असल्यास प्रथम खबर संशयास्पद ठरणार नाही.

दखलपात्र गुन्ह्याच्या केसेसमध्ये पोलीस ठाणे अंमलदाराने प्रथम खबरीची प्रत संबंधित मॅजिस्ट्रेट यांच्याकडे त्वरित रवाना करणे अत्यावश्यक आहे. कलम १५७ च्या तरतुदींप्रमाणे घटना घडल्याचा अहवाल त्वरित पाठविणे सक्तीचे आहे व तपासाच्या कामात ती एक महत्त्वाची पायरी आहे. (सी.डब्ल्यु. एन.१२१ : १९६१)

जो अधिकारी प्रथम खबर अहवाल तयार करतो त्याला सदर गुन्ह्यासंबंधित सर्व माहिती असणे गरजेचे आहे. कुठलीही लेखी तक्रार घेताना अशा अधिकाऱ्याने काळजी घेणे जरूरी असते. घडलेल्या गुन्ह्याची परिस्थिती व सर्व घटक समजून त्यासंबंधी खुलासा करून घेणे गरजेचे असते, त्यामुळे केस न्यायालयात चालवताना त्यात विरोधाभास निर्माण होत नाही, किंवा तसे दिसून येत नाही.

## प्रथम खबर अहवाल व्यापक कसा बनवाल? :

पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्याने नेहमी त्यांनी बनविलेला अहवाल सत्य व माहिती देणाऱ्या इसमाने दिलेल्या माहितीच्या आधारावर बनवल्याची खात्री बाळगावी. त्याने स्वत:चे मत प्रदर्शित करणे टाळावे आणि क्लिष्ट किंवा कायदेशीर भाषा वापरणेदेखील टाळावे. अहवाल हा माहिती देणाऱ्या इसमाच्या शब्दातच लिहावा.

## महत्त्वाचे नियम जे प्रथम खबर अहवालाला व्यापक बनवितात.

| | | |
|---|---|---|
| व्यापकता कशी आणावी?<br>प्रथम तोंडी व नंतर लेखी | काय?<br>(What?)<br>कोण?<br>(Who?)<br>कधी?<br>(When?)<br>कुठे?<br>(Where)<br>कोणती?<br>(Which?)<br>का?<br>(Why) | १) काय माहिती मिळाली?<br>२) तो काय म्हणून माहिती देतो? : साक्षीदार, पीडित, ऐकीव माहिती असलेला<br>३) गुन्हेगार काय घेऊन गेले?<br>४) गुन्हेगाराने काय सुगावा मागे ठेवला? गुन्हा कोणी केला?<br>५) पीडित कोण आहे?<br>६) तेथे कोण हजर होते?<br>७) कधी?<br>८) घटना कुठे घडली? (ती जागा)<br>९) कोणत्या पद्धतीने? (घटनेचे वर्णन)<br>१०) का? (गुन्ह्यामधील हेतू) |

## माहिती देणारा इसम तपासी अधिकारी नसावा :

फिर्यादी पक्षाच्या विश्वसनीयतेस बाधा येते. जेव्हा तपासाचे काम असा पोलीस अधिकारी करतो, ज्याने प्रथमदर्शनी अहवाल लाचलुचपतीच्या प्रकरणाचा बनवलेला असतो, ज्यात त्याच पोलीस अधिकाऱ्यास लाच

देण्याचा प्रयत्न झाला होता. (ए.आय.आर. १९७६ सु को ९८५)

## माहिती देण्याचे वगळल्यास / टाळल्यास त्याचा परिणाम :

क्रि.प्रो.को. कलम ३९ आणि ४० प्रमाणे जनतेवर आणि काही ठराविक अपराधांविषयी सरकारी नोकरांवर काही अपराधांची माहिती/खबर देण्याचे बंधन आहे ती न दिल्यास या कलमाप्रमाणे ते दोषी ठरतात व तसे करण्याचे कारण पटवून देऊन ते शाबीत करण्याची जबाबदारी अशा इसमावर असते व अन्यथा त्यास खालील कलमांतर्गत शिक्षा होऊ शकते.- कलम १५४ किंवा २०२ आय.पी.सी. (आय.एल.आर. १० कोलकाता ६१२ आय.एल.आर. २८ कोलकाता ९०४)

## खोटी माहिती देण्याचा परिणाम :

पोलीस ठाण्यातील अंमलदारास खोटी माहिती देणे हा गुन्हा आहे. आय.पी.सी. कलम १८२ किंवा २११ अन्वये. (५ सी डब्ल्यु एन ७२७, ४ क्रि.प्रो.को. ६८ कोलकाता)

## एखाद्या घटनेसंदर्भात एकच प्रथम खबर अहवाल असू शकतो :

एखाद्या घटनेच्या संदर्भात एकाहून अधिक खबर अहवाल नोंदवण्यास सर्वोच्च न्यायालयाने मज्जाव केला आहे. अर्थात त्या घटनेसंबंधी काही नवीन माहिती मिळाल्यास त्याची नोंद कि.प्रो.को.च्या कलम १६१ च्या तरतुदींनुसार करावी व चार्जशिटमध्ये तसे नमूद करावे. सुप्रीम कोर्टाने अगदी निक्षून असे सांगितले आहे की, पोलिसांचे हे कर्तव्य आहे की, सदर गुन्ह्यासंबंधी प्रथम खबर अहवालामधील फक्त दखलपात्र घटनांचीच नोंद करता कामा नये, तर सर्व गुन्हेगारी कृत्यांची किंवा व्यवहारांची, जी त्या गुन्ह्यासंबंधी घडली असेल त्याची दखल घ्यावी.

## केस लॉ :

## टी. टी. ॲन्थोनी वि.केरळ शासन ए.आय.आर. २००१ सु.को. २६३७

केरळच्या ''कन्नूर'' जिल्ह्यातील सर्वश्रुत घटनेमध्ये पोलिसांच्या गोळीबारात पाच लोक ठार झाले व बरेचसे जखमी झाले. पोलिसांनी विरोधकांच्या कार्यकर्त्यावर त्यांना शांत करण्यासाठी व जमावावर ताबा मिळण्यासाठी गोळीबार केला, ते लोक युडीएफ गटबंधनाच्या एका मंत्र्याच्या भेटीच्या वेळी प्रदर्शन करत होते. त्यानंतर माहीत असलेल्या कार्यकर्त्यांवर व विरोधकांतील अनेक अनोळखी इसमांविरुद्ध केसेस दाखल झाल्या. सामाजिक शांततेचा भंग केल्यामुळे पोलिसांना गोळीबार करावा लागला अशा आशयाची तक्रार नोंदवण्यात आली. त्या दरम्यान ह्या घटनेच्या विरोधात लोकांनी मोर्चे काढले व युडीएफ सरकारला न्यायालयीन चौकशीचे आदेश द्यावे लागले.

मधल्या काळात युडीएफ सरकार निवडणूक हारले व विरोधकांचे राज्य आले. त्या दरम्यान चौकशी आयोगाचा अहवाल तयार झाला आणि तो लोकांच्या माहितीसाठी प्रदर्शित करण्यात आला. नवीन सरकार स्थापन झाले व त्यांनी मुख्य दंडाधिकारी व पोलीस उपअधीक्षकास त्या मृत्यूसाठी जबाबदार धरले. ह्या चौकशी आयोगाच्या अहवालास ग्राह्य मानून मुख्य दंडाधिकारी व गोळीबार करणारे पोलीस कर्मचारी यांना त्या गोळीबारास जबाबदार धरण्यात आले व त्यांच्याविरुद्ध दावे दाखल करण्यात आले. मुख्य दंडाधिकारी व सर्व पोलीस अधिकाऱ्यांनी जेव्हा उच्च न्यायालयाने त्यांची त्यांच्याविरुद्ध दाखल केलेले दावे रद्द करण्याची मागणी फेटाळून लावली, तेव्हा त्यांनी सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागितली.

## ह्या अपिलांतून दोन महत्त्वाचे कायदेशीर मुद्दे उपस्थित केले :

१. जो गुन्हा घडला आहे त्यासंदर्भात दुसरा एफ.आय.आर. नोंदवता येतो का? आणि त्याच्या आधारे नवीन

चौकशी किंवा तपास करता येईल का?

२. त्याच घटनेबाबतचा चौकशी आयोगाचा अहवाल तपास करणाऱ्या एजन्सीवर बंधनकारक होईल का?

## सर्वोच्च न्यायालयाचे निरीक्षण :

१. प्रथम खबर अहवाल हा सर्व घटनेसंबंधी मिळालेल्या पहिल्या माहितीच्या आधारावर लिहिला व नोंदवला जातो. दुसऱ्या शब्दात म्हणायचे झाल्यास तो दखलपात्र गुन्ह्याविषयी सर्वप्रथम मिळालेल्या माहितीवर आधारित लिहिला व नोंदवलेला अहवाल असतो. म्हणूनच सर्वोच्च न्यायालयाने असे प्रतिपादन केले की, दुसऱ्यांदा प्रथम खबर अहवाल नोंदवण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

अर्थात, त्याच घटनेविषयी निरनिराळ्या लोकांकडून निरनिराळी व अधिक माहिती मिळू शकते. अशा परिस्थितीत सर्वोच्च न्यायालयाच्या म्हणण्यानुसार दंडाधिकाऱ्याकडे तो अहवाल दाखल करण्याअगोदर पोलीस ठाणे स्वाधीन अंमलदाराने अधिक तपास फक्त दखलपात्र गुन्ह्याचा तपास, जो त्या प्रथम खबर अहवालामध्ये नोंदवला गेला आहे, तेच न करता त्या घटनेसंदर्भात घडलेल्या इतर गुन्ह्यांच्या किंवा व्यवहारांचादेखील तपास करावा. त्यांचे असे म्हणणे आहे की, असा अहवाल दंडाधिकाऱ्याकडे दाखल केल्यानंतर जर तपास अधिकाऱ्यांच्या पुढील तपासात काही अजून गोष्टी निष्पन्न झाल्या तर, त्याने (तिने) पुन्हा ताजा एफ.आय.आर. नोंदवण्याची गरज नसते, त्याला (तिला) अधिक तपास करण्याचा अधिकार असतो. सर्वसाधारणपणे कोर्टाच्या आदेशानेच पुढील तपास करता येतो.

२. सर्वोच्च न्यायालयाच्या म्हणण्यानुसार चौकशी आयोगाचा अहवाल हा पोलिसांवर बंधनकारक नाही. सरकार त्यांच्या अनेक धोरणांतर्गत चौकशी आयोग नेमते व त्यांचा अहवाल मान्य करायचा की नाकारायचा हा सर्वस्वी सरकारचा निर्णय आहे. तरीही पोलीस अशी चौकशी आयोगाने प्रदर्शित केलेल्या अहवालाचा फायदा घेऊ शकतात व त्याचा त्यांच्या तपासातील एक भाग म्हणूनदेखील उपयोग करू शकतात. परंतु अशा अहवालामुळे पोलिसांच्या तपासातून मत बांधणी करण्यास अटकाव होऊ नये, जर त्यांनी गोळा केलेल्या पुराव्यावरून काही वेगळा निष्कर्ष लागत असल्यास अर्थात, पोलीस एक स्वतंत्र यंत्रणा आहे व त्यांनी त्यांचे काम आखून दिलेल्या कायद्यांनुसार व त्यांच्यासमोर असलेल्या पुराव्यांच्या आधारेच करावे.

## सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश :

१. एका घटनेच्या संदर्भात एकच एफ.आय.आर. असू शकतो.

२. जर एफ.आय.आर. नोंदवल्यानंतर काही अतिरिक्त माहिती मिळाली तर पोलिसांनी त्याची चौकशी करावी व अधिकाऱ्याने दंडाधिकाऱ्यांकडे पाठवण्यासाठी तयार केलेल्या अहवालात त्यातील निष्पन्न बाबी नमूद कराव्या.

३. जर तपास अधिकाऱ्याच्या तपासादरम्यान काही अधिक पुरावे मिळाले तर दंडाधिकाऱ्यांकडे पाठवलेल्या अहवालाव्यतिरिक्त त्याने/तिने पुरवणी अहवाल दंडाधिकाऱ्यांकडे सादर करावा.

४. चौकशी आयोगाचा अहवाल तपासकार्य करणाऱ्या एजन्सीवर बंधनकारक नाही. तपासकार्य करणाऱ्या एजन्सीचे त्यांनी जमा केलेल्या पुराव्यावरून वेगळे मत असू शकते.

■■■■■

# प्रकरण २

# पंचनामा

## Panchanama

**[Cr.P.C. Sec. 51, 100, 103, 165, 166, 174]**

पंचनाम्याची कायद्यात व्याख्या केलेली नाही फक्त इन्क्वेस्ट पंचनामा संबंधाने Cr. P.C. कलम १७४, १७५, १७६ मध्ये तरतूद केलेली आहे. तसेच Cr. P.C. कलम ५१, १००, १०३, १६५, १६६ ही कलमे झडतीबाबतच्या तरतुदीची आहेत. I.E.A. Sec. - 27. मेमोरँडम पंचनाम्यासंदर्भात आहे.

पंचनामा : तपासी अंमलदार आणि पंचांनी घटनास्थळाची पाहणी व सूक्ष्म निरीक्षण करून दिसत्या परिस्थितीचे तयार केलेले निवेदन म्हणजे पंचनामा होय. Panchanama is a memorandam of what has been seen & observed by investigating officer & Panchas, is called a Panchanama.

| | |
|---|---|
| Cr. P.C. Sec. 51 | – अटक केलेल्या व्यक्तीची झडती. |
| Cr. P.C. Sec. 100 | – बंदिस्त जागेचा ताबा ज्यांच्याकडे असेल त्या व्यक्तींनी झडतीस परवानगी देणे. |
| Cr. P.C. Sec. 103 | – दंडाधिकाऱ्यांना आपल्या समक्ष झडती घेण्याचा निर्देश देण्याच्या अधिकाराबाबत. |
| Cr. P.C. Sec. 165 | – पोलीस अधिकाऱ्याने तपासकामी आपल्या हद्दीत घ्यावयाची झडती. |
| Cr. P.C. Sec. 166 | – एका पोलीस ठाणे अंमलदार अधिकाऱ्यास हद्दीबाहेरील दुसऱ्या पोलीस अधिकाऱ्याकडे झडती - वॉरंट काढण्याची मागणी केव्हा करता येईल. |
| Cr. P.C. Sec. 174 | – आत्महत्या वगैरेंबाबत पोलिसांनी तपास करून अहवाल देण्याबाबत... |
| Cr. P.C. Sec. 175 | – व्यक्तींना समन्स पाठविण्याचा अधिकार. |
| Cr. P.C. Sec. 176 | – मृत्यूच्या कारणाची दंडाधिकाऱ्याने चौकशी करणे. |

ओळखपरेड पंचनामा [Cr. P.C. Sec. 54 (A)]

झडती पंचनामा (Cr. P.C. Sec. 100, 103, 165, 166)

इन्क्वेस्ट पंचनामा (Cr. P.C. Sec. 174)

मालमत्ता किंवा वस्तू ताब्यात घेण्याचा पंचनामा (I.E.A. 27) इ. निरनिराळे पंचनामे करावे लागतात. त्याकरिता खालील महत्त्वाचे मुद्दे लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

अटक पंचनामा

पाहिलेल्या दृष्यांचा पंचनामा

### उद्दिष्टे :-

१) घटनास्थळाला उशिरा भेट देण्याचा दुष्परिणाम सांगू शकाल?

२) साक्षीदार व पंच साक्षीदार का फितूर होतात ? त्याकरिता आपण काय काळजी घ्याल ते सांगू शकाल?

३) पुराव्याच्या दृष्टीने पंचनाम्याचा काय उपयोग होऊ शकेल हे पाहू शकाल?

४) पंचनाम्यात आढळणाऱ्या सर्वसाधारण त्रुटींबाबत काय सांगू शकाल?

५) घर झडती पंचनामा करण्याची कार्यपध्दती व लक्षात ठेवावयाच्या गोष्टी पाहू शकाल?

## दोषसिध्दीकरिता महत्त्वाचे मुद्दे :

१. पंच त्याच विभागातील, सुशिक्षित, नि:पक्षपाती, नि:स्वार्थी, सभ्य, बोलका व हुशार घ्यावा. त्यांचे पूर्ण नाव, पूर्ण पत्ता, वय, व्यवसाय व दूरध्वनी / मोबईल क्रमांक लिहावा.

२. एकाच व्यक्तीची अनेक पंचनाम्यामध्ये पंच म्हणून निवड करू नये. कारण असे पंच न्यायालयात खटला चालू असताना न्यायालयात आरोपीच्या बाजूने साक्ष देण्याचा संभव असतो. असे पंच व्यावसायिक पंच असतात.

३. पंच खात्रीलायक व खटल्याच्या सुनावणीच्या वेळी न फुटणारा, प्रलोभनास बळी न पडणारा असावा.

४. पंचनामा घटनास्थळी करावा व पूर्ण होताच त्यावर पंचाची व तपासी अंमलदाराची सही घ्यावी. सही घेऊन त्यावर दिनांक व वेळ न चुकता टाकावी.

५. स्वखुशीने तयार नसणाऱ्या इसमास पंच म्हणून घेऊ नये.

६. महिलांचे संबंध असेल त्या ठिकाणी महिला पंच घ्यावेत.

७. पंचनामा रात्री केला असल्यास त्यामध्ये वीज प्रकाश स्रोतांचा उल्लेख करावा.

८. बऱ्याच पंचनाम्यात पंचांची नावे व वेळ नंतर लिहिली जाते. त्यामुळे शाई बदलली जाते व त्यामुळे पंचनाम्याच्या खरेपणाबद्दल खटल्याचे कामकाजात संशय निर्माण होऊन गुन्हेगार निर्दोष सुटतात.

९. फोटोग्राफी किंवा व्हिडिओ रेकॉर्डिंग केली असल्यास संबंधित साक्षीदारांचा उल्लेख करावा व त्याचेही जबाब / टिपण घ्यावे.

१०. घटनास्थळाच्या पंचनाम्यातील पंच साक्षीदार यांनी घटनास्थळाबद्दल सविस्तर साक्ष दिली व घटनास्थळाबद्दल त्यातील वेळेबाबत योग्य पुरावा सादर केला म्हणून गुन्हा सिध्द झाला.

११. घटनास्थळांचा पंचानामा व इन्क्वेस्ट पंचनाम्यातील पंच साक्षीदारांनी फिर्यादीप्रमाणे व सविस्तर सुसंगत घटना सांगितल्याने न्यायालयाने त्यावर विश्वास ठेवला.

१२. तपासी अंमलदार यांनी तक्रारदाराची तक्रार घेऊन, गुन्हा नोंद करून घटनास्थळी भेट देऊन, घटनास्थळांचा पंचनामा केला व तीन आरोपीपैकी दोघांकडून तलवारी व एकाकडून रिव्हॉल्व्हर जप्त केले. त्यावर न्यायालयाने विश्वास ठेवून आरोपीला शिक्षा दिली आहे.

१३. छापा घालण्यापूर्वी N.D.P.S. कायद्यानुसार अनिवार्य असलेल्या तरतुदींची पूर्तता तपासी अंमलदारांनी केली होती. उदा.- दोन पंचांना बोलावून पोलिसांनी स्वत:ची व पंचांची अंगझडती देऊन पंचनामा केला होता. आवश्यक असलेले किट सोबत घेण्यात आले होते. तसेच पोलीस पथक व पंच जाणाऱ्या वाहनांची पूर्ण तपासणी करण्यात येऊन छापापूर्व पंचनामा (Pre Trap Panchanama) बनविण्यात आला होता. तपासी अंमलदाराने सुनावणीदरम्यान न्यायालयासमोर पंच व साक्षीदारांना साक्षीपूर्वी न्यायालयात साक्ष कशाप्रकारे द्यावी याबद्दल त्यांना विश्वासात घेऊन वारंवार अवगत करण्यात आले होते. यावर न्यायालयाने विश्वास ठेवून आरोपी संतोष वर्गीस लोबो यास N.D.P.S. Act. 1985 कलम ८(क), २१, २९ अन्वये १० वर्षांची सक्तमजुरी व १ लाख रु. दंड व दंड न भरल्यास दोन वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा सुनावली.

## आरोपी निर्दोष सुटल्याचे निवाडे :

१. घटनास्थळ पंचनामा शाबीत करता आला नाही, म्हणून आरोपी निर्दोष सुटलेले आहेत. म्हणून पंचांना विश्वासात घ्यावे व जागेवर प्रत्यक्ष बोलवावे. कारण पंचांना जागेबद्दल विवेचन करता आले नाही.

२. गुन्ह्याच्या घटनास्थळाचा पंचनामा केला नाही.

३. आरोपीबाबत खात्रीशीर माहिती मिळाल्यावरसुध्दा तपासणी अधिकाऱ्याने पंच सोबत घेतले नाही.

४. आरोपीला अटक करताना अटक पंचनामा केला नाही.

५. घटना घडली ती वेळ मध्यरात्रीची होती, मात्र घटनास्थळाच्या पंचनाम्यात पुरेसा लाईट होता अगर कसे हे तपासी अंमलदाराने नमूद केले नाही व साक्षीतदेखील तसे काही सांगितले नाही.

६. हत्यारे जप्त केल्याबद्दल मुद्देमाल रजिस्टरच्या प्रति न्यायालयात सादर केल्या नाहीत.

७. आरोपीकडून गुन्ह्यात वापरण्यात आलेला चाकू हस्तगत करण्यात आलेला नाही.

८. तपासी अंमलदाराने मेमोरंडम पंचनाम्यामध्ये ताब्यात घेतलेल्या सोन्याच्या दागिन्यांवर सील व सही केली नव्हती, पंचांच्या सहीचे लेबल नव्हते, तसे पंचनाम्यातदेखील नमूद नव्हते व सराफाकडून 'सोने' असल्याबाबत प्रमाणित करून घेतले नाही.

९. तपासी अंमलदाराने कोणताही पुरावा गोळा करताना काळजी घेतल्याचे दिसून येत नाही. जर का त्यांनी काळजी घेतली असती तर आरोपी निर्दोष सुटले नसते, असे मत न्यायालयाने व्यक्त केले.

## इन्क्वेस्ट रिपोर्ट :

प्रेताची तपासणी अहवाल म्हणजे अनैसर्गिक मृत्यूबाबत पोलिसांनी केलेला तपास, प्रेताची तपासणी या शब्दाची क्रि. प्रो. कोडमध्ये व्याख्या दिलेली नाही. शब्दकोशातील अर्थाप्रमाणे 'इन्क्वेस्ट' या शब्दाचा अर्थ ज्या मृत्यूमध्ये मरणाचे कारण माहिती नाही त्याची चौकशी करणे हा होय.

'इन्क्वेस्ट' (Inquest) या शब्दाचे मूळ हे इंग्रजी कायदा 'इन्क्विशियन' या कायद्यांअंतर्गत आहे.

'इन्क्वेस्ट' (Inquest) बाबतचा कायदा कलम १७४ ते १७६ क्रि.प्रो.कोड यात आहे.

## प्रेताची तपासणी तीन प्रकारांनी होऊ शकते :

१. पोलिसांकडून.

२. न्यायाधिशांकडून.

३. अपघाती अगर अनैसर्गिक वाटल्यास अशा मृत्यूची चौकशी करणारा अधिकारी (Coroner).

शेवटचा प्रकार (Coroner) हा भारतात बहुतांशी राज्यांमधून काढून टाकण्यात आला आहे.

## कायदेशीर तरतुदी :

कलम १७४ क्रि.प्रो.कोड मध्ये नमूद केल्याप्रमाणे ठाणे अंमलदार किंवा ज्यास राज्य सरकारने खास अधिकार प्रदान केले आहेत असा दुसरा कोणी पोलीस अधिकारी खालील प्रकारच्या मृत्यूसंबंधी मृत्यूचे कारण शोधून काढण्यासाठी चौकशी करू शकतात.

१. ज्यात कोणी आत्महत्या करेल.

२. ज्यात माणसाला कोणी दुसऱ्याने ठार मारले किंवा जनावराने मारले किंवा काही यंत्रामुळे मृत्यू आला किंवा अपघाती मृत्यू झाला असेल.

३. ज्यावेळी मनुष्य काही संशयित परिस्थितीत मृत्यू पावला असेल ज्यात दुसऱ्या कोणी काही गुन्हा केला असेल.

४. ज्यात लग्नापासून ७ वर्षांचे आत स्त्रीने आत्महत्या केली असेल.

५. ज्यात स्त्री लग्न झाल्यापासून ७ वर्षाचे आत मृत्युमुखी पडली असेल व ज्यात कोणी दुसऱ्याने त्या स्त्रीबाबत गुन्हा केला आहे असा संशय असेल.

६. ज्यात कोणी स्त्रीचा लग्नापासून ७ वर्षाच्या आत मृत्यू आला असेल व त्या स्त्रीच्या नातेवाईकांनी तिच्या मृत्यूबाबत चौकशीची विनंती केली असेल.

७. ज्यावेळी मृत्यूच्या कारणांबाबत संशय उत्पन्न होत असेल.

८. जेव्हा इतर काही कारणाने पोलीस अधिकाऱ्यास तसे करणे योग्य वाटत असेल.

## कलम १७४ (४) क्रि.प्रो.कोड

जिल्हा दंडाधिकारी किंवा प्रांत अधिकारी (S.D.M.) आणि इतर कोणीही दंडाधिकारी ज्यास सरकारने किंवा जिल्हा दंडाधिकाऱ्याने खास अधिकार प्रदान केले आहेत हे मृत्यूबाबत चौकशी करू शकतात.

याचा अर्थ नैसर्गीक मृत्यू सोडून इतर सर्व प्रकरणात प्रेताची तपासणी करणे आवश्यक असते. ठाणे अंमलदारास एखाद्या अकस्मात, नैसर्गिक किंवा संशयित मृत्यूबाबत माहिती मिळाल्यानंतर लगेच अशा प्रथम खबरीची प्रत नजीकच्या न्यायाधीशाकडे ज्यांना प्रेताची तपासणी करावयाचा अधिकार आहे. त्यांना व वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना पाठवावी.

## कलम १७४ क्रि.प्रो.कोड याप्रमाणे चौकशीची पध्दत

घटनास्थळी पोहचल्यानंतर तपासात मदत करण्यासाठी दोन किंवा जास्त प्रतिष्ठित माणसांना, जे त्या भागात राहणारे आहेत किंवा शेजारीपाजारी राहणारे आहेत त्यांना बोलवावे किंवा क्रि.प्रो.कोड कलम १७५ प्रमाणे लेखी फर्मान द्यावे. ही दोन माणसे मृताचे नातेवाईक नसावे किंवा कोणी आरोपी असेल तर त्याचे नातेवाईक नसावेत, ती माणसे शक्यतो त्याच्या जातीचेसुध्दा नसावेत.

## घटनास्थळावर कुठल्या बाबींकडे लक्ष द्यावे (किंवा नोंद करावी) :

अ) घटनास्थळावरील दोन कायमच्या वस्तूंपासून प्रेताची जागा निश्चित करावी.

ब) १. हात, पाय, डोके याची जागा (अवस्था) याची नोंद घ्यावी.

२. जखमा, खरचटलेले इ. ची लांबी, रुंदी व शरीराच्या कुठल्या भागावर त्या जखमा आहे याची नोंद.

३. हाडे कुठे व कशा तऱ्हेने मोडली आहेत.

४. केसाची स्थिती व्यवस्थित विंचरलेले (भांग पाडलेले) भरकटलेले (उसकटलेले) किंवा नुकतेच कापलेले (कटिंग केलेले).

५. जर मृत इसम पुरुष असेल तर त्याच्या चेहऱ्यावरील केसाबाबत ज्यात दाढी, मिशा इ. बाबत संपूर्ण माहिती लिहावी.

६. कानावरील पाळ्यात किंवा नाकावरील काही भोके (कान, नाक, टोचलेले आहे काय?).

७. कातडी हाताचा पंजा, पाय इ. (कठीण) टणक, व चप्पल, बूट इ. व्रण (खुणा) आहेत का?

८. (डोक्यापासून पायापर्यंत) शरीराची तपासणी करताना मृत्यूची वेळ ठरविण्यासाठी उपयुक्त म्हणजे शरीर ताठ होणे इ. गोष्टी.

क) १. मृताची जात, वय, समाज समजू शकेल अशा खुणा.

२. ओळख पटण्यासाठी असणाऱ्या खुणा म्हणजे जुन्या जखमांच्या खुणा, तीळ, चामखिळी, गोंदलेले इत्यादी स्वरुपातील खुणा.

३. प्रेताचा रंग व साधारण उंची.

४. इतर सर्व गोष्टी ज्या तपासकामी व अज्ञात इसमाची ओळख पटविण्यासाठी गरजेच्या असतील.

५. जर प्रेताची ओळख पटली नाही तर हाताचे ठसे, फोटो घेणे गरजेचे असते. त्याचप्रमाणे नखाची टोकेसुध्दा उपयोगी पडतात.

**सूचना- प्रेताची अवस्था फोटो घेतल्याखेरीज व माहिती नोंदवून घेतल्याखेरीज बदलू नये.**

## शवविच्छेदन करण्यासाठी मृतदेह पाठविल्याबाबत

जो कोणी अधिकारी प्रेताची तपासणी करीत असेल त्याने सदर प्रेत नजीकच्या अधिकार असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्याकडे मृत्यूच्या कारणाबाबत संशय असेल, किंवा इतर काही कारणासाठी किंवा त्या अधिकाऱ्याच्या शवविच्छेदन करणे गरजेचे वाटते त्यावेळी त्या अधिकाऱ्याने प्रेत शवविच्छेदनासाठी पाठवावे.

प्रेत घेऊन जाणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याकडे मयताबाबतचे मंजूर असलेल्या मेमो (फॉर्मसह) शवविच्छेदन करण्याच्या विनंतीबाबत फॉर्म पाठवावा. शवविच्छेदनासाठी प्रेत पाठविण्याला उशीर करू नये, कारण प्रेत सडण्याची शक्यता असते व त्यामुळे मृत्यूचे कारण शोधणे कठीण होते.

पोलीस हवालदार / शिपाई हे प्रेताच्या सुरक्षिततेस जबाबदार असतात आणि जरूर असेल तर त्यांनी स्थानिक पोलिसाकडून पहारेकरी (गार्ड) मागावा. जर जरूर भासली तर तपास अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे प्रेताचा ताबा दिल्यापासून वैद्यकीय अधिकाऱ्याने शवविच्छेदन करेपर्यंत कोणीही प्रेताची ढवळाढवळ केली नाही, अशा प्रकारची साक्ष साक्षीदार म्हणून देऊ शकले पाहिजे.

## वैद्यकीय अधिकाऱ्यांना शवविच्छेदन करण्याबाबत अधिकार

अ) सरकारी दवाखान्यातील सर्व वैद्यकीय अधिकारी की ज्या दवाखान्यात प्रेतसार आहे.

ब) १. नगरपालिका व स्थानिक सरकारी संस्थांनी ( जिल्हा परिषद, तालुका, पंचायत इ.) नेमलेले सर्व वैद्यकीय अधिकारी.

२. सरकारने स्थानिक संस्थांकडे नेमणुकीस पाठविलेले वैद्यकीय अधिकारी / स्थानिक सरकारी संस्थांनी चालविलेल्या वैद्यकीय संस्थामधून नेमलेले खासगी वैद्यकीय अधिकारी की ज्या संस्थांना सरकारकडून अनुदान मिळते.

क) निरनिराळ्या रुग्णालयात जेथे एकच वैद्यकीय अधिकारी असतो व तेथे मानद वैद्यकीय अधिकारी असतात त्यांनी (ज्यावेळी वैद्यकीय अधिकारी गैरहजर असेल) त्याचप्रमाणे, पोलीस अधिकाऱ्याने ग्रामीण भागात वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्याकडे शक्यतो वैद्यकीय – कायद्याचे काम असेल तर ते पाठवू नये.

## अपवाद :

वैद्यकीय अधिकारी घटनास्थळावर म्हणजे जातीय दंगली वेळी मृत, अपघाताचे जागी अनेक लोक मृत्युमुखी पडले असतील, डोंगर कोसळणे इ. ठिकाणी शवविच्छेदन करू शकतात. प्रेताची तपासणी केल्यानंतर त्याआधी जर काही दखलपात्र गुन्हा झाला आहे असा संशय असेल तर तपास अधिकारी तपास चालू ठेवून तो पूर्ण करेल.

## शवविच्छेदन झाल्यानंतर प्रेताची विल्हेवाट लावण्याबाबत :

सर्वसाधारणपणे प्रेताचा ताबा हा त्याचे नातेवाईक किंवा मित्रांकडे द्यावा. जर योग्य अधिकाऱ्याने तसे न करण्याबाबत आदेश दिलेले असतील तर मात्र देऊ नये. जर मयताचा कोणी नातेवाईक किंवा मित्र नसतील व जेव्हा ते ताबा घेण्यास नकार देत असतील तर पोलिसांनी विल्हेवाट लावण्याची तजवीज करावी.

बेवारस किंवा निराश्रित प्रेत असेल तर त्याची विल्हेवाट ही स्थानिक संस्था किंवा ग्रामप्रमुख करतील. त्यांच्या गैरहजेरीत पोलीस प्रेताची विल्हेवाट लावतील, प्रेत पुरण्याचा खर्च हा न्यायालयाकडून किंवा जिल्हा पोलीस अधिकाऱ्यांकडून मागावा.

## ओळख न पटलेले मृतदेह

ज्या वेळी प्रेताची ओळख पटली नसेल तेव्हा पोलीस अधिकाऱ्याने प्रेताचे वर्णन काळजीपूर्वक नोंदवावे.

ज्यात निशाण्या (खुणा) असेल तर, आवर्जून घेण्यासारख्या खुणा, काही खास गोष्टी असाव्यात. प्रेताचे वर्णन आजूबाजूच्या पोलीस ठाण्याकडे व जिल्ह्यातून तसेच रोजच्या गुन्हेविषयक परिपत्रकातून व मासिकातून प्रसिध्द करावे. त्याचप्रमाणे वर्तमानपत्रे व जेथे जरूर असेल तेथे दूरदर्शनवरही प्रक्षेपित करावे.

## पोलीस कोठडी किंवा न्यायालयीन कोठडीतील मृत्यू :

ज्यावेळी कोणी इसम (आरोपी) पोलीस कोठडीत असताना मृत पावेल, त्यावेळी ज्या न्यायाधीशांना प्रेताची तपासणी करण्याचा अधिकार आहे (इन्क्वेस्ट) अशा न्यायाधीशांना त्वरित माहिती द्यावी व त्यांना सर्व खुलासेवार हकिगत व ज्या परिस्थितीत मृत्यू झाला असेल त्याबाबतची माहिती द्यावी व त्यांच्या निरीक्षणासाठी (तपासणीसाठी) सदरहू इसमाचे प्रेत जपून ठेवावे.

ज्या न्यायाधीशांनी त्या प्रेताची तपासणी केली असेल अशा न्यायाधीशांना साक्षीदाराचे जबाब शपथेवर घेण्याचा अधिकार आहे व असे जबाब कलम १७६ (१) क्रि.प्रो.कोडप्रमाणे ग्राह्य आहेत.

१७४ क्रि. प्रो. कोड (Inquest) या कलमाखाली प्रेताची तपासणी करताना कुठल्या गोष्टी कराव्यात व कुठल्या गोष्टी टाळाव्यात.

१. तपासणी करताना घटनास्थळ, मयताचे प्रेत व आजूबाजुच्या भागाचे बारकाईने निरीक्षण करूनच प्रेताची तपासणी करावी.

२. प्रेताचे अंगावरील कपडे काढून गुप्त भागांची तपासणी करावी. स्त्रीची तपासणी करताना नेहमीच्या खबरदाऱ्या घ्याव्यात.

३. पोलीस कोठडीतील किंवा पोलीस चौकशीदरम्यान मृत्यू झाला तर त्या प्रेताची तपासणी ही न्यायाधीशांनीच करावयास हवी.

४. पंच साक्षीदार हे प्रतिष्ठित व तटस्थ व त्या भागातील असावेत. ते आरोपीचे नातेवाईक नसावेत किंवा शक्यतो त्याच्या जातीचे नसावेत.

५. मयताची तपासणी ही पध्दतशीरपणे डोक्यापासून पायापर्यंत किंवा पायापासून डोक्यापर्यंत साक्षीदारांच्या समक्ष त्वरित करावी.

६. प्रेताची तपासणी करताना वैद्यकीय शब्दांचा वापर करू नका.

७. जर प्रेताच्या शरीराचे काही भाग किंवा हाडे निरनिराळ्या ठिकाणी मिळून आले तर वेगवेगळे पंचनामे करावेत.

८. प्रेताची तपासणी करताना विचारपूस केलेल्या साक्षीदारांचे जबाब वेगळे घ्यावेत.

९. शब्दांवर शब्द किंवा खाडाखोड असे प्रकार प्रेत-तपासणी पंचनाम्यात नसावेत.

१०. मयताची ओळख पटविण्यासाठी त्वरित पावले उचला. तपासणी करताना प्रेतावर कुठे जखमाचे व्रण, गोंदलेले, विशिष्ट खुणा, अपंगत्वाच्या खुणा आहेत काय ? त्या बघाव्यात. त्याचप्रमाणे किंमती वस्तू, दागदागिने इ. प्रेताचे अंगावर आहेत काय ते बघावे, कपड्यांवर धोब्याची खूण इ. बघावी, बोटाचे ठसे त्वरित घेऊन तज्ज्ञाकडे पाठवावे, त्याचप्रमाणे प्रेत न हलविता छायाचित्र (फोटो) घ्यावेत.

११. प्रेताच्या अंगावरील जखमांचे स्वरूप, कुठल्या भागावर, जागा, केव्हा झालेले आहे हे नमूद करावे.

१२. प्रेताचे अंगावरील कपडे कशा पध्दतीचे आहेत, त्यांचा रंग, आकार इ. बद्दल माहिती लिहावी.

१३. गुन्ह्याचे जागेवर, प्रेताचे अंगावर व जप्त केलेल्या वस्तूवर किती रक्त मिळून आले हे पंचनाम्यात नमूद करावे.

१४. जर तो प्रकार दुसऱ्याने मारल्याचा असेल तर जखमीचे हात (तळहात) बोटांची नखे इत्यादी

१५. घटनास्थळावरील ताब्यात घेतलेल्या वस्तू या पंचाच्या समक्ष बंद कराव्यात व तसे पंचनाम्यात नमूद करावे.

१६. पंचनाम्यात दिसून येणारे मरणाचे कारण सविस्तर लिहावे. जर ते कारण बळजबरी असेल तर कुठले हत्यार वापरले आहे ते नमूद करावे.

१७. साक्षीदारांच्या सह्या पंचनाम्यावर घेतल्या पाहिजेत.

१८. पंचनाम्यात संदिग्ध (अस्पष्ट) वर्णन नसावे. म्हणजे प्रेताच्या उजव्या किंवा डाव्या बाजूस काही अंतर दूर 'प्रेतापासून फार लांब नाही' इत्यादी

१९. मूळ पंचनामा हा न्यायालयाकडे त्वरित पाठवावा व त्याच्या प्रती वरिष्ठांना (चित्रिकरण केले असेल तर) त्यासोबत पाठवाव्यात.

## कलम १७६ क्रि.प्रो.कोड :

खालील प्रकरणात न्यायालयास प्रेताची तपासणी करण्याचा अधिकार आहे.

१. ज्यावेळी कोणी इसम हा पोलीस किंवा न्यायालयीन कोठडीत मरण पावतो.

२. ज्यावेळी लग्न झाल्यापासून ७ वर्षाचे आत स्त्रीने आत्महत्या केली असेल.

३. ज्यावेळी कोणीही स्त्री लग्नापासून ७ वर्षाचे आंत आत्महत्त्या करेल, ज्यात परिस्थितीवरून संशय निर्माण होत असेल की कोणी इतर इसमाचे त्या स्त्रीचे बाबतीत गुन्हा केला आहे.

४. इतर सर्व मृत्यू जे कलम १७४ (१) क्रि.प्रो.कोड नमूद केले आहेत.

५. थडग्यातून प्रेत उकरून काढण्याबाबतची सर्व प्रकरणे.

## प्रेत उकरून काढणे :

प्रेत खालील कारणाने उकरून बाहेर काढले जाते.

अ) मृत्यूचे कारण व प्रकार याबाबत तक्रार आली असेल तर.

■■■■■

# प्रकरण ३

# साक्षीदारांचे जबाब

# (Statement of Witnesses)

**उद्दिष्टे :**

**(Cr. P.C. Sec. 160, 161, 162)**

**[I.E.A. Sec. 135, 136, 145, 159]**

Cr. P.C. Sec. 160 - दखलपात्र गुन्ह्याचे तपासासंदर्भात साक्षीदारांना समक्ष हजर राहण्यास फर्माविण्याचा तपासी अंमलदाराचा अधिकार.

Cr. P.C. Sec. 161 - दखलपात्र गुन्ह्याच्या तपासकामी पोलिसांनी घ्यावयाची साक्षीदारांची तपासणी.

Cr. P.C. Sec. 162 - तपासी अंमलदारांनी घेतलेले जबाब स्वाक्षरीत करावयाचे नाहीत, त्या जबाबाचा पुराव्यात उपयोग.

Cr. P.C. Sec. 135 - साक्षीदार हजर करण्याबाबतचा व त्याची साक्ष तपासणी करण्याबाबतचा क्रम.

Cr. P.C. Sec. 136 - पुराव्याच्या स्वीकार्यतेसंबंधी न्यायाधीशाने निर्णय करणे.

Cr. P.C. Sec. 145 - पूर्वीच्या लेखी कथनांसंबंधी उलटतपासणी.

Cr. P.C. Sec. 159 - स्मृतीला उजाळा देणे.

१) साक्षीदाराच्या जबाबावरून घडलेल्या घटनांची पडताळणी होऊन पुराव्यावर आधारित बाबी न्यायालयासमक्ष ठेवता येतात हे पाहता येईल.

२) साक्षीदाराच्या साक्षीवरून आरोपी विरूध्द गुन्हा शाबीत होतो हे पाहू शकाल.

**गुन्हे शाबीत होण्याच्या दृष्टीने साक्षीदार हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. हे तपासी अंमलदाराने लक्षात ठेवावे.**

समाजातील निरनिराळ्या व्यक्तीप्रमाणे साक्षीदार हे देखील वेगवेगळ्या स्वभावाचे असतात. उदा. निःस्वार्थी, हितसंबंधी, नाखुष, भित्रा, महिला, बालसाक्षीदार, फितूर, खोटे बोलणारा, अपंग इ. वर्गवारी करता येईल. अशा साक्षीदारांचे जबाब घेताना खालीलप्रमाणे दक्षता घ्यावी.

१. गंभीर गुन्ह्यात - साक्षीदार संशयिताला विचारपूस करताना ''टीम पध्दत'' अवलंबवावी.

२. साक्षीदाराचा जबाब विनाविलंब घ्यावा, कारण विलंब झाल्यास तो विसंगत उत्तरे देण्याचा संभव असतो व त्याच्या मनाप्रमाणे घटना तयार करून सांगत असतो.

३. साक्षीदाराला विश्वासात घेऊन गुन्ह्याबद्दल माहिती मिळवावी. शक्यतोवर प्रश्न-उत्तर स्वरूपात त्याचा जबाब लिहावा.

४. जबाब नेहमी घडलेल्या घटनेच्या क्रमवारीनुसार नोंदविला जाईल याकडे लक्ष द्यावे.

५. जबाब नेहमी स्पष्ट, मुद्देसुद, परिपूर्ण व साक्षीदाराच्या शब्दात लिहावा.

६. चाकोरीबध्द जबाब (Stereo Type Statement) एकाच पध्दतीचे टिपण घेऊ नये.

७. जबाबात खाडाखोड किंवा अक्षरावर अक्षर लिहू नये तसेच व्हाईटनरचादेखील उपयोग करू नये. अशा

कृतीमुळे पोलिसांवर न्यायालय विश्वास ठेवत नाही व त्याचा फायदा आरोपीला मिळतो. त्यामुळे आरोपी निर्दोष सुटतो.

८. साक्षीदार फितूर होऊ नये म्हणून त्याला विश्वासात घेऊन कार्यवाही करावी.

९. तपासाचा अधिकार असणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यानेच तपास करावा. (उदा. Prevention of Atrocities Act, E.C. Act, Prevention of curruption Act.) इ. कायद्यातील तरतुदीनुसार पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त दर्जाच्या अधिकाऱ्याने तपास करावा असे बंधन आहे. म्हणून तो तपास खालच्या दर्जाच्या अधिकाऱ्यांनी करू नये.

१०. फिर्यादीशी विसंगत (Contradictory) जबाब / टीपण घेऊ नये.

११. घटनेबाबतचा सविस्तर साक्षीदारांचे जबाबात उल्लेख करावा व त्यांचे शब्दात जबाब घ्यावेत.

१२. गुन्हा प्रत्यक्ष पाहणारे साक्षीदार फितूर होतात. त्यांना विश्वासात घ्यावे. म्हणून आरोपीचे नातेवाईक हितसंबंधी यांना साक्षीदार म्हणून घेऊ नये.

१३. फिर्याद व साक्षीदाराचे जबाब यात तफावत (Contradiction) ठेवू नये.

१४. साक्षीदार उलट तपासणीत (Cross - Examination) घाबरतात. त्यामुळे त्यांना खटला सुरू होण्याआधी ब्रिफींग अर्थात थोडक्यात माहिती देणे अत्यंत आवश्यक आहे. ही बाब पूर्वापार परंपरेने चालत असल्याने तिचाच अवलंब करावा.

१५. कधीकधी न्यायालयात महत्त्वाच्या साक्षीदारांची साक्ष घेण्यात येत नाही. (उदा. Special Executive Magistrate, Eye witnesses, Medical Officer) वगैरे म्हणून सर्व संबंधित साक्षीदारांच्या साक्षी घेण्याबाबत सरकारी अभियोक्ता यांना विनंती करावी.

१६. तपासी अंमलदार व साक्षीदाराने फिर्यादीस अनुसरून साक्ष दिली व साक्षीदारांच्या साक्षीमध्ये सुसंगतता आढळून आली म्हणून गुन्हा शाबीत झाला.

१७. फिर्यादी व साक्षीदार यांनी आपापली साक्ष सुसंगतरीत्या दिल्याने आरोपी सुटण्याची कोणतीही संधी उपलबध झाली नाही.

१९. साक्षीदार प्रमोद हा पीडित मुलीबरोबर समुद्रकाठी होता आणि त्याने आरोपीला त्या दोघांना सोडून देण्याची केलेली विनंती व आरोपीने त्याच्याकडे केलेल्या पैशाची मागणी व त्याला पैसे आणण्याच्या सबबीखाली घटनास्थळावरून पिटाळले हे सिध्द झाले. त्यामुळे आरोपीला १४ वर्षे कालावधीची कारावासाची शिक्षा झाली.

## आरोपी निर्दोष सुटल्याची निवाडे :

२०. प्रत्येक आरोपीचे गुन्ह्यातील सहभागाबद्दल साक्षीदारांकडून पुरावा मिळत नसल्याने त्याचा फायदा आरोपीला होतो.

२१. फिर्यादी व साक्षीदार हे साक्षीसाठी कधी कधी उपलब्ध होत नाहीत.

२२. गंभीर जखमी झालेल्या प्रमुख साक्षीदाराचे अपघातात निधन झाल्याने साक्ष झाली नाही.

२३. घटना घडली त्यावेळी प्रत्यक्ष घटना पाहणारा कोणीही साक्षीदार नव्हता.

२४. फिर्यादी व प्रत्यक्ष घटना पाहणारा साक्षीदार यांच्या साक्षीमध्ये विसंगती असल्याने पुरावा विश्वासार्ह वाटला नाही.

२५. न्यायालयात फिर्यादीने साक्षीच्या वेळी आरोपीला ओळखले नाही.

२६. पंच साक्षीदार अभियोग पक्षाने तपासले नाहीत. त्यामुळे त्यांच्याकडून जी हत्यारे जप्त करण्यात आली होती ती सिध्द करता आले नाही.

२७. कोणत्या आरोपीचा गुन्ह्यात काय सहभाग होता तसेच कोणत्या आरोपीचे हातात कोणते हत्यार होते याचा उल्लेख कोठेही नाही.

२८. महत्त्वाच्या साक्षीदाराची अभियोग पक्षाने साक्ष घेतली नाही.

२९. ऐकीव गोष्टीचा पुरावा हा विश्वसनीय व सकारात्मक पुरावा होत नसल्याने.

३०. साक्षीदारांच्या साक्षीमध्ये विसंगती उदा. एक साक्षीदार म्हणतो १०० ते २४० लोकांचा जमाव होता, तर दुसरा साक्षीदार १००० ते २५०० लोकांचा जमाव होता असे म्हणतो.

३१. गुन्ह्यात वापरलेला चाकू हस्तगत केला, मात्र पंच साक्षीदार हे साक्षीसाठी मिळून आले नाहीत.

३२. अभियोग पक्षाचा कोणताही साक्षीदार घटना घडली त्यावेळी प्रतिबंधात्मक आदेश अस्तित्वात असल्याबाबत तसेच भारतीय हत्यार कायद्याखाली दोषारोपपत्र पाठविण्याबाबत काहीच बोलला नाही. सक्षम अधिकाऱ्याकडून पूर्वमंजुरी आदेश प्राप्त केल्याबद्दल न्यायालयात साक्ष देताना सुद्धा एकही शब्द उच्चारला नाही.

३३. एका पंचाने बऱ्याच वेळेला पोलीस पंच म्हणून साक्ष दिल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले. (सराईत व व्यावसायिक पंच)

३४. पोलीस निरीक्षक व सहा. पोलीस निरीक्षक यांच्या साक्षीत विसंगती होती. उदा.- एकाने १२.१५ वाजता पोहोचलो व दुसऱ्याने १३.१५ वा. पोहोचल्याचे सांगितले. रेडींग पार्टी केव्हा व कोणत्या वाहनाने घटनास्थळी पोहोचली यात विसंगती दिसून आली.

३५. तपासी अंमलदाराने आरोपीला कोणी अटक केली हे माहीत नसल्याचे सांगितले व अपूर्ण माहिती न्यायालयात सांगितली.

३६. न्यायालयाने साक्षीदाराच्या साक्षीवर विश्वास ठेवला नाही. (I.E.A. Sec. 136)

३७. बरेच घटक प्रमुख तपासी अंमलदारांना साक्षीकरिता परवानगी देत नाही. त्यामुळे ते न्यायालयात हजर राहत नाही.

३८. बरेच घटक प्रमुख तपासी अंमलदारांना साक्ष देण्यासाठी मुख्यालय सोडण्याची परवानगी देत नाही. आणि त्यामुळे संबंधित तपासी अंमलदार हे त्यांनी तपास केलेल्या गुन्ह्याकडे साक्षीकामी लक्ष देत नाही व साक्ष विलंबाने झाल्याने आरोपीस त्याचा फायदा होतो. म्हणून सर्व घटक प्रमुखांनी तपासी अंमलदारांना वेळेवर न्यायालयात साक्ष देण्याकरिता परवानगी द्यावी.

# प्रकरण ४

# विचारपूस तंत्र

## (Interrogation Technique)

**उद्दिष्टे :**

१) आरोपीकडून गुन्ह्याची माहिती कशी मिळवावी ते आपल्याला कळेल.

२) मालमत्ता हस्तगत कशी होईल हे आपल्याला कळेल.

१. गुन्हा घडल्याबरोबर त्वरित विचारपूस करा. वेळ निष्कारण वाया घालवू नका. कारण वेळ झाल्यावर गुन्ह्याची माहिती अधिक वाढवून सांगण्याची शक्यता असते.

२. साक्षीदारांना घटनास्थळी विचारपूस करावी किंवा त्यांनी जेथे घटना पाहिली असेल त्या ठिकाणी विचारपूस करावी.

३. साक्षीदारांना एकत्र येऊ देऊ नका किंवा घोळका करून त्यांची विचारपूस करू नका. त्यामुळे त्यांच्या गप्पांना उधाण येऊन घटनेबाबत तर्कवितर्क सुरू होतात.

४. तपासी अंमलदाराने प्रत्येक साक्षीदार स्वतंत्रपणे तपासावा व तपासलेल्या साक्षीदाराचा इतर साक्षीदाराशी संबंध येणार नाही याची काळजी घ्यावी.

५. संशयित किंवा इतर साक्षीदारांना विचारपूस करीत असताना एकापेक्षा जास्त साक्षीदार असल्यास त्यांना जवळ हजर ठेवू नका व त्यांचा आपसात संपर्क होणार नाही याची दक्षता घ्यावी.

६. सुरुवातीला मुख्य साक्षीदार व विश्वसनीय साक्षीदारांना तपासा.

७. साक्षीदारास त्याच्या मर्जीप्रमाणे सांगू द्यावे.

८. साक्षीदारांना सहसा सूचक प्रश्न विचारू नये (Leading question)

९. साक्षीदारांना सूचनावजा प्रश्न विचारू नये. (Suggestive question)

१०. विचारपूस शांततेने, गंभीरपणे व धीराने केली पाहिजे.

११. साक्षीदाराला दमदाटी, भीती, प्रलोभन, आमिष दाखवून साक्ष घेऊ नका.

१२. साक्षीदाराचे वय, लिंग, धर्म, राजकीय मत, सामाजिक दर्जा शिक्षण याप्रमाणे विचारपूस करण्याची पध्दत बदलावी.

१३. विचारपूस करताना तपासी अंमलदाराने शांत व संयमी असणे गरजेचे आहे.

१४. साक्षीदाराच्या स्मृतीस चालना द्या.

१५. साक्षीदाराला विचारपूस करताना त्याच्या चेहऱ्यावरील भावना ओळखा.

१६. साक्षीदारांची काळजीपूर्वक उलट तपासणी करावी.

१७. तपासी अंमलदाराने साक्षीदारास घटनेची माहिती स्वयंस्फूर्तीने देऊ द्यावी.

१८. टीम तयार करून तपास करावा.

१९. विचारपूस करण्यापूर्वी संबंधित साक्षीदाराला जे प्रश्न विचारावयाचे असतील त्या प्रश्नांची प्रश्नावली तयार करून विचारपूस करावी.

२०. प्रश्नावलीप्रमाणे विचारपूस करताना आवश्यक असेल त्याठिकाणी प्रश्नावली व्यतिरिक्त उपप्रश्न

विचारण्यात यावे.

२१. महिला व बाल साक्षीदारांना तसेच वयोवृध्द साक्षीदारांकडे त्यांच्या निवासस्थानी विचारपूस करावी.

२२. बाल साक्षीदारांना विचारपूस करताना गणवेशातील पोलिसांनी विचारपूस करू नये.

## १) साक्षीदारांची तपासणी :

तपासणी किंवा मुलाखत घेणे - याचे महत्त्व :-

१) तपासाचे काम यशस्वीरीत्या करणे हे तपास करणारा अधिकारी कुठली पद्धत वापरतो यावर अवलंबून असते.

२) एखाद्या तपासाचे काम पूर्ण झाले असे तेव्हाच समजावे, जेव्हा शारीरिक पुराव्यांची हाताळणी पूर्ण झाली असल्यास, साक्षीदारांची तपासणी अतिशय हुशारीने केली असल्यास, संशयितांची चौकशी परिणामकारक असावी, सर्व सुगावे तर्कशुद्ध पद्धतीने विकसित करावेत आणि केसचे प्रतिनिधीत्व करणे आणि अहवाल तयार करताना तो व्यापक, स्पष्ट व तंतोतंत असावा.

३) साक्षीदाराने शपथेवर तोंडी दिलेल्या माहितीवरून मोठा पुरावा मिळू शकतो ज्यावरून गुन्ह्यांचा आरोप ठेवता येईल.

४) मुलाखत घेणे जे सर्वसाधारणपणे तपास करणाऱ्याचे काम असते व ह्या एकाच पद्धतीने तपासा दरम्यान केसची सर्वांगीण माहिती काढणे शक्य आहे.

५) मुलाखती घेणे ही एकच माहिती घेण्याची पद्धत आहे.

६) तपास करणाऱ्याचा सगळ्यात परिणामकारक तपास म्हणजे त्याची माहिती काढण्याची कुवत, ही माहिती त्याने तक्रारदार, साक्षीदार, खबरी आणि संशयित यांच्याकडून संयम राखून व अचूक प्रश्न विचारून काढायची असते.

## २) मुलाखत देण्याचा हेतू :

फक्त घटनेची सत्यता जाणून घेणे इतकाच असू शकत नाही. जे सत्य काढायचे आहे ते-

१) निःपक्षपाती असावे.

२) असंदिग्धपणे कायदा मान्य करेल/ग्राह्य धरेल असे.

३) बचावपक्षाच्या आव्हानांसमोर टिकेल असे.

४) बचाव पक्षाने बचावासाठी केलेल्या विधानांना निष्फळ ठरवू शकेल असे असावे.

## ३) मुलाखत घेण्याआधी पूर्ण करायच्या अटी :

१) मुलाखत घेणाऱ्याचे विशेष गुणधर्म :

अ) त्याच्या अंगी विक्रेत्याचे कसब असावे, त्याला अभिनय करता आला पाहिजे तसेच त्याने मानसोपचार तज्ज्ञ असावे, म्हणजेच त्याच्याकडे हे गुण असावेत-मन वळवू शकणे, जुळवून घेता आले पाहिजे, अंतरंग समजण्याची कुवत आणि अभिव्यक्त करता येणे इ.

ब) ज्याची मुलाखत घ्यायची आहे त्याच्याशी जिव्हाळा प्रस्थापित करता आला पाहिजे.

क) असे प्रभावी व्यक्तिमत्व जो विश्वास निर्माण करेल, त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या ताकदीने मात्र तरीही आपला वरिष्ठपणा उघड होऊ देणार नाही, त्याचा दबाव येणार नाही अशी काळजी घेणारा असावा.

ड) प्रांतियता किंवा वंशासंबंधीचे बोलणे, वागणे ह्यांची अतिशयोक्ती टाळा व त्या व्यक्तीच्या मनात अढी निर्माण करण्याचे टाळा.

## ४) नियोजन किंवा तयारी :

अ) गुन्ह्याच्या संदर्भातील सत्यतेचा अभ्यास करणे - गुन्ह्याचा कायद्याच्या दृष्टीने विचार-मनातच एकदा साक्षीदाराकडून अपेक्षित माहितीची उजळणी करा- सर्व गुन्ह्यांची एक यादी तयार करा.

ब) घटनास्थळी सोडलेल्या शारीरिक पुराव्यांचा अभ्यास करा, आणि साक्षीदार जी माहिती सांगणार आहे त्यांच्याशी त्यांची कशी सांगड घालाल याचा विचार करा.

क) साक्षीदाराच्या पार्श्वभूमीचा अभ्यास करा - त्याचे वय, विवाहित आहे की काय, कौटुंबिक परिस्थिती व जबाबदाऱ्या, समाजाबाबतचे त्याचे वर्तन, संवेदनक्षमता, आर्थिक व सामाजिक परिस्थिती, लैंगिक आवडनिवड किंवा योग्य मार्गावर नसणे, धमक्या देऊन काही काम करून घेण्याची वृत्ती.

ड) अनुकूल शारीरिक स्थितीही, योग्य वातावरण निर्मितीसाठी उपयुक्त ठरते, अशी अनुकूलता खालील परिस्थितीत अपेक्षित आहे.

**अ) मुलाखतीची जागा** : शांत व कुठलाही उपद्रव नसणारी असावी आणि जिथे मन शांत होईल व विश्वास निर्माण होईल, शक्यतो साक्षीदाराच्या सोयीने जागा ठरवावी.

**ब) बसण्याची व्यवस्था** : दोघांसाठी सरळ पाठ असलेल्या खुर्च्या व दोघांची एकमेकांच्या समोर एकाच सपाट भागावर बसावे. जेव्हा एखादी व्यक्ती जवळ बसते तेव्हा त्याच्याशी सहज जवळीक साधता येते, तेथील फर्निचर असे असावे ज्याने दोघांमध्ये अडथळा निर्माण होणार नाही- ह्या अडथळ्यांमुळे एकमेकांत सामंजस्याने मिसळता येणे शक्य होत नाही. त्यामुळे माहिती जी अगदी सहज मिळू शकते ती न मिळू शकल्याने विश्वास निर्माण होण्याकामी अडथळा येतो. त्यामुळे साक्षीदाराला सहजता वाटेल असे वातावरण असावे.

## ५) वेळ :

घटना घडल्यानंतर मुलाखत जितक्या लवकर घेता येईल तितके ते चांगले ठरते कारण, त्यावेळी घटना साक्षीदाराच्या मनात ताजी असते. मुलाखत घेण्याआधी मुलाखत घेणाऱ्याने घटनास्थळाचे परीक्षण करणे गरजेचे आहे, त्याचा आखीव नकाशा तयार करा, तेथून मिळालेल्या वस्तू जपून ठेवाव्यात, आणि योग्य तो शोध घ्यावा. मुलाखत घेणाऱ्याकडे भरपूर वेळ असला पाहिजे आणि त्याने त्याला घाई असल्याचे दर्शवू नये.

## अ) उशीर झाल्यास त्याचा परिणाम :

अ) साक्षीदार काही सत्यता/ घटना विसरण्याची शक्यता असते.

ब) इतरांशी वारंवार बोलण्याने किंवा चर्चा केल्याने साक्षीदार काही फोल, कल्पित मजकूर टाकण्याची शक्यता वाढते.

क) संशयितांकडून साक्षीदारांवर दबाव आणला जाण्याची शक्यता असते व ते साक्षीदारांच्या साक्षीत फेरबदल करू शकतात.

ड) पुष्कळ वेळा साक्षीदार त्याची पहिली मुलाखत घेणाऱ्याच्या बाजूला असतो.

ई) उशिरा घेतलेल्या जबानीत उशिराबद्दल समाधानकारक स्पष्टीकरण न दिल्यास कोर्टदेखील त्यांच्या जबानीविषयी संशय घेते.

## ब) स्मरणशक्तीला उजाळा देणे :

अ) साक्षीदाराने घटना घडताना पाहिली तेव्हा तेथे सभोवताली असलेल्या परिस्थितीत त्याला पुन्हा घेऊन जाणे.

ब) त्या घटनेचा संबंध एखाद्या अशा विशेष घटनेशी लावावा, ज्यात त्या साक्षीदाराला रस असेल आणि त्या संदर्भाने त्याला हवा त्या घटनेचा तपशील आठवण्यास मदत होईल.

## क) सहाय्यकांना कामाच्या पद्धतीविषयी मार्गदर्शन करा :

अ) जर तपास करणारा अधिकारी काही तातडीच्या कामात गुंतला असेल ज्यात त्याला लक्ष घालणे अगदीच गरजेचे असेल, तेव्हा दुसऱ्या अधिकाऱ्याला पूर्ण तपशील समजावून सांगून साक्षीदाराची चौकशी करायला सांगता येईल. परंतु त्या अधिकाऱ्याला केसविषयी संपूर्ण माहिती सविस्तरपणे सांगणे गरजेचे आहे.

## ड) चौकशी कुठल्या क्रमाने करावी :

१) चौकशी कशा क्रमाने करावी हे साक्षीदार कधी उपलब्ध आहेत त्यावर अवलंबून असते. ह्यात सर्वात तर्कशुद्ध क्रमवारी म्हणजे जशी माहिती विकसित होत जाते त्याच क्रमाने त्या त्या साक्षीदारांची चौकशी करणे.

२) सर्वप्रथम पीडित व्यक्तीची चौकशी करावी - जर ती व्यक्ती जिवंत असेल व शुद्धीत असेल तर त्यानंतर जो साक्षीदार गुन्हेगाराविषयी माहिती देऊ शकेल त्या साक्षीदाराची चौकशी करावी आणि चोरीस गेलेली मालमत्ता आणि गुन्ह्यांशी संबंध दाखवेल असा पुरावा असलेला साक्षीदार त्यानंतर घ्यावा.

## ६) कौशल्य :

१) नाते संबंध : मुलाखतकाराने ज्याची मुलाखत घ्यावयाची आहे त्याचा विश्वास संपादन करण्याचा प्रयत्न करावा. ह्या मुलाखतीचा उद्देश साक्षीदाराशी अतिशय चांगले नाते निर्माण करण्याचा असावा. साक्षीदारांविरुद्ध बोलेल असे संबंध कधीच निर्माण होऊ नये आणि मुलाखतकाराने साक्षीदारा विषयी काही दूषित पूर्वग्रह मनात ठेवू नये, अथवा होऊ देऊ नये.

२) प्रवृत्ती/ दृष्टिकोन चौकशी करतांना चौकशी करणाऱ्याचा ज्याची चौकशी करायची त्याच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन, मनोरचना, मनोधारणा इ. गोष्टींवर अवलंबून असते.

अ) असा विचार करायचा प्रयत्न करा की, जर तुमची चौकशी होत असती तर तुम्ही कसा विचार कराल? किंवा कसे बोलाल?

ब) तुम्ही कधीच तुम्हाला कंटाळा असल्याचे किंवा तुम्ही बेपर्वा किंवा तटस्थ असल्याचे दाखवू नका.

क) मुलाखतीला सुरुवात करण्याआधी त्या साक्षीदाराच्या केस संदर्भातील भावना समजावून घ्या तसेच साक्षीदार व संशयित ह्यांच्यात काही नाते आहे का ह्याची चौकशी करा.

३) जवळचा वाटणे/ दृष्टिकोन (ॲप्रोच) :

अ) मुलाखतकाराने सर्वप्रथम साक्षीदाराशी ओळख करून घ्यावी. त्याने स्वतःची ओळख करून द्यावी. तसेच शिष्टाचारांचे पालन करावे.

ब) त्यानंतर त्याने साक्षीदाराशी ओळख वाढवावी. साक्षीदाराला समजून घेण्यासाठी व त्याच्या भावना काही गप्पांच्या ओघात समजून घ्याव्यात.

क) संपूर्ण सत्य उघड करण्याची गरज नाही किंवा साक्षीदार त्यात कशाप्रकारे गुंतला आहे हे चौकशीच्या आधीच त्याला सांगणे गरजेचे नाही.

ड) मुलाखतकाराने नोंदी कराव्यात व औपचारिक नसावे. प्रत्येक वेळी असा प्रयत्न करावा की, साक्षीदाराचे सहकार्य मिळावे. फक्त चौकशीच्या दरम्यान नव्हे तर न्यायालयाच्या कामकाजातदेखील.

## ७) प्रश्नोत्तरे करणे :

अ) चौकशीच्या वेळी चौकशी करणाऱ्याचे संपूर्ण लक्ष साक्षीदाराकडे असावे. साक्षीदाराला कधीच असे म्हणू नये की, 'तू मला खोटेच सांगत असशील' उलटपक्षी 'तू मला पूर्ण सत्य सांगितले नाहीस' असे म्हणावे, म्हणजे असा साक्षीदार अधिक माहिती सांगण्यास उद्युक्त होत राहिल.

ब) ज्याची मुलाखत घ्यावयाची आहे त्याची पातळी समजून घेऊन त्याप्रमाणे बोला. ह्यासाठी प्रश्न अगदी साधे व साक्षीदाराला समजतील असे असावेत.

क) साक्षीदाराला बेचैन करणारे प्रश्न जसे गरिबी, त्याची गुन्हेगारी पार्श्वभूमी इ. विचारण्याचे टाळावे, जर ते त्याच्या चौकशीशी अजिबातच संबंधित नसेल तर.

ड) चौकशीचे वेळी त्याचे स्वरूप, साक्षीदार व चौकशी करणारा अधिकारी एकमेकांशी गप्पा मारत असल्याप्रमाणे असावे.

इ) असे प्रश्न विचारावेत की साक्षीदार सहज वर्णन करून माहिती सांगेल. ह्यासाठी ज्याचे उत्तर ''हो'' किंवा ''नाही'' स्वरूपाचे असतील असे प्रश्न विचारणे शक्यतो टाळावे.

ई) साक्षीदाराला सुगावा लागेल असे किंवा सूचक प्रश्न विचारणे टाळावे, कारण त्यामुळे तपासाचा उद्देश साध्य होत नाही.

फ) मुलाखतकाराने साक्षीदारावर प्रश्नांचा भडिमार करू नये किंवा अनेक वेगवेगळ्या प्रकारचे प्रश्न एकाच वेळी विचारू नये. कारण त्यामुळे साक्षीदाराच्या मनावर दडपण येऊन योग्य व सत्य घटनेविषयी बोलण्यात व्यत्यय येऊ शकेल.

ग) मुलाखतकाराने जागरूक असावे व तो विचारत असलेल्या प्रश्नांचा साक्षीदारावर काय परिणाम होत आहे हे त्याच्या हावभावांवरून ओळखावे.

ह) ज्याची उत्तरं अगदी संक्षिप्त असतील असे प्रश्न विचारणे जिथे गरजेचे असतात तिथेच विचारावेत.

उदा. ह्याबद्दल तू मला अजून सविस्तर सांगशील का? त्यानंतर काय झाले? त्याबद्दल तुला काय वाटते? इ. अशा प्रश्नांमुळे साक्षीदाराच्या मनात येणारे एका मागून एक विचारांमध्ये अडथळा येत नाही. तसेच तपास अधिकारीदेखील साक्षीदाराला कुठल्या बाबी तपासाच्या कामी महत्त्वपूर्ण आहेत किंवा फारशा महत्त्वाच्या नाहीत ह्या संबंधित कुठलाही सुगावा लागू देत नाही.

## ८) नोंदवणे :

अ) मुलाखत घेण्यासाठीचे वातावरण निर्माण करण्याअगोदरच मुलाखत घेणाऱ्या अधिकाऱ्याने त्याचे रजिस्टर व पेन मुलाखतीचा तपशील लिहीण्यासाठी काढून ठेवू नये. ह्यामुळे तो घाबरून काही बोलण्याच्या मन:स्थितीत राहणार नाही.

ब) मुलाखत घेता घेता त्याने लिहू नये किंवा टिपण करू नये. साक्षीदाराचे पूर्ण म्हणणे पहिले ऐकून घ्यावे आणि मगच नोंदी कराव्यात.

क) त्याने लिहिलेली जबानी एकदा वाचून घ्यावी व त्यानंतर गरज पडल्यास त्याला स्पष्टीकरण देण्यास सांगावे.

## ९) कसे थांबावे :

अ) कुठलीही चौकशी लांबलचक नसावी व तासन्‌तास चालू ठेवू नये, किंवा ती हळूहळू अचानक संपवू नये. मुलाखत कुठून चालू करावी व कोठे संपवावी हे काही गोष्टींवर अवलंबून असते.

१) साक्षीदाराचे व्यक्तिमत्त्व.

२) किती भाग यशस्वीपणे पूर्ण झाला आहे.

३) जर जास्तीची माहिती आवश्यक असेल तर,

ब) मुलाखत नेहमी शिस्तबद्ध पद्धतीने व निश्चितपणे संपवावी- अचानक तुटकपणे संपवू नये.

क) शेवटी साक्षीदाराचे त्याच्या सहकार्याबद्दल आभार मानावे.

४) दिलेल्या जबानीचे मूल्यांकन करावे :

अ) चौकशी करणाऱ्याने मूल्यांकन करताना सत्याला ऐकीव माहितीपासून वेगळे करावे आणि सत्यतेचे तपासाच्या कामात किती महत्त्व आहे व त्याची चौकशीच्या कामात कितपत मदत होईल हे बघावे.

ब) साक्षीदाराने अनावधानाने दिलेली माहिती ज्याचे कारण, अतिशयोक्ती, चुका, वेळ व अंतर किंवा वर्णन ह्याविषयी दिलेतर चुकीची माहिती ह्या सर्व गोष्टींना मुद्दामहून दिलेल्या चुकीच्या माहिती पासून वेगळे ठेवावे. मुलाखत घेणाऱ्याने साक्षीदाराशी त्याने चुकीची माहिती दिली किंवा तो एखादी गोष्ट समजण्यात इतक्या चुका करतो किंवा त्याने इतर चुका केल्यावरून उपहासात्मकरीत्या बोलू नये.

क) काही छोट्या कमतरता ज्या स्वाभाविक असतात, त्यामुळे त्यांच्यामुळे पुराव्याचे महत्त्व कमी होत नाही.

ड) चौकशी करणाऱ्याने स्वतःला आधीच कारस्थाने करणाऱ्या दलालांच्या कारवाया पासून सावध ठेवावे, कारण असे दलाल व ज्या लोकांना त्या गुन्ह्यात स्वारस्य असते असे लोक साक्षीदारांना खोटे बोलण्यास प्रवृत्त करू शकतात. साक्षीदारांकडून अशा पद्धतीने काढलेला पुरावा त्या परिसरातील एखादी व्यक्ती जिचा ह्या घटनेशी संबंध नाही व जिच्यावर विश्वास ठेवता येईल अशा व्यक्तीच्या मदतीने तपासून घ्यावा.

इ) अशा पद्धतीने खोटा पुरावा बनवण्याचे कुठलेही समर्थन करता येणार नाही. त्यात थोडासाही बदल केल्यास संपूर्ण पुरावा संशयास्पद वाटू लागतो. ज्यांची चौकशी होत आहे अशा व्यक्तीने केवळ सत्य व पूर्ण सत्यच बोलावे.

## १०) काही वेगळ्या प्रकारचे साक्षीदार :

१) दिलेल्या जबानीचे मूल्यांकन करावे :

अ) नाखुष असलेला साक्षीदार :

ब) नाखुष असलेला साक्षीदार : नाखुषीचे कारण.

२) निरनिराळ्या ठिकाणी जाऊन साक्ष देण्यासाठी होणाऱ्या त्रासामुळे साक्षीदार नाखुष असतो.

३) एखादा साक्षीदाराची साक्ष देण्याची इच्छा असते, पण भीती वाटत असते. त्याला गुन्हेगाराकडून किंवा त्याच्या मित्रांकडून कुठलाही धोका नाही हे त्याला पटवून देणे गरजेचे आहे, तसेच गरज असल्यास त्याला पोलीस संरक्षण देतील हे देखील त्याला सांगावे.

## ११) पोलिसांविषयी तिरस्कार असतो कारण :

अ) तपास अधिकाऱ्यांची पक्षपाती वृत्ती.

ब) पोलीसांविषयीचा सर्व सामान्यांत असलेला तिरस्कार.

क) पोलीस वर्गातील भ्रष्टाचार.

१) कदाचित साक्षीदार संशयिताचा मित्र असू शकतो. जेव्हा केव्हा साक्षीदार किंवा इतर माहिती देणारे खबरी जेव्हा सहकार्य करण्यास नकार देतात, कारण ते मुद्दामच गुन्हेगाराला संरक्षण देत असतात किंवा ते समाजकंटक असतात किंवा पोलीस दुष्ट असतात, त्यांच्यातील एकमेकांवरील विश्वास तोडण्याचा प्रयत्न करावा किंवा त्यालाच गुन्हेगार ठरवून त्याची चौकशी करावी.

२) साक्षीदार कधी निष्ठूर असू शकतो ज्याला कशातच रस नसतो. त्याच्या नाखुशीचे कारण शोधा आणि त्याच्या मनातली भीती दूर करून त्याचा विश्वास संपादन करा, त्यानंतर चौकशी व्यवस्थित होईल.

## अ) बडबड करणारा साक्षीदार :

तो नक्कीच अतिशयोक्ती करतो, आणि खोटी माहिती देतो. त्यांना काळजीपूर्वक प्रश्न विचारल्यास ते नक्कीच योग्य माहिती देतील.

## ब) अशिक्षित साक्षीदार :

सहसा खरे असतात, पण पटकन कोणाचाही प्रभाव होतो. त्याची वृत्ती मैत्रीपूर्वक असते आणि त्यांच्यात विश्वास निर्माण करावा व तेव्हाच त्याचे बाहेरील व्यक्तींच्या दबावापासून रक्षण करा, ज्यामुळे तपासाच्या कामात मदत होईल. स्पष्टीकरण देण्याची त्यांची क्षमता कदाचित कमी असेल, पण त्यांना प्रात्यक्षिक दाखवून किंवा इतर पद्धतीने स्पष्टीकरण देण्याची मुभा असावी. त्यांच्याशी बोलतांना साध्या भाषेचा वापर करा. स्तुती करणे अगदी आवश्यक असल्यासच करा.

## क) खोटारडा साक्षीदार :

खोटा पुरावा कधी कधी चुकीच्या निरीक्षणामुळे, बुद्धीची क्षमता कमी असल्याने, कट्टर वृत्तीने आणि बऱ्याच इतर कारणांमुळे दिला जातो. खोटे बोलण्यामागील कारण शोधा आणि साक्षीदाराची अगदी कसून तपासणी करा, ज्यामुळे त्याच्या खोट्या साक्षीतून देखील सत्य बाहेर काढता येईल.

## ड) लाजाळू व सहज घाबरणारा साक्षीदार :

अशा साक्षीदारांच्या विधानात बरीच अनिश्चितता निर्माण होते. त्यांच्याकडून सत्य थोडे थोडे करून काढून घ्यावे. तपास अधिकाऱ्याने अतिशय हळूवारपणे त्यांना प्रश्न विचारावे आणि त्यांची चौकशी ही सहज बोलण्याच्या ओघात करावी व शक्यतो त्याला प्रश्न उत्तराचे स्वरूप देऊ नये. जितकं शक्य असेल तितकं अशा साक्षीदारांची चौकशी त्याच्या ओळखीच्या वातावरणात करावी.

## इ) महिला साक्षीदार :

ह्या सहसा लाजाळू व घाबरट असतात. त्यांची त्यांच्याच घरगुती वातावरणात विचारपूस करावी. त्यांचा लाजाळूपणा आणि भीती घालवण्यासाठी खास प्रयत्न करावेत व त्यांना विश्वास वाटेल अशी वातावरणनिर्मिती करावी. विचारपूस ही आपापसात गप्पांच्या स्वरूपात असावी व औपचारिक प्रश्न उत्तरे नसावीत, म्हणजे त्यांना बोलण्याची हिंमत मिळते. खबरदारी घेणे गरजेचे आहे. आपल्याला हवी असलेली माहिती देणारी एक व्यक्ती ह्या दृष्टिकोनातूनच फक्त त्या महिलेकडे बघा आणि त्या व्यतिरिक्त त्या व्यक्तीला फार महत्त्व देऊ नये. नेहमी एका महिला साक्षीदाराची विचारपूस करताना इतर साक्षीदार त्यात महिला साक्षीदारांना प्राधान्य द्यावे. तिथे हजर असावे.

## ई ) लहान मूल साक्षीदार :

हे सगळ्यात चांगले साक्षीदार असतात. कारण ते अतिशय उत्सुक निरीक्षक असतात आणि त्यांची ग्रहणक्षमतादेखील चांगली असते. परंतु ते इतरांच्या सूचनादेखील चटकन ग्रहण करतात आणि त्यामुळे त्यांची पटकन दिशाभूल करता येते किंवा त्यांना घाबरवतादेखील येते. तपास अधिकाऱ्याने साक्षीदाराला कितपत समज आहे ह्याचा अंदाज घ्यावा. जेव्हा अशा साक्षीदारांची विचारपूस करतात तेव्हा एखाद्या वडीलधाऱ्या व्यक्तीप्रमाणे वागून त्यांचा विश्वास संपादन करावा. लहान मुलाची चौकशी करताना त्याचे पालक बरोबर असावेत. अर्थात जर ते पालकच संशयित असल्यास तसे करणे शक्य होत नाही. लहान मूल जेव्हा साक्षीदार असतो तेव्हा त्याला योग्य तितकी समज आलेली असावी, ज्याची व्याख्या कलम ११८ पुराव्याचा कायदा यात दिलेली आहे आणि सारासार विचाराच्या नियमानुसार त्याला बळकटी येणे गरजेचे आहे.

## फ) मुका–बहिरा साक्षीदार :

जर असा मित्र किंवा नातेवाईकांवर विश्वास ठेवता येत नसेल तर गरजेप्रमाणे सरकारी विशेषज्ञाची जो मूकबधिरांच्या संस्थेतून असेल अशाची मदत घ्यावी.

टिप्पणी :– १: तिसरा पक्षीय तेव्हाच वापरावा जेव्हा अशी व्यक्ती त्या घटनेची प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असेल किंवा एखाद्या अतिशय महत्त्वाच्या घटनेचा साक्षीदार असेल आणि तो पुरावा कोर्टात दाखल करणे अटळ आहे.

२) अशा साक्षीदाराने दिलेल्या पुराव्याला बळकटी आणण्यासाठी शक्यतो साक्षीदारांची शपथेवर जबानी घ्यावी.

## संशयितांची विचारपूस :

**१) विचारपूस त्याचे महत्त्व :** बऱ्याच फौजदारी केसेसमध्ये निदान काढण्यासाठी हाताळणी करणे गरजेचे आहे. जरी त्याची विचारपूस एखाद्या सगळ्यात जास्त योग्यता असलेल्या अधिकाऱ्याने केली, तरीही संशयितांची विचारपूस करणे किंवा इतर कोणाचीही चौकशी करावी, ज्यांना त्या केसबाबत काही विशिष्ट माहिती असेल.

**२) विचारपूस करण्याचा उद्देश :** संशयिताच्या विचारपूसचा उद्देश फक्त कबुलीजबाब घेणे इतकाच नसतो तर सत्य घटना आणि परिस्थितीची आणि गुन्ह्याविषयीच्या इतर तपशिलावरून त्या गुन्ह्याची माहिती काढणे हा देखील असतो. जसे तारीख, वेळ, ठिकाण कारण आणि गुन्हा अशा पद्धतीने घडला, साक्षीदारांची ओळख आणि अशी माहिती गोळा करावी ज्यावरून चोरीस गेलेली मालमत्ता पुन्हा मिळवता येईल आणि संशयितांचा इतर एखाद्या गुन्ह्यात हात असेल तर ते शोधून काढणे शक्य होईल.

**३) विचारपूस करणे ही एक कला आहे :** ही कला कशी संपादित करावी. विचारपूस करणे हा एक बुद्धीचा खेळ आहे व जो नेहमी अशा व्यक्ती जिंकतात, ज्या चपळ व तल्लख बुद्धीच्या असतात आणि त्या विषयातील कमतरतांचा फायदा घेऊ शकतात. विचारपूसच्या कामातील ही सर्वात कठीण पद्धत आहे. ह्या विचारपूसच्या कलेत असाधारण यश संपादन करण्यासाठी अभ्यास व सराव ह्या व्यतिरिक्त अजून काही बाबींची गरज असते त्या पुढीलप्रमाणे –

**१) संयम –** ह्या क्षेत्रात ज्या पोलीस अधिकाऱ्याला जरासेदेखील यश संपादन करावयाचे असेल तर हा गुण असणे गरजेचे आहे. एकदा का संशयिताला वाटले की, त्याची विचारपूस करणारा अधिर झालेला आहे तर मग तो त्यानंतर फसवणूक करण्याचा प्रयत्न करतो. त्याला असे वाटू लागते की, विचारपूस करणारा लवकरच चौकशीचे काम सोडून देईल. संयम सोडल्यास त्याचा परिणाम विचारपूस करणाऱ्याच्या सुज्ञतेवर आणि युक्तिवाद करणाऱ्यावर होईल. त्याच्या उतावीळपणे वागण्याने राग येऊ शकतो व त्यामुळे जी काही थोडीफार माहिती मिळण्याची शक्यता होती, ती सुद्धा नाही मिळणार आणि त्यामुळे काही महत्त्वाच्या गोष्टींकडे पूर्ण दुर्लक्ष होईल.

## ४) मानसिक स्थिती की ज्याचा प्रभाव सुद्धा विचारपूसवर होतो :

१) आरोप करणे – विचारपूसच्या वेळी अपराधी व्यक्ती नेहमीच घाबरलेली असते. अपराधी व्यक्ती ज्याला गुन्हा घडल्या–घडल्या त्याच ठिकाणाहून अटक करण्यात आली किंवा घटना घडल्यानंतर काही वेळातच अटक केल्यानंतर तो भावनाविवश होऊन गोंधळात पडतो. ह्या अपराधी भावनेमुळेच –

i) मानसिकरित्या ह्या व्यक्तीच्या हालचालींवर परिणाम होतो

ii) त्याला मानसिक दबावामुळे असे वाटू लागते की, तो असुरक्षित आहे आणि मग तो बचावात्मक पवित्रा घेतो.

२) पुरावा - त्यांचा संशयितावर होणारा परिणाम :

संशयितावर जेव्हा पुराव्याच्या बळावर आरोप केले जातात. तेव्हा संशयित अशा पुराव्याला सामोरे जात असतांना तो एका अनिश्चित मानसिक अवस्थेत असतो. त्यातून अगदी भिन्न आणि विरोधी मानसिकता तयार होते, जिला आपण अस्थिरता, उदासीनता असे म्हणू शकतो. ज्याचा परिणाम त्याच्या मनात असे विचार येण्यात होतो की, संपूर्णपणे सर्व घटना उघडपणे सांगण्यातच त्याला शांतता मिळणार आहे.

३) दोषी असण्याची जाणीव : दोषी असण्याची जाणीव झाल्यावर एक शत्रुत्वाची भावना निर्माण होते आणि त्यातूनच तो व्यक्ती आपला गुन्हा कबूल करतो. वरील सर्व परिस्थिती जेव्हा निर्माण होते तेव्हा अनुकूल मानसिकता निर्माण होते, आणि त्यातूनच अशी धारणा निर्माण होते की, तो त्यात मागे न वळता पुढेच जात राहतो. ह्याच वेळी त्याची कबुली मान्य केली जाते व प्रतिकार करून ह्यातून बाहेर पडण्याची गरज पडत नाही. तपास अधिकाऱ्याने मात्र अशा कबुलीकडे जरा संशयास्पद वृत्तीनेच बघावे. जरीही अशी कबुली ही दोषी असण्याच्या जाणिवेने दिली गेली असली तरी. एक अगदी अस्सल कबुली जबाब एखादा दोषी व्यक्ती जेव्हा देतो तेव्हा त्या दोषी भावनेने तो खचून गेलेला असतो. तसेच एखादा मानसिक रोगी असलेली व्यक्ती सोडली तर अशी खोटी कबुली देणारे लोक सहसा अगदी मनमिळावू दिसतात व तसेच वागतात. दोषी असल्याच्या जाणिवेतून ज्या व्यक्ती कबुली देतात त्यांच्या कबुलीची सत्यता पडताळण्यासाठी एखादी अशी गोष्ट त्याला विचारा ज्याचा गुन्ह्याशी काही संबंध नाही, आणि हे बघावे की, तो त्या गोष्टींना घटनेशी संबंधित असल्याचे मान्य करतो आहे किंवा नाही ?

४) तयारी - विचारपूस तंत्रासाठी व त्यात यश येण्यासाठी पूर्वतयारी करणे गरजेचे आहे.

काही सर्वसाधारण पूर्वतयारीसाठी

**१) विचारपूस करणाऱ्या अधिकाऱ्याने घडलेल्या गुन्ह्याच्या संदर्भातील सर्व सत्यता जाणून घ्याव्यात व त्या परिस्थितीची सर्व माहिती घ्यावी जी तपासाच्या कामी उपयोगी असेल जसे :**

अ) गुन्ह्याचे सत्य स्वरूप.

ब) नक्की किती नुकसान झाले.

क) तारीख, वेळ आणि ठिकाण जिथे घटना घडली (तपशीलवार)

ड) गुन्ह्याच्या ठिकाणाचे वर्णन आणि त्याचे ठिकाण, आणि

इ) तो गुन्हा कसा घडला ते बघणे म्हणजेच वापरलेली हत्यारं, जिथून त्या ठिकाणी प्रवेश केला ते ठिकाण व जिथून बाहेर पडले ती जागा इत्यादी.

ई) गुन्हा घडला तेव्हा कुठे दुसरीकडे असल्याचा दावा करणारा, किंवा इतर जबानी (तोंडी किंवा लेखी) जी संशयिताने तपासासंबंधी दिली.

ग) संवेदनशीलता राखणारा धार्मिक किंवा अन्य स्वरुपाचे पूर्वग्रह न ठेवणारा, बंधुत्वभाव बाळगणारा,

ह) घरगुती वातावरण जपत संवाद साधणारा.

य) सर्वसाधारण सामाजिक वृत्ती.

ज) लैंगिक आकर्षण किंवा योग्य मार्ग सोडून देणे.

क) गुन्हा करण्याची संधी किंवा क्षमता.

## २) संशयिताविषयी शक्य तितकी माहिती मिळवावी :

खालीलप्रमाणे -

अ) वय, शिक्षण, लग्नाविषयी, आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती आणि त्याची गुन्हेगारी पार्श्वभूमी, जर असेल

तर,

ब) आत्ताची त्याची मानसिक आणि शारीरिक स्थिती जसे व्यसनाधीनता दारू, ड्रग्स, अंमलीद्रव्य इ.

क) तपासाकडे बघण्याचा त्यांचा दृष्टीकोन (उदा. – सहकार्य करणारा किंवा शत्रुत्व दाखवणारा)

ड) पीडिताशी किंवा घटनेच्या ठिकाणाशी त्याचा असलेला संबंध.

इ) गुन्ह्याशी त्याचा संबंध दर्शविणाऱ्या सत्यता किंवा गुन्हा करण्यामागील त्याचा हेतू.

ई) गुन्हा घडला तेव्हा कुठे दुसरीकडे असल्याचा दावा करणारा, किंवा इतर जबानी (तोंडी किंवा लेखी) जी संशयिताने तपासासंबंधी दिली.

फ) संवेदनशीलता जपणारा, धार्मिक किंवा अन्य स्वरुपाचे पूर्वग्रह न ठेवणारा बंधुत्वभाव बाळगणारा.

ग) घरगुती वातावरण जपत संवाद साधणारी.

ह) सर्वसाधारण सामाजिक वृत्ती.

य) लैंगिक आकर्षण किंवा योग्य मार्ग सोडून देणे.

ज) गुन्हा करण्याची संधी किंवा क्षमता.

## ३) त्याने पीडिताविषयीदेखील पुढीलप्रमाणे माहिती मिळवावी :

अ) कशा प्रकारची दुखापत केली गेली आणि त्याचा तपशील.

ब) वय, लिंग, वैवाहिक दर्जा, कौटुंबिक जबाबदाऱ्या (त्यांच्यावर किती जण अवलंबून आहेत.)

क) सामाजिक वृत्ती.

ड) आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती.

इ) लैंगिक आकर्षण किंवा योग्य मार्गावरून दूर जाणे.

ई) धमकी देणे.

## i) योग्य जागा निवडणे :

अ) विचारपूससाठी निवडलेल्या जागी एकांत मिळावा आणि इतर काही व्यत्यय येऊ नये ह्याची खबरदारी घ्यावी. गुन्हेगारी जगातील गुन्हेगार केलेला गुन्हा हा एकांताच्या ठिकाणीच मान्य करू शकतील.

ब) संशयिताला त्याच्या मानसिकतेचा फायदा घेऊ देऊ नका.

क) चौकशीची खोली किंवा जागेत अशा काही गोष्टी नसाव्यात, ज्याने चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याचे किंवा संशयिताचे लक्ष विचलित होईल, जसे फोनची बेल वाजणे, इतरांकडून अकारण व्यत्यय येणे.

ड) शक्यतो फार विविधता टाळा, फक्त जिथे गरज असेल तिथेच एखाद्या पथकाची गरज पडते.

इ) जर संशयित एकापेक्षा जास्त असतील तर त्यांची चौकशी वेगवेगळी करावी, ज्यामुळे ते जी विधानं करतात त्यात आपापसात काही विरोधाभास असल्यास लक्षात येते. आपापसातील विरोधी जबान्यांना एकमेकांविरुद्ध वापरावे आणि त्याचा फायदा घेऊन त्याला तोडावे. संशयितांना वेगवेगळे ठेवून त्यांच्याकडून सत्य काढून घेणे हे एक चांगले धोरण असते.

## ii) बसण्याची व्यवस्था :

अ) चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याने संशयिताच्या शक्य तितक्या जवळ बसावे व त्यांच्यामध्ये टेबल किंवा डेस्क किंवा कुठलेही फर्निचर नसावे. अशा अडथळ्यांमुळे मानसिक अडथळे निर्माण होतात. त्यांच्यातील अंतरामुळे संशयिताला मुक्त वाटते व त्याचा विश्वास वाढतो.

ब) सरळ पाठ असलेल्या खुर्च्या निवडाव्या. संशयित व चौकशी करणारे अधिकारी दोघांसाठी खुर्चीत वाकणे

किंवा मागे टेकून बसणे ह्याने संशयिताच्या मानसिकतेवर अयोग्य परिणाम होतो.

क) चौकशी करणारा अधिकारी आणि संशयित यांनी एकमेकांसमोर बसावे.

ड) कुठल्याही प्रकाराने संशयिताला अटकाव करू नये, किंवा पोलिसी खाक्या दाखवून अटक करण्याची धमकी देऊ नये.

इ) चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याने संशयिताच्या अगदी जवळ बसावे, त्यामुळे त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रभावामुळे त्यावर भावनिक ताण पडेल, आणि त्यानंतर संशयिताची मानसिक आणि शारीरिक लक्षणे खालीलप्रमाणे

१) धडधडून धमण्यांमध्ये जोरात रक्त पुरवठा होणे.

२) घाम येणे.

३) जोरजोराने श्वासोच्छवास चालणे,

४) नस जोरात चालणे.

५) गळ्यातील गोटीची खूप जास्त हालचाल.(आवंढा गिळत राहणे.)

६) लज्जीत होणे.

७) जमिनीकडे बघणे, किंवा चौकशी करणाऱ्याच्या डोळ्यात न बघणे, एक पाय दुसऱ्या पायावर टाकणे.

८) पाय हालवणे.

९) हात एकमेकांवर नाचवणे.

१०) बोट टेबलावर नाचवणे.

११) नख खाणे.

१२) आतमध्ये एक विचित्र भाव होणे.

१३) तोंड कोरडे पडणे,

१४) तोंड घट्ट आवळणे

१५) केलेल्या विधानाची शपथ घेऊन सत्यतेची खात्री देणे.

१६) आपली गुन्हेगारी पार्श्वभूमी नसल्याबाबत विधाने, मला तर आवडत नाही वगैरे.

## iii) वेळ :

अ) उगाचच उशीर करू नका. जेथे कबुली जबाब उगाचच उशिराने दिला जातो त्याच्याकडे संशयानेच बघितले जाते.

ब) चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याला त्यासाठी भरपूर वेळ दिला गेला पाहिजे.

## iv) कपडे :

विचारपूस करणाऱ्या व्यक्तीने साध्या वेशात असावे, ज्यामुळे संशयिताच्या मनात विश्वास निर्माण होईल आणि संशयिताच्या मनातून द्वेषाची किंवा विरोधाची भावना कमी करणे, जर त्याने मळलेले किंवा चुरगळलेले कपडे घातले असतील तर, चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याचा प्रभाव कमी होऊ शकतो.

## v) प्रवृत्ती :

विचारपूस करणाऱ्याने जर सहानुभूती व सामंजस्य दाखविल्यास त्याचा प्रभाव खूप जास्त असतो. डावपेचाने किंवा काही तंत्र वापरून जर निष्पाप व्यक्तींकडून कबुली जबाब घेतला गेला तर ते कृत्य लज्जास्पद होईल.

१) संयम आणि चिकाटी हे दोन गुण चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्यात असावे, त्याने त्याचे संतुलन ठेवणे फार

गरजेचे असते. जो संशयित अगदी खंबीर आणि पटकन कबुली देईल असे वाटत नाही त्यावर देखील अतिशय चिकाटीने केलेल्या चौकशीचा परिणाम होतो.

२) गुन्ह्याच्या विषयाला सरळ हात घालण्याची प्रचंड घाई करणे टाळावे. अगदी स्पष्ट शब्द वापरणे जसे मारणे, चोरणे आणि गुन्ह्याची कबुली दे हे टाळावे. याच्याऐवजी 'चल सांग, हे घे, आणि खरं सांग अशी सौम्य भाषा वापरा. सर्वसाधारणपणे गुन्ह्याची कंबुली घेण्याचा प्रयत्न न करता त्या घटनेविषयी माहिती मिळवा किंवा तो घेण्याची कारणे जाणून या.

३) तुम्ही एक तपास अधिकारी आहात व गुन्ह्याची कबुली घेण्यासाठी चौकशी करत आहात हे दाखवण्याचा प्रयत्न करू नका. उलट तुम्हाला फक्त सत्य जाणून घ्यावयाचे आहे हे दाखवणे जास्त प्रभावी असते.

४) अगदी सुरुवातीलाच पेन आणि पेपर घेऊन बसू नये, जेव्हा योग्य वातावरणनिर्मिती होईल तेव्हाच ते करावे.

५) संशयित जेव्हा नसेल तेव्हा त्याच्या परिवाराची काळजी घ्या.

६) संशयिताने काही प्रतिक्रिया दाखवल्यास ती समजून घेण्यासाठी सतर्क राहा, तसेच कोणी त्याच्यावर बाहेरून दबाव आणून सत्य सांगण्याविरुद्ध मन वळवू शकते, तेव्हा त्या दृष्टीनेदेखील लक्ष ठेवा.

७) संशयित लबाडीची युक्ती वापरू शकतो. फक्त ती त्याने खोटा कबुली जबाब देण्यासाठी वापरू नये. कलम २९ भारतीय पुराव्याचा कायदा ह्याला संमती देते. परंतु अशा वेळी दिलेल्या पुराव्याचे महत्त्व मात्र कमी होते.

८) एखादे वचन दिल्यास ते पाळणे गरजेचे असते. परंतु असे वचन नीतिमत्तेला धरून असावे. सहसा असे वचन देऊन घेतलेला कबुली जबाब ग्राह्य धरला जात नाही. अशा वेळी परीक्षा बघण्याचा एक मार्ग म्हणजे, संशयिताचा स्वभाव गुणवैशिष्ट्ये बघावीत व त्यावरून त्याने दिलेला कबुली जबाब सुसंगत आहे का ते तपासावे.

९) योग्य वर्तनासाठी कान उघाडणी करण्यास नेहमीच परवानगी असते.

१०) जिथे भावनिक युक्ती किंवा विनंती याचा उपयोग होत नाही, तिथे चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याने त्रासदायक वातावरण तयार करून अगदी हट्टीपणाने ते ताणून ठेवावे. त्याने सत्य जाणून घेण्यासाठी संशयिताला जेरीस आणावे व कुठेही नमते न घेता प्रामाणिकपणे त्याचा जबाब घ्यावा.

११) विचारपूस करणाऱ्या अधिकाऱ्याने सुरुवातीला केलेल्या विधानाला आत्मविश्वासाची जोड देऊन संशयिताला दोषी असल्याचे भासवा. त्याला असे भासवले पाहिजे की, त्याने काहीही लपविण्याचा प्रयत्न करणे निरर्थक आहे, कारण चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याकडे संशयित दोषी असल्याबद्दलची माहिती त्याच्या मार्गाने मिळालेली आहे.

१२) विचारपूस करणाऱ्या अधिकाऱ्याने संशयिताच्या मानसिक व शारीरिक लक्षणांकडे लक्ष वेधले पाहिजे.

१३) गुन्हेगाराचा दोष किंवा फोलपणा ह्यांचा फायदा घेण्यात आला पाहिजे.

१४) संशयिताच्या मनातील दोषी असण्याची भावना त्याच्या गुन्ह्याचे गांभीर्य फारसे नसल्याचे दर्शवून कमी करा.

१५) संशयिताला सहानुभूती दाखवा –

अ) पीडिताला निषेध करून,

ब) त्याच्या सोबत्यांचा निषेध करून किंवा गुन्ह्याचे कारण एखाद्यामुळे किंवा काही व्यक्तींमुळे घडल्याचे सांगणे,

क) संशयिताच्या असे निदर्शनास आणून द्या की, खरं बोलणे त्याच्या स्वत:च्या मन:शांतीसाठी किंवा त्याच्या नैतिकतेच्या दृष्टीने तसेच त्या प्रकरणाशी संबंध असलेल्या सर्वच व्यक्तींच्या दृष्टीने योग्य आहे व ती एकच सभ्य व सन्मानपूर्वक गोष्ट आहे.

१६) अजुन एका विचारपूस अधिकाऱ्याच्या मदतीने मित्रत्व असलेला व मित्रत्व नसलेला अशी दुहेरी वृत्ती

असल्याचे दर्शवावे.

१७) सत्य सांगण्यास विरोध करणे किती निरूपयोगी आहे हे निदर्शनास आणून द्यावे.

१८) ती व्यक्ती दोषी असल्याबद्दल तुम्हाला सत्य माहीत असल्याचे दाखवा आणि त्याबद्दल अगदी सहज विचारा, जसे काही तुम्हाला ते आधीपासून माहिती नव्हते. त्याचवेळी त्याच्याविरुद्ध त्याच्या गैरकृत्याचे पुरावे तुमच्याकडे आहेत हे संशयिताला दाखवा. त्यामुळे त्याचा जो विश्वास असतो की, पोलिसांकडे त्याच्याविरुद्ध काहीही पुरावा नाही, तो पूर्णपणे अस्वस्थ होतो.

१९) एखादा अस्तित्वात नसलेला पुरावा संशयितापुढे मांडा आणि बघा की, त्याचे स्पष्टीकरण देतो का, आणि त्याने तसे केल्यास त्यावरून तो दोषी असल्याचे स्पष्ट होईल.

२०) पुष्कळ वेळा संशयिताला घटनास्थळी नेणे किंवा पीडिताच्या संपर्कात आणणे योग्य होते.

२१) जेव्हा संशयित व्यक्ती विचारपूस करणाऱ्या अधिकाऱ्याला सांगते की, ''ठीक आहे तुम्हाला जी माहिती हवी ती द्यायला मी तयार आहे. परंतु मी कुठलाही गुन्हा केलेला नाही, तेव्हा ती व्यक्ती नक्कीच दोषी असते.''

## vi) भाषा :

आपण वापरत असलेली भाषा व आपली बोलण्याची पद्धत व एकूणच सांस्कृतिक व सामाजिक दर्जा संशयिताला समजेल असा असावा. असभ्यता किंवा उध्दटपणा ह्या दोन्हीचा वापर करू नये. सूचनात्मक प्रश्न विचारणे टाळावे.

## vii) नोंदविणे :

जेव्हा योग्य वातावरणनिर्मिती होते आणि संशयितदेखील बोलण्याची तयारी दाखवतो तेव्हा नोंद करून घेण्याची प्रक्रिया चालू करावी. त्याची सुरुवात संशयिताच्या दैनंदिन जीवनापासून करावी आणि ती पुढे पालकत्व, रहिवास, नातेसंबंध, साक्षीदार आणि मित्र याबाबत माहिती घेऊन मग गुन्ह्याच्या घटनेचा तपशील घ्यावा. त्यामध्ये घडलेल्या गुन्ह्याची तपशीलवार माहिती असावी जसे, तारीख, वेळ, स्थळ, उद्देश आणि कबुली देणारा गुन्हा घडल्याच्या आणि कुठे गेला होता, घडवण्याची पद्धत, गुन्हा घडल्यानंतर तो कुठे गेला होता, घटना घडण्याआधी व नंतर तो कुठल्या व्यक्तींना भेटला, काही केसेसमध्ये त्याने घटना घडली तेव्हा कुठले कपडे घातले होते हे सांगितल्यास मदत होते. हे सर्व कथन जे कबुली जबाब असेल किंवा घटनेविषयीची सत्यता सांगणारे असेल तर त्याची नोंद नेहमी त्याच्या मनोगताच्या स्वरूपात आणि संशयित ज्या भाषेत बोलत असेल त्या भाषेत शक्यतो करावी.

## viii) निरनिराळ्या पद्धती :

अ) विचारपूसचे काम पूर्ण होताच नोंदविण्याचे काम सुरू करणे.

ब) विचारपूस व नोंदवणे एकाच वेळी करणे.

क) विचारपूसबाबत निरनिराळ्या पायऱ्यांवर नोंदणी करणे.

## ix) तंत्रांची मदत :

अ) विचारपूसच्या वेळी दृकश्राव्य पद्धतीने रेकॉर्ड करणे.

ब) संशयितांचे आपाआपसातील बोलणे मायक्रोफोन लपवून लावून त्यांच्या नकळत ऐकणे.

क) काही खास काच लावून घेणे ज्यामुळे संशयिताच्या हालचाली त्याच्या नकळत टिपता येतील.

ड) खोटे बोललेले - शोधणारा (पॉलीग्राफ) अशा पद्धतीने नोंदवलेला पुरावा अजून तरी आपल्या देशात ग्राह्य मानला जात नाही, जसे शारीरिक खाणाखुणा काही केसेसमध्ये आणि ह्या ग्राफचा अर्थपूर्ण पुरावा असे मानले

जात नाही.

## x) गुन्हेगारांचे वर्गीकरण :

१) भावना प्रधान गुन्हेगार : जे एखादा गुन्हा करतात, बदला घेण्याकरिता, रागात, किंवा लैंगिक गुन्हा करतात. ह्या प्रकाराने गुन्हा करणाऱ्यांना त्याचा सर्वात जास्त त्रास होतो दुसऱ्या शब्दांत दुःखाची जाणीव होते. ह्या केसमध्ये सर्वात प्रभावी तंत्र म्हणजे सहानुभूतीने चौकशी करणे.

२) भावनारहित/कठोर गुन्हेगार – जे आर्थिक फायद्यासाठी गुन्हे करतात. अशा व्यक्तींसाठी सगळ्यात प्रभावी तंत्र म्हणजे 'वस्तुस्थितीचे ॲनॅलिसीस करून दाखविणे', ह्याचा अर्थ अशी पद्धत वापरा जी त्या व्यक्तीच्या सारासार बुद्धीस पटेल. रशियन शास्त्रज्ञ पार्लोव्ह ह्याने तयार केलेले दुसरे गुन्हेगाराच्या चौकशीचे वर्गीकरण.

| | | |
|---|---|---|
| १) शक्तिशाली | (अ) सक्रिय | (ब) निष्क्रिय |
| २) कमकुवत | (अ) सक्रिय | (ब) निष्क्रिय |

## शक्तिशाली सक्रिय :

अतिउत्साही व्यक्तीदेखील ह्याच प्रकारात येतात, ही व्यक्ती लगेचच प्रतिक्रिया देते जसे रडू लागणे, किंवा काही अतिशय जास्त प्रतिक्रिया देणे, ज्याने लक्ष विचलित होईल.

## कमकुवत सक्रिय :

अशी व्यक्ती जो गुन्हा केलेला नसताना त्याची कबुली देतो. तो स्वतःची विचारपूसमधून सुटका करण्यासाठी काहीच प्रयत्न करत नाही.

## शक्तिशाली निष्क्रिय :

हा व्यक्ती मंदबुद्धीचा व निरुत्साही असतो. तो फक्त बसतो आणि म्हणतो, 'तुम्ही सिद्ध करा' हा कदाचित सर्वात कठीण गुन्हेगार असेल.

## कमकुवत निष्क्रिय –

हा घाबरट व्यक्ती असतो. तो फक्त बसतो, भीतीने कापतो पण काहीही सांगत नाही.

i) गुन्हेगार जर अल्पसंख्याक जाती, जमातीचा असेल तर त्याला त्याच्या जाती-जमातीवरून मानहानीकारक बोलू नका. याउलट त्यांच्या समाजाच्या एखाद्या सदस्याची प्रशंसा करा आणि तसेच त्याचा विश्वास जिंकण्याचा प्रयत्न करा.

ii) अपहार करणारा – सर्वात प्रभावीपणे हाताळण्यासाठी म्हणावे की, त्या व्यक्तीला ते पैसे उधार घ्यायचे होते व त्याचा अपहार करायचा नव्हता आणि अचानकच पैसे कमी पडले म्हणून नाही तर त्याने ते पैसे पुन्हा त्यात टाकले असते. दुसरी पद्धत म्हणजे असे म्हणणे की, त्याने ते पैसे त्याच्या आजारी बायको किंवा मुलांसाठी घेतले होते.

अपहाराच्या पहिल्या प्रकारात मालक कमी पगार देतो म्हणून त्यालाच दोषी ठरवावे. किंवा काही अनैतिक किंवा निष्काळजी पद्धतीने काम केल्याने त्याला चोरी करण्याचा मोह झाला असेल.

इतर उपयोगी तंत्र म्हणजे :

अ) खर्चिक स्वभावाच्या बायकोला दोष द्या.

ब) सावकारी व्याज दराने पैसे दिलेल्या सावकाराने दबाव टाकल्याने त्याला दोष द्या.

क) त्या व्यक्तीवर त्याची कुवत नसताना पैसे भरण्यासाठी दबाव टाकला गेल्याने.

ड) पोलिसांना किंवा पूर्ण समाजालाच दोषी ठरवायचे शर्यतींवर पैज लावणे किंवा जुगार खेळण्याची

परवानगी दिल्याबद्दल किंवा सरकारने लागू केलेल्या निरनिराळ्या अवाजवी करांना दोष देणे.

iii) चोर – असे सूचवा की, त्या व्यक्तीने ती चोरी गेलेली वस्तू चुकून उचलली व त्यानंतर त्याला ती परत करायची भीती वाटली. कारण त्याला वाटले की, त्या वस्तुचा मालक कदाचित त्याने ती वस्तू चुकून घेतली यावर विश्वास ठेवणार नाही. एखाद्या महिलेने चोरी केल्यास असे सहज सुचवता येते की, तिने ती चोरी स्वत:साठी केली नसून ती दुसऱ्या कोणासाठी केली असावी. एक वरिष्ठ, तिचा नवरा इ. दुसरे असे सुचविणे की, अशी संधी उपलब्ध झाल्यास कोणीही व्यक्ती चोरी करेल.

## दरोडेखोर – परिणामकारक सूचना :

अ) थोडीतरी सहानुभूती दर्शवावी. त्या व्यक्तीच्या आयुष्यात तिला आलेले दुर्भाग्यपूर्ण अनुभव आणि गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींचा प्रभाव यासाठी.

ब) दरोडेखोरांच्या कौशल्याची प्रशंसा करा.

क) जेव्हा दरोडा किंवा डाका घालतांना खून झालेला असेल तर, त्यांचा तसे करण्याचा उद्देश नव्हता असे सुचवावे. त्याचा उद्देश पैसे चोरण्याचा होता, परंतु स्वत:चा बचाव करताना त्याला बळाचा वापर करावा लागला.

## लैंगिक गुन्हे करणारे :

अ) हा गुन्हा कितीही भेसूर किंवा किळसवाणा असला तरीही, संशयित गुन्हेगाराला तो एक नीच, अमानुष व्यक्ती असल्यासारखी वागणूक देऊ नये, सहानुभूती व समजूतदारपणे वागणूक देणे गरजेचे आहे.

ब) कधी कधी त्या गुन्हेगाराला असे सांगणे की, त्याने केलेल्या गुन्ह्यापेक्षाही वाईट प्रकारचे लैंगिक गुन्हे घडतांना पाहिले आहे, ह्याची मदत होते.

क) कधीही त्या लैंगिक गुन्ह्यातील कृत्याचे वर्णन अश्लीलतेने करू नये, मात्र जर त्या व्यक्तीला स्पष्ट शब्दांत सांगितल्याशिवाय समजणे कठीण असेल तर मात्र त्याच्याशी स्पष्टपणे बोलावे लागेल.

ड) पीडित व्यक्तीचे चालचलन व कपडे घालण्याची पद्धत अशी आहे की, तिलाच दोष द्यावा लागेल असे सुचवावे.

इ) पीडित व्यक्तीचे चरित्र हनन करा जिथे परिस्थितीनुसार बलात्कारीत स्त्रीचे वागणे असे होते की ती वेश्या व्यवसाय करत आहे आणि म्हणूनच संशयिताला वाटले की, ती त्या दृष्टीने इच्छुक व्यक्ती आहे.

## बालगुन्हेगार आणि महिला संशयित :

सर्वसाधारणपणे दिलेल्या सूचनांव्यतिरिक्त ह्या संशयितांना अगदी वेगळ्या पद्धतीने हाताळावे, त्यांना सहानुभूतीने व भावनिक आव्हान करावे.

## अशिक्षित आणि निर्बुद्ध व्यक्ती :

अशा व्यक्ती सुशिक्षित किंवा आर्थिकदृष्ट्या बलवान किंवा सामाजिक प्रतिष्ठा असलेल्या व्यक्तीपेक्षा संवेदनशील असतात.

ब) अशा व्यक्तींना हाताळतांना सहसा अशा मानसिकतेने हाताळावे लागते, जसे एखाद्या लहान मुलाने गुन्हा केला असेल, तेव्हा त्याची विचारपूस कराल त्याप्रमाणे.

क) त्याच्याशी अगदी साध्या भाषेत बोला.

ड) अतिशय सकारात्मक वृत्तीने तिच्याकडे बघावे. आपले कडक धोरण न सोडता संशयितच दोषी असल्याची निश्चितता करावी.

## xi) खोटी कबुली देणारा (पॅथॉलॉजीकल लायर) :

माहीत असलेल्या सत्य घटना संशयिताला सांगितल्या नसतांना त्याचे काय म्हणणे आहे हे तपासणे अतिशय सहाय्यभूत होते, कारण त्याने गुन्हा केला असल्यास त्या सत्य गोष्टी त्याला/माहीतीच असतील.

जे अट्टल व सराईत गुन्हेगार असतात ते काही गोष्टी दाबतील किंवा लपवतील किंवा बऱ्याच वेगवेगळ्या कारणांसाठी खोटी विधाने करतील. विंचारपूस करणाऱ्या अधिकाऱ्यांना तो खोटेपणा किंवा अर्धसत्य ओळखता आले पाहिजे आणि त्याच्यात विश्वास निर्माण करून त्याची खोटे बोलण्याची सवय काढावी.

१३) आरोपीला त्याची कबुली नोंदवण्यासाठी कोंडीत पकडणे.

अ) आरोपी तुरुंग अधिकाऱ्यांच्या ताब्यात असल्याचा अहवाल पुढे पाठवावा. (सुको जजमेंट सु.को. १९५७ क्रि. लॉ. ज. १०१४)

ब) आरोपीवर कुठल्याही बाहेरील व्यक्तींचा प्रभाव पडून व त्यामुळे तो खरे सांगण्यापासून परावृत्त होऊ लागला तर तसे न होण्याची उपाययोजना करावी.

क) आरोपीने आपणहून व त्याच्या मर्जीने खरे सांगावे अशी उपाययोजना करावी.
(एखाद्या केसमध्ये प्रत्यक्ष यशस्वी विचारपूस करणे)

६) कायदेशीर कैदेतून पळून जाणे.

**कैदेतून पळून जाणे** : शिक्षेच्या बाबतीत शिथिलता दाखवणे हा एक गंभीर गुन्हा आहे. कायद्याच्या अधिकाऱ्यांसमोर हे एक आव्हानच आहे. ज्याच्यासमोर प्रत्येक गुन्हेगाराने हात टेकावे, अशी त्याची मागणी आहे. जो कोणी कायदेशीर कैदेतून पळ काढतो तेव्हा तो त्याचा अधिकार न जुमानता तसे करतो, किंवा अशा कैदेतून स्वत:ची सुटका करतो, कायद्याच्या अधिकाराला तुच्छ मानतो.

■■■■■

# प्रकरण ५

# मालमत्ता जप्ती

# Seizure of Property

## उद्दिष्टे :

**(Cr. P.C. Sec. 93, 94, 102, 457)**

Cr. P.C. Sec. 93 - झडती-वॉरंट केव्हा काढता येईल.

Cr. P.C. Sec. 94 - जेथे चोरीची मालमत्ता, बनावट दस्तऐवज इ. असल्याचा संशय असेल त्या जागेची झडती.

Cr. P.C. Sec. 102 - विवक्षित मालमत्ता अभिग्रहण करण्याचा पोलीस अधिकाऱ्याचा अधिकार.

Cr. P.C. Sec. 457 - मालमत्ता जप्त केल्यावर पोलिसांनी सुरू करावयाची प्रक्रिया.

१. जप्त केलेल्या वस्तू पॅक करताना (सील करताना) कोरा कागद वापरावा. वर्तमानपत्र वापरू नये. कारण आरोपीस त्याचा फायदा होणार नाही असे नक्की सांगता येत नाही.

२. जप्त केलेला मुद्देमाल तपासणीस तज्ञाकडे त्वरित पाठविल्यास त्याचा अपेक्षित अभिप्राय मिळण्यास कसा उपयोग होतो ते सांगू शकाल?

३. जप्त मालाचे वर्णन पंचनाम्यात तंतोतंत नमूद असल्यास त्याबाबत संशय निर्माण होत नाही. हे आपल्याला समजून येईल.

मालमत्ता चोरीच्या गुन्ह्यात माल मिळविणे पुराव्याच्या दृष्टीने व आरोपीला शिक्षा होण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. त्याकरिता घटना घडल्यानंतर ताबडतोब मालमत्ता हस्तगत करणे महत्त्वाचे आहे.

१. गुन्ह्यात वापरलेले हत्यार त्वरित जप्त करावे. बऱ्याच गुन्ह्यात वापरलेले हत्यार जप्त केले जात नाही. त्यामुळे न्यायालय आरोपीला निर्दोष सोडतात.

२. मुद्देमाल जप्त करताना पांढरा स्वच्छ कोरा कागद वापरावा, वर्तमानपत्र वापरू नये कारण त्यावर दिनांक असते त्यामुळे त्यात तफावत दिसून येते व आरोपी निर्दोष सुटतात.

३. जप्त केलेले हत्यार / वस्तू / शस्त्र / त्वरित विनाविलंब संबंधितांकडे तपासणीकरिता पाठवावे उशीर करू नये. अशा वेळी त्यात फेरफार होण्याची शक्यता असते म्हणून न्यायालय त्यावर विश्वास ठेवत नाही.

## आरोपी निर्दोष सुटल्याचे निवाडे :

१ जप्ती पंचनाम्यात बनावट नोटांचे नंबर नमूद केले नव्हते.

२. गुन्ह्यात वापरलेले हत्यार जप्त केले नाही.

३. एका गुन्ह्यात गुन्ह्यातील मालमत्ता हस्तगत करण्यात आली नाही.

४. एम.एच.बी. पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला, परंतु शस्त्राच्या जप्ती पंचनाम्यावर कस्तुरबा मार्ग पोलीस स्टेशनचे सील करण्यात आले होते.

५. दिनांक १९/५/२००४ रोजी केलेल्या पंचनाम्यातील जप्त मुद्देमालावर गुंडाळलेले वर्तमानपत्र हे दि.२९/५/२००४ या तारखेचे होते व ते आरोपीच्या वकिलाने न्यायालयाच्या निदर्शनास आणले.

## झडती व जप्ती :

## झडती कशासाठी :

१. फरार आरोपीस शोधण्यासाठी.

२. चोरीस गेलेला माल अथवा गुन्ह्यात वापरलेले हत्यार हस्तगत करण्यासाठी.

३. इतर कोणतीही वस्तू ज्याचा गुन्ह्याशी संबंध आहे अशी वस्तू हस्तगत करण्यासाठी.

४. बंदिस्त इसम शोधण्यासाठी (क.९७ व ९८ क्रि.प्रो.कोड).

५. अग्निशस्त्रे अथवा स्फोटके हस्तगत करण्यासाठी.

६. सरकारने क. १२४ (अ) १५३ (ब) अन्वये बंदी घातलेली प्रकाशने जप्त करण्यासाठी.

७. गुन्ह्याच्या तपासात उपयुक्त असलेले दुवे / पुरावे हस्तगत करण्यासाठी.

एखाद्या इसमाच्या ताब्यात कोणतीही आक्षेपार्ह वस्तू, मालमत्ता किंवा दस्तऐवज असेल तर न्याय दंडाधिकारी किंवा पोलीस ठाण्याचा प्रभारी अधिकारी कलम ९१ क्रि.प्रो.कोड अन्वये नोटीस काढून त्या इसमास ती वस्तू , मालमत्ता किंवा दस्तऐवज हजर करण्यासाठी सांगू शकतो. परंतु, जर न्याय दंडाधिकारी यांना असे जाणवेल की सदर इसम या वस्तू , मालमत्ता किंवा दस्ताऐवज हजर करणार नाही किंवा या वस्तू, मालमत्ता, दस्तऐवज नक्की कोठे आहेत हे माहीत नसेल तर न्याय दंडाधिकारी कलम ९३ क्रि.प्रो.कोड अन्वये झडती वॉरंट काढू शकते. जर अशा इसमाने सदर वस्तू, मालमत्ता किंवा दस्तऐवज हजर केला नाही तर प्रभारी अधिकारी वॉरंट किंवा विना वॉरंट झडती घेऊ शकतो.

## झडती कधी घ्यावी :

१. गुन्हा दाखल करण्यापूर्वी.

२. आरोपीस अटक केल्यानंतर.

३. कबुली जबाब नोंदविल्यानंतर.

४. तपासादरम्यान पुरावा गोळा करताना.

५. कोर्टाच्या आदेशावरून.

६. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी.

## झडतीचे प्रकार :

१. व्यक्ती अटक करण्यासाठी वॉरंटशिवाय एखाद्या जागेची झडती (Cr.P.C.47)

२. वरीलप्रमाणे झडती घेताना घरमालकाने झडती घेण्यास नकार दिल्यास योग्य तो बळाचा वापर करून प्रवेश मिळविण्याचा अधिकार (४७(२)Cr.P.C.)

३. अटक केलेल्या व्यक्तीची वॉरंटशिवाय झडती घेण्याचा अधिकार (५१ Cr.P.C.)

४. अटक केलेल्या व्यक्तीकडे हत्यार मिळाल्यास ते जप्त करण्याचा अधिकार (५२ Cr.P.C.)

५. वॉरंटवरून एखाद्या वस्तुसाठी जागेची झडती घेण्याचा अधिकार (९३ Cr.P.C.)

६. वॉरंटवरून चोरीचा माल अथवा गुन्हा पात्र वस्तू हस्तगत करण्यासाठी जागेची झडती घेण्याचा अधिकार (९४ Cr.P.C.)

७. वॉरंटवरून वर्तमानपत्रे, मासिके, पुस्तके, इ. प्रकाशने जप्त करण्याचा अधिकार (९५ Cr.P.C.)

८. वॉरंटवरून डांबून ठेवलेल्या व्यक्तीची सुटका करण्यासाठी जागेची झडती घेण्याचा अधिकार (९७ Cr.P.C.)

९. वॉरंटवरून पळवून नेलेल्या स्त्रीची सुटका करण्याचा अधिकार (९८ Cr.P.C.)

१०. वॉरंटशिवाय चोरीचा माल किंवा गुन्ह्याशी संबंधित वस्तू जप्त करण्याचा अधिकार (१०२ Cr.P.C.)

११. पोलिस ठाणे अधिकाऱ्यास एखाद्या जागेत प्रवेश करून वजने व काटे तपासण्याचा व ती बेकायदेशीर असतील तर जप्त करण्याचा अधिकार आहे. (१५३ Cr.P.C.)

१२. गुन्ह्याच्या तपासकामी आवश्यक असणाऱ्या कोणत्याही वस्तूसाठी पो.स्टे.हद्दीतील जागेची झडती घेऊन ती जप्त करण्याचा अधिकार आहे. (१६५ Cr.P.C.)

१३. वरील कारणासाठी बाहेरील पोलिस ठाण्याच्या हद्दीत झडती घेऊन वस्तू जप्त करण्याचा अधिकार आहे. (१६६ Cr.P.C.)

कलम २ (प) Cr.P.C. अन्वये जागा म्हणजे कोणतेही घर, इमारत, तंबू, वाहन किंवा होडी असा आहे.
न्याय दंडाधिकारी यांच्या व्यतिरिक्त डी.एम.किंवा एस.डी.एम. खालील बाबीसाठी वॉरंट काढू शकतात.

१. चोरीचा माल हस्तगत करण्यासाठी.

२. आक्षेपार्ह वस्तू (खोटी नाणी, नोटा, स्टँप, सील, C.D. इ.) हस्तगत करण्यासाठी.

३. कोणतीही चौकशी अथवा खटल्यात आवश्यक असणाऱ्या इतर वस्तू हस्तगत करण्यासाठी (९४ Cr.P.C.)

## झडतीची प्रक्रिया :

Cr.P.C.१००, १६५ व १६६ मध्ये झडतीची प्रक्रिया खालीलप्रमाणे नमूद आहे.

१. झडतीच्या वेळी जागा मालकाने सहकार्य केले पाहिजे.

२. घरमालकाने नकार दिल्यास बळाचा वापर करावा.

३. घरामध्ये महिला असल्यास त्यांना बाहेर जाण्यास सांगावे.

४. महिलेची झडती महिलेनेच घ्यावी.

५. दोन पंचांना बोलावून त्यांच्यासमक्ष झडती घ्यावी.

६. झडती यादी तयार करावी (वस्तुच्या नावे व त्या कोठे मिळाल्या हे नमूद असावे.) त्यावर पंचाच्या सह्या घ्याव्यात.

७. झडतीचे वेळी जागामालकास हजर ठेवावे.

८. झडती यादीची प्रत जागामालकास दिली पाहिजे.

९. झडती घेणारा अधिकारी हा पोलिस ठाणे अधिकारी किंवा तपासी अधिकारी असावा.

१०. झडतीची कारणे नोंदविली पाहिजे.

११. झडतीचे काम (कारणे नोंदवून) दुसऱ्यास देऊ शकतात.

१२. दुसऱ्या पोलिस स्टेशन हद्दीत झडती घ्यायची असल्यास त्या पोलिस स्टेशनला कळविले पाहिजे. परंतु तेवढा वेळ नसल्यास स्वत: दुसऱ्या पोलिस स्टेशन हद्दीत झडती घेऊ शकतो (कारणे नोंदवून).

## पोलीस अधिकाऱ्याने झडतीपूर्वी घेण्याची काळजी :

१. झडती पार्टीतील सर्वांकडे ओळखपत्र असावे.

२. पंच हे शक्यतो स्वतंत्र, प्रतिष्ठित व त्या भागातील असावेत.

३. झडतीपूर्वी नियोजन करावे, जागेच्या भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करावा. (महिलांना बाहेर जाण्याची विनंती करावी)

४. आवश्यक कर्मचारी वर्ग सोबत घ्यावा. जागेचे नाव / पत्ता गुप्त ठेवावे.

५. सोबत आवश्यक जप्ती यादीचे फॉर्म, साक्षीदार समन्स, कोरे कागद, कार्बन, पेन, सील, लाख, आगपेटी, मेणबत्ती, झडती आदेश व त्याबद्दलचा ठराव, बेड्या, इ. बरोबर घ्या.

६. पोलिस स्टेशन पासून त्या जागेचा प्रवास जलद करावा.

७. जागेवर पोहचताच प्रवेशद्वार व बाहेर पडण्याच्या जागांवर पहारा लावा.

८. जागेच्या मालकास स्वत:ची व पथकाची ओळख करून सहकार्य करण्याबाबत विनंती करा.

९. झडतीची कारणे व उद्देश समजावून सांगा.

१०. आवश्यकतेपेक्षा जास्त स्टाफ वा कर्मचारी घरात घेऊ नका.

## घर झडती चालू असताना :

१. घरातील कर्त्या पुरुषाला मालमत्ता हजर करण्यास सांगावे जेणेकरून पुढील त्रास व श्रम वाचतील.

२. घरातील सर्व व्यक्तींना एका ठिकाणी बसण्यास सांगून त्यांच्यावर लक्ष ठेवा.

३. स्त्रियांना एका बाजूस थांबवून नजरेआड होऊ देऊ नये, पडदाधारी असल्यास बाहेर जाण्यास सांगावे.

४. पोलिसांनी उगाच गर्दी करू नये. संभाव्य हल्ल्यापासून सावध राहावे.

५. नियोजन करून झडती घ्यावी. घाईगर्दीने अर्धवट झडती घेऊ नये.

६. प्रत्येक वस्तू लपविण्याची जागा उदा. धान्य, पिठाचे डबे तपासावेत.

७. वस्तू पुरून ठेवल्या असू शकतात. जमीन, भिंत, फर्निचर, इ. तपासावेत.

८. घरातील एक पुरुष सतत बरोबर ठेवावा.

९. घरातील व्यक्तीच्या हालचाली, चेहऱ्यावरील हावभाव, नेत्रपल्लवी इत्यादींवर लक्ष ठेवा.

१०. अनेक ठिकाणी झडती घेणे गरजेचे असल्यास विविध पथके करून एकाच वेळी घ्यावी.

११. ताब्यात घेतलेल्या वस्तुची यादी करावी.

१२. सोने, चांदी ताब्यात घेतल्यास सोनाराकडून पारखून व वजन करून घ्यावे.

१३. झडती प्रामाणिक व नि:स्पृह राहून घ्यावी.

१४. अनावश्यक वस्तू ताब्यात घेऊ नये. झडतीचे वेळी इतरांची गैरसोय अथवा वस्तुची मोडतोड करू नये.

१५. जप्ती यादीवर पंचाच्या सह्या घ्या.

१६. जप्त वस्तू व्यवस्थित पॅक, लेबल व सील बंद करा.

१७. जप्ती यादीची प्रत घरमालकास देऊन पावती घ्यावी.

१८. चलनी नोटा ताब्यात घेतल्यास नोटाचे क्रमांक जप्ती यादीत लिहावे.

१९. झडती शक्यतो दिवसा घ्यावी.

२०. काही गुन्ह्यात घरातील इसमांना पोलीस पथकाची झडती घेण्यास मुभा द्यावी.

२१. अटक आरोपीची झडती घेताना जर त्याच्या अंगावर जखमा आढळल्यास जखमांची नोंद घेऊन आरोपी वैद्यकीय अधिकाऱ्याकडे तपासणीसाठी पाठवावे.

२२. झडती मेमोची प्रत जवळच्या न्याय दंडाधिकाऱ्यास विनाविलंब पाठवावी.

२३. झडती घेतल्याबाबत ठाणे दैनंदिनी व केस डायरीत नोंद घ्या.

२४. मुद्देमाल कारकुनाकरवी संबंधित रजिस्टरला नोंद घ्या.

## झडती मेमो :

पुराव्याच्या दृष्टीने झडती मेमो अतिशय महत्त्वाचा आहे. झडती मेमो तयार करताना खालील मुद्दे लक्षात ठेवावेत.

१. वस्तू हस्तगत केल्याची जागा नमूद असावी.
२. वाहन जप्त केल्यास त्याचा रंग, नोंदणी क्रमांक, मेक, मॉडेल, इंजिन क्रमांक, चेसिस क्रमांक इ. नमूद करावे.
३. वस्तूचे संपूर्ण वर्णन नमूद करावे.
४. अग्निशस्त्र हस्तगत केल्यास त्याचे स्केच काढावे व ही बाब जप्ती मेमोमध्ये नमूद करावी.
५. धारदार हत्यारे हस्तगत केल्यास त्याच्या पात्याची / मुठीची लांबी / रुंदी नमूद करावी.
६. सोन्याचे अथवा चांदीचे दागिने सोनाराकडून पारखून सोनाराचे नाव, दागिन्याचे वजन इ. नमूद करावे.
७. पंचांच्या सह्या जागेवरच घेणे गरजेचे आहे.
८. मशीन ताब्यात घेताना त्यातील कुठला भाग नसेल तर तसे नमूद करावे.
९. आरोपीच्या अंगावरील कपड्यात मादक पदार्थ मिळाल्यास ते घातलेले कपडेही ताब्यात घ्यावे व मेमोमध्ये तसे नमूद करावे.
१०. वस्तूवर काही ओळखण्याच्या खुणा असतील उदा. कपड्यावरील टेलर / धोबी मार्क तर तसे नमूद करावे.
११. खाडाखोड, खोडून लिहिणे टाळावे.
१२. जागेवर फोटो घ्यावे व तसे नमूद करावे.
१३. तपासी अंमलदार यांनी झडती मेमो स्वहस्ताक्षरात लिहावा जेणेकरून तो विश्वासपात्र ठरतो.
१४. जप्ती केलेल्या ठिकाणाचा नकाशा काढावा.

## झडती मेमोतील मुद्दे :

१. नाव, वय, व्यवसाय, पत्ता.
२. झडती सुरू करण्याची वेळ, तारीख व ठिकाण.
३. झडतीचे कारण.
४. झडतीचा अधिकार.
५. घरमालकास पोलीस पथकाची झडती घेण्याची दिलेली मुभा.
६. जागेत कोणकोण हजर आहेत त्यांची नावे, वय, नाते. इ.
७. अंग झडती घेण्यापूर्वी इसमास विचारावे की, त्यास राजपत्रित अधिकाऱ्यासमोर हजर राहण्याची इच्छा आहे काय?
८. जागेचे संपूर्ण वर्णन.
९. झडती कशी, कोणी घेतली याचे वर्णन.
१०. मादक पदार्थ तपासणी कीटबाबत नमूद करावे.
११. वस्तूचे वजन कसे / कोणी घेतले किती होते.
१२. जप्त केलेल्या वस्तूची अंदाजे किंमत.
१३. सॅम्पल वा नमुने घेतले, किती घेतले हे नमूद करावे.
१४. ''या व्यतिरिक्त कोणत्याही वस्तू ताब्यात घेतल्या नाहीत''

"कोणतीही वित्त अथवा मनुष्यहानी झाली नाही"

"धार्मिक भावना दुखविल्या नाहीत"

" झडती शांततेत पार पडली"

इत्यादी वाक्य जेथे लागू असेल तेथे लिहावीत.

१५. झडती संपल्याची वेळ व तारीख.

१६. फोटो घेतल्याची नोंद, अंगुली मुद्रा मिळाले अगर कसे याची नोंद.

१७. पॅकिंग, लेबलिंग व सिलिंगबाबत नोंद.

१८. पंचांच्या सह्या घेतल्याची नोंद.

१९. कोणत्या कायद्याखाली व कलमाखाली झडती / जप्ती केली.

२०. झडतीदरम्यान घडलेल्या घटना उदा. तज्ज्ञ आले, डॉक्टर आले, अधिक स्टाफ आला इ. ची नोंद.

२१. पंचनाम्याची प्रत घरमालकास दिल्याबाबत नोंद.

■■■■■

# प्रकरण – ६

# अटक Arrest

**उद्दिष्टे :**

**[Cr. P.C. Sec. 41 to 60, 151, 167, 169]**

(B.P.A. Sec. 72, 73, 79, 80)

Cr. P.C. Sec. 41 – पोलीस वॉरंटाशिवाय केव्हा अटक करू शकतील.

Cr. P.C. Sec. 41A – पोलिसांनी आरोपीस नोटीस काढणे.

Cr. P.C. Sec. 41 B – अटकेबाबत पोलीस अधिकाऱ्याची कर्तव्ये.

Cr. P.C. Sec. 41 C – जिल्ह्यातील नियंत्रण कक्ष.

Cr. P.C. Sec. 41 D – चौकशी वा तपास करतेवेळी वकिलास भेटण्याचा हक्क.

Cr. P.C. Sec. 42 – नाव, पत्ता व राहण्याचे ठिकाण सांगण्यास नकार दिल्यावरून अटक.

Cr. P.C. Sec. 43 – खासगी व्यक्तीकडून अटक आणि अशी अटक केल्यानंतरची प्रक्रिया.

Cr. P.C. Sec. 44 – दंडाधिकाऱ्यांकडून अटक.

Cr. P.C. Sec. 45 – सशस्त्र सेनादलांच्या सदस्यांना अटकेपासून संरक्षण.

Cr. P.C. Sec. 46 – अटक कशी करावयाची.

Cr. P.C. Sec. 47 – अटक करावयाच्या व्यक्तीने प्रवेश केलेल्या स्थळांची झडती.

Cr. P.C. Sec. 48 – अपराध्यांचा अन्य अधिकारिता क्षेत्रामध्ये पाठलाग.

Cr. P.C. Sec. 49 – कोणताही अनावश्यक निर्बंध नसावा.

Cr. P.C. Sec. 50 – अटक करण्यात आलेल्या व्यक्तीला अटकेच्या कारणांची व जामिनाच्या हक्काची माहिती द्यावयाची असेल तर ती द्यावी.

Cr. P.C. Sec. 50 A - आरोपीची अटकेची माहिती नामनिर्देशित व्यक्तीस देणे.

Cr. P.C. Sec. 51 – अटक झालेल्या व्यक्तीची झडती.

Cr. P.C. Sec. 52 – मारक हत्यारे अभिग्रहण करण्याचा अधिकार.

Cr. P.C. Sec. 53 – पोलीस अधिकाऱ्यांच्या विनंतीवरून वैद्यक व्यावसायिकाने आरोपीची तपासणी करणे.

Cr. P.C. Sec. 53 A - बलात्काराचा आरोप असलेल्या व्यक्तीची वैद्यकीय तपासणी करणे.

Cr. P.C. Sec. 54 – अटक केलेल्या व्यक्तीची वैद्यक व्यवसायीने तपासणी करणे.

Cr. P.C. Sec. 54 A - आरोपीची ओळख पटविणे.

Cr. P.C. Sec. 55 – पोलीस अधिकारी वॉरंटाशिवाय अटक करण्यासाठी दुय्यम अधिकाऱ्यांना प्रतिनियुक्त करतो त्या बाबतीतील प्रक्रिया.

Cr. P.C. Sec. 55 A - अटक व्यक्तीचे आरोग्य व सुरक्षा ही जबाबदारी.

Cr. P.C. Sec. 56 – अटक करण्यात आलेल्या व्यक्तीला दंडाधिकाऱ्यापुढे किंवा पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्यापुढे न्यावयाचे असल्यास तसे ते न्यावे.

Cr. P.C. Sec. 57 – अटक करण्यात आलेल्या व्यक्तीला चोवीस तासांहून अधिक काळ स्थानबध्द करून

ठेवावयाचे नाही.

Cr. P.C. Sec. 58 – अटकेचे वृत्त पोलीस अधिकाऱ्यांनी कळविणे.

Cr. P.C. Sec. 59 – अटक केलेल्या व्यक्तीची विमुक्ती.

Cr. P.C. Sec. 60 – पलायन केल्यानंतर पाठलाग करण्याचा व पुन्हा अटक करण्याचा अधिकार.

Cr. P.C. Sec. 151 – दखलपात्र अपराध करण्यास प्रतिबंध करण्यासाठी अटक.

Cr. P.C. Sec. 167 – जेव्हा अन्वेषण चोवीस तासांत संपवणे शक्य नसेल तेव्हा अनुसरावयाची प्रक्रिया. (रिमांड)

Cr. P.C. Sec. 169 – जेव्हा पुरावा अपुरा असेल तेव्हा आरोपींची बंधमुक्तता.

B. P.Act. Sec. 72 – पोलीस अधिकारी वॉरंटाशिवाय अटक करू शकेल.

B. P.Act. Sec. 73 – पोलीस वॉरंटशिवाय अटक केव्हा करू शकेल.

B. P.Act. Sec. 79 – जेव्हा पोलीस अधिकाऱ्यासमक्ष विशिष्ट अपराध केले जातील तेव्हा वॉरंटशिवाय अटक करण्याचा पोलीस अधिकाऱ्याचा अधिकार.

B. P.Act. Sec. 80 – अटक करण्यासंबंधीचे इतर अधिकार.

१) कायदेशीर अटक व बेकायदेशीर अटक यातील फरक आपण सांगू शकाल.

२) बेकायदेशीर अटकेमुळे होणारे दुष्परिणाम आपण सांगू शकाल.

३) अटकेमुळे मानवी हक्कांची कशी पायमल्ली होते, हे आपण सांगू शकाल.

गुन्हा झाल्यानंतर आरोपीला त्वरित अटक करावे असे नाही, मात्र आरोपी पळून जाणार असेल, चोरलेला माल विकून टाकणार असेल, पुरावा नाहीसा करणार असेल, पुन्हा एखादा गुन्हा करण्याची शक्यता असेल तर अशा आरोपीला त्वरित अटक करावी.

आरोपीला अटक केल्यानंतर दोन पंचांसमक्ष त्याचा अटक पंचनामा करावा. त्यात अटकेची वेळ, दिनांक, ठिकाण व मारहाणीच्या खुणा वगैरेंचा उल्लेख करावा. अटक करताना सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या सर्व निर्देशांचे तंतोतंत पालन करावे.

केवळ दखलपात्र गुन्हा दाखल झाला व त्यात आरोपीच्या नावाचा उल्लेख असेल एवढ्याच कारणावरून आरोपीविरोधात कोणताही पुरावा रेकॉर्ड करण्याऐवजी संशयावरून अटक करण्यात येते. ही बाब अत्यंत चुकीची असून, दखलपात्र गुन्हा दाखल झाला तरी त्या आरोपीचे विरुध्द योग्य तो पुरावा रेकॉर्डवर आल्याशिवाय आरोपीला अटक करणे योग्य नाही. याबाबतीत विधी आयोगाने केलेल्या शिफारशीत पोलीस सी.आर.पी.सी. कलम ४१ चा गैरवापर करीत असल्याचे दिसून आल्याचे नमूद केले आहे व अटकेसंदर्भात पोलिसांचे अधिकार कमी करण्याची शिफारस केली आहे.

अटक कशी करावी याबाबतीत सी.आर.पी.सी. कलम ४६ मध्ये नमूद केलेले आहे. तसेच स्त्रियांना अपवादात्मक परिस्थिती खेरीज करून सूर्यास्तानंतर व सूर्योदयापूर्वी अटक करता येणार नाही अशी नवीन सुधारणा कलम ४६ (४) प्रमाणे फौजदारी सुधारणा अधिनियम २००५ दिनांक २३.०६.२००६ पासून करण्यात आली आहे. असे असतानासुध्दा महिलांना रात्री-अपरात्री अटक करण्यात येते. अपवादात्मक परिस्थितीत अटक करावयाचीच असेल तर महिला पोलीस अधिकारी यांनी प्रथम वर्ग दंडाधिकारी यांना निवेदन देऊन पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. तसेच डी. के. बसू वि. प. बंगाल सरकार (अे.आय.आर. १९९६ सर्वोच्च न्यायालय) या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने अटकेसंदर्भात मार्गदर्शक तत्त्वे दिलेली आहे. परंतु त्या तत्त्वाचेसुध्दा पूर्णपणे पालन करत नसल्याचे दिसून येते. पोलिसांना जरी अटकेचे महत्त्व व गांभीर्य लक्षात येत नसले तरी सर्वसामान्य

जनतेला अटकेच्या दुष्परिणामाची व समाजात होणाऱ्या मानहानीची भीती असते. म्हणून पोलिसांनी अटक शस्त्राचा काळजीपूर्वक वापर करणे गरजेचे आहे. एखाद्या इसमास अटक करणे म्हणजे त्याचे स्वातंत्र्य हिरावून घेण्यासारखे असते व ती अटक जर चुकीची असली तर भारतीय राज्यघटनेने दिलेल्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन करणारी असते. त्यामुळे मानवी हक्कांची पायमल्ली होते. याची जाणीव पोलिसांना असणे गरजेचे आहे. नवीन दुरुस्ती कायद्यान्वये करण्यात आलेल्या दुरुस्त्या व सर्वोच्च व उच्च न्यायालयाने अटक व बेडया घालणे संदर्भात वेळोवेळी केलेल्या निर्देशांचे पालन करणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच बालगुन्हेगारांना अटक करताना सुध्दा वरीलप्रमाणे काळजी घेणे गरजेचे आहे. ज्यामुळे मानवी हक्काची पायमल्ली होणार नाही याकडे लक्ष द्यावे.

कोणत्याही इसमास अटक करतांना अटक पंचनामा करणे गरजेचे आहे. कोणत्याही न्यायालयासमोर आरोपी हजर केल्यानंतर न्यायालय त्यास प्रथम पोलिसांनी केलेल्या मारहाणीची विचारणा करीत असते. तसेच अटक पंचनाम्याबाबतसुध्दा विचारणा करते व आरोपीच्या अंगावर असणाऱ्या जखमांबाबत पोलिसांनी केलेला अटक पंचनामा पोलिसांना ढाल म्हणून मदत करीत असतो.

## आरोपी निर्दोष सुटल्याचे निवाडे :

१. आरोपी अटक करण्यासाठी तपासी अंमलदाराने कोणताही प्रयत्न केला नाही.

२. आरोपींना ताब्यात घेतल्यानंतर अटक पंचनामा केला नाही.

३. आरोपीला अटक केली मात्र कुठे अटक केली ते ठिकाण पंच साक्षीदाराला सांगता आले नाही.

४. अत्यावश्यक सेवेतील इसमांना अटक करताना त्याच्या वरिष्ठाकडून त्याच्या जागी दुसरा कर्मचारी नियुक्त केल्याशिवाय अटक करू नये.

## अटक :

कोणा सरकारी नोकराने किंवा प्रचलित कायद्यान्वये अधिकार प्राप्त झालेल्या खासगी व्यक्तीने दुसऱ्या इसमास रखवालीत ठेवणे किंवा ताब्यात घेणे यास अटक म्हणता येईल. भारतीय घटनेने प्रत्येक नागरिकास व्यक्ती स्वातंत्र्याचा मूलभूत अधिकार दिलेला आहे. यामुळे एखाद्या व्यक्तीस ताब्यात किंवा रखवालीत ठेवल्यामुळे त्यांच्या मूलभूत हक्कावर गदा येऊ शकते. म्हणून अटक करताना घटनेतील अनुच्छेद २२ चे तंतोतंत पालन करणे गरजेचे आहे. अनुच्छेद २२ नुसार

१. अटकेची कारणे सांगणे गरजेचे असून स्वत:चा बचाव करण्याची संधी दिली पाहिजे.

२. २४ तासांचे आत (प्रवासाचा वेळ वगळून) न्यायदंडाधिकाऱ्यासमोर हजर करावे.

पोलीस अधिकारी दोन प्रकारे अटक करतो-

अ. वॉरंटशिवाय अटक

ब. वॉरंटवरून अटक

अटक करण्याचा उद्देश आरोपीची पुढील हजेरीबाबत हमी घेणे व त्याला पुढील गुन्हे करण्यापासून प्रतिबंध करणे हे होय. क्रि.प्रो.कोड कलम ४१ ते ६० पर्यंत अटकेबाबत तरतुदी आहेत.

## पोलिस वॉरंटशिवाय केव्हा अटक करू शकतात.

(१) कोणताही पोलीस अधिकारी,-

(अ) जी व्यक्ती, कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याच्या उपस्थितीत, एखादा दखलपात्र अपराध करील अशा व्यक्तीस; किंवा

(ब) ज्या व्यक्तीने सात वर्षांपेक्षा कमी नसेल किंवा सात वर्षांपर्यंत असू शकेल अशा मुदतीच्या कारावासाच्या

शिक्षेस मग ती द्रव्यदंडासह असो किंवा त्याशिवाय असो– पात्र असेल असा दखलपात्र अपराध केला आहे. अशी वाजवी तक्रार ज्या व्यक्तीच्याविरुद्ध करण्यात आली असेल, किंवा तशी विश्वसनीय माहिती मिळाली असेल किंवा तसा वाजवी संशय असेल अशा व्यक्तीस, जर पुढील शर्तीची पूर्तता होत असेल तर :

(एक) अशा व्यक्तीने उक्त अपराध केला आहे अशा तक्रारींच्या, माहितीच्या किंवा संशयाच्या आधारे विश्वास ठेवण्यास पोलीस अधिकाऱ्यास कारण असेल;

(दोन) (अ) अशा व्यक्तीस आणखी कोणताही अपराध करण्यापासून, त्याचप्रमाणे अशा व्यक्तीस प्रतिबंध करण्यासाठी; किंवा

(ब) अपराधाचे योग्य प्रकारे अन्वेषण करण्यासाठी; किंवा

(क) अपराधाचा पुरावा नाहीसा करण्यापासून किंवा कोणत्याही रीतीने अशा पुराव्यामध्ये फेरफार करण्यापासून अशा व्यक्तीस प्रतिबंध करण्यासाठी; किंवा

(ड) ज्या व्यक्तीस प्रकरणाची वस्तुस्थिती माहीत आहे अशा व्यक्तीस, अशी वस्तुस्थिती, न्यायालयाकडे किंवा पोलीस अधिकाऱ्याकडे उघड करण्यापासून परावृत्त करण्यासाठी किंवा अशा व्यक्तीस प्रलोभन दाखविण्यापासून, धमकी देण्यापासून किंवा अभिवचन देण्यापासून अशा व्यक्तीस प्रतिबंध करण्यासाठी; किंवा

(इ) अशा व्यक्तीस अटक केली नाही तर, जेव्हा जेव्हा आवश्यक असेल तेव्हा, न्यायालयामध्ये ती उपस्थित राहणार नाही, याबाबत पोलीस अधिकाऱ्यांची खात्री पटली असेल, तर

त्यासाठी आणि पोलीस अधिकारी अशी अटक करतेवेळी, त्याची कारणे लेखी नोंदवील;

१(परंतु असे की, या पोटकलमाच्या कलमान्वये एखाद्या व्यक्तीला अटक करणे आवश्यक नसेल अशा सर्व प्रकरणांमध्ये, पोलीस अधिकारी अटक न करण्याची कारणे लेखी नमूद करील.)

(बअ) त्या व्यक्तीने, सात वर्षांपेक्षा अधिक असेल अशा मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस–मग ती द्रव्यदंडासह असो किंवा त्याशिवाय असो, – किंवा देहदंडाच्या शिक्षेस पात्र असेल असा दखलपात्र अपराध केला आहे अशी विश्वसनीय माहिती ज्या व्यक्तीच्या विरुद्ध मिळालेली असेल आणि अशा व्यक्तीने असा काही अपराध केला आहे असे अशा माहितीच्या आधारे, विश्वास ठेवण्यास पोलीस अधिकाऱ्यास कारण असेल तर)

(क) ज्या व्यक्तीला या संहितेखाली किंवा राज्य शासनाच्या आदेशाद्वारे अपराधी म्हणून उद्घोषित करण्यात आले आहे; किंवा

(ड) चोरीची मालमत्ता म्हणून वाजवी संशय घेता येईल अशी कोणतीही वस्तू जिच्या कब्जात असून अशा वस्तूसंबंधात ज्या व्यक्तीने अपराध केला असल्याचा वाजवी संशय घेता येईल; किंवा

(ई) पोलीस अधिकारी आपले कर्तव्य बजावीत असताना जी व्यक्ती त्याला अडथळा आणते, अथवा जी व्यक्ती कायदेशीर कचाट्यातून निसटली आहे किंवा निसटण्याचा प्रयत्न करते; किंवा

(फ) जी व्यक्ती संघराज्याच्या सशस्त्र सेनादलांपैकी कोणत्याही सेनादलातून पळून आली असल्याचा वाजवी संशय आहे; किंवा

(ग) भारताबाहेर कोणत्याही स्थळी केलेली जी कोणतीही कृती भारतात केली असती तर अपराध म्हणून शिक्षापात्र झाली असती तिच्याशी जी व्यक्ती संबंधित असून अथवा त्या कृतीशी संबंधित असल्याबद्दल जिच्याविरुद्ध वाजवी फिर्याद देण्यात आली असून किंवा तशी विश्वसनीय खबर मिळालेली असून किंवा तसा वाजवी संशय असून त्याबद्दल प्रत्यार्पणाशी संबंधित अशा कोणत्याही कायद्याखाली किंवा अन्यथा भारतात अटक केली जाण्यास किंवा हवालातीत स्थानबद्ध केली जाण्यास पात्र आहे; किंवा

(ह) जी व्यक्ती बंधमुक्त सिद्धदोषी असून, कलम ३५६ च्या पोटकलम (५) खाली केलेल्या कोणत्याही

नियमाचा भंग करतें; किंवा

(ग) ज्या व्यक्तीच्या अटकेसाठी, अन्य पोलीस अधिकाऱ्याकडून कोणतीही रितसर मागणी- मग ती लेखी किंवा तोंडी असो- आलेली असून अटक करावयाची व्यक्ती आणि ज्याबद्दल अटक करावयाची तो अपराध किंवा अन्य कारण रीतसर मागणीपत्रात विनिर्दिष्ट केलेले असेल आणि ज्याने ती रीतसर मागणी केली तो अधिकारी कायद्याने वॉरंटाशिवाय त्या व्यक्तीला अटक करू शकला असता असे त्यावरून दिसून आले तर,

अशा कोणत्याही व्यक्तीस, दंडाधिकाऱ्यांकडून आदेश मिळाल्याशिवाय व वॉरंटाशिवाय अटक करू शकेल.

(२) कलम ४२ च्या तरतुदींस अधीन राहून जी व्यक्ती एखाद्या अदखलपात्र अपराधाशी संबंधित आहे किंवा ती कशा अपराधाशी संबंधित आहे किंवा ती अशा अपराधाशी संबंधित असल्याबाबत ज्या व्यक्तिविरुद्ध तक्रार करण्यात आली आहे किंवा तशी विश्वसनीय माहिती मिळालेली आहे किंवा तसा वाजवी संशय आहे अशा कोणत्याही व्यक्तीस, वॉरंटशिवाय किंवा दंडाधिकाऱ्याच्या आदेशाशिवाय अटक करता येणार नाही.)

## अदखलपात्र गुन्ह्यात अटक :

१. अदखलपात्र गुन्ह्यातील आरोपीने नाव व पत्ता सांगण्यास नकार दिल्यास. (४२ Cr.P.C.)

२. कलम ३५६ (३) क्रि.प्रो.कोडचा भंग केल्यास.

## कोर्टाच्या आदेशान्वये अटक :

१. कलम ४४ Cr.P.C. अन्वये जर दंडाधिकाऱ्यांच्या समक्ष एखादा गुन्हा घडला तर तो असा गुन्हा करणाऱ्यास अटक करण्याचे आदेश देऊ शकतो.

२. न्यायालयाने एखाद्या इसमास काही अटींवर सोडले असल्यास, असा आदेश कलम १२३ (५) Cr.P.C. अन्वये रद्द केल्यास अशा इसमास पोलीस कलम १२३ (६) Cr.P.C. अन्वये अटक करू शकतात.

## सैन्यातील जवानांना अटकेपासून संरक्षण :

कलम ४५ Cr.P.C. अन्वये सैन्यातील कोणत्याही कर्मचाऱ्यास जर तो शासकीय कर्तव्य करीत असेल तर त्याला केंद्र/राज्य शासनाची परवानगी घेतल्याशिवाय अटक करता येणार नाही.

**विशिष्ट प्रवर्गातील व्यक्तींची अटक**

१. कलम ४४ (२) Cr.P.C. प्रमाणे आरोपी परस्पर कोर्टात हजर होऊ शकतो. अशा वेळी कोर्टाकडून याबाबत माहिती प्राप्त झाल्यास तपासी अधिकाऱ्याने कागदोपत्री अटक करून त्यास कलम १६७ Cr.P.C. प्रमाणे रिमांडसाठी उभे करावे.

२. गंभीर आजारी किंवा जखमी आरोपीस तत्काळ रुग्णालयात हलविले पाहिजे व पहारा ठेवला पाहिजे. संबंधित न्यायदंडाधिकारी यांना रिमांडसाठी अर्ज करावा. जर जखमी / आजारी आरोपी जागेवरून हलविल्यास त्याच्या जिवास धोका असेल तर न्यायदंडाधिकाऱ्यांना जागेवर बोलावून त्याचा जबाब नोंदविण्याबाबत विनंती करावी.

३. जर एखाद्या खासदार किंवा आमदारास अटक केली असेल तर त्याबाबत माहिती त्वरित टेलिग्राम, फॅक्स, वायरलेस इ. द्वारे लोकसभेचे अथवा विधानसभेच्या सभापती यांना कळवावे व अहवाल स्पीडपोस्टद्वारे पाठवावा.

४. एखाद्या न्यायदंडाधिकारी / जज्ज / न्यायिक अधिकाऱ्यास अटक करणे गरजेचे असेल तर मा. सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी तसेच अटकेची माहिती जिल्हा न्यायाधीश व मा. उच्च न्यायालयाला त्वरित देणे गरजेचे आहे. अतिशय आक्रमक असेल तरच हातकडी लावावी. न्यायिक अधिकाऱ्याचा जबाब, कोणताही पंचनामा अथवा वैद्यकीय तपासणी विधी सल्लागार अथवा दुसऱ्या न्यायिक

अधिकाऱ्यासमोर करावी.

५. सरकारी नोकरास अटक करण्यापूर्वी त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यास माहिती द्यावी. अटक करण्यापूर्वी वेळ नसेल तर अटकेनंतर त्वरित माहिती देणे गरजेचे आहे.

६. काही राजदूतांना अटक करता येत नाही; परंतु त्या कार्यालयातील इतरांना अटक केल्यास अटकेची माहिती कॉन्सुलेट यांना कळविण्यात यावी.

७. जेव्हा एखाद्या सैन्यातून पळून गेलेल्या इसमास अटक होईल तेव्हा त्याबाबत माहिती संबंधित युनिटच्या कमांडिंग ऑफिसर यांना कळविणे गरजेचे आहे.

## अटक करण्याची गरज :

१. घाबरलेल्या अथवा दहशतीखाली असलेल्या तक्रारदार / बळी पडलेल्या इसम / साक्षीदार यांच्या मनात विश्वास निर्माण करण्यासाठी.
२. जेव्हा आरोपी पळून जाण्याची शक्यता असते.
३. आरोपी आक्रमक असल्याने अटक केली नाही तर जास्त गुन्हे करेल अशी शक्यता वाटते.
४. आरोपी सराईत गुन्हेगार असल्याने गुन्हे करतच रहाण्याची शक्यता असते.
५. जेव्हा तपासासाठी आरोपीची हजेरी गरजेची असते.
६. जेव्हा आरोपी साक्षीदारांना भीती दाखविण्याची किंवा दुखापत करण्याची किंवा पुरावा नष्ट करण्याची शक्यता असते.
७. फक्त कायद्याने अधिकार दिला आहे या कारणासाठी कोणास अटक करू नये. अटकेच्या समर्थनार्थ योग्य कारणे असावीत.

## अटक करताना घ्यावयाची खबरदारी :

१. गरज असल्यास आरोपीस ओळखणाऱ्या इसमाची मदत घ्यावी.
२. आरोपीचा फोटो, वर्णन ओळखण्याच्या खुणा इ. जवळ ठेवाव्यात.
३. स्वतःचे ओळखपत्र सोबत ठेवावे.
४. स्वसंरक्षणाची योग्य काळजी घ्यावी.
५. खतरनाक आरोपींना अटक करायला जाताना बेड्या, दोर, इ. जवळ ठेवावे जेणेकरून आरोपी पळून जाणार नाही.
६. अटक केलेल्या आरोपीला अटकेची कारणे सांगावीत.
७. अटक करताना जास्त बळाचा वापर करू नये.
८. आरोपीने बळाचा वापर केल्यास योग्य बळाचा वापर करावा. आरोपी फाशी किंवा जन्मठेप शिक्षा असलेल्या गुन्ह्यातील असेल तर स्वसंरक्षणाचा हक्क त्याच्या मृत्यूपर्यंत आहे.
९. आरोपी एखाद्या बंद जागेत लपलेला असल्यास, दरवाजा / खिडकी तोडून आत जाण्याचा अधिकार पोलिसांना आहे.

## डी. के. बसू विरुद्ध प. बंगाल राज्य या प्रकरणात अटकबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाने केलेली मार्गदर्शक तत्त्वे

डी. के. बसू विरुध्द पश्चिम बंगाल राज्य. (१९९७ (१) SCC ४१६) या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने पोलिसांकडून त्यांना असलेल्या अटकेच्या अधिकारांचा दुरुपयोग होऊ नये म्हणून व आरोपीच्या

अधिकारांचे संरक्षण व्हावे म्हणून अनेक मार्गदर्शक तत्त्वे सांगितली आहेत. त्यांचे पालन करण्याच्या सक्त सूचना दिलेल्या आहेत त्या खालीलप्रमाणे.

१. पोलिसांनी आरोपीकडे चौकशी करताना स्वत:ची ओळख स्पष्ट दिसेल अशी नावाची पाटी वगैरे लावून तपास / विचारपूस करावी. या चौकशी / तपास पथकात कोण कोण आहेत, त्याची ठाणे डायरीत सुस्पष्ट त्यांचे नावासह नोंद असावी. आवश्यक असल्यास त्यासाठी स्वतंत्र डायरी उघडावी.

२. पोलिसांनी एखाद्या व्यक्तीला अटक करताना पंचनामा करावा व त्यावर आरोपीच्या एका नातेवाईकाची अथवा तो नसल्यास, ज्या भागातून अटक केली जात असेल, त्या भागातील एखाद्या प्रतिष्ठित व्यक्तीची सही असावी. एवढेच नव्हे तर, त्यावर अटक केल्या जाणाऱ्या व्यक्तीची / संशयिताचीदेखील सही असावी व त्यात अटकेची तारीख व वेळ स्पष्ट लिहिलेली असावी.

३. आरोपीस अटक केल्यावर त्याला अटक का केली आहे. कायद्याच्या कोणत्या कलमाखाली, कोठे घेऊन जाणार आहेत व ठेवणार आहे, यासंबंधी अटक व्यक्तीच्या एका नातेवाईकाला, मित्राला की जो त्याचा हितचिंतक आहे त्याला, लवकरात लवकर तार, दूरध्वनी, खास दूत अशा कोणत्याही माध्यमातून जास्तीत जास्त ८ ते १० तासांचे आत कळविणे अनिवार्य आहे. तसे केल्याची नोंद ठाणे डायरीत घेणे सुद्धा आवश्यक आहे.

४. जर त्याचे नातेवाईक, मित्र दूरच्या जिल्ह्यात अगर बाहेरच्या राज्यात असतील, तर मोफत कायदा मदत केंद्राच्या आधारे त्यांना कळविण्याची व्यवस्था करावी.

५. अटक व्यक्तीला याचे ज्ञान करून दिले पाहिजे की, त्याच्या अटकेसंबंधी त्याचा मित्र, नातेवाईक यापैकी कोणाला तरी कल्पना देण्याचा / माहिती करून देण्याचा त्याला अधिकार आहे.

६. अटक ज्या ठिकाणी झाली असेल, तेथील ठाणे डायरीत अटक होताच अटकेची नोंद व त्यात त्याच्या अटकेसंबंधी त्याच्या कोणत्या नातेवाईकाला अथवा मित्राला, कोणत्या पत्त्यावर किती वाजता, कोणत्या माध्यमातून म्हणजे तार, दूरध्वनी, खास दूत वगैरे याची माहिती व कोणत्या पोलीस अधिकाऱ्याने त्याला कोणत्या गुन्ह्यात अटक केली आहे, याची स्पष्ट नोंद घेणे आवश्यक आहे.

७. अटक व्यक्ती त्याला योग्य वाटेल त्या वैद्यकीय दवाखान्यात स्वत:ची वैद्यकीय तपासणी करून घेऊ शकतो व त्यापूर्वी त्याच्या शरीरावरील गंभीर व किरकोळ स्वरूपाच्या जखमांची नोंद करणारा अहवाल लेखी तयार करणे, त्यावर अटक व्यक्ती व पोलीस अधिकाऱ्याची सही व त्याची एक प्रत आरोपीला देणे आवश्यक आहे.

८. दर ४८ तासांनी अटक व्यक्तीची वैद्यकीय तपासणी संचालक, राज्य आरोग्य सेवा यांनी तयार केलेल्या डॉक्टरांच्या समितीतील डॉक्टरांकडून होणे अनिवार्य आहे. संचालक, राज्य आरोग्य सेवा यांनी प्रत्येक मंडळ, तालुके यासाठीं अशा वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या समित्यांचे (पॅनल्स) गठन करून ते जाहीर करणे आवश्यक आहे. जेणेकरून कैद्याची वैद्यकीय तपासणी करून घेण्यात वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या उपलब्धतेविषयी अडचण भासणार नाही. महाराष्ट्रात राज्य सरकारची प्राथमिक आरोग्य केंद्रे, सर्वसाधारणपणे ज्या ठिकाणी पोलीस स्थानके आहेत तेथे आहेत. त्यामुळे याविषयी विशेष अडचण भासत नाही. शहरातून तर हा प्रश्नच निर्माण होत नाही.

९. काही राज्यातून पंचनाम्याची प्रतसुध्दा न्यायालयांना ताबडतोब पाठविण्याची पध्दत आहे, महाराष्ट्र राज्यात तशी पध्दत नाही.

१०. अटक आरोपीस विचारपूस दरम्यान सतत जरी त्याच्या वकिलाच्या उपस्थितीत परवानगी नसली, तरी विचारपूस दरम्यान तो अधूनमधून आपल्या वकिलाची भेट घेऊन चर्चा करू शकतो.

११. जिल्ह्याच्या ठिकाणाच्या नियंत्रण कक्षात सर्व अटक आरोपींची नावे सर्वांना स्पष्ट दिसतील अशी लिहून

ठेवणे अनिवार्य आहे. त्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक अटक १२ तासांच्या आत नियंत्रण कक्षाला सविस्तर कळविण्याची जबाबदारी अटक करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याची आहे.

## अटक कशी करावी :

कलम ४६ . Cr. P.C. मध्ये अटक कशी करावी याबाबत माहिती दिली आहे.

१. जर तोंडी सांगून इसम रखवालीत आला नाही तर त्याचा हात पकडून अटक करावी.

२. जर विरोध केला अथवा पळून जाण्याचा प्रयत्न केला तर योग्य ते मार्ग / बळ वापरून अटक करावी.

३. आरोपी जर जन्मठेप किंवा फाशीची शिक्षा असलेल्या गुन्ह्यातील असेल व विरोध करील तर त्याचा मृत्यू घडून आला असेल तर तो अपवाद समजावा.

## अटक केल्यानंतर :

१. आरोपीस अटकेची कारणे सांगावीत व तशी नोंद घ्यावी. (कलम ५० Cr. P.C.)

२. जामीनपात्र गुन्हा असेल तर जामिनावर जाण्यास त्यास अधिकार आहे याबाबत माहिती देणे. (कलम ५० Cr. P.C.)

३. दखलपात्र गुन्ह्यात अथवा वॉरंटशिवाय एखाद्यास अटक केली तर त्याबाबत अहवाल त्वरित न्यायदंडाधिकाऱ्यांना पाठवावा (कलम ५६, ५७ Cr. P.C.)

४. पो. ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याने अटक आरोपीस विचारपूस करून त्यास गैरवागणूक झाली किंवा कसे याबाबत खात्री करावी.

५. आरोपी जर जखमी असेल तर तत्काळ औषधोपचारासाठी पाठवावे. तसेच बलात्कार प्रकरणातील आरोपीची वैद्यकीय तपासणी केलीच पाहिजे. (कलम ५३ अ Cr. P.C.)

## आरोपीची झडती :

१. आरोपीस अटक केल्यानंतर जर त्यास जामिनावर सोडले नाही तर त्याची संपूर्ण झडती त्याला कोठडीत ठेवण्यापूर्वी घेणे गरजेचे आहे. त्याच्या शरीरावर व कपड्यामध्ये सापडलेल्या वस्तू ताब्यात घेऊन त्याची यादी आरोपीस द्यावी. या वस्तुंची नोंद मुद्देमाल रजिस्टरमध्ये घेऊन या वस्तू संबंधित स्टोअर हवालदारास ताब्यात द्याव्यात. गुन्ह्याशी संबंधित असलेल्या वस्तू वेगळ्या ठेवाव्यात.

२. महिला आरोपीची झडती महिला पोलीस अधिकाऱ्याने घ्यावी.

३. जर आरोपीच्या अंगावर जखमा असतील तर त्यांची नोंद अटक पंचनाम्यात करून आरोपीस औषधोपचारासाठी पाठवावे व जखमांबाबत अहवाल मागवावा.

४. गंभीर जखमी किंवा दारू प्राशन केलेला आरोपी जो स्वत:ला सांभाळू शकत नाही त्यास तत्काळ सरकारी रुग्णालयात पाठवावे व त्याचा जबाब रुग्णालयातच नोंदवावा.

५. जेव्हा आरोपी स्वत: विनंती करतो की त्याची वैद्यकीय तपासणी करण्यात यावी तेव्हा त्याला वैद्यकीय तपासणीसाठी पाठवावे.

## पोलीस कोठडी :

१. अटक केलेल्या व जामिनावर न सोडलेल्या आरोपीस पोलीस कोठडीमध्ये ठेवावे. या ठिकाणी योग्य पहारा असावा. आरोपीचे नाव व कोठडीत ठेवल्याची / काढल्याची नोंद रजिस्टरमध्ये घ्यावी.

२. विचारपूस करण्यासाठी आणलेल्या आरोपीस कोठडीत ठेवू नये. गंभीर गुन्ह्यातील आरोपी वेगळे ठेवावेत.

३. रिमांडपूर्वी नातेवाईकांना, वकिलाला भेटण्याचा आरोपीस अधिकार आहे. जर आजारी आरोपीने घरचे जेवण मागितले तर ते तपासून द्यावे. रिमांडनंतर या बाबी कोर्टाचे आदेशान्वये कराव्यात.

## पोलीस कोठडीत आरोपीस दिली जाणारी वागणूक :

१. पोलीस कोठडीतील आरोपीचे शारीरिक व मानसिक स्वास्थ्य राखण्याची पूर्ण जबाबदारी पोलिसांची आहे. यासाठी जरुरी असलेल्या सर्व खबरदाऱ्या व उपाययोजना करणे गरजेचे आहे. चौकशी करण्यापूर्वी आरोपीचा गुन्हा, त्याचे वय, इतर आजार इत्यादी बाबींचा विचार करावा.

२. कोठडीत आरोपीस कोणतीही जखम स्वत: किंवा इतरांकरवी होता कामा नये. भावनिक आरोपी कोठडीमध्ये आत्महत्या करू शकतो.

३. सतत लक्ष ठेवावे. कोठडी अशी असावी की बाहेरून संपूर्ण दिसावी. गरज असल्यास कॅमेरा बसवावा.

४. पोलीस कोठडीची वेळच्या वेळी झडती घ्यावी व त्याबाबत नोंदी कराव्यात.

५. कोणत्याही परिस्थितीत आरोपीस मारहाण किंवा छळ करू नये. तसेच अपमानास्पद वागणूक देऊ नये.

## आरोपीचे अधिकार :

१. अदखलपात्र गुन्ह्यात नाव / पत्ता देऊन जामिनावर जाण्याचा (४२ Cr. P.C.)

२. जरुरीपेक्षा जास्त वेळ न थांबवून ठेवण्याचा (४९ Cr. P.C.)

३. अटकेची कारणे जाणून घेण्याचा (५० Cr. P.C.)

४. जामीनपात्र गुन्ह्यात जामिनावर जाण्याचा (५० Cr. P.C.)

५. महिला असल्यास महिलेकडून झडती घेण्याचा (५१ Cr. P.C.)

६. महिला असल्यास महिला वैद्यकीय अधिकाऱ्यामार्फत वैद्यकीय तपासणी करून घेण्याचा (५३ Cr. P.C.)

७. वैद्यकीय तपासणी करून घेण्याचा (५४ Cr. P.C.)

८. २४ तासाच्या वर पोलीस कोठडीत (न्यायदंडाधिकाऱ्याच्या आदेशाशिवाय) न राहण्याचा (५७ Cr. P.C.)

९. जरुरीशिवाय बेडी न लावून घेण्याची (घटनेतील कलम २१)

१०. गैरवर्तणूक न मिळण्याचा (घटनेतील कलम २१)

११. गैरवर्तणूक झाल्यास नुकसानभरपाई मागण्याचा (घटनेतील कलम २१)

१२. रस्त्यावरून मिरवणूक न काढण्याचा अधिकार.

## हातकड्याबाबत नियम :

हातकड्या वापरणे म्हणजे आरोपीचा अपमान करणे होय. बेडी वापरावी किंवा नाही याचा निर्णय शक्यतो पो. ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याने घ्यावा. खतरनाक आरोपींना कोर्टाच्या परवानगीने बेड्या लावाव्यात.

## बेड्या केव्हा वापरू नये :

१. महिलांना.

२. अपंग व्यक्तींना.

३. जामीनपात्र गुन्ह्यातील आरोपी. (आक्रमक असल्यास वापरावी)

४. आजारी आरोपी.

५. १८ वर्षापेक्षा लहान असलेले आरोपी.

६. कलम १७१ Cr. P.C. अन्वये अटक केलेले साक्षीदार.

## मा. सर्वोच्च न्यायालयाची मार्गदर्शक तत्त्वे :

आरोपीस अटक केल्यानंतर कोर्टात उभे करण्यासाठी, तपासकामी, जेलमध्ये किंवा जेलमधून आणण्यासाठी आरोपीला घेऊन प्रवास करावा लागतो. त्यावेळी तो पळून जाणार नाही याची पूर्ण जबाबदारी पोलिसांची आहे. म्हणून आक्रमक किंवा गंभीर गुन्ह्यातील आरोपींना पोलीस बेड्या लावतात. परंतु यामुळे आरोपीच्या स्वातंत्र्यावर गदा येऊन तो मूलभूत हक्कापासून वंचित होतो. आरोपींनी अनेक गुन्हे केले आहेत किंवा गंभीर गुन्हा केला आहे किंवा आरोपीच्या एस्कॉर्ट पार्टीला सोईस्कर होते म्हणून बेड्या वापरू नये.

याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे मार्गदर्शन केले आहे.

१. आरोपी जेव्हा कोर्टात सुनावणीसाठी असतो तेव्हा बेड्या वापरू नये. तो अतिशय खतरनाक असल्यास बेडी लावण्याची परवानगी मा. न्यायालयाकडून घ्यावी.

२. सजा झालेले आरोपी किंवा ज्याचा खटला चालू आहे अशा आरोपींना आदेशाशिवाय बेड्या लावू नये.

३. कोर्टाच्या आदेशान्वये बेड्या वापरल्या तर त्याबाबत नोंद ठाणे दैनंदिनी, केस डायरी, रिमांड डायरी इ. मध्ये घ्यावी.

४. रुग्णालयात दाखल असलेल्या आरोपीस बेडी लावू नये. गरज असल्यास न्यायालयाची परवानगी घ्यावी.

५. सब जेलच्या आतमध्ये बेडी लावू नये.

## आरोपीला बेडी लावण्यापेक्षा खालीलप्रमाणे उपाययोजना करावी.

१. आरोपीच्या एस्कॉर्ट पार्टीतील पोलीस वाढवावे.

२. एस्कॉर्ट पार्टीतील पोलीसांकडे हत्यारे द्यावीत.

३. एस्कॉर्ट पार्टीतील पोलीसांना योग्य प्रशिक्षण द्यावे.

४. आरोपीसोबतचा प्रवास सुरक्षित वाहनातून करावा.

■■■■■

# प्रकरण – ७

# रिमांड

# Remand

## उद्दिष्टे :

## (Cr. P.C. कलम १६७, ३९७ प्रमाणे)

१. अधिक तपास करण्यासाठी उपयुक्त.

२. पोलीस कस्टडी रिमांड नाकारल्यानंतरची क्रियारिती आपणास समजेल.

३. रिव्हीजन दाखल करण्यासाठी आवश्यक बाबी.

४. गुन्हयातील अटक आरोपी तपासासाठी २४ तासांपेक्षा जास्त काळ ताब्यात असण्यासाठी.

५. गुन्हयातील आरोपीचे साथीदार, मुद्देमाल हस्तगत करणे या बाबींकरिता उपयुक्त.

दखलपात्र अपराध केलेल्या व्यक्तीस किंवा प्रचलित कायद्यान्वये एखाद्या व्यक्तीस अटक करण्यात आल्यानंतर त्या अपराधातील सत्य शोधण्याकरिता तसेच निष्पन्न आरोपी विरुध्द पुरावा गोळा करण्याकरिता, अपराधाचा हेतू शोधण्याकरिता, मुद्देमाल हस्तगत करण्याकरिता, अगर मुद्देमालाची कशी विल्हेवाट लावली ह्याबाबत शोध घेण्याकरिता, आरोपीच्या साथीदारांचा तपास करण्याकरिता, आरोपीची पोलीस कोठडी तपासी अंमलदारास आवश्यक असते तेव्हा आरोपीस सी.आर.पी.सी कलम १६७ अन्वये संबंधित न्यायालयात हजर करून त्याची पोलीस कस्टडी रिमांड घ्यावी लागते.

अटक आरोपीस २४ तासांपेक्षा जास्त काळ ताब्यात ठेवणे गरजेचे असते. त्यावेळी ज्या कारणांकरिता पोलीस कस्टडी रिमांड मिळण्यासाठी त्याला केस डायरीसह संबंधित न्यायाधीशांसमोर पोलिसांनी हजर करणे आवश्यक आहे.

परंतु कधी कधी न्यायदंडाधिकारी आरोपीची पोलीस कस्टडी रिमांड मंजूर करीत नाहीत त्यामुळे महत्त्वाच्या मुद्यावर लागलीच तपास होत नाही. त्यामुळे आरोपीचे गुन्ह्यातील साथीदारांना लवकर अटक न होणे, मुद्देमाल हस्तगत करता न येणे, गुन्ह्यात वापरलेले हत्यार हस्तगत करण्यास विलंब होणे इ. मुद्यांवर तपासामध्ये त्रुटी राहून आरोपीस शिक्षा होत नाही, किंवा आरोपीचा गुन्ह्याशी संबंध जोडण्यास तपासी अंमलदारास त्रास होतो. अशा प्रकरणांमध्ये पोलीस कस्टडी रिमांड नाकारलेल्या आरोपीची पुन्हा पोलीस कस्टडी रिमांड मिळविणे आवश्यक असते. त्यामुळे तपासी अंमलदारास आरोपीस शिक्षेपर्यत पोहचविण्यास मदत होते. पोलीस कस्टडी रिमांड एकूण पंधरा दिवसांपर्यंत मिळते. त्यानंतर गुन्ह्याच्या स्वरूपानुसार आरोपीस मॅजिस्ट्रेट कस्टडी रिमांड मिळते. गंभीर स्वरूपाच्या व १० वर्षापेक्षा जास्त शिक्षा असलेल्या गुन्ह्यामध्ये ९० दिवस व इतर गुन्ह्यांमध्ये ६० दिवस मॅजिस्ट्रेट कस्टडी रिमांड दिली जाते.

## कनिष्ठ न्यायालयाने पोलीस कस्टडी नाकारल्यास रिव्हीजन दाखल करण्याची प्रक्रिया :

ज्या न्यायालयाने आरोपीची पोलीस कस्टडी रिमांड नाकारलेली आहे, त्या न्यायालयाकडे तपासिक अंमलदाराने अर्ज करून 'नाकारलेल्या आदेशाची' प्रमाणित प्रत प्राप्त करून घ्यावी. आरोपीची पोलीस कस्टडी

रिमांड का आवश्यक आहे त्या कारणांसह संपर्क अहवाल जिल्हा सरकारी वकिलांना सादर करावा. जिल्हा सरकारी वकील Cr. P. C. कलम ३९७ अन्वये जिल्हा सत्र न्यायालयात पुनर्निरीक्षण अर्ज दाखल करतात. अशा अर्जावर जिल्हा सत्र न्यायालयात सुनावणी होते आणि आरोपीस पोलीस कस्टडी रिमांड देण्याचे अगर नाकारण्याचे सत्र न्यायालयाकडून आदेश केले जातात.

## महत्त्वाचा मुद्दा :

ज्या न्यायालयाने पोलीस कस्टडी रिमांड नाकारल्याबाबत आदेश केलेले आहेत, त्या न्यायालयास जिल्हा सत्र न्यायालयात पुनर्निरीक्षण अर्ज दाखल करणार असल्याबाबत व आरोपीस जामीनावर सोडू नये म्हणून तपासीक अंमलदाराने लेखी विनंती, अहवाल सादर करणे गरजेचे आहे.

## रिव्हीजन दाखल करण्यासाठी आवश्यक बाबी :

१. कनिष्ठ न्यायालयाने पोलीस कस्टडी नाकारलेल्या मूळ आदेशाची सत्य प्रत.

२. रिव्हीजन अर्ज दाखल करण्याकरीता तपासीक अंमलदाराने जिल्हा सरकारी वकिलांना विनंती अर्ज करावा.

३. अटकेनंतरच्या पहिल्या १५ दिवसांत आरोपीस न्यायालयीन कोठडीतून पोलीस कोठडीत व पोलीस कोठडीतून न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे हुकूम करता येतात. म्हणून पोलीस कस्टडी रिमांड नाकारल्यानंतर लागलीच पुनर्निरीक्षण अर्ज दाखल करणे आवश्यक आहे.

४. तपासीक अंमलदाराने पुनर्निरीक्षण अर्जाच्या सुनावणीच्या वेळी कागदपत्र व मूळ केस डायऱ्यांसह न्यायालयात हजर राहावे.

## जामीन व रिमांड :

पोलिसांनी अटक केलेल्या इसमास जामिनावर तरी सोडले पाहिजे किंवा न्यायालयीन कोठडीत तरी पाठविले पाहिजे कारण पोलीस कुठल्याही इसमास अटक केल्यापासून २४ तासांपेक्षा जास्त वेळ आपल्या ताब्यात ठेवू शकत नाही.

ज्यावेळी अटक केलेला इसम स्वत: स्वत:चा बाँड देऊन किंवा इतर इसमाचा बाँड देऊन किंवा, तो सांगितल्याप्रमाणे कोर्टासमोर हजर होईल किंवा केला जाईल आणि जर असे करण्यात कुचराई केली तर बाँडमध्ये नमूद केलेली रक्कम कोर्टात भरेल या प्रक्रियेस जामीन असे म्हणण्यात येते. कुठल्याही इसमास अटक करण्याचा उद्देश हा की, असा अटक केलेला इसम हा कायदेशीर खटल्यासाठी, (खटल्यास तोंड देण्यासाठी) हजर राहील अशी खात्री करण्यासाठी जर अटक केलेल्या इसमाने स्वत:हून योग्य तो जामीन दिला किंवा इतर एक किंवा जास्त लायक व्यक्तीकडून सदर इसम खटल्यासाठी कोर्टासमोर हजर राहील अशी खातरजमा (खात्री) दिली तर अटकेचा उद्देश सफल होतो,

अटक केलेला इसम स्वत:च्या किंवा इतर जामीनदारांच्या बंधपत्रावर जामिनावर सोडला जातो. जामिनासाठी गुन्हे जामीनपात्र व अजामीनपात्र असे दोन तऱ्हेचे असतात. ज्यावेळी कोणताही इसम जामीनपात्र गुन्ह्याखाली अटक केला जातो तेव्हा त्यास ठाणे अंमलदाराने किंवा कोर्टाकडून जामिनावर सुटण्याचा हक्क असतो. पण जर अजामीनपात्र गुन्ह्यात अटक झाली तर जामिनावर सोडणे हे पोलीस किंवा कोर्टाच्या मर्जीवर असते.

## जामीनपात्र गुन्ह्यांत जामीन देणे (कलम ४३६ क्रि.प्रो. कोड)

ज्यावेळी कोणा व्यक्तीला जामीनपात्र गुन्ह्यात अटक होते तेव्हा त्यास जामिनावर सोडण्यासाठी ठाणे अंमलदार सक्षम आहे. जर अटक करणारा पोलीस अधिकारी ठाणे अंमलदार नसेल तर अशा अंमलदाराने अटक

इसमास जामिनावर सोडण्यासाठी व्यक्तीला लेखी अहवालासह ठाणे अंमलदारासमोर हजर करावा. जर जामिनपात्र गुन्ह्यांत जामिनावर सुटल्यानंतर आरोपी फरार झाला आणि जर त्यास परत अटक केली तर त्याने अजामीनपात्र गुन्हा केला आहे असे समजावे. जर ठाणे अंमलदाराने जामीनपात्र गुन्ह्यात इसमास जामिनावर सोडले तर बाँड घेण्यात यावे. अशा वेळी जे जामीनदार असतील त्याचे सविस्तर पत्ते त्या बाँडवर नमूद करणे गरजेचे आहे. जामीनपात्र गुन्ह्यात जामिनावर सोडताना किती जामीनदार व किती रकमेचे असावे हे ठरविण्याचा अधिकार पोलीस अधिकाऱ्यांचा आहे.

## अजामीनपात्र गुन्ह्यात जामीन (कलम ४३७ (२) क्रि.प्रो.कोड)

ज्यावेळी अजामीनपात्र गुन्ह्यात इसमास अटक केली जाते त्यावेळी सर्वसाधारणपणे त्यास न्यायालयासमोर हजर करणे गरजेचे आहे. पण क्रि.प्रो.कोड कलम ४३७(१) व (२) यातील तरतुदीनुसार अपवादात्मक गुन्ह्यात ठाणे अंमलदार जामिनावर सोडू शकतो.

## पोलिसांनी जामीन देणे केव्हा बंधनकारक आहे

१. क्रि.प्रो.कोड कलम ४३६ अन्वये जामीनपात्र गुन्ह्यांत.

२. क्रि.प्रो.कोड कलम ४३७ (२) अन्वये अजामीनपात्र गुन्ह्यांत ज्यावेळी तपास करताना असा अटक केलेला इसम फक्त जामीनपात्र गुन्ह्यांत संबंधित आहे असे निदर्शनास येते.

३. ज्यावेळी तपास पूर्ण झाल्यानंतर जर असा एखाद्या इसमावर कोर्टात त्याच्याविरुध्द खटला पाठविण्याइतका सबळ पुरावा नाही किंवा तपासअंती पुराव्यानुसार फक्त जामीनपात्र गुन्हा क्रि.प्रो.कोड कलम १६९ व १७० प्रमाणे मिळून येत असल्यास.

४. ज्यावेळी इसमास क्रि.प्रो.कोड ७१ अन्वये जामीनपात्र वॉरंटवर अटक केले असेल तेव्हा.

## अजामीनपात्र गुन्ह्यांमध्ये जामीन देण्यास विरोध करण्यासाठी मुद्दे :

१. फरारी होण्याची शक्यता.

२. पुराव्यात ढवळाढवळ, नाहीसा करण्याचा प्रयत्न, साक्षीदारांस धमक्या व दहशत निर्माण करण्याची शक्यता.

३. परत गुन्हा करण्याची शक्यता.

४. गुन्ह्याचे गांभीर्य व आरोपीची वागणूक.

५. विभागात शांततेचा भंग व वातावरणात बदल होण्याची शक्यता.

६. फिर्यादीपक्षाकडून प्रतिकार होण्याची शक्यता.

## जामीनपात्र वॉरंट :

ज्यावेळी एखाद्या इसमास जामीनपात्र वॉरंटवर (अटकेचा हुकुमावर) अटक केली जाते, त्यावेळी जामीन देण्यासाठी त्यास पोलीस ठाण्यात येण्याची सक्ती करू नये. जर तो जामीन देण्यास तयार असेल तर त्यास अटक केल्याजागीच जामीन द्यावा.

## कलम ४३८ क्रि.प्रो. कोड अटकपूर्व जामीन :

या कलमानुसार उच्च न्यायालय व सत्र न्यायालयास आरोपीस किंवा संशयित आरोपीस अजामीनपात्र गुन्ह्यात अटकपूर्व जामीन मंजूर करण्याचा अधिकार आहे. या जामिनास अटकपूर्व जामीन असे म्हणतात व तो अटींसह असतो. जामीन हुकूमानुसार जर आरोपीस अटक केली तर त्यास जामिनावर सोडावे. म्हणून ज्या इसमास अटकपूर्व जामीन मंजूर झाला असेल त्यास अटक करता येऊ शकते; पण त्यास त्वरित जामिनावर सोडण्यास

हवे.

ज्यावेळी एखाद्या इसमास अटक होण्याची भीती वाटते (शक्यता) त्यावेळी तो इसम उच्च व सत्र न्यायालयाकडे अर्ज करून जर त्यास अटक केली तर जामिनावर सोडण्याची सूचना द्यावी अशी विनंती करू शकतो. अशा अर्जावर न्यायालय सरकारी वकिलांना काही विरोध आहे का? हे विचारण्यासाठी सूचनापत्र देतात. ठाणे अंमलदारांनी सरकारी वकिलांना आपला युक्तिवाद करण्यासाठी पुरेशी माहिती द्यावी. जर न्यायालयाचा हुकूम आरोपीच्या बाजूने लागला तर त्या इसमास त्या हुकुमानुसार जामीन घेऊन जामिनावर सोडण्यात यावे. यावरून स्पष्ट आहे की, जरी अटकपूर्व जामीन मंजूर झाला असेल तरी पोलीस त्यास अटक करू शकतात; मात्र अशा इसमास कोर्टासमोर हजर न करता जामिनावर सोडण्याची मुभा आहे.

अशा अर्जाच्या सुनावणीवेळी जर न्यायालय आरोपीच्या बाजूने निर्णय देणार असेल तर काही अटी लावण्याबाबत विनंती करावी, या अटी पुढीलप्रमाणे :

अ) सदर इसम चौकशीसाठी (विचारपूस) ज्यावेळी बोलाविले जाईल त्यावेळी हजर राहील.

ब) तो प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे पुराव्यात वा साक्षीदारात ढवळाढवळ (हस्तक्षेप) करणार नाही.

क) तो इसम ती जागा किंवा देश सोडणार नाही.

ड) तो इसम तपासकामी सहकार्य करेल.

## अटक केलेल्या आरोपीचा रिमांड (क्रि.प्रो.कोड १६७) :

रिमांड (पोलीस कोठडीसाठी मागावयाचा हुकूम) म्हणजे न्यायालयाकडून आरोपीस पोलीस कोठडीत वेळोवेळी ठेवावयास हुकूमाबाबतची पध्दत. ज्यावेळी एखाद्या इसमास अटक केली जाते व जामिनावर सोडले जात नाही त्यावेळी त्यास न्यायालयाकडून पोलीस कोठडीत रवानगी केली जाते. (जास्तीत जास्त १५ दिवस)

ज्यावेळी एखाद्या इसमास तपासादरम्यान अटक केली जाते व तपास २४ तासाचे आंत जर पूर्ण झाला नाही तर पोलीस ठाण्याचे अंमलदाराने या आरोपीस नजीकच्या न्यायालयात आपला रिमांड अहवालासह व सोबत त्या वेळेच्यापर्यंत लिहिलेल्या केस डायरीसह पाठवावा.

जर त्या अहवालावरून गुन्हा केल्याबद्दल दिसून येत असेल तर पुढील तपासासाठी अशा आरोपीस पोलीस कोठडीत पाठविले जाईल.

पोलीस कोठडी ही एकावेळी जास्तीत जास्त १५ दिवसांसाठी आहे. १० वर्षापेक्षा कमी शिक्षा असलेल्या सर्वसाधारण गुन्ह्यात न्यायालयीन कोठडी ही जास्तीत जास्त ६० दिवसापर्यंत पोलीस मागू शकतात व शिक्षा जर जन्मठेप व मृत्युदंडाची असेल वा १० वर्षापेक्षा कमी नसेल तर ९० दिवसांची कोठडी मिळू शकते. पण जर या मुदतीत आरोपपत्र दाखल केले नाही तर खुनासारख्या गंभीर गुन्ह्यात सुध्दा जामीन मिळून आरोपी सुटू शकतो.

कुठलाही आरोपी न्यायमूर्तीसमोर उभा केल्याखेरीज पोलीस कोठडीत पाठविला जाऊ शकत नाही.

निरनिराळ्या वेळी केलेल्या गुन्ह्यासाठी आरोपीस वेगवेगळ्या कोठडीत पाठविला जाऊ शकतो. रिमांड हा नेहमी न्यायालयाकडून दिला जातो. पण न्यायमूर्तीच्या गैरहजेरीत त्यास न्यायमूर्तीचे अधिकार प्रदान केले असतील अशा कार्यकारी दंडाधिकाऱ्यासमोर जर आरोपीस उभे केले तर त्याचेकडून रिमांड दिला जाऊ शकतो. अशा प्रकारात हा रिमांड जास्तीत जास्त ७ दिवसांचा असेल त्यानंतर मात्र तो रिमांड अधिकारप्राप्त न्यायमूर्तीकडून दिला जाईल.

## पोलीस कोठडी रिमांड (कलम १६७ क्रि.प्रो. कोड) :

काही वेळा न्यायालयीन कोठडीत रवानगी झालेल्या आरोपींकडे तपास करणे गरजेचे असते. अशा वेळी

जर आरोपीस पोलीस कोठडीत घेणे गरजेचे असेल तर खालील मुद्दे लक्षात ठेवले पाहिजे.

१. जर पुरेशी कारणे असतील तर आरोपीस पोलीस कोठडी दिली जाते. त्यामुळे अशी मागणी करतांना त्या अर्जात समाधानकारक कारणे दिली पाहिजे.

२. पोलीस कोठडी ही फक्त पहिल्या पंधरा दिवसात दिली जाते व ती सुध्दा जास्तीत जास्त १५ दिवस निरनिराळ्या गुन्ह्यांत केलेल्या निरनिराळ्या अर्जाद्वारे पोलीस कोठडी मागितली जाऊ शकते. पोलीस कोठडीची मुदत संपल्यानंतर आरोपीस वेळेत न्यायालयासमोर उभे केले पाहिजे.

■■■■■

# प्रकरण – ८

# आरोपीची ओळख परेड

## (Identification Parade of the Accused)

### उद्दिष्टे :

**[Cr. P.C. Sec. 54 (A) I.E.A. Sec. 9 & Sec. 159]**

Cr. P.C. Sec. 54 (A) – अटक केलेल्या व्यक्तीची ओळख.

I.E.A. Sec. 9 – संबध्द तथ्यांचा खुलासा किंवा ती प्रस्तुत करण्यासाठी जरूर असलेली तथ्ये.

I.E.A. Sec. 176 – स्मृतीला उजाळा देणे.

१. आरोपीची नक्की ओळख कशी करावी हे आपल्याला समजेल.

ओळख परेड घेताना आरोपी मॅजिस्ट्रेट कस्टडीत असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. म्हणून आरोपीची ओळख परेड घ्यायची असल्यास त्याला अटक झाल्यावर –

१. आरोपी अटक केल्यावर त्याचा फोटो वर्तमानपत्रात /दूरदर्शनवर दूरचित्रवाहिन्यांवर देऊ नये.

२. आरोपींचे चेहऱ्यावर बुरखा लावावा.

३. ओळख परेड त्वरित घ्यावी.

४. आरोपी जर पोलीस कस्टडीत असेल तर त्याची मॅजिस्ट्रेट कस्टडी घ्यावी.

५. तपासकामी पोलीस कस्टडी रिमांड आवश्यक असेल तर पुन्हा पोलीस कस्टडीसाठी विनंती करावी.

६. विशेष कार्यकारी दंडाधिकारी यांच्याकडून ओळख परेड करून घ्यावी.

७. ओळख परेड घेताना पोलिसांनी उपस्थित राहू नये व ओळखपरेड पंचनाम्यात तसे स्पष्टपणे नमूद करण्यास विशेष कार्यकारी दंडाधिकारी यांना विनंती करावी.

८. ओळखपरेड घेताना आरोपीला ओळखणाऱ्या साक्षीदाराने गुन्हा करताना ज्या परिस्थितीत पाहिले त्या परिस्थितीत हजर करावे. व त्याचे सोबत नियमानुसार तोतया म्हणून उभे राहणारे इसमांचा सुध्दा पेहराव आरोपीसारखाच ठेवण्याचा प्रयत्न करावा.

९. साक्षीदारांना (भीती असल्यास) संरक्षण द्यावे.

१०. आरोपी अटक केलेनंतर आरोपी व साक्षीदारांचा प्रत्यक्ष संबंध येणार नाही, याची खबरदारी घ्यावी. काही वेळेस आरोपी अटक केले नंतर फिर्यादी व साक्षीदार त्याला पाहण्यासाठी पोलीस स्टेशनला येतात. त्यामुळे ओळखपरेड घेण्यात कोणताही अर्थ नसतो.

११. ओळखपरेड घेण्याबाबत मा. उच्च न्यायालयाने काही निर्देश जारी केले आहेत. त्या निर्देशांचे पालन Special Ex. Magistrate यांनी केले आहे किंवा नाही ते पाहावे. व ओळख परेडपूर्वी शक्यतोवर त्यांना ते निदर्शनास आणून द्यावे.

### ओळखपरेडमध्ये दोषसिध्दीची कारणे :

१. S.E.M. यांनी ओळख परेड कशी व कोणत्या नियमाप्रमाणे घेतली हे न्यायालयासमोर सांगितले. फिर्यादी व साक्षीदाराने आरोपींना ओळखपरेडमध्ये ओळखून त्याचा गुन्ह्यातील सहभाग सांगितला. त्यामुळे अभियोग पक्षाने

ओळख परेडबाबत सादर केलेला पुरावा न्यायालयाने विश्वासार्ह मानला.

२. S.E.O. यांनी जेलमध्ये ओळख परेड घेतली त्यावेळी फिर्यादी व साक्षीदारांनी आरोपींना ओळखल्याने यावर न्यायालयाने विश्वास ठेवून आरोपीतांना शिक्षा दिली.

## आरोपी निर्दोष सुटल्याचे निवाडे :

१. तपास अंमलदाराने आरोपीची ओळख परेड घेतली नाही.

२. S.E.O. यांनी जेल मध्ये आरोपीची ओळख परेड घेतली त्यावेळी फिर्यादीने आरोपीला ओळखले. परंतु न्यायालयासमोर ओळखले नाही. तसेच S.E.O. यांनी दोन आरोपींची ओळख परेड वेगवेगळी न घेता एकाच वेळी दोन्ही आरोपींची ओळख परेड घेतल्यामुळे ती प्रचलित नियमानुसार घेतली नाही.

३. आरोपीला अटक केल्यानंतर त्याची ओळख परेड घेण्यात आली नाही.

४. ओळख परेड घेतांना मा. उच्च न्यायालयाचे निर्देशांचे पालन केले गेले नसल्याने न्यायालयाने त्या ओळख परेडवर विश्वास ठेवला नाही.

५. पोलिसांनी आरोपीची ओळख परेड न घेता पोलीस ठाण्यातच फिर्यादी व साक्षीदाराला आरोपीस दाखविण्यात आले.

## ओळख परेड :

अनेक लोकांच्या समूहातून एखाद्या इसमास ओळखून काढण्याच्या प्रक्रियेस ओळख परेड असे म्हणतात. साक्षीदाराने एखाद्या संशयितास जरी न्यायालयात पहिल्यांदाच ओळखून काढले आणि असे ओळखून काढलेले पुरावा हा जरी स्वतंत्र (अस्तित्व असलेला) पुरावा असला तरी असा पुरावा सहजासहजी मान्य होत नाही. न्यायालयासमोर आरोपीस ओळखून काढले तर अशा पुराव्यास पुष्टी किंवा खात्री देण्यासाठी आधी ओळख परेडमध्ये संबंधित आरोपीस ओळखण्यासाठी ओळख परेड घेण्यात येते.

ओळख परेड किंवा परीक्षा दिवाणी व फौजदारी अशा दोन्ही प्रकारांत ओळखून काढण्यास घेण्यात येतात.

१. इसम जिवंत वा मृत ओळखीचा किंवा अनोळखी.

२. निरनिराळ्या वस्तू त्यात स्फोटके सुद्धा असतात

३. हस्ताक्षर, फोटो, बोटांचे ठसे.

आरोपीचे किंवा इतर वस्तूची ओळख परेड गुन्हेगारी प्रकारात बहुधा घेतली जाते. ती एखादा आरोपी दोषी वा निर्दोष आहे हे ठरविण्यासाठी घेतली जाते व गुन्हेगारी प्रकरणांत ती तपासादरम्यान घेतली जाते.

## प्रस्थापित कायदा :

ओळख परेडसाठी कुठलाही प्रस्थापित्त कायदा नाही. गुन्ह्यात एखादा निर्दोष माणूस गोवला जाऊ नये, त्याची खात्री व्हावी यासाठी न्यायालये ओळख परेडचा आग्रह धरतात. कलम ४७७ क्रि.प्रो.कोड अन्वये उच्च न्यायालयास नियम करण्याचे अधिकार आहेत.

## ओळख परेड केव्हा घ्यावी? :

१. ज्या वेळी गुन्ह्याचे तपासात आरोपीस अटक होते किंवा काही मालमत्ता शोधून काढली जाते, अशावेळी परेड घेण्यात येतात.

२. अशी ओळख परेड एखाद्या साक्षीदाराने एखाद्या संशयितास (आरोपीस) बघितला आहे व ज्यास तो पूर्वी ओळखत नव्हता या त्याच्या म्हणण्याची सत्यता पडताळण्यासाठी घेतली जाते.

३. जेव्हा पोलीस अनोळखी इसमाने केलेल्या गुन्ह्याचा तपास करीत असतात व त्यात गुन्हा केलेल्या संशयितास अटक करतात, तेव्हा ओळख परेड घेतली जाते ज्याद्वारे प्रत्यक्ष बघितलेले साक्षीदार हे संशयितास ओळखून त्याने गुन्हा केला आहे किंवा नाही हे सांगू शकतात.

## ओळख परेडचा उद्देश :

गुन्ह्याचा तपास करणाऱ्या अधिकाऱ्यांना आरोपपत्र पाठविण्यापूर्वी खात्री पटावी म्हणून व न्यायालयात आरोपीने गुन्हा केला आहे, याची खात्री व्हावी म्हणून ओळख परेड घेण्यात येते. आरोपीच्या फायद्यासाठीसुध्दा ओळख परेड घेतली जाते. साक्षीदाराने दिलेल्या जबाबाची खात्री पटण्यासाठी आणि साक्षीदार खरोखरच त्यांनी बघितलेले संशयित (आरोपी) ओळखू शकतात काय याची खातरजमा करण्यासाठी ओळख परेड घेतली जाते.

## आधी घेतलेल्या ओळख परेडचे महत्त्व :

साक्षीदाराने न्यायालयात दिलेला जबाब (साक्ष) हा भक्कम पुरावा असतो. साक्षीदाराने खटला चालू असताना पहिल्या वेळेसच आरोपीस ओळखले हा पुरावा तकलादू असतो. श्रीराम v/s राज्य या खटल्यात उच्चतम न्यायालयाने असा निकष दिला आहे की, खटला चालू असताना आरोपीस ओळखणे हा फार किंमती पुरावा नाही, जोपर्यंत या पुराव्यास आधीच्या ओळख परेडची जोड नसेल.

## ओळख परेड कोणी घ्यावी :

कायद्यात याबाबत काहीच तरतूद नाही. पोलीस अधिकारी किंवा इतर स्वतंत्र इसम ओळख परेड घेऊ शकतो. पोलीस अधिकाऱ्यांनी घेतलेल्या ओळख परेडला काहीच किंमत (पुरावा म्हणून) दिली जात नाही. खासगी माणसाने घेतलेल्या ओळख परेडला काहीतरी किंमत (पुरावा म्हणून) असते.

सर्वसाधारणपणे सत्र न्यायालयाने नियुक्त केलेल्या न्यायाधीशाने ओळख परेड घ्यावी. जर सत्र न्यायालयाने अशी नेमणूक केली नाही तर कोणीही न्यायाधीश ज्याला कलम १६४ क्रि.प्रो.कोड प्रमाणे कबुलीजबाब घेण्याचा अधिकार आहे असे न्यायाधीश ओळख परेड घेऊ शकतात.

निरनिराळ्या उच्च न्यायालयाने असे निर्णय दिले आहेत की, जर ओळख परेडच्या पुराव्यास खटल्यात किंमत असेल (महत्त्वाचे असेल, पुरावा म्हणून मान्य करावयास असेल) तर ओळख परेड न्यायालयाने पोलिसांच्या गैरहजेरीत घेतली पाहिजे.

## ओळख परेड घेण्यास विलंब (त्याचे परिणाम) :

सर्वसाधारण पध्दतीने पोलिसांनी अटक केल्यानंतर आरोपीकडून पुरावा मिळविण्याकरिता किंवा चोरीची मालमत्ता मिळविण्याकरिता पोलीस कोठडी घेण्यात येते व त्यानंतर न्यायालयातील कोठडीत पाठवून ओळख परेड घेण्याची विनंती करण्यात येते.

पोलीस कोठडीनंतर ओळख परेड घेणे फार कमी महत्वाचे (पुरावा म्हणून) आहे. ओळख परेडच्या पुराव्याचे महत्त्व ठरविताना ओळख परेड ही आरोपी अटक केल्यानंतर थोड्या वाजवी वेळेत झाली होती काय हा एक महत्त्वाचा मुद्दा असतो आणि जर अशी ओळख परेड वाजवी (योग्य) वेळेत झाली नसेल तर ओळख परेड उशिरा घेतल्याबाबत पटण्यासारखे कारण तपास यंत्रणेकडून दिले आहे का? हे तपासले जाते.

## ओळख परेड व पोलिसांची कर्तव्ये (बिहार राज्य v/s वकील सिंग पाटणा उच्च न्यायालय)

१. ओळख परेड हा तपासाचा एक भाग आहे.

२. ओळख परेडसाठी आरोपीला पोलिसांनी न्यायालयीन कोठडीत पाठविले पाहिजे.

३. पोलिसांनी ओळख परेड घेण्यासाठी न्यायालयास विनंती केली पाहिजे.

४. पोलिसांनी न्यायालयात योग्य त्या वस्तू व गुन्ह्याची हकिकत दिली पाहिजे.

५. पोलिसांनी ओळखणारे साक्षीदार न्यायमूर्तीसमोर उभे केले पाहिजे.

## फोटो, पायाचे, बोटाचे ठसे व हस्ताक्षर ओळख

गुन्हेगारांना ओळखण्यास फोटो हे फार महत्त्वाचे असतात. फोटोवरून गुन्हेगारास ओळखणे कठीण होऊ शकते, जर गुन्हेगाराने त्याचे केस, दाढी किंवा प्लास्टिक शस्त्रक्रिया करून चेहऱ्यात बदल केले असतील तर. जेव्हा गुन्हेगार शोधण्यासाठी पोलीस फोटोंचा उपयोग करतात तेव्हा पोलिसांनी सावधगिरी बाळगली पाहिजे. अनेक निरनिराळे फोटो एकत्रित दाखवून त्यातून साक्षीदारास संशयितास फोटो उचलायला सांगणे ही योग्य पध्दत आहे. परंतु, एकत्र फोटो दाखवावयाचा व साक्षीदारास विचारायचे की हाच संशयित आहे का? हे चुकीचे आहे.

त्याचप्रमाणे पायाचे ठसे, बोटांचे ठसे व हस्ताक्षर हे तज्ज्ञांकडून ओळखले जातात व त्यामुळे तपासात मदत होते.

## वस्तुची व प्राण्यांची (जनावरांची) ओळख :

अ) **वस्तू :**– चोरी, दरोडे , इ. गुन्ह्यांमध्ये चोरीस गेलेल्या मालाचे (सामानांची, वस्तूची) यादी दिली असते. आणि ज्यावेळी अनेक गुन्ह्यांमधील मालमत्ता (वस्तू) हस्तगत केल्या जातात (परत मिळविल्या जातात) ज्यावेळी मालकांना बोलवून त्याच्या वस्तू ओळखण्यास सांगितले जाते. चोरी इ. गुन्ह्यांमध्ये माल हस्तगत करण्याचा पंचनामे इ. पुरावे ग्राह्य धरले जातात अशा वेळी साक्षीदारांकडून वस्तू ओळखण्याचा पुराव्यावर भवितव्य अवलंबून असते.

ज्यावेळी चोरीस गेलेल्या वस्तुची एखादी ओळखण्याची विशिष्ट खूण असते व अशा वस्तू बाजारात उपलब्ध नसतात (मिळत नाही) अशा वस्तूची ओळख पटवून घेणे गरजेचे नसते. टपाल खात्याच्या वापरत असलेल्या तांब्याच्या तारा ठराविक मापाच्या असतात व त्या बाजारात मिळत नाहीत; तेव्हा त्याची ओळख पटविण्याची गरज नसते. त्याचप्रमाणे चोरीस गेलेल्या वस्तूवर एखादा शिक्का असेल किंवा पुसून न जाताही खूण असेल तर अशा वस्तुची ओळख पटविणे गरजेचे नसते. वस्तुची ओळख करून घेणे एवढ्यासाठी गरजेचे असते की आरोपीने असा दावा करू नये की, त्याने त्या वस्तू बाजारांत ज्या सहज विकत मिळतात तेथून विकत घेतल्या आहेत. त्याचा हा दावा फोल ठरविण्यासाठी वस्तुची ओळख पटवून घेणे गरजेचे असते.

ज्यावेळी वस्तूची ओळख पटवून घेण्याची प्रक्रिया केली जाते त्यावेळी अशा वस्तू इतर त्याच प्रकारच्या वस्तुंमध्ये एकत्रित करून साक्षीदारास त्याची वस्तू बाहेर काढण्यास सांगावे, जर साक्षीदाराने या वस्तू ओळखण्याच्या प्रक्रियेच्या आधी बघितलेल्या असल्याची शक्यता असेल तर अशी ओळख निरर्थक ठरते. ज्यावेळी जप्त केलेल्या वस्तुंना लेबल लावलेले असेल व त्या वस्तू इतर लेबल न लावलेल्या वस्तूत एकत्रित करुन ओळख प्रक्रिया केली तर तशी ओळख असमाधानकारक ठरते असे न्यायालयांने निकालात म्हटलेले आहे.

ज्यावेळी वस्तुला एखादी विशिष्ट खूण असते तेव्हा त्या वस्तुची ओळख सहजरित्या स्वीकारली जाते. जेव्हा एखादे धोतर हे त्याच्या फाटलेल्या भागामुळे ओळखले गेले ती ओळख समाधानकारक ओळख मानली गेली.

परंतु एखाद्या वस्तुवरील खूण ट्रेडमार्क किंवा पेटंट असते; पण त्या खुणेबाबत वस्तूच्या वर्णनात सांगितलेले नसेल तेव्हा त्या वस्तूच्या ओळखीस फार कमी महत्त्व दिले जाते (पुराव्यात)

आसाम राज्य V/S यु.एन.राजखोब्रा या खटल्यात एक टॉवेल ज्यावर धोबीची खूण होती तो टॉवेल प्रेताजवळ मिळून आला. तो धोबी साक्षीदार म्हणून न्यायालयासमोर आला व त्याने त्याचे साक्षीत सांगितले की त्या टॉवेलवरील खूण त्याने केली होती व तो टॉवेल आरोपीचा आहे. पुढे उच्च न्यायालयाने आरोपीचा युक्तिवाद

की सदरहू खुणेची (धोबीने केलेली खूण) ओळख न्यायालयासमोर करून घेणे गरजेचे होते हा फेटाळण्यात आला व धोब्याची साक्ष ग्राह्य धरण्यात आली.

पंजाब राज्य V/S रामेश्वर दास या खटल्यात बेकायदेशीर अफूची आरोपीकडून केलेली जप्ती वादात होती. जप्त करतानाच्या पंचाने सरतपासणी व उलट तपासणीत सांगितले की सदरहू अफू ही आरोपीकडूनच जप्त केली आहे. पण आरोपीच्या नंतर परंत उलट तपासणीच्या वेळी, साक्षीदार पंचाने दुसराच चुकीचा इसम आरोपी म्हणून दाखविला. उच्च न्यायालयाने असा निर्णय दिला की केवळ ह्या कारणामुळे साक्षीदार पंचाची साक्ष टाकाऊ ठरविता येणार नाही.

एखाद्या वस्तुवर काही लक्षणीय (उल्लेखनीय) खूण नसली तरी ती रोजच्या वापरात असते. जर अशी वस्तू साक्षीदार अनेक वर्षे वापरीत असेल तर साक्षीदार अशी वस्तू ओळखू शकेल. येथे मुद्दा असा असतो की, साक्षीदार वस्तू ओळखतो, पण तो कशी (कशावरून) ओळखतो याचे स्पष्टीकरण देऊ शकत नाही. जर न्यायालयाने एखाद्या साक्षीदाराने वस्तू ओळखली यावर विश्वास ठेवला तर त्याने कशावरून ती वस्तू ओळखली याचे कारण देऊ शकला नाही, ही बाब खटल्यात फारशी आड येत नाही (त्यामुळे फरक पडत नाही) खास खुणा नसलेल्या पण नेहमीच्या व सतत उपयोगात असलेल्या वस्तूबाबत चर्चा करताना, न्यायालयांनी अनेकदा मत व्यक्त केले आहे की, अशा वस्तू त्याच्या मालकांनी ओळखणे शक्य आहे. जसे कामगारास त्याचे हत्यार, पुष्कळशा लोकांना त्याचे कपडे, दागिने इ. अनेक प्रकारच्या वस्तू वारंवार बघितलेल्या वस्तूच्या स्वरूपावरून सुतार, गवंडी किंवा इतर कारागीर त्याची हत्यारे, कपडे, दागिने किंवा इतर मालमत्ता त्याच्या मालकाला माहीत असते. जनावरे व इतर वस्तू नि:शंकपणे त्या लोकांना माहिती असतात. ते निरीक्षणावरून अशा वस्तुची ओळख ओळखण्याचे शिक्षण देते व अशा ओळखवर सहजपणे विश्वास ठेवता येतो. पण त्याचबरोबर साक्षीदार अशा वस्तू ओळखल्याबाबत साक्षीदार कारणे सांगू शकणार नाही. मी माझे धोतर, गाय, माझ्या पत्नीचे मंगळसूत्र किंवा हार व माझ्या मित्राचे हस्ताक्षर इतर अनेक गोष्टींच्यामधून ओळख पटू शकेल. पण प्रश्न विचारला तर अशा ओळखण्याचे योग्य किंवा बुध्दीला पटणारे कारण देऊ शकणार नाही. अशा वस्तू ओळखण्याची कारणे दिली नाहीत म्हणून अशा साक्षीस खोटी ठरविणे योग्य होणार नाही. दागिन्यांच्या ओळखण्याबाबत किंवा त्या दागिन्यावर खास ओळखता येण्याजोगी खूण नाही म्हणून अशा ओळखण्याबाबतचा पुरावा नाकारता येणार नाही.

साक्षीदारांनी अशा वस्तू किंवा जनावरे ओळखल्याबाबतच्या प्रक्रियेत पोलिसांसमोर दिलेला जबाब हा क्रि.प्रो.कोड कलम १६२ अन्वये अग्राह्य आहे. त्यामुळे पोलीस अधिकारी अशी साक्ष देऊ शकत नाही की साक्षीदाराने वस्तू ओळखल्या; परंतु साक्षीदार मात्र त्याने त्या वस्तू ओळखल्याबाबत साक्ष देऊ शकतात व त्यामुळे ओळखीला पाठबळ मिळते.

**ब) जनावरे–**

ज्यावेळी जनावर हरवल्याबाबत फिर्याद किंवा तक्रार दिली जाते त्यावेळी पोलीस अधिकाऱ्याने त्या जनावराच्या अंगावर काही गोंदविलेल्या किंवा व्यंग आहे काय की ज्यामुळे जनावर ओळखता येईल याची विचारपूस करावी. जनावरे इतर वस्तूपेक्षा सहजपणे ओळखली जातात कारण कुत्रे, गायी या प्राण्यांना त्याच्या मालकाबद्दल आस्था, आपलेपणा असतो व पोलीस जनावरांच्या हालचाली बघून ओळख निश्चित करू शकतात.

## ओळख परेड घेणाऱ्या न्यायाधीशाने घ्यावयाच्या दक्षता :

१. लोकांच्या समक्ष (उघड्यावर) परेड घेऊ नये. गुप्तता बाळगावी.

२. कोणीही पोलीस अधिकारी हजर नसावा.

३. जर जेलमध्ये परेड झाली तर जेलचे अधिकारी परेडचे जागी हजर नसावा.

४. बिगर संशयित हे संशयिताचे वयाचे, उंचीत व सर्वसाधारण सारखे दिसणारे परेडचे वेळी एकत्रित करावे.

५. संशयित आरोपीच्या अंगावर दिसून येणाऱ्या खुणा झाकाव्यात.

६. आरोपीने घातलेले कपडे हे बिगर संशयित (डमी) यांना सुध्दा घालण्यास सांगावे किंवा आरोपीच्या अंगावरील कपडे आरोपीस बदलण्यास सांगावे.

७. जे लोक हजर असतील त्याच्याबाबत आरोपीस हरकत असल्यास ती सांगण्याची त्यास परवानगी असावी.

८. आरोपीस परेडमध्ये कुठल्या जागी (नंबरवर) उभे राहायचे असेल तर तशी त्यास परवानगी द्यावी.

९. ओळखण्यासाठी बोलाविलेल्या साक्षीदारांना परेडच्या जागेपासून दूर ठेवावे जेणेकरून परेडची जागा त्यांना दिसणार नाही त्याचप्रमाणे आरोपी व संशयितास बघता येऊ नये.

१०. एकानंतर एक साक्षीदारास ओळख परेडमध्ये ओळखण्यासाठी बोलावावे साक्षीदार एकत्र आणण्याची परवानगी नाही.

११. ज्या इसमास साक्षीदार ओळख परेडमध्ये ओळखणार आहे त्या इसमाची आधी ओळख होती काय? हे विचारावे.

१२. परेडचे वेळी आरोपीने जर काही जबाब दिला तर त्याची नोंद घ्यावी.

१३. ओळख परेड संबंधात इतर सर्व परिस्थिती काळजीपूर्वक नोंदविणे गरजेचे आहे.

ओळख परेड घेणाऱ्या न्यायाधीशाने सर्व तऱ्हेच्या दक्षता घ्याव्यात हे तत्त्व आहे. कारण त्यामुळे वाईट पध्दतीने परेड घेतल्यामुळे साक्षीबाबत संशय निर्माण होऊ शकतो.

## ओळख परेड व आरोपीस जामीन :

कलम ४३७ क्रि.प्रो.कोडप्रमाणे ओळख परेड घेणे बाकी आहे या कारणासाठी जामीन नाकारला जाऊ शकत नाही. जर अशा तऱ्हेने जामीन दिला तर आरोपी हा साक्षीदाराकडून बघितला जाण्याची शक्यता असते व त्यामुळे ओळखपरेडला काही अर्थ राहात नाही. आरोपीस अटक केल्यानंतर रिमांड अहवालात ओळख परेड घेणे गरजेचे आहे हे तपास अंमलदाराने नमूद करावे. ती लवकरात लवकर घ्यावी म्हणजे आरोपी जामीनावर सुटण्याआधी परेड घेता येईल.

सरकारी पक्ष हा साक्षीदारांना दिलेल्या वेळी हजर करण्याचे तयारीत असला पाहिजे. पोलिसांकडे असलेला फोटो हा साक्षीदाराला दाखविला जाऊ शकतो. ज्यावेळी आरोपी हा साक्षीदारांच्या ओळखीचा असतो त्यावेळी ओळख परेड घेण्याची गरज नाही. ज्यावेळी आरोपी हा साक्षीदारांना (गुन्ह्यापूर्वी) माहिती नसतो त्यावेळी ओळखपरेडची गरज भासते.

जर आरोपीला जागेवरच अटक करतांना जर त्या गुन्ह्यातील साक्षीदार हजर असतील (साक्षीदाराच्या समक्ष आरोपीस अटक झाली) तर ओळख परेड घेण्याची गरज नाही. मात्र, आरोपीस कायदेशीर हक्क असो किंवा नसो जर त्याने ओळख परेडची मागणी केली तर ती घ्यावी.

जर प्रथम खबरीमध्ये आरोपीची नावे दिलेली असतील तर याचा अर्थ आरोपी माहितीचे आहेत. पण जर प्रथम खबर (फिर्यादी) ऐकीव बातमीवर असेल तर मात्र ओळख परेड गरजेचे असते.

## ओळख परेडच्या पुराव्याची छाननी :

१. अंधाऱ्या रात्री ओळखून काढले याला पुरावा म्हणून किंमत नाही.

२. चांगल्या चांदण्याचे प्रकाशात ७ यार्डापर्यंत ओळख ही शक्य असल्याचे मानले जाते.

३. कंदिलाच्या प्रकाशातील ओळख ही प्रकाश व परिस्थितीवर अवलंबून राहील.

४. विजेरीच्या प्रकाशात जर साक्षीदाराने विजेरीचा प्रकाशझोत आरोपीवर मारला तर ओळख शक्य आहे. मात्र

आरोपीने विजेरीचा प्रकाशझोत साक्षीदारावर मारला तर ओळख शक्य नाही. आवाजावरून ओळख शक्य आहे जर आरोपी हा साक्षीदाराच्या चांगला ओळखीचा असेल तर.

५. ओळखीच्या संशयिताची ओळख दिवसाच्या प्रकाशात ५० ते ९० यार्डापर्यंत. नाहीतर २८ ते ३३ यार्डापर्यंत ओळख शक्य आहे. त्या लोकांनी एकदाच १६ यार्डापर्यंत बघितले ही ओळख मान्य आहे.

## ओळख परेडमध्ये जर ओळखू शकला नाही तर

साक्षीदार जर ओळख परेडमध्ये आरोपीस ओळखू शकला नाही तर ही फार मोठी चूक नाही. कारण ओळख परेडमधील आरोपीस ओळखणे हा पूरक पुरावा आहे. आरोपीस न्यायालयात खटल्याचे वेळी ओळखणे हा महत्त्वाचा पुरावा असतो. जर आरोपीस न्यायालयीन (खटल्याचे वेळी) साक्ष देताना ओळखले नाही; तर आरोपीस शिक्षा होणार नाही. मात्र ओळख परेडमध्ये आरोपीस ओळखणे हा चांगला पुरावा असतो.

## कैद्याची ओळख कायदा (१९२०) :

शिक्षा झालेल्या गुन्हेगारांचे व इतरांचे फोटो व इतर मोजमापे इ. घेण्यासाठी अधिकार प्रदान करण्याच्या उद्देशाने कैद्याची ओळख कायदा १९२० साली मंजूर करण्यात आला. मोजमापमध्ये बोटाचे ठसे, पायांचे ठसे याचा समावेश आहे.

या कायद्यानुसार ज्या आरोपींना एक वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त शिक्षा कुठल्याही गुन्ह्यात होते किंवा त्यानंतरच्या गुन्ह्यात त्यापेक्षा जास्त शिक्षा होण्यास पात्र होतो अशा गुन्हेगाराची मोजमापे (हाताचे पायांचे ठसे, फोटो इ.) घेण्याची तरतूद आहे.

या कायद्यानुसार ज्या इसमांना एक वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त शिक्षा होऊ शकते, अशा गुन्ह्यात अटक झाली असेल आणि जरी शिक्षा झालेली नसेल तरी ही मोजमापे (बोटांचे ठसे, पायांचे ठसे व फोटो) घेता येतात. जो कोणी इसम त्याची मोजमापे किंवा फोटो घेण्यास विरोध करील किंवा अडथळा आणेल तो इसम कलम १८६ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा करेल. या कायद्यानुसार मोजमापे वा फोटो घेण्यासाठी सर्व तऱ्हेचे उपाय करणे कायदेशीर ठरेल.

जर ज्या कोणी इसमाचे या कायद्यान्वये मोजमापे व फोटो घेण्यात आले असतील आणि जर अशा इसमास खटला न चालविता सोडून देण्यात आले असेल किंवा मुक्त करण्यात आले असेल किंवा निर्दोष सोडण्यात आले असेल तर त्याची मोजमापे व फोटो त्यास परत करणे किंवा नाश करणे कायद्याने गरजेचे आहे. मात्र असा इसम पूर्वी एक वर्ष किंवा जास्त शिक्षा असलेल्या गुन्ह्यात शिक्षा झालेला नसावा.

या कायद्याची अंमलबजावणी करताना एखाद्या इसमाची मोजमापे व फोटो काढल्याजागी व कसे घ्यावेत व जागेबाबत, कुठल्या तऱ्हेची मोजमापे घ्यावी. ती मोजमापे घेतल्याची पध्दत, फोटो घेताना कशा प्रकारचे कपडे परिधान करावे आणि अशा घेतलेल्या मोजमापाच्या फोटोंचे रेकॉर्ड व्यवस्थित ठेवणे, नाहिसे करणे आणि विल्हेवाट कशी लावावी इ. बाबत नियम करण्याचे राज्य सरकारला अधिकार आहेत.

जो कोणी या कायद्याची किंवा नियमांची अंमलबजावणी प्रामाणिक व विश्वासाने करेल किंवा करण्याचा विचार करेल त्याचे विरुध्द कुठलाही दावा किंवा खटला (चौकशी) करता येणार नाही.

■■■■■

# प्रकरण – ९

# वैद्यकीय प्रमाणपत्र व उतरीय तपासणी अहवाल
## (Medical Certificate & Postmortem Notes)

**उद्दिष्टे :**

**[Cr. P.C. Sec. 53, 53 (A), 54, 164 (A)] [I.E.A. Sec. 45]**

Cr. P.C. Sec. 53 – पोलीस अधिकाऱ्यांच्या विनंतीवरून वैद्यक व्यावसायिकाने आरोपीची तपासणी करणे.

Cr. P.C. Sec. 53 (A) – बलात्काराचा आरोप असलेल्या आरोपीची वैद्यक व्यावसायिकाने तपासणी करणे.

Cr. P.C. Sec. 54 – अटक केलेल्या व्यक्तीची वैद्यक व्यावसायिकाने तपासणी करणे.

Cr. P.C. Sec. 164 (A) – बलात्कार झालेल्या व्यक्तीची वैद्यकीय तपासणी.

Cr. P.C. Sec. 45 – तज्ञांची मते.

१. पोलीस तपासात वैद्यकीय अधिकाऱ्यांची (तज्ज्ञाची) मदत कशी होते ते सांगू शकाल.

२. वैद्यकीय अधिकाऱ्याने जखमी/मृताबाबत अभिप्राय दिल्याने तो पुराव्याचे दृष्टीने कसा उपयुक्त आहे ते सांगू शकाल.

शरीराविरुध्दच्या गुन्हयात (प्रकरण ८, १६, १७ व २०) गुन्हा शाबीत होण्यासाठी वैद्यकीय प्रमाणपत्र पुराव्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. अशा गुन्ह्यात पोस्टमॉर्टम नोट्स (उत्तरीय तपासणी अहवाल) किंवा वैद्यकीय प्रमाणपत्र लवकरात लवकर मिळविण्याचा प्रयत्न करावा. जेणेकरून अशा वैद्यकीय प्रमाणपत्रावर विश्वास ठेवून आरोपीला शिक्षा होऊ शकेल. असे प्रमाणपत्र भारतीय पुरावा अधिनियम सन १९७२ चे कलम ४५ प्रमाणे ग्राह्य आहे.

१ बऱ्याच वेळा न्यायालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांची साक्ष होत नाही.

२. वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या जबाबात विसंगती असते. त्यात औषधोपचाराचा वेळ, दिनांक लिहिला जात नाही. ते लिहून घ्यावे.

३. जखमांचे प्रमाणपत्र घेण्यात यावे. अन्यथा त्याचा फायदा आरोपीला होतो.

४. वैद्यकीय अधिकारी व पोस्टमॉर्टम करणारे डॉक्टर या दोघांनी त्यांच्या साक्षीमध्ये मयतास झालेल्या जखमा ह्या त्याचा मृत्यू होण्यास पुरेशा असून, त्या जखमा चाकुने होऊ शकतात असे सांगितले, व त्या गुन्ह्यात चाकू जप्त होता यावरून खुनाचा गुन्हा शाबीत झाला.

५. एका गुन्ह्यात जखमीला वैद्यकीय अधिकाऱ्यासमोर तो बेशुध्दावस्थेत हजर केला असता वैद्यकीय अधिकाऱ्याने केस पेपरवर आरोपीचा इतिहासामध्ये इंजेक्शन दिल्याने फिर्यादी बेशुध्द असल्याचे लिहिले होते. मात्र, तपासात गुंगीचे औषध घातलेले बिस्किट खाल्ल्याचे निष्पन्न झाले होते.

६. काही केसेसमध्ये वैद्यकीय अधिकाऱ्याने आरोपीत इतिहासात प्राणघातक हल्ला लिहिले नाही म्हणून आरोपीला न्यायालयाने निर्दोष सोडले आहे.

७. वैद्यकीय अधिकाऱ्याने मृत्यूचे कारण (Cause of Death) is (shock with multiple injuries) झटका व अनेक जखमा असे दिले मात्र या घटनेत चाकूने भोसकून खून करण्यात आलेला होता.

८. विशेष कार्यकारी अधिकारी यांनी ज्यावेळी जबाब नोंदविला त्यावेळी जखमी महिला ही जबाब देण्याच्या

मनस्थितीत होती अगर कसे या बाबत वेळ, दिनांक व वैद्यकीय अधिकाऱ्याने दुजोरा दिलेला नव्हता.

९. आरोपीचे रक्त नमूनेच न घेतल्याने त्याचा रक्तगट मिळून आला नाही.

१०. तपासी अधिकाऱ्याने नोंदविलेल्या मृत्युपूर्व जबाबावर वेळ नमूद केलेली नव्हती. तसेच वैद्यकीय अधिकाऱ्यानेदेखील वेळ नमूद केलेली नव्हती. यामुळे दोघांच्या साक्षीमध्ये वेळेबाबत तफावत दिसून आली.

११. वैद्यकीय अधिकाऱ्याने फिर्यादीस पडल्यामुळे अशा जखमा होऊ शकतात अशी साक्ष उलटतपासणी करताना दिली.

१२. एका गुन्ह्यामध्ये सुरत (गुजरात) येथील जिल्हा शासकीय रुग्णालयामध्ये औषधोपचार झाला होता. मात्र, अभियोग पक्षाने सदर कागदपत्र मिळविण्याचे कोणतेही प्रयत्न केले नाही. किंवा त्या वैद्यकीय अधिकाऱ्याची साक्षदेखील घेण्यात आली नाही.

१३. फिर्यादीवर उपचार करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासले नाही व यापूर्वी दिलेल्या वैद्यकीय प्रमाणपत्रावर फिर्यादीला तपासल्याची दिनांक, फिर्यादीचे नाव नव्हते व डॉक्टरांची सहीदेखील नव्हती.

१४. फिर्यादीच्या अंगावरील जखमा प्रथम खबरीत नमूद करण्यात आल्या. परंतु फिर्यादीने आरोपीस केलेल्या जखमांचा उल्लेख प्रथम खबरीत केला नाही. त्याची वैद्यकीय तपासणीसुध्दा केली नाही. यावरून आरोपीच्या अंगावरील जखमांसंदर्भात वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केले नाही. व सत्य हकिकत न्यायालयापासून लपवून ठेवली. या कारणास्तव आरोपीस निर्दोष सोडण्यात आले. म्हणून आरोपीच्या अंगावरील जखमांचासुध्दा वैद्यकीय अहवाल घेणे गरजेचे आहे.

१५. पोस्टमार्टममुळे मृत्यू नक्की कोणत्या कारणाने आला हे सांगता येते. तसेच व्हिसेरामुळे मृत्यूचे कारण व कोणते विष घेतले हे नक्की सांगता येते. त्यामुळे पोस्टमार्टेम करून आवश्यक त्या गुन्हयात व्हिसेरा राखून ठेवावा व त्वरित तपासणीकरीता संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठवावा.

# प्रकरण – १०

# न्याय वैद्यक शास्त्र

## Forensic Medicine Science

### उद्दिष्टे :

### परिस्थितीजन्य पुरावा व तज्ञांचा पुरावा :

१) घटनास्थळावरील भौतिक दुवे व संशयित आरोपी यांचा संबंध प्रस्थापित करण्यासाठी न्याय सहायक विज्ञानाचा उपयोग कसा होतो ते सांगू शकाल.

२) पुराव्याच्या दृष्टीने परिस्थितीजन्य पुरावा किती महत्त्वाचा आहे ते सांगू शकाल.

३) परिस्थितीजन्य पुराव्याची साखळी जोडताना न्याय सहायक शास्त्राची कशी मदत घेतात ते सांगू शकाल.

डॉ. एडमंड लोकार्ड या ब्रिटिश शास्त्रज्ञाने १९१० मध्ये न्याय वैद्यक शास्त्रात एक नवीन शोध लावून तपासकामी त्याचा परिणामकारक पुरावा म्हणून उपयोग होऊ लागला.

**लोकार्डचे तत्त्व** – निसर्गत: ज्या वेळेस दोन वस्तू एकमेकांच्या सान्निध्यात येतात, त्या वेळेस त्यांच्यातील घटकांची रंग, रूप, आकार, वास इ. गुण धर्माची देवाण-घेवाण होते. उदा.- फळयावर खडूने लिहिणे, पायाला माती लागणे इ.

निसर्गत: दोन वस्तू एकसारख्या नसतात. प्रत्येकाचे वैशिष्ट्ये वेगवेगळे असते. घटनास्थळी ज्या वस्तू किंवा पदार्थ ज्याचा संबंध संशयित अगर आरोपीशी आला असावा अशा वस्तू मिळतात त्यालाच आपण भौतिक दुवे असे म्हणतो.

### ब) भौतिक दुवे सात प्रकारात विभागण्यात आले आहेत.

| | |
|---|---|
| १) तंतू व तंतूमय पदार्थ | : दोरा, कापूस, केस इ. |
| २) डाग | : रंगाचे डाग, रक्ताचे डाग, वीर्याचे डाग इ. |
| ३) खुणा | : बोटाचे, हाताचे, पायाचे, शस्त्राचे ठसे |
| ४) दस्तऐवज | : टाईप केलेले कागद, हस्तलिखित, वापरलेले पेन, पेन्सिल, कार्बन पेपर |
| ५) स्फोटके | : वापरलेली बंदूक, काडतुसे |
| ६) धूलिकण | : रेतीचे कण, मातीचे कण, लाकडी भुसा |

७) विषासंबंधी : वांती, शौच, खाण्याचे पदार्थ, पेय, रिकामे ग्लास, भांडे, औषधे

तपासकामी काही शास्त्रज्ञांनी नवीन शोध लावून तपासात उत्क्रांती घडवून आणली आहे. असे काही महत्त्वाचे शास्त्रज्ञ व शोध –

१) डॉ. कार्ल लॅण्डस्टेनर यांनी १९०३ साली रक्ताचे गट कोणकोणते हे ठरवून दिले.

२) मॅथ्यू आरफिला यांनी १८७९ मध्ये शरीराच्या भागाचा शोध लावला. (पोट्रेट पध्दतीचा जनक)

१) फ्रान्सिस गाल्टन यांनी १८९२ साली एका इसमाचा ठसा दुसऱ्या इसमाच्या ठशाशी कधीही जुळू शकत नाही, असा शोध लावला असून, त्यांना अंगुली मुद्रा विज्ञानाचे जनक मानले जाते.

२) कर्नल काल्वीन गोदार्ड या ब्रिटिश सैन्यातील अधिकाऱ्याने बॅलेस्टीक सायन्सचा शोध लावला.

एखादी बंदुकीची गोळी त्याच बंदुकीतून उडाली अगर कसे याविषयी अभिप्रायाबाबत, ते महत्त्वाचे ठरते.

३) अल्बर्ट ओस्बार्न या शास्त्रज्ञाने एखादा दस्तऐवज हा न्यायालयामध्ये शास्त्रीय पुरावा होऊ शकतो. हे सिध्द करून दाखविले आहे. त्यांनी सन १९१० साली क्वेश्चन डॉक्युमेंट या नावाचे पुस्तक लिहिले असून हे पुस्तक दस्तऐवज तज्ञांचे प्राथमिक संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोगात येते.

४) लार्सन ॲण्ड किलर यांनी अमेरीकेत सन १९२० मध्ये लाय डिटेक्टरचा शोध लावला. सध्या किलर यांचे किलरस पॉलीग्राफ या उपकरणाचा उपयोग करण्यात येतो.

तपासी अंमलदार यांनी गुन्हा दाखल केल्यानंतर ताबडतोब घटनास्थळी जाऊन घटनेचे सूक्ष्म निरीक्षण करून पंचनामा करणे आवश्यक आहे. त्याबाबतीत खालील मुद्दे महत्त्वाचे आहे.

१. गुन्हयाचे ठिकाणी (घटनास्थळी) सूक्ष्म व बारकाईने निरीक्षण करून परीस्थितीजन्य पुराव्याचे भौतीक दुवे प्राप्त करावे.

२. तपासी अंमलदारांनी घटनास्थळी सूक्ष्म व बारकाईने निरीक्षण करून तेथील भौतिक दुवे नाश पावणार नाहीत, त्यांची हलवाहलव होणार नाही याची दक्षता घ्यावी.

३. घटनास्थळी व्हिडिओ ग्राफर, पोलीस फोटोग्राफर, अंगुली मुद्रा तज्ज्ञ यांना त्वरित पाचारण करावे.

४. घटना पाहणारे साक्षीदार हे न्यायालयात फितूर होऊ शकतात. परंतु घटनास्थळावर मिळालेले परिस्थितीजन्य पुराव्याचे भौतिक दुवे कधीही फितूर होत नाहीत. यामुळे पुराव्याच्या दृष्टीने भौतिक दुवे अतिशय महत्त्वाचे असतात. ("Man may lie but circumstances doesn't)

५. घटनास्थळावरील भौतिक दुव्यांचा (वस्तू व पदार्थाचा) संशयित / आरोपींशी कोणत्या तरी प्रकारे संबंध आलेलाच असतो. म्हणजेच आरोपीचा घटनास्थळावरील अस्तित्वाबद्दल परिस्थितीजन्य पुरावा निष्पन्न झालेला असतो.

६. घटनास्थळी मिळालेले भौतिक दुवे, घटनास्थळाचे पंचनाम्यात नमूद करावे व जप्त करून ताब्यात घ्यावे.

७. जप्त केलेले भौतिक दुवे, तज्ञांचे अभिप्रायाकरिता तात्काळ न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोग शाळेत पाठवावे.

८. विलंबाने पाठविलेल्या मुद्देमालाच्या गुणधर्मात बदल होऊ शकतात. त्यामुळे तज्ञांना विश्लेषण करणे अवघड होते. परिणामी योग्य व अपेक्षित अभिप्राय मिळत नाहीत. आणि या गोष्टीचा आरोपीला निर्दोष सुटण्याकरिता फायदा मिळतो.

९. जप्त मुद्देमाल तज्ञांकडे तपासणीकरिता किती शीघ्रतेने पाठविला आहे या मुद्याला न्यायालयात फार महत्त्व आहे. उशिरा पाठविलेल्या मुद्देमालाबाबत संशय निर्माण होतो व त्याचा फायदा आरोपीस निर्दोष सुटण्याकरिता होतो.

१०. घटनास्थळी मिळालेल्या भौतिक दुव्यावर संशयित आरोपीचे ठसे मिळाल्यास त्याचा उपयोग आरोपी शोधण्यासाठी चांगल्या प्रकारे होतो आणि आरोपी मिळाल्यावर आरोपीचे व घटनास्थळावरील भौतिक दुव्यावरील ठसे एकाच व्यक्तीचे निष्पन्न झाल्याने आरोपीचा घटनास्थळावरील अस्तित्वाबद्दलचा पुरावा निष्पन्न होतो आणि आरोपी तो पुरावा नाकारू शकत नाही.

११. तज्ञांनी दिलेला अभिप्राय हा शास्त्रावर (Science) निश्चितरित्या आधारित असल्याने तो शास्त्रोक्त पुरावा म्हणून ग्राह्य असतो.

१२. परिस्थितीजन्य पुराव्याची एक साखळी तयार होणे आवश्यक आहे. अशा साखळीतील एक कडी जरी दुबळी अथवा कमी पडली तर संपूर्ण पुराव्याबद्दल संशय निर्माण होऊन न्यायालयात गुन्हा सिध्द करणे अशक्य होते. पुराव्याच्या साखळीचे सर्व भाग स्वतंत्रपणे व एकत्रितपणे आरोपीनेच गुन्हा केला आहे, तो गुन्हा इतर कोणीही

केलेला नाही असा निष्कर्ष काढण्यास पूर्णपणे मदत करणारे असावेत.

१७. परिस्थितीजन्य पुराव्यावरून घडलेला गुन्हा आरोपीनेच केलेला आहे व आरोपाबाबत आरोपीस वाजवी व समाधानकारक स्पष्टीकरण देणे शक्य नाही. या बाबी सिध्द करता आल्या पाहिजेत.

१८. परिस्थितीजन्य पुराव्यावरून आरोपीनेच गुन्हा केलेला आहे हे सिध्द करण्याबरोबरच तो निष्पाप नाही हे पण सिध्द व्हावे लागते. म्हणजेच सादर केलेला परिस्थितीजन्य पुरावा निर्णायक स्वरूपाचा असावा लागतो.

१९. सादर केलेल्या परिस्थितीजन्य पुराव्याबद्दल आरोपीकडे स्पष्टीकरण असेल, ठोस पुरावे असतील तरच आरोपीला संशयाचा फायदा मिळू शकतो.

२०. परिस्थितीजन्य पुराव्याची साखळी जोडताना तपासी अंमलदार यांनी न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळेची मदत घेऊन तेथील तज्ञांचे स्पष्ट अभिप्राय घ्यावेत. तसेच परिस्थितीजन्य पुरावा देणाऱ्या साक्षीदारांची मुद्देसूद जबानी घेऊन साक्षीदार व तज्ञांचा पुरावा यांची योग्य ती सांगड घालून न्यायालयापुढे सादर करावा.

न्यायालयात खटला सुरू होण्यापूर्वी तपासी अंमलदार यांनी सरकारी वकिलांशी तपासातील पुरावाबाबत चर्चा करून गोळा केलेल्या परिस्थितीजन्य पुरावा, तज्ञांचा पुरावा यांची मुद्देसूद मांडणी न्यायालयापुढे करावी. म्हणजे आरोपीला शिक्षा होऊन गुन्हे शाबितीचे प्रमाण वाढेल. नाहीतर कितीही चांगला पुरावा असला आणि न्यायालयापुढे मुद्देसूद मांडणी करता आले नाही तर आरोपीस निश्चितच निर्दोष सुटण्यास मदत होईल.

## जिवंत व मृत व्यक्तीची ओळख, लिंग व वयाची ओळख

## IDENTIFICATION OF LIVING AND DEAD PERSON, DETERMINATION OF AGE & SEX

### व्यक्तिगत ओळख (Personal Identity) :

एखाद्या व्यक्तीच्या व्यक्तित्वाची निश्चिती करणे म्हणजे व्यक्तिगत ओळख होय.

कोणत्याही व्यक्तीच्या खऱ्या व्यक्तित्वाची जाणीव करून घेणे किंवा त्याला ओळखणे म्हणजे व्यक्तिगत ओळख किंवा वैयक्तिक ओळख होय. (Identification is the recognition of an individual based on certain physical characteristics which are unique to each individual.) काही विशिष्ट शारीरिक वैशिष्ट्ये वा प्रत्येक व्यक्तीच्या बाबतीत एकमेव असतात, त्यांच्या आधारे व्यक्तिची ओळख ही पटत असते.

आपण समाजात दररोज कित्येक दिवाणी किंवा फौजदारी गुन्हे घडत असलेले पहातो व ऐकतो, कधी कधी गुन्हा घडल्यानंतर गुन्हेगार पळून जातात. गुन्ह्यामुळे ज्या व्यक्तीवर अन्याय झालेला आहे, त्याला न्याय मिळण्याकरिता गुन्हेगाराला पकडून त्याला शिक्षा होणे आवश्यक असते. कित्येक व्यक्तींतून गुन्हेगाराला शोधून काढावे लागते.

खालील गुन्ह्यांत व्यक्तिगत ओळख करणे आवश्यक असते.

| | | |
|---|---|---|
| १) | फौजदारी गुन्हे (Criminal Cases) | १) सैनिक, सैन्यातून नोकरी करीत असताना पळून जातो. |
| | | २) हल्ला, बलात्कार, हत्या इ. फौजदारी गुन्हे करणाऱ्या व्यक्तीची ओळख. |
| | | ३) स्मरणशक्ती नष्ट होणे, वेडेपणा इत्यादी मानसिक आजारग्रस्त व्यक्ती. |
| | | ४) हरवलेल्या लहान मुलांचा शोध. |
| | | ५) नवजात बालकांची अदलाबदल होते. |
| २) | दिवाणी खटले (Civil Cases) | १) खऱ्या व्यक्तीऐवजी एखादी दुसरीच व्यक्ती ढोंग करून मीच संपत्तीचा वारस आहे असा दावा करतो. |

२) विम्याचे रकमेवर आपला हक्क दाखविणे.

३) पेन्शन बंद झाल्यानंतर पुन्हा सुरू करण्याकरिता.

३) **प्रेत किंवा शव (Dead Body)**

१) इमारतीस, घरास किंवा इतर ठिकाणी आग लागून त्यात एखाद्या व्यक्तीचा मृत्यू होतो.

२) स्वत:स आग लावून आत्महत्या केलेल्या मृत व्यक्तीची ओळख.

३) लढाईत, गोळीबारात, दारूगोळा इत्यादींचा स्फोट होऊन त्यात व्यक्ती मरण पावल्यास ओळखणे जरूरीचे असते.

४) रेल्वे, विमान, ट्रक, कार इत्यादींमुळे अपघात घडून त्यात मृत्यू होणे.

५) गळा दाबून, जखमा होऊन किंवा अन्य कारणांनी धोका देऊन एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झालेला आढळून येतो.

४) **शरीराचे अवशेष आणि हाडे (Remnants of body and bones)**

भारतात अतिशय उष्णता असल्यामुळे प्रेत लवकर सडण्याची संभावना असते. ग्रामीण भागातील लोक जवळपास नदी असल्यास प्रेते नदीत सोडतात, गुन्हा केल्यानंतर मृत व्यक्तीचे शरीर जंगलात फेकून दिले जाते किंवा घाईघाईने पुरले जाते. अशावेळी जंगलातील किंवा खेड्याच्या आजूबाजूला असलेली जनावरे प्रेत उकरून शरीर खातात आणि त्यामुळे शरीराचे पुष्कळसे अवयव खाल्ले जाऊन काही अवशेष किंवा अवयव शिल्लक राहतात. शरीर सडलेले असते, अवशेष व हाडे जरी शिल्लक असले तरी ती व्यक्ती कोण हे ओळखणे महत्त्वाचे असते. पोलिसांद्वारे शरीराचे अवशेष, हाडे इत्यादी डॉक्टरांकडे तपासणीकरिता आणले जातात. तपासणी करून डॉक्टरांना आपले मत द्यावे लागते. उदाहरणार्थ मृत शरीर स्त्रीचे, पुरुषाचे किंवा मुलाचे आहे, हाडे मनुष्याची आहेत की प्राण्याची इत्यादिविषयी स्पष्टीकरण द्यावे लागते.

१) जात/वंश (Race)

२) लिंग (Sex)

३) वय (Age)

४) ॲन्थ्रॉपॉमेट्री (Anthropometry) (Galton Method and Dactylography)

५) पायांचे ठसे (Foot Print)

६) क्ष-किरण परीक्षा (Radiographs)

७) रस (सीरम) अभ्यास (Serological Studies)

८) व्यंग (Deformity)

९) व्रण (Scar)

१०) गोंदणे (Tattoo Marks)

११) व्यावसायिक चिन्हे (Occupational Marks)

१२) हस्ताक्षर (Handwriting)

१३) कपडे व दागिने (Cloths and Jewellery Articles)

१४) बोलणे व आवाज (Speech / Voice)

१५) चाल (Gait)

१६) सवयी आणि व्यवहाराच्या रीती (Tricks of manner & habit)

## १) जात (Race) –

पुष्कळदा मृत व्यक्तीचे शरीर बेवारस स्थितीत रस्त्यात, जंगलात, आगगाडीत, नदीत, विहिरीत, तलावात पडलेले आढळते. मृत व्यक्ती कोण असावा, त्याची जात इत्यादींची ओळख करावी लागते. भारतात प्रामुख्याने दोन जाती आढळतात. १) हिंदू, २) मुसलमान. खालील प्रमुख चिन्हांवरून ती व्यक्ती हिंदू आहे किंवा मुसलमान आहे हे कळून येते.

| हिंदू–पुरुष | मुसलमान–पुरुष |
|---|---|
| १) हिंदू पुरुषाचे शिश्नाचे सुपारीवरील त्वचा कापलेली नसते. | १) मुसलमान पुरुषाच्या शिश्नाचे सुपारीवरील त्वचा कापलेली असते. (खतना/सुनता) |
| २) ब्राह्मण व इतर काही जाती गळ्यात जानवे घालतात. | २) जानवे घालत नाही. |
| ३) गळ्यात तुळशीची किंवा रुद्राक्षाची माळ आढळते. | ३) अशी माळ घालत नाहीत. |
| ४) कपाळावर चंदन–कुंकू–गंध इत्यादी लावलेले असते. | ४) नमाज पठण असल्यामुळे त्यांच्या कपाळावर मध्यभागी, गुडघ्याचे वाटीवर निशाणी आढळून येते. |
| ५) हिंदू लोकात डोक्याच्या केसामध्ये शेंडी असते. | ५) अशा प्रकारे शेंडी ठेवीत नाहीत. |
| ६) कान छेदलेले असतात. | ६) काही व्यक्तीत डाव्या बाजूच्या कानात छिद्र केलेले दिसून येते. |

| हिंदू–स्त्री | मुसलमान–स्त्री |
|---|---|
| १) शरीरावर कित्येकदा गोंदलेले आढळते. | १) गोंदलेले आढळत नाही. |
| २) नाकाच्या डाव्या नाकपुडीत नथ घालण्याकरिता छिद्र केलेले असते. कधी कधी मधल्या पडद्यातही आढळून आले आहे. | २) फक्त नाकाच्या मधल्या पडद्यातच छिद्रे पाडलेली असतात. |
| ३) दोन्ही कानात रिंग घालण्यास एक छिद्र असते. | ३) दोन्ही कानात अनेक छिद्रे असतात. |
| ४) सौभाग्यवती स्त्रिया डोक्याच्या केसाच्या मध्यभागी शेंदूर किंवा कुंकू लावतात. | ४) शेंदूर किंवा कुंकू वापरत नाहीत. |
| ५) सौभाग्यवती स्त्रिया काचेच्या बांगड्या वापरतात. विधवा वापरत नाहीत. | ५) साधारणत: अशीच प्रथा आढळते, विधवा बांगड्या वापरत नाहीत. |
| ६) जुन्या प्रथेतील विधवा स्त्रिया डोक्यांचे केस काढतात. हल्ली ही प्रथा बंद झालेली आहे. तरीपण नवस म्हणून तरुण स्त्रिया सुद्धा देवाला केस वाहतात. उदा. तिरुपती देवस्थान. | ६) डोक्याचे केस काढत नाहीत. |
| ७) पायाचे बोटात चांदीचे जोडवे वापरतात. | ७) वापरत नाहीत. |

## २) लिंग (Sex) –

बाह्य परीक्षेवरून जीवित किंवा मृत व्यक्ती कोणत्या लिंगाची, म्हणजे स्त्री आहे की पुरुष ? मुलगा किंवा मुलगी आहे हे ओळखले जाऊ शकते. काही पुरुष व स्त्रिया उभय लिंगी (Hermophrsdite) असतात. कधी कधी सडलेल्या प्रेताची किंवा सांगड्याचे लिंग ओळखण्याची आवश्यकता भासते.

**पुरुषांमध्ये** – अंडकोष (Testis), पुरस्थिता ग्रंथी (Prostate gland), शिश्न (Penis), ओठावर मिशा, दाढीवर

केस असतात. बांधा मजबूत असून आवाज कडक असतो.

**स्त्रियांत** – रज: पिंड (Ovary), गर्भाशय (Uterus), योनी (Vagina) आढळून येते. त्यांचा बांधा नाजूक असून आवाज कोमल असतो. छातीवर स्तन असतात. दाढी मिशा नसतात.

**सडलेल्या शवात लिंगाची ओळख** – शव सडले असले तरी स्त्रियांचे रज:पिंड आणि पुरुषाच्या पुरस्थिता ग्रंथी पुष्कळ काळपर्यंत टिकून राहतात. त्यावरून शव पुरुषाचे किंवा स्त्रीचे आहे हे ओळखले जाऊ शकते.

**सांगाड्याची लिंग ओळख (Sex- identity of Skeletal Remains) :**

**हाडे** – वयस्क स्त्रीची हाडे पुरुषापेक्षा लहान व हलकी असून स्नायू चिकटण्याकरिता बाहेर निघालेले भाग (प्रवर्ध) (Processes) कमी प्रमाणात असतात. तसेच उंचवटेसुद्धा (tubercles) कमी असतात.

**कवटी (Skull)** – स्त्रियांची कवटी पुरुषांच्या कवटीपेक्षा हलकी व लहान असते. कवटीची पोकळी पुरुषाचे कवटीपेक्षा लहान असते.

**चेहरा (Face)** – स्त्रियांच्या चेहऱ्याची हाडे नाजूक व लहान आढळतात, विशेषत: वरचा व खालचा जबडा.

**छातीचा पिंजरा (Thoracic Cage)** – स्त्रियांचे छातीचा पिंजरा आखूड व रुंद असून छातीचे हाड आखूड असते. बरगड्या पातळ असून त्यात वक्रता जास्त आढळते.

**कटीर पोकळी (Ischio Pubic Fossa)** – स्त्रियांची कटीर पुरुषापेक्षा रुंद व उथळ असते. जघनास्थिची कमान रुंद व गोल असून गवाक्षरंभ (ऑब्टूरेटर फोरॅमेन) त्रिकोणी व पुरुषापेक्षा लहान असते. तसेच त्रिकास्थ वरच्या बाजूला कमी वक्र, आखूड व रुंद असते.

**मृत व्यक्तीचा फोटो** – मृत व्यक्तीचा फोटो घेतल्यास लिंगाची ओळख होण्यास मदत होते, तसेच त्याच्या शारीरिक बांध्यावरून वयाची निश्चिती करता येते. फोटोच्या माध्यमातून अनेक व्यक्तींद्वारे ओळख पटण्यास सहायता मिळते.

**३) वय (Age) - Determination of Age :**

वय निश्चित करण्याकरिता डॉक्टरकडे आरोपी व बलात्कारित स्त्री किंवा मुलगी पाठविली जाते. अशावेळी वयाचा अंदाज सांगावा लागतो. जन्मापासून २२ ते २५ वर्षे वयापर्यंतच वयाची निश्चिती केली जाऊ शकते. त्यानंतर फक्त अंदाज व्यक्त करता येतो.

**खालील बाबी वयाची निश्चिती करण्यास मदत करतात. (Age estimation)**

अ) दात

ब) अस्थिविकास

क) लैंगिक व गौण चिन्हे.

अ) दात–

सुरुवातीला लहान मुलांना जे दात येतात त्यांना अस्थायी दात असे म्हणतात. त्यांची संख्या २० असते. काही वर्षांनी ते दात पडून त्यांचे जागी दुसरे दात येतात. त्यांची संख्या ३२ असून त्यांना स्थायी दात असे म्हणतात.

**Classification and Eruption of Deciduous teeth (Milk Teeth)**

| Tooth | | Eruption |
|---|---|---|
| मधले कृन्तक (पटाशीचे) | | |
| खालचे | : | 6 to 8 months |
| वरचे | : | 7 to 9 months |

| | | |
|---|---|---|
| बहिर्कृन्तक | | |
| खालचे) | : | 7 to 9 months |
| वरचे | : | 10 to 12 months |
| प्रथम दाढ | : | 12 to 14 months |
| सुळा | : | 17 to 18 months |
| द्वितीय दाढ | : | 20 to 30 months |

**Classification and Eruption of Permanent teeth :**

| दंत (दात) | | Eruption |
|---|---|---|
| प्रथम दाढ | : | 6 to 7 years. |
| कृन्तक | : | 6 to 8 years. |
| बहिर्कृन्तक | : | 7 to 9 years. |
| प्रथम द्विशिरस्क | : | 9 to 11 years. |
| द्वितीय द्विशिरस्क | : | 10 th 12 years. |
| सुळा | : | 11 to 12 years. |
| द्वितीय दाढ | : | 12 to 14 years. |
| तृतीय दाढ | : | 17 to 25 years. |

त्यांच्यातील फरक

| तात्पुरते दात | कायमचे दात |
|---|---|
| आकार हलके, लहान, अरुंद | जड, मजबूत, रुंद |
| मुकूट - पांढरा रंग | हस्तीदंती पांढरा |
| मान : जास्त संकुचित | कमी संकुचित |
| चोटी : | ------- |

स्थायी दातापेक्षा अस्थायी दात पांढरे शुभ्र (China White) असतात. स्थायी दात हस्तिदंताप्रमाणे पांढरे (Ivory white) आढळतात.

म्हातारपणी दातांची स्थिती जीर्ण होते, कारण वयोमानाप्रमाणे त्यातील पोषक तत्त्व कमी होत जाते, त्यामुळे दात पडू लागतात, हिरड्या (Gums) आकुंचन पावतात.

**ब) अस्थिविकास (Ossification of Bones) :**

लांब हाडांचा मधला भाग (Shaft-Diaphysis) आणि वरचा भाग (Epiphysis) यातील जुळण्याच्या काळानुसार वयाची निश्चिती करता येते. संधी होण्याच्या काळाचे ज्ञान क्ष-किरणांचे सहाय्याने केले जाते. अस्थींचा पूर्ण विकास झाल्यास वयाची निश्चिती अस्थिवरून केली जाऊ शकत नाही.

**काही मुख्य हाडांचा विकास -**

१) सुमारे दीड वर्षाचे वय झाल्यानंतर लहान मुलांची टाळू (Closer of ant. frontanelle) भरते.

२) १४ ते १६ वर्ष या वयात जंघास्थित (Tibia), अनुजंघास्थि (Fibula) ह्या हाडांचे वरचे टोक कांडाशी

(Shaft) जुळते.

३) १६ ते १७ वर्षाचे वयात अंतःप्रकोष्ठास्थिचे (Olecranon ते Ulna) कांडाशी जुळते.

४) १६ ते १७ वर्षाचे अवधीत बहिःपकोष्ठास्थि (Radius) ह्या हाडांचे डोक्यांचा भाग व ह्युमरस बाहवास्थि (Lower end of Humerus) ह्या हाडाचे खालचे टोक कांडाशी जुळते.

५) १८ ते १९ व्या वर्षी अर्वास्थि (Lower end of Femur) ह्या हाडांचा वरचा भाग त्याच्याशी जुळतो.

६) २५ वर्षाचे वय होईपर्यंत लांब हाडांचे वरचे भाग (Epiphysis) आपल्या जवळच्या कांडाशी (Shaft) भागांशी संधी करतात.

७) छातीच्या हाडाचे तुकडे (Tubercles of rib) खालून वर याप्रमाणे १४ ते २५ या वयात आपसात संधी करतात.

८) ४० वर्षे वयात छातीचे हाडाचा मॅन्युब्रियम (Manubrium) हा भाग त्याचे कांडाशी शरीराशी जुळतो.

९) कवटीच्या रेषा (Sutures) ३० ते ३५ वर्षाचे वय झाल्यास हळूहळू नाहीशा होऊ लागतात तर वृद्धावस्थेत पूर्ण नष्ट होतात.

**वयाचे न्यायवैद्यक महत्त्व (Medicolegal importance Age determination) :**

| | |
|---|---|
| १) गर्भावस्थेतील ७ वा महिना | :- गर्भावस्थेतील ७ व्या महिन्यापूर्वी चैतन्याची अल्पता. |
| २) ७ वर्ष | :- ७ वर्षाखाली गुन्ह्याची जबाबदारी नसते. |
| ३) ७ ते १२ वर्ष | :- गुन्ह्याची प्रवृत्ती व जाण पाहून/समज पाहून गुन्ह्याची जबाबदारी ठरते. |
| ४) १२ वर्ष | :- वैद्यकीय तपासणीकरिता संमती देऊ शकते. |
| ५) १५ वर्ष | अ) कारखान्यात कामगार म्हणून काम करण्यास वैद्यकीयदृष्ट्या सक्षम. |
| | ब) पत्नीशी संभोग करण्यासाठी देऊ शकतो. |
| ६) १६ वर्ष | अ) स्त्रीशी संभोग करण्यासाठी संमती मिळू शकते. |
| | ब) कायदेशीर पालकांपासून अपहरण होऊ शकते. |
| ७) १८ वर्ष | अ) व्यक्ती मोठा होणे. (पूर्ण वाढ) |
| | ब) स्त्रीचे विवाहाचे वय |
| | क) वयाची किशोरावस्था स्त्री/पुरुष दोघेही |
| | ड) गंभीर दुखापत व मृत्युचे कारणाबद्दल निश्चित पुराव्यांचे कारण देऊ शकते. |
| | इ) मुलीकरिता कायदेशीर पालकांपासून अपहरण होऊ शकते. |
| | फ) वेश्याव्यवसायासाठी मुलीचे अपहरण होऊ शकते. |

**क) लैंगिक चिन्हे (Secondary Sex Characters) :**

Secondary sex differences with age दुय्यम लैंगिक चिन्हे (वयासहित)

| विशेषता | पुरुष | स्त्री |
|---|---|---|
| छातीवरील केस | उपस्थित | अनुपस्थित |
| जांघेतील केस | १४ वर्ष | १३ वर्ष |
| दाढी मिशा | १६ ते १८ वर्ष | अनुपस्थित |

| | | |
|---|---|---|
| आवाज | कमी तीव्रता | अधिक तीव्रता |
| स्तन | अविकसित | विकसित १२-१४ वर्ष |
| रजप्रवृत्ती | --------- | १२ ते १४ वर्ष |
| गळघाडीचे हाड | विकसित | अविकसित |
| Genitals | शिस्न | योनी |

**४) मानववंश शास्त्र (Anthropometry) :**

सराईत गुन्हेगारांचे बाबतीत ही पद्धती अंमलात आणली जाते. याचे दोन प्रकार असतात.

अ) बर्टीलॉन पद्धती

ब) गाल्टन पद्धती

**अ) बर्टीलॉन पद्धती (Bertillon System) :**

ही पद्धती बर्टीलॉन ह्या शास्त्रज्ञाने शोधून काढली. ह्यांच्या तत्त्वानुसार २१ वर्षाचे वयानंतर सांगाड्याचे आकारात फरक पडत नाही. प्रत्येक मनुष्याच्या अवयवांच्या लांबी-रुंदीत फरक आढळून येतो. या पद्धतीत व्यक्तीच्या काही अवयवांचे मोजमाप केले जाते व त्यावरून त्याची ओळख पटते. विशेषत: डोक्याची लांबी, रुंदी, डाव्या हाताचे मधले बोट, डाव्या पायाची लांबी, डाव्या अग्र उपबाहूची लांबी (forearm) व काही व्यक्तीच्या उजव्या कानाची लांबी मोजली जाते.

**चेहरेपट्टी व रंग** – पृथ्वीतलावरील व्यक्ती काळे, गोरे, सावळे इत्यादी वेगवेगळ्या रंगांचे आढळून येतात. व्यक्तीला ओळखण्यास त्याच्या रंगाची फार मदत होते. गुन्हा करताना त्याला पाहिले गेले असेल तर पहाणारा त्याचे रंगावरून त्याला ओळखू शकतो.

रंगाप्रमाणेच त्याचा चेहरा व आकृती सुद्धा महत्त्वाची असते. प्रत्येक व्यक्तीच्या चेहऱ्याची ठेवण वेगवेगळी असते. कधी कधी काही बाबतीत साम्य आढळत असले तरी सूक्ष्म निरीक्षणाने काही चिन्हावरून त्याचे वेगळेपण स्पष्ट दिसून येते. गुन्हेगार आपला चेहरा कृत्रिमरीत्या बदलण्याचा प्रयत्न करतात. तपासणी करताना नाकाची ठेवण, डोळे, दात, हनुवटी इत्यादींचे वर्णन काळजीपूर्वक लिहावे. काही व्यक्तींचे डोळे घारे तर काहींचे काळे असतात. सर्व वर्णन सूक्ष्म निरीक्षण करून लिहावे.

**केस** – केसावरून व्यक्तीची ओळख पटवता येते. मरणानंतर केस लवकर सडत नसल्यामुळे ते नष्ट होत नाहीत. बेवारस शव किंवा सांगाडा डॉक्टरकडे तपासणीकरिता पाठविला जातो, तेव्हा केसांची सुद्धा तपासणी करून वर्णन लिहावे लागते. अशा वेळी केसांचा रंग, प्रकार, लांबी इ. ची माहिती काळजीपूर्वक लिहावी.

आपला अपराध लपविण्याकरिता अपराधी पूर्वीच्या केसांचा रंग बदलतात. कृत्रिम रंग देऊन आपले अस्तित्व लपविण्याचा प्रयत्न करतात. कृत्रिम रंगाने रंगविलेल्या केसात एकरूपता आढळत नाही. सापडलेल्या केसांची शरीरावरील केसांची तुलना करून पहावी. संशय असल्यास केस कापून, नवीन केस येईपर्यंत पोलिसांचे ताब्यात ठेवले जाऊ शकते. केसांचा रंग पहातांना काही धंद्यात केसांचा रंग बदलतो हे लक्षात ठेवणे आवश्यक असते उदा. तांब्याचे कारखान्यात काम करणाऱ्याचे केसांचा रंग हिरवट तर निळीच्या धंद्यात केसांचा रंग निळसर होतो.

**ब) गाल्टन पद्धती (Galton Method) : बोटांचे ठसे आणि पायांचे ठसे (Dactylography) :**

या पद्धतीत बोटांच्या उंचवट्यांचे ठसे पांढऱ्या कागदावर छपाईच्या शाईने घेतले जातात व सूक्ष्म काचेने तपासले जातात. त्यांच्या तत्त्वानुसार लहानपणापासून तर म्हातारपणापर्यंत प्रत्येक मनुष्याचे ठसे कायम राहतात, त्यात फरक पडत नाही. शव सडून बोटे गळल्यानंतर ते नाहीसे होतात. प्रत्येक व्यक्तीच्या ठश्यात फरक असतो. एका व्यक्तीचे ठसे दुसऱ्या

व्यक्तीच्या ठश्यांशी जुळत नाहीत. ठसे घेण्यापूर्वी बोटे साबणाने स्वच्छ धुतली जातात. कुष्ठरोग्याचे ठसे घेऊ नयेत. संसर्गजन्य रोग्याचे त्याचा रोग बरा होईपर्यंत ठसे घेतले जात नाहीत. निरीक्षणाने असे सुद्धा आढळून आलेले आहे की, जुळ्या मुलांच्या बोटांचे ठसे सारखे नसतात.

**बोटांचे ठसे घेण्याचे दोन प्रकार असतात**

१) साधे ठसे (Plain Prints)

२) गोलाकार ठसे (Rolled Prints)

साधे ठसे नेहमीच्या पद्धतीप्रमाणेच घेतले जातात, परंतु गोलाकार ठसे हाताच्या नखांच्या एका बाजूपासून दुसऱ्या बाजूपर्यंत फिरवून घेतले जातात. त्यामुळे बोटांच्या ठशांची चिन्हे जास्त प्रमाणात उमटलेली दिसतात.

**बोटांच्या ठशांचे महत्त्व :**

१) अज्ञात शवाची ओळख

२) हरवलेल्या व्यक्तीची ओळख

३) गुन्हेगाराचे हात गुन्हा करताना तेल, ग्रीस, रक्त इत्यादींनी माखले जाऊन दुसऱ्या (घड्या) पडून त्याचे ठसे उमटू शकतात. त्यांची जुळवणी संशयित अपराध्याच्या ठश्यांशी केल्यास खऱ्या अपराध्याची ओळख पटू शकते.

४) शासकीय नोकरी – शासकीय कामकाजात उपयुक्त उदा. सेवापुस्तकातील बोटांचे ठसे.

५) अशिक्षित मनुष्याचे सही ऐवजी त्याचा अंगठा घेतला जातो.

५) **पायाचे ठसे (Foot Prints) :**

गुन्हेगाराच्या पायाचे ठसे घेतले जातात. त्यावरून पोलीस तपासात मदत होते. गुन्हेगाराची ओळख या पद्धतीमुळे पटू शकते. तपासणी करताना पायावर असलेले व्यंग, व्रण ठसे इत्यादीचे सूक्ष्म निरीक्षण करून लिहावे. बोटांचे ठसे कसे आहेत? चालण्याची पद्धत कशी आहे, तळव्याला छिद्रे आहेत काय, इत्यादी पाहावे. वाळूवर उमटलेले ठसे मोठे असतात. पायाच्या ठशावरून तो धावत गेला किंवा चालत गेला हे कळून येते.

काही प्रसूतिगृहात मूल जन्मल्यानंतर त्याच्या पायांचे ठसे घेऊन ठेवतात त्यामुळे चुकीने लहानमुलांची अदलाबदल झाली किंवा ओळखीची आवश्यकता पडली तर पायाचे ठशावरून ओळख पटविली जाऊ शकते.

६) **क्ष–किरण परीक्षा (Radiographs)** - जिवंतपणीच्या क्षकिरण प्रमिंची मरणोत्तर क्षकिरण प्रमिंफशी तुलना केली जाते. तसेच वय ठरविणेसाठी पण उपयोगी पडते.

७) **Serological Studies** - रसविज्ञान–समगट, लिंगसुत्रे, गुणसूत्रेची तपासणी केली जाते.

८) **व्यंग (Deformity)** – शरीरात असणाऱ्या व्यंगामुळे व्यक्ती ओळखली जाऊ शकते. जीवित व्यक्तीची तसेच शवाची तपासणी करतांना ही व्यंगे काळजीपूर्वक तपासावीत. व्यंगे आनुवंशिक असू शकतात किंवा आयुष्यात केव्हाही घडून येऊ शकतात. टाळूत भेग असणे, ओठाचे मध्यभागी भेग (Hare lip), पायाला ११ किंवा १२ बोटे, तीळ इत्यादी आनुवंशिक, तर अपघातानंतर पाय, हात, डोळे अधू होणे इत्यादी व्यंगे निर्माण होतात. काही व्यक्तींचे कुबड निघालेले असते.

९) **व्रण (Scar)** – अंगावरील व्रण व्यक्तीची ओळख पटविण्यात मदत करतात. तीक्ष्ण हत्याराने झालेले व्रण सरळ रेषेप्रमाणे तर ठेचलेल्या व मुकामार जखमेचे व्रण रुंद असतात. लहानपणी झालेल्या जखमेचा व्रण वयोमानाप्रमाणे वाढत जातो. जळाल्यामुळे किंवा भाजल्यामुळे झालेले व्रण मोठे व अनियमित असतात. बंदुकीच्या गोळीने झालेले प्रवेश व निर्गमाचे व्रण अनियमित आकाराचे असतात. जळालेल्या जखमांवर केस उगवत नाहीत. नवीन व्रणाचा रंग

लाल होऊन त्यात वेदना असते. हळूहळू त्याचा रंग बदलून तो तपकिरी होतो व शेवटी पांढरा होतो, व्रणाचे वर्णन करताना खालील माहिती घ्यावी.

१) व्रणाची
२) व्रणाचा आकार
३) व्रणाची आकृती
४) व्रणाचा रंग
५) व्रणाचा मऊपणा-कडकपणा.

**व्रणाचे न्यायवैद्यकीय महत्त्व**

१) व्यक्तीची ओळख पटण्यास मदत होते.
२) व्रणाचे आकार व प्रकारावरून ते कोणत्या शस्त्राने झाले असावेत हे कळून येते.
३) संशयित व्यक्तीच्या अंगावरील व्रण व अपराध करताना झालेल्या जखमेचा व्रण जुळवून पहाता येतो. त्यामुळे अपराधी पकडला जातो.

१०) **गोंदणे (Tattoo marks)** – कोरकू, गोंड इत्यादी आदिवासी तसेच इतर काही जातीत अंगावर गोंदवून घेण्याच्या प्रथा आढळतात. स्त्रियांचे हनुवटीवर, कपाळावर, गालावर, हातावर ही चिन्हे आढळतात. जगात पुष्कळ जमातीत ही प्रथा दिसून येते. माणसे हातावर देवाचे, जनावराचे, प्रेयसीचे नांव गोंदवून घेतात. स्त्रियांनी सुद्धा आपले हातावर पतीचे, प्रियकाराचे नाव गोंदवून घेतलेले आढळते. वर्णन करताना त्याची आकृती, रंग आकार, स्थान इत्यादीचे वर्णन काळजीपूर्वक लिहावे. दोन व्यक्तीच्या गोंदण्यात साम्य असू शकते, परंतु दुसऱ्या चिन्हावरून ओळख केली जाते. शव सडल्यानंतरही चिन्ह शिल्लक राहते. खोल गोंदले गेले असल्यास लसिका ग्रंथीवर प्रभाव पडलेला आढळून येतो. अपराधी आम्लाने जाळून किंवा त्वचा कापून ही चिन्हे मिटविण्याचा प्रयत्न करतात. अशावेळी व्रण निर्माण होऊ शकतो. एका चिन्हांवर दुसरे चिन्हसुद्धा काढल्याचे उदाहरण सापडते. गोंदण्यावरून व्यक्तीचे नाव कळून येते.

११) **व्यावसायिक चिन्हे** – मनुष्याच्या व्यवसायाप्रमाणे त्याचे शरीरावर काही चिन्हे निर्माण होतात व त्यावरून जीवित किंवा मृत व्यक्तीचा व्यवसाय, जात इत्यादींची ओळख होते. उदा. पाणी भरणाऱ्याच्या खांद्यावर कावड वाहत असल्यामुळे घट्टे पडलेले असतात. वजन करणाऱ्याच्या उजव्या हातावर वारंवार तराजू धरल्यामुळे ती जागा कडक झालेली आढळून येते. चांभाराच्या छातीच्या खालच्या भागात सतत दाब पडत असल्यामुळे छोटा खळगा तयार झालेला असतो. शिंप्याच्या डाव्या हाताच्या मधल्या बोटावर छिद्रे आढळतात.

१२) **हस्ताक्षर** – घटनास्थळावर सापडलेली डायरी किंवा इतर साहित्यावरून अपराधाच्या हस्ताक्षराची जुळवणी केल्यास अपराधी व्यक्ती किंवा इतर मनुष्याची ओळख होते. याची परीक्षा हस्ताक्षरतज्ञ करू शकतो. मानसिक रोग, लकवा, बोटांचा कंप इत्यादी रोगात हस्ताक्षरात फरक पडतो.

१३) **कपडे व दागिने** – कपडे व दागिने व्यक्तिगत ओळखीस मदत करतात. अंगावर असलेले कपडे, घड्याळ, दागिने, खिशात सापडलेली वस्तू, भेटकार्ड इत्यादीवरून ओळख पटते. ह्या सर्व वस्तू जपून ठेवाव्या. तपासताना कपड्यावर टेलरचे व धोब्याचे निशाण, रक्ताचे, वीर्याचे डाग असू शकतात.

१४) **बोलणे व आवाज** – प्रत्येक व्यक्तीची बोलण्याची तऱ्हा व आवाज वेगवेगळा असतो व त्यावरून ही व्यक्ती कोण असावी ह्याचा अंदाज लावला जातो व हा अंदाज बहुधा खरा निघतो. अपराध करताना एखाद्याने त्याचा आवाज ऐकला असेल तो साक्षीदार अपराध्याला ओळखू शकतो. काही व्यक्ती नाकातून तर काही अडखळत बोलतात. काहींचा आवाज तोतरा तर काहींचा जोराचा व कर्कश असतो.

१५) **चाल** – व्यक्तीच्या चालण्याच्या तऱ्हेवरून तो ओळखला जाऊ शकतो. काही व्यक्तींची विशिष्ट अशी चाल असते.

अपघातामुळे एखाद्याचा पाय मोडला असेल तर तो लंगडत चालेल. अर्धांगवात इत्यादी काही रोगात चाल बदललेली आढळते. दिवाणी दाव्यात कर्मचाऱ्याने मालकाविरुद्ध भरपाईकरिता दावा केला असेल तर डॉक्टरला मत विचारले जाते. त्यावेळी अपघाताने चालण्यात फरक झाला किंवा पूर्वीचाच होता ह्याबद्दल मत द्यावे लागते. पूर्व इतिहास विचारून मत द्यावे. अपराध करताना एखाद्या व्यक्तीने गुन्हेगाराला पाहिले असल्यास त्याचे चालीवरून त्याला हा साक्षीदार ओळखू शकतो व गुन्हा शबित केला जातो.

१६) **सवयी व व्यवहाराच्या रीती** – लहानपणापासून जडलेल्या सवयी व राहणीवरून मनुष्याला ओळखले जाऊ शकते. उदा. डाव्या हाताने लिहिणे, खांदे उडवित चालणे, बोलणे, बोलतांना चेहऱ्याच्या स्नायूंना झटका देणे इत्यादी.

## मृत्यू व त्याचे न्यायवैद्यक महत्त्व, कारणे, प्रकार (DEATH AND ITS MEDICOLEGAL IMPORTANCE, CAUSES, TYPES)

## मृत्यू व त्याचे न्यायवैद्यकीय महत्त्व

### मृत्यू म्हणजे काय?

मानवी शरीरातील मेंदूक्रिया, हृदयक्रिया आणि श्वसनक्रिया पूर्णपणे थांबून शरीरातील पेशींचा टप्प्याटप्प्याने मृत्यू झाल्यामुळे जी अवस्था निर्माण होते. त्या अवस्थेला मृत्यू असे म्हणतात.

**मृत्यूच्या अवस्था (Stages of Death) :**

१) **दैहिक मृत्यू (Somatic Death) :–** मानवी शरीराचे जीवन व स्वास्थ्य ज्यांचेवर अवलंबून आहे असे मुख्य अवयव मेंदू, हृदय, फुफ्फुसे (जीवनत्रयी) ह्यांचे कार्य पूर्णपणे बंद होते, त्याला दैहि मृत्यू असे म्हणतात. यात शरीरातील सर्व स्नायू शिथिल होतात परंतु विशिष्ट प्रकारच्या पेशींचा मृत्यू होत नाही व शरीर गरम राहते, त्यामुळे यांत्रिक किंवा विद्युत उद्दीपनाने त्यात उत्तेजना निर्माण केली जाऊ शकते.

२) **आण्विक मृत्यू (Molecular Death) :–** अशा प्रकारच्या मृत्यूत शरीरातील पूर्ण पेशींचा आणि पेशीजालाचा पूर्णत: मृत्यू होतो. हा मृत्यू शरीराची जीवनक्रिया थांबल्यानंतर काही वेळाने होतो. यात यांत्रिक किंवा विद्युत उद्दीपनाने चेतना निर्माण केली जाऊ शकत नाही. शरीर थंड होते आणि बाह्य वातावरणातील तापमानाबरोबर शरीराचे तापमान येते.

## मृत्यूच्या रिती/मार्ग (Modes of Death)

मनुष्याचा मृत्यू स्वाभाविक किंवा अस्वाभाविक यासारख्या कारणाने होत असतो, त्याचे ३ मार्ग असतात.

१) कोमा (Coma) – (कायमची बेशुद्धी)

२) सिंकोप (Syncope) – (हृदयावरोध)

३) अस्फेक्सिया (Asphyxia) – (श्वसनावरोध)

I) **कोमा** – काही कारणामुळे किंवा रोगामुळे मेंदूचे कार्य पूर्णपणे स्थगित होऊन कायमस्वरूपी मूर्च्छा आणि कायमची बेशुद्धी येते, त्याला कोमा असे म्हणतात व त्यातच रोग्याचा मृत्यू होतो.

कारणे –

अ) डोक्याला मार लागून मेंदूला इजा होणे.

ब) मेंदूवरील आवरणांना जखम किंवा रोग होणे.

क) मेंदूला धक्का बसणे, अस्थिभंग होऊन मेंदूत रक्तस्राव होणे.

ड) मेंदूत गळू होणे (Brain tumour) किंवा नवीन मांस वाढणे (New growth).

इ) मेंदूतील धमनी अरुंद होणे.

ई) मेंदूतील धमनीचा विस्तार होऊन ती फुटणे.

उ) अफू, मद्य, इत्यादी विषांचा प्रभाव मेंदूवर पडून मृत्यू होणे.

ए) यकृत, मूत्रपिंड यांच्या काही रोगातील विष शरीरातील रक्तात भिनल्यानंतर त्याचा परिणाम मेंदूवर होऊन मृत्यू होऊ शकतो. उदा. युरेमिया, मधुमेह.

**चिन्हे :**

मेंदूवर प्रभाव पडताच सुरुवातीला मूर्च्छा (Stupor) येते. रोगी काही क्षण असंबंधित बोलू शकतो. प्रतिक्षिप्त क्रियांना (Reflexes) प्रतिसाद देत नाही. स्नायूत अशक्तपणा येऊन अचेतना निर्माण होते, नंतर पूर्ण बेशुद्धी येते.

**कोमा : मरणोत्तर तपासणीचे स्वरूप (Post Mortem Appearances) :**

१) मेंदू व मेंदूची आवरणे रक्तसंचययुक्त असतात.

२) कवटीच्या हाडांचा अस्थिभंग व कवटीवर जखमा, मेंदूतील जखमांमुळे सतत रक्तस्राव झाल्यामुळे कवटीच्या पोकळीत रक्ताचे गोळे जमलेले, मस्तिष्कावरणात किंवा मेंदूच्या निरनिराळ्या भागात रोगामुळे झालेला रक्तस्राव आढळतो.

३) हृदयाचे उजव्या बाजूत रक्त भरलेले आणि डावे रिकामे आढळते.

४) फुफ्फुसे आणि नीला रक्ताने भरलेल्या असतात.

**II) सिंकोप** – हृदयाचे रक्ताभिसरण कार्य कोणत्याही कारणाने स्थगित झाल्यामुळे आलेल्या मृत्यूला सिंकोप किंवा हृदयावरोध असे म्हणतात.

**कारणे–**

अ) हृदयाच्या झडपांचे आजार, करोनरी, रोहिणींचे आजार, हृदयाच्या स्नायूंचे आजार, इ.

ब) कधी कधी शरीराचे आतील अवयवातून अकस्मात व पुष्कळ प्रमाणात रक्तस्राव होऊन झालेल्या रक्तस्रावामुळे मृत्यू घडून येतो. उदा. एखादा अस्थिभंग होऊन यकृत, प्लीहा इ. वर मार लागून रक्तस्राव होणे, शरीरातील मोठी रक्तवाहिनी फुटून त्यातून पुष्कळ प्रमाणात रक्त जाणे इत्यादी.

क) भयाघात (Vagal Shock) अचानक भीती वाटणे, डोक्यावर अचानक मार लागणे, पोटाचे खळग्यावर अचानक मार, इ. कारणांमुळे मृत्यू होतो.

**चिन्हे –**

अ) डाव्या छातीत दुखणे.

ब) शरीरावर घाम येणे.

क) डोके दुखणे.

ड) डोळ्यांना अंधूक दिसणे.

इ) तीव्र बेचैनीमुळे हवेची अत्यंत आवश्यकता जाणवते, त्यामुळे रोगी श्वासोच्छवास जोराने घेत असतो. रोगी शेवटपर्यंत शुद्धीवर असतो आणि अचानक हृदय बंद पडून त्याचा मृत्यू होतो.

**सिंकोप : मरणोत्तर तपासणीचे स्वरूप**

अ) रक्ताल्पतेमुळे (Anaemia) मृत्यू झाला असल्यास, हृदयाचे कप्पे आकुंचन पावलेले व रिकामे आढळतील.

ब) खूप प्रमाणात थकवा येऊन मृत्यू आला असल्यास हृदयाचे स्नायू कमजोर (Asthenia) झाल्यामुळे त्यात

खूप अशक्तपणा येतो आणि पूर्णपणे रक्त कमी न होता ह्रदयाचे कप्पे रक्ताने भरलेले असतात.

क) फफ्फुसे, मेंदू, उदर पोकळीतील इतर अवयवांचा रंग फिकट असतो.

**III) अस्फेक्शिया – श्वसनावरोध**

कोणत्याही कारणाने श्वसनसंस्थेला प्राणवायूचा पुरवठा बंद झाल्यास त्याला श्वसनावरोधाने मृत्यू झाला असे म्हणतात.

**कारणे –**

अ) श्वसनमार्गात अडथळा निर्माण होऊन श्वास घेण्यात अडचण व प्राणवायूचा पुरवठा थांबल्यामुळे मृत्यू येतो. उदा. श्वसनमार्गात बाहेरील वस्तू अडकणे, ग्रंथीचा दाब, गुदमरणे, घशात श्लेष्माचा पडदा तयार होऊन श्वसनमार्ग बंद होणे, बुडणे, गळफासामुळे श्वसनमार्ग बंद होणे.

ब) अतिशय उंच जागेवर किंवा विमानात पुष्कळ उंचीवर गेल्यामुळे प्राणवायूचा पुरवठा न होणे.

क) अतिशय थंडी, अशक्तता किंवा अन्य कारणामुळे, श्वसनकार्यात भाग घेणाऱ्या स्नायूंची हालचाल थांबणे, श्वसनात उपयोगी स्नायूंचा लकवा होणे.

ड) फुफ्फुसाचे जुने आजार.

**चिन्हे** – अशा प्रकारच्या मृत्यूत चिन्हांची निर्मिती तीन अवस्थेत होते.

१) श्वासोच्छवास खूप जोरात चालणे (Stage of Exaggerated Breathing)

२) आचके येणे (Stage of Convulsions)

३) थकवा येणे (Stage of Exhaustion)

पहिल्या अवस्थेमध्ये चेहरा काळजीयुक्त होऊन डोके जड पडते आणि कानात आवाज येण्यास सुरुवात होते. डोळे वर आलेले, ओठ निळसर, श्वासोच्छवास खोल व वेगात होतो. श्वासकष्ट, श्वसन स्नायूंची हालचाल जोराने, शरीर, हातपाय, चेहरा निळसर होत जातो.

दुसऱ्या अवस्थेत खूप जोरात स्नायूंची हालचाल होते व आचके येतात.

तिसऱ्या अवस्थेत पुष्कळ थकवा येतो. मेंदूतील श्वसनकेंद्राचा लकवा होतो.

प्रतिक्षिप्त क्रिया नष्ट होतात, डोळ्याच्या बाहुल्या विस्तारलेल्या, नाडीचा वेग हळूहळू कमी होत जाऊन रोग्याचा मृत्यू होतो.

श्वसनक्रिया थांबल्यानंतर काही सेकंदपर्यंत ह्रदय सुरू राहते. वरील अवस्था मृत्यूपूर्वी ५ मिनिटे असतात.

**श्वसनावरोध :** मरणोत्तर तपासणीचे स्वरूप

**बाह्यस्वरूप (External Appearance) :**

१) हळूहळू श्वसनावरोध होऊन मृत्यू आलेला असल्यास चेहरा शांत व फिकट दिसतो.

२) एकदम श्वसनावरोध झाला असेल तर चेहरा निळा, रक्तसंचययुक्त दिसतो.

३) ओठ आणि नखे काळ्या, निळ्या रंगाची आढळतात.

४) जीभ बाहेर आलेली, नाकातोंडातून रक्तमिश्रित फेस आढळतो.

५) मरणानंतर येणारा ताठरपणा हळूहळू येतो.

६) मरणोत्तर निळसरपणा स्पष्ट दिसतो.

अंत:स्वरूप (Intemal Appearance) :

१) स्वरयंत्र व श्वासनलिकेच्या श्लेष्मल त्वचेत रक्तसंचित स्राव आढळतो.

२) फुफ्फुसाचा रंग जांभळा, फुफ्फुसे कापल्यास प्राणवायूविरहित रक्त भरलेले दिसते.

३) हृदयाची उजवी बाजू, नीला, महारोहिणी काळ्या व अपूर्ण गोठलेल्या रक्ताने भरलेल्या आढळतात, हृदयाच्या डाव्या बाजूत रक्त नसते. कारण फुफ्फुसाचे प्राणवायू घेऊन रक्त शुद्ध करण्याचे कार्य बंद झालेले असते.

४) मृत्यूनंतर लगेच तपासणी केल्यास कधी कधी हृदयाचे दोन्ही कप्पे भरलेले आढळतील, परंतु मरणोत्तर ताठरपणा सुरू झाल्यानंतर हृदय आकुंचित झाल्यामुळे ते रिकामे होते.

५) मेंदू रक्तसंचययुक्त (कोमात यापेक्षा जास्त प्रमाणात रक्तसंचय असतो)

६) उदरपोकळीतील अवयव रक्तसंचययुक्त आढळतात.

७) लहान-लहान केशवाहिन्या फाटल्यामुळे टाचणीच्या डोक्याएवढे लहान-लहान रक्ताचे ठिपके, (पुंजके) फुफ्फुसावर आढळतात.

मृत्यूचे प्रकार (Types of death) :

१) **नैसर्गिक (Natural) :-** फक्त आजारपणामुळे होणारा मृत्यू.

२) **अनैसर्गिक (Unnatural) :-** शारीरिक अपघातामुळे/अन्य घातामुळे होणारा मृत्यू.

अ) आत्मघाती (Suicidal), ब) अन्यघाती (Homicidal), क) अपघाती (Accidental)

१) **नैसर्गिक मृत्यू : स्वाभाविक मृत्यू : कारणे**

a) हृदयाचे विकार : हृदयाचे झडपांचे/स्नायूंचे/मासेपशींचे विकार

b) रक्तवाहिन्यांचे रोग हृदयाच्या समवाहिन्यांचे विकार

c) मेंदूतील रक्तस्राव

d) (Shock) मानसिक धक्का.

e) श्वसन मार्गातील रोग

f) अन्नपचन मार्गातील रोग : जठर फुटणे, स्वादूपिंडाचा दाह

g) गर्भाशयाचे आजार, इत्यादी.

२) **अस्वाभाविक/अनैसर्गिक मृत्यूची कारणे**

विषबाधा, प्राणांतिक जखमा, विवाहितेस जाळणे, अपघात, खून इत्यादी संशयित मृत्यू.

## मृत्यूची लक्षणे व मृत्यूचे अंदाजे वय

### (SIGNS OF DEATH & TIME SINCE DEATH)

मृत्यूची खालील लक्षणे आढळून येतात. त्यापैकी सुरुवातीची तीन दैहिक मृत्यूची व बाकीची आण्विक मृत्यूची लक्षणे होत.

**Immediate signs of death :-**

१) मेंदूचे कार्य थांबणे २) हृदयाचे रक्ताभिसरण कार्य थांबणे ३) श्वसनक्रिया थांबणे

**Early signs of death :-**

४) डोळ्यातील बदल ५) त्वचेतील बदल ६) शरीर थंडगार पडणे

७) मरणोत्तर निळसरपणा ८) स्नायूत बदल होणे

**Late Signs :-**

९) शरीरात सडण्याची व कुजण्याची क्रिया होणे. (Putrefaction or Decomposition)

१०) शरीरातील पिवळसर मेदयुक्त पदार्थांचे रुपांतर होणे. (Saponification)

११) शवरक्षण क्रिया– शरीरात सुकण्याची क्रिया घडून येणे. (Mummification)

**१) मेंदूचे कार्य थांबणे (Stoppage of Brain Function) :**

मेंदूवर काही कारणास्तव किंवा आजारामुळे मेंदूचे कार्य पूर्णपणे स्थगित होऊन कायमची बेशुद्धी येऊन मृत्यू येतो.

**परीक्षा (Test) :**

अ) शरीरावर दाब दिल्यास किंवा टोचल्यास कुठल्याही संवेदना होत नाहीत.

ब) डोळ्यांची हालचाल बंद होऊन प्रकाशास प्रतिसाद देत नाही.

क) बेशुद्धी/मूर्च्छा आल्यासारखी अवस्था होते.

ड) स्नायूत अशक्तपणा अचेतना निर्माण होऊन अर्धांगवायू होतो.

इ) E.C.G. - Flat line

**२) हृदयाचे रक्ताभिसरण थांबणे (Stoppage of Heart Circulation) :**

कोणत्याही कारणास्तव किंवा आजाराने हृदयाचे रक्ताभिसरणाचे कार्य बंद पडून मृत्यू येतो.

**परीक्षा (Test) :**

अ) **श्रवण नलिकेने (Stethoscope) :** पाच मिनिटेपर्यंत तपासल्यानंतर हृदयाचे आवाज ऐकू न आल्यास मृत्यू निश्चित झालेला आहे असे समजावे. हृदय थांबल्यास रक्ताभिसरण बंद होते. Pulse not feeble, B.P. not recordable, ECG-Flat line. नाडी लागत नाही, रक्तदाब मोजला जात नाही, इसीजी सरळ रेषेत येतो.

ब) **मॅग्नस परीक्षा (Magnus Test) :** जिवंत व्यक्तीचे बोटाभोवती दोरा आवळून बांधल्यास दोऱ्याचे भोवती सूज निर्माण होते, परंतु मृत मनुष्याचा पूर्ण भाग पांढरा होतो व त्या ठिकाणी सूज आढळून येणार नाही, यावरून रक्ताभिसरण थांबलेले आहे असे समजावे.

क) जिवंत व्यक्तीचे नख दाबल्यास ते पांढरे होते व दाब काढल्यास गुलाबी होते. अशा प्रकारची अवस्था मृत व्यक्तीत होत नाही.

**३) श्वसनक्रिया थांबणे (Stoppage of respiration) :**

कोणत्याही कारणाने किंवा आजाराने श्वसन संस्थेचे कार्य बंद पडून श्वासोच्छवास क्रिया साडे तीन मिनिटेपर्यंत थांबलेली असल्यास मृत्यू झाला असे समजावे..

**परीक्षा (Test) :**

अ) श्वासोच्छवास सुरू असतांना जिवंत मनुष्याचे नाकासमोर आरसा किंवा चमकणारी काच ठेवल्यास त्याचेवर वाफ पडल्यामुळे तो आरसा किंवा काच अंधूक होते. श्वासोच्छवास बंद झालेला असल्यास अंधुकता येणार नाही व मनुष्य मरण पावला असे समजावे. ही पद्धती थंड हवामानात उपयोगी पडते.

ब) मृत व्यक्तीचे नाकासमोर मोराचे पीस किंवा कापूस ठेवल्यास त्याची हालचाल आढळून येणार नाही, यावरून श्वासोच्छवास थांबला असे समजावे.

### ४) डोळ्यातील बदल (Eye changes) :

मनुष्याच्या मृत्यूनंतर त्याच्या डोळ्यात बदल आढळून येतात.

अ) डोळ्यांची चमक (Lusterness) नष्ट होते.

ब) डोळ्यांची प्रतिक्षिप्त क्रिया (Corneal Reflex) घडून येत नाही.

क) डोळ्यांचे काळे बुबुळ अपारदर्शक व अंधूक होते.

ड) डोळ्यांच्या बाहुल्या विस्तारलेल्या दिसतात.

इ) नेत्रगोल शिथिल होऊन आत जातात.

### ५) त्वचेत होणारे बदल (Skin changes) :

मृत्यूनंतर कातडीचा रंग राखेच्या रंगाप्रमाणे पांढरा किंवा मातकट दिसून त्वचेतील बदल गोऱ्या मनुष्यात प्रामुख्याने आढळून येतो. मृत्यूनंतर त्वचेची लवचिकता नाहीशी होऊन त्वचेत जखम केली असता त्यात जागा (Gap) झालेली दिसून येत नाही. त्याचप्रमाणे गोंदण्याच्या चिन्हांत काहीच बदल होत नाही. फॉस्फरस विषबाधेतील किंवा कावीळ रोगातील पिवळेपणात काही फरक पडत नाही.

### ६) शरीर थंड पडणे (Cooling of the body) :

मृत्यूच्या वेळेची निश्चिती करण्यास हे चिन्ह फार मदत करते. मृत्यूनंतर शरीराचे उष्णतामान कमी होण्यास सुरुवात होते आणि हे कमी होत जाणारे उष्णतामान वातावरणातील तापमानाइतके होते. थंड होण्याचे प्रमाण थंड प्रदेशात जास्त प्रमाणात असते. प्रेत उघडे असल्यास उष्ण तापमान कमी होण्याचे प्रमाण जलदगतीने होते. मनुष्याचे सामान्य उष्णतामान ९८.४ फॅरनहीट असते. या उष्णतापमानात १५ ते २० डिग्री फॅरनहीट उतार झाल्यास तो मनुष्य मरण पावला असे म्हणता येते. शरीर थंड होण्याचा निश्चित असा नियम नाही. मृत्यूनंतर काही तासात शरीराचे तापमान लवकर कमी होते व त्यानंतर हळूहळू थंड होते. साधारणत: पहिल्या ६ तासात, दरताशी २.५ फॅरनहीट ह्या गतीने व त्यानंतरच्या ६ तासात १.५ फॅरनहीट प्रमाणे उष्णतामान कमी होते. अशाप्रकारे साधारणपणे शरीराचे उष्णतामान कमी होण्यास १२ तास लागतात. परंतु शरीराचे आतील अवयवांचे उष्णतामान कमी होण्यास २४ तास लागतात. शरीर थंड होण्याचे प्रमाण व्यक्तीचे वय, शारीरिक स्थिती, मृत्यूचे कारण किंवा प्रकार व सभोवतालची परिस्थिती या घटकावर अवलंबून असते.

अ) **वय** – तरुण व मध्यम वयातील व्यक्तीमध्ये उष्णतामान हळूहळू तर म्हातारे आणि लहान मुले यांचे उष्णतामान जलद गतीने कमी होते.

ब) **शारीरिक स्थिती** – लठ्ठ व सुदृढ माणसाचे तापमान, सडपातळ व अशक्त माणसापेक्षा उशिरा कमी होते.

क) **मृत्यूचे कारण किंवा प्रकार** – क्षय, कॅन्सर, टायफाईड (विषमज्वर) इत्यादी जुनाट रोग तसेच पुष्कळ रक्तस्राव झाल्यास मृत्यू ओढवून आला तर उष्णतामान लवकर कमी होते.

ड) **सभोवतालची परिस्थिती** – मृत शरीर उघडे असले व थंड प्रदेशात असले तर त्या वातावरणाप्रमाणे शरीराचे उष्णतामान कमी होते. मृत शरीर बंद खोलीत ठेवल्यास उष्णतामान लवकर कमी होणार नाही. ज्या ठिकाणी हवा मुक्तपणे वाहत असेल अशा ठिकाणी प्रेत ठेवलेले असल्यास उष्णतामान हळूहळू कमी होते. उघड्या मैदानात ठेवलेले शरीर लवकर थंड होते. पाण्यात बुडलेल्या शरीरास थंड होण्यास कमी वेळ लागतो तर उष्ण पाण्यात वेळ लागेल. अति थंड प्रदेशात तापमान लवकर कमी होऊन शरीर गोठेल, परंतु शरीराचे अवयव बदलत नाहीत.

### ७) मरणोत्तर निळसरपणा (नीलिमा) (Post Mortem Staining or PM lividity) :

हृदयाचे कार्य बंद झाल्यानंतरच शरीरावर मरणोत्तर निळसरपणा येण्यास सुरुवात होते. मनुष्याचा मृत्यू झाल्यानंतर

लगेच शरीरात खेळणारे द्रवरूपी रक्त घट्ट होत नाही. गुरुत्वाकर्षणाच्या नियमानुसार हे द्रवरूपी रक्त केशवाहिन्या आणि लहान नीलामध्ये जमा होऊन रंगामध्ये बदल घडून येतो. त्याला मरणोत्तर निळसरपणा असे म्हणतात. हे मृत्यूचे निश्चित असे लक्षण आहे.

द्रवरूपी रक्त केशवाहिन्या आणि लहान नीलामध्ये जमा होऊन शरीराच्या खालच्या भागात जमा होते व त्यामुळे त्वचेतील रंगात बदल घडून येतो. हा बदल शरीराच्या स्थितीवर अवलंबून असतो. व्यक्ती पाठीवर पडलेली असेल तर हा बदल डोक्याचे मागच्या भागात, कान, मान व हातपाय यात आढळतो. तंग वस्त्र असलेल्या ठिकाणी आढळून येणार नाही.

हा निळसरपणा मृत्यूनंतर एका तासात दिसावयास लागतो आणि त्याला पूर्ण होण्यास सुमारे ४ ते १२ तास लागतात. त्वचेवर तांब्यासारखे लाल किंवा जांभळट असे चट्टे दिसून येतात. सुरुवातीला हे चट्टे वेगवेगळे असून नंतर हळूहळू एकत्र मोठी जागा व्यापतांना गोऱ्या माणसात हा कातडीतील बदल स्पष्टपणे दिसून येतो. रक्त जोपर्यंत द्रवरूपात आहे तोपर्यंतच हा बदल होतो. शरीराच्या स्थितीनुसार त्यात बदल घडून येतो. स्थिती बदलल्यास त्या बाजूला रक्त जाईल. रक्त गोठल्यानंतर असा बदल घडून येणार नाही.

कातडीत होणाऱ्या रंगावरून मृत्यूचे कारण शोधून काढता येते. १) श्वसनावरोधाने आलेल्या मृत्यूत त्वचेचा रंग निळसर होतो. २) कार्बन मोनॉक्साईड ह्या विषामुळे मृत्यू झाला असेल तर त्वचा लालभडक रंगाची आढळून येते. ३) फॉस्फरस विषबाधेत त्वचेचा रंग करडा होतो.

**मरणोत्तर निळसरपणाचे न्यायवैद्यकीय महत्त्व :**

१) मरणोत्तर निळसरपणा त्वचेवर उठून दिसत नाही व शरीरात एकसारखेपणा असतो तर वळ त्वचेवर उठून दिसतो व त्यात एकसारखेपणा नसतो.

२) मरणोत्तर निळसरपणात त्वचेचा रंग सारखा असतो परंतु वळाचे रंगात वेगवेगळेपणा आढळून येतो.

३) मरणोत्तर निळसरपणात त्वचेवर ओरखडा आढळून येत नाही. वळामध्ये त्वचेवर ओरखडा आढळून येतो.

४) मरणोत्तर निळसरपणात, ज्या जागेवर तो प्रकट झालेला आहे ती जागा कापल्यास त्या ठिकाणी असलेल्या त्वचेतूनच पातळ किंवा गोठलेले रक्त निघेल परंतु वळ असलेल्या ठिकाणी पेशीजालातसुद्धा रक्त आढळेल.

**८) स्नायूत बदल होणे– मरणोत्तर ताठरता (Rigor Mortis) :**

ही अवस्था शरीराची आकुंचनशक्ती नष्ट झाल्यानंतर सुरू होते. यात स्नायूतील ATP's नष्ट होऊन Lactic Acid गोळा होते. त्यामुळे स्नायू ताठरतात. ह्यात शरीरातील सर्व ऐच्छिक आणि अनैच्छिक स्नायू कडक होतात. म्हणून या अवस्थेला मरणोत्तर ताठरता असे म्हणतात. शरीरातील उष्णतामान कमी होण्याची क्रिया सुरू असते त्यावेळी किंवा त्यानंतर शरीर ताठर होण्यास सुरुवात होते. सर्व स्नायू कडक व कठीण होतात परंतु शरीराचा किंवा अवयवाचा आकार बदलत नाही.

सुरुवातीला अनैच्छिक स्नायूत सुरू होऊन नंतर ऐच्छिक स्नायूत कडकपणा आढळतो. हृदयाचे स्नायूत मृत्यूनंतर एक तासाने कडकपणा निर्माण होतो. उजव्या कप्प्यापेक्षा डाव्या कप्प्यावर जास्त प्रभाव पडतो. ऐच्छिक स्नायूमध्ये सुद्धा कडकपणा क्रमानुसार येतो. सुरुवात डोळ्यांच्या पापण्यांपासून, चेहऱ्यानंतर मानेचा मागचा भाग, खालचा जबडा, मानेचा समोरचा भाग, उदर पोकळीतील अवयव प्रभावित होतात व नंतर तो कडकपणा खाली पायाला उतरतो. कडकपणा ज्या क्रमाने येतो त्याच क्रमानुसार नाहीसा होतो.

**मरणोत्तर ताठरपणा येण्याची वेळ :** शरीरात ताठरपणा येण्यास निरनिराळ्या व्यक्तीत कमी अधिक वेळ लागू शकतो. निश्चित वेळ सांगता येत नाही. हवामानाचा देखील ह्यावर परिणाम होतो. उष्ण प्रदेशात १८ ते ३६ तास तर अति थंड प्रदेशात २४ ते ४८ तास वेळ लागतो. भारतात ताठरपणा येण्यास एक दोन तासात सुरुवात होऊन त्याला वाढण्यास १२ तास लागतात. शरीरात हा ताठरपणा सुमारे १२ तास रहातो आणि पुढील १२ तासात समाप्त होतो.

क्षय, कॅन्सर, टायफाईड इत्यादीसारख्या जुनाट रोगात हा लवकर सुरू होऊन लवकर संपतो. मरणोत्तर ताठरपणा लवकर सुरू झाल्यास लवकर संपतो.

**मरणोत्तर ताठरपणावर प्रभाव पाडणारी परिस्थिती –**

अ) वय, ब) स्नायूंची स्थिती, क) मृत्यूचा प्रकार, ड) वातावरण

अ) **वय :** सशक्त व्यक्तीत मरणोत्तर ताठरपणा हळूहळू येतो तसेच स्पष्ट आढळून येतो. लहान मुले व म्हाताऱ्यात जलद येतो.

ब) **स्नायूंची स्थिती :** मृत्यूपूर्वी स्नायू विश्रांतीचे अवस्थेत असल्यास ताठरपणा हळूहळू येऊन पुष्कळ वेळ टिकतो. वृद्ध व्यक्तीत लवकर सुरू होऊन लवकर संपतो.

क) **मृत्यूचा प्रकार :** कॉलरा, प्लेग, टायफस, टायफाईड, टी. बी., कॅन्सर इत्यादिसारख्या जुनाट रोगात स्नायू झिजत गेल्यामुळे व थकल्यामुळे ताठरपणा लवकर येऊन लवकर संपतो. न्यूमोनिया, रक्तजमूर्च्छा, श्वसनावरोध या प्रकारात उशीरा सुरू होतो. मध्यवर्ती मज्जासंस्थेवर परिणाम करणाऱ्या विषामुळे मृत्यू झाल्यास ताठरपणा लवकर सुरुवात होऊन जास्त वेळ टिकतो. उदा. कुचला विष इ.

ड) **वातावरण :** मेलेल्या शरीराच्या भोवती असणाऱ्या परिस्थितीचा देखील परिणाम होतो. थंड प्रदेशात ताठरपणा हळूहळू सुरवात होऊन जास्त वेळ टिकतो. उष्ण प्रदेशात लवकर सुरुवात होऊन लवकर संपतो, थंड पाण्यात शरीर बुडले असता ताठरपणास लवकर सुरुवात होऊन पुष्कळ वेळपर्यंत टिकतो.

**मरणोत्तर स्तंभ (Cadaveric Spasms) :**

या अवस्थेत स्नायूंची प्राथमिक शिथिलता न येता शरीर एकदम कडक व कठीण होते. मृत्यूसमयी ऐच्छिक स्नायू अत्याधिक आकुंचित व कार्यशील असतात, त्यामुळे अशी अवस्था निर्माण होते. उदा. रणांगणावर लढणारा शिपाई, अकस्मात श्वसनावरोध होणे, इत्यादी अवस्थेत शरीराची हालचाल फार जोराची असते, त्यामुळे अशा अवस्थेत मृत्यू आला असेल व हातात धरलेले शस्त्र किंवा वस्तू फार मजबूत अशी धरलेली असेल तर ती वस्तू सोडविण्यास फार जोर लावावा लागतो. ह्या स्थितीला 'मरणोत्तर स्तंभ' असे म्हणतात.

मरणोत्तर ताठरपणापूर्वी हातात शस्त्र धरलेले असेल तर ते मजबूतीने धरलेले नसते व थोड्याच स्पर्शाने पडू शकते. न्यायवैद्यक खटल्यात मरणोत्तर येणाऱ्या स्तंभाचे फार महत्त्व असते त्यामुळे १) मृत्यूची वेळ व मृत्यूपूर्वी मृत व्यक्तीची कोणती स्थिती होती हे कळून येते. २) हातात धरलेले शस्त्र, केस, कापडाचे तुकडे इत्यादी वस्तू पक्क्या धरल्या गेल्या असतील तर त्या व्यक्तीने आत्महत्या केलेली आहे किंवा त्याची हत्या झालेली आहे हे शोधून काढण्यात मदत होते. आत्महत्या करणाऱ्याचे हातातील शस्त्र जड व रक्ताने चिकटलेले असेल तर हातातून गळून पडते.

**९) सडणे किंवा कुजणे (Decomposition) :**

सडणे किंवा कुजणे हे मृत्यूचे निश्चित असे चिन्ह आहे, ही क्रिया फार हळूहळू सुरू होते. शरीरात असलेल्या सूक्ष्म जंतूंनी तयार केलेल्या रसाच्या क्रियेमुळे कुजण्याची क्रिया सुरू होऊन जिवंत मनुष्याचे आतड्यात काही सूक्ष्म जंतू (Bacillus Proteus) असतात. मृत्यू झाल्यानंतर ते आतडीचे बाहेर निघून शरीराच्या सर्व पेशीजालात, इंद्रियात आणि रक्तात प्रवेश करतात. त्यामुळे शरीरात कुजण्याची क्रिया सुरु होते.

सडण्याच्या क्रियेत खालील क्रम आढळून येतो.

अ) शरीराचा रंग बदलणे – १) बाह्य परिवर्तन, २) अंत:परिवर्तन

ब) घाण वास येणाऱ्या वायूंची निर्मिती व वाढ

क) शरीराचे आतील अवयवातील परिवर्तन

अ) शरीराचा रंग बदलणे :

१) **बाह्य परिवर्तन :** सुरुवातीला उदर भागावर हिरवट रंगाची (Marbling) छटा येते. ह्या रंगाचा बदल हिवाळ्यात १ ते ३ दिवसात तर उन्हाळ्यात ६ ते १२ तासातच दिसावयास लागतो. गोऱ्या रंगाच्या व्यक्तीत शरीराचा बदल स्पष्टपणे आढळून येतो. डोळ्याचा रंग बदलतो, डोळे मऊ होऊन काळ्या बुबुळावर ह्या अवस्थेची क्रिया होते. ते दुधाप्रमाणे पांढरे दिसावयास लागतात व हळूहळू डोळे आत धसतात. साधारणत: १२ ते १८ तासानंतर पोटावर असणारा रंग इतर भागावर पसरण्यास सुरुवात होतो. छाती, तोंड, हातपाय, इत्यादींवर ह्या रंगाचे चट्टे दिसतात व ह्यांचा सुरुवातीचा हिरवट रंग बदलून हिरवट निळा दिसू लागतो. हे चट्टे सुरुवातीला वेगवेगळे असतात, परंतु हळूहळू एकत्र येऊन एक मोठा भाग तयार होऊन शरीराची पूर्ण त्वचा वरील रंगाची होते.

२) **अंत:परिवर्तन :** रक्तवाहिनीत असणारे रक्त विघटित होते आणि लाल रक्तकणातील तत्त्व रक्तवाहिन्यांच्या भिंतीवर येऊन स्पष्ट दिसते, त्यामुळे शरीरावर दिसणाऱ्या नीला ठळकपणे दिसू लागतात व त्या जांभळट लाल किंवा हिरवट रेषेप्रमाणे आढळतात. गोठलेले रक्त द्रवरूपात येते आणि मरणोत्तर निळसरपणात फरक पडतो.

**ब) घाण वास येणाऱ्या वायूंची निर्मिती व वाढ**

त्वचेत होणाऱ्या रंगाच्या बदलाबरोबरच, शरीर सडण्याची क्रिया होत असताना हायड्रोजन सल्फाईड, अमोनिया, मिथेन इत्यादी प्रकारच्या वायूंची निर्मिती होऊन त्यापासून फार घाण वास सुटतो.

१) **वायूंचा इंद्रियावर दाब पडणे :** सुमारे १२ ते १८ तासानंतर हे वायू आतड्यात जमा होतात व त्यामुळे पोटाला फुगारा येतो. हा फुगारा कधी कधी इतका वाढतो की शवपरीक्षा करताना पोट चिरल्यास फार जोराचा आवाज येतो. पोटाला फुगारा आल्यामुळे व वायूचा दाब वाढल्यामुळे पुष्कळदा लघवी, परसाकड (विष्ठा) आपोआप होते. दाबामुळे पोटातील अन्नाचा अवशेष तोंड, घसा, नाक इत्यादीतून बाहेर पडतो. पुरुषाचे शिश्न अंडकोष फुगतात. सर्व शरीर पूर्वीच्या अवस्थेपेक्षा खूप मोठे झालेले आढळून येते. ही अवस्था ३६ ते ४८ तासानंतर बिभत्स रूप धारण करते. वायूचा दाब पडल्यामुळे गर्भाशयातील गर्भ देखील बाहेर पडू शकतो. तोंडातून फेस, घाण पाणी बाहेर येते. स्त्रियांचे स्तन मोठे होतात. जननेंद्रिय सुजून मोठे होते. हृदयावर आणि रक्तवाहिन्यांवर वायूचा दाब पडल्यामुळे जखमांतून रक्त निघू लागते. शरीरावर फोड तयार होतात व त्यात लालसर रंगाचा द्रव पदार्थ आढळून येतो. त्वचा मऊ होते व सोलली जाते. जखमा फुगतात त्यामुळे त्या ओळखल्या जाऊ शकत नाहीत, नेत्रगोल, जीभ बाहेर येते, पाण्यातील शव हलके होऊन तरंगू लागते. ४८ ते ७२ तासात गर्भाशय, गुदद्वार बाहेर येते, केस व नखे निघू लागतात, ३ ते ५ दिवसात कवटीची हाडे व इतर सांधे मोकळे होतात.

२) **अळ्यांची (Maggots) निर्मिती (Entomology) :** तोंड, नाक व जखमा इत्यादी ठिकाणी माशा अंडी देऊ लागतात आणि सुमारे १८ ते २४ तासातच त्यांच्या अळ्या तयार होतात व आतील शरीरात प्रवेश करतात व आतील अवयवांचा नाश घडून येतो. पाच दिवसात त्या मोठ्या होऊन माशा तयार होतात व उडू लागतात.

**क) शरीराचे आतील अवयवांचे परिवर्तन :**

सडण्याच्या अवस्थेत ज्याप्रमाणे शरीराचे वरील भागाचा रंग बदलतो, त्याचप्रमाणे आतील अवयव उदा. यकृत प्लीहा, मूत्रपिंड यांचा देखील रंग बदलतो. हा रंग सुरुवातीला गडद लाल व नंतर काळा होतो. पोटावर सडण्याची क्रिया आरंभ होते. त्याचवेळी स्वरयंत्र व वायू नलिका कुजू लागते. लहान मुलांचा मेंदू, जठर यावर क्रिया सुरू होते. जठरामध्ये ही क्रिया हिवाळ्यात ४ ते ६ तासात तर उन्हाळ्यात २४ ते ३६ तासात घडून येते. यानंतर आतडे, यकृत, प्लीहा यावर परिणाम होतो. जठर व आतड्यापेक्षा हृदय व फुफ्फुसे यावर कुजण्याची क्रिया उशिरा होते, गर्भाशयावर फार उशीर लागतो. मृत्यूनंतर ६ ते ९ महिन्यात सुद्धा गर्भाशयात सडण्याची क्रिया घडून आल्याचे उदाहरण सापडते. पाण्यात कुजण्याची क्रिया दुप्पट वेळाने होते. भारतात शरीर कुजल्यामुळे पाण्यातील शव हिवाळ्यात २ ते ३ दिवसात तर उन्हाळ्यात २४ तासातच पृष्ठभागावर तरंगताना आढळते.

**सडण्याच्या क्रियेचे न्यायवैद्यकीय महत्त्व :**

१) हे मृत्यूचे निश्चित असे चिन्ह आहे.

२) यावरून मरणाच्या वेळेची निश्चिती करता येते.

**१०) सॅपॉनीफिकेशन (Saponification) :**

काही विशिष्ट परिस्थितीत शरीर सडण्याची (Decomposition) क्रिया थांबते आणि त्याऐवजी मेणासारखा पदार्थ तयार होतो. हा पदार्थ (Adipocere) तेलकट व पांढऱ्या रंगाचा असतो. शरीराची चरबी मेणाप्रमाणे मऊ होते व बराच काळ टिकते. ह्याचा प्रभाव चरबी असलेल्या अवयवात जास्त प्रमाणात आढळून येतो. सुरुवातीला हा बदल कातडीखाली असणाऱ्या चरबीत होतो. स्त्रियांचे स्तन, गालाचे मांस, कंबर या ठिकाणी प्रभाव जास्त पडतो, कारण या भागात चरबी जास्त असते.

रासायनिक दृष्टिकोनातून विश्लेषण केल्यास यात ग्लिसरीन, साबण, प्रोटिन हे पदार्थ आढळून येतात. प्रेतातून आंबट असा वास येतो व स्पर्श केल्यास त्यात चोपडेपणा जाणवतो व सहजासहजी कापला जाऊ शकतो. ह्या क्रियेत शरीराचे आकारात बदल होत नसल्यामुळे मेलेला मनुष्य सहज ओळखला जातो. साधारणपणे ही अवस्था परिस्थितीनुसार ३ आठवडे ते ३ महिन्यात घडून येते. हवामानाप्रमाणे वेगवेगळा अवधी लागत असतो.

**खालील अवस्थेत सॅपॉनीफिकेशनची क्रिया घडून येते.**

१) शरीर पाण्यात पूर्णपणे बुडलेले असणे.

२) शव ओल्या जागेत गाडणे.

३) विष्ठा असलेल्या गटारातील शव.

४) उष्ण आणि ओल्या जागेत शव उघडे असणे.

**न्यायवैद्यकीय महत्त्व :**

१) हे एक मृत्यूचे निश्चित असे चिन्ह आहे.

२) या स्थितीवरून मृत्यूची वेळ निश्चित केली जाऊ शकते.

३) मृत्यूचे कारण ठरविता येते.

**११) शवरक्षणक्रिया (Mummification) :**

वाळवंटात किंवा अति उष्ण प्रदेशात उदा. इजिप्त, सिंध, बलूचिस्तान, राजस्थान, इत्यादी ठिकाणी अति उष्णतेमुळे शरीरातील पाणी बाष्पीकरणाने लवकर नाहीसे होते. सर्वसाधारणपणे शरीर हळूहळू सुकत जाते व प्रत्येक अवयव वाळतो. परंतु शरीराचा नैसर्गिक आकार कायम राहतो त्यामुळे मनुष्य कित्येक वर्ष स्पष्ट ओळखला जातो. ह्या अवस्थेत त्वचा वाळलेली, चामड्यासारखी व करड्या रंगाची होते व ती हाडाला चिकटून गेलेली असते. शरीराचा वास लाकडासारखा येतो आणि आतील अवयव एकमेकाबरोबर चिकटतात. साधारणत: ३ महिने ते १ वर्षे लागते. इजिप्तमधील वाळलेली प्रेते आजही इंग्लंडच्या अजबघरात पाहावयास मिळतात त्यांना ममी असे म्हणतात. हजारो वर्षानंतरसुद्धा त्यांचे चेहरे आपण ओळखू शकतो. मेलेले शरीर टिकवून ठेवण्याकरिता मेडिकल कॉलेजमध्ये अर्सेनिक, लेड सल्फाईड, पोटॅशियम कार्बोनेटच्या द्रावणाचा वापर मांडीच्या रोहिणीत (Femoral Artery) किंवा महारोहिणीत (Carotid Artery) टाकून केला जातो.

**शव रक्षणक्रियेचे न्यायवैद्यकीय महत्त्व :**

१) मृत्यूचे निश्चित असे चिन्ह आहे.

२) मृत व्यक्तीची ओळख करता येते. त्यांचे अंगावरील जखमा ओळखता येतात.

३) मृत्यूचे कारण शोधून काढता येते.

४) मृत्यूची वेळ निश्चित ठरविता येते.

५) शव कुठून प्राप्त झाले याची जाणीव होते.

**मरणाची वेळ निश्चित करणे :**

कोणतेही प्रेत, शव परीक्षेकरिता आल्यानंतर, न्यायवैद्यकीय दृष्टिकोनातून, मृत्यूनंतर किती वेळ झालेला असावा, याचा अंदाज डॉक्टरला द्यावा लागतो. मागे दिलेल्या मृत्यूचे चिन्हावरून ही वेळ ठरविली जाऊ शकते. उदा. शरीर थंड होणे, मरणोत्तर ताठरपणा, सडणे इत्यादी अवस्थांवरून मृत्यूनंतर झालेला वेळ निश्चित करता येतो. खालील परिस्थितीसुद्धा याबाबतीत मदत करते.

१) साधारणत: शाकाहारी अन्नाचा उपयोग केला जातो. जठरातून हे अन्न जेवणानंतर सुमारे ६ ते ७ तासांनी बाहेर पडते. इंग्रज लोक मिश्र अन्न उदा. मांस व पालेभाज्या सुद्धा घेतात व अशा प्रकारचे अवशेष ४ ते ५ तासात पचन होऊन जठरातून आतड्यात टाकले जातात. शवपरीक्षेत हा अंदाज लावल्यास मृत्यूची वेळ ठरविली जाऊ शकते. काही रोगात पचनक्रियेत वेळ लागतो हा मुद्दा लक्षात घ्यावा.

२) बहुधा सर्वांना रात्री झोपी जाताना आणि सकाळी उठल्यानंतर लघवीला जाण्याची सवय असते. शव परीक्षेचे वेळी मूत्राशय पूर्ण भरलेले आढळले तर त्याचा मृत्यू रात्री किंवा सकाळ होण्यापूर्वी झाला असावा असा अंदाज बांधता येतो.

३) काही व्यक्तींना बहुधा सकाळी दाढी करण्याची सवय असते. शवाचे दाढीवर केस आढळल्यास सकाळचे पुष्कळ वेळेपूर्वी त्याचा मृत्यू झाला असावा असे मानण्यात येते. दाढीचे केस चोवीस तासात सुमारे ०.४ मिमी. गतीने वाढतात.

४) मृत्यू झालेल्या व्यक्तीजवळील समाचारपत्र, घड्याळ, व्यक्तिगत लिहिलेले पत्र इत्यादीवरून सुद्धा वेळेचे ज्ञान प्राप्त होऊ शकते.

५) शव एखाद्या जंगलात किंवा झाडेझुडपे असलेल्या ठिकाणी पाच-सहा दिवस पडलेले असेल तर शवाखालील वनस्पती, झुडपे इत्यादी सूर्यप्रकाशाचे अभावामुळे पिवळी पडलेली असतात.

६) बहुधा व्यक्ती सकाळी मलत्याग करतो. शवपरीक्षा करताना मोठे आतडे भरलेले आढळल्यास सकाळ होण्यापूर्वी त्याचा मृत्यू झाला असावा असा अंदाज लावता येतो.

## जखमांचे प्रकार

## (TYPES OF WOUNDS)

**जखमांचे प्रकार :**

१) ABRASION (अॅब्रेजन) खरचटलेल्या, ओरखडलेल्या जखमा.

२) CONTUSION / BRUISE (कॉन्टुजन किंवा ब्रुझ/टेंगूळ, वळ, मुकामार इ.)

३) INCISED WOUND (इनसाईज्ड वुंड/कापीव जखम)

४) LACERATED WOUND (लॅसरेटेड वुंड/फाटलेली जखम)

५) STAB WOUND / PUNCTURED WOUND (स्टॅब वुन्ड/पंक्चरड वुंड/भोसकलेली जखम)

६) FIRE ARM WOUND (फायर आर्म वुंड/अग्निशमन/बंदुकीच्या गोळीची जखम)

**CLW - CONTUSED LACERATED WOUND :**

कठीण व बोथट (Hard & Blunt Substance) वस्तूच्या आघाताने अशा जखमा होतात. त्या जखमांच्या कडांवर

सूज आढळून येते.

**१) खरचटलेल्या जखमा (Abrasion) :**

एखाद्या कठीण व बोथट किंवा खडबडीत वस्तूच्या शरीरावरील घर्षणाने खरचटलेल्या जखमा होतात. उदा. ओबडधोबड दगड, दगडाचा कोपरा, हाताची नखे जमिनीचा पृष्ठभाग (विशेषत: अपघातात) सुरुवातीला खरचटलेल्या जखमा लालसर दिसतात नंतर १२ ते २४ तासाने त्यावर खपली तयार होते.

१) २-३ दिवसापर्यंत खपलीचा रंग याकाळात लालसर निळा होतो. यानंतर ही खपली काळसर दिसते.

२) साधारण ४-७ दिवसापर्यंत ही खपली आपोआप पडून जाते खपलीच्या खाली पांढरट चट्टा साधारण ७-८ दिवस दिसतो व नंतर तो नाहीसा होत जातो.

३) १० दिवसांनंतर पांढरट चट्टा बाकीच्या जवळील त्वचेसारखा पूर्ववत होतो. यावरून या जखमा केव्हा झाल्या असतील याबद्दल वैद्यकीय अधिकारी मत प्रदर्शित करतात.

किरकोळ वाटणाऱ्या खरचटलेल्या जखमा काही घटनेमध्ये तपासकामी उपयोगी पडतात.

चेहऱ्यावरील, नाकातोंडा जवळील खरचटलेल्या जखमा होण्याचे कारण नाक व तोंड दाबून मारण्याच्या घटना (Suffocation) गुदमरून मृत्यू.

गळ्यावर नखांमुळे झालेले ओरखडे गळा हातानी दाबल्यामुळे आढळतात (Throttling) बलात्काराच्या घटनेमध्ये स्त्री व पुरुषांच्या दोघांच्याही अंगावर नखांचे ओरखडे आढळून येतात गळ्यावर, हातावर, छातीवर, मांडीवर व गुप्तांगावर इ. ठिकाणी. अपघातात खरचटलेल्या जखमा जमिनीवर व्यक्ती पडल्यानंतर काही अंतर घसरत जाते त्यामुळे कपड्याच्या आतून झालेल्या असतात. तसेच एकाच दिशेने झालेल्या असतात.

**२) मुकामार/वळ (Contusion / Bruise) :**

कोणत्याही कठीण व बोथट वस्तूचा आघात शरीरावर झाल्यावर कॉन्टूजन होते. यामध्ये मार लागल्यावर त्वचेखाली असलेल्या रक्तवाहिन्या चेंगरल्या वा चेपल्या जातात त्यामधून झालेला रक्तस्राव त्वचेखाली स्नायूमध्ये एका ठिकाणी जमा होतो. त्यास एकोमीसीस असेही म्हणतात. कॉन्टुजनची कालमर्यादा त्यातील रंग बदलामुळे निश्चित केली जाते ती अशी:-

१) सुरुवातीला जखम लालसर दिसते.

२) नंतरच्या तीन दिवसांत निळी, निळसर काळी, तपकिरी रंगाची दिसते.

३) ५ ते ६ दिवसांत त्यात हिरवट रंग निर्माण झालेला दिसतो.

४) ७ ते १२ दिवसांत त्यात पिवळट रंग निर्माण झालेला दिसतो.

५) साधारण १४-१५ दिवसांत पिवळट रंग हळूहळू फिक्कट होत जाऊन ती त्वचा पूर्ववत दिसू लागते. या रंग बदलावरून वैद्यकीय अधिकारी जखम केव्हा झाली आहे? हे सांगू शकतात.

**कॉन्टुजनचे विधिवैद्यक महत्त्व :**

१) जखम कशामुळे झाली आहे ते समजते.
उदा.- क्रिकेट किंवा हॉकीचा चेंडू लागल्यावर गोल-जखम दिसते. (O)

२) काठी, लाठी, उसामुळे झाली असल्यास समांतर रेषेत वळ उमटतात.

३) चेन, चाबूक यामुळे होणाऱ्या जखमा त्या वस्तुच्या आकाराप्रमाणे दिसतात.

४) अनेक कॉन्टुजनमुळे तीव्र स्वरूपाच्या वेदनेमुळे एखाद्या वेळेस मृत्यू येऊ शकतो.
पोटाच्या वरील भागात किंवा पुरुषांमध्ये अंडाशयास जोरात मार लागल्यास मृत्यू घडून येतो. या जखमा

अन्यघाती किंवा अपघाती असतात. आत्मघाती असण्याची शक्यता फार कमी असते.

३) **वेडीवाकडी/फाटलेली जखम (Lacerated Wound) :**

एखाद्या कठीण व बोथट वस्तूचा प्रहार झाल्यानंतर त्या ठिकाणची त्वचा फाटते त्वचेखालील पेशी, स्नायू फाटतात. जखमांच्या कडा अनियमित, वेड्यावाकड्या, दातरलेल्या अशा दिसून येतात.

अशा प्रकारच्या जखमा, दगड, विटा, बाटली, काठी, लोखंडी पहार जड भांडे इ. मुळे होतात. तसेच मोठ्या दगडावर आपटल्यामुळे किंवा पडल्यामुळे सुद्धा होतात.

जनावरांच्या दातांमुळे, जनावरांच्या नखांमुळे तसेच शिंगामुळे सुद्धा अशा जखमा झालेल्या आढळून येतात. अशा जखमातून रक्तस्राव मोठ्या प्रमाणावर झालेला दिसतो. काही वेळेस आघात जोरात झाला असल्यास खाली असलेल्या हाडाचे फॅक्चर होते.

ज्या वस्तु मुळे जखम झाली आहे, त्या वस्तूचा काही अंश जखमेत आढळतो. उदा :- रंगीत काठीचा रंग (बारीक कण) जखमेत आढळतात.

जर जखमा अपघाती असतील तर जमिनीच्या संपर्कामुळे तेथील माती, धूळ, चिखल इ. जखमेत आढळते. काही वेळेस वाहनांच्या खालील भागातील तेल, इंधन, वगण इ. जखमेत आढळून येते.

**विधिवैद्यक महत्त्व :-** जखमा बहुधा अन्यघाती किंवा अपघाती असतात क्वचित आत्मघाती असतात.

**CLW Contused Lacerated Wound :**

अशा जखमा विशेषत: डोक्यावर, पायाच्या नडगीवर म्हणजेच त्वचेखाली हाड असणाऱ्या भागावर दिसतात. कठीण व बोथट वस्तूच्या प्रहाराने त्वचा लगेच फाटते. फाटलेल्या त्वचेच्या कडा सुजलेल्या दिसतात.

४) **काप असलेली जखम [Incised Wound (I.W.)] :**

अशा जखमा धारदार शस्त्राने झालेल्या असतात. (Sharp cutting edged Weapon) शस्त्राचा धार असलेला भाग त्वचेवरून चालवला असता त्वचा, त्वचेखालील पेशी, स्नायू कापले जातात. या जखमांचे ठळक वैशिष्ट्य म्हणजे जखमांच्या कडावरून कापीव जखम ओळखता येते. जखमेच्या कडा सफाईदारपणे व्यवस्थितपणे (Clean Cut Margins) (edges) कापलेल्या असतात. त्वचेखालील पेशी स्नायू, सफाईदार कापलेले दिसतात. जखमेतील रक्तवाहिनीसुद्धा सफाईदारपणे कापल्या गेल्यामुळे या जखमेतून रक्तस्राव मोठ्या प्रमाणावर होतांना आढळतो.

अशा जखमा मध्यभागी फाकलेल्या/उकललेल्या (Gaping) व बाजूंनी निमुळत्या झालेल्या दिसतात.




अशा जखमा खालील शस्त्रांनी होतात.

उदा :- ब्लेड, वस्तरा, फुटलेली काच, चाकू इ. कुठलेही धार असलेले शस्त्र.

**विधिवैद्यक महत्त्व :**

१) या जखमा कशामुळे झाल्या आहेत ते सांगता येते.

२) शस्त्र कोणत्या दिशेने चालविले आहे हे सांगता येते. शस्त्र प्रथम शरीरावर लागलेल्या ठिकाणी जखम थोडी

खोल असते व जिथून शस्त्र बाहेर काढले असेल त्या ठिकाणी जखम वरवर व जास्त निमुळती झालेली दिसते.

३) अशा जखमा बहुधा आत्मघाती शरीरावर कुठेही आढळतात. अपघाती कापीव जखमा अपघातामुळे ओळखणे शक्य होते. आत्मघाती/स्वत:हून केलेल्या जखमा शरीराच्या ठराविक भागावर व वरवर केलेल्या असतात.

उदा. : उजव्या हाताच्या व्यक्तीने शरीराच्या डाव्या भागावर, दंडावर मनगटावर, छातीवर इ. ठिकाणी व डावखुऱ्या माणसाने उजव्या भागावर जखमा केलेल्या आढळतात. म्हणजेच थोडक्यात हात सहजासहजी पोहोचेल त्या भागावर जखमा आढळतात. (ब्लेड, काचेने केलेल्या असतात)

**विधिवैद्यक महत्त्व :**

स्वत:हून केलेल्या जखमा कस्टडीतील आरोपी, तुरुंगातील कैदी, किंवा वेडी माणसे करतात.

आरोपी / कैदी जखमा करून घेण्याचे कारण तपासी अंमलदारावर मारहाणीचे खोटे आरोप करणे यामुळे तपासाची दिशा बदलणे, तपासी अंमलदारास अडचणीत आणणे असा असतो. या जखमा वरवर असतात यातून फारच कमी रक्तस्राव होतो.

तळहातावर व हाताच्या बाहेरील बाजूच्या जखमा अन्यघाती असतात. कारण स्वत:चा बचाव करण्यासाठी किंवा शस्त्र हातात पकडल्यामुळे अशा जखमा झालेल्या आढळतात.

**५) भोसकलेली जखम <u>(Stab Wound / Punctured Wound)</u> :**

या प्रकारच्या जखमा एखादे टोक असलेले (Pointed) शस्त्र किंवा हत्यार अंगात घुसल्यामुळे होतात. लांबी रुंदी पेक्षा या जखमा अधिक खोल असल्याचे आढळते म्हणून या जखमात खोलपणा महत्त्वाचा असतो. या जखमा होण्यासाठी टोक असलेले हत्यार कारणीभूत असते.

उदा. टोकदार चाकू, खंजीर, भाला, बाण, सुई, दाबण, टोचा, टोक असलेला पत्रा, टोक असलेली कात्री, काच इ.

काही वेळेस हत्यार एका बाजूने आत जाते, त्याचे दुसरे टोक शरीराच्या दुसऱ्या बाजूने बाहेर आलेले आढळते.

उदा. बाण, भाला. तलवार इ. या जखमा किती खोल आहेत यावर त्यांचे गांभीर्य अवलंबून असते म्हणजे शरीरातील महत्त्वाचे अवयव, मोठ्या रक्तवाहिन्यांना इजा होते, अंतर्गत रक्तस्राव मोठ्या प्रमाणात होतो व मृत्यूसुद्धा होऊ शकतो. काही वेळेस वरून जखम किरकोळ दिसून येते परंतु जखम जास्त खोल असेल तर गंभीर असते.

उदा. टोचा संपूर्ण आत शरीरात गेला असल्यास गंभीर इजा होते. परंतु वरून जखम लहान दिसून येते.

या जखमा होतांना शस्त्र किंवा हत्यारामुळे अंगावरील कपड्याचा लहान तुकडा जखमेत आढळून येतो, जखमा तपासून पाहिल्यानंतर कोणत्या शस्त्राने झाल्या आहेत हे सांगता येते.

उदा. गोलाकार शस्त्र (टोचा, दाबण, सुई) एका बाजूनी धार असलेले किंवा दुधारी शस्त्र.

1) Single edged Weapon

2) Double edged Weapon.

**विधिवैद्यक महत्त्व :**

अशा जखमा बहुधा अन्यघाती किंवा अपघाती असतात. अन्यघाती जखमा अनेक असतात बहुधा छाती पोट व मानेच्या खालील भागात जास्त प्रमाणात असतात. कारण शस्त्रांनी प्रहार करताना हे भाग समोर येतात.

अपघाती जखमा :

वाहनाच्या अपघातात एखादा टोक असलेला वाहनाचा भाग रस्त्यावरील टोक असलेला दगड इ. अंगामध्ये घुसू शकतो. आत्मघाती भोसकलेल्या जखमा क्वचित आढळतात.

६) **Fire Arm Wound (Gun Shot Wound) (स्फोटकाने होणारी जखम) :**

**(बंदुकीच्या गोळीची जखम) :**

बंदुकीच्या गोळीच्या जखमा खालील बाबींवर अवलंबून असतात.

१) किती अंतरावरून गोळी लागली आहे?

२) किती वेगाने गोळी शरीरात गेली आहे?

३) कोणत्या शस्त्राने अशी जखम झाली आहे?

४) गोळी शरीरात जातांना एखाद्या ठिकाणी आपटून गोळीचा वेग कमी झाला आहे का?

**Contact Shot -** म्हणजे मझल (Muzzle) शरीरावर टेकलेले असते.

**Close range / Near range shot -** म्हणजे शरीरापासून काही इंच किंवा ४ ते ५ फूट अंतरावरून गोळी लागली असेल.

**Distant Range Shot -** म्हणजे दुरून गोळी लागली असेल तर.

जवळून गोळी लागली असल्यास एन्ट्री वुन्ड भोवती Burning, Blackening, Singeing of hairs, Scorching, Tattooing दिसून येते.

म्हणजे उष्णतेमुळे भाजल्यासारख्या गन पावडरमुळे व धुरामुळे काळसरपणा जखमेच्या भोवतालचे केस होरपळलेले अर्धवट जळालेली व पूर्ण जळालेली गन पावडर वेगात त्वचेमध्ये रुतल्यामुळे गोंदल्यासारख्या खुणा दिसतात.

जर गोळी दूर अंतरावरून लागली असेल तर एन्ट्री वुंड भोवतालच्या वरील (ψ) खुणा दिसून येत नाहीत. एखाद्या व्यक्तीच्या शरीरात गोळी कोणत्या दिशेने गेली आहे हे समजण्यासाठी Entry Wound व Exit Wound यातील फरक ओळखणे आवश्यक आहे.

बंदुकीच्या गोळीच्या बहुधा दोन जखमा असतात एक प्रवेशाची जखम (Entry Wound) व दुसरी गोळी बाहेर पडल्याची जखम (Exit Wound).

एखाद्या व्यक्तीच्या शरीरात गोळी कोणत्या दिशेने गेली आहे हे समजण्यासाठी Entry Wound व Exit Wound यातील फरक ओळखणे आवश्यक आहे.

# MEDICO LEGAL CASE REGISTER, CIVIL HOSPITAL, NASHIK
## न्यायवैद्यक शास्त्र मामला नोंदवही, जिल्हा रुग्णालय, नाशिक

MLC NO. /मामला क्र. ______

OPD/IPD NO./बाह्य/आंतररूग्ण क्र. ______

DATE & TIME OF /दिनांक व वेळ
ARRIVAL/कोठून आणले ______

DATE & TIME OF /तपासणीची दि. व वेळ
EXAMINATION : ______

NAME, BELT NO., CONTACT NO OF POLICE OFFICIAL/पोलिस अधिकाऱ्यांचे नाव व नं. संपर्क क्र. ______

IDENTIFICATION MARKS /ओळखीचा खुणा
1) ______
2) ______

CONSENT : I ......................................
.................................. give my full, free, voluntry consent for complet medical examination. The nature, procedure, risk and consequences have been explained to me by doctor in the language that I understand.
संमती पत्र : मी माझे तपासणी करीता पूर्ण शुद्धीवर राहून संमती देत आहे. व डॉक्टरांनी मला तपासणीचे स्वरुप, धोक्याची जाणीव करून दिली ती मला समजली आहे.

सही/- स.नि.डा.हा. अं.
Signature Thumb impression
साक्षीदारांची सही/-
Signature of witness

NAME /नांव : ______ AGE/वय : ______ SEX/लिंग : ______

R/O./राहण्याचे ठिकण : ______ BROUGHT BY & CONTACT NO. / कोणी आणले त्यांचे नाव व संपर्क क्र. : ______

Short history of the case :
मामल्याची थोडक्यात इतिहास :

Examination :
तपासणी :

Description of injuries if present / जखमेचे आताचे स्वरुप :

| Sr. No. अ.क्र. | Type of injury जखमेचा प्रकार | Site & dimensions जखमेची जागा, मोजमाप | Age of injury जखमेचे वय | Name of injury जखमेचे स्वरुप | Remarks शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

Investigations advised /तपासणीचा दिलेला सल्ला ::

Articles/samples preserved/संरक्षित नमूने :

Opinion /मत :

वै.अ.ची सही नांव व सही
Signature of Medical Officer (With name & Stamp)

| Entry Wound<br>गोळीच्या प्रवेशाची जखम | | Exit Wound<br>गोळी बाहेर पाडल्याची जखम | |
|---|---|---|---|
| १. | ही जखम बहुधा लहान असते (गोळीच्या आकारापेक्षा सुद्धा लहान असू शकते) | १. | बहुधा मोठी असते. आत गोळीचे तुकडे झाले असतील किंवा हाडाचे तुकडे झाले तर एकापेक्षा जास्त गोळी बाहेर पडल्याच्या जखमा दिसतात. |
| २. | जखमेतून रक्तस्राव कमी प्रमाणात होताना दिसून येतो. | २. | रक्तस्राव मोठ्या प्रमाणात दिसून येतो जर गोळी हाडाला लागली असेल तर रक्ताबरोबर हाडाचा चुरा बाहेर येताना दिसून येतो काहीवेळेस अवयवांचा लगदा सुद्धा दिसून येतो. |
| ३. | जखमेच्या कडा आतील बाजूस वळलेल्या असतात. | ३. | जखमेच्या कडा बाहेरील बाजूस वळलेल्या दिसून येतात. |
| ४. | कपड्यावरून गोळी आत गेली असल्यास कपड्याचा तुकडा जखमेच्या आत दिसून येतो. | ४. | कपड्याचा तुकडा जखमेच्या बाहेरील बाजूस लोंबकळताना दिसून येतो. |
| ५. | जवळून गोळी लागल्यास जखमेभोवती उष्णतेमुळे भाजल्यासारखा खुणा, गन पावडर धुरामुळे, काळसरपणा, अंगावरील केस होरपळलेले, गन पावडर त्वचेत रुजल्यामुळे गोंदण्याच्या खुणा (Burning Blackening] Singeing of hairs & tattooing) दिसून येतात. काही कपड्यांवर सुद्धा काळसरपणा उष्णतेमुळे कापड जळालेले दिसून येते. | ५. | यासारख्या खुणा या जखमेभोवती दिसून येत नाही. |
| ६. | जखमेचा मार्ग कार्बोक्सी हिमोग्लोबीनमुळे गुलाबी दिसून येतो जर मझल टेकवून गोळी आत गेली असेल तर | ६. | असा गुलाबी रंग दिसून येत नाही. |
| ७. | जखमेच्या भोवताली बॅरेलमधील ग्रीसमुळे (Grease Collar) दिसते- | ७. | अशी (Grease Collar) दिसत नाही. |
| ८. | ''क्ष''-किरण किंवा प्रयोगशाळेतील तपासणीवरून या जखमेखाली शिसाचे वर्तुळ (Lead Ring) दिसून येते. | ८. | असे दिसून येत नाही. |

**बंदुकीच्या गोळीच्या जखमा आत्मघाती, अपघाती व अन्यघाती कशा ओळखायच्या असतात.**

| आत्मघाती घटना | | अन्यघाती / अपघाती घटना | |
|---|---|---|---|
| १. | तरुण प्रौढ पुरुष या पद्धतीने आत्महत्या करताना आढळतात. | १. | कोणत्याही वयोगटातील व्यक्ती असू शकते. |
| २. | आत्महत्या करणाऱ्या व्यक्तीने ठराविक भागावर गोळी झाडून घेतलेली असते. उदा. कानशिलाचा भाग, कपाळाचा मध्यभाग, हनुवटीच्या खालून तोंडात पोटाच्या वरील भागातून तोंडामध्ये टाळूच्या भागातून | २. | शरीराच्या कोणत्याही भागावर गोळी लागलेली असते. |
| ३. | शरीरावर मझल टेकवून गोळी झाडलेली असते किंवा अतिशय जवळून झाडून घेतलेली असते. | ३. | बहुधा दुरून गोळी झाडलेली असते क्वचित प्रसंगी जवळून सुद्धा गोळी झाडलेली आढळून येते. |
| ४. | बहुधा एकाच गोळीने मृत्यू झालेला आढळून येतो. (Hasitation shots) क्वचित मारू की नको अशा मनःस्थितीत एखादी गोळी छताला किंवा भिंतीस लागलेली आढळते. | ४. | एकापेक्षा अनेक गोळ्या लागलेल्या आढळतात. |
| ५. | आत्महत्येस शस्त्र हाताच्या मुठीत मरणोत्तर पेटक्यात (Cadaveric Spasm) घट्ट पकडलेले आढळून येते. | ५. | मरणोत्तर पेटक्यात शस्त्र आढळून येत नाही कारण शस्त्र त्या ठिकाणी नसते. मृत्यूनंतर आत्महत्येचा देखावा निर्माण करण्यासाठी खून करून मृताच्या हातात शस्त्र ठेवण्याचा प्रयत्न केल्यास घट्ट पकडलेल्या अवस्थेत आढळून येत नाही. |
| ६. | घटनास्थळाच्या ठिकाणी अस्ताव्यस्तपणा, झटापटीच्या खुणा आढळून येत नाहीत. | ६. | अस्ताव्यस्तपणा व झटापटीच्या खुणा आढळून येतात. |
| ७. | गोळी शरीरात गेलेल्या जखमेवरून स्वत: झाडलेली आहे का ते ओळखता येते. उदा.– उजव्या हाताच्या व्यक्तीने उजव्या बाजूने गोळी झाडून घेतलेली असते. | ७. | मारेकऱ्यांची गोळी कोणत्याही दिशेने गेलेली आढळते. |

## भाजलेल्या जखमा : भाजणे व पोळणे (Burns & Scald)

**विधिवैद्यक महत्त्व :**

भाजलेल्या जखमा मृत्युपूर्व आहेत किंवा मृत्यूनंतरच्या आहेत. कारण काही गुन्हेगार एखाद्या व्यक्तीचा मृत्यू आधी घडवून आणतात (खून करतात) व तो लपविण्यासाठी देखावा निर्माण करतात म्हणून अशा वेळेस मृत्युपूर्व भाजलेल्या जखमा व मरणोत्तर भाजलेल्या जखमा यातील फरक माहीत असणे आवश्यक आहे.

| मृत्युपूर्व भाजलेल्या जखमा | मरणोत्तर भाजलेल्या जखमा |
|---|---|
| १) भाजलेल्या जखमा भोवताली लालसरपणा दिसून येतो. | लालसरपणा दिसून येत नाही. |
| २) फोड येतात. त्या फोडात द्रवपदार्थ असतो. त्या द्रवपदार्थात क्षार, प्रथिने व रक्तपेशी असतात. | सहसा फोड येत नाहीत जर फोड आल्यास त्यात फक्त हवा असते. |
| ३) जखम बरी होण्याची चिन्हे दिसून येतात (जर जखम जुनी असेल तर) | जखम बरी होण्याची चिन्हे दिसून येत नाहीत. |
| ४) जखमेत रोगजंतू गेले तर पू झालेला आढळून येतो. | पू झालेला आढळून येत नाही. |
| ५) पोस्टमार्टम करताना श्वासमार्गाच्या वरील भागात आतील बाजूस काळसर काजळीसारखा थर आढळून येतो कारण श्वास घेतांना नाकातोंडातून धूर श्वासमार्गात गेल्यामुळे असे दिसते. (हे खात्रीशीर चिन्ह मृत्यू भाजल्यामुळे असल्याचे आहे.) | शवविच्छेदनात असे आढळून येत नाही. |

**भाजणे :**

शरीराच्या पृष्ठभागास अग्नीच्या ज्वाला, उत्सर्जित उष्णता किंवा एखादा कठीण तापलेला धातू याचा स्पर्श झाल्यास ज्या जखमा होतात त्यांना भाजणे असे म्हणतात.

विधिवैद्यकाच्या दृष्टीने घर्षणामुळे निर्माण झालेल्या जखमा, ढगातून निर्माण झालेल्या विजेमुळे होणाऱ्या जखमा, घरगुती वापराच्या विजेमुळे झालेल्या जखमा 'क्ष' किरण किंवा तीव्र स्वरूपाच्या दाहक रसायनांनी झालेल्या जखमांना भाजणे असे म्हणतात.

**पोळणे :**

एखादा द्रव पदार्थ त्याच्या उत्कलन बिंदूपर्यंत तापलेला असताना अंगावर पडल्यास अथवा कोणत्याही द्रव पदार्थाची वाफ अंगावर आल्यास त्यामुळे ज्या जखमा होतील त्यांना पोळणे असे म्हणतात.

**भाजलेल्या जखमांचे वर्गीकरण :**

**१ ली डिग्री :** शरीराचा पृष्ठभाग फक्त लालसर होऊन फोड येणे.

**२ री डिग्री :** भाजल्यामुळे संपूर्ण त्वचा भाजणे.

**३ री डिग्री :** स्नायू, शरीराच्या आतील नाजूक व महत्त्वाचे अवयव व हाडे जळून नष्ट होणे.

**भाजल्यामुळे जीवितास धोका निर्माण करणारे मुद्दे :**

१) शरीराचा भाजलेला भाग (अवयव).

२) भाजलेल्या जखमेची खोली.

३) भाजलेल्या जखमांनी व्यापलेला शरीराचा पृष्ठभाग.

४) भाजलेल्या व्यक्तीचे वय.

५) उष्णतेचा शरीरावर परिणाम झालेला काळ.

६) जर शरीराच्या एकूण पृष्ठभागापैकी १/३ पृष्ठभाग भाजलेला असेल तर मृत्यू अटळ असतो.

**मरणोत्तर चिन्हे : बाह्य चिन्हे :**

१) त्वचेवर नियमित व अनियमित कडा असलेल्या भेगा आढळून येतात.

२) डोक्याच्या कवटीची हाडे सुटी सुटी झालेली असतील व त्यामधून मेंदूचा भाग बाहेर आलेला दिसेल.

३) संरक्षणात्मक (मुष्टियोध्याचा पवित्रा) या प्रकारात प्रेताचे पाय, कमर व गुडघे यामधून टाकलेले व हात कोपरामधून वाकलेले असून, मुठी घट्ट आवळलेल्या असतात. दोन्ही हात शरीराच्या समोर आढळून येतात.

**आंतर चिन्हे :**

१) डोक्याच्या कवटीच्या हाडांच्या अस्थीभंग झालेला दिसून येईल.

२) मेंदू व मेंदूवरील आवरणे रक्तसंचययुक्त आढळून येतात.

३) फुफ्फुसावरील आवरण सुजलेले व रक्तसंचययुक्त दिसून येईल.

४) फुफ्फुसे सुजलेली व रक्तसंचययुक्त आढळून येतील.

५) हृदयाचे कप्पे रक्ताने भरलेले आढळून येतील.

६) जठर व लहान आतडे यांचे आतील भाग सुजलेला व रक्तसंचययुक्त दिसून येईल.

७) लहान आतड्याच्या सुरवातीच्या भागावर बऱ्याच प्रमाणात अल्सर निर्माण झालेले दिसून येतील. हे भाजून मृत्यू झाल्याचे खात्रीशीर चिन्हे आहे.

**विधिवैद्यकीय मुद्दे :** १)भाजल्यामुळेच मृत्यू घडून आला आहे काय?

२) एखादे अर्धवट जळालेले प्रेत आढळून आल्यास त्यावरून मृत्यूचे कारण शरीराच्या न जळालेल्या भागावर गंभीर स्वरुपाच्या जखमा आढळून आल्यास बारकाईने तपासून पाहिले पाहिजे.
लहान आतड्याच्या सुरवातीच्या भागावर बऱ्याच प्रमाणात अल्सर आढळून आल्यास तो मृत्यू भाजल्यामुळेच झाला, असे सिद्ध होते.

३) भाजणे ही क्रिया अपघाती, आत्मघाती किंवा अन्यघाती होती काय?

**अपघाती :** भाजलेल्या जखमांच्यामुळे मृत्यू येणे हे अपघाती स्वरूपाचे असते.

**कारणे :**

१) खेड्यात उघड्यावर दगडांच्या किंवा विटांच्या चुलीवर स्वयंपाक करणे.

२) खेड्यात रात्री उजेडाकरिता रॉकेलच्या दिव्यांचा वापर करणे.

३) अपघाताने एकाएकी उकळत्या दुधात किंवा पाण्यात पडणे.

४) कारखाने व इंजिन रूम्स या ठिकाणी अपघाताने पोळले जाणे.

५) उष्णतेचा शरीरावर परिणाम झालेला काळ.

६) जर शरीराच्या एकूण पृष्ठभागापैकी १/३ भाग भाजून नष्ट झालेला असेल तर मृत्यू अटळ असतो.

## श्वसनावरोधामुळे होणारे मृत्यू
## (ASPHYXIAL DEATHS)

कुठल्याही बाह्य किंवा अंतर कारणाने श्वसनमार्गात अडथळा आल्याने प्राणवायू न मिळाल्याने मृत्यू होतो, त्यालाच श्वसनावरोधाने मृत्यू झाला असे म्हणतात.

मनुष्य स्वतःस फाशी घेणे किंवा दुसऱ्याला फाशीवर टांगणे, गळा दाबणे, पाण्यात बुडणे, श्वसनमार्गात काही वस्तू अडकणे, भिंत, जडवस्तु छातीवर पडल्याने गुदमरणे अशा अनेक कारणांने श्वसनावरोध होतो.

एखादी दोरी किंवा इतर वस्तूंनी गळ्याभोवती फास लावून श्वसनक्रियेत लागणारा रक्त व पेशी यांना आवश्यक असलेला प्राणवायू न मिळाल्याने किंवा इतर कारणांनी प्राणवायू न मिळाल्याने श्वसनक्रिया बंद होऊन मृत्यू येतो.

१) फाशी - स्वत: किंवा दुसऱ्याने फासावर लटकवणे.

२) स्ट्रॅग्युलेशन - गळा दाबून-आवळून, नाक व तोंड दाबणे.

३) गुदमरणे - छातीवर दाब पडणे.

४) पाण्यात बुडून या कारणांनी होतात. १) अपघाती, २) आत्महत्या, ३) अन्यघाती खून करणे किंवा ४)

कायदेशीर फाशीची शिक्षा ही कारणे असू शकतात.

**श्वसनावरोधाची कारणे : दोन**

१) बाह्य कारणे – फाशी, गळफास, गळा दाबणे इत्यादी.

२) प्राणवायूची कमतरता कमी व अधिक उंचीवर जाणे.

अ) विषारी वायूंचा प्रादुर्भाव, हवेत वाढलेले कार्बनडाय ऑक्साईड, अमोनिया, हायड्रोजन सल्फाईड व इतर विषारी वायू.

क) नाक व तोंड दाबून श्वसनक्रिया बंद करणे.

ड) श्वसननलिकेवर दाब, गळ्यावर दाब,

फ) पाण्यात बुडून

ग) विषबाधेमुळे श्वसनक्रियेत अडथळा व बंद होणे.

ह) श्वसननलिकेत काही वस्तू अडकून

न) स्ट्रिकनिनची विषबाधा किंवा धनुर्वाताचे झटके

**फाशीची लक्षणे :**

१) निळसर रंगाचा सुजलेला चेहरा, नेत्रावरण लाल दिसतात.

२) डोळे – डोळे उघडे, जीभ – तोंडातून बाहेर पडलेली किंवा दोन्ही हातात अडकलेली, चावलेली.

३) ओठ – निळसर (तोंडातून लाळ निघालेली), तोंड, नाक, कानातून रक्तस्राव, लघवी–शौचास आपोआप झालेली.

| शरीर टांगून फाशी (Hanging) | | गळ्यावर दाब देऊन गळफास लावून (Strangulations) | |
|---|---|---|---|
| १) | निळसर रंगाचा सुजलेला. (कायदेशीर फाशी सोडून) | १) | हा अन्यघाती प्रकार असतो. |
| २) | फासाचे चिन्ह तिरपे तुटक मानेवरून स्वरपेटी हनवटी यामध्ये. | २) | चिन्ह आडवे – पूर्ण जीव घेणाऱ्याचा कंठावर जास्त भर असतो. |
| ३) | मानेच्या स्नायूंना इजा कमी. | ३) | मानेचे स्नायू फाटलेले आढळतात. |
| ४) | फासाचे चिन्हाचे आजूबाजूला क्वचित इजा झालेली आढळते. | ४) | चिन्हाचे आजूबाजूला खरचटल्याच्या खुणा दिसता रक्तसंचय झाल्यास पुरावा विशेषत्वाने दिसतो. |
| ५) | तुरुंगातील फासात स्वरयंत्र किंवा श्वास नलिका यांना क्वचित धक्का लागेल. मानेच्या दुसऱ्या मणक्याचा अस्थिभंग होऊन पर्यायाने मज्जा रज्जूला इजा होईल. | ५) | स्वरयंत्र व श्वासनलिका फाटलेल्या आढळतात. |
| ६) | मानेवर, चेहऱ्यावर चेंगरणे, खरचटणे अशा जखमांचा अभाव. | ६) | प्रतिकारामुळे मानेवर, चेहऱ्यावर खुणा दिसतात. |
| ७) | बाह्यचिन्हे कमी उठावदार. | ७) | सुजलेल्या चेहऱ्यापासून जीभ बाहेर निघेपर्यंत सर्व चिन्हे उठावदार. |
| ८) | नाक – तोंड कान यातून रक्त क्वचित वाहील. | ८) | नाक – तोंड, कान यातून रक्त वाहिलेले आढळेल. |
| ९) | कलत्या तोंडातून लाळेचे ओघळ हनुवटीवर, छातीवर आलेले आढळतात. | ९) | तसा प्रकार आढळत नाही. |
| १०) | मानेची लांबी वाढलेली दिसते. | १०) | मानेची लांबी वाढलेली दिसत नाही. |
| ११) | जखम पन्हाळी सारखी खोल. | ११) | जखम जास्त खोल नसते. |
| १२) | गाठ सरकती किंवा सैल व फासा एक. | १२) | फासा किंवा गाठ अनेक असू शकतात. |

**I) गळफास :** गळ्याभोवती दोरीचा फास लावून एखादे उंच ठिकाणी शरीर टांगले असता जो मृत्यू घडून येतो, त्यास गळफासाने मृत्यू आला असे म्हणतात. श्वासनलिका दाबली गेल्यामुळे श्वसनावरोधामुळे हृदय बंद पडते.

**गळफासामध्ये मृत्यूची कारणे :**

**अ) श्वसनावरोध :** गळफासामुळे श्वासनलिकेचा मार्ग बंद होऊन मृत्यू घडून येतो. गळफास जर गळ्याच्या खालच्या भागावर लावण्यात आला असेल अशा दोरीची गाठ जर श्वासनलिकेवर असेल तर श्वासनलिका बंद होऊन मृत्यू घडून येतो.

**ब)** निरनिराळ्या कारणाने मेंदूतील रक्तवाहिनीस इजा होऊन मेंदूच्या आतील भागात रक्तस्राव होऊन बेशुद्धी येते आणि त्यामुळे मृत्यू घडून येतो असे म्हणतात.

जर फासाकरिता जाड, रुंद आणि मऊ अशा प्रकारची दोरी किंवा चादर उदा. फेटा, मफलर, धोतर, साडी, दुपट्टा इ. वापरलेले असल्यास गळ्यावरील रक्तवाहिन्या दाबल्या जातात व त्यामुळे मेंदूमधून रक्त हृदयाकडे येऊ शकत नाही. मेंदूमधील रक्तवाहिन्यांवर अतिशय दाब पडतो व त्या फुटतात व मृत्यू घडून येतो.

**क)** गळफासामुळे श्वासनलिकेवर दाब पडतो व श्वसनमार्ग बंद होतो, त्याचबरोबर गळ्यावरील रक्तवाहिन्या दाबल्या जाऊन मेंदूमध्ये रक्तस्राव होऊन मृत्यू घडून येतो.

**ड) हृदयावरोध :** गळफासामुळे श्वासनलिका दाबली गेल्यामुळे श्वसनावरोध होतो व त्यामुळे हृदयाला रक्तपुरवठा होत नाही म्हणून हृदय बंद पडते व हृदयावरोध होतो.

**इ) कोमा :** गळफासाच्या दोरीने गळ्यावर अतिशय दाब येऊन बेशुद्ध पडून अशुद्ध व शुद्ध रक्तवाहिन्या या एकदम दाबल्या जाऊन मेंदूमधील रक्ताभिसरणाने मृत्यू घडून येतो.

**ई) मानेच्या मणक्याचा अस्थिभंग व मानेचा मणका निखळणे :** तुरुंगातील फाशीप्रमाणे जर ती व्यक्ती फास लावून ५ ते ७ फूट उंचीवरून खाली पडली असेल त्यावेळेस या प्रकारे मानेच्या मणक्याला इजा होऊन मृत्यू घडून येतो. मानेच्या मणक्याचा अस्थिभंग झाल्यास मज्जारज्जू तुटतो व मानेचा मणका निखळल्यास मज्जारज्जू दाबला जातो. अशा प्रकारात मृत्यू काही क्षणातच घडून येतो.

**गळफासाचे विधिवैद्यकीय मुद्दे :**

| | मृत्युपूर्व गळफास | | मरणोत्तर गळफास |
|---|---|---|---|
| १) | दोरीची खूण : (मृत्युपूर्व) तिरपी व उभी असते. | १) | दोरीची खूण : सलग वर्तुळाकार. |
| २) | दोरी गाठ : दोरीची गाठ सहसा एकच असते आणि डाव्या किंवा उजव्या कानाजवळ असते. | २) | दोरीच्या गाठी एकापेक्षा जास्त असतात आणि गळ्याच्या समोरच्या भागावर आढळून येतात. |
| ३) | चेहरा सुजलेला आढळून येईल. डोळे रक्तसंचयुक्त वटारलेले व कानशिलावरील रक्तवाहिन्या कपाळावरील व मानेवरील रक्तवाहिन्या तट्ट फुगलेल्या अशा आढळून येतील. | ३) | हे चिन्ह आढळून येणार नाही. |
| ४) | जीभ बाहेर पडलेली आढळून येईल. | ४) | जीभ बाहेर पडलेली दिसून येणार नाही. |
| ५) | मृत्यूपूर्व प्रकारात पुरुषाचे बाबतीत जननेंद्रिय किंवा लिंग ताठ झालेले असेल आणि वीर्यपतन झालेले असेल. | ५) | लिंग ताठ, किंवा वीर्यपतन झालेले आढळून येणार नाही. |
| ६) | या व्यक्तीस शौचास व लघवी झालेली आढळून येईल. | ६) | शौचास व लघवी झालेली आढळून येणार नाही. |

न्यायवैद्यकीय दृष्टीकोनातून प्रश्न :

१) मृत्यू गळफासानेच झाला आहे काय?

२) गळफास हा आत्मघाती, अन्यघाती आणि अपघाती आहे काय?

एखाद्या वेळेस एखाद्या व्यक्तीचा खून करून खुनासारखा गुन्हा उघडकीस येऊ नये अथवा खुनाचा आरोप आपल्यावर येऊ नये म्हणून मारल्यानंतर प्रेत टांगून ठेवण्यात येते. म्हणून गळफासाने मृत्यू सिद्ध करण्यासाठी ती व्यक्ती टांगलेल्या स्थितीत होती काय आणि या अशा टांगल्यामुळेच मृत्यू घडून आला काय हे सिद्ध करावे लागते.

| | गळफास हा आत्मघाती | | गळफास हा अन्यघाती |
|---|---|---|---|
| १) | सहसा प्रौढ माणसेच या प्रकारे आत्महत्या करतात. १० वर्षांखालील मुले आणि म्हातारी माणसे गळफास लावून आत्महत्या करीत नाहीत. | १) | कोणत्याही प्रकारची वयोमर्यादा नाही. |
| २) | गळफासाची खूण आत्मघाती प्रकारात तिरपी व तुटक व गळ्याच्या वरच्या भागावर आढळून येईल. | २) | गळफासाच्या दोरीची खूण गळ्याच्या भागावर, गळ्यावर आडवी व वर्तुळाकार अशी असते. |
| ३) | या दोरीची एकच गाठ असते आणि ती गळ्यावर उजव्या किंवा डाव्या बाजूने असते. तोंडातून लाळ गाठीया विरूद्ध दिशेला ओघळतांना दिसते. | ३) | दोरीची गाठ एकापेक्षा जास्त व गळ्यापर्यंत किंवा मागे असते. तोंडातून लाळ दिसून येत नाही. |
| ४) | शरीरावर झटापटीच्या किंवा केलेल्या खुणा आढळून येणार नाहीत. | ४) | शरीरावर धडपड केल्याचा झटापटीच्या खुणा आढळून येतील. परंतु मेलेली व्यक्ती जर लहान असेल किंवा ती व्यक्ती जर मादक द्रव्यांच्या अंमलाखाली असेल तर मात्र प्रतिकार केल्याची चिन्हे आढळून येणार नाहीत. |
| ५) | शरीरावर गंभीर आणि मोठ्या जखमा दिसून येणार नाहीत. | ५) | शरीरावर गंभीर स्वरूपाच्या व विस्तृत जखमा आढळून येतील. |
| ६) | मयताचे हात बांधलेले आढळून येणार नाहीत. | ६) | मयत व्यक्तीचे हात जर बांधलेले आढळून आले तर तो अन्यघाती प्रकार आहे असे समजावे. |
| ७) | प्रेत जर घरात सापडले तर घराची दारे खिडक्या व मुख्यगेट आतील बाजूने कड्या लावून बंद केलेले आढळून येतील. | ७) | दारे खिडक्या व गेटबाहेरच्या बाजूने बंद केलेली आढळून येतील. |

**II) गळा दाबणे :**

१) हा एक भयंकर अकस्मात मृत्यूचा प्रकार आहे. यामध्ये गळ्याभोवती दोरी गुंडाळून आवळल्यामुळे श्वसनमार्ग बंद होतो. परंतु शरीर लोंबकळलेले किंवा टांगलेले नसते.

२) गळ्यावर जर दाब हाताच्या बोटाच्या सहाय्याने दिला असेल तर त्याला गळा दाबणे (Throttling)असे म्हणतात.

३) गळ्यावर दाब, पाऊल, गुडघा, कोपर अथवा अन्य कोणत्याही कठीण साधनाने गळा दाबल्याचे प्रकार संभवतात.

**मरणोत्तर चिन्ह : (बाह्य) :**

१) दोरीची खूण गळ्यावर स्पष्ट तसेच ज्या साधनाने गळा आवळला असेल त्या वस्तुच्या इतकी खूण दिसून येते.

२) दोरीची खूण गळ्यावर स्वरयंत्र किंवा स्वरयंत्राच्या खाली अशी असते.

३) दोरीची खूण श्वासनलिकेवर आडवी, पावलांशी समांतर तसेच गळ्यावर सर्व बाजूने वेढलेली अशी दिसून येते.

४) दोरीच्या खुणा एकापेक्षा जास्त आढळून आल्यास दोरी गळ्याभोवती बऱ्याचवेळा गुंडाळलेली आहे, असे सिद्ध होते.

५) जर मयत व्यक्ती बसलेल्या स्थितीत असेल आणि तिच्या गळ्याभोवती दोरी गुंडाळून काही अंतरापर्यंत ओढत नेलेली असेल तर गळ्यावरची खूण तिरपी दिसेल.

६) हाताने गळ्याच्या समोरच्या भागावर दाब दिल्यास श्वासनलिकेच्या दोन्ही बाजूला बोटांच्या खुणा आढळून येतील. अंगठ्याची खूण किंचित बाहेरच्या बाजूस अशी आढळून येईल. बोटांच्या खुणा अंगठ्याच्या खुणेच्या विरुद्ध बाजूस दिसतील.

७) गळ्यावर ओरबडण्याच्या, खरचटल्याच्या व सुजेच्या खुणा दिसून येतात. कारण मयत व्यक्तीने गळा आवळताना धडपड केलेली असते.

८) मयत व्यक्तीच्या छातीवर गुडघे टेकून बसून जर गळा आवळलेला असेल तर बरगड्या व छातीच्या हाडांचा अस्थिभंग तसेच छातीच्या आणि पोटाच्या पोकळीतील महत्त्वाच्या अवयवांना गंभीर दुखापती झालेल्याची चिन्हे आढळून येतील.

९) जर काठीच्या सहाय्याने किंवा पावलाने गळ्यावर दाब दिला असेल तर गळ्याच्या समोरच्या भागावर श्वसनलिकेवर आडवी सूज आलेली दिसून येईल.

**विधिवैद्यकीय मुद्दे :**

१) मृत्यू गळा दाबल्यामुळेच घडून आलेला आहे काय?

२) हे अन्यघाती, आत्मघाती, अपघाती होते काय?

३) काही वेळेस गळ्यावर दोरीची खूण अगदी अस्पष्ट अशी असते किंवा दोरीची खूण बाहेरून दिसत सुद्धा नाही. गळा आवळण्यासाठी जर रेशमासारखी मऊ दोरी किंवा साधन वापरलेले असल्यास असे घडून येते.

४) काही वेळेस मृत्यूनंतर सुद्धा दोरी बांधलेली आढळून येते व त्यामुळे सुद्धा गळ्यावर दोरीची खूण दिसून येईल.

५) प्रेत जर अत्यंत कुजलेल्या स्थितीत असेल तर गळा फुगीर व सुजलेला असा दिसतो. त्यामुळे मृत्यूचे वेळी गळ्याभोवती असलेले कापड उदा. शर्टाची कॉलर, नेकटाय, मफलर इत्यादी साधने फुगलेल्या गळ्यात रुतून बसते. त्यामुळेसुद्धा गळ्याजवळ दोरीने आवळण्यासारखी खूण दिसून येऊ शकते. म्हणून मृत्यू श्वसनावरोधामुळेच घडून आलेला आहे हे सिद्ध करण्यासाठी मानेच्या आतल्या बाजूस जे अवयव असतात. त्याच्यावरील झालेला परिणाम तसेच श्वसनावरोधाने झालेल्या मृत्यूची चिन्हे विचारात घेऊन निर्णय घ्यावयाचा असतो.

१) **आत्मघाती :** याची उदाहरणे दिसून येत नाहीत. जवळ जवळ नसतातच.

२) **अन्यघाती :** गळ्यावरील दोरीची खूण तसेच श्वसनावरोधाने झालेल्या मृत्यूची चिन्हे या व्यतिरिक्त त्या व्यक्तीने प्रतिकार केल्याची चिन्हे तसेच धडपडीची चिन्हे शरीराच्या इतर भागावर आढळून येतील.

३) **अपघाती :** हे सुद्धा फार क्वचित आढळून येते. परंतु काही काही वेळेस शर्टाची कॉलर, नेकटाय, नेकपॅन्ट, एखाद्या फिरत्या यंत्राच्या चाकात अडकल्यामुळे किंवा एखादी दोरी आकस्मिकरीत्या गळ्याभोवती गुंडाळली

जाऊन मृत्यू झाल्याची उदाहरणे दिसून येतात. या गोष्टी मुख्यत: ज्या व्यक्ती मादक द्रव्यांच्या अंमलाखाली असतात किंवा फिट वा झटका येताना असे होण्याची दाट शक्यता असते.

**गळफास**

| | गळफास | | गळा दाबणे |
|---|---|---|---|
| १) | गळफास हा मुख्यत्वे करून आत्मघाती असतो. | १) | स्ट्रॅंग्युलेशन बहुधा अन्यघाती असते. |
| २) | गळफासामध्ये दोरीची खूण गळ्यावर तिरपी, तुटक आणि गळ्याच्या वरच्या भागावर दिसून येते. | २) | दोरीची खूण गळ्यावर एकदम आडवी, स्वरयंत्राचे खाली, सलग व संपूर्ण गळ्याभोवती आवळेलेली अशी दिसून येते. |
| ३) | गळफासात फास घेतल्यानंतर जर ती व्यक्ती बऱ्याच उंचावरून पडलेली असेल तर गळ्याचे स्नायूंना इजा झालेली दिसून येईल. | ३) | गळ्याच्या स्नायूंना इजा झालेली दिसून येते. |
| ४) | उंचीवरून पडल्यामुळे मानेचा मणका तुटलेला किंवा निखळलेला. | ४) | मानेच्या मणक्याला सहसा इजा झालेली दिसून येत नाही. |
| ५) | शरीराच्या इतर भागावर तसेच चेहऱ्यावर, कपाळावर झडापटीची चिन्हे दिसून येणार नाहीत. | ५) | स्ट्रॅंग्युलेशनमध्ये चेहऱ्यावर, कपाळावर, छातीवर तसेच शरीराच्या इतर भागावर ओरखडणे, खरचटणे व सुजेची चिन्हे दिसून येतात. |
| ६) | गळफासामध्येच तोंडाच्या एका बाजूतून पोटावर व छातीवर एका उभ्या सरळ रेषेत लाळ गळालेली दिसून येते. | ६) | तोंडातून लाळ गळाल्याचे चिन्ह दिसून येणार नाही. |
| ७) | गळफासामध्ये प्रेत टांगलेल्या स्थितीत आढळून येते. | ७) | स्ट्रॅंग्युलेशनमध्ये प्रेत मुख्यत्वे करून टांगलेले आढळून येणार नाही. |
| ८) | मरणोत्तर नीलिमा दोरीच्या खुणेच्या वरच्या भागात व पायामध्ये दिसून येईल. | ८) | त्या व्यक्तीची मरताना जशी स्थिती असेल त्याप्रमाणे जमिनीकडे झुकलेल्या भागावर मरणोत्तर नीलिमा आढळून येईल. (बहुदा चेहरा किंवा खांद्यावर) |

### ३) बुडून मृत्यू (Drowning Death) :-

एखादी व्यक्ती पाण्यात किंवा इतर कोणत्याही द्रव पदार्थांत पडल्यामुळे वातावरणातील हवा फुफ्फुसात जाऊ न शकल्यामुळे मृत्यू घडून येतो. यालाच ड्राऊनिंग किंवा पाण्यात बुडून मृत्यू असे म्हणतात. सर्व शरीर पाण्यात बुडालेच पाहिजे असे नाही. नुसते तोंड आणि नाक जरी पाण्यात बुडाले तरी मृत्यू घडून येतो.

**बुडाल्यामुळे मृत्यू येण्याची कारणे :**

१) **शॉक :** एकाएकी व अनपेक्षितपणे पाण्यात पडल्यामुळे भयंकर भीतीने धक्का बसून मृत्यू घडून येतो.

२) **हृदयावरोध :** एखादी व्यक्ती पाण्यात पडताना पाण्याच्या पृष्ठभागाचा भार छाती व पोटावर बसून व्हेगस प्राणदानाडी कार्य बंद पडते व हृदयक्रिया एकाएकी थांबते.

३) **मेंदूला जखम होणे :** एखादी व्यक्ती डोक्यावर किंवा कमरेवर पाण्यात पडल्यावर पाण्याच्या तळाशी असलेल्या कठीण, टणक पदार्थावर आदळल्यामुळे मेंदूला गंभीर स्वरूपाची दुखापत होते व मृत्यू घडून येतो.

४) **मेंदूतील रक्तस्राव :** थंडीच्या दिवसात अतिशय थंड पाण्यात पडल्यामुळे, तसेच भयंकर भीती वाटल्यामुळे एकाएकी सर्व शरीर उत्तेजित झाल्यामुळे रक्ताचा प्रवाह मेंदूकडे सुरू होतो. अगोदरच काही आजारामुळे मेंदूची रक्तवाहिनी कमकुवत झालेली असल्यास हा रक्ताचा दाब ती सहन करू शकत नाही. त्यामुळे सदरची

रक्तवाहिनी फुटून मेंदूत रक्तस्राव सुरू होतो. बेशुद्धी येते व मृत्यू घडून येतो.

५) **थकवा :** खोल पाण्यात पडण्यामुळे जीव वाचविण्याकरिता पाण्याच्या पृष्ठभागावर राहण्यासाठी बराच काळ धडपड केल्यामुळे भयंकर स्वरूपाचा थकवा येऊन शेवटी मृत्यू घडून येतो.

६) **जखमा :** ज्यावेळेस एखादी व्यक्ती एखाद्या अरूंद विहिरीत किंवा विहिरीच्या भिंतीशी डोके आपटून डोक्याच्या कवटीचा अस्थिभंग किंवा मानेच्या मणक्यांचा अस्थिभंग तसेच निखळणे या जखमामुळे मृत्यू घडून येतो.

७) **श्वसनावरोध :** पाण्यात पडून मृत्यूचे हे एक प्रमुख कारण आहे. पाण्यात पडल्यानंतर २/४ मिनिटात मृत्यू घडून येतो. फुफ्फुसात शिरलेले पाणी हवेत मिसळते व फेस तयार होतो ह्या फेसामुळे हवा शिरण्याचा मार्ग बंद होतो.

८) **मरणोत्तर चिन्हे : बाह्य चिन्हे :**

अ) प्रेत पाण्यातून काढल्यानंतर ताबडतोब तपासून पाहिल्यास प्रेतावरील कपडे भिजलेले आढळून येतील.

ब) डोळे अर्धवट उघडे किंवा संपूर्ण झाकलेले, लालसर, रक्तसंचययुक्त असे दिसतील. डोळ्याच्या बाहुल्या प्रसरण पावलेल्या आढळून येतील.

क) जीभ सुजलेली आणि बाहेर पडलेली दिसून येईल.

ड) क्युटीस अन्सेरिना : त्वचा खडखडीत आणि सुरकुतलेली अशी दिसते. त्या अवस्थेला Cutes Anserina क्युटीस अन्सेरिना असे म्हणावे. थंडीचे दिवसात पाणी अतिशय थंड असताना त्यात बुडून मरण पावल्यास त्या व्यक्तीची त्वचा खरबरीत, दाणेदार व सुरकुतलेली अशी दिसून येते. त्वचेवरील केस मुळांना इरेक्टर पायली (Erector Pillae) स्नायूंच्या तंतूंचे एकाएकी आकुंचन झाल्यामुळे हे चिन्ह निर्माण होते. जिवंतपणी पाण्यात पडल्यानंतरच हे चिन्ह दिसू शकते. म्हणून बुडून मृत्यू आल्याचे हे खात्रीशीर चिन्हे आहे.

इ) पुरुषांच्या बाबतीत अंडकोश आणि लिंग आत ओढलेले व आकुंचन पावलेले असे दिसून येईल. स्त्रियांचे बाबतीत स्तनाग्रे आत ओढली गेलेली आढळून येतील.

ई) मयताचे हातात गवत, शेवाळ, चिखल, वाळू, जल वनस्पतीच्या फांद्या किंवा पाने, काठी इत्यादी घट्ट धरलेले आढळून येईल.

उ) बोटांच्या नखात वाळू, चिखल, शिरलेला आढळून येईल. हातापायांच्या बोटांना खरचटलेल्याच्या जखमा दिसून येतील. तळहात व तळपायाची त्वचा पांढरी स्वच्छ दिसते. या चिन्हास धोबीचे हात (Washerman's hand) असे म्हणतात.

**आंतर चिन्हे :**

१) मेंदू व मेंदूवरील आवरणे लाल व रक्तसंचययुक्त अशी दिसतात.

२) फुफ्फुसे एखाद्या रबरी फुग्यात हवा भरल्याप्रमाणे फुगीर, जड, सुजलेली अशी दिसून हाताने स्पर्श केल्यास स्पंजाप्रमाणे लागतात व फुफ्फुसे कापून बघितल्यास बऱ्याच प्रमाणात लालसर फेसयुक्त द्रव बाहेर आलेला दिसून येतो.

३) स्वरयंत्र, श्वासनलिका व सूक्ष्म श्वासनलिका यांच्यात बारीक पांढरा साबणासारखा फेस गोळा झालेला दिसून येतो. तसेच वाळू, चिखल, जलवनस्पतीचे तुकडे इत्यादी गेलेले आढळून येतात. या अवयवांची आंतरत्वचा लाल रक्तसंचययुक्त अशी दिसते.

४) हृदयाची उजवी बाजू रक्ताने भरलेली व डावी बाजू रिकामी असते.

५) जठरात बऱ्याच प्रमाणात पाणी आढळून येते. जठरात पाणी आढळून येणे हे बुडाल्यामुळे मृत्यू आल्याचे महत्त्वाचे चिन्ह आहे. एखाद्या व्यक्तीस मारून टाकल्यानंतर पाण्यात बुडविल्यास जठरात पाणी आढळून येणार नाही. तसेच जठरात शेवाळ, जलवनस्पतीचे तुकडे व बारीक तंतू गेलेले आढळून येतील.

६) लहान आतड्यात वाळू व चिखलमिश्रित भरपूर पाणी आढळून येईल. आतड्यात पाणी असणे हे सुद्धा जिवंतपणी पाण्यात बुडाल्याचे खात्रीशीर व महत्त्वाचे चिन्ह आहे. त्याचप्रमाणे आतड्यात बारीक शंख व जलवनस्पतीचे तुकडे आढळून येतात. मृत्यूनंतर पाण्यात बुडविल्यास आतड्यामध्ये या बाह्य वस्तू आढळून येणार नाहीत. आतड्यात पाणी हे जठराच्या नियमित आकुंचन प्रसरणामुळे हालचालीमुळेच जाऊ शकते. यकृत लालसर पातळ रक्ताने भरलेले आढळून येईल. प्लिहा व मूत्रपिंड गडद लाल रंगाचे दिसून येईल. मध्य कर्णात पाणी शिरलेले आढळून येईल. एखादी व्यक्ती पाण्यात पडल्यानंतर श्वास घेण्याच्या प्रयत्नात पाणी गिळताना थोडेसे पाणी मध्यकर्णाकडे ढकलले जाते. मध्य कर्णात पाणी आढळून येणे हे सुद्धा बुडाल्यामुळे मृत्यू आल्याचे खात्रीशीर चिन्ह आहे.

### वैद्यकीय मुद्दे :

मृत्यू हा पाण्यात बुडाल्यामुळेच घडून आलेला आहे काय? पाण्यात बुडून मृत्यू आलेला असल्यास ते सिद्ध करण्यासाठी शरीराच्या बाह्य भागावर व अंतर्गत अवयवांना काही गंभीर स्वरूपाच्या जखमा असल्यास त्याची नोंद घ्यावी लागते. तसेच विषबाधेची चिन्हे आढळून आल्यास त्याची नोंद घेऊन त्याबाबत मत व्यक्त करावयाचे असते. त्यासाठी खालीलप्रमाणे मुद्दे विचारात घ्यावे लागतात.

नं.१ १) नाका तोंडावर साबणासारखा पांढरा बारीक बुडबुड्याचा फेस गोळा झालेला दिसून येतो.

२) मयताचे हातात त्या पाण्यात असलेल्या एखादा पदार्थ घट्ट आवळून धरलेला असतो.

३) श्वसनमार्गास बारीक पांढरा फेस आढळून येणे.

४) जठरात किंवा लहान आतड्यात किंवा दोन्हीमध्ये पाणी, चिखल, वाळू, पाणवनस्पतीचे तुकडे इत्यादी आढळून येतात.

५) मध्यकर्णात पाणी सापडणे.

६) फुफ्फुसे हवा भरलेल्या रबरी फुग्याप्रमाणे फुगीर व जड लागणे, तसेच फुफ्फुसे कापून पाहिल्यावर त्यामध्ये लालसर फेसमिश्रित बराचसा द्रवपदार्थ बाहेर आलेला आढळून येतो.

नं. २ अ) बुडण्याची क्रिया ही अपघाती आत्मघाती किंवा अन्यघाती होती काय?

ब) बुडण्याची क्रिया मुख्यत्वे करून अपघाताने होत असते. काही प्रमाणात आत्मघाती असते आणि फार क्वचीत प्रसंगी अन्यघाती असते.

### १) अपघाती बुडणे :

१) ज्यावेळी पोहता न येणाऱ्या व्यक्ती समुद्र, नद्या, कालवे किंवा तळी यांच्या खोल पाण्यात चुकून जातात व त्यात बुडून मरण पावतात.

२) पवीत्र धार्मिक ठिकाणी खोल पाण्यात यात्रेकरू अंघोळ करताना त्यात बुडून मरतात. अशावेळी मयत व्यक्तीच्या कमरेला लहानसे फडके किंवा पंचा गुंडाळलेला असतो व बाकीचे शरीर उघडे नग्न असते.

३) विहिरीचे पाण्यात बुडून श्वास कोंडल्याने मृत्यू येतो.

४) तळ्याच्या काठी किंवा कालव्याच्या काठी खेळत असताना लहान मुले पाण्यात त्यात एकाएकी पडून बुडून मरण पावतात. त्याचप्रमाणे घरातील पाणी साठविण्याच्या भांड्यात अपघाताने पडून मरण पावतात.

५) मादक द्रव्यांच्या अंमलाखाली असलेली एखादी व्यक्ती किंवा वेड्याचा झटका अथवा फिटचा झटका

आलेला असताना उथळ पाण्यात देखील अपघाताने बुडून मृत्यू येऊ शकतो.

**२) आत्मघाती बुडणे :**

आत्मघाती बुडून मृत्यू झालेला असल्यास खालील मुद्दे विचारात घ्यावे लागतात.

१) प्रेतास जड वस्तू बांधलेल्या आढळून येतात.

२) प्रेताचे हात व पाय अशा तऱ्हेने बांधलेले असतील की ते स्वत: त्या व्यक्तीसच शक्य आहे.

३) आत्महत्येचा प्रकार खोल पाण्यातच केलेला असतो.

४) शरीरावर कोणत्याही जखमा आढळून येणार नाहीत. परंतु काही जखम आढळून आल्यास त्या विहिरीत किंवा आडात पडताना एखाद्या वस्तुशी संपर्क येऊन झालेल्या असणे शक्य असते.

**३) अन्यघाती बुडणे :**

१) मयताचे शरीरावर गंभीर स्वरूपाच्या जखमा व प्रतिकाराची, झटापटीची चिन्हे आढळून येतात.

२) हात आणि पाय दुसऱ्या एखाद्या व्यक्तीने एकत्र बांधल्यासारखे आढळून येतात.

३) मयत व्यक्ती जर तरुण असेल तर उथळ पाण्यात फक्त चेहराच बुडविलेला आढळून येईल.

## शवविच्छेदन (POST MORTEM)

शव विच्छेदनालाच Autopsy mecropsy thanopsy असे म्हणतात.

ही एक शास्त्रशुद्ध व पदध्तीशीर अशी तपासपद्धती आहे.

शव विच्छेदन चार प्रकारे करतात :

१) शरीररचना प्रेत तपासणी Anotomical

२) वैद्यकीय कायदेशीर (न्याय वैद्यकीय) प्रेत तपासणी Medicolegal

३) आभासी (Virtual) (सीटी स्कॅन एम.आर.आय. ३ डी)

४) मानसिक (psychological)

आपण न्याय वैद्यकीय शवविच्छेदन कशासाठी करतात ते पाहुया.

१. मृत्यूचे कारण शोधण्यासाठी, मृत्यू नैसर्गिक की अनैसर्गिकरित्या झाले हे पाहण्यासाठी.

२. मृत्यू अनैसर्गिक असेल तर तो अपघाती आहे की अन्यघाती किंवा अपघात पाहण्यासाठी.

३. मृत्यूची वेळ निश्चित कारण्यासाठी

४. अनोळखी प्रेताची ओळख पटविण्यासाठी

५. मृत्यूबाबत वस्तूनिष्ठ माहिती न्यायालयात सादर करण्यासाठी.

६. नवजात अर्भकाचा जन्म जिवंतजन्म आहे की मृत्यूजन्म हे ठरवण्यासाठी

७. दवाखान्यात दाखल झाल्यानंतर २४ तासात मृत्यू झाला आहे की, नंतर हे ठरविण्यासाठी.

शवविच्छेदन हे नोंदणीकृत सरकारी वैद्यकीय व्यवसायिक किंवा शासकीय वैद्यकीय अधिकारी (एम.बी.बी.एस. किंवा त्यापेक्षा अधिक पात्रता व अनुभव असलेली व्यक्ती) करू शकतात.

वैद्यकीय अधिकाऱ्याला कार्यक्षेत्राच्या मर्यादा नाही तसेच पोलीसांकडून आणलेल्या कोणत्याही मृतदेहावर (पुरूष/ स्त्री) शवचिकित्सा करू शकतात.

(महाराष्ट्र स्विहील मेडिकल कोड भाग-१, १९५१ प्रकरण ----२०/४)

विनाविलंब शवचिकित्सा करावी.

शवचिकित्सा ही शक्यतोवर दिवसाच्या प्रकाशातच करावी पण रात्री शवचिकित्सा करू नये असा कायदा नाही. (महाराष्ट्र सिव्हील मेडिकल कोड भाग-१, १९५१ पाठ - २०/९ आणि २४)

मृतदेहाची लगेचच दिवसाच्या उजेडात सुर्यात्सापूर्वीच शवचिकित्सा करावी जर मृतदेह सुर्यास्तानंतर आला असेल तर शवचिकित्सा दुसऱ्यादिवशी सकाळी करावी. (महाराष्ट्र सिव्हील मेडिकल कोड भाग-१, १९५१ पाठ -२०/२७)

शवागृहातच शवचिक्त्सिा करावी. (जेव्हा शक्य असेल, तेव्हा) कधीही खाजगी कक्षात शवचिकित्सा करू नये. कोणीही अनाधिकृत व्यक्ती शविचिकित्सेदरम्यान उपस्थित असू नये जसे नातेवाईक, राजकारणी, वकील, वार्ताहर, पोलीस इ.

मृतदेह पोलीस शिपाई जो सोबत असेल त्यांनी ओळखावा.

जर उपचारादरम्यान आजारी व्यक्ती मृत पावल्यास उपचार करत असणाऱ्या डॉक्टरने शवचिच्छेदन करू नये. तसेच.

मृत व्यक्ती जर जवळची नातेवाईक किंवा मित्र असेल तर त्या डॉक्टरांनी शवविच्छेदन करू नये.

संशयित अनैसर्गिक मृत्यू असेल उदा. तरूण विवाहित स्त्री. (जळीत प्रकरण) गर्भपातानंतर मृत्यू बलात्कार आणि खून शवचिकित्सा दोन वैद्यकीय अधिकाऱ्यांनी करावी.

वैद्यकीय अधिकाऱ्यांनी पहिले पोलीस पंचनामा वाचावा व त्या मधल्या नोंदी शरीरावर आढळणाऱ्या नोंदीसोबत पडताळून घ्यावा.

वैद्यकीय अधिकारी गरज पडल्यास तज्ञांचा सल्ला घेऊ शकतात मृत्यूचे कारण निश्चित करण्यासाठी शवचिकित्सा अहवाल त्याच दिवशी किंवा लवकरात लवकर किंवा २४ तासाच्या आत द्यावा. कारण तपशील स्मरणशक्तीच्या आधारे देऊ शकत नाही. (जर जास्त उशीर झाला तर) (महाराष्ट्र सिव्हील मेडिकल कोड भाग-१, १९५१ भाग २०/३७)

शवचिकित्सा अहवालाची एक प्रत जिल्हा शल्यचिकित्सकाकडे पाठवावी (महाराष्ट्र सिव्हील मेडिकल कोड भाग- १, १९५१ पाठ - २०/१८)

## खाजगी डॉक्टर :

खाजगी डॉक्टर : न्यायवैद्यकीय प्रकरण जसे शवचिकित्सा हाताळू शकत नाहीत. तरी आपत्कालीन प्रसंगात, जेव्हा मानवाचे आयुष्य जिथे अडचणीत असेल तेव्हा केस जरी न्यायवैद्यकीय असेल तरी डॉक्टरचे पहिले कर्तव्य आहे की तिथे उपस्थित राहुन पेशंटला मरणाच्या संकटातून बाहेर काढावे.

# जिल्हा रूग्णालय, नाशिक
## DISTRICT HOSPITAL, NASHIK

शवविच्छेदन तपासणी केलेल्या दवाखाना/रुग्णालयाचे नाव गांव/शहर
Memorandum of a Post- Mortem Examination held at Dispensary/ Hospital on the dead of

तालुका जिल्हा कोणी केले
of Village/City Taluka District by

१) सामान्य माहिती General Particulars

अ) शव कोणी पाठविले By whom was the corpse sent 2

ब) कोठून पाठविले त्या ठिकाणाचे नाव Name of place from which sent

क) त्या ठिकाणाचे अंतर Distance of place from which sent

२) कोणी आणले By whom was the corpse brought ?

३) कोणी ओळखले By whom identified ?

४) मिळाल्याची दिनांक, तास, वेळ (मिनिटे) The date, hour and minute of its receipt.

अ) शवविच्छेदन सुरु केल्याची तारीख, तास, मिनिटे The date hour and minute of beginning post- mortem examinattion

ब) शवविच्छेदन संपल्याची दिनांक, तास, मिनीटे The date, hour and minute of ending post-mortem exemation

५) पोलीस अधिकारी/न्यायदंडाधिकारी यांनी शवतपासणीसाठी Subatance of accompanying Report from

police officer or Magistrate, together with the date of death, if known.
Supposed cause of death or reason, for examination.
दिलेले संभाव्य कारण

६) दवाखाना/रुग्णालयात तपासणी झाली नसल्यास
If not examined at Dispensary or Hospital
अ) Name of place where examined.
ब) दवाखाना/रुग्णालयाचे अंतर Distance from Dispensary or Hospital
क) शव दवाखाना/रुग्णालयात न नेण्याचे कारण
Reason why the body was not sent to the Dispensary or Hospital

२) बाह्यतपासणी
External Examination

७) लिंग, वय, जात, धर्म, कपडे व
दागिन्यांचे वर्णन
Sex, apparent, age, race or caste. Description of
Clothes and of ornaments of the body

८) कपड्यांचे स्वरुप
Condition of the clothes -
ओले/रक्ताचे/वीर्याचे/मातीचे/
विष्ठेचे/मूत्राचे डाग असलेले
Whether wet with water stained with blood or
soiled with vomit or foecal matter.

९) त्वचेवरील विशेष खुणा व्रण/वण/
गोंदणे/तीळ/मोस इ. दातांची संख्या
व स्वरुप
Special marks on the skin such at scares,
tattooing etc. any malformation, peculiarities or other
marks of identification. State of the teeth.
नवजात अर्भकांची लांबी, रूंदी, वजन
उंची, केसांचे स्वरुप, नखांची स्थिती
गर्भनाडी व अपरा असलेस तिची स्थिती

In newly-born infants, the length and (if possible), the/weight of the body to be recorded together with the state of the hair nails and umbilical cord it Isength whether placenta is attached or not, if present, its size and condition

१०) शरीराची स्थिती पिळदार दपकट, कृश, मध्यम स्थूल थंड/गरम

Condition of Body-Whether well-nourished, thin or emaciated warm or cold.

११) मरणोत्तर ताठरपणी/संकोच (विकास) स्नायूंची स्थिती

Regar Mortift- Well marked, slight or absent, whether present in the whole body or part only.

१२) कुजण्याची/सडण्याची स्थिती, मरणोत्तर निळसरपणा

Extent, and signs of decomposition, presence post-mortern lividity of buttocks, lions, back and thighs or any other part. Whether bullae present and the nature of their contained fluid, Condition of the cuticle.

१३) नैसर्गिक दारांची अवस्था डोळे, कान, नाक, तोंड, जीभ दात इ. यांची स्थिती त्यातून येणाऱ्या द्रवाचे वर्णन सूजलेले

Feature Whether natural or swollen state of eyes, position of tongue, nature of fluid (if any) oozing from mouth nostrils or ears.

१४) त्वचेची स्थिती व रोमांच अवस्था रक्त इ. चे डाग

Condition of skin - Marks of blood etc. in suspected drowning the presence or absence of cutes ansertna to be noted.

१५) बाह्य जननेंद्रियाची स्थिती

Injuries of external genitals Indication of purging.

१६) हाता-पायांची स्थिती

Position of limbs - Especially of arms and of fingers in

suspected drowning the presenceor absence of
sand or earth within the nails or on the skin of hands and feet.

१७) जखमांचे वर्णन, अंदाजे वय व कारण

Surface wounds and injuries. Their nature, position dimensions (measured) and directions to be accurately stated-their probable age and causes to be noted.

वळांची स्थिती

If bruises be present what is the condition of the subcutaneous

(N.B. - When injuries are numerous and cannot be mentioned within the space available they should be mentioned on a separate paper which should be signed.)

१८) अस्थिमग्न व इतर बाह्य जखमांचे वर्णन

Other Injuries discovered by external examination or palpation as fractures etc.

अ) १७ व १८ मधील वर्णन केलेल्या जखमा मृत्यूपूर्व आहेत याची खात्री आहे का?

Can you say definitely that the injuries shown against serial Nos. 17 and 18 are ante-mortem injuries 2

अंतर्गत तपासणी

Internal Examination

१९ डोके (शिर)

Head

१) डोक्यावरील जखमांचे स्वरुप

Injuries under the scalp, their nature

२) कवटी भग्न असेल तर त्याचे स्वरुप व स्थिती

Skull - Vault and base-describe fractures, their sites, dimensions, directions etc.

३) मेंदू व त्यावरील आवरणांची स्थिती, मेंदूचे वजन

Brain - The appearance of its coverings, size weight and general condition of the organ itself and any abnormality found in its examination to be carefully noted. (Weight M. 3, gram F2-75 grams)

२० छाती (उर)

Thorax

अ) उरोभिंती व बरगड्या (पर्शुका)

Walls, ribs cartilages

ब) फुफ्फुसावरण

Pleaura

क) स्वरयंत्र, श्वासवाहिनी व तिच्या शाखा

Larynx, Trachea and Bronchi

ड) उजवे फुफ्फुस

Right Lung

इ) डावे फुफ्फुस

Left Lung

फ) ह्रदयावरण

Pericardium

ग) ह्रदयाची स्थिती व वजन

Heart with weight

ह) महारोहणी व महानीला

Large vessels

आय) इतर शेरा

Additional remarks

२१) उदर (पोट)

Abdomen

उदरभिंती

Walls

उदरांतरावरण

Peritoneum

उदरगुहा

Cavity

कपोल/गाल, दात जीभ, घसा

Bucal Caity, teeth, tongue and Pharynx

अन्ननलिका

Oesophagus

आमाशय व त्यातील घटक

Stomach and its contents

लघ्वंत्र (लहान आतडे)

Small intestine and its contents

बृहदांत्र (मोठे आतडे) व त्यातील घटक

Large intestine and its contents

यकृत (काळीज) त्याचे वजन व पित्ताशय

Liver (with weight) and gall bladder.

अन्नाशय (स्वादुपिंड)

Pancreas and suprarenals

प्लीहा व त्याचे वजन

Spleen with weight

वृक्क (मूत्रपिंड) व त्यांचे वजन

Kidneys with weight

मूत्राशय

Bladder

पुनरूत्पादक अवयव

Organs of generation

आमाशयातील घटक व शेवटचे जेवण केव्हा घेतले ती वेळ

Additional remarks with where possible, Medical Officer's deduction from the state of the contents of the stomach as to time of death and last meal.

रासायनिक विश्लेषणाकरीता अवशेष (अंतरावयव) ठेवले असल्यास त्याचे वर्णन व संख्या

State which viscera (if any) have been retained for chemical examination and also quote the numbers on the bottles containing the same.

**Opinion as to the cause probable cause of death.**

मृत्यूचे संभाव्य कारण

दिनांक
Date

सही/-
Signature

* The Spinal Cord need not be examined unless there are any Indications of disease, Strychnla

posining or injury.

Note - The report must be written and signed immediately after the examination. Medical Officers will at once despatch a duplicate copy to the Civil Surgeon of their district for record in his Office. Great care should be taken not to cut the viscera before they have been inspected in site.

| | | |
|---|---|---|
| १ | ठिकाण : | दवाखाना Dispensary |
| | Place | रुग्णालय Civil Hospital |

| | |
|---|---|
| पोलीस उपनिरीक्षकांना | माहितीकरीता त्यांचा संदर्भ क्र. |
| Forwarde to the Police Sub-Inspector | For Information with reference to his No. |

२. अवशेष विश्लेषणाकरीता ठेवले आहेत का नाही त्याची माहिती

Viscera has been preserved. It may please be stated Immediately whether examination by the Chemical Analyser is necessary or it is to be destroyed.

वैद्यकीय अधिकारी
Civil Surgeno or M. M.

जिल्हा शल्यचिकित्सक यांना माहितीकरीता प्रत
Copy forwareded with compliments to the Civil Surgeon.

जिल्हा शल्यचिकित्सक यांनी पाहिले व तपासले
Seen and examined by the Civil Surgeon

जि. श. चि. यांचा शेरा
Remarks of the Civil Surgeon

## छिन्नविछिन्न झालेल्या प्रेताची व हाडाच्या सांगाड्याची शवचिकित्सा
## (Exam. of Multilated dead body & skeletal remains)

काही वेळेस गुन्हेगाराकडून किंवा खुनी इसमाकडून व्यक्तीचा खून केल्यानंतर त्या प्रेताची विल्हेवाट लावणे सोपे जावे म्हणून प्रेताचे तुकडे तुकडे करण्यात येतात. त्याचप्रमाणे प्रेत जर उघड्यावर पडलेले असेल तर अथवा उथळ जागेत पुरलेले असेल तर उंदीर, कुत्रे, लांडगा, तरस इत्यादी जंगली जनावरे तसेच गिधाडासारखे पक्षी प्रेतावर हल्ला करतात व थोड्याच वेळात ते छिन्नविछिन्न करून टाकतात. असे छिन्नविछिन्न व तुकडे तुकडे झालेले प्रेत मरणोत्तर चौकशीसाठी पाठविले जाते. अशा परिस्थितीत पाठविलेले प्रेताचे तुकडे मानवी आहेत किंवा एखाद्या जनावराचे आहेत हे ओळखणे आवश्यक असते.

सदरचे अवशेष, तुकडे एकत्र जुळविण्यात येतात व सदरचे तुकडे एकाच माणसाचे आणि त्याच व्यक्तीचे आहेत किंवा काय ते ठरविण्यात येते.

त्वचेची व अवयवांची परिस्थिती यांचे वर्णन केले जाते.

प्रेताचे तुकडे कशा तऱ्हेने करण्यात आलेले आहेत याचेही वर्णन करावे लागते. उदा. कुऱ्हाडीने तोडण्यात आलेले आहे काय किंवा करवतीने कापले आहे काय किंवा एखाद्या तीक्ष्ण, धारदार हत्याराने कापलेले आहे काय. दगडाने किंवा तसल्याच कोणत्याही साधनाने चेपलेले आहे काय व हिंस्र जनावरांच्या दातांनी फाटलेले आहे काय इत्यादी गोष्टी नमूद कराव्या लागतात.

डोके व धड शाबूत असल्यास लिंग ठरविणे सोपे जाते.

परंतु ते अवयव जर अत्यंत कुजलेल्या स्थितीत असतील तर सूक्ष्मदर्शक यंत्राच्या सहाय्याने स्त्री बिजांड कोश, पौरुष ग्रंथी, स्तन या अवयवांच्या सूक्ष्म पेशी शोधून काढून लिंग ठरविण्यात येते.

१) **वय :** डोक्यावरील केसाचा रंग, डोक्याची कवटी, दाताची संख्या, धडाचा आकार यावरून सर्वसाधारण वय निश्चित करता येते.

२) **ओळख :** गोंदलेल्या खुणा, हातांचे बोटांचे ठसे, जखमेचे व्रण, केस, परिस्थिती, व्यंग, अस्थिभंग व निखळलेला सांधा काही असल्यास यावरून ओळख करण्यात येते.

३) **मृत्यूची वेळ :** अवयवाच्या परिस्थितीवरून उदा. मरणोत्तर नीलिमा, मरणोत्तर ताठरपणा व प्रेत सडण्याची क्रिया यावरून अंदाजे मृत्यूची वेळ ठरविता येते.

४) **मृत्यूचे कारण :** शरीरातील एखाद्या महत्त्वाच्या व मोठ्या रक्तवाहिनीस किंवा एखाद्या महत्त्वाच्या अवयवास गंभीर जखमा किंवा दुखापत झालेली असल्यास त्यावरून मृत्यूचे कारण ठरविण्यात येते.

**कवटीवरून वय निश्चित करणे :**

१) वयाच्या ३० ते ३५ वर्षे दरम्यान कवटीच्या शिवणी अदृश्य होऊ लागतात.

२) वयाच्या ५५ वर्षांच्या नंतर या शिवणी संपूर्णपणे नष्ट झालेल्या दिसतात.

३) अगदी उतार वयात डोक्याच्या कवटीची हाडे हलकी व पातळ झालेली आढळून येतात. (वयाच्या ७० व्या वर्षानंतर) मृत्यूचे कारण आणि मृत्यू कोणत्या तऱ्हेने घडून आला हे ठरविणे.

विषबाधेच्या प्रकारात किंवा विषबाधेचा संशय असल्यास शरीरातील काही महत्त्वाचे अवयव (व्हेसेरा) पुढील तपासणीसाठी पुरेसे प्रीझरवेटिव्ह तसेच व्हिसेरा असलेल्या बरण्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या खासगी सीलद्वारे सीलबंद करून केमिकल अनालायझरकडे पाठवावयाचे असतात.

**Visceras :**

१) आमाशय व त्यातील घटक काचेच्या बरणीत

२) लहान आतडे व त्यातील घटक

३) १/२ कि. यकृत व किडणी स्वतंत्र बरणीत

४) रक्षक रसायन

# शव उत्खनन

# (EXHUMATION)

ज्यावेळेस एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर काही काळाने संशय निर्माण झाल्यास शव उत्खनन करून शव चिकित्सा करण्यात येते किंवा निव्वळ व्यक्तिगत ओळखीसाठी सुद्धा शव उत्खनन करतात.

**नियम :** डिस्ट्रिक्ट मॅजि. किंवा कॉरोनर यांच्या लेखी संमतीने सकाळचे वेळेस भरपूर सूर्यप्रकाशात नातेवाईक व डॉक्टर्स यांच्या उपस्थितीत शव उत्खनन करण्यात येते. शव उत्खननास सुरुवात करण्यापूर्वी थडग्याचे ठिकाण निश्चित झाल्यानंतर त्या थडग्यावर नावाची पाटी वगैरे असल्यास ती वाचून खात्री करून घ्यावी किंवा थडगे दगड आणि सिमेंटने पक्के बांधलेले असल्यास थडग्याला दगड तयार करणाऱ्याकडून ओळखून घ्यावा. एवढे संपल्यानंतर थडगे खोदण्यास सुरुवात करावी. थडगे खोदत असताना ती शवपेटिका दिसून येईल. ती शवपेटिका ज्या इसमाने तयार केलेली असेल त्याच्याकडून ओळखून घ्यावी. त्याबरोबर शवपेटीलगत असलेली सुमारे अर्धा किलो माती एका स्वच्छ कोरड्या काचेच्या बरणीत गोळा करून ठेवावी. विषबाधेचा संशय असल्यास केमिकल अनालायझरसाठी तिचा उपयोग होतो. त्यानंतर शवपेटिका किंवा प्रेत वर काढावे व ते प्रेत जास्तीत जास्त साक्षीदारांकडून पण मुख्यत: मयताचे नातेवाईक, मित्र किंवा नोकर यांच्याकडून ते ओळखून घ्यावे. कारण प्रेताचे दफनविधीचे वेळेस तयार करताना हे इसम त्या ठिकाणी हजर असतात.

**शव परीक्षा :** प्रेत जर नुकतेच पुरलेले असेल तर स्मशानभूमीच्या बाहेर उघड्यावर शवचिकित्सा सुरू करावी. परंतु शवचिकित्सा सुरू करताना इतर बघणाऱ्या लोकांना मज्जाव करण्यात यावा. परंतु प्रेत ज़र कुजलेल्या स्थितीत असेल तर प्रेताचे अंदाजे वय, बांधा व प्रेतावरील ओळखीच्या खुणा याची नोंद करण्यात यावी. त्यानंतर प्रेताचे अंगावरील केस एका स्वच्छ कोरड्या मोठ्या तोंडाच्या काचेच्या बरणीत गोळा करून ठेवावे. त्याचा उपयोग नंतर व्यक्तिगत ओळखीसाठी व खनिज विषबाधेच्या बाबत केमिकलसाठी उपयोग होतो. त्यानंतर शरीरातील सर्व महत्त्वाच्या पोकळ्या बारकाईने तपासून पहाव्या. त्यातील शक्यतो जास्तीत जास्त व्हिसेरा स्वतंत्रपणे राखून ठेवावेत. हे अवयव जास्त वेळ हवेत उघडे ठेवू नयेत, किंवा त्याचा कोणत्याही धातूशी संघर्ष येऊ देऊ नये. व्हिसेरा साठविलेल्या बरण्या व्यवस्थित काचेचे झाकण लावून सीलबंद कराव्यात व त्याच दिवशी अनालायझरकडे पाठविण्यात यावे. तर प्रेताचे केस, नखे, शरीरातील बरगडीचे हाड राखून ठेवण्यात यावे. तसेच प्रेतावर काही जखमा असल्यास त्याची नोंद ठेवावी किंवा जुन्या अस्थिभंगाचे चिन्ह असेल तर तशी नोंद करणे आवश्यक आहे.

## जंतुनाशके व सुगंधी द्रव्ये :

याचा वापर प्रेतावर शिंपडणेसाठी करू नये. प्रेतामधून दूषित दुर्गंधी व विषारी वायू शरीरात जाऊ नये म्हणून (M.O.) ने पोटॅशियम परमँगनेटचे द्रवात भिजवलेले मास्क नाका तोंडावर बांधावा तसेच (M.O.) ने पोस्टमार्टेम करताना वाऱ्याच्या दिशेला उभे रहावे.

कालमर्यादा :

इंग्लंडमध्ये व भारतामध्ये शव उत्खननास कोणत्याही प्रकारची कालमर्यादा नाही. परंतु स्कॉटलंडमध्ये ही मर्यादा २० वर्षे, फ्रान्समध्ये १० वर्षे व जर्मनीत ३० वर्षे आहे.

## COMMON WORDS / TERMINOLOGY USED IN POST MORTEM

## शवविच्छेदनात नियमित वापरात येणारे सर्वसाधारण शब्द व परिभाषा

P. M. - शवविच्छेदन Post-After ............................................ Mortem-Death

MLC-Medico Legal Examination ............................................ न्यायवैद्यक परीक्षण

Corpse-Cadaver-Dead body for dissection ............................ मृतदेह

Viscera-Vital organs to preserve ............................................ व्हिसेरा

Rigor Mortis-Cadaveric Rigidity ............................................ मरणोत्तर ताठरता

Postmortem Staining/Lividity ............................................ मरणोत्तर निळसरपणा

Decomposed dead body ............................................ कुजलेले / सडलेले प्रेत

Cutes anserina-goose skin ............................................ सुरकुतलेली त्वचा

Indication of Purgeing-stool / urine passed .............................. मलमूत्र निस्सारण

Causes of death ............................................ मृत्यूचे कारण

Natural death ............................................ नैसर्गिक मृत्यू

Unnatural death ............................................ अनैसर्गिक मृत्यू

**Probable Cause of Death : मृत्यूचे अंदाजे कारण :-**

1) Cardiorespiratory arrest due to haemorrhagic shock due to mutiple interenal organ injuries.

(अंतर्गत अवयवांना जखमा होऊन रक्तस्रावामुळे हृदय श्वसनक्रिया बंद पडून मृत्यु झाला असेल.)

2) Cardiorespiratory arrest due to asphyxia due to hanging :

(गळफासाने श्वसनावरोध होऊन हृदय श्वसनक्रिया बंद पडून मृत्यु झाला असेल.)

3) Cardiorespiratory arrest due to hypovolemic shock due to Burn injuries.

(जळाल्यामुळे शरीरातील रक्त व पाणी अभावामुळे हृदय श्वसनक्रिया बंद पडून मृत्यु झाला असेल.)

## लैंगिक गुन्हे (SEXUAL OFFENCES)

**लैंगिक गुन्हे (Sexual Offences) :**

संभोग : संभोग दोन प्रकारचा असू शकतो.

१) स्वाभाविक/ नैसर्गिक

२) अस्वाभाविक/ अनैसर्गिक

**नैसर्गिक /स्वाभाविक** : पुरुषाचे जननेंद्रिय व स्त्रीयोनीद्वारे जो संभोग केला जातो त्याला नैसर्गिक संभोग असे म्हणतात.

अनैसर्गिक/अस्वाभाविक : एका पुरुषाचे जननेंद्रिय व दुसऱ्या व्यक्तीचे तोंड किंवा गुद्द्वार याद्वारे जो संभोग केला जातो त्याला अनैसर्गिक संभोग असे म्हणतात.

स्वाभाविक संभोगाचे दोन प्रकार आहेत.

१) जबरी संभोग. (बलात्कार)

२) वर्जित(इन्स्टेट) :- एखाद्या पुरुषाने आपल्या अगदी जवळच्या रक्ताच्या नात्यातील असलेल्या स्त्रीशी संभोग करणे याला वर्जित असे म्हणतात. उदा. आई, बहीण, चुलत बहीण, पुतणी, भाची, सावत्र बहीण, सावत्र मुलगी, आजी, मावशी, नात व स्वत:ची मुलगी इत्यादी.

**अनैसर्गिक /अस्वाभाविक (I.P.C.377) :**

१) **समलिंगी संभोग :** पुरुषाने पुरुषाशी करावयाचा संभोग, एखाद्या पुरुषाने दुसऱ्या पुरुषाच्या गुदद्वाराचा उपयोग करून संभोग सुख घेणे याला समलिंगी संभोग किंवा गुदमैथुन असे म्हणतात. एखाद्या स्त्रीने दुसऱ्या स्त्रीच्या बाह्य जननेंद्रियाचा उपयोग करून स्वत:चे जननेंद्रिय त्यावर घासून संभोग सुख घेणे याला सुद्धा समलिंगी संभोग असे म्हणतात.

२) **मुखमैथुन :** एखादा पुरुष दुसऱ्या स्त्रीच्या तोंडाचा उपयोग करून लिंगाद्वारे संभोग करतो त्याला मुखमैथुन असे म्हणतात.

३) **पशुसंभोग :** पुरुषाने जनावराच्या मादीच्या गुदद्वारातून किंवा योनीतून जो संभोग केला जातो त्याला पशुसंभोग असे म्हणतात. सर्व सामान्यपणे गुराखी किंवा मेंढपाळ लांब रानात जनावरे घेऊन गेल्यानंतर एकांतवासात त्याची संभोगाची इच्छा उद्दीपित होते. अशा प्रसंगी तो शेळी, मेंढी, गाढवाची मादी, घोडी, गाय, म्हैस इत्यादीच्या योनीचा उपयोग करून संभोग सुख घेतो यास पशुसंभोग म्हणतात.

**१) बलात्कार (आय.पी.सी.-३७६) :**

बलात्काराची व्याख्या व शिक्षा इपीको (क) ३७५ व ३७६ मध्ये दिलेली आहे. कोणत्याही स्त्रीशी तिच्या इच्छेवाचून संभोग यात १५ वर्षांवरील पत्नीचा समावेश होत नाही. हा बलात्कार लहान मुलीपासून वृद्ध स्त्रीवर होणे शक्य आहे.

बलात्कार झाला किंवा नाही हे ठरविण्यासाठी संबंधित स्त्री-पुरुषांची वैद्यकीय तपासणी करणे आवश्यक आहे. मात्र तपासणीपूर्वी त्यांची लेखी संमती घेणे आवश्यक आहे.

बलात्काराचे गुन्ह्याकरिता गुन्हा होण्यासाठी पुरुषांचे इंद्रिय योनीत जाऊन वीर्यपतन होऊन योनिपटल फाटलेच पाहिजे असे नाही. गुन्हा सिद्ध होणेसाठी पुरुषाचे इंद्रिय योनीत गुरुओष्टीत थोडेसे शिरले तरी पुरे. इंद्रिय योनीत शिरण्याचा प्रयत्न करणेदेखील गुन्हा करण्यात मोडते. यात ७ वर्षाखालील मुलास त्याची उमज किती (चांगले वाईट बद्दल त्याची समज) माहिती आहे किंवा जाण आहे हे ठरवून शिक्षा होते.

**पुरुषांची तपासणी :**

१) वय, शक्ती व संभोग करण्याची पात्रता.

२) अंगावर, कपड्यावर माती, रक्त किंवा वीर्य यांचे डाग किंवा वीर्य यांचे डाग किंवा अस्तित्व.

३) हात, तोंड, इंद्रिय यावर जखमा, ओरखडे.

४) गुह्यभागावरील केस वीर्याने चिकटलेले किंवा कसे.

५) पुरुषेंद्रियावर स्त्रीचे गुप्त भागावरील केस आढळणे.

६)　गरमी-परमासारखे रोगांचे अस्तित्व.

७)　बलात्काराचे ठिकाणी पुरुषांचे वीर्याचे, रक्ताचे डाग.

**स्त्रीची तपासणी :**

१)　वय

२)　गुप्त भागावर जखमा

३)　कपड्यावर रक्ताचे व वीर्याचे डाग.

४)　योनीमार्गात वीर्य सापडणे (लहान मुलीचे बाबतीत हे बलात्काराचे निश्चित लक्षण.)

५)　योनीत रक्त व वीर्य दोन्हीही.

६)　गुप्त रोग.

७)　शरीर प्रकृती व प्रतिकार शक्ती.

८)　ती स्त्री संभोगास सरावलेली आहे किंवा कसे.

**शारीरिक तपासणी :**

बलात्कारासारख्या गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यात आरोपी असलेल्या व्यक्तीची तपासणी करण्यापूर्वी त्याची लेखी संमती घेणे आवश्यक आहे. तसेच तपासणीत स्पष्ट होणाऱ्या गोष्टी त्याच्या विरुद्ध कोर्टात पुरावा म्हणून तपासल्या जातील याची सुद्धा कल्पना द्यावी.

त्याच्या जननेंद्रियाची वाढ तसेच शारीरिक शक्ती या गोष्टींची नोंद करणे आवश्यक असते. तपासणीची नक्की वेळ, तारीख, महिना, वर्ष लिहावे. आरोपीच्या अंगावरील कपडे फाटलेले असणे, त्याच्या अंगावरील कपड्याचा काही भाग नाहीसा झालेला असणे किंवा कपड्याचे बटन तुटून नाहीसे झालेले असेल. इत्यादी गोष्टी नमूद केल्या पाहिजेत. त्यामुळे झटापट झाल्याचे स्पष्ट होते. आरोपीच्या कपड्यावर चिखलाचे, रक्ताचे किंवा वीर्याचे डाग असल्यास त्याची नोंद करावी. आरोपीच्या शरीरावर बलात्कारित स्त्रीने प्रतिकार केल्यामुळे सुजेची, ओरखड्याची व चावण्याची चिन्हे असल्यास त्याची नोंद करावी.

या जखमा आरोपीच्या चेहऱ्यावर, हातावर, मांड्यावंर व लिंगावर आढळून येण्याची शक्यता असते. आरोपीच्या गुप्त भागावरील केसावर वीर्यपतन झाल्यामुळे ते केस एकमेकांत गुंतलेले व चिकटलेले आढळून येतील तशी नोंद करावी. त्यालाच वीर्याने चिकटलेली केसांची जाळी (matted public hairs) असे म्हणतात.

आरोपीच्या अंगावर संशयित बलात्कार झालेल्या स्त्रीचे केस आढळून आल्यास ते व्यवस्थित राखून ठेवून तपासणीकरिता जपून ठेवावे. बलात्कारित स्त्रीने धडपड व प्रतिकार केल्यामुळे आरोपीच्या शिश्नावर ओरखडल्यामुळे जखमा आढळून येतील. परंतु त्याशिवाय आरोपीच्या शिश्नावर पुढील भागावरील त्वचेवर व आतील बाजूस ओरखडणे व फाटणे इत्यादी चिन्हे आढळून येतात. स्त्री जर कुमारिका असेल तर तिच्या अरुंद अशा योनीत क्रूरपणे जननेंद्रिय घातले गेल्यास जननेंद्रियाची पुढच्या व मागील भागावर असलेली शिवण फाटलेली आढळून येईल. आरोपीशी झुंज केलेली नसल्यास शिस्नाच्या पुढील भागाच्या त्वचेखाली पांढरा घट्ट असा स्त्राव गोळा झालेला आढळून येतो. परंतु आरोपीचे जननेंद्रिय बलात्कारित योनीत संपूर्ण शिरलेले असेल व घर्षण झालेले असेल तर मात्र आढळून येणार नाही.

आरोपीच्या शिश्नावर काही काही वेळेस गुप्त रोगाची चिन्हे आढळून येण्याची शक्यता असते. त्या चिन्हांची सविस्तर नोंद करून ठेवावी. ही चिन्हे स्त्रीच्या योनीवरही आढळतील.

ज्या ठिकाणी बलात्कार घडण्याचा संशय असेल त्या जागेचे निरीक्षण बारकाईने करणे आवश्यक आहे. त्या जागेवर

रक्ताचे डाग, फाटलेल्या कपड्याचे तुकडे, तुटलेली बटणे इत्यादी आढळून येतील. तसेच त्या जागेवर शरीराच्या खुणा निर्माण झालेल्या दिसून येतील. त्या जागेवर गवत असल्यास गवत चुरगळलेले व तुडवलेले असे आढळून येईल.

**बलात्कारित स्त्रीची तपासणी :**

१) ज्या स्त्रीवर बलात्कार झाल्याचा संशय असेल तिला कोणतेही प्रश्न न विचारता घडलेल्या प्रसंगाचे वर्णन करून घ्यावे.

२) बलात्कारित स्त्रीची तपासणी सुरू करण्यापूर्वी ती जर १२ वर्षे किंवा पुढील वयाची असेल तर तिची लेखी संमती एका साक्षीदारासमोर घेण्यात यावी. जर ती १२ वर्षे वयाचे आतील असेल किंवा तिला मानसिक आजार असल्यास तिच्या आईची किंवा वडिलांची किंवा कायदेशीर पालकांची लेखी संमती घेणे आवश्यक असते.

३) तपासणी करण्याची नक्की, वेळ, तारीख महिना, वर्षे यांची व्यवस्थितपणे नोंद करून ठेवावी.

४) हे सर्व झाल्यानंतर प्रमुख तपासणीला सुरवात करावी. त्यात प्रथम कपड्याची तपासणी करण्यात येते. कपड्यावर रक्ताचे किंवा वीर्याचे डाग असल्यास ते पाहून ते डाग कपड्याच्या पुढच्या भागावर अथवा पाठीमागच्या भागावर असल्यास त्यांची तशी नोंद करणे आवश्यक आहे. सर्वसाधारणपणे वीर्याचे डाग पुढच्या बाजूला आणि रक्ताचे डाग पाठीमागच्या बाजूला असतात. त्याचप्रमाणे झटापट झाल्यामुळे कपडे फाटलेले किंवा चिखलाने माखलेले असतील तशी नोंद करावी.

५) **प्रतिकाराची व झटापटीची चिन्हे :** ही चिन्हे व ओरखडे आणि सूज त्या स्वरूपात चेहऱ्यावर. स्त्रीच्या चालण्याच्या पद्धतीत फरक पडलेला दिसून येतो. चालताना तिला भयंकर वेदना होतात. तसेच लघवी करतांना व शौचास बसताना वेदना होत असल्याची माहिती मिळते.

६) **बाह्य जननेंद्रियाची तपासणी :** बलात्कारित स्त्रीच्या गुप्त भागावर वीर्यपतन झाल्यामुळे त्या ठिकाणचे केस चिकटलेले व एकमेकात गुंतलेले असे आढळून येतील. असे चिकटलेले केस कोरड्या हाताने व स्वच्छ कात्रीने अलगद कापून घेऊन शुक्रजंतुकरिता त्यांची तपासणी करावी. स्त्रीच्या बाह्य जननेंद्रियावरच मांडीवर वाळून गेलेले वीर्याचे डाग आढळून आल्यास ते डाग एका स्वच्छ बोथट सुरीने अलगद काढून पुढील तपासणीसाठी व्यवस्थित राखून ठेवावेत. बाह्य जननेंद्रियामधून रक्तस्राव होत असल्यास त्याची पण नोंद करून घ्यावी. बलात्कारित स्त्रीचे जननेंद्रिय सुजलेले व ओरखड्यामुळे ते लाल झालेले व वेदनायुक्त असे दिसेल. त्या परिस्थितीचे वर्णन व्यवस्थित करून ठेवावे. बलात्कारित मुलगी कुमारिका असल्यास व पुरुषाचे लिंग संपूर्ण आत गेलेले असल्यास तिचे योनीपटल फाटलेले आढळून येईल. फाटलेल्या या योनी पटलाच्या कडा लाल व सुजलेल्या अशा असतील. त्यांना शरीराने स्पर्श केल्यास अतिशय वेदना होतील व त्यातून सहजासहजी रक्त बाहेर येऊ लागेल.

७) लग्न झालेली जास्त वयाची स्त्री असल्यास व वारंवार संभोग झालेला असल्यास तिच्या बाह्य जननेंद्रियावर तसेच मांड्या, ओटीपोटी, छाती, स्तन, गळा, चेहरा, पाठ इत्यादीवर ओरखडे आणि सुजेची चिन्हे आढळून येतील. बलात्कारित स्त्रीच्या बाह्य जननेंद्रियावर सिफालीस, गनोरीया (गरमी, परमा) या रोगाची चिन्हे दिसून येतील व त्याच व्यक्तीने बलात्कार केला आहे असे सिद्ध करता येईल. जर आरोपीलाही तीच चिन्हे दिसलीतर.

**बेकायदेशीर गर्भपात (Illegal Abortion) :**

स्त्रीच्या गर्भाशयात हळूहळू वाढत असलेला गर्भ २० आठवड्यापूर्वी किंवा मुदत संपण्यापूर्वी कोणत्याही उपायाने तयार होत असलेला गर्भ गर्भाशयातून बाहेर काढण्याच्या कृत्यास गर्भपात असे म्हणतात.

भारतात काही धार्मिक व कडक बंधनांमुळे पुनर्विवाहास बंदी असल्याने स्त्रीचा बेकायदेशीर गर्भपात करण्यास प्रवृत्त

होतात. त्याचप्रमाणे अविवाहित स्त्रियांचे बाबतीत अनैतिक संबंधातून गर्भधारणा झाल्यास त्यासुद्धा गर्भपात करून घेण्यास प्रवृत्त होतात. बेकायदेशीर गर्भपात दुसऱ्या किंवा तिसऱ्या महिन्यात केला जातो. परंतु प्रामुख्याने चौथ्या किंवा पाचव्या महिन्यात त्या स्त्रीला गर्भवती असल्याची खात्री पटल्यामुळे यावेळेस गर्भपात करण्याची प्रवृत्ती जास्त दिसून येते. बेकायदेशीर गर्भपातानंतर त्या गर्भवती स्त्रीस मृत्यू आल्यास तो गुन्हा कोर्टापुढे निर्णयासाठी येतो. किंवा गुप्तपणे पोलिसांना कोणीतरी कळवत असते. त्यावेळेस सुद्धा हा गुन्हा उघडकीस येतो. आय. पी. सी. कलम ३१२, ३१३, ३१४, ३१५ व ३१६, ३१७, ३१८ यामध्ये बेकायदेशीर गर्भपातासाठी निरनिराळ्या मुदतीच्या प्रकारच्या शिक्षा सांगितलेल्या आहेत. परंतु संशयित स्त्री ही गर्भवती होती आणि तिच्या संमतीने गर्भपात करण्यात आलेला आहे. या दोन गोष्टी फिर्यादी पक्षास सिद्ध कराव्या लागतात. वरील दोन्ही गोष्टी सिद्ध झाल्यानंतर गर्भपात करून घेणारी स्त्री व गर्भपात करणारी व्यक्ती हे दोन्हीही शिक्षेस पात्र ठरतात. बेकायदेशीर गर्भपात करत असताना त्यामुळे तर त्या स्त्रीस मृत्यू आला तर गर्भपात करणारी व्यक्ती आय. पी. सी. ३१४ प्रमाणे शिक्षेस पात्र ठरेल.

**MTP Act 1971 ( वैद्यकीय गर्भपात अधिनियम, १९७१) :**

या कायद्यानुसार खालील कारणांकरीता २० आठवड्यांपर्यंत गर्भपात करता येतो. (देशात रोज १७५२ व वर्षाला ६५०००० नोंदीत गर्भपात आहेत.) त्याचे प्रकार (१) स्वाभाविक, (२) कृत्रिम व त्याचे प्रकार व त्याच्या अटी पुढीलप्रमाणे

**१) चिकित्सार्थ :** गर्भावस्थेमुळे स्त्रीला शारिरीक व मानसिक आजार होणार असेल तर उदा. गर्भशयाचे आजार, हृदयाचे आजार, फुफुसाचे आजार, क्षयरोग, गर्भिणी उपस्मार, कॅन्सर.

**२) बालकल्याणार्थ :**

अ) जर होणाऱ्या बालकास जन्मजात शारीरिक/मानसिक आजार हृदयाचे आजार होणार असेल तर,

ब) जर गर्भिणीस गोवर कांझिण्या व्हायरल हिपॅटायटिस असे तीव्र स्वरुपाचे आजार झाले तर,

क) गर्भिणीस मनोअवसादरोधक, कार्टिझोन इ. अशी औषधे चालू असतील तर,

ड) वारंवार गर्भिणीस क्ष किरण परिक्षण किंवा रेडिओथेरपी/केमोथेरेपीची आवश्यकता असतील तर किंवा कॅन्सरचे उपचार चालू असेल तर,

इ) गर्भाशयाचे आजार

फ) वारंवार सिझेरीयन करावे लागणेचा इतिहास

**३) मानवतेच्या दृष्टीकोनातून –**

जर बलात्कारामुळे गर्भधारणा राहिली असेल तर,

**४) सामाजिक दृष्टीकोनातून गर्भनिरोधन**

गर्भनिरोधन साधने अक्षम ठरली तर तसेच जर गर्भवती अतिगरीब परिस्थितीची असेल तर तसेच तिला काही तीव्र स्वरूपाचे शारीरिक व मानसिक व अनुवंशीक आजार असतील तर उदा, हृदयाचे विकार, फुफुसाचे असाध्य विकार, मेंदूचे असाध्य विकार, इ. तसेच विवाहितेने गर्भनिरोधक साधने वापरल्यानंतर त्यांचे कार्य नीट न झाल्यामुळे, उदा. निरोध फाटणे, कॉपर टी निसटणे, फोम टॅबलेट काम न करणे, योनीच्छद फाटणे इ.

## गर्भपात संमतीपत्र

१८ वर्षावरील स्त्रीचे स्वहस्ताक्षरातील संमतीपत्र असावे १८ वर्षाचे आतील स्त्री असेल तर किंवा स्त्री वेडी/अंमली पदार्थांचे अंमलाखाली असेल तर तिच्या कायदेशीर पालकांचे संमतीपत्र असावे.

गर्भपात कोठे व केव्हा करावा

१) शासकीय रुग्णालयात/शासन मान्यताप्राप्त रुग्णालयातच गर्भपात करावा.

२) शासनाने परवानगी दिलेला नोंदणीकृत वैद्यकीय अधिकारी/व्यावसायिक असावा.

३) स्त्रीरोग व प्रसुतीतंत्र विषयांतील पदव्युत्तर पदवीधर तज्ञ असावा आणि किंवा त्याने जिल्हा शल्यचिकित्सक/जिल्हा आरोग्य अधिकारी/महानगरपालिकेचे वैद्यकीय अधीक्षक/आरोग्याधिकारी यांनी मान्यता दिलेली वैद्यकीय व्यावसायिक असावा. प्राधान्याने स्त्रीरोग प्रसुती शास्त्रातील पदव्युत्तर पदवी/पदवीका धारक.

**गर्भपाताचा पुरावा (Medicolegal Evidence in Abortion) :**

गर्भपात झाला किंवा नाही हे ठरविण्याकरिता दोन बाबी पाहिल्या जातात.

१) गर्भपात झालेल्या स्त्रीची तपासणी

२) गर्भपातात पडलेले अवशेष

**१) गर्भपात झालेल्या स्त्रीची तपासणी –**

**अ) जिवंत स्त्रीची तपासणी–**

i) नुकतेच बाळंतपण झाल्याची चिन्हे– गर्भाची पूर्ण वाढ झालेली असल्यास चिन्हे स्पष्ट आढळतात.

ii) कमी दिवसाचे गरोदरपण असल्यास, गर्भपातानंतर ४ ते ५ दिवसात तपासणी केल्यास खालील चिन्हे आढळतील.

iii) योनिमार्गातून रक्तमिश्रित स्राव दिसेल.

iv) योनिमार्ग शिथिल व विस्तारलेला आढळेल.

v) योनिमार्गाच्या श्लेष्मल त्वचेला खरचटल्याच्या, फाटल्याच्या जखमा आढळतील.

vi) ग्रीवामुखाला भेग, जखमा, औषध वापरले गेलेले असल्यास फाटलेले असू शकते.

vii) युटेरियन साऊंड (गर्भशलाका तपासणी यंत्र) टाकलेले असल्यास किंवा साधारण तपासणीत गर्भाशय वाढलेले दिसेल.

viii) स्तन भरलेले, दुधाचा किंवा पीयूष कोलोस्ट्रोमचा (Colostrom) स्त्राव व स्तनाची इतर चिन्हे.

**ब) मृत स्त्रीची तपासणी –**

गर्भावस्थेची चिन्हे आढळतील, श्लेष्मल त्वचेवर दाहाची लक्षणे असू शकतात. जोराच्या आघातामुळे फाटण्याचा संभव असतो. म्हणून ही तपासणी करतांना काळजी घ्यावी.

पूर्ण योनिमार्गासहित, गर्भाशय, बीजवाहिनी कापून वेगळे करून टेबलावर ठेवले जाते व नंतर सूक्ष्म निरीक्षण करतात. अन्नमार्गातील मूत्रमार्गातील इंद्रियांची तपासणी करावी. त्यामुळे विषाचा अंदाज लावता येतो.

विषाचा थोडासा संशय असल्यास बेकायदेशीर गर्भपातात, गर्भाशय, बीजवाहक नलिका, रज:पिंड, जननमार्गात आढळलेल्या वस्तू, जठरातील निघालेले अवशेष, रासायनिक तपासणीकरिता जपून ठेवावे. एखाद्या गर्भवती स्त्रीचा मृत्यू झाल्यानंतर तिचे प्रेत कुठेही फेकले जाऊ शकते, तसेच तपासणीकरिता उशिरा आणले जाण्याची शक्यता असते. अशा प्रसंगी प्रेत कुजते, सडते आणि वायू तयार होतात. त्या वायूंच्या दाबामुळे गर्भाशयातील मूल बाहेर फेकले जाते, अशा बाळंतपणाला 'मरणोत्तर बाळंतपण' (Post Mortem Delivery) असे म्हणतात.

**२) गर्भपातात पडलेल्या अवशेषाची तपासणी –**

कधी कधी गर्भपातात पडलेले अवशेष उदा. गर्भ, रक्ताचा गोळा, मासिक स्त्रावाचा गोळा इत्यादी बाहेर फेकले जातात, संशय असल्यास पोलिस तपासणीकरिता डॉक्टरकडे पाठवितात. अशावेळी वरील अवशेष धुवून सूक्ष्मदर्शक यंत्राखाली तपासले जातात.

सुरुवातीच्या महिन्यात पोषणांकुर इत्यादी बाहेर येतात, वार (placenta) सुद्धा बाहेर येऊ शकते. त्यांचे तुकडे तपासावेत. गर्भ असल्यास त्याचा गर्भशयात राहण्याचा काळ चेतनाशक्ती येण्याचा काळ (viability), अंगावरील जखमा इत्यादी आहेत किंवा काय यांची तपासणी करावी.

कधी कधी बनावटी गर्भदेखील तपासणीकरता आणला गेल्याची उदाहरणे आहेत. भांडण झाल्यानंतर रक्तात माखलेल्या कपड्याचा गोळा आणून तो गर्भ आहे आणि दुसऱ्या व्यक्तीने आघात केल्यामुळे गर्भ पाडला अशी पोलिसांमध्ये तक्रार केली जाते.

**(बालहत्या) :**

भृणहत्या म्हणजे १ वर्षाचे आतील बालकास बेकायदेशीरपणे नष्ट करणे म्हणजेच प्रसूतीनंतर काही तासातच बालकास मारून टाकणे. यात संशयित आई मानसिक आजाराने ग्रस्त आहे का ते पहावे लागते आणि नुकत्याच झालेल्या प्रसूतीची लक्षणे तिथेच उपलब्ध आहेत का ते पहावे. बालकाचे शवविच्छेदन करून पुढील गोष्टींबाबत निश्चितता करावी.

बेकायदेशीर :

१) मृतजात/ जन्मानंतर मृत

२) जिवंत चैतन्ययुक्त जन्म

३) जन्मानंतर किती वेळ जिवंत होते.

४) चैतन्याचा आविष्कार झाला होता का?

५) मृत्यूचे कारण काय?

अ) मृतजात : गर्भाशयात जिवंत होते पण जननप्रक्रियेत मृत्यू झाला असेल म्हणजे ७ महिने (२८ आठवड्यानंतर) जन्माला येऊन मृत्यू होणे.

ब) जातमृत : गर्भाशयातच मृत झालेले अर्भक यात मरणोत्तर ताठरपणाची लक्षणे दिसतात. अर्भकाची त्वचा शिथिल सुरकुतलेली, कुजट वासाची, तांबूस निळसर रंगाची दिसते. कवटीची हाडे सहज वेगळी होतात.

क) वैध बालक : म्हणजे जन्माला आल्यानंतर शारिरीक हालचाल करू शकणारे बालक

ड) जीवित बालक : अर्भक जन्माला आल्यानंतर श्वास घेऊ न शकणे किंवा त्याची हत्या श्वास घेणेपूर्वी करणे.

## अर्भकहत्येची कारणे

१) नैसर्गिक – जन्मजात आजार, हृदय, फुफ्फुसाचे विकार

२) अपघाती – विलंबित, प्रसव, अपरेचे विकार इ.

३) गुन्हेगारी कारणे – हेतुपुरस्सर पाण्यात बुडवणे, गुदमरणे, विष देणे इ.

जन्मानंतर बालकाची मरणोत्तर तपासणी – फुफ्फुसाची तपासणी – फुफ्फुसाची वजन तपासणी स्थितीत तपासणी, तरंगणे तपासणी – श्वसन प्रक्रियेपूर्वी दोन्ही फुफ्फुसांचे वजन ३०–४० ग्रॅम असते. श्वासोच्छ्वासानंतर ६०–६६ ग्रॅम होते.

श्वसन तपासणी – जलस्थितीत तपासणी – फुफ्फुसाचे तोंडाशी दोरीने बांधून पाण्यात बुडवून पहावीत. ती पाण्यावर तरंगली तर त्याचे १२–२० तुकडे करून परतु बुडवून पहावीत आणि हवेचे बुडबुडे आले तर अर्भकाने श्वास घेतला होता, असे समजते.

पूर्णवाढ बालक – लांबी ५०–५३ सेमी, वजन २.५ ते ५ किलो. सामान्यतः ३।। कि. डोक्यावरचे केस, बोटावरचे नखे, अवरूद्धयोनी असणे, मलमुत्र गृदमार्ग असणे.

अस्थिविकास – उर्वास्थिचे खालचे टोक, जंघास्थिचे वरचे टोक ३६ व्या आठवड्यात दिसते. टाचेचे हाड ५ व्या महिन्यांत व घोट्याजवळचे हाड ७ वे महिन्यांत गर्भावस्थेत दिसते.

## प्रसुती पूर्व गर्भलिंग निदान तंत्र कायदा

हा कायदा १६ जानेवारी १९९६ ला सर्वोच्च न्यायालयाने पारित केला.

संकेत – ३५ वर्षांवरील गर्भिणी स्त्री जिचा वारंवार गर्भपात झाला आहे. किंवा जिला अनुवंशिक आजार असतील किंवा मानसिक आजार असतील किंवा केमोथेरपी चालू असेल तर तिचे गर्भलिंगनिदान करु शकतो. जेणेकरून तिच्यातील विकृती पुढील वंशात येणार नाही.

शासन मान्यताप्राप्त केंद्रे –

अनुवंश समुपदेशन केंद्र, अनुवंश प्रयोगशाळा व चिकित्सालये, सोनोग्राफी केंद्र, शासकीय व शासन मान्यताप्राप्त स्त्रीरोग तज्ञांचे दवाखाने याठिकाणी ही तपासणी करता येईल. या कायद्याचा भंग/गैरवापर झाल्यास भा.द.वि. ३१२ ते ३१५ चे अंतर्गत शिक्षा सुनावली जाते.

**प्रसुतीपूर्व गर्भलिंग निदान कायदे अंतर्गत अधिकार समिती**

जिल्हाधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक,
महानगर पालिकेचा मुख्य वैद्यकीय अधिकारी
महिला व बालकल्याण समितीचा सदस्य.

राज्य शासन समिती
राज्य महिला आयोग – अध्यक्षा/सदस्या
आरोग्यमंत्री
आरोग्य सचिव
संचालक आरोग्य सेवा

केंद्र शासन समिती
केंद्रीय आरोग्य मंत्री
केंद्रीय आरोग्य सचिव
राष्ट्रीय महिला आयोग अध्यक्षा/सदस्या

# प्रकरण – ११

# अंगुली मुद्रा शास्त्र

## (Finger Print Science) (I.E.A. Sec. 45, 46)

**उद्दिष्टे :**

**Indentification of Prisoners Act, 1920 Sec. 3**

I.E.A. Sec. 45 - तज्ञांची मते.

I.E.A. Sec. 46 - तज्ञांच्या मतांशी संबंधित तथ्ये.

१. आरोपीच्या विरुध्द पुरावा गोळा करता यावा म्हणून उपयोग.

२. आरोपीनेच गुन्हा केला आहे किंवा नाही हे पडताळण्यासाठी.

३. आरोपीला शिक्षा देण्यासाठी सबळ पुरावा सादर करण्याकामी.

अंगुली मुद्रा शास्त्र (Finger Print Science) हे परिपूर्ण असे स्वयंसिध्द शास्त्र आहे व अभ्यासाच्या दृष्टीने अचुकता दर्शविणारे असून अद्वितीय आहे. कोणत्याही व्यक्तीच्या शोधकामासाठी नि:पक्षपाती असे उपयुक्त शास्त्र असून बोटांच्या ठशाद्वारा गुन्हे तपास कामी उपयोग होऊ शकतो.

बोटांच्या तळहातावरील त्वचेच्या विशिष्ट रचनेमुळे उमटणाऱ्या ठशांना बोटांचे ठसे म्हणतात व या ठशांचा अभ्यास ज्या शास्त्रात करतात त्याला अंगुली मुद्रा शास्त्र असे म्हणतात.

अखिल विश्वातील सर्व देशात अंगुली मुद्रा शास्त्र हे पोलीस खात्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण व उपयोगी असल्याचे अनेक वर्षांच्या अनुभवाने सिध्द झाले आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे अंगुली मुद्राचे शाश्वत एकात्म तत्त्व आहे.

प्रत्येक व्यक्तीच्या जन्मत: अंगुलीवार तयार झालेल्या मुद्रांचा आकार हा त्या व्यक्तीच्या मृत्यूपर्यंत व नंतरही देह सडेपर्यंत बदलत नाही.

प्रत्येक व्यक्तीच्या अंगुली मुद्रा रेषांचे गुणधर्म हे वेगवेगळे असतात. म्हणून कोणत्याही दोन अंगुली मुद्रा कधीही एकात्म/एकसारख्या/एक समान नसतात. (जर त्या एकाच व्यक्तीने एकाच अंगुलीच्या उठविलेल्या नसतील तर)

सन १८९२ मध्ये डॉ. फ्रान्सीस गाल्टन यांनी हे सिध्दांत मांडले. म्हणून त्यांना अंगुली मुद्रा शास्त्राचे जनक संबोधिले जाते.

सर ई.आर. हेन्री यांना १२ जून १८९७ मध्ये जगात पहिला फिंगर प्रिंट ब्युरो कोलकत्ता येथे स्थापन करण्याचे श्रेय आहे. तसेच त्यांनी १० बोटांच्या ठशांची वर्गीकरण पध्दत मांडली व आज जगात हेन्री वर्गीकरण पध्दत वापरली जाते.

घटनास्थळी मिळणाऱ्या बोटांच्या ठशांवरून (चान्स प्रिंट वरून) आरोपीचा शोध घेता येतो. याची कल्पना डॉ. हेन्री फॉल्डस् यांनी मांडली व त्यामुळे तपासाच्या आधुनिक तंत्रज्ञानात भर पडली. त्यावरून आरोपी निश्चित करता येत असल्यामुळे आरोपीला शिक्षा होऊ शकते.

१. भारतीय पुरावा कायदा सन १८७२ कलम ४५ व ४६ अन्वये हा तज्ञांचा पुरावा न्यायालयात ग्राह्य आहे व कलम ७३ अन्वये अंगुली मुद्रांची तुलनात्मक तपासणी करून निष्कर्ष काढता येतो.

२. बोटांचे ठसे हे एक सारखे नसतात या तत्त्वाचा उपयोग करून अचुक आरोपी शोधून काढता येतो व न्यायालयास शिक्षा देणे कामी उपयोग होतो.

३. घटनास्थळावर चान्स प्रिंट मिळाल्यावर ते जो पर्यत फोटोग्राफ घेतले जात नाहीत तो पर्यंत. सुरक्षित ठेवावेत.

४. गुन्हेगार व्यक्तीचे बोटांचे ठसे घेऊन पाठविण्याचा पोलिसांना अधिकार आहे. (Identification of Prisoners Act. No. 33 Year 1920)

५. अंगुली मुद्रा तज्ञांची साक्ष खोटी ठरत नाही.

६. घटनास्थळावर प्रिंट मिळणे म्हणजेच आरोपी घटनास्थळावर गेल्याचा व गुन्हयात सामील असल्याचा भक्कम पुरावा आहे.

७. आरोपी इतर गोष्टी नाकारू शकतो. परंतु, घटनास्थळावर त्याचे बोटांचे ठसे मिळाल्याचे उत्तर त्याच्याकडे नसते.

८. गुन्हा करतेवेळी हाताचा वापर होतो म्हणूनच ठसे मिळण्यासाठी लवकरात लवकर तज्ञांना पाचारण करावे.

९. बोटांचे ठसे अंगुली मुद्रा हे गुन्हेगार व गुन्ह्याची सिध्दता पटविण्यासाठी महत्त्वाचा दुवा आहे.

१०. मालमत्ता विरुध्दच्या भा.दं.वि. प्रकरण १२ व १७ मधील गुन्हयात पूर्व शिक्षा असलेल्या गुन्हेगाराने पुन्हा गुन्हा केल्यास भा.दं.वि. कलम ७५ प्रमाणे वाढीव शिक्षा देण्याची तरतूद आहे.

११. गुन्हेगार व्यक्तीने खरेदी विक्रीच्या व्यवहारात ठसे उमटविले असल्यास त्याचे ठसे नाकारण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

१२. खोटे दस्तऐवजावरील बोटांचे ठसे ओळखून आरोपीला शिक्षा होऊ शकते.

१३. दुसऱ्यानेच पगार पत्रकावर बोटांचे ठसे उमटवून पैसे घेतल्याचा पुरावा शाबीत करता येतो.

१४. बोटांच्या ठशाच्या साहाय्याने जिवंत अथवा मृत व्यक्तीची अचुक ओळख पटविता येते.

१५. चान्सप्रिंटच्या साहाय्यानेच आरोपीला शोधले तर गुन्ह्याच्या तपासामध्ये महत्त्वपूर्ण पुरावा म्हणून उपयोग होतो व अज्ञात गुन्हेगाराची ओळख पटविता येते.

१६. पूर्व शिक्षा झालेल्या अनोळखी बेवारस मृत इसमाचे बोटांचे ठसे हे त्याची ओळख पटविण्यासाठी घेतले जातात.

१७. वादग्रस्त दस्ताऐवज व नैसर्गिक दस्तऐवजावरील ठशांची तुलना करून खरा आरोपी कोण याचा शोध घेतला जातो.

१८. अटक केलेल्या आरोपीस पूर्व शिक्षा झालेली आहे किंवा नाही हे पडताळून पाहता येते. त्यासाठी आरोपीचा शोध घेण्याकरिता अंगुली मुद्रा पत्रिका पाठविणे आवश्यक असते.

१९. वित्तीय संस्था, बँका, विमा कंपन्या, न्यायालय, सैन्यदले, निवडणूक आयोग, रुग्णालय, पारपत्र ऑफिस, मोटारसायकल परवाना इ. ठिकाणी ठशांच्या सहाय्याने व्यक्तिगत ओळख पटविली जाते.

२०. आरोपी सुनील आत्माराम मोरे (पोलीस शिपाई) याने साक्षीदार सुमीत याच्याकडून नोटबुक घेऊन त्यावर फिर्यादी व साक्षीदार प्रमोद यांची नांवे व पत्ते लिहिली ते हस्ताक्षर तज्ञांनी तपासून ते आरोपीचेच असल्याबद्दल अभिप्राय दिला व त्यामुळे या गुन्ह्यात आरोपीला भा.दं.वि. कलम ३७६ अन्वये १२ वर्षाचा सश्रम कारावास आणि २५,०००/- रु. दंड व दंड न भरल्यास एक वर्ष अधिक कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली.

## बोटांचे ठसे घेण्याचे कायदेशीर अधिकार :

Indentification of Prisoners Act. No. 33 Year 1920 - कैद्यांच्या ओळखी विषयीचा कायदा नं. ३३ सन १९२० नुसार बोटांचे ठसे घेण्याचा कायदेशीर अधिकार पोलीस तपासी अंमलदाराला प्राप्त

झालेला आहे.

कलम ३ - शिक्षा झालेल्या मनुष्याचे ठसे घेण्याविषयी.

कलम ४ - शिक्षा न झालेल्या मनुष्याचे ठसे घेण्याविषयी.

कलम ५ - मनुष्याचे ठसे घेण्याचे न्यायालयाचे अधिकार.

कलम ६ - बोटांचे ठसे घेऊ देण्यास अडथळा करण्याविषयी.

## चान्स प्रिंट म्हणजे काय :

गुन्ह्याच्या ठिकाणी गुन्हेगार वस्तू हाताळतांना त्याच्या कळत किंवा नकळत जे ठसे ठेवून जातो त्या ठशांच्या साहाय्याने गुन्हेगाराचा शोध लागू शकतो, असे डॉ. हेन्री फॉल्डस् या शास्त्रज्ञाने दाखवून दिले आहे. अशा प्रकारचे योगायोगाने मिळालेले ठसे हे गुन्हा आणि गुन्हेगार यामधील महत्त्वाचा दुवा असतो.

गुन्ह्याच्या ठिकाणी सापडलेल्या चान्स प्रिंटचे तीन प्रकार आहेत.

## चान्स प्रिंटचे तीन प्रकार :

१) प्लॅस्टिक प्रिंट - (Plastic Prints) मऊ पृष्ठभागावरील ठसे - हे साबण, चिखल, मेणबत्ती, डांबर, वितळलेले मेण अशा प्रकारच्या वस्तूवर सापडतात. त्यांना प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या साहाय्याने उचलतात व निगेटिव्हची पॉझिटिव्ह करतात.

२) सदृश्य ठसे - (Visible Prints) गुन्ह्याच्या ठिकाणी जर रंग, रक्त, शाई किंवा धूळ यामध्ये ठसा उमटलेला असेल तर तो आपल्याला स्पष्ट दिसतो. अशा प्रकारच्या ठशांवर कोणतीही पावडर न वापरता त्याचा फोटोग्राफ घेतात.

३) अदृश्य ठसे - (Latant Prints) - गुन्हयाच्या ठिकाणी सापडलेल्या वस्तुंवरील अदृश्य स्वरूपातील ठसे उघड्या डोळयांनी स्पष्ट दिसत नाहीत. अशा प्रकारच्या ठशांवर पावडरच्या साहाय्याने ठसे सदृश्य करतात. उदा. लाकडावरील / फर्निचरवरील ठसे, स्टील, पितळीची भांडी, काच, कागद व कोणत्याही गुळगुळीत पृष्ठभागावरील ठसे.

## फिंगर प्रिंट डेव्हलपिंग म्हणजे काय ?

अदृश्य ठसे विविध पावडरचा वापर करून व रासायनिक प्रक्रियेद्वारे तसेच अत्याधुनिक पध्दतीद्वारे सदृश्य करणे यासच 'फिंगर प्रिंट डेव्हलपिंग' असे म्हणतात.

## फिंगर प्रिंट डेव्हलप करण्याच्या तीन पध्दती :

१) **मेकॅनिकल पध्दत** - या पध्दतीमध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या पावडरचा वापर करून फिंगर प्रिंट डेव्हलपिंगसाठी उपयोग केला जातो.

उदाहरण अ) युनिव्हर्सल पावडर - कोणत्याही रंगीत पृष्ठभागावरील ठसे डेव्हलप करण्यासाठी वापरतात.

ब) ब्लॅक पावडर - सफेद / पांढऱ्या पृष्ठभागावरील ठसे डेव्हलप करण्यासाठी वापरतात.

क) ग्रे पावडर - मंद रंगाच्या पृष्ठभागावरील ठसे डेव्हलप करण्यासाठी वापरतात.

२) **रासायनिक पध्दत** - या पध्दतीमध्ये रासायनिक द्रव्ये वापरून प्रिंट डेव्हलप केले जातात.

उदाहरण अ) सिल्व्हर नायट्रेट प्रोसेस - कपड्यावरील ठसे डेव्हलप करण्यासाठी वापरतात.

ब) नीन हायड्रीन प्रोसेस - जुन्या कागदावरील ठसे डेव्हलप करण्यासाठी वापरतात.

क) आयोडीन फ्युमिंग प्रोसेस - कागदावरील ठसे डेव्हलप करण्यासाठी वापरतात.

## ३) फिंगर प्रिंटच्या अत्याधुनिक पध्दती :

अ)	ओमिनी १००० लाईट सोर्स उपकरण

पोलीस तपासात चान्सप्रिंटस्च्या साहाय्याने गुन्हेगार निष्पन्न करून देण्याकामी अंगुली मुद्रा तज्ज्ञ बहुमोल मदत करीत असतात. गुन्हास्थळी गुन्हेगारांनी त्याचे प्रत्यक्ष अस्तित्व दर्शविणारे बोटांचे अदृश्य ठसे नकळत सोडलेले असतात. हे अदृश्य ठसे म्हणजेच बर्गलस व्हिजीटींग कार्ड होय.

महाराष्ट्र पोलीस दलाने आधुनिकीकरणांतर्गत अंगुली मुद्रा केंद्रासाठी पाश्चात्य बनावटीचे ओमिनी १००० लाईट सोर्स उपकरण, पोलीरे लाईट सोर्स उपकरण व डस्टमार्क लिफ्टींग किट अंगुली मुद्रा केंद्रासाठी खरेदी केल्या आहेत.

उपकरणाची माहिती :-

| | | |
|---|---|---|
| १) नाव | :- | OMINI - 1000, Light Source Instrument. |
| उत्पादक देश | :- | M/s. Lighting Power Co. U.S.A. |
| किंमत | :- | Rs. 4,00,000 |
| अनुषंगिक | :- | NIKON - S008 Camera Kit |
| साहित्य | :- | Auto Processor, Fluerocent Powders |

उपयुक्तता :- चान्सप्रिंट विकसनाच्या पारंपरिक पध्दतीच्या वापरामुळे फक्त गुळगुळीत पृष्ठभाग असलेल्या वस्तूंवर चान्स्प्रिंट विकसित करण्याची सुविधा उपलब्ध होती. परंतु त्यामुळे अंगुली मुद्रा तज्ञांचे गुन्हे तपास कामात मर्यादा पडत असत. या आधुनिक उपकरणाने मात्र अंगुली मुद्रा तज्ञांच्या गुन्हे तपास कामाची व्याप्ती वाढली असून, ओबडधोबड पृष्ठभाग उदा. लाकूड, दगड, रेक्झीन, प्लॅस्टिक, लेदर इ.सारख्या वस्तूवरही असणारे अदृश्य ठसे हे दृश्यमान करता येतील. ही विज्ञानाची किमया सदर उपकरणातील अतिनील प्रकाश किरणांच्या (Ultra Violate Rays) विविध क्षमतेच्या वापरामुळे आणि त्यास प्रतिसाद देणाऱ्या फ्ल्युरोसेंट पावडरच्या साहाय्याने अंगुली मुद्रा तज्ज्ञ गुन्हे तपासाचे काम करू शकणार आहेत. एवढेच नव्हे तर हे दृश्यमान केलेले ठसे उपलब्ध कॅमेरामुळे त्वरित छायाचित्रित करता येतील. निगेटिव्ह ट्रान्सपरंसी फिल्म असून ऑटोप्रोसेसरमध्ये ताबडतोब डेव्हलप केली जाते व अंगुली मुद्रा तज्ञ त्याची उपयुक्तता गुन्हा स्थळीच अजमावू शकतात.

## ब) पॉली रे लाईट सोर्स उपकरण :

| | | |
|---|---|---|
| नाव | :- | Poliray Light Source Instument |
| उत्पादक देश | :- | Rofin Australia Pvt. Ltd. ACN - 425 507<br>6/4-44 Garden Boulevard, Dingley Victoria 3172,<br>Australia. |
| किंमत | :- | Rs. 2,50,000 |
| अनुषंगिक | :- | Poliray Kit Caring Case with Camera |
| साहित्य | :- | Auto Processor Charging Battery, Fluerocent Powders |

उपयुक्तता :- ओमिनी १००० लाईट सोर्स उपकरणाची सुधारित प्रतिकृतीच्या रूपाने पॉली रे लाईट सोर्स उपकरण हे उदयास आले आहे. संशयित आरोपीचे ठसे तपासकामी घटनास्थळावर आपणास उपलब्ध झाले असतील तर हे उपकरण हाताळण्यास अत्यंत सोपे आहे. हातात घेऊन पाहिजे त्या ठिकाणी आपणास ते नेता येऊ शकते. साधारणत: दोन किलोग्रॅम वजनाचे हे उपकरण असून त्यात वेगवेगळ्या प्रकाश किरणांच्या तीव्रतेचे सात फिल्टर वापरलेले आहेत. शिवाय हे मशीन १२ व्होल्टच्या बॅटरीवर चालू शकते.

ज्या ठिकाणी ठसे आहेत तेथे फ्ल्युरोसंट पावडरच्या साहाय्याने दृश्यमान करून त्यावर पॉली रे लाईट

सोर्स उपकरणांव्दारे अतिनिल किरणे पाडल्यावर ठसे चमकायला लागतात. वस्तूचे पृष्ठभाग व रंग यानुसार हवी ती (हिरवी, गुलाबी, पिवळी) फ्ल्युरोसंट पावडर ठसे डेव्हलप करण्यासाठी वापरून वेगवेगळ्या प्रकाशमान सात फिल्टरच्या साहाय्याने दृश्यमान करून आपल्याला ठशांची सुस्पष्टता निश्चित करता येते व नंतर तशाच रंगाचे फिल्टर वापरून कॅमेऱ्याचा वापर करून त्या उपकरणांच्या मध्येच त्याचे छायाचित्रण केले जाते.

## क) डस्टमार्क लिफ्टींग किट –

गुन्ह्याच्या ठिकाणी असलेल्या धुळीवरील आरोपीचे ठसे घेताना उपयोगी ठरणारी यंत्रणा अमेरिकेच्या कंपनीकडून मागविण्यात आली आहे. आरोपीचे ठसे मिळविताना गुन्ह्याच्या ठिकाणी असलेल्या धुळीचा अडथळा येत होता. विशेषत: ग्रामीण भागात तो जाणवायचा. धुळीमुळे ठशांची छायाचित्रे अस्पष्ट येतात आणि ठशांची अनेक वैशिष्ट्ये बुजून जातात. त्यामुळे ठशांच्या स्वरूपात असणारा महत्त्वाचा पुरावा कुचकामी ठरायचा. अनेकदा चोऱ्या, घरफोड्यांच्या प्रकारात आरोपी खिडकीवाटे आत शिरून चोऱ्या करतात. अशा वेळी घरात शिरताना खिडकीतील धुळीवर त्यांचे ठसे उमटतात. त्याद्वारे धुळीच्या समस्येवर मात करण्यास डस्टमार्क लिफ्टींग किटद्वारे यश आले आहे. या यंत्रणेचा वापर करून धुळीवर असलेल्या ठशांवर विशिष्ट धातुचा पातळ पत्रा आंथरून त्यातून विद्युत प्रवाह सोडण्यात येतो. त्यामुळे पत्रा काहीसा ताणला जातो. आणि त्यावर धुळीवरील ठसे स्पष्टपणे उमटतात. त्याचेही छायाचित्र चांगले येते. या तंत्राचा उपयोग गुन्हे उघडकीस आणणेकामी होणार आहे. उदा. – पूर्वी वर्तमानपत्राच्या छापील पृष्ठ भागावरील धुळीचे ठसे घेताना अडचणी निर्माण व्हायच्या कारण ट्रान्सपरंट सेलोटेपच्या साहाय्याने धुळीचे ठसे घेताना छापील पृष्ठभागदेखील उमटायचा किंवा फोटोग्राफ घेताना छापील पृष्ठभागाचाही समावेश व्हायचा. परंतु डस्टमार्क लिटींग किटद्वारे वर्तमानपत्रावर धुळीचे ठसे असतील तर विशिष्ट धातुच्या पातळ शीटचा काळा भाग प्रिंटवर ठेवून रबर रोलरने शीट्स सरळ करून घ्यावे. सिल्व्हर भागावर विशिष्ट बॅटरीचा निगेटिव्ह चार्ज करताना स्केल ठेवून शीट्सला स्पर्श होईल असा प्रवाह सोडावा. त्यानंतर शीट पॉझीटिव्ह चार्ज झाले असता डस्ट प्रिंट काळया बाजूवर येईल त्या ठशाची प्रकाशात पाहणी केली असता तेवढ्या भागाचा फोटोग्राफ काढून डस्टमार्क लिटींग किटचा उपयोग धुळीचे ठसे डेव्हलप करण्यासाठी करता येतो.

## अंगुली मुद्रा संगणकावर गुन्हेगारांची माहिती तपासणे.

फिंगर प्रिंट ॲनॅलिसीस ॲण्ड ट्रेसिंग सिस्टिम / फॅक्ट्स ५ सिस्टिम –

राज्यभरातील तीन लाख गुन्हेगारांच्या बोटांचे ठसे व त्यांची वैयक्तिक माहिती फिंगर प्रिंट ॲनॅलिसिस ॲन्ड ट्रेसिंग सिस्टिमद्वारे (Facts 5 System) नोंदविण्याचे काम राज्य गुन्हे अन्वेषण विभागातील फिंगर प्रिंट ब्युरोने पूर्ण केले असून त्याचा प्रत्यक्ष वापर सुरू झालेला आहे. या योजनेमुळे राज्यात कुठेही गुन्हा घडल्यास तो कोणत्या सराईत गुन्हेगाराने केला आहे. याचा उलगडा काही तासात होऊ शकेल.

या विभागात दरवर्षी सरासरी बारा हजार ठशांची भर पडते, मात्र नोंदीचे काम मनुष्य बळाद्वारे होत असल्याने अडचणी येत असत. तसेच ठशांची पडताळणी करताना बराच कालावधी लागत असे. हैद्राबादच्या सी.एम.सी. या कंपनीने ठशांची नोंदणी आणि पडताळणी करण्यासाठी फॅक्टस् ५ ही कार्यप्रणाली विकसित केली आहे.

फॅक्टस् ५ कार्यप्रणालीद्वारे राज्यभरात वेगवेगळ्या गुन्हयामध्ये अटक झालेल्या गुन्हेगारांचे ठसे आणि वैयक्तिक माहिती नोंदविण्याचे काम सुरू झालेले आहे. त्यापैकी शिक्षा झालेल्या तीन लाख गुन्हेगारांच्या नोंदणीचे काम पूर्ण झाले आहे. नोंदविलेल्या या माहितीची फेरतपासणी केली जाऊन त्याचा प्रत्यक्ष वापर सुरू झालेला आहे. या माहितीची देवाण–घेवाण करण्यासाठी महाराष्ट्र राज्यात ४१ सबस्टेशन (रिमोट क्वेरी वर्क

स्टेशन) उभारण्यात आलेली आहेत. तेथे ठशांवरून गुन्हेगारांचा शोध घेण्या बरोबरच नवीन गुन्हेगारांच्या नोंदीसुध्दा घेतल्या जाणार आहेत.

आजवर भारत देशातील अवघ्या आठ राज्यांमध्ये या पध्दतीचा अवलंब झालेला आहे. सर्व प्रथम १९९८ मध्ये तामिळनाडू, आंध्रप्रदेश व जम्मू काश्मीरमध्ये या पध्दतीने ठशांची पडताळणी करण्यात यश मिळविले आहे. नंतर दिल्ली, केरळ, कर्नाटक, हरियाणा व महाराष्ट्र या राज्यांनीही ही पध्दत उपयोगात आणली आहे.

## फिंगर प्रिंटबाबत घ्यावयाची काळजी :

१) तपासी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घटनास्थळावरील कोणतीही वस्तू तज्ञांच्या तपासणी अगोदर हाताळू नये.

२) वस्तू हाताळतांना रूमाल किंवा हातमोज्यांचा वापर करावा.

३) घरातील व्यक्ती घटनास्थळावरील कोणतीही वस्तू हाताळणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

४) घटनास्थळी गेलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी चोरीस गेलेला माल पाहण्यासाठी घरच्या लोकांना अंगुली मुद्रा तज्ञ येईपर्यंत कुठल्याही वस्तूला हात लावण्यास सांगू नये.

५) पोलीस अधिकारी किंवा कर्मचारी हे स्वत: हात लावून किती माल गेला आहे हे पाहण्याकरिता लॉकर्स, दागिन्यांच्या पेटीला नकळत हात लावतात त्यामुळे आरोपीचे ठसे नष्ट होण्याची शक्यता असते.

६) खुनासारख्या गुन्ह्याच्या घटनास्थळी एखादे धारदार शस्त्र, जवळपास असणाऱ्या चिजवस्तू यासुध्दा व रूमाल किंवा हातमोजे यांच्या साहाय्याने हाताळाव्यात.

## F.S.L. मोबाइल व्हॅन :

## इनव्हेस्टिगेशन कार युनिटच्या उपयोगाबाबत :

**इनव्हेस्टिगेशन कार युनिट –** पोलीस खात्यात गुन्ह्याच्या तपासाबाबत आधुनिकीकरण करण्याच्या दृष्टीने व गुन्ह्याचा तपास ताबडतोब वैज्ञानिक पध्दतीने करून गुन्ह्याच्या जागेचा शास्त्रोक्त पुरावा लवकरात लवकर उपलब्ध करून गुन्ह्याचा शोध लावणे. गुन्हे शाबीत करणे असा उद्देश डोळयासमोर ठेवून इनव्हेस्टीगेशन कार युनिट जास्तीत जास्त जिल्ह्यांना पुरविण्यात आलेली आहे. हा स्तुत्य उपक्रम मा. पोलीस महासंचालक व गृह विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या सौजन्याने शासनाने राबविलेला आहे.

इन्व्हेस्टीगेशन कार युनिटमध्ये फिंगर प्रिन्ट एक्सपर्ट, फोटोग्राफर, वैज्ञानिक साहाय्यक अशा तज्ञांची त्यांना त्यांच्या कामात लागणाऱ्या साहित्य उपकरणांसह नेमणूक केलेली आहे. अशा प्रकारची यंत्रणा प्रत्येक जिल्ह्यात अंमलात आलेली आहे.

इनव्हेस्टीगेशन कार युनिट प्रत्येक जिल्ह्यात एल.सी.बी. शाखेकडून वापरण्यात येतात. सर्वसाधारणपणे खालील गुन्ह्याच्या जागी इनव्हेस्टीगेशन कार युनिट भेटी देऊन स्थानिक तपासी अंमलदारांना त्या घटनास्थळीच जागच्या जागीच मदत करीत असतात. मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या आदेशानुसार ज्या गुन्ह्यांची निवड केलेली आहे ते गुन्हे खालीलप्रमाणे.

### १) खून व खुनाचा प्रयत्न :

अ) ज्या गुन्ह्यातील उद्देश पैसे, दागिने, इस्टेट व हक्क इ. मिळविण्यासाठी असेल.

ब) ज्या गुन्ह्यात मरणाबाबत विषप्रयोग केल्याचा संशय आहे.

क) ज्या गुन्ह्यात गुन्हा करताना क्षेपणास्त्राचा/अग्निशस्त्राचा वापर केला आहे. अगर त्याकरिता जवळ

क्षेपणास्त्रे बाळगली आहेत.

ड) ज्या गुन्ह्यात ताबडतोब आरोपी निष्पन्न झालेला नाही.

## २) खालील संशयित मयतांची प्रकरणे :

अ) ज्या प्रकरणी अकस्मात मृत्यू झाला आहे आणि त्याकामी मयताच्या नातेवाईकांनी खात्रीशीर संशय दाखविला आहे.

ब) ज्या प्रकरणी सार्वजनिक हिताचे संबंध आहेत.

## ३) दरोडा व जबरी चोरी :

अ) ज्या गुन्ह्यात धंदेवाईक गुन्हेगारांचा हात आहे.

ब) ज्या गुन्ह्यात क्षेपणास्त्रे बाळगली आहेत. अगर वापरली आहेत.

क) ज्या गुन्ह्यात वाहनांचा वापर केला आहे.

## ४) घरफोडी व चोरी :

अ) सर्व प्रकारचे घरफोडी व चोरीचे गंभीर गुन्हे.

ब) ज्या गुन्ह्यात गेलेला माल जरी जास्त नसला तरी गुन्ह्याच्या पध्दतीवरून सुरक्षिततेस धोका आहे किंवा ज्या प्रकरणी सार्वजनिक हितास बाधा येते असे गुन्हे.

## ५) जाळपोळ व समाज विघातक प्रकरणे :

अ) सार्वजनिक मालमत्तेच्या बाबतीतील प्रकरणे.

ब) मनुष्यहानी झालेली जाळपोळीची गंभीर प्रकरणे.

क) सार्वजनिक अशांततेमध्ये गणना होईल अशी इतर जाळपोळ व समाज विघातक प्रकरणे.

## ६) गंभीर अपघात :

अ) ज्यात मनुष्यहानी झालेली आहे असे अपघात.

ब) सार्वजनिक अशांततेची बाब असलेली प्रकरणे.

## ७) इतर प्रकरणे –

वरील वर्गात न बसलेली, परंतु ज्यात तज्ञांची सेवा आवश्यक आहे असे वाटते अशा विशिष्ट प्रकारची प्रकरणे.

८) वरील प्रकरणी रात्रंदिवस या कारची सेवा उपलब्ध होण्याकरिता टेलिफोनवरून पोलीस स्टेशन तपासी अंमलदारांनी मागणी करावी, अशी मागणी करताना वर नमूद केलेल्या गुन्ह्याव्यतिरिक्त इतर प्रकरणी मागणी केली जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

९) ज्या वेळी कारची मागणी केली जाते, त्यावेळी गुन्ह्याच्या जागेची माहिती अगदी बरोबर घ्यावी किंवा एखादा पोलीस शिपाई नेमून कार गुन्ह्याच्या जागी अनावश्यक विलंब न लावता पोहचू शकेल, अशी व्यवस्था करावी.

१०) गुन्ह्याच्या जागी कारमधील तज्ञांची भेट, तपासी अंमलदार किंवा त्या गुन्ह्याची माहिती असलेला इतर ज्येष्ठ अधिकारी यांना घेऊन त्यांना घटनास्थळाची माहिती देतील.

तज्ञांनी सॅम्पल (नमुना) घेण्याबाबत पुराव्याचे धागेदोरे राखून ठेवणे इ. बाबत दिलेल्या सूचना तंतोतंत अंमलात आणाव्यात व तज्ञांना वेळोवेळी मदत व सहकार्य द्यावे.

११) अशा गुन्ह्याच्या भेटीकरिता कारची मागणी केल्याबद्दलचे रजिस्टर ठेवावे.

प्रत्येक जिल्ह्याच्या एल.सी.बी. पोलीस निरीक्षक किंवा दुय्यम पोलीस निरीक्षक यांनी पोलीस स्टेशनकडून

मागणी झाल्यावर कार तज्ञासह ताबडतोब घटनास्थळी जाईल. अशी व्यवस्था त्यांच्या शाखेकडून होईल याची जबाबदारी योग्य प्रकारे पाळावी. यामध्ये हयगय अगर विलंब झालेस कारच्या भेटीचा उद्देश सफल होणार नाही व गुन्ह्याच्या ठिकाणचे भौतिक पुरावे रेकॉर्डवर आणण्यात अडचणी येतील. म्हणून या कारचा जास्तीत जास्त परिणामकारक वापर करण्याकडे सर्व संबंधितांनी लक्ष पुरवावे.

फिंगर प्रिंट एक्सपर्ट यांनी बोटांचे / पायाचे ठसे डेव्हलप करून योग्य ठशांचे फोटोग्राफरकडून फोटो घेऊन तपासी अंमलदारांनी गुन्ह्याच्या ठिकाणाचे घरातील किंवा तत्सम लोकांचे ठसे लगेच घ्यावेत. तसेच संशयित, सराईत व माहीतगार गुन्हेगारांच्या व हिस्ट्रीशिटर व्यक्तीच्या बोटांचे ठसे घेण्याची तजवीज करावी. व त्या स्लिपा फिंगर प्रिंट एक्सपर्टला लगेच उपलब्ध करून द्याव्यात. त्याच प्रमाणे वैज्ञानिक सहायक व फोटोग्राफरनी आपापली कामे जागच्याजागी व संबंधित साहित्य वापरून पुराव्याचे पदार्थ व मुद्दे तपासून योग्य ती चाचणी करण्याकरिता ताब्यात घ्यावयाचे आहेत. याकरिता तपासी अंमलदाराने त्याच वेळी हजर राहून त्या कामी त्यांना मदत व सहकार्य देऊन तपासाची पूर्तता करावयाची आहे.

या कामाचे परिणामकारक यश स्थानिक तपासी पोलीस अंमलदार व संबंधित पोलीस स्टेशन इनचार्ज हे वैज्ञानिक पध्दतीने गुन्ह्याचा तपास करण्यास पुरेपूर रस घेऊन त्यात किती समरस होतात यावर अवलंबून आहे. म्हणून या पुढे यावर अधिक भर द्यावा.

■■■■■

# प्रकरण – १२

# अ) कबुली जबाब

## [Confession Cr. P.C. Sec. 164]

### उद्दिष्टे :

Cr. P.C. Sec. 164 – कबुली जबाब आणि जबाब नोंदून घेणे.

ब) मृत्युपूर्व जबाब [Dying Declaration I.E.A.]

**I. E. A. Sec. 24 to 30, 32 (1)**

I. E. A. Sec. 24 – फौजदारी कार्यवाहीत प्रलोभन, धमकी किंवा वचन यांद्वारे घेण्यात आलेला कबुली जबाब ग्राह्य नाही.

I. E. A. Sec. 25 – पोलीस अधिकाऱ्याकडे दिलेला कबुली जबाब ग्राह्य नाही.

I. E. A. Sec. 26 – पोलिसांच्या रखवालीत असताना आरोपीने दिलेला कबुली जबाब त्याच्याविरुध्द ग्राह्य नाही.

I. E. A. Sec. 27 – आरोपीकडून मिळालेल्या माहितीपैकी किती भाग शाबीत करता येईल.

I. E. A. Sec. 28 – प्रलोभन, धमकी किंवा वचन खेरीज घेतलेला कबुलीजबाब ग्राह्य आहे.

I. E. A. Sec. 29 – अन्यथा संबध्द असलेला कबुली जबाब हा गुप्ततेचे वचन, इत्यादी कारणांमुळे असंबध्द व्हावयाचा नाही.

I. E. A. Sec. 30 – एका आरोपीचा कबुली जबाब त्याच अपराधातील अन्य व्यक्ती विरुध्द विचारात घेणे.

I. E. A. Sec. 32 (1) – जी व्यक्ती मरण पावली आहे किंवा जिचा शोध लागू शकत नाही अशा व्यक्तीने दिलेला जबाब मृत्यूच्या कारणाशी संबंधित असेल तेव्हा तो ग्राह्य आहे.

१. आरोपीने मॅजिस्ट्रेट समोर स्वखुशीने कबुली जबाब दिल्यास गुन्हा शाबीत होण्यास कशी मदत होते ते सांगू शकाल.

२. आरोपीने पोलीस रखवालीत असताना दिलेल्या निवेदनावरून एखादी गोष्ट उघडकीस आल्यास पुरावा कायद्याप्रमाणे कसे ग्राह्य आहे ते सांगू शकाल.

### कबुली जबाब :

गुन्हयाच्या तपासात आरोपीने मॅजिस्ट्रेट समोर सी.आर.पी.सी.कलम १६४ प्रमाणे स्वत: गुन्हा केल्याबाबत कबुली देतो त्यावरून त्याच आरोपीने गुन्हा केल्याचे सूचित होते. अशा वेळी आरोपीने स्वखुशीने न्यायालयासमोर सांगितलेला गुन्ह्याचा मजकूर म्हणजे कबुली जबाब होय.

अ) घटना – एका ठिकाणी एका पाच वर्षाच्या बालिकेवर त्याच्या शेजारी राहणाऱ्या इसमाने बलात्कार केला. ती बालिका बलात्कार करणाऱ्या माणसाला ओळखत असल्याने तिचा ज्युडिशियल मॅजिस्टेट वर्ग-१ यांचेकडे सी.आर.पी.सी. कलम १६४ प्रमाणे कबुली जबाब घेण्याचे ठरविले. सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यावर पीडित बालिकेला ज्युडिशियल मॅजिस्टेट वर्ग-१ यांच्या समोर कबुली जबाबास आणले, त्यावेळी त्या न्यायालयाने पीडित बालिकेला ''तुला काही सांगायचे आहे का?'' असे विचारले त्या बालिकेने त्यावर नकारार्थी मान

हालवली म्हणून ती मुलगी गुन्हयाबद्दल काही सांगत नाही असे मत नोंदविले व तिचा कबुली जबाब घेतला नाही. त्यामुळे आरोपी निर्दोष सुटले.

१. कबुली जबाब हा भारतीय पुरावा अधिनियम कलम २१ प्रमाणे ग्राह्य आहे.

२. आरोपीने तिऱ्हाईत व्यक्ती समक्ष सांगितलेला कबुली जबाब भारतीय पुरावा अधिनियम कलम २५ अन्वये ग्राह्य आहे.

३. आरोपीने मॅजिस्ट्रेट समोर दिलेला कबुली जबाब हा भारतीय पुरावा अधिनियम कलम २६ अन्वये ग्राह्य आहे.

४. आरोपीने पोलीस रखवालीत असताना दिलेल्या निवेदनावरून एखादी गोष्ट उघडकीस आल्यास भारतीय पुरावा अधिनियम कलम २७ अन्वये ग्राह्य आहे.

५. महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी अधिनियम १९९९ च्या कलम १८ नुसार पोलीस अधीक्षकापेक्षा कमी दर्जाच्या नसलेल्या पोलीस अधिकाऱ्यासमोर आरोपीने दिलेला कबुली जबाब न्यायालयीन चौकशीमध्ये ग्राह्य आहे.

६. कबुली जबाबामुळे इतर पूरक पुरावा गोळा करणे सोयीस्कर असते.

७. कबुली जबाब घेतांना उच्च न्यायालयाचे नियमावलीनुसार (High court Manual) घेण्यात यावा.

८. कबुली जबाबासंदर्भात मा. उच्च न्यायालयाचे निवाडयाचा विचार करता साक्षीदारांचा सी.आर.पी.सी. कलम १६४ प्रमाणे जबाब घेतात. अशा साक्षीदारावर तपासी अंमलदाराचा विश्वास नसतो. तो भविष्यात फितूर होईल म्हणून त्याचा जबाब घेतात. म्हणून त्याचे जबाबासोबत इतर पूरक पुरावा असणे गरजेचे आहे.

## कबुली जबाब :

जेव्हा आरोपी हा पोलिसांपुढे किंवा न्यायालयासमोर त्याने केलेल्या गुन्ह्याची कबुली देतो तेव्हा त्यास कबुलीजबाब असे म्हणतात. ज्या परिस्थितीत आरोपीने गुन्हा केला त्या परिस्थितीबाबत माहिती सांगण्याचा प्रयत्न करणे हासुध्दा कबुलीजबाब होऊ शकतो. जबाब हा कबुलीजबाब आहे असे म्हणता येईल जेव्हा गुन्ह्याची संपूर्ण कबुली किंवा गुन्ह्याच्या सर्व माहिती / वस्तुस्थिती ज्यामुळे गुन्हा झाला आहे, हे आरोपी सांगत असेल.

## कबुली जबाबबाबतच्या कायदेशीर तरतुदी :

जवळजवळ सर्व लोकशाही देशांमधून कबुली जबाब हा पुरावा अतिशय सावधतेने स्वीकारला जातो. कबुली जबाब हा मोकळेपणाने, स्वत:हून व खरा असला पाहिजे. कबुली जबाबाचा पुराव्यात स्वीकार करणे हे न्यायमूर्तींच्या समाधानावर अवलंबून असते. इंग्लंड, अमेरिका व युगांडामध्ये पोलिसांनी केलेल्या चौकशीत जी उत्तरे आरोपीनी दिली ती पुरावा म्हणून मान्य आहे. या देशामध्ये जर कबुली जबाब हा मोकळेपणाने, खरा व स्वत:हून दिलेल्या दिसून आला तर त्यावरून शिक्षा दिली जाते.

पोलिसांनी आरोपीकडे केलेली विचारपूस (तपास) ही कलम १६३, १६४ व ३१६ क्रि.प्रो.कोड व कलम २४ ते ३० भा.पु.का.प्रमाणे असते. कलम १६४ क्रि.प्रो.कोड व कलम २६ भा.पु.कायदा ( IEA) ही एकत्रित असून ती न्यायमूर्तींकडे दिलेला कबुली जबाबासंदर्भात आहेत.

## कलम १६३ क्रि.प्रो.कोड आमिष न देणे :

१. कुठलाही पोलीस अधिकारी किंवा अधिकार असलेल्या कोणाही इसमाने कलम २४ पुरावा कायदा यात नमूद केलेल्या कोणत्याही तऱ्हेचे आमिष, धमकी किंवा कुठलेही वचन देऊ नये.

२. पण त्याच दरम्यान जर कोणी इसमास स्वत:च्या मोकळेपणाने त्या प्रकरणांत जर जबाब द्यायचा असेल तर कोणीही पोलीस अधिकारी किंवा इतर इसमांनी त्यास कुठल्याही प्रकारे जबाब देण्यापासून थांबवू नये (किंवा तसा जबाब न देण्याबाबत प्रवृत्त करू नये.)

मात्र कलम १४४(४) क्रि.प्रो.कोडमध्ये असलेल्या तरतुदीस कुठल्याही तऱ्हेची वरीलप्रमाणे बाधा येणार नाही.

## कलम ३०६ क्रि.प्रो.कोड :

कलम ३०६ क्रि.प्रो.कोड (माफीचा साक्षीदार) व कलम ३०७ क्रि.प्रो.कोड (माफीचा साक्षीदार म्हणून देण्याचा अधिकार) त्यात नमूद केलेल्या तरतुदीखेरीज इतर कोणाही इसमास आमिष, धमकी किंवा इतर प्रकारे त्याला माहिती उघड करण्यासाठी किंवा न सांगण्यासाठी प्रवृत्त करणार नाही.

## भारतीय पुराव्याचा कायदा कलम २४ :

गुन्हेगारी खटल्यात आरोपीने दिलेला कबुली जबाब हा अग्राह्य आहे, जर आरोपीने दिलेला कबुली जबाब जर कोर्टाचे मते कोणी अधिकाऱ्याने (जबाबदार व्यक्तीने) धमकी, आमिष किंवा काही कबूल करून घेतल्याचे वाटले आणि जर कोर्टाला असे वाटले की, असा कबुली जबाब दिल्याने आरोपीस गुन्ह्यांसंबधी काही फायदा होणार आहे किंवा लौकिकदृष्ट्या एखादे कुकर्म (पाप) टाळता येण्यासारखे आहे.

## कलम २५ भा.पु.का. (IEA) :

पोलीस अधिकाऱ्यासमोर दिलेला कबुली जबाब हा त्या आरोपीविरुध्द वापरता येणार नाही. (अग्राह्य आहे.)

## कलम २७ भा.पु.का. (IEA) :

मात्र ज्यावेळी पोलीस अधिकाऱ्यासमोर त्याचे रखवालीत असताना दिलेला कबुली जबाबामुळे काही हकिकत उघड होत असेल तर तेवढाच जबाब मग तो कबुली जबाब असला तरी अशी हकिकत उघडकीस आणण्यापुरताच उपयोगात आणता येईल.

## कलम २८ भा.पु.का. (IEA) :

मात्र कलम २४ मध्ये नमूद केलेल्या कबुली जबाबाबाबत जर कोर्टाला वाटले की, असा जबाब हा आमिष, धमकी किंवा कबुली देण्याबाबतचे आक्षेप संपूर्णपणे काढून टाकलेले होते तर असा जबाब ग्राह्य धरला जाईल.

## कलम २९ भा.पु.का. (IEA) :

जर आरोपीचा कबुली जबाब इतर कारणांसाठी ग्राह्य असेल तर केवळ असा जबाब हा गोपनीय ठेवला जाईल या वचनावर किंवा आरोपीस फसवून घेतला गेलेला असेल किंवा आरोपी नशेत असेल किंवा विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे जी उत्तरे तो नाकारू शकत असेल अशा तऱ्हेने दिलेला असेल किंवा आरोपीस तो तसा कबुली देण्यास बांधलेला नाही अशा तऱ्हेची समज न घेता दिलेला असेल तर असा कबुली जबाब आरोपीच्या विरुध्द ग्राह्य धरला जाऊ शकतो.

## कलम ३० भा.पु.का. (IEA) :

ज्यावेळी एकापेक्षा जास्त आरोपींवर एकत्रित खटला एकाच गुन्ह्यामध्ये चालू असेल तर एका आरोपीने दिलेला कबुली जबाब हा त्यांच्याविरुध्द आणि इतर आरोपी विरुध्द कोर्ट विचारात घेऊ शकतो. या कबुली जबाबाच्या तरतुदीबाबत एकत्रित परिणाम काय असेल त्याचा गोषवारा पुढीलप्रमाणे.

१) ज्या कोर्टात आरोपीविरुध्द खटला चालू आहे अशा खटल्यात आरोपीने पोलीस अधिकाऱ्यासमोर दिलेला कबुली जबाब ग्राह्य धरता येणार नाही. त्यामुळे आरोपीने पोलीसाकडे दिलेला कबुली जबाब कुठल्याही कारणासाठी ग्राह्य धरता येणार नाही (उपयोगात आणता येणार नाही) फक्त खालील नमूद केलेल्या कारणासाठी.

२) पोलीस अधिकाऱ्याखेरीज इतर इसमासमोर आरोपीने दिलेला कबुली जबाब न्यायालयात त्या खटल्यात आरोपीविरुध्द ग्राह्य धरला जाईल, मात्र जर असा कबुली जबाब आमिष दाखवून, धमकी देऊन किंवा काही वचन देऊन घेतला असेल व आरोपीस अशी समज करून देण्यात आली की त्यामुळे त्याला काही फायदा होईल किंवा एखादे कुकृत्य लपवता येईल तर त्याचा तो कबुली जबाब ग्राह्य धरता येणार नाही. मात्र, आरोपीच्या मनात जर वरील समज दूर केलेले असतील तर तो कबुली जबाब ग्राह्य धरण्यात येऊ शकतो. एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, एखादा जबाब हा निगडित आहे व ग्राह्य आहे, मात्र तो विश्वसनीय आहे की नाही ही दुसरी गोष्ट आहे. एखादा जबाब निगडित असेल मात्र तो जर विश्वसनीय नसेल तर विचारात घेतला जाणार नाही. (त्याचा पुरावा म्हणून उपयोग केला जाणार नाही.)

३) कबुली जबाबाचा काही भाग जर एखादी गोष्ट थेट मिळवण्यासाठी उपयोगात आला तर असा कबुलीजबाब ज्या आरोपीने दिला आहे, त्याचे विरुध्द ग्राह्य धरता येतो जर जबाबाचा तो भाग आरोपीने पोलिसापुढे पोलीस कोठडीत असताना दिलेला असेल. हा नियम या तत्त्वावर आधारित आहे की, पोलिसासमोर दिलेला कबुली जबाब हा कमकुवत आहे. कारण तो डागळलेला व अविश्वसनीय असतो. मात्र जरी तो भाग कबुली जबाब असला तरी एखादी गोष्ट (उघडकीस) मिळविण्यासाठी प्रत्यक्ष ती मिळविली गेल्यामुळे त्याची विश्वासार्हता पक्की होते.

४) वर नमूद केल्याप्रमाणे जर पोलीस अधिकाऱ्याव्यतिरिक्त दुसऱ्याकडे कबुली जबाब दिला व जर त्यात आमिष, धमकी किंवा काही भरवसा (वचन) नसेल तर तो ग्राह्य आहे आणि जरी असा कबुली जबाब हा गोपनीयच्या वचनात, फसवून किंवा धोका देऊन किंवा तो नशेत असताना किंवा अशा प्रश्नांच्या उत्तरातून की ज्या प्रश्नांची उत्तरे देणे बंधनकारक नव्हते तरीही तो ग्राह्य आहे.

५) आरोपीचा जो कबुली जबाब ग्राह्य धरला जातो तो जबाब केवळ आरोपीस असा जबाब तुझ्याविरुध्द वापरला जाईल अशी समज दिली नव्हती म्हणून अग्राह्य होत नाही.

६) ज्यावेळी अनेक आरोपीवर एकत्रित एकाच गुन्ह्याखाली खटला चालू असतो त्यावेळी एका आरोपीचा कबुली जबाब जर सिध्द झाला तर त्या कबुली जबाबात ज्या इतर आरोपीचा उल्लेख झाला असेल त्या आरोपीविरुध्द न्यायालय विचार करू शकते.

सर्वसाधारण नियम असा की एखाद्या आरोपीचा कबुली जबाब हा फक्त त्याच्या विरोधात वापरला जाऊ शकतो. इतर आरोपीविरुध्द त्याचा (उपयोग) वापर करता येणार नाही त्या नियमास हा अपवाद आहे. मात्र हा अपवाद लागू करण्यासाठी व त्याचा उपयोग करण्यासाठी खालील अटी जरुरीच्या आहेत.

अ) कबुली जबाब देणारा आरोपी व इतरांच्या विरुध्द एकाच गुन्ह्यात खटला चालू आहे.

ब) त्या सर्वांचा खटला एकत्रित चालू आहे.

क) आरोपीने दिलेला कबुली जबाब किंवा त्यातील काही भाग हा कायद्याच्या दृष्टीने दाखल करून घेण्यायोग्य, त्या खटल्याशी निगडित व वरील १ ते ५ या नियमानुसार सिध्द झालेला हवा.

## कबुली जबाबांचे प्रकार :- सर्वसाधारण पृथक्करण

१. अधिकार असलेल्या इसमासमोर दिलेला कबुली जबाब.

२. पोलीस अधिकाऱ्यांना दिलेला कबुली जबाब.

३. न्यायालयासमोर दिलेला कबुली जबाब.

४. न्यायालयाखेरीज दिलेला कबुली जबाब.

५. साक्षीदाराने दिलेला कबुली जबाब.

६. मागे घेतलेला (फिरवलेला) कबुली जबाब.

कबुलीजबाब हा नेहमी मोकळेपणाने व स्वेच्छेने दिलेला हवा. आमिष, धमकी किंवा वचन देऊन मिळालेला कबुली जबाब न्यायालय स्वीकारीत नाही.(कलम २४ भा.पु.का) जबाबातील माहिती एखादी गोष्ट उघड करते तेवढीच माहिती कलम २७ भा.पु.का.अन्वये ग्राह्य आहे. इतर जबाब नाही.

## न्यायालयासमोरील कबुली जबाब :

हा फार महत्त्वाचा व वजन असलेला असतो. सर्वसाधारणपणे न्यायालयात (कोर्टात) घेतला जातो. तो मोकळेपणाने व स्वेच्छेने दिलेला असावा त्यास कुठलेही आमिष दाखवू नये. कलम १६४ क्रि.प्रो.कोड मध्ये नमूद केलेल्या अटीनुसार आरोपीस तू कबुली जबाब देण्यास बांधलेला नाही अशी समज न देणे ही एक त्रुटी आहे आणि त्यामुळे कबुली जबाब नाकारण्यात येऊ शकतो.

## न्यायालयासमोर कबुली जबाब कसा सिध्द करावा :

ज्या न्यायमूर्तींनी कबुली जबाब घेतला आहे त्यांनी कोर्टात हजर राहून तोंडी साक्ष दिली पाहिजे हा एक गैरसमज आहे. जर कलम १६४ क्रि.प्रो.कोड मध्ये नमूद केलेल्या सर्व अटींची पूर्तता केलेली असेल तर ते न्यायालयात हजर नसले तरी चालते.

## न्यायालयाबाहेरचा कबुली जबाब (पोलीस व न्यायाधीश यांच्या खेरीज) :

न्यायालयात अशा जबाबांना वजन (महत्त्व) दिले जात नाही त्यासाठी तपासी अधिकाऱ्याने अशा पुराव्यावर संतुष्ट राहू नये. हा पुरावा दुबळा पुरावा असतो व तो विचारात घेताना विचारपूर्वक व काळजीपूर्वक घेतला जातो. इतर पुराव्याबरोबर या पुराव्यामुळे आरोपीवर आरोप शाबीत करण्यात येते.

अशा अतिरिक्त कबुली जबाबाचे वेळी अशा साक्षीदाराने आरोपीने जे शब्द वापरले असतील तर शक्यतो त्या शब्दातच साक्ष दिली पाहिजे. न्यायालयात या पुराव्यास पाठिंबा देण्यास इतर पुरावा लागतो. न्यायालयाचे कलम १६४ क्रि.प्रो.कोड प्रमाणे घेतलेला कबुली जबाब इतका विश्वास अशा कबुली जबाबावर ठेवत नाही.

अशा तऱ्हेचे कबुली जबाबाची छाननी अतिशय बारकाईने व खूप विचारपूर्वक (गांभीर्याने) आणि सावधगिरीने करावी लागते कारण या पुराव्याचे आधारे आरोपीस दोषी ठरविणे धोक्याचे असते.

## सहआरोपीचा कबुली जबाब (कलम ३० भा.पु.का.) :

हा पुरावा अतिशय कमजोर (दुबळा) स्वरूपाचा असतो व त्यासाठी त्यास पाठबळ देण्यास (पुष्टी देणारा) पुराव्याची गरज असते. एकत्रित चालणाऱ्या खटल्यात सहआरोपीने दिलेला कबुली जबाब हा त्याच्या विरुध्द व इतरांविरुध्द कलम ३० क्रि.प्रो.कोडमध्ये सांगितल्याप्रमाणे पुरावा म्हणून विचार करता येतो.

सह-आरोपीने दिलेला कबुली जबाब पुष्टी (पाठबळ) असणारा पुरावा असल्याखेरीज आरोपीस दोषी ठरविता येणार नाही. अशा तऱ्हेचा पुरावा व साक्षीदार आरोपीस शपथेवर साक्षीदार म्हणून तपासला तरी त्यापेक्षा कमजोर (दुबळा) पुरावा असतो. म्हणून दूरदर्शी धोरण हुशार तपासी अंमलदाराने आपल्या गुन्ह्यासाठी पुष्टी देणारे इतर दुय्यम पुरावे गोळा करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे.

## फिरविलेला (मागे घेतलेला, नाकारलेला) कबुली जबाब :

या जबाबाला पुरावा म्हणून काही किंमत नाही. हा अतिशय दुबळा व कच्च्या प्रकारचा पुरावा असतो व न्यायालय नेहमीच अशा कबुली जबाबावर विश्वास ठेवत नाही.

फक्त अशा फिरविलेल्या कबुली जबाबावर काहीतरी इतर पुष्टी देणारा पुरावा असल्याशिवाय कोणालाही

दोषी ठरवून शिक्षा देता कामा नये. कोर्टाने सदर कबुली जबाब हा स्वेच्छेने व कुठल्याही दबावाखाली किंवा आमिषापुढे दिलेला नाही याची खात्री करून घेतली पाहिजे.

फिरविलेला (परत घेतलेल्या) कबुली जबाबाला पूरक म्हणून इतर काही पुरावा तपास अंमलदाराने गोळा केला पाहिजे. अशा फिरविलेल्या कबुली जबाबावर पुष्टी असलेले पुरावा नसताना आरोपीस दोषी ठरवून शिक्षा देता येईल, मात्र आपला कबुली जबाब फिरविण्याची (मागे घेतलेली कारणे) जर साफ खोटी आढळून आली आणि जर न्यायालयाची अशी खात्री पटली की, दिलेला कबुली जबाब हा स्वेच्छेने दिला होता आणि त्यात खरी वस्तुस्थिती सांगितली आहे.

## कबुली जबाब घेण्याची पध्दत व तत्त्वे :

बऱ्याच गुन्ह्यांमध्ये तपासी अंमलदार गुन्हा सिध्द होऊन शिक्षा होण्यासाठी कबुली जबाबाचा उपयोग करतात. याचे कारण तपासी अंमलदारांना जवळचा मार्ग अवलंबून गुन्हा उघडकीस आणण्याचा त्वरित निर्णय हवा असतो. आरोपी ज्यावेळी गुन्हा कबूल करतो तत्काळ त्यावेळी तपासी अंमलदारास गुन्हा उघडकीस आला असे वाटते त्यांना हे समजत नाही की कबुलीजबाब ही काही तपासाची सुरूवात नाही.

कबुलीजबाब मिळवण्यासाठी धमक्या व विचार करता येणार नाही अशा तऱ्हेचे शारीरिक दबाव याचा वापर करण्यात येतो. हे अमानुष (रानवट) कृत्य आहे व त्याचा कधीही वापर करू नये. अशा कृत्यांमुळे नागरिकांच्या मूलभूत हक्कावर गंभीर गदा येते.

निरपराधी इसमाचा शारीरिक छळ केला जातो व त्रासून तो इसम शारीरिक दु:ख (वेदना) चुकविण्यासाठी खोटा कबुलीजबाब देतो ही नेहमीचीच सर्वसाधारण गोष्ट आहे. कायदा सर्व सुसंस्कृत पध्दतीने कबुलीजबाब घेण्यास परवानगी देतो. आजच्या जमान्यात वैज्ञानिक उपकरणाद्वारे कबुली जबाब घेता येतो.

शिकलेले व चतूर विचारपूस करणारे स्वेच्छेने कबुली जबाब मिळविण्यात यशस्वी झाले आहेत विचारपूस करणाऱ्याकडे धीर, चतुराई, अनुभव व त्या विषयाचे सखोल ज्ञान असणे आवश्यक आहे.

## कबुली जबाबाची नोंद करून घेणे व त्याची खातरजमा :

ज्यावेळी आरोपी कबुली देण्याच्या मनस्थितीत, तयारीत असतो त्यावेळी तपास अंमलदाराने त्वरित त्यास कबुली जबाब नोंदविण्यासाठी न्यायालयाकडे पाठविणे गरजेचे आहे. त्याचे कारण या देशात पोलीस अधिकाऱ्यासमोर दिलेला कबुलीजबाब हा ग्राह्य नाही. आरोपीस घाईने न्यायालयाकडे पाठविण्याऐवजी त्याचा सविस्तर कबुलीजबाब पोलिसांनी नोंदवून घ्यावा.

गुन्हेगार हे हुशार असतात. तो तपासी अंमलदारास असे भासवेल की, त्यास न्यायमूर्तीसमोर कबुलीजबाब द्यायचा आहे पण न्यायमूर्तीसमोर गेल्यानंतर तो त्याचा शब्द फिरवेल व कबुली जबाब देण्यापासून परावृत्त होईल. मालमत्तेच्या गुन्ह्यात चोरीचा माल घेण्याबाबतची माहिती काढून ती नोंद करणे हे उपयुक्त असते.

## तुम्ही कबुली जबाब कसा नोंदवाल :

१. एका वाक्यामध्ये एक वाक्य लिहा.

२. परिच्छेद नंतर परिच्छेद तयार करा.

३. आरोपीचे म्हणणे सविस्तर ऐका व नंतर संयुक्तिक (एकत्रित) जबाब तयार करा.

वरील पैकी नं. २ ची पध्दत विचारपूस करणाऱ्या अधिकाऱ्यास जास्त पटते.

## पोलिसांनी कलम २७ भा.पु.का अन्वये जबाब कसा घ्याल :

एखादी गोष्ट आरोपीच्या जबाबामुळे किंवा त्यातील काही भागामुळे उघडकीस आली अशा आरोपींच्या

जबाबावर जर पोलीसांना पुरावा म्हणून अवलंबून राहायचे असेल तर पोलिसांनी आरोपीने वापरलेले (उच्चारलेले) शब्द जसेच्या तसे लिहिले पाहिजेत. आरोपींनी दिलेली माहिती सर्वसाधारणपणे कोर्टासमोर सिध्द केली जाते. आरोपीने उच्चारलेले शब्द जसेच्या तसे कोर्टासमोर आले पाहिजे. कारण शब्दाचा थोडयाशा फरकानेसुध्दा गुन्हा शाबीत किंवा अशाबित होण्याचा संभव असतो. कोर्टाची अपेक्षा असते की, पोलिसांना आरोपीने उच्चारलेले शब्द जसेच्या तसेच लिहावेत. दोन वाक्यातील फरक ''मी दागिने झाडाच्या झुग्यात ठेवले आहेत'' व ''दागिने झुग्यात ठेवले आहेत'' या दोन वाक्यांचा अर्थ वेगवेगळा होतो. पहिल्या वाक्यावरून असे दिसून येईल की काहीकाळ तरी दागिने आरोपीचे ताब्यात होते व त्यावरून आरोपी व दागिने याचा संबंध सिध्द होईल दुसऱ्या वाक्यावरून असे दिसून येईल की, आरोपीस फक्त माहिती झाले की दागिने झाडाच्या झुग्यात आहेत. पोलीस अधिकाऱ्याने शब्द लिहिण्यासाठी निवडू नयेत किंवा आरोपीस काय म्हणावयाचे आहे हे सांगण्यासाठी स्वत:चे शब्द वापरू नयेत पोलीस अधिकाऱ्याने पंचनामा अथवा मेमोरंडम आरोपीने सांगितलेल्या शब्दात तयार करावा आणि दोन किंवा जास्त पंचांनी त्यावर सहया कराव्यात.

## कबुली जबाब लिहिताना कोणत्या गोष्टींकडे लक्ष द्याल :

१. सुरुवात- आरोपीचे नाव, टोपण नावे असल्यास, आईवडिलांचे नाव, पत्ता इ.

२. गुन्ह्याचा उद्देश व तयारी करण्यासाठी काय कृती केली?

३. प्रत्यक्ष गुन्हा घडला त्याचे सविस्तर वर्णन, वेळ, कशा तऱ्हेने गुन्हा केला.

४. गुन्हा घडल्यानंतरची वागणूक म्हणजे जागा कशी सोडली, मालमत्तेचे वाटप व विल्हेवाट.

५. पूर्वी केलेला गुन्ह्याबाबत माहिती.

६. माल विकत घेणारे व साथीदारांची नावे व त्याच्या हालचाली इत्यादी.

## मृत्युपूर्व जबाब :

## मृत्युपूर्व जबाब म्हणजे काय?

ज्या वेळी एखादा इसम मृत्युशय्येवर (मरणाचे वाटेवर) असतो आणि अशा स्थितीत असताना मरणापूर्वी एखादा जबाब देतो व तो जबाब कायद्यानुसार न्यायालयात सिध्द केला जातो अशा जबाबास तांत्रिकदृष्ट्या मृत्युपूर्व जबाब असे म्हटले जाते. असा जबाब जेव्हा कलम ३२ भा.पु.का अन्वये ग्राह्य धरला जातो, त्यास मृत्युपूर्व जबाब असे म्हटले जाते.

एखाद्या जखमी इसमाने ठाणे अंमलदाराकडे तक्रार (फिर्याद) दिली व नंतर त्या जखमामुळे तो जखमी इसम मृत्यू पावला तर तो मृत्युपूर्व जबाब म्हणून होईल. जखमी इसमाचा कलम १६१ क्रि.प्रो.कोड प्रमाणे घेतलेला जबाबसुध्दा जर तो जखमी इसम त्या जखमामुळे मृत्यू पावला तर तो जबाब ही मृत्युपूर्व म्हणून मानला जाईल.

## मृत्युपूर्व जबाबाचे स्वरूप :

अ) हा मृत्यू पावलेला इसमाचा जबाब आहे.

ब) ज्या वेळी तो सिध्द केला जाईल तेव्हा तो पुरावा म्हणून वापरला जाईल.

क) हा एक प्रकारचा ऐकीव पुरावा आहे. कारण सांगणारा मयत झाला असतो व दुसरा कोणी तरी येऊन त्या मयत इसमाने त्याच्या मृत्युपूर्व काय सांगितले हे सांगतो.

ड) (सांगणारा) तो माणूस मृत पावलेला असल्याने, त्याचा / तिचा जबाबाची परीक्षा उलट तपासणी करून घेता येत नाही.

इ) तरी तो पुरावा म्हणून स्वीकारला जातो (मान्य होतो) म्हणून ऐकीव पुरावा हा पुरावा म्हणून ग्राह्य धरला जात नाही या नियमास अपवाद आहे.

## मृत्युपूर्व जबाब हा पुरावा म्हणून का दाखल करून घेतला जातो :

अ) 'जरुरी' या तत्त्वावर तो आधारित आहे. तो असा पुरावा नाकारला तर त्यापेक्षा चांगला पुरावा उपलब्ध होणार नाही आणि त्यामुळे न्यायप्रक्रियेचा उद्देश सफल होणार नाही.

ब) दुसरे कारण असे सांगता येईल की मृत्यूच्या शय्येवर असलेल्या माणसाच्या ओठावर सत्य असते. मृत्यू समोर दिसत असताना अशी अवस्था येते की मनुष्य कुठलेही खोटे सांगण्याच्या मनःस्थितीत नसतो व हा जबाब शपथेची जागा घेतो.

## मृत्युपूर्व जबाब कोण घेऊ शकतो :

मृत्युपूर्व जबाब कोणीही इसम घेऊ शकतो; मात्र मृत्युपूर्व जबाब शक्यतो न्यायमूर्तींनी घ्यावा, जर ते सहजासहजी उपलब्ध नसतील तर वैद्यकीय अधिकारी / डॉक्टरसुध्दा मृत्युपूर्व जबाब घेऊ शकतात. तातडीच्या प्रकरणांत तपास अधिकारीसुध्दा मृत्युपूर्व जबाब घेऊ शकतात.

## मृत्युपूर्व जबाब घेण्याची पध्दत :

१. मृत्युपूर्व जबाब देणारा इसम हा जबाब देण्याच्या तंदुरुस्त परिस्थितीत आहे याची खात्री करा. तो / ती शुध्दीवर असावेत.

२. सर्वसाधारणपणे ज्यावेळी गंभीररीत्या जखमी झालेला इसम हा जबाब देण्याच्या परिस्थितीत असेल तेव्हा तपासी अधिकाऱ्याने किंवा वैद्यकीय अधिकाऱ्याने जवळच्या न्यायमूर्तींना त्या इसमाचा मृत्युपूर्व जबाब घेण्यासाठी पाचारण करावे.

३. वैद्यकीय अधिकाऱ्याकडून ज्याचा जबाब घ्यायचा आहे त्याच्या शारीरिक व मानसिक तब्येतीच्या परिस्थितीबाबत मत घ्यावे, जर वैद्यकीय अधिकारी उपलब्ध असेल तर त्याचेकडून जखमीच्या तब्येतीबाबत तसा दाखला घ्यावा.

४. मृत्युपूर्व जबाब घेताना त्यात रस असलेल्या कोणाही इसमास त्या जबाब देणाऱ्यावर प्रभाव पाडण्यासाठी किंवा मार्गदर्शन करण्यासाठी हजर राहू देऊ नये.

५. मृत्युपूर्व जबाब शक्यतो परिपूर्ण असावा.

६. मृत्युपूर्व जबाब देणारा इसम हा त्याच्या स्वत:च्या माहितीवरून बोलला पाहिजे.

७. जर मृत्युपूर्व जबाब पोलिसांनी लिहिला तर प्रश्नोत्तरे या स्वरूपात आणि जबाब देणाऱ्याच्या शब्दात व भाषेत प्रथम पुरुषांत व तंतोतंत असावा. त्यातील आरोपी आणि प्रथम दर्शन साथीदारांची नावे दिली असतील तर ती सुस्पष्टपणे व सरळपणे लिहावीत जेणेकरून त्याच्या ओळखीबाबत संशय व्यक्त होणार नाही.

८. मृत्युपूर्व जबाब देणाऱ्याची सही जबाबावर न चुकता घ्यावी.

९. जर जबाब देणारा अशिक्षित असेल वा जखमामुळे सही करण्यास असमर्थ असेल तर त्याच्या हाताचा अंगठा घ्यावा.

१०. अशा जबाबात (मृत्युपूर्व जबाबात) त्या इसमाची सही का घेतली नाही या कारणाची नोंद घ्यावी.

११. मृत्युपूर्व जबाब घेताना सूचक प्रश्न विचारू नका.

१२. ज्यावेळी जबाब देणाऱ्या व्यक्तीची परिस्थिती (तब्येत) गंभीर असेल व तो बोलू शकत नसेल तर

त्याच्या हाताच्या किंवा डोक्याने केलेल्या खुणांवरून जबाब घ्या. असा जबाब घेणाऱ्या इसमाने जबाब देण्यामागे काय, कशा खुणा केल्या याबाबत खुलासेवर लिहावे.

## मृत्युपूर्व जबाब घेणे :

१. मृत्युपूर्व जबाब हा देणाऱ्या इसमानी ज्या शब्दात व भाषेत दिला त्या शब्दात व भाषेतच लिहावा.

२. जबात घेताना कठीण शब्द टाळावेत.

३. जबाब देणाऱ्या इसमास विचारलेले प्रश्न जसेच्या तसे लिहावेत. वापरलेले शब्द व सांगण्याची पध्दत नमूद करावी.

४. मृत्युपूर्व जबाब देणाऱ्यांनी व इतर हजर असलेल्यांनी या जबाबावर सही करून तारीख व वेळ टाकावी.

५. मृत्युपूर्व जबाब जर पोलीस अधिकाऱ्याने घेतला असेल तर त्यानेसुध्दा त्याची सही करावी ज्या दोन प्रतिष्ठित व्यक्ती समक्ष जबाब घेतला असेल त्यांनीही त्यावर सह्या कराव्यात.

६. लांबलचक जबाब घेण्याचे टाळावे.

७. मृत्युपूर्व जबाब थोडक्यात, सुस्पष्ट व स्पष्टीकारक असावा.

८. मृत्युपूर्व जबाब देणारा, त्याचा जबाब चालू असताना मृत्यू पडला तर असा अर्धवट जबाबही ग्राह्य आहे. (संदर्भ-उच्चतम-न्यायालय केस प्रकरण १९६२ १२५२)

९. जर मृत्युपूर्व जबाबात आरोपीविरुध्द स्पष्टपणे आरोप केलेले असतील पण हाताचा अंगठा इसम मृत्यू झाल्यानंतर घेतला असेल तर उच्चतम (सुप्रीम कोर्ट) न्यायालयाने असा जबाब पुरावा म्हणून ग्राह्य आहे असे मान्य केले आहे.

१०. गुन्ह्यासाठी आरोपीच हा जबाबदार आहे असे जर मृत्युपूर्व जबाबात थोडक्यात पण स्पष्टपणे थेट सांगितले असेल तर तो जबाब पुरावा म्हणून मान्य केला आहे. (संदर्भ १८७६-१५१९ (१९७६-११९४)

११. जर पोलीस अधिकाऱ्याने मृत्युपूर्व जबाब घेतला असेल तर त्याने वैद्यकीय अधिकाऱ्याकडून तो इसम (जखमी) जबाब देण्यास ठीक आहे, जरी त्याची स्थिती गंभीर असली तरी असा अहवाल घ्यावा. अशा जबाबावर जखमीची सही व वैद्यकीय अधिकाऱ्याची जबाबाला पुरावा म्हणून सही घ्यावी (संदर्भ उच्चतम न्यायालय निकाल हरियाणा राज्य हरपालसिंग १९७८ १५३० आणि १९७८. १७६९ जससंतसिंग या केसमध्ये, उच्चतम न्यायालयाने असे म्हटले आहे की, जर मृत्युपूर्व जबाब हा न्यायमूर्तींनी घेतला नसेल तर त्याची छाननी बारकाईने व्हायला पाहिजे; पण असे मान्य झाले आहे की, बारकाईने छाननी केल्यानंतर जर कोर्टाचे असे मत झाले की, सदर जबाब खरा आहे तर न्यायमूर्तींना आरोपीस त्या जबाबास काही पूरक पुरावा नसतानासुध्दा शिक्षा देण्याची मुभा आहे.

१२. पोलीस अधिकाऱ्याने मृत्युपूर्व जबाब घेताना खात्री केली पाहिजे की, तसा जबाब हा कोणाच्या शिकविण्यावरून किंवा आमिष दाखविल्यामुळे देत नाही. असा जर जबाब दिला गेला व त्याबाबत पुरावा दिला गेला तर सदर मृत्युपूर्व जबाब संशयित आहे म्हणून अग्राह्य ठरविला जाईल.

(संदर्भ-अब्दुल मजिद १९७६ १८८२) सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले आहे की मरण पावलेली व्यक्ती जबाब देण्यालायक होती ह्याबाबत मत देण्यासाठी वैद्यकीय अधिकारी हा उत्तम माणूस (साक्षीदार) असतो. वैद्यकीय अधिकाऱ्यास वाटले की, मरण जवळ आले आहे आणि न्यायाधीशांना व पोलिसांना बोलाविण्याइतका वेळ नाही तर मृत्युपूर्व जबाब अशा वैद्यकीय अधिकाऱ्याने घेणे उचित होईल किंवा ते त्याचे कर्तव्यच आहे. वैद्यकीय अधिकारी हा जबाबदार व चांगला असून त्यात त्याला काहीही

फायदा नसतो. (संदर्भ १९५८, २२ मुंबई राज्य १९६५ ३९) खरा मृत्युपूर्व जबाब ह्याचे आधारावर जरी त्यास पूरक पुरावा नसला तरी शिक्षा होऊ शकते.

## मृत्युपूर्व जबाबाची पुरावा म्हणून किंमत (ग्राह्यता) :

मृत्युपूर्व जबाब या प्रकारचा पुरावा दाखल करून घेण्यामागे सर्वसाधारण असे तत्त्व असते की, हा जबाब दु:खाच्या काळात जीवनाचा शेवट आलेला असतो, ज्यावेळी मनुष्य मरणाच्या दारात उभा असतो, जेव्हा त्याची जगण्याची आस्था (इच्छा) लोप पावलेली असते (संपलेली असते), ज्यावेळी खोटं बोलण्याचा उद्देश संपलेला असतो (शांत झालेला असतो) तेव्हा खरं बोलण्याची प्रबळ इच्छा मनात येते.

मृत्युपूर्व जबाबात एक स्वाभाविक कमतरता आहे की, यामुळे आरोपीला मेलेल्या माणसाची उलटतपासणी करण्याची संधी नसते आणि म्हणून त्यास कोर्टात प्रत्यक्ष दिलेल्या साक्षीइतके महत्त्व दिले जात नाही.

निरनिराळ्या न्यायालयांची कोर्टात मृत्युपूर्व जबाबाच्या पुराव्याच्या मान्यतेबाबत निरनिराळी मते असतात. काही न्यायालयांनी इसमाचा मृत्युपूर्व जबाबावर फक्त अवलंबून शिक्षा दिली आहे. इतर काही न्यायालयांचे असे मत असते की जर मृत्युपूर्व जबाबास जर भरपूर व समाधानकारक इतर पुराव्याचे पाठबळ नसेल तर शिक्षा देणं घातक ठरेल. असे पाठबळ (पूरक) पुरावा हा प्रत्यक्ष पुराव्याच्या स्वरूपात नसला तरी तो तसा परिस्थितीजन्य पुराव्याच्या स्वरूपाचा असू शकतो.

ज्याचा मृत्युपूर्व जबाब घेताना त्याला विचारलेल्या प्रश्नांना तो त्याची बोटे दाखवून किंवा इतर खुणांनी व हावभाव करून उत्तरे देत असेल तरी तो पुरावा म्हणून ग्राह्य (मान्य) आहे. मृत्युपूर्व जबाबावर नेहमी जबाब देणाऱ्याची सहीच हवी असं नाही, मात्र त्या इसमाची अशी सही असेल तर पुराव्याच्या दृष्टीने तो जास्त महत्त्वाचा ठरतो व त्याची उपयुक्तता जास्त असते. एका जखमी इसमाचा जबाब तो मरणापूर्वी पोलीस अधिकाऱ्याने घेतला व तो जबाब प्रथम खबर (फिर्याद) म्हणून नोंद केली तर तो जबाब प्रथम खबर म्हणून दाखल केला त्यामुळे मृत्युपूर्व जबाब म्हणून त्याची पुराव्याची किंमत कमी होत नाही.

मृत्युपूर्व जबाबात मयताने मरणाचे कारण दिले असेल तर ते फार महत्त्वाचे असते व तो फार किंमती पुराव्याचा भाग असतो व त्याचा उपयोग मनुष्यवध किंवा अपहरण या प्रकरणांत फार महत्त्वाचा ठरतो.

मृत्युपूर्व जबाब हा पोलीस अधिकाऱ्याने जरी घेतला असला तरी त्याचा पुरावा म्हणून उपयोग करण्यास १६२ क्रि.प्रो.कोड प्रमाणे बाधा येत नाही. जरी असा जबाब तोंडी इतर माणसांच्या उपस्थितीत दिला असेल तर तो कोर्टात त्या माणसांची साक्ष घेऊन सिध्द करता येतो.

मृत्युपूर्व जबाब हा ग्राह्य होतो जेव्हा तो देणारा इसम नंतर मृत्यू पावला तर. जर असा इसम जगला तरी पोलीस अधिकाऱ्याव्यतिरिक्त इतर कोणाजवळ किंवा न्यायाधीशासमोर जर जबाब दिलेला असेल तर त्या जबाब देणाऱ्या इसमाच्या कोर्टातील साक्षीला असा पुरावा पूरक ठरतो. जर तो जबाब पोलीस अधिकाऱ्यासमोर असेल तर त्याचा उपयोग कलम १६२ क्रि.प्रो.कोड प्रमाणे घेतलेला जबाब म्हणून होईल.

जर मृत्युपूर्व जबाबास पुष्टी असेल तर उत्तमच कारण त्यामुळे त्या मृत्युपूर्व जबाबाचा खरेपणावर शिक्कामोर्तब होईल. मृत्युपूर्व जबाब हा तोंडीही असू शकतो. तोंडी मृत्युपूर्व जबाब जो कुठल्याही कमतरतेशिवाय असेल तर तो फार महत्त्वाचा पुरावा असतो.

मृत्युपूर्व जबाबात नमूद असलेल्या काही आरोपीविरुध्द पोलिसांनी आरोपपत्र दाखल केले नाही तरी त्या मृत्युपूर्व जबाबाची किंमत कमी होत नाही. कारण त्यांना आरोपी म्हणून मुक्त केले होते अशा लोकांना काही वाईट (दृष्टी) हेतूने गोवण्यात आले असेल.

क्वचित एखाद्या गुन्ह्यात फक्त मृत्युपूर्व जबाब हा शिक्षा देण्यास पुरेसा असेल तरी सर्वसाधारणपणे विश्वास

ठेवण्या लायक असा पुष्टी देणारा पुरावा मृत्युपूर्व जबाबास आधार देण्यासाठी जरुरीचे असते. मृत्युपूर्व जबाब देणारा इसम हा मरणाचे दारातच हवा असे नाही किंवा मरणाच्या भीतीत नसला तरी चालेल. तो जबाब ग्राह्य होतो जेव्हा जबाब देणारा मृत्यू पावतो. अमर्याद उशिरा जर मृत्युपूर्व जबाब घेण्यात आला तर पुरावा म्हणून त्याची किंमत कमी होते. मृत्युपूर्व जबाबाकडे पुरावा म्हणून बघतांना संपूर्ण जबाब बघावा, त्याचे निरनिराळ्या भागात बघू नये.

## मृत्युपूर्व जबाब – केव्हा विश्वसनीय ठरतो ? :

संदर्भ–कौशलराव मुंबई राज्य १९५८ २२ १९८० ५५९, या केसमध्ये उच्चतम न्यायालयाने म्हटले आहे की,

१. मृत्युपूर्व जबाबात जर पूरक (पुष्टी) देणारा पुरावा नसेल तर फक्त तो जबाब हा शिक्षा देण्यास पुरेसा नाही असा अलिखित निर्णय करता येणार नाही.

२. प्रत्येक गुन्हा त्या त्या हकिकतीनुसार विचारात घ्यावा आणि त्यावेळी मृत्युपूर्व जबाब कुठल्या परिस्थितीत दिला होता हे बघून ठरवावे.

३. मृत्युपूर्व जबाब हा हलक्या प्रकाराचा व इतर पुराव्यापेक्षा कमी प्रतीचा पुरावा आहे असा सिध्दांत ठेवता येणार नाही.

४. मृत्युपूर्व जबाब हा इतर पुराव्यासारखाच एक पुरावा आहे आणि त्याची छाननी करताना आजूबाजूच्या परिस्थितीचा विचार करून व असा पुरावा कसा विचारात घ्यावा याबाबतची मार्गदर्शक तत्त्वे विचारात घ्यावी.

५. न्यायाधीशांनी जरी मृत्युपूर्व जबाब नोंदवला असेल तरी त्यात मनुष्याच्या स्मरणशक्तीचा व स्वभावाच्या चुका होऊन नुकसानकारक होऊ शकते.

६. मृत्युपूर्व जबाबात सांगितलेली हकिगत ही शेवटपर्यंत सुसंगत असावी व लवकरात लवकर मिळणाऱ्या संधीनुसार दिला पाहिजे आणि तो इतरांच्या शिकविण्यावरून नसावा.

हबीब उस्मान v/s महाराष्ट्र सरकार या खटल्यात उच्चतम न्यायालयाने मृत्युपूर्व जबाब जो घटनेनंतर लगेच नोंदविला आहे अशा जबाबास जास्त महत्त्व देणे हे गरजेचे व नैसर्गिक आहे असे म्हटले आहे.

## ब) मृत्युपूर्व जबाब :

भारतीय पुरावा अधिनियम सन १८७२ चे कलम ३२ – एखादी व्यक्ती अपराध्याच्या, घटनेच्या संबंधाने गंभीर जखमी झाली असून तिला मृत्यू येणे शक्य आहे अशा वेळी झालेल्या जखमा कोणी, का व कोणत्या कारणासाठी केल्या या संबंधाने त्या व्यक्तीने मृत्युपूर्वी केलेले कथन म्हणजे मृत्युपूर्व जबाब होय.

१. मृत्यूच्या दारात असणारी व्यक्ती शक्यतोवर खोटे बोलत नाही या तत्वास अनुसरून मृत्युपूर्व जबाबास फारच महत्त्व आहे.

२. मृत्युपूर्व जबाब हा प्रश्नोत्तर स्वरूपात असावा.

३. मृत्युपूर्व जबाब जखमींच्या शब्दात लिहावा.

४. मृत्युपूर्व जबाब घेतल्यानंतर जबाब देणारी व्यक्ती शुध्दीत होती. याबद्दल वैद्यकीय अधिकाऱ्याचा दाखला घ्यावा. त्यावर त्यांनी दिनांक / वेळ लिहिण्यास विनंती करावी.

५. एका खटल्यामध्ये मृत्युपूर्व जबाबाची तारीख व वेळ नमूद केली नसल्यामुळे खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने आरोपीस निर्दोष सोडले.

६. मृत्युपूर्व जबाब एकापेक्षा जास्त वेळा नोंदविण्यात आले असतील तर त्या जबाबात सुसंगतपणा व सातत्य असले पाहिजे. असे श्रीमती कमला विरुध्द पंजाब राज्य, सर्वोच्च न्यायालय, ए.आय.आर. १९७३, पान

नं.३७४, क्रि.लॉ. जर्नल पा.नं.६८ वर नमूद केले आहे.

७. नवविवाहित स्त्रीच्या तपासात मृत्युपूर्वी पाठविलेली पत्रे हस्तगत करण्यात आली असल्यास अशा पत्रास मृत्युपूर्वी नवविवाहित स्त्रीस सासू-सासरे व इतरांकडून त्रास असल्याबाबतच्या तक्रारी नमूद असतील तर ते पत्र मृत्युपूर्व जबाब म्हणून ग्राहय आहे. असे मनोहर लाल विरुध्द राज्य, पंजाब व हरियाणा उच्च न्यायालय १९८१, क्रि. लॉ. जर्नल, पान नं. १३७३ वर नमूद केलेले आहे.

८. एखाद्या इसमाचा मृत्युपूर्व जबाब घेतल्यानंतर तो मयत झाला नाही तर तो जबाब मृत्युपूर्व जबाब म्हणून ग्राह्य धरता येत नाही. परंतु असे जबाब सी.आर.पी.सी. कलम १६२ चा जबाब म्हणून उपयोगात आणता येतात.

९. काही व्यक्ती मृत्युपूर्वी खरे बोलतातच असे नाही. त्याकरिता इतर परिस्थितीतील पुरावा व इतर पूरक पुरावा मिळविणे आवश्यक आहे.

■■■■■

# प्रकरण १३

# तज्ज्ञांचा अभिप्राय

## Experts Opinion I.E.A. Sec. 45, 46, 73

**उद्देश :**

I. E. A. Sec. 45 – तज्ञांची मते.

I. E. A. Sec. 46 – तज्ञांच्या मतांशी संबंधित तथ्ये.

I. E. A. Sec. 73 – सही, लिखाण किंवा मोहोर या, कबूल केलेल्या किंवा शाबीत केलेल्या नमुन्यांशी ताडून पाहणे.

१. विविध प्रकारचे तज्ञ व ते कोणत्या बाबी संबंधी अभिप्राय देतात ते सांगू शकाल.

२. तज्ञांचा अभिप्राय घेऊन घडलेला गुन्हा व आरोपीचा संबंध कसा प्रस्थापित करू शकतो ते सांगू शकाल.

३. तज्ञांचा अभिप्राय पुराव्याच्या दृष्टीने उपयुक्त कसा ते सांगू शकाल.

४. कोणत्या तज्ञाकडे कोणती वस्तू तपासणी करीता पाठवावी व काय अभिप्राय घ्यावा ते सांगू शकाल.

## तज्ञांचे प्रकार व त्याचा उपयोग काय?

## तज्ञांचे प्रकार खालीलप्रमाणे आहेत.

**१. जीवशास्त्राचे तज्ञ (Biologist) F.S.I.**

जीवशास्त्रीय तज्ञ हे रक्त, वीर्य, लाळ, घाम, मूत्र, केस, हाडे तसेच झाडांचे अवशेष, गवत यांचे परीक्षण करून अभिप्राय देतात. कवटीचे व त्या इसमाच्या फोटोग्राफवरून सुपर इंपोझिशन तंत्राने सदरचा इसम तोच आहे का याबाबत अभिप्राय देतात.

**२. रसायन शास्त्राचे तज्ञ (Chemist) - F.S.I.**

रसायन शास्त्राचे तज्ञ हे धातु, संयुगे, रंग, विष, तेल सर्व रासायनिक पदार्थ, अल्कोहोल यांचे परिक्षण करून अभिप्राय देतात.

**३. भौतिकशास्त्राचे तज्ञ (Physicist)**

भौतिक शास्त्राचे तज्ञ हे हत्याराच्या वस्तुं वरील खुणा, टायर मार्क, कपड्याचे व कागदाचे फाटलेले तुकडे, ग्लास व ग्लासचे तुकडे, कपड्याचा धागा, दोरा, घटनास्थळावरील माती व आरोपीचे कपड्यावरील मातीचे कण, वाहनांचे खोडून काढलेले नंबर, चेसीज व इंजिन नंबर इ. भौतिक वस्तूंचे परिक्षण करून अभिप्राय देतात.

**४. बॅलेस्टीक एक्सपर्ट (Ballistic Expert)**

हे तज्ञ अग्निशस्त्र, बंदूक, रिव्हॉल्वर, पिस्तूल, काडतुसे, तोफा व क्षेपणास्त्रे यांची तपासणी करून अभिप्राय देतात.

५. प्रोफेसर ऑफ ॲनाटॉमी **(Prof. Of Anatomy)** (शरीररचना तज्ञ)

हे तज्ञ हाडांची तपासणी करून हाडे मानवाचे, प्राण्यांचे किंवा पक्षाचे तसेच मानवी असल्यास स्त्रीचे अगर पुरुषाचे, शरीराचे कोणत्या भागातील, वय, शरीरबांधा वगैरे बाबत अभिप्राय देतात.

६. विधीवैद्यक शास्त्र

हे तज्ञ मृत किंवा जखमी व्यक्ती त्यांच्या अंगावरील जखमा, आत्मघाती / अपघाती / हल्ल्याने

झालेल्या आहेत अगर कसे याबाबत उपचाराचे वेळी व शवविच्छेदनाचे वेळी निरीक्षण करून अभिप्राय देतात. तसेच लैंगिक अपराधामध्ये पीडित, आरोपी अगर संशयित यांची तपासणी करून अभिप्राय देतात.

**७. पशु वैद्यकीय अधिकारी**

हे तज्ञ प्राण्यांच्या बाबतीत घडलेल्या अपराधांमध्ये जखमी/मृत प्राण्यांची तपासणी व निरीक्षण करून अभिप्राय देतात.

**८. हस्ताक्षर तज्ञ – (Handwriting Expert.)**

हे तज्ञ हस्तलिखीत, टंकलिखीत, प्रिन्ट केलेल्या दस्तऐवजाची मायक्रोस्कोपीक, फोटो मायक्रोसींग, अल्ट्राव्हायोलेट व इन्फ्रारेड फोटोग्राफीने तपासणी करून अभिप्राय देतात.

**९. ड्रग्ज व नारकोटीक्स तज्ञ**

हे तज्ञ हेरॉइन ऊर्फ ब्राऊन शुगर (गर्द), अफू, चरस, मॅन्ड्रेक्स गोळया, गांजा, भांग या ड्रग्जची थिनलेयर क्रोमेटोग्राफी, गॅस, हायपरफॉरमन्स लिक्विड क्रोमेटोग्राफीच्या सहाय्याने रासायनिक तपासणी करून अमली पदार्थाबाबत अभिप्राय देतात.

**१०. अंगुली मुद्रा तज्ञ – (Finger Print Experts)**

हे तज्ञ घटनास्थळी मिळालेल्या चान्सप्रींट, संशयीत आरोपीचे बोटाचे व तळव्याचे ठसे यांची तपासणी करून अभिप्राय देतात.

**११. मिंट मास्टर नाणी तज्ञ :**

हे तज्ञ खोटी व बनावट नाणी यांची तपासणी करून अभिप्राय देतात.

**१२. मॅनेजर, इंडिया सिक्युरिटी प्रेस**

हे तज्ञ बनावट नोटा, रेव्हेन्यु स्टॅम्प, पोस्टल स्टॅम्प यांची तपासणी करून अभिप्राय देतात.

**१३. स्फोटक पदार्थाचे तज्ञ (Explosive Expert)**

हे तज्ञ बॉम्ब, हॅण्ड ग्रेनेड, डिटोनेटर, सर्व प्रकारचे स्फोटक पदार्थ यांची तपासणी करून अभिप्राय देतात.

**१४. हाफकीन इन्स्टिटयूट, परेल, मुंबई.**

येथील तज्ञ हे सर्पदंश, विंचू, कुत्रा, उंदीर चावलेल्या गुन्हयामध्ये त्वचा व ब्रेनचे नमुने तपासून अभिप्राय देतात.

**१५. गुणवत्ता नियंत्रण व दक्षता विभाग (सार्वजनिक बांधकाम विभाग)**

येथील तज्ञ हे सिमेंट, वाळू, खडी इ. बांधकामात वापरलेले नमुने तपासणी करून अभिप्राय देतात.

**१६. न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, मुंबई (कलीना).**

येथील तज्ञ D. N. A. व्हाईस स्पेक्टोग्राफ, पॉलीग्राफ (लाय डिटेक्टर), ब्रेन मॅपींग वगैरेंबाबत तपासणी करून अभिप्राय देतात.

१७. तज्ञाचा अभिप्राय भारतीय पुरावा अधिनियम सन १८७२ चे कलम ४५ व ४६ प्रमाणे न्यायालयात ग्राह्य आहे.

१८. घटनास्थळी जप्त केलेल्या वस्तू/साहित्य त्वरित दोन पंचासमक्ष जप्त करून संबंधित तज्ञाकडे विनाविलंब पाठवावे. विलंबाने पाठविल्याने त्याचा फायदा आरोपीला मिळतो व आरोपी निर्दोष सुटतो.

१९. तज्ञाचे प्रकार वर नमूद केलेले आहेत त्याप्रमाणे आवश्यकतेनुसार संबंधित तज्ञांकडे वस्तू त्वरित पाठवाव्यात.

२०. आरोपीकडून जप्त करण्यात आलेल्या नोटा रिझर्व्ह बँकेच्या ऑफिसरकडून तपासल्यानंतर त्या बनावट असल्याचे मत दिले व त्यावर न्यायालयाने विश्वास ठेवला.

२१. मरीन ड्रॉईव्ह बलात्कार केसमध्ये साक्षीदार याच्या मोबाईलवर आलेला कॉल / संदेश हा आरोपीच्या मोबाईलवरून आला असल्याबाबत टाटा कंपनीच्या प्रतिनिधींनी साक्षीदार म्हणून सिध्द केले. त्यावर न्यायालयाने त्यांची साक्ष विश्वासार्ह मानली व आरोपीला शिक्षा दिली आहे.

तज्ञाचे पत्ते व त्यांच्याकडे कोणत्या वस्तू तपासणीस पाठवाव्या त्याचा तक्ता खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | तज्ज्ञाचे पत्ते | तपासणीकरिता पाठवावयाच्या वस्तू |
|---|---|---|
| १ | मा.संचालक,<br>न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोग शाळा,<br>कालीना, विद्यानगरी, सांताक्रुज,महाराष्ट्र राज्य,<br>मुंबई. | १) व्हिसेरा, रक्त, वीर्य, मूत्र, थुंकी, घाम.<br>२) वनस्पतीचे नमुने (वनस्पती शास्त्र विभाग)<br>३) प्राण्यांची कातडी, केस, मांस<br>(प्राणीशास्त्र विभाग)<br>४) कपडे, माती, रंग प्लॅस्टिकवस्तू<br>(पदार्थ विज्ञान विभाग)<br>५) बंदूक, पिस्तोल, काडतूस, पुंगळया इ.<br>(क्षेपणास्त्र शास्त्र विभाग)<br>६) D.N.A. सॅम्पल, व्हाईस स्पेक्टोग्राफ मानवी हाडे |
| २ | मा. प्राध्यापक शरीर रचनाशास्त्र<br>वैद्यकीय महाविद्यालय,<br>मुंबई, नागपूर, औरंगाबाद, पुणे,<br>सोलापूर, मिरज, आंबेजोगाई इ. | |
| ३ | मा. मुख्य शासकीय दस्तऐवज परीक्षक<br>पुणे, मुंबई, नागपूर, औरंगाबाद. | बनावट दस्तऐवज, हस्ताक्षर, सही, टाईप लेखन,<br>दस्तऐवजावरील ठसे वगैरे |
| ४ | मा. संचालक,<br>अंगुली मुद्रा तज्ज्ञ,<br>मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद | बोटांचे, पायाचे ठसे |
| ५ | मा. प्रिन्ट भावळू (मिंट मास्टर)<br>बनावट नाणी तज्ज्ञ, मुंबई. | खोटी व बनावट नाणी |
| ६ | मा. मॅनेजर, इंडिया सिक्युरिटी प्रेस,<br>नाशिक व देवास मध्यप्रदेश | बनावट चलनी नोटा, रेव्हेन्यू व<br>पोस्टल स्टॅम्प |
| ७ | मा. कंट्रोलर ऑफ एक्सप्लोझिव्ह,<br>मुंबई. | सर्व प्रकारचे स्फोटक पदार्थ, बॉम्ब,<br>हॅण्ड ग्रेनेड, डिटोनेटर इ. |
| ८ | मा. संचालक, हाफकीन इन्स्टिटयूट,<br>परेल, मुंबई नं. १२. | सर्प, कुत्रा, उंदीर चावलेल्या केसमधील<br>मयताचे ब्रेनचे नमुने |
| ९ | मा. मुख्य विश्लेषक / हेल्थ लॅबोरेटरी, अमरावती | अन्नबाधा आणि खाद्यतेल नमुने |
| १० | मा. अधीक्षक अभियंता<br>गुणवत्ता नियंत्रण व दक्षता<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती | सिमेंट, वाळू, खडी इ. बांधकामात<br>वापरलेले नमुने |

**टीप : वरील फलक कृपया पोलीस स्टेशन सूचना फलकावर लावावा.**

# प्रकरण – १४

# गुन्ह्यांचे ठिकाणांचे फोटो व व्हिडिओ रेकॉर्डिंग

## Photography & Video Recording

### उद्दिष्टे :

१) चित्र खोटे बोलू शकत नाही. हे आपल्याला समजेल.

२) घटना किंवा गुन्हा घडला तेव्हा खरी परिस्थिति काय होती हे आपण सांगू शकाल.

१. फोटोग्रॉफी व व्हिडिओ शूटिंगमुळे न्यायालयाला व वरिष्ठ अधिकाऱ्यांना खरी परिस्थिती दाखविता येते.

२. Reconstruction of Crime साठी याचा उपयोग होतो.

### क्राईम सिन रेकॉर्डिंग (फोटोग्राफी / व्हिडिओग्राफी) :

क्राईम सिन म्हणजे अपराध जेथे प्रत्यक्ष घडलेला आहे. ठिकाणावरील दृश्य किंवा असे दुसरे ठिकाण की, तेथे संबंधित अपराधाबाबतचे भौतिक दुवे मिळून आलेले आहेत. असे दुवे संबंधित तज्ञामार्फतीने परिक्षणासाठी गोळा केले जातात. त्यापूर्वी त्याचे संबंधित छायाचित्रात-तज्ञाद्वारे रेकॉर्डिंग होणे आवश्यक असते.

अशा रेकॉर्डिंगच्या छायाचित्रण विषयक प्रमुख दोन पध्दती आहेत.

१. घटनास्थळाचे छायाचित्रण करणे.

२. घटनास्थळाची व्हिडिओग्राफी करणे.

याकरिता सर्वप्रथम घटनास्थळाचे संरक्षण होणे खूप गरजेचे असते. घटनास्थळावरील परिस्थितीमध्ये त्यांचे छायाचित्रण किंवा व्हिडिओग्राफी होईपर्यंत किंचितही बदल होता कामा नये. त्यातल्या त्यात ट्रेस इव्हिडन्समध्ये कोणताही बदल करू नये. ट्रेस इव्हिडन्स म्हणजे जसे एक वस्तू दुसऱ्या वस्तुच्या सानिध्यात आल्यास तिची त्या सानिध्यात आलेल्या वस्तूवर रंग, रूप, कण, छाप सोडते. अशी पध्दती संबंधित तज्ञ गेल्या शतकापासून गुन्हे शोधण्याकरिता वापरात आले आहेत. अशी ट्रेस इव्हिडेन्स म्हणजे, फिंगर प्रिंटस्, चान्स प्रिन्टस् केस, कॉस्मेटिक्स, काच, रंग, माती, बोटॉनिकल मटेरियल्स, बंदूकीची गोळी, गोळी डागल्याच्या खुणा, स्फोटके, जळीताच्या खुणा, स्किडमार्क, इ. भौतिक दुवे गोळा केल्यानंतर संबंधित तज्ञांच्या आवश्यकतेनुसार त्याची घटनास्थळावर;, त्याचप्रमाणे प्रयोगशाळेत क्लोजअप किंवा मायक्रो फोटोग्राफी केली जाते व संबंधितांना परीक्षणाकरिता त्याचप्रमाणे न्यायालयात ठोस पुरावा म्हणून अशी छायाचित्रे सादर केली जातात.

घटनास्थळाचे छायाचित्रण करताना कॅमेरा अँगल व कॅमेऱ्याची लेन्स या दोन गोष्टी खूप महत्त्वाच्या आहेत.

### १. कॅमेरा लेन्स :

गुन्ह्यासंबंधित घटनास्थळावरील छायाचित्रण करीत असताना कॅमेऱ्याची लेन्स ही शक्यतो नॉर्मल लेन्स असावी. कारण वाइड अँगल लेन्सवर घेतलेल्या छायाचित्राचे आकारमान विकृत येण्याची दाट शक्यता असते.

### २. कॅमेरा अँगल्स :

कॅमेरा अँगल्समुळे आपणास घटनास्थळाचे नेमके ठिकाण व स्थिती दर्शविता येते, त्याचप्रमाणे विविध

विषयांची अंतरेदेखील स्पष्ट करता येतात. हेच तत्त्व व्हिडिओ आणि मुव्ही कॅमेऱ्यालादेखील लागू पडते. मग असे छायाचित्रण विविध कोनातून घेतले जाते. यामध्ये व्हयू पॉइन्ट खूप महत्त्वाचा असतो. व्हयू पॉइन्ट म्हणजे दृष्टिक्षेपात येणारे दृष्य की कॅमेरा ते रेकॉर्ड करू शकतो. हा अत्यंत महत्त्वाचा अँगल असतो. याशिवाय हाय अँगल शॉट, लो अँगल शॉट, वाइड अँगल शॉट, बर्डस् आय व्हयू. आय लेव्हल शॉटस्, क्लोजअप शॉटस्, इत्यादी अँगल्स महत्त्वाचे असतात.

## गुन्ह्याच्या ठिकाणाचे छायाचित्रण :

घटनास्थळाचे छायाचित्रण करताना खालील महत्त्वाचे मुद्दे लक्षात ठेवले पाहिजेत.

१. ज्या वस्तुचा किंवा घटनेचा फोटो घ्यावयाचा आहे त्यावर प्रकाश पुरेसा असावा. अशा प्रकाशा अंतर्गत छायाचित्रणाकरिता, कृत्रिम छायाचित्रणाकरिता नैसर्गिक प्रकाशाचा वापर करता येतो. सूर्यप्रकाश, डेलाईट, इ.

२. कॅमेऱ्याच्या लेन्सवर फोटो घेताना प्रत्यक्ष प्रकाश पडता कामा नये, याकरिता कॅमेरा प्रत्यक्ष प्रकाशाकडे पाठ करून घ्यावा, किंवा कॅमेऱ्यास लेन्स हूड वापरावे, किंवा छत्रीसारख्या अन्य साधनांनी सावली करून फोटो घ्यावेत.

३. कॅमेऱ्याचा फोकस योग्य अॅडजेस्ट करावा. ( शार्प फोकस करावे) विशेषत: मॅन्युअल प्रकारच्या कॅमेऱ्यात विशेष काळजी घ्यावी. स्वयंचलित (अॅटो) प्रकारच्या कॅमेऱ्यात फोकस आपोआप शार्प होत असतो.

४. कॅमेऱ्याचे अॅपरवर व शटरस्विड प्रकाशाच्या आणि कॅमेरा लेन्सच्या आणि फिल्मच्या स्विड किंवा डिजिटल कॅमेऱ्याची क्रमांक यांच्यानुसार अॅडजेस्ट करावा.

५. आवश्यकतेनुसार कॅमेरा स्टॅण्डचा वापर करावा. विशेषत: कमी प्रकाशात फोटोग्राफी करताना प्रकाशाच्या स्वरूपानुसार शटर स्विड कमी ठेवावे लागते. शटरस्विड कमी ठेवून कॅमेरा हातात धरून फोटो काढल्यास कॅमेरा हालतो आणि येणारा फोटो सुस्पष्ट येत नाही अशावेळी कॅमेरा स्टँडवर लावून काढल्यास फोटो स्पष्ट येतात.

६. फोटो काढल्यानंतर जर फोटो फिल्मचा मॅन्युअल प्रकारचा कॅमेरा असल्यास फिल्म पुढे सरकावून घेणे अत्यंत आवश्यक असते अन्यथा एकाच फिल्मवर २ इमेल येऊन दोन्ही फोटो खराब होतात. कॅमेरा अॅटो किंवा डिजिटल प्रकारचा असल्यास फिल्म किंवा इमेज आपोआप पुढे सरकते. घटनास्थळावरील फोटो घेताना ते जास्तीत जास्त संख्येमध्ये घ्यावेत. याकरिता अहवालाच्या खालील गोष्टी लक्षात ठेवाव्यात.

१. गुन्हेगाराचा येण्याचा मार्ग व जाण्याचा मार्ग यावर मुख्यत: भौतिक दुवे मिळण्याची दाट शक्यता असते अशी ठिकाणे हेरून त्या ठिकाणाचे चांगले निरीक्षण करावे व असे मिळालेल्या दुव्यांचे बाजूस स्केल ठेवून फोटोग्राफी करावी.

२. सर्व आधारव्रता:- घटनास्थळाचे लोकेशन प्रथम निश्चित करावे. याकरिता जर गुन्हा उघड्या भागात घडला असेल तर, जवळ असलेली स्थिर वस्तू जसे इलेक्ट्रिकचा खांब, इमारत, झाड, इ. त्याच्यासहित फोटो घ्यावा. अशा फोटोमध्ये दिशादर्शक फलक ठेवावा. आवश्यक असेल तेथे स्केलचा वापर किंवा फुटपट्टी ठेवावी.

३. घरामध्ये किंवा बंदिस्त जागेत असल्यास चारही कोपऱ्यातून घटनेचे फोटो घ्यावेत. यामध्ये डेड बॉडी असल्यास तिची ओळख पटण्याकामी चेहऱ्याचा क्लोजअप घ्यावा किंवा एखादा महत्त्वाचा दुवा असल्यास. उदा. हत्यार किंवा वस्तू तिचा जवळून फोटो घ्यावा. असे जवळून फोटो घेत असताना त्या हत्याराचा किंवा वस्तुच्या

लगत स्केल ठेवावा.

४. घटनास्थळावर फिंगरप्रिंट एक्सपर्ट यांनी जर चान्स प्रिंट डेव्हलप केली असेल तर तिचा फोटो पोलीस छायाचित्रकार (तज्ञ) यांचे मार्फतने घेण्यात यावा.

वरील नियम अपघात स्थळाचे छायाचित्रण करतानाही लागू पडतात.

## छायाचित्रणाचे महत्त्व थोडक्यात खालीलप्रमाणे :

छायाचित्रण म्हणजे सकृतदर्शनी पुराव्याचा एक महत्त्वाचा दस्तऐवज असतो. पुरावा कायदा कलम ९ प्रमाणे कोर्टात हजर करणेकामी उपयुक्त. गुन्ह्याच्या ठिकाणाची परिस्थिती ही बदलणारी असू शकते. अशी परिस्थिती फोटो काढून कायम स्वरूपात दस्तऐवज म्हणून टिकवता येते. त्याचप्रमाणे न्यायालयात पुराव्याचे ठोस मुद्दे दाखविण्याचे साहस म्हणूनही महत्त्व आहे. फिल्म फोटोग्राफी अथवा फोटोग्राफी ही वेगवेगळ्या प्रकाशात करून उदा. अल्ट्राव्हायोलेट, इन्फ्रारेड, एक्स-रे इ. मानवी डोळ्याने सहजासहजी न दिसणाऱ्या अदृश्य वस्तू दृश्य करून त्या सहज कोर्टासमोर पुरावा म्हणून ठेवता येतात. याशिवाय ठरविलेल्या व्यक्ती किंवा वस्तू यांची ओळख पटविणे कामी, संशयास्पद कागदपत्रांच्या बाबतीत त्या गुन्हेगाराची किंवा लिहिण्याची ओळख पटविता येते. अपघाताच्या ठिकाणचा फोटो म्हणजे त्या ठिकाणचा नकाशाच होय. दृश्य व अदृश्य चान्स प्रिंट किंवा फिंगर प्रिंट यांचे विविध प्रकारचे फोटो प्रिंटर्स विविध प्रकारची प्रकाश किरणे जसे अल्ट्राव्हायोलेट, इन्फ्रारेड, एक्स-रे यांच्या साहाय्याने गुप्त अक्षरे संशयित पुडक्यांची अथवा खोक्यांची तें न उघडता तपासणी करणे, पुसलेली, घासून काढलेली, खाडाखोड केलेली अक्षरे ओळखणे त्याचप्रमाणे, ती कोर्टात ठोस पुरावा म्हणून सादर करण्यासाठी छायाचित्रांचा उपयोग होतो.

■■■■■

# प्रकरण १५

# केस डायरी

## Case Diary [Cr. P.C. Sec. 172]

### उद्दिष्टे :

Cr. P.C. Sec. 172 - **अन्वेषण किंवा तपासातील कार्यवाहीचा रोजनामा.**

१) केस डायरी म्हणजे काय हे आपल्याला समजेल.

२) केस डायरीतील तपासाचे महत्त्व/उपयोग काय हे आपल्याला समजेल.

३) न्यायालयास केस डायरीचा उपयोग काय हे आपल्याला समजेल.

तपासी अधिकाऱ्याने गुन्ह्याच्या घटनेसंबंधी योग्य क्रमाने ठेवलेले रेकॉर्ड, तपासाबाबत घेतलेले निर्णय व त्या अनुषंगाने अनुसरलेली प्रक्रिया म्हणजेच ''केस डायरी'' होय.

१. मात्र बरेच तपासी अंमलदार हे केस डायरी रोजच्या रोज लिहित नाही त्यामुळे गुन्ह्याच्या घटनेतील क्रमवारीत बदल होतो व चुका दिसून येतात व त्यावरून ते आळशी आहेत हे दिसून येते.

२. न्यायालय योग्य निर्णयाप्रत येण्याकरिता केस डायरी मागवू शकते.

३. पोलीस अधिकाऱ्यास त्याची स्मृती ताजी करण्यासाठी केस डायरीचा उपयोग होतो.

४. अशा वेळी न्यायालय पोलीस अधिकाऱ्यांचे म्हणणे खोडून काढण्यासाठी केस डायरीचा उपयोग करू शकता व त्यामुळे विसंगती निर्माण होऊन केस सुटू शकते.

५. साक्षीदार फितूर झाला किंवा कसे हे पाहण्यासाठी केस डायरीचा उपयोग होतो.

६. तपास अंमलदाराच्या विरुध्द भा.दं.वि. कलम २११ च्या उपयोगासाठी केस डायरीचा उपयोग होतो.

७. आरोपीची पोलीस कस्टडी रिमांड घेते वेळी न्यायालयात केस डायरी दाखल करणे आवश्यक असते. जर केस डायरी दिली नाही तर पोलीस कस्टडी रिमांड नाकारली जाऊ शकते.

### केस डायरी

### गुन्ह्याच्या तपासाचा दैनिक (दैनंदिन) अहवाल (कलम १७२ क्रि.प्रो.कोड)

### गुन्ह्याच्या तपासाचा अहवाल लिहिण्याची गरज :

गुन्ह्याचा तपास करणाऱ्या प्रत्येक पोलीस अधिकाऱ्याने तपासाचा दैनंदिन अहवाल कलम १७२(१) क्रि.प्रो.कोड अन्वये ठेवलाच पाहिजे. या अहवालात त्याने तपासाचा अहवाल रोजच्या रोज आणि तपासात निरनिराळ्या गोष्टी केव्हा केल्या त्याची वेळेची नोंद घ्यावी. कलम १७२(२) क्रि.प्रो.कोड अन्वये खटला चालविणारे फौजदारी न्यायालय या अहवालाचा उपयोग पुरावा म्हणून करणार नाहीत; परंतु चौकशी किंवा खटला चालविताना मदत म्हणून करू शकतात. न्यायालय या दैनिक अहवालाचा उपयोग पोलीस कोठडी किंवा जामीन देण्यासाठी करू शकणार नाही; परंतु त्यातील नोंदीचा उपयोग कलम १६१ व १४५ भा.पु.का.अन्वये करू शकतात.

## कायदेशीर बाबी कलम १७२ क्रि.प्रो. कोड :

१. या प्रकरणाप्रमाणे तपास करणारा प्रत्येक पोलीस अधिकारी रोजच्या रोज या अहवालात तपासाचा भाग लिहितील. त्यात त्यास खबर कधी मिळाली, त्याने तपासास सुरुवात कधी केली व कधी संपविला, कुठल्या जागेला व जागांना भेट दिली व परिस्थितीची सत्यता तपासण्याकामी कोणते जाबजबाब घेतले याच्या नोंदी करेल.

२. कुठलेही फौजदारी न्यायालय असा तपास दैनिक अहवाल (केस डायरी) चौकशी किंवा खटला चालवितांना मदत म्हणून मागवू शकतात; परंतु त्याचा पुरावा म्हणून उपयोग करू शकत नाही. आरोपी किंवा त्याचे (वकील) प्रतिनिधी अशी दैनंदिन अहवाल न्यायाधीशांना बघितला किंवा वापरला म्हणून ते मागू शकत नाही. मात्र अशा अहवालावरून न्यायाधीशाने पोलीस अधिकाऱ्यास खोटे पाडण्यासाठी किंवा संबंधित पोलीस अधिकाऱ्याने त्याची आठवण जागी करण्यासाठी वापरली तर मात्र कलम १६१ किंवा १४५ भा.पु.का.च्या तरतुदी लागू होतील. (त्यांना ठराविक भागाचा वापर करता येईल)

## कलम १७२ क्रि.प्रो.कोड अन्वये तपासाच्या रोजच्या अहवालाबाबत खालील मुद्दे पुढे येतात.

१. हा अहवाल तपास अंमलदाराने ठेवावयाचा असतो. जो कोणी एखाद्या गुन्ह्याचा तपासाचा मुख्य असतो त्याने तो ठेवावयाचा असतो. हा अहवाल म्हणजे गुन्ह्याच्या तपासाबाबत निरनिराळ्या अधिकाऱ्यांनी जे तपास एकाकडून दुसऱ्याकडे तपास घेतात त्यांनी (एकसारखा) एकापाठोपाठ ठेवलेला असतो.

२. हा अहवाल रोजच्या रोज लिहिला गेला पाहिजे.

३. या अहवालात तपासादरम्यान ज्या – ज्या गोष्टी केल्या असतील त्याची नोंद हवी म्हणजे ज्या – ज्या जागांना भेटी दिल्या, जी माहिती मिळाली असेल, साक्षीदार किंवा आरोपीकडे विचारपूस केली असेल, साक्षीदाराचे जाबजबाब, घेतलेल्या झडत्या त्याबाबत संपूर्ण माहिती, वस्तू ताब्यात घेतलेल्या असतील तर याबाबत संपूर्ण माहिती, कोणास अटक केली असेल इ. बाबी या दैनंदिन अहवालात तपास अंमलदाराने उल्लेख करावा.

४. या दैनंदिन अहवालात गुन्हा प्रथम खबर कधी मिळाली, तपासाकामी उचललेली निरनिराळे पावले, त्यासाठी लागलेला वेळ व तपास ज्या दिवशी कधी संपविला (बंद केला) इ. बाबत माहिती लिहिली पाहिजे.

५. तपास करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याने तपासकामी भेटी दिलेल्या निरनिराळ्या जागांबाबत, त्यासाठी दिलेला वेळ व त्यातून काय निष्पन्न झाले याबाबत उल्लेख असला पाहिजे.

६. या दैनंदिन अहवालातील तपासाच्या हकिकतीचे कथन व साक्षीदारांचे जाबजबाब या खेरीज समोर आलेल्या किंवा उघड झालेल्या घटना त्याचप्रमाणे परिस्थितीवरून उघड व समोर आलेल्या घटनांबाबत उल्लेख असावा.

एखाद्या गुन्ह्याच्या तपासाबाबत संपूर्ण चित्र (अहवाल) दिसून आला पाहिजे. हा अहवाल गोपनीय आहे; मात्र पुढे नमूद केल्याप्रमाणे त्याचा उपयोग काही परिस्थितीत करता येतो.

दैनंदिन तपासाचा अहवाल एखाद्या गुन्ह्याच्या तपासाबाबत लिहिणे ही कायदेशीर जबाबदारी आहे. हा अहवाल लिहिण्याखेरीज कुठलाही तपास होऊ शकत नाही.

## उद्देश :

असा दैनंदिन अहवाल लिहिण्यामागे अनेक कारणे आहेत. अशा दैनंदिन अहवालामुळे पोलिसांनी तपासकामी केलेल्या कामाबाबत व जेव्हा तपास एका अधिकाऱ्याकडून दुसऱ्याकडे बदली केला जातो, यावेळी तपासाचे व सातत्य याबाबत खात्री देता येते. दुसरी गोष्ट म्हणजे या दैनंदिन अहवालाची प्रत रोज वरिष्ठ अधिकाऱ्याकडे पाठविली जाते त्यामुळे ते तपासाच्या प्रगतीबाबत लक्ष घालतात व ज्यावेळी गरज असेल तेव्हा तपासाबाबत मार्गदर्शन करू शकतात. तिसरी बाब म्हणजे कलम १६७ क्रि.प्रो कोडप्रमाणे ज्यावेळी पोलीस आरोपीच्या पोलीस कोठडीची विनंती करतात, त्यावेळी न्यायाधीशांना दैनंदिन अहवाल बघण्याची, वाचण्याची परवानगी आहे.

याखेरीज दैनंदिन अहवालात तपासाकामी विचारात घेतलेले मुद्दे व काही गुन्ह्याबाबत केलेले स्पष्टीकरण नमूद केले जाते व या दैनंदिन अहवालाची प्रत रोज वरिष्ठांकडे पाठविण्यात येते त्यामुळे तत्त्वहीन, दुष्ट किंवा सदसद्विवेक बुध्दीला धरून न चालणाऱ्या अधिकाऱ्याकडून तपास मुद्दाम खराब / चुकीचा किंवा दिशाहीन होणार नाही, यावर चांगल्या तऱ्हेने नियंत्रण ठेवता येते.

पोलिसांना खोटी कागदपत्रे करून खोटा तपास करावयास उत्तेजन द्यावे हा कायदा करणाऱ्यांचा उद्देश नाही. एखाद्या खऱ्या गुन्ह्याचा तपास एखाद्या दुष्ट अधिकाऱ्याकडून चुकीने होऊ नये यासाठी दैनंदिन अहवालाची पध्दत सुरू केली आहे व त्यामुळे त्या अहवालावरून खोट्या (चुकीच्या) पध्दतीने केलेल्या तपासावर त्वरित लक्ष देऊन सुधारणा करता येईल किंवा त्याचा मुकाबला करता येईल. दैनंदिन अहवाल हा पुरावा होऊ शकत नाही. मात्र जर न्यायालयाने पोलीस अधिकाऱ्यांना खोटे ठरविण्यासाठी (किंवा त्याच्या विसंगती दाखविण्याकरिता) किंवा पोलीस अधिकाऱ्याने स्मरणार्थ उपयोग केला तर तो पुरावा होऊ शकतो. या दैनंदिन अहवालात तपासाबाबत केलेल्या कारवाईंच्या नोंदी केल्या जातात व त्या नोंदी वरिष्ठांकडून किंवा न्यायालयाकडून तपासल्या जाण्याच्या शक्यतेमुळे तपास अधिकाऱ्यांकडून केल्या जाणाऱ्या कारवाईवर परिणामकारक नियंत्रण राहते. तपासात चांगली प्रगती व उत्तम गुणात्मक तपास व्हावा हा उद्देश आहे. हा अहवाल रोजच्या रोज लिहावा यामागे कायदा करण्याचा उद्देश हा की तपास वेगाने व्हावा व तपास अंमलदारास केलेल्या तपासात खराबी करण्यास वाव मिळणार नाही.

## दैनंदिन अहवालात काय नमूद करावे :

१. या अहवालात तपास अधिकाऱ्याने काय केले, कुठल्या जागांना भेटी दिल्या हे नमूद करावे. ही कागदपत्रे (अहवाल) विशेषाधिकार असलेला दस्तऐवज आहे. परंतु साक्षीदारांचे जबाब जर केस डायरीमध्ये उतरविले तर ते कलम १६१, १६२ क्रि. प्रो. कोड याचे कक्षांत येतात व त्यामुळे या जबाबांना विशेषाधिकाराचा शिक्का दैनंदिन अहवालसारखा मिळत नाही.

२. या अहवालात खालील गोष्टी नमूद केल्या पाहिजेत.

अ. प्रथम खबर तपास अधिकाऱ्यास मिळाल्याची वेळ.

ब. तपास अधिकाऱ्याने तपास सुरू केल्याची व थांबविल्याची वेळ.

क. जागा व जागांना दिलेल्या भेटी.

ड. परिस्थितीबाबत खात्री करण्यासाठी तपासात घेतलेले जबाब.

३. साक्षीदारांचे जबाब जागेवरच लिहावेत.

४. पहिल्या दैनंदिन अहवालात प्रथम खबरीचा गोषवारा प्रथम देऊन, फिर्याद केव्हा मिळाली, घटनास्थळास भेट देण्यास उशीर झाला असेल तर त्याची कारणे, घटनास्थळासाठी निघाल्याची वेळ, पोहचल्याची वेळ,

घटनास्थळाचे वर्णन इ. नमूद करावे.

५. तपासादरम्यान तपास अधिकाऱ्याने काय – काय पावले उचलली आणि मिळालेला प्रत्येक धाग्याचे वर्णन नमूद करावे.

६. गोपनीय खबर देणाऱ्याचे नाव दैनंदिन अहवालात नमूद करू नये व कलम १२५ भारतीय पुरावा कायद्यानुसार न्यायालये तसे करण्यास (नाव सांगण्यास) तपास अधिकाऱ्यास भाग पाडू शकत नाही. कुठलेही न्यायालय गुन्ह्याबाबत माहिती देणाऱ्याचे नाव उघड करण्याची सक्ती करू शकत नाही. ही तरतूद बातमीदाराचे संरक्षण व सुरक्षितता यासाठी केलेली आहे.

७. ज्या घरांच्या झडत्या घेतल्या असतील त्याची कारणे व झडत्या घेताना हजर असलेल्या साक्षीदाराचे माहितीसह दैनंदिन अहवालात हे नमूद करावे.

८. मालमत्ता जप्त केली तर तिचे वर्णन व जागा इ. माहिती दैनंदिन अहवालात नमूद करावी

९. ज्या कोणाकडे विचारपूस केली असेल व कलम १६१ क्रि.प्रो.कोड प्रमाणे जबाब घेतले असतील तर ते दैनंदिन अहवालास जोडले पाहिजेत.

१०. जर जागेवरच साक्षीदाराचे जबाब नोंदवून घेणे शक्य नसेल तर तपास अधिकाऱ्याच्या नोंदवहीत नोंद घ्यावी व पोलीस ठाण्यात परत आल्यावर लगेच नमूद केलेल्या (फॉर्मवर) नोंदवावेत.

११. दैनंदिन अहवालात प्रत्येक दिवशी केलेल्या तपासाचा थोडक्यात गोषवारा शेवटी घ्यावा.

१२. दैनंदिन अहवालाची मूळ प्रत ज्या न्यायालयाचे कार्यक्षेत्रात पोलीस ठाणे येथे पाठवावी.

१३. न्यायाधीशांकडून पोलिसाकडे तपासासाठी पाठविलेल्या प्रकरणांत (गुन्ह्यामध्ये) सुध्दा तपासाचा दैनंदिन अहवाल लिहावा.

१४. खटला सुरू झाल्यानंतर त्याची प्रगती कळण्यासाठीसुध्दा दैनंदिन अहवाल लिहून त्यात खटला चालला किंवा तारखा पडल्या याची नोंद घ्यावी.

## तपासाच्या दैनंदिन अहवालात आणखी खालील गोष्टी असाव्यात :

१. खात्यातील वरिष्ठांना किंवा इतरांना गुन्ह्याची माहिती पाठवली ती साध्या / तातडीच्या तऱ्हेने पाठविली किंवा कसे याबाबत उल्लेख असावा.

२. तज्ज्ञांना पाचारण केले असल्यास त्याबाबत माहिती.

३. पोलीस ठाण्याच्या गुन्हेविषयक माहितीची मदत घेतली तर त्याची माहिती.

४. गुन्ह्यात ज्या गुन्हेगारांची शक्यता असेल तर त्याची खातरजमा केल्याबाबत.

५. सर्वसाधारण सावधानताबाबत जाहीर केलेला फतवा तपासात मदत व सहकार्य मिळण्याबाबत केलेले कारवाई किंवा उचललेली पावले याबाबतची माहिती.

६. घटनास्थळावर मिळालेले धागे (सुगावे), ते सुरक्षित ठेवण्यासाठी व योग्य त्या प्रकारे तज्ज्ञांना पाठविण्यासाठी केलेली कारवाई.

७. घेतलेल्या जबाबाची पडताळणी व तपासादरम्यान एखाद्या ठिकाणी गैरहजर होतो अशी घेतलेल्या भूमिकेबाबतची खात्री केली असल्यास त्याची माहिती.

८. गुन्ह्याचा एखाद्या पध्दतीबाबत केलेला अंदाज किंवा एखादी पध्दत नाकारल्याबाबतची कारणे इ. माहिती.

९. पुढील तपासाच्या दिशा किंवा काय करावयाचे आहे याचे आराखडे.

१०. गुन्हा करण्याच्या एखाद्या शक्यतेबाबत तपासाअंती ठरविलेले मत असल्यास त्याबाबत माहिती.

## गुन्ह्याचा तपासाचा दैनंदिन अहवाल कसा लिहावा :

दैनंदिन अहवाल लिहिताना सुरुवात फिर्याद कधी मिळाली यापासून सुरू करून त्यात फिर्यादीची नक्कल संपूर्णपणे आहे तशी लिहावी. त्यानंतर तपास अंमलदाराने प्रत्येक गोष्टीची खातरजमा केल्याबाबत व त्याबाबत उचललेल्या पावलाबाबत लिहावे.

तपासादरम्यान प्रत्येक महत्त्वाच्या कारवाईबाबत या अहवालात कारवाई केल्यानंतर शक्यतो लगेच नोंद घ्यावी. अधिकाऱ्याने नोंद घेण्यासाठी दिवसाचे शेवटपर्यंत वाट पाहू नये. ज्यावेळी पोलीस ठाण्यातून बाहेर असताना दैनंदिन अहवाल लिहिण्याची वेळ आली तर तो कुठे (कुठल्या जागेवरून-गावातून) लिहिला याची नोंद करावी.

प्रत्येक वेळी प्रत्येक कारवाईबाबत या दैनंदिन अहवालात नोंद घ्यावी. हा अहवाल तपास अंमलदाराने स्वत:चे हस्ताक्षरात लिहावा याचे कारण तो अहवाल गोपनीय स्वरूपात असतो. ज्यावेळी तपास अंमलदारास तो अहवाल स्वत: लिहिणे अशक्यप्राय असते. त्यावेळी तो त्याचे हजेरीत लिहिला गेला पाहिजे व त्यावर तपासी अंमलदार व लिहिणाऱ्याची सही पाहिजे व त्यात स्वत: तो अहवाल का लिहू शकला नाही याचे कारणही नमूद केले पाहिजे.

काही अधिकारी दैनंदिन अहवाल टंकलिखित करून घेतात हे चुकीचे आहे; मात्र स्वत: अधिकारीच उत्तम टंकलेखक असेल तर हरकत नाही. एका खटल्यात टंकलिखित अहवाल सादर करण्यात आला असता त्या अधिकाऱ्यास भर कोर्टात त्याला टंकलेखन करता येते हे सिध्द करण्यासाठी टंकलेखन करण्यास सांगितले गेले. मोठमोठे व गुंतागुंतीचे शब्द हा अहवाल लिहिताना वापरू नयेत. अहवालाची भाषा साधी सोपी व सरळ असावी, अपशब्द वापरू नये.

हा दैनंदिन अहवाल सरकारतर्फे पुरविण्यात आलेल्या पुस्तकांतून लिहावा. ज्यात प्रत्येक पानात नंबर दिलेले असतात व ती पाने व्यवस्थित फाटण्यासाठी भोके पाडलेले असतात. हा अहवाल तीन प्रतीत लिहावा एक प्रत वरिष्ठ अधिकाऱ्यांना पाठवावी. दुसरी न्यायालयात ज्यावेळी आरोपीस १६७ क्रि.प्रो कोडप्रमाणे पोलीस कोठडीची मागणी केली जाते त्यावेळी न्यायालयास देण्यासाठी किंवा कलम १७२ क्रि.प्रो. कोडप्रमाणे न्यायालयाने मागविली असताना देण्यासाठी राखीव ठेवावी.

दैनंदिन अहवाल दोन भागात लिहिला जावा. पहिला भाग हा तपासाबाबतच्या निवेदनासाठी असावा हा भाग गोपनीय असतो व न्यायालयात त्याचा पुरावा म्हणून वापर करू शकत नाही (कलम १७२ क्रि.प्रो.कोड मध्ये नमूद परिस्थिती व्यतिरिक्त) दुसऱ्या भागात तपास अधिकाऱ्यांना कलम १६१ क्रि.प्रो. कोडप्रमाणे साक्षीदाराचे घेतलेले जबाब असावेत. हे जबाब कलम १६२ क्रि.प्रो. कोडप्रमाणे साक्षीदाराचे साक्षीतील तफावती दाखविण्यासाठी आरोपीकडून वापरल्या जाऊ शकतात.

या दैनंदिन अहवालात पोलीस अधिकाऱ्याने तपासाबाबतचे आपले मत, अंदाज किंवा सिध्दांत लिहू नये. त्याचप्रमाणे त्याने बेजबाबदाराची अफवा, गावातील गप्पा किंवा गृहीत धरलेल्या किंवा गुन्ह्याची उकल करण्यासाठी शक्यता-अशक्यतेच्या गोष्टी लिहू नयेत. म्हणजे तपास अंमलदाराने वस्तुस्थिती व परिस्थिती याची खातरजमा केल्याबाबतचा हा अहवाल असतो.

हा अहवाल तपासी अंमलदाराने केलेल्या कारवाईचा व व्यक्तिगत स्वरूपाचा असतो. त्यात त्याचे स्वत:चे मत, इच्छा, विचार व विश्वास याला जागा नसते. ज्या वेळी परिस्थिती प्रत्यक्ष सांगितल्याप्रमाणे पुढे येते त्यावेळी अटळ असे अनुमान समोर येतात. तपास अधिकारी परिस्थितीचे वर्णन व त्यावरून काय वस्तुस्थिती समोर आली याची अनुमाने लिहू शकतो. हे एवढ्यापुरतेच मर्यादित असते. तपासी अंमलदाराने एक गोष्ट लक्षात

ठेवली पाहिजे की, त्याची स्वत:ची अनुमाने हे न्यायालयासमोर किंमती ठरत नाही तर वस्तुस्थिती, घटना याबाबत ग्राह्य असलेला व (शिंतोडे न उडविता येणारा पुरावा) हाच उपयोगी पडतो. तपासी अंमलदाराने हे पण लक्षात ठेवले पाहिजे की, कलम १७२ क्रि.प्रो.कोडप्रमाणे हा दैनंदिन अहवाल न्यायालयासमोर पुरावा म्हणून सादर करण्यास स्पष्ट प्रतिबंध आहे.

## तपासाचा दैनंदिन अहवाल लिहिताना खालील गोष्टी मनात ठाम असल्या पाहिजे :

१. घटना घडलेल्या क्रमानुसार लिहिलेले पाहिजे.

२. यामध्ये तंतोतंतपणा सांभाळलेला असावा.

३. ज्यावेळी एखादी घटना घडल्याबाबत कळते तेव्हा वेळ, आठवड्याचा दिवस व तारीख ही लिहिली पाहिजे.

४. जरूर असतील तेवढा तपशील व घटना द्याव्यात म्हणजे नंतर पुरवणी अथवा स्पष्टीकरण अहवाल देणे टाळता येते.

५. अहवाल लिहिणाऱ्याने काय बघितले, काय ऐकले व स्वत: काय केले हे स्पष्टपणे लिहिले पाहिजे.

६. अहवाल लिहिताना दुसऱ्याने काय सांगितले याबाबत नमूद करताना दुसऱ्याकडून काय ऐकले हे स्पष्ट करावे.

७. घटनास्थळाचा नकाशा तयार करताना, तपासी अधिकाऱ्याने महत्त्वाची निरनिराळी अंतरे ही नकाशात व दैनंदिन अहवालात नमूद करावीत.

८. जर तपासादरम्यान काही मालमत्ता शोधून काढली असेल किंवा जप्त केली असेल तर दैनंदिन अहवालात जरूर त्या सर्व बाबी, कुठल्या परिस्थितीत, जागेवरून किंवा व्यक्तीकडून उघडकीस आणली इ. नमूद केले पाहिजे. तपास अधिकाऱ्याने कुठलीही बाब ही आपल्या स्मरणशक्तीवर सोडू नये त्यामुळे संपूर्ण तपास हा पूर्णपणे निकामी ठरेल.

## तपासाचा दैनंदिन अहवाल हा खालील गुन्ह्यांमध्ये पाठवावा :

१. दखलपात्र गुन्ह्याचा तपास जो प्रकरण १२ क्रि.प्रो.कोड प्रमाणे तपास केला असेल अशा सर्व गुन्ह्यात.

२. ज्या अदखलपात्र गुन्ह्याचा तपास न्यायालयाचे परवानगीने केला असेल अशा सर्व गुन्ह्यात.

३. कलम १७४ क्रि.प्रो.कोड अन्वये मृत्यूचे कारण शोधण्यासाठी केलेल्या तपासांत.

४. काही राज्यातून प्रकरण ८ Cr.P.C. प्रमाणे चाप्टरचे प्रकरणात ज्यात शांतता राखण्यासाठी किंवा चांगल्या वर्तणुकीच्या बंधनपत्रात घेतले जाते अशा प्रकरणात दैनंदिन अहवाल लिहिला जातो.

## तपासाच्या दैनंदिन अहवालाचा उपयोग :

तपासी अधिकाऱ्यास संदर्भ म्हणून या अहवालाचा उपयोग होतो. त्या अधिकाऱ्यास प्रत्येक गुन्ह्याचे प्रत्येक लहानसहान गोष्टी लक्षात ठेवणे शक्य नसते. जर तपास अधिकाऱ्यास त्या गुन्ह्याचा तपास पुढे चालू ठेवणे काही कारणाने शक्य नसेल तर अशावेळी दुसऱ्या अधिकाऱ्यास तपास हाती घेताना व पुढे चालू ठेवताना पूर्वीच्या अधिकाऱ्याने आधी केलेल्या तपासाचे बाबतीत उचललेली पावले, केलेली कारवाई व गोळा केलेला पुरावा ह्याबाबत समजू शकतो व गुन्ह्याबाबत माहिती होऊ शकते.

## दैनंदिन अहवालाचे उपयोगाबाबत कायद्याची कलमे :

१. कलम १६७ क्रि.प्रो. कोडप्रमाणे आरोपीला अटक केल्यानंतर २४ तासाचे आंत तपास पूर्ण होऊ शकत नाही आणि त्यावरील आरोपात बरेच तथ्य आहे तेव्हा पोलीस अधिकारी तपासाच्या दैनंदिन अहवालाची प्रत न्यायाधीशांना सादर करतात व त्यावेळी न्यायाधीश त्या अहवालाचे आधारे खात्री करून २४ तासाच्या पुढे आरोपीस पोलीस कोठडीत पुढील तपासासाठी पाठवू शकतात.

२. कलम १७२ क्रि.प्रो.कोडप्रमाणे फौजदारी कोर्ट चौकशी व खटला चालविताना कुठल्याही वेळी सदर दैनंदिन अहवालाचा पुरावा म्हणून नाही तर तपासात किंवा खटला चालविताना मदत म्हणून वापर करू शकतात. न्यायमूर्ती या अहवालाचा उपयोग सरकार व आरोपी यांच्यात योग्य तो न्याय देण्यासाठी एखाद्या मुद्यावर जास्त खुलासा हवा असल्यास व तो महत्त्वाचा असेल अशावेळी कलम १७२ हे दैनंदिन अहवालाचा उपयोग न करण्याबाबत बंधन घालत नाही फक्त त्याचा पुरावा म्हणून उपयोग न करण्याबाबत बंधन घालते. न्यायालये या अहवालाचा उपयोग संशय असल्यास दूर करण्यासाठी करू शकतात. एखाद्या गुन्ह्याची दखल घ्यावी की नाही हे ठरविण्यासाठीसुध्दा न्यायाधीश दैनंदिन अहवालात नमूद केलेले मुद्दे व तपासात जमा केलेली वस्तुस्थिती, साक्षीदाराचे कलम १६१ क्रि.प्रो.कोड प्रमाणे घेतलेले जबाब यांचे अवलोकन करू शकतात. मात्र कलम १७३ क्रि.प्रो.कोड प्रमाणे आरोपपत्र दाखल केल्यानंतर जर कुठलाही गुन्हा होत नाही असे दिसून येत असेल तर न्यायमूर्ती ते बाजूस करू शकत नाही. परंतु दैनंदिन अहवालाचे आधारे व त्यातील मजकुरावरून त्याची खात्री झाली तर न्यायमूर्ती अधिक तपास करावयाचा हुकूम देऊन खात्री झाली की, गुन्ह्याचा प्रकार आहे तर दखल घेऊ शकतात.

३. चाप्टर (XIX) Cr. P. C. प्रमाणे ज्यावेळी पोलीस आरोपपत्र पाठवितात, न्यायालय पोलीस तपासाचा दैनंदिन अहवाल मागवून न्यायालयाचे मनात जर आरोप ठेवण्याबाबत जर काही संशय असेल व तो संशय इतर गोष्टीवरून दूर होत नसेल तर, तो अहवाल वाचून ते त्यांची खात्री करून घेऊ शकतात. आरोपीवर आरोप ठेवण्याकरिता न्यायालयास पोलिसांनी त्याचे आरोपाचे समर्थनार्थ दाखल केलेले सर्व जबाब, जर १६४ क्रि.प्रो.कोडप्रमाणे काही कबुलीजबाब असतील तर ते इ. सर्वांचे अवलोकन करून जर काही शंका असतील तर दैनंदिन अहवाल मागवून, खात्री करून घेऊ शकतात. न्यायालयाने गुन्ह्याची दखल घ्यावी की नाही हे ठरविण्याकरितासुध्दा न्यायमूर्ती हे दैनंदिन अहवालात नमूद केलेल्या बाबींचा तपासादरम्यान गोळा केलेला पुराव्याचा व कलम १६१ प्रमाणे घेतलेल्या जबाबाचा विचार करू शकतात व खात्री झाली की, सकृतदर्शनी आरोपी किंवा अनेक आरोपीवर गुन्हा केल्याची परिस्थिती असेल तर आरोपपत्र ठेवून पुढील कारवाई करतात. मात्र फक्त दैनंदिन अहवालावर अवलंबून पोलिसांनी १७३ क्रि.प्रो.कोडप्रमाणे दाखल केलेल्या कागदपत्रावरून जर गुन्हा झाल्याचे दिसून येत नसेल तर न्यायालय गुन्ह्याची दखल घेऊ शकत नाही.

याप्रकारे यातील फरक स्पष्ट केला आहे. न्यायालय कलम १७२ क्रि.प्रो. कोडप्रमाणे तपासाचे दैनंदिन अहवालाचा उपयोग करू शकते; मात्र त्याचा पुरावा म्हणून उपयोग करू शकत नाही. एकदा का न्यायालयासमोर इतर गोष्टी ज्यावरून ते कारवाई करू शकतात. अशा गोष्टी पुढे येतात, मात्र जर एखाद्या मुद्यावरून शंका असेल व तो स्पष्ट करून घ्यायचा असेल तर दैनंदिन अहवालाचा वापर करून ते स्पष्टीकरण किंवा शंका दूर करू शकतात.

न्यायालय या अहवालाचा उपयोग फक्त तपासात काही दोष आहे का व हे दोष सरकारी पक्षाच्या बाजूस कशा तऱ्हेने आड येऊ शकतात, हे बघण्यासाठी करू शकते. हा अहवाल वाचल्यानंतर जर न्यायालयास काही संशयित बाब वाटली तर कलम ३११ क्रि.प्रो.कोडप्रमाणे स्वत:चे अधिकार वापरून त्याबाबतचा पुरावा मागवू शकतात. अहवालात नमूद केलेल्या काही गोष्टींचा फायदा घेऊन न्यायालय त्या साक्षीदारास अहवालात नमूद केलेल्या मुद्याबाबत जास्त प्रश्न विचारून अधिक पुरावा पुढे आणू शकतात व त्याचा उपयोग पुरावा म्हणून करू शकतात.

ज्यावेळी सरकारी पक्षाकडून एखादा साक्षीदार हा उलटलेला (फुटलेला) साक्षीदार आहे हे घोषित करण्याकरिता परवानगी न्यायालयाकडे मागणी होते त्यावेळी सरकारी पक्षाची विनंती योग्य आहे की नाही? त्यास

काही आधार आहे काय हे ठरविण्याकरिता दैनंदिन अहवालाचा वापर न्यायालय करू शकते. ज्यावेळी पोलीस आरोपीची पोलीस कोठडीसाठी अर्ज करतात त्यावेळी दैनंदिन अहवालाचे अवलोकन करून त्यातील नोंद केलेले मुद्दे हे तो अर्ज ठरविण्यासाठी योग्य आहेत काय हे ठरवू शकतात.

त्याचप्रमाणे ज्यावेळी आरोपीवर दोषारोप ठेवावयाचा असतो त्यावेळीसुध्दा न्यायालयाचे कर्तव्य आहे की दैनंदिन अहवाल पाहून त्यात आरोप ठेवण्याचे रद्द करण्याबाबत काही मजकूर आहे काय हे बघणे, जर पोलीस अहवालात आरोप ठेवण्याइतका जर पुरावा नसेल तर कुठल्याही इसमावर खटला भरावा व त्याचे स्वातंत्र्य धोक्यात आणावे असा कायदा नाही. क्रि.प्रो.कोड यातील निरनिराळ्या कलमान्वये न्यायालयाला तपासाचा दैनंदिन अहवाल बघण्याचा अधिकार आहे हे स्पष्ट झालेले आहे.

ज्यावेळी पोलीस तपास बंद करण्याचे ठरवितात तेव्हाही न्यायालय हे कलम १७३ क्रि.प्रो.कोड हे न्यायालयास दैनंदिन अहवाल बघण्याचा विचार करावयास सांगते. खरं तर क्रि.प्रो. कोडप्रमाणे न्यायाधीशांना पोलीस तपासाचेबाबत अगदी प्रथम खबर आल्यापासून संपर्कात राहावे ही वस्तुस्थिती आहे. जरी तपास पूर्ण झाल्यानंतर पोलीस या निर्णयाप्रत आले की, आरोपीविरुध्द काहीही पुरावा नाही तरीसुध्दा न्यायाधीश पोलिसांना किंवा दुय्यम न्यायाधीशांना तपास करण्यास सांगू शकते जर ते पोलिसांच्या तपासाबाबत समाधानी नसतील तर.

जामिनाच्या अर्जावर जामीन द्यावा की नाही हे ठरवितानासुध्दा न्यायाधीश दैनंदिन अहवाल बघू शकतात. कलम ४८२ क्रि.प्रो. कोडप्रमाणे उच्च न्यायालय एखाद्या प्रकरणाचा ज्यावेळी विचार करते, त्यावेळी ते दैनंदिन अहवाल बघू शकतात. न्यायालय दैनंदिन अहवाल फक्त अवलोकन करू शकत नाही तर त्याचा उपयोग त्यातील नोंदीबाबत पोलिसांच्या विसंगती दाखविण्यासाठीसुध्दा करू शकतात. न्यायालय या अहवालचा उपयोग सरकारी पक्षाच्या म्हणण्याच्या पृष्ठ्यर्थ मात्र वापरू शकत नाही. ज्यावेळी विरोधी पक्षाचा युक्तिवाद नाकारला जातो. कारण तसा मजकूर पोलीस दैनंदिन अहवालात अजिबात नमूद केला जात नाही अशावेळी पोलीस दैनंदिन अहवालाचा उपयोग करणे हे कायद्याने मंजूर नाही.

चौकशी किंवा खटला चालू असताना त्याला मदत म्हणून फक्त दैनंदिन अहवालाचा उपयोग करणे हे योग्य आहे असे नमूद केलेला आहे. या दैनंदिन अहवालातील मजकुरावर साक्षीदाराला प्रश्न तयार करण्यासाठी उपयोग करण्याबाबत सीमित आहे आणि या दैनंदिन अहवालाचा उपयोग करताना न्यायालयाने फार काळजी घेतली पाहिजे. न्यायालयाने हे लक्षात ठेवले पाहिजे की दैनंदिन अहवाल हा आरोपीस बघता येत नाही. सर्वसाधारणपणे हे पोलिसांचे त्यांच्या उपयोगासाठीची (रेकॉर्ड) नोंद असते.

दैनंदिन अहवाल हा व्यवस्थित ठेवला म्हणून सरकारी पक्षाची बाजू पुढे करण्याकरिता त्याचा फारसा उपयोग होऊ शकत नाही. मात्र, जर या अहवालात काही गंभीर चुका केल्यास ते सरकारी पक्षाला घातक ठरू शकते. दैनंदिन अहवाल बघण्याचे स्वातंत्र्य न्यायालयास दिले आहे जेणेकरून सरकारी पक्ष हा आरोपीस संशयाचा फायदा देण्यासाठी काही संशयास्पद स्थितीत कार्य करीत नाही ना याची कल्पना येऊ शकते. ज्यावेळी दैनंदिन अहवालातील काही मजकूर हा सरकारी पक्षाच्या विरुध्द आहे तर न्यायालय फक्त पोलीस अधिकाऱ्यास त्याबाबत प्रश्न विचारू शकतात. इतर दुसऱ्या कुठल्याही साक्षीदारास नाही.

मात्र जर पोलीस अधिकाऱ्याने आपली आठवण ताजी करण्याबाबत दैनंदिन अहवालाचा उपयोग केला तर आरोपीस ज्या भागाचा उपयोग पोलीस अधिकाऱ्याने केला असेल तो भाग बघण्याचा अधिकार मिळतो. त्याचप्रमाणे जर न्यायालयाने पोलीस अधिकाऱ्याला तफावत दाखविण्यासाठी त्याचा उपयोग केला तर आरोपीस तसाच अधिकार म्हणजे तो भाग बघण्याचा अधिकार प्राप्त होतो.

## दैनंदिन अहवाल न लिहिण्याचे परिणाम :

दैनंदिन अहवाल हा रोजच्या तपासाची नोंद असते, जर रोजच्या रोज तपासादरम्यान उघडकीस आलेल्या गोष्टींची नोंद केली नाही तर ती परिस्थिती प्रत्यक्षात नव्हतीच अशा तऱ्हेचा संशय निर्माण होऊ शकतो व साहजिकच ही बाब आपल्या विरुध्द जाऊ शकते.

## वरिष्ठ अधिकाऱ्यांचे कार्य :

मंडल पोलीस निरीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस अधीक्षक यांना प्रथम खबरीची प्रत प्राप्त होत असते त्यांनी ही प्रत (फिर्याद) वाचली पाहिजे व दैनंदिन अहवालाची प्रत त्वरित मिळते की नाही याची खात्री केली पाहिजे. ज्यावेळी दैनंदिन अहवालाची प्रत येईल तेव्हा त्यावर तारीख टाकून स्वाक्षरी करावी.

त्यांनीही दैनंदिन अहवालाचा लगेच सखोल अभ्यास करावा जेथे गरज आहे तेथे सूचना कराव्यात. या सूचना चुका लक्षात आणून देण्यासाठी नसाव्यात तर तपासाबाबत सल्ला मार्गदर्शनपर असाव्यात; मात्र जर अहवालात ढोबळ चुका किंवा काही टाळले असेल तर मात्र तसे दाखवून दिलेच पाहिजे.

■■■■■

# प्रकरण – १६

# घटनास्थळाचे निरीक्षण, नकाशे व स्केच काढणे

## Spot Inspection/Map/ Sketch of Spot

**उद्दिष्टे :**

१. मुद्दे, गोष्टी चांगल्या प्रकारे समजण्यास मदत होते ते सांगू शकाल.

२. तंतोतंत व अचूक नकाशा काढणे म्हणजे घटनास्थळाचे बारकाईने निरीक्षण केल्याचे स्पष्ट होते.

३. न्यायालयात साक्ष देताना तपासी अंमलदारला मदत होते.

४. तंतोतंत व अचुक काढलेला नकाशा पुरावा कायद्यान्वये ग्राह्य ठरतो.

५. न्यायाधीशाला खटल्याची माहिती करून घेण्यास मदत होते.

गंभीर व महत्त्वाच्या गुन्हयात आवश्यक असेल त्या सर्व ठिकाणी घटनास्थळांचे स्केच किंवा नकाशा काढावा. कारण, यावरून गुन्ह्याचा पूर्ण तपास करण्याकरिता याचा उपयोग चांगल्याप्रकारे होतो. अंमलदार घटनास्थळी प्रत्यक्ष हजर होता हे सिध्द होईल. तसेच केस न्यायालयात चालू असताना न्यायालयाला किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांना गुन्ह्याची माहिती देण्यासाठी त्याचा चांगल्याप्रकारे उपयोग होतो व गुन्हा कसा घडला हे समजू शकते व त्यामुळे आरोपीला शिक्षा होते.

याचा उपयोग Reconstruction of Crime करिता होतो.

१. तपासी अंमलदार यांनी घटनास्थळाचा नकाशा त्वरित शक्यतोवर स्वत: काढावा.

२. कंपास, टेपचा वापर करून अचुक मोजमाप घेऊन नकाशा काढावा.

३. घटनास्थळाचा नकाशा शक्यतो भूमी अभिलेख कार्यालयाकडील आरेखक यांचेकडून काढून घ्यावा. कारण त्यास न्यायालयात मान्यता आहे.

४. नकाशा काढणाऱ्या आरेखकास तपासी अंमलदार यांनी स्वत: घटनास्थळ दाखवून घटनास्थळावरील परिस्थितीची माहिती पुरवावी. नकाशामुळे न्यायालयाला भूतकाळात घटनास्थळ कसे होते याची मदत होते.

५. घटनास्थळाचा नकाशा उशिरा काढलेला असल्यास पुराव्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरत नाही, म्हणून विलंब टाळावा.

६. नकाशामुळे घटनास्थळ व प्रत्यक्ष घटना पाहणारा साक्षीदार यांच्यातील अंतर, घटनास्थळावर असलेल्या वस्तू, घटनास्थळाची परिस्थिती या सर्व गोष्टींचा न्यायालयास न्यायाचे कामात मदत होते.

## घटनास्थळाचे निरीक्षण व संरक्षण

जेव्हा दखलपात्र गुन्ह्याची खबर मिळते तेव्हा पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे की, ती नोंदवून घेणे व तपास हाती घेणे (कलम १५६ क्रि.प्रो.कोड) त्यानंतर त्याने स्वत: किंवा त्याच्या हाताखालील अधिकाऱ्याने घटनास्थळी जाऊन तपास करून पुरावा गोळा करणे व आरोपीचा शोध व अटक करणे क्रमप्राप्त आहे. (कलम १५७ क्रि.प्रो.कोड) कोणत्याही कारणाने घटनास्थळी जाण्यास उशीर होत असल्यास घटनास्थळ सुरक्षित ठेवणे गरजेचे असते.

घटनास्थळाचे महत्त्व अनन्य आहे. काही वेळा आरोपी घटनास्थळी मिळून येतो. परंतु, बहुतांश वेळी घटनास्थळावरील मिळालेल्या दुव्यावरून आरोपी निष्पन्न करून त्यास अटक करावी लागते.

## घटनास्थळाचे महत्त्व :

घटनास्थळाच्या निरीक्षणातून खालील बार्बीमध्ये मदत होते :-

१. गुन्ह्याची हकिकत निष्पन्न करण्यासाठी.

२. आरोपीची ओळख पटविण्यासाठी.

३. घटना नक्की कोठे घडली हे शोधण्यासाठी.

४. साक्षीदारांच्या जबाबाची सत्यता पडताळण्यासाठी.

५. गुन्ह्याची पुनर्बांधणी करण्यासाठी.

६. गुन्ह्याची कार्यप्रणाली स्पष्ट करण्यासाठी.

७. भौतिक पुरावे गोळा करण्यासाठी.

कलम १५७ क्रि. प्रो. को. प्रमाणे तपासी अंमलदाराने तत्काळ घटनास्थळावर जाणे अपेक्षित आहे. घटनास्थळावर पोहचण्यास उशीर झाल्यास नागरिकाकडून घटनास्थळामध्ये काही फेरफार होऊ शकते. त्यामुळे घटनास्थळावरील महत्त्वाचे दुव्याचा नाश होऊ शकतो. त्यामुळे काही महत्त्वाच्या कारणामुळे जर घटनास्थळी पोहचण्यास उशीर होत असेल तर तपासी अधिकाऱ्याने आपल्या दुय्यम अधिकाऱ्यास घटनास्थळी पाठवून घटनास्थळाचे संरक्षण करणे गरजेचे आहे.

घटनास्थळ हे बंद जागेत, मोकळ्या जागेत किंवा एखाद्या वाहनात असू शकते. घटनास्थळ व घटनास्थळावर सापडलेल्या वस्तू भारतीय पुरावा कायदा कलम ७ अन्वये ग्राह्य पुरावा मानल्या जातात. माणसे खोटे बोलू शकतात. परंतू परिस्थिती खोटे बोलत नाही. म्हणून घटनास्थळाचे बारकाईने निरीक्षण करणे गरजेचे आहे. नुसते पाहणे या क्रियेस निरीक्षण म्हणता येणार नाही. परंतु एखादी गोष्ट चिकित्सक बुध्दीने पाहणे यास निरीक्षण म्हणता येईल.

निरीक्षणामध्ये प्रामुख्याने १) आवड २) एकाग्रता ३) पाहण्याची सवय या तीन घटकांचा समावेश होतो. निरीक्षण ही एक कला असून जोपर्यंत पोलीस अधिकारी ही कला अवगत करीत नाही तो यशस्वी होऊ शकत नाही. याकरिता बुध्दी, कार्यक्षमता, तत्परता, ज्ञान, स्मरणशक्ती या गुणांची आवश्यकता आहे.

निरीक्षण योग्य झाले तर पुढील अनुमानही योग्य काढता येते. निर्णय चुकीचा घेतल्यास तपासात गोंधळ निर्माण होऊन अपयश पदरी पडते. याकरिता निरीक्षण वास्तववादी असले पाहिजे. निरीक्षणामध्ये कल्पनेला वाव देऊ नये. गुन्हेगार काही खुणा, मागमूस मागे सोडून जातो, त्यास दुवे असे म्हणतात. दुवे शोधून काढणे म्हणजे तपासातील अडचणी दूर करणे होय.

## घटनास्थळावर पोहचल्यावर करावयाची कारवाई :

१. पोहचल्याची तारीख व वेळ नोंद करावी, नेमके ठिकाण, हवामान, व आजुबाजूच्या परिसराची नोंद.

२. जखमींना तत्काळ वैद्यकीय मदतीस पाठवावे.

३. योग्य पहारा लावून घटनास्थळ सुरक्षित करावे.

४. घटनास्थळाचे लवकर प्राथमिक निरीक्षण करून जरुरीप्रमाणे तज्ज्ञांना पाचारण करावे.

५. विविध कोनातून फोटोग्राफ घ्यावे.

६. घटनास्थळाचा नकाशा काढावा.

७. घटनास्थळाचे दुव्यासाठी बारकाईने निरीक्षण करावे. कोणताही दुवा निसटता अथवा नाश होऊ नये.

८. सर्व दुवे काळजीपूर्वक उचलून, योग्य आवरणात ते सील पॅक करून त्यावर पंचाच्या सह्या घेऊन तज्ज्ञांकडे पाठवाव्यात.

९. गुन्ह्याचा हेतू शोधून काढण्याचा प्रयत्न करावा.

१०. गुन्ह्याच्या कार्यप्रणालीचा सखोल अभ्यास करावा.

११. गुन्ह्याची पुनर्बांधणी करण्याचा प्रयत्न करावा.

१२. घटनास्थळावरील कोणत्याही वस्तूस कमी लेखू नये.

१३. तपासी अधिकाऱ्याने स्वच्छ मनाने निरीक्षण केले पाहिजे.

## घटनास्थळाचे संरक्षण :

तपासी अधिकाऱ्याने घटनास्थळाचे संरक्षण करणे अत्यंत गरजेचे आहे. घटनास्थळावरील बघे, वृत्तपत्रांचे प्रतिनिधी तसेच आवश्यक नसलेले पोलीस यांना तत्काळ दूर करण्यात यावे. यांच्यामुळे घटनास्थळावरील दुवे दूषित किंवा नाश पावू शकतात. जखमी इसमांना तातडीने मदत देणे गरजेचे असले तरी मृतदेहावर दुवे मिळून येत असल्याने मृतदेह संपूर्ण निरीक्षण होईपर्यंत घटनास्थळावरून हलवू नये. बहुतांश गुन्ह्यामध्ये तपासाचे यश प्राथमिक निरीक्षणावर अवलंबून आहे.

घटनास्थळ बंद जागेत असेल तर ती संपूर्ण खोली / सदनिका संरक्षित करावी. काही वेळा गरज वाटल्यास निरीक्षण संपेपर्यंत संपूर्ण इमारतीमध्ये इतरांना प्रवेश देऊ नये. घटनास्थळ मोकळ्या जागेत किंवा वाहनात असेल तर संपूर्ण आजूबाजुच्या परिसरात इतरांना प्रवेश देऊ नये. दोऱ्या, टेप्स, निशाण्यांचा यासाठी वापर करावा. गरज वाटल्यास पहारा लावावा. घटनास्थळ जर बाल्कनी, टेरेस, उद्यान, व्हरांडा, इ. मोकळ्या जागेत असेल तर पाऊस, वारा, धूर, सूर्यप्रकाशापासून संरक्षण देण्यासाठी पॉलीथीन शीटचा वापर करावा. भटकी कुत्री, पाळीव जनावरे, पक्षी यापासून योग्य काळजी घ्यावी.

## निरीक्षण करण्याच्या पध्दती :

घटनास्थळाची जागा व परिस्थितीनुसार घटनास्थळाच्या निरीक्षणाच्या झडती पध्दती खालीलप्रमाणे आहेत.

**अ) छप्परवजा किंवा बंद जागा**

**१. घड्याळाच्या काट्याप्रमाणे (दिशने) झडती घेणे.**



**२. घड्याळाच्या काट्याचे विरुध्द दिशेने झडती घेणे.**



**ब) मोकळे मैदान – मोकळी जागा**

१. पट्टे पध्दत.




२. विभागणी पध्दत.



३. चक्राकार पध्दत.



४. गोलाकार / वर्तुळाकार पध्दत.



५) ग्रीड / भित्त पध्दत



वरील पध्दती या स्वतंत्र किंवा एकत्रितरीत्यासुध्दा वापरता येतात.

## भौतिक दुवे / पुरावा

ज्या वेळेस दोन वस्तू एकमेकांच्या सान्निध्यात येतात, त्यावेळेस त्यांच्यात त्यांच्यातील घटकांचा रंग, रूप, आकार, वजन, वास, इ. गुणधर्माची देवाणघेवाण होते. उदा. फळ्यांवर खडूने लिहिणे, पायाला माती लागणे, इ. निसर्गात दोन वस्तू एकसारख्या नसतात. प्रत्येकाची वैशिष्ट्ये वेगवेगळी असतात. या तत्त्वावर घटनास्थळी अशा वस्तू किंवा पदार्थ ज्यांचा संबंध संशयित अगर आरोपीशी आला असावा अशा वस्तू किंवा पदार्थ मिळतात त्याला भौतिक दुवे असे म्हणतात.

## भौतिक दुव्याची शास्त्रीय व्याख्या :

गुन्ह्याच्या तपासात तपासी अंमलदारास ज्या गोष्टीचे ज्ञान त्यांच्या पंचेंद्रियांद्वारे ( नाक, कान, स्पर्श,जिभ, डोळे ) होते व त्या गोष्टीचा उपयोग तो तपासात पुरावा म्हणून करून घेतो त्यास भौतिक दुवे म्हणतात. उदा. केस, रक्त, कागद इ.

## भौतिक दुवे मिळण्याचे ठिकाण

१. गुन्हेगार येण्याचा मार्ग.

२. गुन्ह्याच्या ठिकाणावर प्रवेश केल्याची जागा.

३. गुन्ह्याचे ठिकाण व तेथील वस्तू.

४. घटनास्थळातून बाहेर पडण्याचा मार्ग.

५. परत जाण्याचा मार्ग.

६. आरोपी किंवा संशयिताचे अंगावर.

७. सावज, बळी, जखमी किंवा फिर्यादीचे अंगावर.

## गुन्ह्याच्या जागी मिळून येणारे भौतिक दुवे

| अ.क्र. | द्रव्यांचा प्रकार | उदाहरण |
|---|---|---|
| १. | मानवी द्रव्य | रक्त, थुंकी, घाम, लाळ, वीर्य, अश्रू |
| २. | शरीराचे भाग | कवटी, मांस, दात, नखे, हाडे |
| ३. | वेष्टन | बाटली, कॅन, इंजेक्शन, ग्लास, ड्रम, पोते, इ. |
| ४. | दस्ताऐवज | पुस्तक, चेकबुक, वर्तमान पत्र, रिसिट, सील स्टॅम्प, फोटो, बिल, कार्बन पेपर इ. |
| ५. | औषधे | पावडर, गोळ्या, कॅप्सूल इ. |
| ६. | स्फोटके | वायर, स्प्रिंग, टायमर, न उडालेली स्फोटके, दोरी, इ. |
| ७. | तंतू व तंतूमय पदार्थ | कापड, दोरा, कापूस, सीट कव्हर, पडदे, इ. |
| ८. | अंगुली मुद्रा | हाताचे, बोटाचे, तळव्याचे, दृश्य, अदृश्य ठसे |
| ९. | पायाचे ठसे | पायाचे, रक्ताने माखलेले धुळीवर, चिखलावर बूटाचे |
| १०. | दाताचे व्रण | दाताचे, चावल्याचे |
| ११. | आग | जळलेला, अर्धवट जळलेला, ज्वलनशील पदार्थ, काडेपेटी. |
| १२. | स्फोटके / काडतुसे | गावठी, फॅक्टरीमध्ये बनविलेली, जिवंत अथवा उडविलेली काडतुसे / गोळ्या, वॅडस्, गन पावडर, इ. |
| १३. | व्हिसेरा | वांती, पेय, शौच, इ. |
| १४. | रंग | एका वस्तूवरून दुसऱ्या वस्तूवर |
| १५. | ज्वलनशील वस्तू | केरोसिन, पेट्रोल, डिझेल, ग्रीस, थिनर, इ. |
| १६. | ग्लास | बांगड्या, तुकडे, शीट वस्तू, इ. |
| १७. | केस | माणसाचे, जनावराचे |
| १८. | निशाण्या | टायर, ब्रेक, धातूवरील, मोल्डस्, इ. |
| १९. | डाग | रक्ताचे, वीर्याचे, रंगाचे, इ. |
| २०. | धूलिकण | रेती, मातीचे कण, कोळसा पावडर, लाकडी भुसा, इ. |
| २१. | हत्यारे / टूल्स | रेझर, चाकू, स्क्रू ड्रायव्हर, हातोडा, सुई, कुऱ्हाड, करवत, तलवार इ. |
| २२. | टूल मार्क | कापलेली, वाकलेली, चिरलेली, इ. |
| २३. | ऑडिओ / व्हिडिओ | कॅसेट, टेप, रेडिओ, वॉकमन, टी. व्ही. इ. |
| २४. | संगणक | हार्ड / सॉफ्ट कॉपी, मोबाईल, सीम कार्ड, पेन ड्राईव्ह, इ. |
| २५. | वायर / केबल्स | इलेक्ट्रिक, कॉपर, ट्रॅक्शन इ. |
| २६. | सीरियल क्रमांक | वाहने, अग्निशस्त्रे, मोबाईल इ. चा |
| २७. | इतर | इतर कोणतीही वस्तू जी गुन्हेगाराची गुन्ह्याशी संबंध जुळवित असेल. |

## स्केच :

तपासी अधिकाऱ्याने घटनास्थळाचा काढलेला स्केच हा शंभर शब्दांपेक्षा जास्त घटनास्थळाचे वर्णन करू शकतो, म्हणून त्यास गुन्ह्याच्या तपासात खूप महत्त्व आहे. स्केचमुळे खालील फायदे होतात.

१. भौतिक परिस्थितीचे अचूक वर्णन.

२. घटनास्थळावरील घटनांचा क्रम लावता येतो.

३. भौतिक दुवे व इतर वस्तूची जागा निश्चित करता येते.

४. जे घटनास्थळावर हजर नव्हते त्यांना घटनास्थळाची माहिती होते.

५. बऱ्याच वेळा कोर्टात ग्राह्य पुरावा होऊ शकतो.

६. मुलाखत किंवा चौकशी स्केचच्या आधारे करता येते.

७. कोर्टासमोर खटला मजबूत करण्यासाठी मदत होते.

स्केच दोन प्रकारचे असतात १) कच्चा स्केच व २) अंतिम चित्र.

कच्चा नकाशा हा तपासी अधिकारी घटनास्थळावर काढतो तर अंतिम चित्र हे नंतर व्यावसायिक चित्रकाराला बोलावून काढले जाते.

कच्चे चित्र हे जागेवरच तपासी अधिकारी काढतात. जास्तीत जास्त माहिती त्यात समाविष्ट करावी. उपयुक्त बाबींचा समावेश असावा. येणारे रस्ते, जाणारे रस्ते, इमारती, शेती, इ. बाबी स्केचमध्ये असाव्यात. घटनास्थळाचे फोटो काढल्यानंतर स्केच काढावा. फोटो व स्केच काढेपर्यंत घटनास्थळावरील कोणतीही वस्तू हलवू नये.

## स्केच काढण्याची पध्दत :

१. प्रथम नीट निरीक्षण करा.

२. मोजमाप घ्या.

३. कागदावर आऊटलाईन काढा.

४. वस्तू व भौतिक दुवे स्केचमध्ये दाखवा.

५. इतर महत्त्वाच्या गोष्टी दाखवा.

६. टिप्पणी करा.

७. दिशा, सूची व स्केल दाखवा.

८. स्केच पुन्हा तपासून पाहा.

## स्केच काढण्याच्या विविध पध्दती

१. काटकोन समन्वय पध्दत.




FIG 1 : BASELINE OR COORDINATE METHOD

A. B. - Two fixed points (coordinates)
AB - Baseline (side wall) D - Dead body
CC1 - Perpendicular distance between the head portion of the frsf bofy and baseline
C1D - Distance between nearest fixed point and the perpendicular line

ही पध्दत घटनास्थळ बंद जागेत असल्यास वापरतात. एकमेकांच्या बाजूला असलेल्या भिंतीपासून वस्तूपर्यंतचे अंतर काटकोनात मोजून वस्तूचे ठिकाण निश्चित केले जाते. ही पध्दत फक्त घटनास्थळ चौकोनी किंवा काटकोनी असल्यास वापरता येते.

२. **त्रिकोण पध्दत.**




ही पध्दत घटनास्थळ बंद जागेत किंवा मोकळ्या जागेत असले तरी वापरता येते. घटनास्थळावरील कोणत्याही दोन ठिकाणांवरून वस्तूचे पर्यंत त्रिकोण काढण्यात येतो. त्रिकोणाच्या कोनाच्या अंशाप्रमाणे स्केचवर वस्तूचे ठिकाण निश्चित करता येते.

३. क्रॉस प्रोजेक्शन पध्दत.




Cross Projection Method

*Sample Legend*







*Completed Crime Scene Sketch*

ही पध्दत बंद खोलीत वापरता येते. घटनास्थळाला वरून पाहिल्यावर ते एका बॉक्सप्रमाणे दिसते. मग घटनास्थळाच्या प्रत्येक कोपऱ्यातून अंतर मोजून वस्तूचे ठिकाण निश्चित करता येते.

## भौतिक दुवे गोळा करणे :

तपासामध्ये पुरावा मिळविणे, पुराव्याच्या साखळ्या जोडणे, कमजोर दुवे मजबूत करणे, अनावश्यक बाबी टाळणे, गुन्हा व संशयित यांचा संबंध तसेच साक्षीदारांची सत्यता पडताळून पाहण्यासाठी भौतिक दुव्याचा उपयोग होतो. म्हणून गुन्ह्याच्या जागी जाणाऱ्या पोलिसांनी तेथे जाताच त्या ठिकाणाचे बारकाईने अवलोकन करून गुन्ह्याच्या ठिकाणावरील वैज्ञानिक दुवे नाश पावणार नाहीत, त्यांची हलवाहलव होणार नाही अगर कोणीतरी जाणूनबुजून नाश करणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे.

भौतिक दुवे गोळा करण्यात खालील टप्प्याचा समावेश आहे.

१. हाताळणे, तपासणे व ताब्यात घेणे.

२. पॅकिंग करणे.

३. लेबल लावणे.

४. सील लावणे.

५. मागणीपत्राद्वारे प्रयोगशाळेत पाठविणे.

## हाताळणे व तपासणी करणे :

हाताळणे म्हणजे कोणत्याही वस्तूस स्पर्श करणे, ती उचलणे व बाजूला ठेवणे. भौतिक दुव्यास स्पर्श केल्यापासून ही क्रिया सुरू होते. विधिविज्ञान प्रयोगशाळेकडून अगर तज्ज्ञांकडून निर्दोष व चांगले मत मिळविण्यासाठी पोलीस अंमलदाराने खालील दक्षता बाळगली पाहिजे.

१. वस्तू दिसताक्षणीच तिला स्पर्श करण्याचा किंवा उचलण्याचा मोह तपासी अंमलदाराने टाळावा.

२. हातात रबरी मोजे घालावे.

३. स्पर्श करण्यापूर्वी बारकाईने निरीक्षण करावे. जादा प्रकाशझोताचा अथवा भिंगाचा जरूर पडल्यास वापर करावा. वस्तूवरील दृश्य, अदृश्य परक्या गोष्टी / खुणा, ठसे इ. चा नाश होणार नाही अशा प्रकारे वस्तू हाताळाव्यात.

४. वस्तू कमीत कमी हाताळा.

५. वस्तू नेहमीच्या पध्दतीने न उचलता काळजीपूर्वक व योग्यरितीने उचलावी.

## वस्तू उचलण्याची पध्दती :

१. चिमटा, चमचा, पक्कड इ. च्या मदतीने उचलणे.

२. चिकटपट्टीच्या मदतीने उचलणे.

३. धारदार वस्तूने खरडवून काढणे.

४. व्हक्यूम क्लिनरच्या मदतीने उचलणे.

५. कंगव्याने विंचरून गोळा करणे.

६. नखे कापून क्लिपिंग घेणे.

## पॅकिंग :

जप्त केलेली वस्तू सुरक्षित व तिचे गुणधर्म जसेच्या तसे राहावे यासाठी ते कव्हर करणे गरजेचे आहे. भौतिक दुवे / वस्तूमध्ये भेसळ होणार नाही, हालचालीमुळे ते खराब होणार नाही किंवा सांडणार नाही, त्यांचे ज्वलन अथवा स्फोट होणार नाही याची काळजी घेणे गरजेचे आहे.

भौतिक दुव्याच्या सुरक्षिततेसाठी ते पॅक करताना सील करताना व पाठविताना खालील नियम पाळणे गरजेचे आहे.

१. ओले किंवा घाणेरडे खोके, डबा वापरू नका. पक्के झाकण किंवा बुच नसलेले डबे, बाटल्या वापरू नका.

२. वास येणारे कंटेनर वापरू नका.

३. रस्त्यामध्ये फाटतील असे पातळ कार्डबोर्डचे खोके वापरू नका.

४. विषारी / स्फोटके / पावडरी पॅक करताना चांगल्या प्रतीची पाकिटे / पॉलिथिन बॅग वापरा.

५. एका वस्तूचा दुसऱ्या वस्तूशी संपर्क येऊ नये.

६. प्रत्येक वस्तू स्वतंत्र पॅक करा.

७. काचेच्या बाटल्या पॅक करताना त्या एकमेकांवर आदळून फुटणार नाहीत याची काळजी घ्या.

८. वस्तू ताब्यात घेतल्यापासून ती तज्ज्ञांकडे / कोर्टाकडे पाठविण्यापर्यंत कोणाच्या ताब्यात आहे याची नोंद ठेवा.

९. ओली वस्तू पॅक करण्यापूर्वी कोरडी करा. (सूर्यप्रकाशात नाही).

१०. स्फोटक पदार्थ पॅक करताना विशेष काळजी घ्या.

११. कपड्यावरील डागांवर घडी घालू नका.

१२. काचेचे तुकडे कापसात पॅक करावे.

## सिलिंग :

भौतिक पुराव्याच्या सुरक्षिततेसाठी लाखेच्या साहाय्याने सीलचा वापर करावा. त्यासाठी प्रत्येक वस्तू सील करता येण्याजोगी बांधावी. तसेच तिचे सील काढल्याशिवाय ती उघडता येऊ नये. दोऱ्याने बांधणी केली असेल तर प्रत्येक गाठीवर सील असणे आवश्यक आहे. प्रत्येक सील लाखेवर पूर्ण उमटले पाहिजे. गरज नसल्यावर सील जबाबदार व्यक्तीच्या ताब्यात ठेवावे. सील हे अधिकृत असावे. पुराव्याच्या वस्तूबरोबर पाठवायच्या पत्रात सीलचा नमुना ठसा देणे आवश्यक आहे. बुचावर सील करताना काळजी घ्यावी की उघडताना लाख बाटलीत पडणार नाही. सील करताना प्रथमपासून शेवटपर्यंत एकाच प्रकारची लाख व सील वापरावे.

## लेबलिंग :

पॅक आणि सील केलेल्या वस्तूवर लेबल लावणे आवश्यक आहे. लेबल हे त्या वस्तू प्रयोगशाळेत तपासतांना अडथळा येईल अशा तऱ्हेने न लावता योग्य ठिकाणी लावावे. अगदी लहान वस्तू असेल तर एखादा खोका किंवा डबा यात वस्तू ठेवून त्या डब्यावर लेबल लावावे.

लेबलमध्ये खालील गोष्टी नमूद करणे आवश्यक आहे.

१. पोलीस ठाण्याचे नाव व जिल्हा.
२. गुन्हा रजिष्टर क्रमांक व कलमे.
३. जप्त केल्याची तारीख, वेळ व दिनांक, कोणाकडून जप्त केली.
४. वस्तूचे थोडक्यात वर्णन.
५. जप्त करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव, हुद्दा व सही.
६. पंचांच्या सह्या.

## मागणीपत्र :

पुराव्याच्या वस्तू प्रयोगशाळेत अथवा तज्ज्ञांकडे पाठविल्यास त्यासोबत तपासणी कशी व कोणत्या बाबतीत पाहिजे याची मागणी करणारे मागणीपत्र वेगळे पाठवावे. त्याची एक प्रत पुराव्याच्या वस्तूच्या बासनाचे आत टाकावी.

या पत्रात खालील बाबींचा समावेश असावा.

१. पोलिस ठाणे जिल्हा, राज्य.
२. गुन्हा रजि. क्रमांक व कलम.
३. संक्षिप्त तपशील.
४. प्रत्येक बासनातील वस्तूचे क्रमवार वर्णन.
५. परीक्षण कोणत्या मुद्यावर हवे त्याचा तपशील.
६. तपासी अंमलदाराचे नाव व हुद्दा.
७. सीलचा नमुना ठसा.
८. वाहक कर्मचाऱ्याची ओळख.
९. कार्यालय प्रमुखांचा शेरा व सही.
१०. परीक्षण करण्याची विनंती व परीक्षणाचे वेळी पाठविलेल्या वस्तुंमधील काही भाग / अंश वापरण्याची अनुमती.

■■■■■

# प्रकरण – १७

# न्यायसहायक विज्ञान

## उद्दिष्टे :

## न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेची माहिती व मार्गदर्शनपर सूचना :

न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा (एफएसएल) या बहुशास्त्रीय संस्था असून त्या अत्यंत विशिष्ट प्रकारचे व प्रगत विश्लेषण कार्य करतात. तपासयंत्रणांना आणि त्यामार्फत न्याययंत्रणेला निष्पक्ष शास्त्रीय पुरावे देणे हे एफएसएलचे मुख्य कर्तव्य आहे. ही संस्था भारतीय दंडसंहिता, फौजदारी गुन्हे संहिता, भारतीय शस्त्र कायदा, एनडीपीएस कायदा, स्फोटक पदार्थ कायदा, पेट्रोलियम कायदा, मुंबई पोलीस कायदा, दारुबंदी कायदा, जीवनावश्यक वस्तू कायदा, मोटार वाहन कायदा, माहिती व तंत्रज्ञान कायदा, वन्यजीव संरक्षण कायदा, टाडा इ. कायद्यांतर्गत विविध गुन्हे प्रकरणांमध्ये वैज्ञानिक विश्लेषणात्मक अहवाल पुरविते.

न्यायसहायक सेवा अधिक परिणामकारक करण्याकरता एफएसएलचे कर्मचारी पोलीस तपास अधिकारी आणि न्यायालयीन अधिकारी यांना वेळोवेळी नियमितपणे प्रशिक्षण देत असतात. सहसा असे आढळून येते की, कुठल्याही नाविण्यपूर्ण तंत्रज्ञानाचा फायदा अन्य नागरिकांच्या आधी गुन्हेगारच घेत असतात. आणि गुन्ह्यांचा सामना करण्याकरता न्यायसहायक वैज्ञानिकांना विज्ञान व तंत्रज्ञान संस्थांमध्ये खास प्रशिक्षण यांद्वारे सुप्रशिक्षित करण्याकरता सातत्याने प्रयत्न केले जातात.

मुंबई एफएसएल ची स्थापना १९५८ साली करण्यात आली. त्यानंतर नागपूर (१९६६), पुणे (१९७९), औरंगाबाद (१९८२), नाशिक (२००४), अमरावती (२००८), नांदेड (२०१५), आणि कोल्हापूर (२०१६) अशा सात विभागीय प्रयोगशाळा कार्यरत आहे. त्यांचे मुख्य कार्यालय मुंबई येथे आहे.

## D.N.A. (जनुकीय गुणसूत्रे) तपासणी

### (Deoxyribo-Nucleic Acid Test)

डी.एन.ए. प्रोफाईल या तंत्राचा उपयोग शरीराविरुध्दच्या अपराधातील गुन्हेगारांची, दिवाणी व फौजदारी खटल्यामधील संबंधित व्यक्तीची, हरवलेल्या मुलांची, हॉस्पिटलमधील मुलांच्या अदला बदलीची, खून व बलात्काराच्या गुन्हयामध्ये आरोपीची तसेच वादग्रस्त बालकाच्या मातापित्याचा शोध घेण्यासाठी व ओळख पटविण्याकामी केला जातो.

प्रत्येक व्यक्तीस जन्मत:च त्याच्या आई–वडिलांकडून काही जैविक बाब्री वारसाने प्राप्त होत असतात त्यामुळे बहुतेक व्यक्ती त्यांच्या आई वडिलांप्रमाणे रंग, उंची, बांधा वगैरे बाबी घेऊनच जन्मास येतात. ही जशी बाह्य लक्षणे असतात. तशीच जैविक रसायनांचा वारसादेखील आई वडिलांकडून प्राप्त होत असतो. त्यातील एक रसायन म्हणजे डी.एन.ए. जनुकीय गुणसूत्रे होय.

तपासिक अंमलदाराने संबंधित मॅजिस्ट्रेटच्या आदेशाने अधिकृत वैद्यकीय अधिकाऱ्याकरवी आरोपीच्या रक्ताचे नमुने घ्यावेत. बलात्कार किंवा लैगिंक गुन्ह्यात बळीचे योनीतील स्वॅब, जुन्या रक्ताचे, वीर्याचे डाग असलेले कपडे, खुनातील बळीच्या हाडाचे नमुने घेऊन डी.एन.ए. तपासणीसाठी पाठवावेत. ज्या व्यक्तीची ओळख पटवायची आहे त्याचे उपलब्ध नमुने व त्याच्या जवळच्या नातेवाईकांचे (आई, वडील, पती, पत्नी,

मुले) रक्ताचे नमुने तुलनेसाठी पाठवावेत. नमुने एखाद्या थर्मासमध्ये बर्फ टाकून सुरक्षितपणे प्रयोगशाळेत ७२ तासांच्या आत पोहोचतील असे तात्काळ पाठवावेत.

गुन्हयाच्या तपासात घटनास्थळी नमुने मिळून आल्यास तुलनेसाठी गुन्हयांतील संशयित/आरोपीचे नमुने तपासणीसाठी पाठविले जातात. त्यावेळी त्याची तुलना करून संशयित/आरोपीचा गुन्हयांमध्ये सहभाग आहे अगर कसे याबाबत डी.एन.ए. टेस्ट तंत्राच्या आधारे अचूक माहिती मिळते.

## डी.एन.ए. टेस्टसाठी नमुने पॅकिंग करण्याच्या पध्दती :

| | |
|---|---|
| दात, हाडे व केस<br>(मानवी व प्राण्यांचे) | कोरड्या पॉलिथीन बॅगमध्ये |
| वीर्याचे नमुने | नमुने कॉटनवर घेऊन ते स्वच्छ व कोरडया काचेच्या बॉटलमध्ये भरून सील करून पाठवावे. |
| स्नायू पेशी<br>(Musile tissues) | हाडाच्या जवळील साधारणपणे १०० ग्रॅम स्नायूपेशी एका स्वच्छ काचेच्या बाटलीमध्ये कोणतेही प्रिझर्व्हेटिव्ह न टाकता घ्याव्यात. |
| रक्ताचे डाग | कोरड्या पॉलिथीन बॅगमध्ये पाठवावेत. |
| कोरडया कातडीचे नमुने | कोरड्या पॉलिथीन बॅगमध्ये पाठवावेत. |
| झाडांच्या वस्तू | स्वच्छ कपड्यामध्ये गुंडाळून पॉलिथीन बॅगमध्ये पाठवावेत. |

## पितृत्व / मातृत्व चाचणी (D.N.A. Test) साठी रक्त/मांस इत्यादी नमुने पाठविण्या संबंधी सूचना :

न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळा, मुंबई यांनी पुरविलेल्या २ मि.ली.च्या प्लॅस्टिक टयुबमध्ये प्रत्येक व्यक्तीसाठी २ टयूब (माता, पिता व मूल) याप्रमाणे रक्त घेण्यास संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यास सूचित करावे.

टयुबमध्ये असलेल्या परिक्षीत द्रावणामध्ये (Preservative) रक्त व्यवस्थित मिसळण्यासाठी टयुब ३-४ वेळा सावकाश हलवावी.

टयुबच्या बाजूच्या भागावर पांढरी बँडेज टेप चिकटवून त्यावर व्यक्तीचे नाव स्पष्टपणे नमूद करावे.

सदरच्या टयुब एका स्वच्छ प्लॅस्टिक डबीत भरून, प्लॅस्टिकची डबी सील करावी. (टयुबवर सील करू नये)

प्लॅस्टिकच्या डबीवरील सीलचा नमुना अग्रेषण पत्रासोबत दिल्या जाणाऱ्या Identification Form वर Copy of seal असे नमूद केलेल्या ठिकाणी ठळकपणे उमटविण्यात यावा.

न्याय वैज्ञानिक प्रयोग शाळा, मुंबई यांचेकडून देण्यात येणारा Identification Form चा नमुना प्रत्येक व्यक्तीसाठी एक याप्रमाणे संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून भरून घ्यावा.

Identification Form वर त्या - त्या व्यक्तीचे पासपोर्ट आकाराचे छायाचित्र चिकटवून त्यावर वैद्यकीय अधिकारी यांची स्वाक्षरी व पदनाम दर्शविणारा शिक्का उमटविण्यात यावा. त्यावर तीन साक्षीदारांच्या समक्ष सहया व ज्याचे रक्त काढले त्याची सही घ्यावी. त्यावर तपासिक अंमलदार यांनी सही करावी.

पोलीस ठाण्याकडून दिल्या जाणाऱ्या अग्रेषण पत्रात (Forwarding letter) डी.एन.ए. चाचणीसाठी

असा स्पष्ट उल्लेख करावा.

रक्त नमुने असलेली प्लॅस्टिकची डबी रक्त काढल्यापासून या प्रयोगशाळेत जमा करण्यासाठी ४ तासांपेक्षा जास्त वेळ लागणार असल्यास बर्फ असलेल्या थर्मास प्लास्कमध्ये न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळा, मुंबई येथे पाठवावी. प्लॅस्टिकची डबी पॉलीथीन पिशवीत पॅक करून नंतर बर्फात ठेवावी. डबीत पाणी शिरणार नाही याची खबरदारी घ्यावी.

गर्भ/मांस इत्यादी नमुने असल्यास छोटया निर्जंतुक केलेल्या प्लॅस्टिकच्या डब्यात घालून सदरचा डबा बर्फात ठेवून न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळा, मुंबई येथे पाठवावा. उपलब्ध असल्यास डब्यामध्ये ४ टक्के EDTA चे द्रावण टाकावे. Formalin अथवा इतर द्रावण डब्यात टाकू नये. Formalin टाकलेला नमुना DNA परीक्षणासाठी अयोग्य समजण्यात येईल.

**महत्त्वाचे :** रक्त नमुना घेण्यापूर्वी संबंधित व्यक्तीने किमान ४ महिने रक्तदान केलेले नाही याची खात्री करून घ्यावी व तसे संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांना सूचित करावे. रक्तदान (Transfusion) स्वीकारलेल्या व्यक्तीचे रक्त (D.N.A.) चाचणीसाठी अयोग्य असून सदर व्यक्तीचे रक्त, रक्तदान स्वीकारल्यानंतर ४ ते ६ महिन्यांनी घेण्यात यावे.

## ब्रेन मॅपींग टेस्ट
## (Polygraph Test)
## (असत्य शोधक चाचणी)

१) असत्य शोधक चाचणी ही बऱ्याचदा खोटं बोलणाऱ्या व्यक्तिचा शोध घेणारी चाचणी असे म्हणूनच ओळखली जाते. शरीरातील विविध भागांमध्ये/ वर विविध 'सेन्सर' चा वापर करुन हा प्रयोग वा ही चाचणी करण्यात येते. विविध शारिरीक/ भावनिक बदलांचा मागोवा हा त्यातून घेण्यात येतो. विविध परिणामे वा निकष हे त्यासाठी ठरवून देण्यात आलेली असतात. संबंधित व्यक्ती जर अशाप्रकारे चाचणी देत असेल तर त्या व्यक्तिच्या शरीरांतर्गतच्या हालचाली, बदल त्यांचा अभ्यास करण्यात येतो. प्रश्नांची उत्तरे देत असतांना त्या त्या व्यक्तीच्या भावनिक व परिणामी त्यांच्या तिच्या शरीरातील रासायनिक बदलांची दखल ही अत्यंत बारकाईने घेतली जाते. रक्तदाब किती वाढला, किती कमी झाला, हृदयाची धडधड किती वाढली, श्वासोच्छवास गती किती व कशी वाढली इत्यादी परिणामे ही त्यासाठी निश्चित करण्यात आलेली असतात. कित्येकवेळा शारीरिक दृश्य हालचालींचीही दखल ही घेण्यात येते, जसे की, हातवारे, पायांच्या हालचाली, असाही एक अनुभव आलेला आहे की, चाचणीस अनुसरण्यात येत असताना, त्यात काही असामान्य अशाही बाबी समोर येतील निदान वर नमूद केलेल्या काही बाबतींमध्ये तरी काही तसे प्रश्न उद्‌भवलेच तर.

२) ही चाचणी प्रशिक्षित व सुविद्य अशा/ उच्चविद्याविभूषित तज्ज्ञांद्वारे करण्यात आली पाहिजे. ही चाचणी ज्यांच्या देखरेखीखाली करण्यात येईल, त्यांच्यासाठी ही बाब अत्यंत महत्वाची असते की, त्यांनी हृदयगती ही प्रमाणित करण्यासाठीची चाचणी प्रभावित करण्यात आली पाहिजे. अगदी सामान्य व सत्य उत्तरालाही त्याद्वारे परिणाम हा दिसून आला पाहिजे. या उद्दिष्टांकरीता ही बाब आवश्यकच आहे. असे प्रश्न विचारण्यात यावेत की, जे अगदी निष्पत्ती वळणावरील असतील, आणि चौकशीस सामोरे जाणाऱ्या व्यक्तीला खोटं बोलण्यासाठीचे काही कारणच उरणार नाही. असे प्रश्न काही पुढीलप्रमाणे असू शकतात, जसे की, 'तुमचे नांव काय आहे', 'तुमचे वय आता किती आहे', 'तुमच्या वडिलांचे नाव काय?', 'तुम्ही कोठे राहतात?', 'तुमच्या/ तुझ्या पत्नीचे नाव काय?' अशाप्रकारचे प्रश्न हे प्रतिसाद मोजण्यासाठी फारच उपयुक्त ठरतील, त्यातून सर्व शारीरिक बारकाईने टिपले जातील आणि कोणत्या प्रश्नावर ती व्यक्ती व्यथित/ परावृत्त झाली/ निरुत्तर झाली याचाही शोध घेता

येतो.

३) ही चाचणी राज्य फॉरेन्सीक लॅबोरेटरी, कलिना, मुंबई येथे केली जाऊ शकते. ही चाचणी करण्याकरिता, संशयितास विनंती पत्र हे पाठविण्यात येणे आवश्यक ठरते, स्टेट फॉरेन्सिक लॅबोरेटरी यांना तपास अधिकारी व अंमल अधिकारी यांनी तशी विनंती ही केली पाहिजे, की ज्याची चाचणी ही करावयाची आहे प्रकरणाशी संबंधित सर्व वस्तुस्थिती, आणि तपासकामातील सर्व आवश्यक बाबींची पूर्तता आवश्यक ठरते. पूर्तता ही आवश्यक ठरते.

४) या चाचणीचा अहवाल हा न्यायालयात दखलपात्र असतो. मात्र तपास काही पूरक बाबीही आवश्यक ठरतात. ज्या कोणत्या अधिकाऱ्याने चाचणी केली त्याने त्यास पूरक म्हणून साक्षीदार पुरावे दिले पाहिजेत. आणि अशी चाचणी ही त्याने घेतली याचेही पुरावे द्यावेत.

## मेंदू ग्रंथीतील बदलांची चाचणी :

तपास वा चौकशी अधिकाऱ्याच्या कामामध्ये आणखी एक नवीन सहाय्यभूत ठरणारी अशी ही चाचणी असते. ''ब्रेन फिंगर प्रिंटिंग टेस्ट'' असे सुद्धा यास म्हटले जाते. यांमध्ये मेंदूमधील सर्व बदलांचा शोध हा घेण्यात येत असतो. मुलाखतकाराने त्या त्या व्यक्तीसमोर उभ्या केलेल्या प्रतिमा व आवाज/ध्वनी यांना मेंदूमध्ये नेमका काय व कसा प्रतिसाद मिळाला, याचे अचूक मोजमाप यात होत असते. ज्या काही पद्धतीने मेंदू हा क्षीप्त वा प्रतिक्षिप्त प्रतिक्रिया व्यक्त करीत असतो, की त्या व्यक्तीने खरोखरच अशा घटनेत वगैरे सहभाग हा नोंदविलेलला होता किंवा नाही. उदा. की जेव्हा व्यक्तीने प्रत्यक्षरित्या एखाद्या घटनेचे साक्षीदार म्हणून अनुभव हा घेतलेला आहे अथवा नाही. व्यक्तीचा मेंदू हा त्या त्या घटनेबाबतची अधिक माहिती ही वाचून ऐकून व टीव्ही वर बघून घेत असतो. तो अतिशय वेगळ्या पद्धतीने प्रतिक्रिया देत असतो. मुलाखतकाराची प्रतिक्रिया ही त्याच्या मेंदूतील रासायनिक व एकूणच भावनिक बदलातून कळत जात असते आणि त्या कोणत्याही नैसर्गिक वा अनैसर्गिक पद्धतीने दाबून टाकता येत नाहीत. जरी मुलाखत देणाऱ्यास तसे कांही करावेसे वाटले तरी तो तसे करु शकत नाही.

२) प्रशिक्षित व्यावसायिकांकडून केवळ अशी चाचणी ही घेण्यात येऊ शकते. आणि ती स्टेट फॉरेन्सिक लॅब्रोटरी, कलिना मुंबई यांच्याकडे उपलब्ध असेल वरील परिच्छेदात जो काही शिष्टाचार/ संकेत हा देण्यात आलेला आहे हा अतिशय कौशल्यपूर्वक या उपकरणाबाबत संमत करण्यात आला पाहिजे. ही गोष्ट फार महत्वाची आहे की, अशी चाचणी ही करीत असतांना कोणत्याही पोलिस अधिकाऱ्याने त्याठिकाणी उपस्थित राहण्याची गरजच नाही. तथापि अशी चाचणी घेणाऱ्या अधिकाऱ्यांनी चौकशी ही तर केलीच पाहिजे की, तो चौकशी वा तपास अधिकाऱ्यासमवेत राहून सहकार्य करावे. चाचणी ही घेतली जाण्यापूर्वी सक्षम अशा न्यायालयाची परवानगी ही घेण्यात यावी. न्यायालय हे अशी परवानगी तपास अधिकाऱ्याच्या अर्जावरुन देऊ शकते त्याकरीता संशयितांचे/ साक्षीदारांच्या हरकती बाजुला सारु शकतो.

३) चाचणी घेणारी तज्ज्ञ व्यक्ती ही वैशिष्ट्यपूर्णरित्या आगाऊ असे मत देऊ शकते की, अशी चाचणी ही यशस्वी झाली, वा कितपत यशस्वी/ अयशस्वी झाली वगैरे, जेणेकरुन तपास अधिकारी यास भरपूर सहकार्य लाभू शकेल. त्यांनी देखील सखोल असा अहवाल हा मागितला पाहिजे, आणि चाचणीची सीडी ही तज्ज्ञाकरवी मागवून घ्यावी. तज्ज्ञ व्यक्ती ही त्यास असे सर्व काही माहिती ही पुरवू शकते.

४) तपास अधिकाऱ्यांसाठी हा एक मार्गदर्शक असाच भाग असतो, ज्याद्वारे पुढील तपासकार्यात गती मिळत असते. तथापि, ही बाब अद्यापि मान्य करुन घेण्याजोगी नाही विशेषतः न्यायालयात की, संशयित आरोपाविरुद्धचा तो काही पुरावा वगैरे आहे त्यासाठीच ही बाब आवश्यक ठरते की, तपास अधिकाऱ्याने अधिकाधिक पुरावे हे संकलित करावेत, जे न्यायालयात मान्य करण्याजोगे/ होण्याजोगे असतील, ज्यावरुन दोषी व्यक्तीला शिक्षा ही

होऊ शकेल.

## अंमलीद्रव्य अंमला खालील चाचणी :

१) ह्या चाचणीमध्ये अशा गोष्टीचे प्रशासकीय सामर्थ्य असते की ज्यास आपण 'सत्य उजेडात आणणे' असेच म्हणू शकतो. याचेच रासायनिक नांव हे सोडियम पेन्थथोल असे आहे. एखाद्या तज्ज्ञाकरवी ही चाचणी करुन घेणे योग्य ठरते. भूलशास्त्रज्ञ यांच्या देखरेखीखाली व प्रत्यक्ष नियंत्रणाखाली ही चाचणी करण्यात आली पाहिजे. जेव्हा मुलाखतकार हा एका विशिष्ट अशा भूमिकेत शिरत असतो तेव्हा, किंवा जेव्हा तो मेंदूवर सद्सद्विवेक बुद्धीने वा जागेपणी असल्यागत नियंत्रण ठेवू शकत नसतो, तेव्हा प्रश्न विचारण्याची प्रक्रिया ही सुरू करण्यात आली पाहिजे. या अंमलीद्रव्याच्या अंमलाखालील व्यक्ती ही मग त्याच्यापुढे ठेवण्यात आलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी उत्सुक असतो. तो आपला विरोध रोखून ठेवूच शकत नाही. या चाचणीतील व मेंदूची चाचणी यांच्यामधील फरक हा असतो की, यात मुलाखत देणारा हा तोंडीच उत्तरे देत असतो आणि अशा काही प्रश्नांना उत्तरे देत असतो की, 'तुमच्या समवेत अन्य कोणी कोणी हे कृत्य केले, हा गुन्हा केला.' मालमत्तेची विल्हेवाट तुम्ही कुठे व कशाप्रकारे लावली'' 'तुम्ही हा गुन्हा कशाप्रकारे केला'? 'तुम्ही एकत्र कसे आलात'? इत्यादी ब्रेन ऑपिंग ही चाचणी दुसऱ्या बाजुला मेंदूमधील त्यातील रासायनिक क्रिया-अभिक्रिया यांचे चित्ररुप दाखवित असते. आणि त्या त्या व्यक्तीचे प्रयोगात्मक ज्ञान हे दर्शवित असते.

२) वरील चाचणी ही भूलतज्ञांकडून करण्यात येत असते. आणि कोणी तज्ज्ञ व्यक्ती ही देखरेख ठेवते आता ही चाचणी स्टेट फॉरेन्सिक लॅबोरेटरी, कलिना, मुंबई येथे ही उपलब्ध आहे. तपास अधिकारी किंवा अन्य जी कोणी अधिकारी व्यक्ती त्या प्रकरणाशी चांगल्यापैकी परिचित असेल, त्यांनी त्या मुलाखत देणाऱ्या व्यक्तिची साथसंगत केली पाहिजे आणि तज्ज्ञासमवेत पूर्व बैठकही घेतली पाहिजे, जेणेकरुन तो त्या प्रकरणाशी संबंधित आवश्यक बाबींचा परिचय करुन देईल. तज्ज्ञ व्यक्तीकरिता काही प्रश्नावली ही तयार करणे आवश्यक ठरते, त्यामुळे अशा चाचणीतून चांगल्यापैकी उत्तरे ही मिळू शकेल व त्याद्वारे प्रकरणाचा उलगडा होत जाईल. चाचणी घेतली जात असतांना पोलिस अधिकाऱ्याने तेथे हजर राहणे आवश्यक नाही. तज्ज्ञ व्यक्ती ही आधीच काही मते देऊ शकतीलही, आणि नंतर सविस्तर असा अहवालही देऊ शकतील, त्याचप्रमाणे चाचणीची सीडी ही जर तपास अधिकाऱ्यास आवश्यक असेल तर देऊ शकतील.

३) ही गोष्ट सुद्धा नमूद करणे तितकेच गरजेचे आहे की, संबंधित न्यायालयांची परवानगी मिळविणे हे आवश्यकच आहे. त्यातही पुन्हा निकाल हे मान्य करुन घेण्यासारखे नसतात आणि न्यायालयात ते कदाचित झिडकारलेही जाऊ शकतात. कारण ते शेवटी संशयिताचे जाबजबाब असतात, आणि ते केवळ तपास/ अन्वेषणालाच मदत करतात. अशाप्रकारची कोणतीही एक चाचणी ही न्यायालय परवानगी देईल तेव्हा करण्यात येत असते, तथापि, तसे काही प्रकरण हे आकारास आले पाहिजे. अशा अधारावर की, जी माहिती आधी कळालेली नव्हती, तपास अधिकाऱ्यास त्याबाबत कल्पना नव्हती, ती त्यांना आता कळली असेल, आणि आणखी काही चाचण्या करण्याची गरज भासत असते.

४) तपास अधिकारी हा झडती वा जप्ती घेण्यासाठी, पुराव्यांचे संकलन करण्यासाठी आपल्या चमूसह नेहमीच तयार असला पाहिजे. जर मुलाखत देणाऱ्या व्यक्तीकडून ह्या बाबी उघड झाल्या की, विशिष्ट अशी जागा की, जेथे पुराव्यांचे तुकड्या-तुकड्यांमधील अस्तित्व वा काही आक्षेपार्ह अशी कागदपत्रे दिसून येत आहेत, ती आढळली आहेत तर ते त्या चाचणीद्वारे शोधू शकतात.

## संगणकीय अंगुलीमुद्रा :

१) संगणकातून वा संगणकातील हार्ड डिस्क जप्त करण्यात आल्यानंतर त्यावरील सर्व डाटा (माहिती वा आकडेवारी)

ही पुन्हा मिळविण्यात आली पाहिजेत. तो सर्व डाटा मिळविण्यासाठीच कॉम्प्युटर फॉरेन्सिक उपयुक्त ठरते. संगणकातून डिलिट झालेल्या फाईल्स पुन्हा मिळविणे सुद्धा सहज शक्य आहे. जी एक गोष्ट सदासर्वकाळ लक्षात ठेवणे गरजेची आहे, ती म्हणजे संगणक हा जप्त केला जात असताना, आणि त्यांची डिस्क ही ताब्यात घेतली जात असतांना, प्रणाली वा सिस्टिम ही बदलती राहते, जेव्हा की ती यापूर्वी कधी वापरली गेली असेल. डिस्क तपासण्यात येण्याचा कोणताही प्रयत्न हा जसाच्या तसा, त्यामुळेच बचावकर्त्याकडून आव्हान देण्यात येऊ शकतो, जे असा युक्तिवाद करु शकतात की, त्या डिस्कवर बदल करण्यात आले.

२) त्यामुळेच ही बाब अगदी अनिवार्य ठरते की, अशी डिस्क ही फॉरेन्सिक लॅबकडे पाठविण्यात यावी, अगदी ज्या क्षणी ती ताब्यात घेऊन सील करण्यात आली त्या क्षणी प्रयोगशाळेत विशेष उपकरण हे वापरण्यात येते आणि एक असा प्रोग्रॅम की ज्यावरुन अन्य डिस्कवर दुसरी ही डिस्क दिसू शकेल, त्यासाठी डिस्क उघडण्याची गरज नसते. त्यामुळे तारीख बदलते. अशाप्रकारची मिरर डिस्क ही वाचण्यात येते, आणि वगळण्यात वा डिलिट करण्यात आलेल्या फाईल्स परत मिळविण्यात येतात.

३) न्यायालयात असा पुरावा हा मान्य करण्यात येण्याजोगा असतो आणि असा पुरावा हा न्यायालयात सिद्ध करण्याकरिता तज्ज्ञाकडून त्याची तपासणी होणे गरजेचे असते. स्टेट फॉरेन्सिक लॅब ही अशी चाचणी घेण्याकरिता सक्षम असते. वर म्हटल्याप्रमाणे तज्ज्ञ व्यक्तिस साक्षीदार म्हणून ग्राह्य धरण्यात येते आणि त्याची तपासणी ही त्याचा सल्ला वा मत न्यायालयात तपासण्यासाठी, बोलविण्यात येत असते.

वर इंग्रजीत नमूद करण्यात आलेले चाचणी संदर्भातील माहिती मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे स्थायी आदेश क्र. ९ दिनांक २४/०७/२००७ प्रमाणे नमूद करण्यात आलेली आहे.

## आवाजाची तपासणी – Voice Spectograph –

सर्वसामान्यत: मानवी आवाज बदलत नाही. या तत्त्वास अनुसरून मानवी आवाजाचे 'व्हाईस स्पेक्टोग्राफ' या उपकरणाद्वारे पृथ:क्करण केले असता प्रत्येक बोलणाऱ्याची वेगळी ओळख सिध्द करता येते. व्हाईस स्पेक्टोग्राफ यंत्र आवाजाच्या ऊर्जेचे इलेक्ट्रॉनिक पध्दतीने आलेख (प्रिंट) बनवते. प्रत्येक मनुष्याच्या आवाजाचा वेगवेगळा व्हाईसप्रिंट (आलेख) असतो. एखाद्या इसमाने टॉन्सिल, दात काढून आवाज बदलण्याचा प्रयत्न केला तरीही व्हाईस स्पेक्टोग्राफने त्याचा आवाज ओळखता येतो.

या विषयाचे तज्ज्ञ व्हाईस स्पेक्ट्रम तपासून त्याच माणसाचा आवाज आहे किंवा कसे हे सांगू शकतात. गुन्हेगारांनी टेलिफोन, मोबाईल फोनद्वारे केलेले गुन्हे (उदा.– पळवून नेणे, लाच, खंडणी, इ.) यामध्ये या तंत्राचा वापर केला जातो.

ज्यावेळी एखादी व्यक्ती फोन अगर मोबाइलचा गुन्हा करण्यासाठी वापर करते किंवा काही व्यक्ती व्यासपीठावरून आक्षेपार्ह विधाने करतात, त्यावेळी गुन्ह्यांतील आरोपीचे व व्यासपीठावरून वक्तव्य करणाऱ्या व्यक्तींचे संभाषण या तंत्राचा उपयोग करून रेकॉर्ड केले जाते. पुढे त्या आधारे अशा व्यक्तीच्या विरुध्द कायदेशीर कार्यवाही केली जाते. त्यावेळी आरोपीने संभाषण केले आहे हे सिध्द करण्यासाठी पुरावा गोळा करण्याची जबाबदारी तपासी अंमलदारावर येते. अशा वेळी पूर्वी रेकॉर्डिंग झालेले वादग्रस्त संभाषण त्यानेच केले आहे, हे तज्ज्ञांच्याकडून पडताळून पाहण्यासाठी संबंधित व्यक्तीच्या आवाजाचे नमुने पुन्हा रेकॉर्डिंगद्वारे गोळा करून त्याची तुलना या तंत्राच्या सहाय्याने केली जाऊन अभिप्राय दिला जातो.

## इंटर सेप्सन ऑफ टेलिफोन सेल
## (Indian Telegrame Act. Sec. 5)

फोन टॅपिंगमुळे गुन्हेगारांची हालचालीची आगाऊ इंत्थंभूत माहिती मिळते. मात्र त्यासाठी आवश्यक ती परवानगी घेणे गरजेचे आहे.

१) कोणत्याही सार्वजनिक आणिबाणीच्या प्रसंगी किंवा सार्वजनिक सुरक्षितता वगैरे लक्षात घेऊन वा ते स्वारस्य लक्षात घेऊन, केंद्र सरकार वा राज्य सरकार किंवा कोणताही अधिकारी जो याबाबतीत विशेष करुन अधिकारी, करण्यात आलेला आहे, जर त्याचें असे समाधान झाले की, ही बाब आवश्यकच आहे किंवा तातडीची गरज आहे की, तात्पुरता ताबा हा घेण्यात यावा, (जोपर्यंत की सार्वजनिक आणिबाणी ही अस्तित्वात असेल, किंवा सार्वजनिक सुरक्षेकरीता अशी कृती करणे आवश्यक आहे.) कोणतीही तार कायदा हा जेव्हा स्थापित होतो तेव्हा किंवा कोणत्याही व्यक्तीकडून की ज्यास या कायद्यांतर्गत परवानगी ही देण्यात आलेली आहे.

२) कोणत्याही सार्वजनिक आणिबाणीच्या प्रसंगी किंवा सार्वजनिक सुरक्षेच्या स्वारस्याखातर केंद्र सरकार किंवा राज्य सरकार किंवा अन्य कोणीही अधिकारी, जो यासाठी विशेषतः अधिकार प्रदान करण्यात आलेला आहे, केंद्र वा राज्य सरकारमार्फत, त्याचे जर असे समाधान झाले की, तसे करणे हे भारताच्या एकात्मता व अखंडतेसाठी आवश्यक आहे, राज्याची सुरक्षा, विदेशी राष्ट्रांशी मैत्रीपूर्ण संबंध, किंवा सार्वजनिक कायदा व सुव्यवस्था किंवा गुन्हा वा अपराध करण्याकरिता चिथावणी देण्याकामी प्रतिबंध करणे लेखी स्वरुपात कारणे लिहिली जाणे आदेशान्वये, असे निर्देश देतात की, कोणताही संदेश वा संदेशांचा वर्ग हा किंवा कोणत्याही व्यक्तीकडून किंवा संदेशांचा समूह वगैरे व्यक्तिंचा समूह वगैरे किंवा कोणत्याही विशिष्ट अशा विषयाशी संबंधित बाबी प्रसारित करण्यासाठी पुढे आणल्या जात असतील तर त्या मध्येच खंडित करुन ऐकल्या जाऊ शकतात किंवा एखादा अधिकारी हा त्याठिकाणी जसे की आदेशात नमूद करण्यात आलेला आहे.

तथापि, प्रसारमाध्यमांसाठीचे संदेश हे भारतातच प्रसिद्ध करण्यात आले पाहिजेत, अशा प्रतिनिधींचे की जे केंद्र सरकारमार्फत प्रभावित आहेत किंवा राज्य सरकारने त्यांना तसे ओळखपत्र दिलेले आहे. त्या संदेशांना खंडन करुन ऐकले जात नसते किंवा तसे करता येत नाही. जोपर्यंत की प्रसारण हे अशा प्रकारे प्रतिबंधित करण्यात येत नसते, या उपकलमांतर्गत.

## १. जीवशास्त्र/ रक्तजल शास्त्र विभाग :

## पोलीस अधिकाऱ्यांना महत्त्वाच्या सूचना :

खून, मारामारी, दरोडा, बलात्कार या सारख्या प्रकरणांच्या गुन्हे अन्वेषणात जैविक पदार्थांचे विश्लेषण फार महत्वाचे ठरते. अशा प्रकारच्या गुन्ह्यात रक्त, विर्य, लाळ, लघवी, विष्ठा, दूध यासारखे द्रव पदार्थ विशेषतः त्यांचे डाग तसेच केस, पेशीबंद लाकूड, वनस्पतीजन्य वस्तू इत्यादी अशा पदार्थांचे विश्लेशण आवश्यक ठरते. ते विश्लेषण जीवशास्त्र/ रक्त जलशास्त्र या विभागात केले जाते. या विभागात सामान्यतः खालीलप्रमाणे विश्लेषण करण्यात येते.

* अ) निरनिराळे जैविक पदार्थ किंवा त्यांचे मुद्देमालावर असलेले अवशेष/ डाग/ जखमी/बळी/ आरोपी यांचे कपडे व आरोपी कडील हत्यारे ) यांचे अस्तित्व तपासणे. उदा. रक्त/विर्य/लाळ/योनीस्राव/ इत्यादी.
* ब) सदर जैविक पदार्थ मानवी/प्राण्याचे आहेत किंवा कसे याबाबतचे विश्लेषण.
* क) मानवी जैविक द्रव पदार्थ अथवा त्यांचे डाग यांचे रक्त गट वर्गीकरण.
* ड) आरोपीचा गुन्ह्याशी संबंध प्रस्थापित करण्याकरिता केसांचे परीक्षण - (मानवी आहेत अगर कसे, शरीराच्या कोणत्या भागावरील आहेत, विशिष्ठ व्यक्तीचे आहेत का?)
* इ) पशुंची बेकायदेशीर केलेली हत्या, वन्य प्राणी संरक्षण कायद्याचे उल्लंघन करून केलेली पशुंची हत्या किंवा मासातील भेसळ अशा प्रकारच्या प्रकरणात मांसाचे/ रक्ताचे विश्लेषण.

* फ) मानवी केस, दात व रक्ताचे डाग यांचे डाग परीक्षण.

* ग) लाकडाचे तुलनात्मक विश्लेषण तसेच अपवादात्मक प्रसंगी घटनास्थळी आढळून आलेल्या वनस्पती, बिया वगैरेची गुन्ह्याच्या तपासात मदत होणे शक्य असल्यास त्याचे परीक्षण.

वरील प्रकारचा जैविक मुद्देमाल आपल्या कडील वातावरणामुळे लवकर खराब होण्याची शक्यता असते. हे लक्षात घेऊन, सदर गुन्ह्यात नीट काळजीपूर्वक सुरक्षित आणि शक्यतो लवकर न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेत पाठवावा. साधारणपणे रक्त तपासणीसाठी पाठविण्यात येणाऱ्या २५% प्रकरणात मुद्देमाल २ ते ४ आठवड्यात तसेच ४०% प्रकरणात मुद्देमाल १ ते ४ महिने इतका उशीरा पाठविण्यात येतो असे आढळून आले आहे. हा विलंब ऐ. बी. ओ. रक्त गट आणि विशेषतः इतर प्रगते रक्त गट तपासणीत हानीकारक असतो. तेव्हा अशा प्रकरणात मुद्देमाल त्वरीत प्रयोगशाळेत पाठविण्याची आवश्यकता आहे. कदाचित अशा प्रकरणात आरोपी किंवा संशयीत व्यक्ती यांचे कपडे/ हत्यारे इ. गोळा करण्यास विलंब होत असेल तर निदान मृतांचे/जखमींचे/ गुन्हास्थळावरील इतर वस्तू ताबडतोब पाठविण्यात याव्यात व इतर वस्तू मिळताक्षणी विनाविलंब प्रयोगशाळेत पाठविण्याची व्यवस्था करावी.

## मुद्देमाल गोळा करतांना तसेच तो प्रयोगशाळेत पाठविताना, येथे नमूद केल्याप्रमाणे खबरदारी घेण्यात यावी.

* १) रक्त अथवा इतर जैविक पदार्थांचे डाग असलेले कपडे, अथवा इतर मुद्देमाल सावलीत पूर्णतः वाळवून पाठवावी.

२) प्रत्येक मुद्देमाल कागदात/पाकीटातून अथवा इतर प्रकारे सुरक्षित वेगवेगळा बांधून पाठवावा. कपडे बांधताना अशी काळजी घ्यावी की त्यावरील रक्त नसलेल्या भागाचा, रक्त असलेल्या डागाशी संबंध येणार नाही. या करीता असा भाग स्वच्छ कागदाने झाकून नंतर घडी करणे योग्य राहील.

३) रक्त मिश्रित माती किंवा रक्त लागलेले गवत/दगड यावरील रक्त वाळवून मुद्देमाल कागदात/ पाकिटात घालून पाठवावा. तसेच त्या सोबत कंट्रोल म्हणून शक्य तितक्या जवळची रक्त विरहीत माती/ दगड/गवत पाठविणे आवश्यक असते.

४) फरशी/ भिंत/ सिमेंट टाईल्स/लाकडी अथवा इतर घर सामान यावरील वाळलेल्या रक्ताचे डाग स्वच्छ कापडाने पुसून/चाकूने खरवडून/खपल्या काढून किंवा शक्य असेल तर रक्त लागलेला भाग कापून/तोडून जशाचा तसा स्वच्छ डब्यात/ पुठ्ठ्याच्या खोक्यात किंवा कागदात गुंडाळून पाठवावा. सोबत क्र. ३ प्रमाणे त्याच जवळील रक्ताचा डाग नसलेल्या भागाचा नमुना कंट्रोल म्हणून पाठवावा.

५) गुन्ह्याच्या ठिकाणी रक्ताचे थारोळे साचलेले असेल तर, स्वच्छ कापडाचा तुकडा त्या थारोळ्यात बुडवून पूर्णतः, पाकीटात घालून पाठवावा. तसेच थारोळ्या जवळील भाग पाण्यात ओलसर केलेल्या त्याच प्रकारच्या कापडाने घासुन तो कापडाचा तुकडा, कंट्रोल म्हणून निराळ्या पाकिटात घालून पाठवावा.

६) एखाद्या प्रकरणात मांसाचा तुकडा प्रयोगशाळेत पाठविणे आवश्यक असल्यास तो मांसाचा तुकडा ताजा/ ओलसर असल्यास एका स्वच्छ काचेच्या बाटलीत घालून बाटली बर्फात ठेऊन, त्वरित प्रयोगशाळेत पाठविण्याची व्यवस्था करावी. ताबडतोब पाठविणे शक्य नसल्यास, मांसाच्या तुकड्याचे दोन भागात विभाजन करून, एक तुकडा पूर्णतः वाळवून व दुसरा तुकडा फॉरमल सलाईन १० फॉरमॅलीन मध्ये ०.९ ग्रॅम सोडीयम क्लोराईड) मध्ये बुडविलेल्या स्थितीत बाटलीत पाठवावा.

७) प्रयोगशाळेत पाठविण्यात येणारा मुद्देमाल वर नमूद केल्याप्रमाणे कागदात/ पाकिटात/बाटलीत घालून कागदाचे वेष्टन करून, कार्यालयीन सील लावून पाठवावा. तसेच त्यावर मुद्देमालाचे वर्णन करणारे लेबल लावून

अग्रेषण पत्रात त्या मुद्देमालाला दिलेला क्रमांक ठळकपणे लिहावा. मुद्देमाल असलेले पार्सल पूर्णतः सुरक्षित आहे याची खबरदारी घ्यावी.

## २. विषशास्त्र विभाग :

हा विभाग मनुष्यवध आणि आत्महत्येशी संबंधित विषप्रयोग प्रकरणांमध्ये वैद्यकीय प्रकरणांमध्ये वैद्यकीय अथवा पोलीस अधिकारी सादर करत असलेल्या व्हिसेरा स्टमक वॉश/ उलटी रक्त आणि इतर जैविक/ अजैविक पदार्थांचे त्यातील विष त्यात असल्यास ओळखण्याकरता परीक्षण करतात. गुन्हा दाखल करण्याचे काम यशस्वी होण्याकरता विषाच्या प्रमाणाचे पद्धतशीर विश्लेषण व मापन नित्यनेमाने केले जाते. प्राणी अथवा पक्ष्यांशी संबंधित गुन्हेगारी प्रकरणांमधील पुराव्यांदाखल सादर केल्या गेलेल्या वस्तुंचे (मुद्देमाल) परीक्षणदेखील हा विभाग करत असतो. समर्थनात्मक विश्लेषण अहवालांकरता एक्सिलरेटेड स्वॉल्व्हंट एक्स्ट्रॅक्टर, सॉलिड फेज एक्स्ट्रॅक्टर, गॅस क्रोमॅटोग्राफी, स्पेक्ट्रोफोटोमेट्री आणि हाय परफॉर्मन्स आणि हाय परफॉर्मन्स थिन लेयर क्रोमॅटोग्राफी विथ स्कॅनर यांसारख्या प्रगत उपकरणीय तंत्रांचा वापर केला जातो.

## पोलिस अधिकाऱ्यांना मार्गदर्शक सूचना :
## (विष शास्त्र विभाग, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, मुंबई – ९८)

१) पोलीस ठाण्याकडून येणाऱ्या प्रत्येक पत्रावर जावक क्रमांक, दिनांक, शिक्का, अ.म./गु.र.नं., मयताचे नांव, जिल्ह्याचे नांव लिहिलेले असावे.

२) पोलिस ठाण्याकडून येणाऱ्या प्रत्येक मुद्देमालावर लावलेल्या सिलचा नमुना पोलीस प्राधिकार पत्रावर (Police Authority Letter ) असावे. त्याशिवाय प्रकरण स्वीकारले जाणार नाही.

३) प्रत्येक व्हिसेरा, स्टमक वॉश, वांती, रक्त, लघवी वगैरे केसपेपर बरोबर पोलीस प्राधिकार पत्र असावे. या सोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणे प्राधिकार पत्र (Police Authority Letter ) असावे त्याशिवाय प्रकरण स्वीकारले जाणार नाही.

४) प्रत्येक प्रकरणासाठी वेगळा केसपेपर पाठवावा.

५) पोलीस प्राधिकार पत्रात मुद्देमालाचे सविस्तर वर्णन, हकिकत लिहावी, तसेच अ.मृ./गु.र.नं. किंवा ज्युरी रजि. नं. लिहिलेला असावा.

६) मुद्देमालाचा प्रत्येक नमुना (Exhibit) स्वतंत्रपणे बांधून त्यावर व्यवस्थित सील, लेबल, नांव, मुद्देमालाचे वर्णन, पोलीस स्टेशन अ.मृ./गु.र.नं. पी.एम.नं. मुद्देमाल या प्रयोगशाळेत दाखल केल्याचा अचूक दिनांक, मुद्देमालाचे व परिक्षणाचे स्वरूप यांचा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.

७) परिक्षणाचे स्वरुपाचा (कोणत्या तऱ्हेचे परिक्षण अपेक्षित आहे.) स्पष्ट उल्लेख केसपेपरमध्ये करण्यात यावा.

८) स्मरणपत्रामध्ये मयताचे नांव, पोलीस स्टेशन अ.मृ./गु.र.नं. पी.एम.नं. मुद्देमाल या प्रयोगशाळेत दाखल केल्याचा अचूक दिनांक, मुद्देमालाचे व परीक्षणाचे स्वरुप यांचा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.

९) व्हिसेरा, वांती, रक्त, लघवी, स्टमक वॉश या सारखा जैविक मुद्देमाल परिक्षणानंतर परत केला जात नाही. या व्यतिरिक्त इतर अजैविक मुद्देमाल अहवाल मिळाल्यापासून १५ दिवसात घेवून जाण्याची व्यवस्था करावी. जागेअभावी तपासणी झालेला मुद्देमाल साठवून ठेवणे फारच अडचणीचे होत असल्यामुळे अहवाल प्राप्त होताच अजैविक मुद्देमाल परत घेवून जाणे.

१०) व्हिसेरा, वांती, रक्त, लघवी, स्टमक वॉश इत्यादींचा परीक्षण अहवाल संबंधित वैद्यकिय अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात येतो व त्याची प्रत आपल्या पोलीस ठाण्यास पाठविण्यात येते. तसेच पोलीसांकडून दाखल अजैविक

मुद्देमालाचा अहवाल फक्त पोलीस ठाण्याकडेच पाठविण्यात येतो.

११) गुन्हा स्थळास (Scene of Crime) लवकरात लवकर भेट देवून तेथे शास्त्रीय व इतर परीक्षणाच्या दृष्टीने उपयुक्त वस्तु/मुद्देमाल काळजीपूर्वक गोळा करावा. वर उल्लेख केल्याप्रमाणे प्रत्येक नमुना स्वतंत्रपणे सिलबंद करुन परीक्षणासाठी शक्य तेवढ्या लवकर प्रयोगशाळेत दाखल करावा.

१२) गुन्ह्याच्या ठिकाणी मिळून आलेला मुद्देमाल उल्टी (Vomit) उलटी/वांती मिश्रित माती (Vomit mixed with earth) तोंडातील फेस, लघवी, रक्त नमुना, माती इत्यादी वेगवेगळे व्यवस्थितपेण सिलबंद करून त्यावर वरीलप्रमाणे लेबल लावून ठेवावे.

१३) गोळा केलेले कंट्रोल नमुने (Control Samples) इतर मुद्देमालाबरोबर मिसळले जाणार नाहीत. अशा तऱ्हेने मुद्देमाल सिलबंद करण्याची दक्षता घेण्यात यावी.

१४) व्हिसेरा, वांती, रक्त, लघवी, स्टमक वॉश इत्यादि विहित नमुन्यातील पूर्णपणे भरलेल्या फॉर्म (व्हिसेरासाठी – Form CM 23 m & CM 23 e )न्या. वै. २३ म. व इ. आणि वांती, रक्त, लघवी, स्टमक वॉश, अजैविक मुद्देमालासाठी Form CM 24 m & CM 24 e) न्या. वै. २४ म. आणि इ.) मध्ये वैद्यकीय/ पोलीस अधिकाऱ्यांनी भरून पाठविले तरच स्वीकारले जातात.

१५) खाजगी डॉक्टरांकडून आलेली प्रकरणे थेट स्वीकारली जात नाहीत. अशी प्रकरणे पोलिसांनी स्वतःकडे दाखल करुन घेवून नंतर पोलीस स्टेशनच्या सिलने व पत्रासह परीक्षणासाठी प्रयोगशाळेत दाखल करावीत.

१६) विंचू चावलेल्या, कुत्रा चावलेल्या, उंदीर चावलेल्या केसेस थेटपणे हाफकिन इन्स्टिटयूट परेल, मुंबई – ४०० ०१२ यांचेकडे मयताच्या मेंदूच्या नमुन्यासह दाखल कराव्यात.

१७) व्हिसेरा रिपोर्ट विहीत कालावधीत प्राप्त झाला नाही तर तपासणी अंमलदारांनी प्रथम संबंधित वैद्यकिय अधिकाऱ्याकडे चौकशी करावी, त्यानंतर प्रयोगशाळेकडे प्रकरणाच्या सद्यः स्थितीबद्धल माहिती घ्यावी व त्यानंतरच वरिष्ठांना/ शासनास आपला अहवाल सादर करावा. कारण काही पोलीस अधिकाऱ्यांनी काही प्रकरणामध्ये शासनास असत्य माहिती सादर केल्याचे निदर्शनास आले आहे. ही अतिशय गंभीर बाब असल्यामुळे या सूचनेचे काटेकोपणे पालन करण्यात यावे.

१८) सर्पदंशाची प्रकरणे संबंधित प्रयोगशाळेकडे दाखल करण्यात यावीत. अन्नविषबाधेची (Bacteriological Food Poisoning Cases) प्रकरणे फक्त मुंबई प्रयोगशाळेतच तपासली जातात.

१९) सर्पदंश प्रकरणामध्ये सर्पविष विश्लेषणासाठी व्हिसेरा पाठवू नये. त्याऐवजी रक्त व सर्पदंश झालेल्या ठिकाणची कातडी पाठविणे आवश्यक आहे. चामडीचे कंट्रोल सँपलही वेगळे पाठविण्यात यावे. ज्या प्रकरणामध्ये रक्त व कातडी राखून ठेवली नसेल अशा प्रकरणामध्ये अन्य विषबाधेचा संशय असेल तरच अशी प्रकरणे प्रयोगशाळेकडे रासायनिक विष परीक्षणासाठी पाठविण्यात यावीत.

## ३. दारूबंदी विभाग :

मुंबई दारूबंदी कायद्यांतर्गत जवळ बाळगण्याच्या गुन्हे प्रकरणांमधील अवैध दारू/ वॉश देशी दारू परदेशी दारू इ. च्या नमुन्यांमध्ये आढळलेले अल्कोहोलचे प्रमाण तपासणे आणि मोटार वाहन कायद्यांतर्गत दारू पिऊन भरधाव वाहन चालवण्यासारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये तसेच भारतीय दंड विधान कलम ३०२, ३०७, ३०४ अंतर्गत गुन्ह्यांमधील रक्तातील अल्कोहोलचे प्रमाण तपासून सविस्तर अहवाल सादर करणे या सर्व गोष्टी या विभागामार्फत केल्या जातात. अल्कोहोलची उत्पादनशुल्काच्या कामकाजाकरता परीक्षा करण्याचे काम डेन्सिटोमीटर या उपकरणाच्या साह्याने केले जाते.

या विभागात देशी दारू, गावठी दारू, बिअर, वाईन, व्हिस्की, व्होडका, ताडी, गावठी दारू बनविण्यासाठी

वापरण्यात येणारा काळा गुळ, नवसागर इत्यादी रसायने विना परवाना ताब्यात बाळगणे, विक्री करणे वा उत्पादित करणे, असे नमुने राज्य उत्पादन शुल्क व पोलिस विभागाकडून सील, लेबल करून प्रपत्रासह या विभागात दाखल केले जातात.

त्याचप्रमाणे मद्य (अल्कोहोल) वापरुन उत्पादित केलेली औषधे, सौंदर्य प्रसाधने व दारु व्हिस्की, ब्रॅन्डी, रम, व्होडका, जीन, बिअर इत्यादी यातील मद्याची (अल्कोहोलची) टक्केवारी शोधली जाते. त्यामुळे कंपन्यांकडून योग्य उत्पादन शुल्क आकारले जाण्यास शासनास मदत होते.

तसेच मद्य प्राशन केलेल्या वाहन चालकांच्या रक्ताची चाचणी केली जाते. त्यामुळे सरकारला न्याय-निवाडा करण्यास मदत होते.

१) रक्त मद्यार्क चाचणी करण्यासाठी मुंबई प्रोहिबीशन ॲक्ट (मुंबई मद्य विरोधी कायदा) अनुसार पाच मिली रक्त पाठविणे आवश्यक आहे. (मद्य) टक्केवारी शोधण्यासाठी दोन पद्धतींचा वापर केला जातो.

१) रासायनिक पद्धत.

२) हेड स्पेय जी.सी. (Vomit)

२) रक्तामध्ये असणाऱ्या मद्याची (अल्कोहोलाची) मर्यादा ५०मिली/१०० मिली व मोटार वाहन कायद्यानुसार रक्तामध्ये असणाऱ्या मद्यार्काची मर्यादा ३० मिली/१०० मिली इतकी आहे. मर्यादेपेक्षा जास्त मद्यार्क प्रमाण आढळून आल्यास ती व्यक्ती शिक्षेस पात्र होते.

३) मद्यार्क परिक्षणासाठी Densitometer, headspace Gas-Chromatography, alcolyser, refratometer, etc. उपकरणाचा वापर केला जातो.

## ४. क्षेपणास्त्र विभाग

हा विभाग सर्वसाधारण आणि गावठी बंदुका (कट्टा) व रिव्हॉल्व्हर पिस्टल, एसॉल्ट, रायफल कार्बाईन आणि दारूगोळ्यासारख्या घातक अग्निशस्त्रांचे परीक्षण करतो. गुन्हेस्थळावर सापडलेल्या बंदुकीतून फायर केलेल्या गोळ्यांवरील चरे आणि फायर केलेल्या काडतुसांच्या पुंगळ्यांवरील फायरिंग पिनचे ठसे व चाचणी फायर केलेल्या गोळ्यांवरील चरे आणि फायर केलेल्या काडतुसांच्या पुंगळ्यांवरील फायरींगचे पिनचे ठसे यांचे तुलनात्मक परीक्षण करण्याकरता एक सुक्ष्मदर्शक यंत्र वापरले जाते. फायर केलेल्या दारूगोळ्यांचे अंश कपडे/त्वचा/खिडकीच्या काचा इ. ना गोळीमुळे पडलेली छिद्रे आणि हत्या वा सशस्त्र हल्ल्यांच्या प्रकरणांमध्ये फायर केलेल्या गोळ्यांनी पार केलेले अंतर अशा गोष्टींचे परीक्षण देखील हा विभाग करतो. तसेच हत्यांर कायद्यांतर्गत जवळ बाळगलेल्या स्फोटके परीक्षणही या विभागाद्वारे केले जाते. गुन्हेस्थळावरून जप्त केलेल्या काडतुसांच्या पुंगळ्या व गोळ्यांवरील खुणांच्या प्रतिमांचा राष्ट्रीय स्तरावरील माहितीसाठी तयार करण्याच्या कामी या विभागातील इंटिग्रेटेड बॅलिस्टिक आयडेन्टिफिकेशन सिस्टिमचा उपयोग केला जातो. गोळ्या व काडतुसांच्या पुंगळ्यांच्या डिजिटल प्रतिमांची तुलना करण्याकरता या विभागाकडे एक खास हार्डवेअर व सॉफ्टवेअर संच आहे.

**महत्त्वाचा मुद्देमाल :**

**१. हत्यार किंवा शस्त्र :**

बंदूक, रायफल एसएलआर (ए के ४७ - रशियन किंवा ए के ५६ - चायनिज इ. ) कारबाईन, पिस्तोल, रिव्हाल्व्हर, गावठी कट्टा, शॉट गन, एअर गन, मझल लोडर गन, मशिन गन, सिंगल/डबर बॅरल रायफल इ. हत्यारांवर बोटाचे ठसे, पावडरचे कण असू शकतात तसेच आत काडतूस सुद्धा असू शकतात त्यामुळे हत्यार वापरतांना काळजी घ्या, तज्ञांची मदत घ्या. वापरलेल्या अग्निशस्त्राची नळी/बॅरल साफ करू नका किंवा नळीत काहीही कोंबू नका. नळीला कॅपिंग करा. नळी/हत्यार मऊ कापडाने गुंडाळून संरक्षित करा.

२. जिवंत काडतूस (कार्ट्रिज) :

प्रत्येक अग्निशास्त्रासाठी काडतूस आवश्यक असतेच. जसे, १२ बोअरची बंदूक, पिस्तोल/रिव्हॉल्व्हर/ रायफल इ. हे निकेल–कॉपरचे जॅकेटसह किंवा एनॅमल सह असू शकते. कॅपवर वर्ष /अक्षरे इ. असतात.

**३. काडतुसाची पुंगळी/वापरलेले काडतूस/परक्यूसन कॅप.**

काडतुस परक्यूसन कॅप फायर केल्याने कॅपवर फायरिंग पिन चा ठसा उठतो व इतरही खुणा उठतात. कॅपमध्ये ठिणगी उत्पन्न करण्यासाठी स्फोटक प्रायमिंग मिश्रण असते. हत्यारातून गोळी झाडल्यावर काडतुसाची पुंगळी बाहेर फेकली जाते तेव्हा तिचेवर इजेक्टर/एक्सट्रॅक्टर इ. च्या खुणा उठतात. गोळी झाडतांना कोणते शस्त्र वापरले हे ठरवितांना ह्या ठशांचा व खुणांचा हत्यार ओळखण्यासाठी व तुलनात्मक परीक्षणासाठी खूप उपयोग होतो.

**४. बुलेटस् /आयर्न कोर/बंदुकीच्या गोळ्या :**

बुलेट बॅरलमधून वेगाने बाहेर पडतांना अग्निशास्त्राचा बॅरेल (नळी)शी घासली जाते व त्यावर बॅरल मधील लँडस् ग्रुव्हज यांच्या घासल्याच्या खुणा (स्ट्रिएशन्स) उठतात. यांची तुलना फिंगर प्रिंट – अंगुली मुद्रांशी केली जाते कारण वेगवेगळ्या हत्याराने वेगवेगळ्या खुणा तयार होतात. गोळी झाडलेले अग्निशस्त्र ओळखण्यासाठी व तुलनात्मक परीक्षणासाठी जखमी/मयत यांचे शरीरातून किंवा गुन्हास्थळावर मिळालेल्या बुलेटस्/बंदुकीच्या गोळ्या आयर्न कोर इ. चा खूप मोठा उपयोग होतो.

**५. शिस्याचे छर्रे/लेड पॅलेटस् बॉल्स इ. –**

बंदुकीतून फायरींग केल्यावर काडतूस मधील बॅडस् बाजूला फेकले जातात व आतील छर्रे वेगाने पुढे तसेच पसरत जातात.

६. प्रोपेलन्ट –

हे बुलेट/गोळी झाडण्यासाठी काडतुसमध्ये वापरण्यात येणारे संवेदनशील स्फोटकांचे मिश्रण असते. त्याच्या जळण्याने प्रचंड वायू/दाब तयार होऊन बुलेट गोळी किंवा छर्रे वेगाने बाहेर फेकले जातात. प्रोपेलंट म्हणून ब्लॅक पावडर/गन पावडर, स्मोकलेस पावडरचा वापर केला जातो.

**७. परिक्षणासाठी जप्त करावयाचे नमुने /मुद्देमाल**

१) गुन्हास्थळावर सांपडलेले अग्निशास्त्र (गावठी कटा, पिस्तोल, रिव्हॉल्व्हर), काडतुसाच्या रिकाम्या पुंगळ्या, परक्युशन कॅप, बुलेटचे – शिस्याचे बारीक तुकडे छर्रे, वॅडस् इत्यादी.

२) संशयित/आरोपीचे ताब्यातून/घरातून जप्त केलेले अग्निशस्त्र (गावठी कट्टा, पिस्तोल, रिव्हॉल्व्हर, रायफल, बंदूक), काडतूसे

३) फायरिंगचे – रक्ताचे डाग असलेले छिद्र पडलेले जखमी/मयत यांचे कपडे.

४) वैद्यकीय अधिकारी यांनी संशयित – आरोपीचे हात पुसून घेतलेले कापसाचे बोळे.

५) जखमी/मयत यांच्या शरीरावर बुलेट/छर्रे लागलेल्या भागाचे एक्स् रे फोटो.

६) जखमी/मयत यांचे शरीरातून काढलेल्या बुलेटस्/छर्रे व त्यांचे तुकडे.

७) जखमी/मयत याचे नमुना रक्त.

८) सुरक्षितपणे पॅक केलेली बुलेट लागलेल्या खिडकीची छिद्र पडलेली कांच, पत्रा.

९) बुलेट/छर्रे लागलेल्या ठिकाणचे काळपट डाग पुसून घेतलेले कापसांचे बोळे.

## ५. सामान्य विश्लेषण विभाग

या विभागात पेट्रोलजन्य पदार्थामधील भेसळ, सिमेंट मधील भेसळ व कॉंक्रीट तपासणी, मिरची पावडर

परिक्षण, फसवणूक किंवा चोरीच्या गुन्ह्यातील दागीने (सोने, चांदी, तांबे इ.) चे परीक्षण ऑथोगिक रसायने, अनओळखी रसायने व त्यांचे ॲशाचे परिक्षण, स्फोटके गुंगीकारक पद्धतीचे परीक्षण, रंगाचे परीक्षण, तंतुचे परीक्षण, इलेक्ट्रीक शॉक, ॲसिडचे परिक्षण, हुंडाबळी प्रकरणातील जाळणे किंवा आत्महत्या चा संदर्भातील परिक्षण व तसेच वेगवेगळ्या गुन्ह्यातील तुलनात्मक परिक्षण करण्याचे कार्य आधुनिक उपकरणाच्या साह्याने (HPLC, GLC, UV, HPTLC, GCMS, IR, ED-XRF इ.)विश्लेषण केले जाते.

## अ. अंमली/मादक पदार्थ (नार्कोटीक ड्रग्ज)

अंमली/मादक पदार्थांची तपासणी सामान्य विश्लेषण व उप. विभागातील अंमली पदार्थ विभागात केली जाते. ज्या पदार्थांच्या सेवनाने मनोव्यापारावर परिणाम हातो त्यांना मादक पदार्थ म्हणतात. उदा. गांजा, चुरस, सिंथेटीक, कॅनॅबीज स्पाईस, के२, अफीम, मॉर्फिन, ब्राऊन शुगर, कोकेन, एलएसडी, एक्स्टॉसी, ॲम्फेटॅमाईन इ. एन.डी.पी. एस. ॲक्ट, १९८५ (दि नार्कोटिज ड्रग्ज ॲण्ड सायकोट्रॉपिक रेग्युलेशनसह)/मादक औषधे व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थांबाबतचा कायदा – १९८५ अमेंडमेड १९८६ इ. कायदे मादक पदार्थांसबंधी कारवाई करण्यासाठी अस्तित्वात आहेत.

### ब. चरस, गांजा, भांग

कॅनाबिज सटायवा (मारीज्युआना हेम्प, गांजा) ही वनस्पती (झाड, झुडूप) १०,००० वर्षांपासून अस्तित्वात असल्याचे म्हटले जाते. यास प्रचलितपणे गांजाचे झाड म्हणून संबोधिले जाते. दुखण्यापासून आराम वाटणे, जखमा न जाणवणे, गुंगी येणे असे बरेच औषधी गुणधर्म यांमध्ये आहेत. गांजाचे झाडाची उंची साधारणपणे दहा फुटापर्यंत असते. याचे फांद्यांना ५ ते ९ कंगुरेदार पाने असतात. हे एकच झाड चरस, गांजा व भांग या मादक पदार्थांचे मुख्य स्थान आहे.

**गांजा** : गांजाचे झाडाचे फुलांसहीत शेंडे, बिया व पाने यांना एकत्रितपणे गांजा म्हटले जाते.

**चरस/हशिय** : गांजाचे स्त्री जातीय झाडाची पूर्ण वाढ झाल्यावर त्याची पाने व फुलांचे शेंडे यापासून जो चिक/चिकट पदार्थ काढला जातो. चरस असे म्हणतात. याचा रंग काळपट व वास उग्र असतो.

**भांग** : गांजाचे झाडाचे फांद्याचे लहान-लहान/बारीक-बारीक, तुकडे, काड्या व काही पाने यासं भांग म्हणतात.

### क. परिक्षणासाठी जप्त करावयाचा मुद्देमाल

१) वनस्पतीजन्य पदार्थ (गाजांची पाने, फुले, बिया चोळलेले मिश्रण इ.)

२) काळपट चिकट पदार्थ (कांड्या, बिस्किट, गोळ्या इ.)

३) मुळांना लागलेल्या मातीसह गांजाची झाडे

४) गांजाची झाडे उपटून काढली त्या ठिकाणाजवळील नमुना माती

५) गांजा ओढण्यासाठी वापरली जाणारी चिलीम, हुक्का व इतर साहित्य.

६) विड्या, सिगारेट व त्यांची अर्धवट जळालेली थोटके.

७) एनडीपीएस ॲक्ट मधील गुन्ह्यातील मुद्देमाल पाठवितांना कमीत कमी २४ ग्रॅम इतका असावा व तो ७२ तासांचा आत पाठविण्यात यावा.

### ड. अफिम (ओपिएट्स) मॉर्फिन इ. मादक पदार्थ

मॉर्फिन हा नैसर्गिक अंमली पदार्थ आहे. वेदना कमी करणे- थांबविणे व गुंगी आणणे हे याचे प्रमुख गुणधर्म. जागतिक युद्धांमध्ये याचा मोठ्या वापर झाला. मार्फिन हे अफूचे झाड (पॅपॅव्हर सोम्नीफेरम) यांना येणाऱ्या बोंडांपासून मिळविले जाते. या झाडाची पूर्ण वाढ झाल्यावर त्याला मोहक अशी फुले येतात व नंतर त्याची बोंड

तयार होतात. हीच अफूची बोंडे होय.

इ. **हिरॉईन – ब्राऊन शुगर – गर्द**

हिरॉईन किंवा ब्राऊन शुगर किंवा गर्द हा अंमली पदार्थ निसर्गतः मिळून येत नाही. यांचे रासायनिक नाव डाय ॲसिटील मॉर्फिन आहे. प्रयोगशाळेत मॉर्फिन या मादक पदार्थांची ॲसिटीक अनहायड्राईड सारख्या पदार्थासोबत प्रक्रिया करून हिरॉईन तयार केली जाते. अफुचे झाडाचा चिक–अफीम–ओपियम हे हिरॉईन तयार करण्यासाठी जसेच्या तसे वापरल्यास अशुद्ध (क्रूड) हिरॉईन मिळते व त्याचा रंग ब्राऊन असल्याने त्यास ब्राऊन शुगर म्हणतात. यात खूप कमी प्रमाणात मॉर्फिनसह ऑपियमचे इतर सर्व घटक पदार्थसुद्धा असतात. याचे वेदनाशामक, गुंगीकारक तसेच इतरही अनेक वैद्यकीय औषधी उपयोग आहेत. यापासून शुद्ध हिरॉईन वेगळ कसे असतात. अवैधरित्या क्लँडेस्टीन प्रयोगशाळांमध्ये अफीम पासून हिरॉईन तयार केले जाते. हिरॉईन हा अत्यंत प्रभावीपणे कृत्रिमरित्या तयार केलेला अंमली पदार्थ असून मार्फिनपेक्षा याचा परिणाम लगेच होतो. जादा नफा मिळविण्यासाठी ब्राऊन शुगर कट केले जाते. म्हणजेच त्यामध्ये कॅफिन लॅक्टोज ॲम्फेटॅमाईन इ. स्वस्त पदार्थ मिसळले जातात व वजन वाढविले जाते. काचेच्या प्लॅस्टिकच्या लहान कुप्या बाटल्यांमधून छोट्या पुड्यांमधून याची अवैध विक्री केली जाते.

ई. **परीक्षणासाठी जप्त करावयाचे नमुने**

१) पावडरचे नमुने, पावडर ठेवेल्या कुप्या (ॲम्पुल्स–व्हायल्स्) पावडरच्या पुड्या.

२) अफूचे बोंड

३) मुळांना असलेल्या मातीसह अफूची झाडे.

४) अफूची झाडे उपटून काढली त्या ठिकाणाजवळील नमुना माती.

५) इंजेक्शन, सिल्व्हर फॉईल रसायने इ.

# स्फोटके

## स्फोटाच्या ठिकाणी मिळणाऱ्या अवशेषांचे परीक्षण

स्फोटकांचा वापर हा काहीतरी गैरकृत्य करण्याच्या व जीवितहानी व वित्तहानी करण्याच्या दृष्टीने फार वर्षांपासून केला जातो. बाजारात मिळणारे स्फोटकांचे मिश्रण किंवा सैन्यदल, कारखाने आदी मध्ये वापरणारी स्फोटके यांच्यापासून देशी पद्धतीने गावठी बॉम्ब तयार करणे इदत्यादी बाबी तशा भारतात अपरिचित नाही. अलीकडच्या काळात अतिरेकी कारवाया वाढल्या आहेत. ते नेहमी लुटालूट, जाळपोळ, निरपराध व्यक्तींची हत्या महत्वाच्या व्यक्तींची हत्या इत्यादी कृत्य करीत असतात. किंवा तशा प्रयत्नात असतात. त्यामुळे कायदा राबविणाऱ्या यंत्रणेत स्फोटकांची माहिती आवश्यक आहे. जेणेकरून ते नागरिकांची जीवित व वित्तहानी सार्वजनिक मालमत्ता महत्त्वाची स्थळे, इमारती व्यक्तींचे प्राण इत्यादीचे संरक्षणासाठी योग्य पावले उचलून गुन्हेगारांवर कारवाई करू शकतात.

स्फोटके म्हणजे असा कोणताही घन, द्रव्य किंवा वायुरुपातील पदार्थ की, ज्याच्या तपमानात वाढ केली असता तो पदार्थ आपल्या भोवती अचानक दाब निर्माण करतो. हा दाब स्फोट पदार्थांचे वायुरुपात बदल झाल्यामुळे होतो. त्यावेळी अतिशीघ्र अशी रासायनिक डिकंपोझिशनची प्रक्रिया होते आणि या उष्मा निर्माण करणाऱ्या रासायनिक प्रक्रियेमुळे मोठ्या प्रमाणात निर्माण तपमान वाढते.

स्फोट म्हणजे हवेतील ऑक्सिजनच्या अनुपस्थितीत होणारी अतिशीघ्र ज्वलन प्रक्रिया होय. स्फोटक पदार्थ शीघ्र गतीने संघटीत होऊन मोठ्या प्रमाणात वायू निर्माण होतो. या वायू निर्मितीचा वेग सुमारे तीन ते तीनशे

मीटर प्रति सेंकद असतो. या वायुनिर्मितीबरोबर मोठ्या प्रमाणात ऊर्जा, प्रकाशझोत व आवाजसुद्धा निर्माण होतो. चांगला स्फोट होण्यासाठी स्फोटके एखाद्या वस्तुमध्ये मर्यादित (शोभेची दारू, फटाके इत्यादी) केली जातात. उदा. गन पावडर.

डिटोनेशन म्हणजे शीघ्रगतीने स्फोटकांच्या रेणूचे विघटन होणे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात विध्वसंक शक्ती निर्माण होते. डिटोनेशनमुळे ऊर्जा, आवाज, अल्पवधीचा प्रकाशझोत निर्माण होतो. डिटोनेशवर एखाद्या वस्तुमध्ये मर्यादित करणे इत्यादीसारख्या बाह्य घटकांचा परिणाम होत नाही. डिटोनेशन प्रक्रियेचा वेग दर सेकंदाला ३००० ते ८००० मीटर इतका असतो. उदा. टी.एन.टी जेलीग्राईट इत्यादी.

स्फोटकांचे प्रामुख्याने दोन प्रकार पडतात.

१) **कमी शक्तीची स्फोटके** – या स्फोटकांचा फक्त स्फोट होतो. यामध्ये डिटोनेशन क्रिया होत नाही. कमी शक्तीच्या स्फोटकांचा स्फोट होण्यासाठी उर्जा, प्रकाशझोत किंवा घर्षणाची आवश्यकता असते.

२) **जादा शक्तीची स्फोटके** – यामध्ये डिटोनेशनची प्रक्रिया होत असते. अशा प्रकारचे स्फोट होण्यासाठी सर्वप्रथम डिटोनेशन तरंगाची आवश्यकता असते. त्यांचे खालील भाग पडतात. (१) इनिशिएटर, (२) इंटर मीडिअरी, (३) ब्लास्टींग चार्जेस, (४) डॅमोलीशन स्फोटके.

## अ. बीडीडिएस – बॉंब डिटेक्शन अँड डिस्पोजल स्क्वॉड

(बॉब शोधक व नाशक पथक) : गुन्हे तपास करतांना स्वतःहून कोणतीही जिवंत स्फोटके हाताळू नका. त्यासाठी बॉंब शोधक व नाशक पथक यांना तसेच स्फोटक तज्ञांना पाचारण करा. प्रत्येक जिल्ह्याचा ठिकाणी बी डिडीएस असते. जिवंत स्फोटके, बॉंब, आयईडीइ. चा शोध घेणे, हाताळणे व नाश करणे यासाठी यांना उच्चस्तरीय प्रशिक्षण देऊन त्यात निष्णात केलेले असते. बॉंब किंवा स्फोटकाचा नाश करण्यासाठी बॉंब नाशक यंत्रणेचा वापर केला जातो.

## ब. जिवंत स्फोटके

न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेत तपासणीसाठी जिवंत स्फोटके स्विकारली जात नाहीत. एखाद्या ठिकाणी जिवंत स्फोटके असल्याचे वाटल्यास त्यांना स्पर्श करू नये किंवा ती हाताळू नयेत. ती अत्यंत धोकादायक असते. तो भाग त्वरीत संरक्षीत करावा व बीडिडीएस बॉंब शोधक व नाशक पथक बोलवावे. गुन्हास्थळाचे ते अवलोकन करतील तसेच श्वासन पथक व स्फोटके शोधण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या उपकरणांचा वापर करून स्फोटकांचा शोध घेतील. जिवंत स्फोटकांचा त्यांनी नाश केल्यानंतर त्यात वापरलेल्या स्फोटकांची तपासणी करण्यासाठी ती इतर नमुन्यांसोबत प्रयोगशाळेत दाखल करावेत. त्यासोबत स्फोट झाल्यावर जप्त केलेला इतर मुद्देमाल (खिळे, ढिगाऱ्याचा थोडास भाग, पसरलेले डिटोनेटरचे तुकडे इ.) सुद्धा स्फोटाचे अस्तित्व तपासणीसाठी काळजीपूर्वक दाखल करावेत.

स्फोट झालेल्या ठिकाणावरून जप्त केलेल्या नमुन्यांच्या तपासणीमध्ये नायट्राईट व नायट्रेट चे अस्तित्व अत्यंत मोलाचे ठरते.

तपासणीसाठी जप्त/दाखल करावयाच्या मुद्देमाल

१) गुन्हेस्थळावर असलेले स्फोटक पदार्थ, पावडर व संशयास्पद वस्तू इत्यादी.

२) गुन्ह्याच्या केंद्रस्थळावरील मधील माती.

३) गुन्हे स्थळावरील ढिगाऱ्यातील मिश्रण

४) गुन्हेस्थळावरील तुटलेल्या दरवाज्यांचे/खिडक्याचे/पडलेल्या भिंतीचे स्लॅबचे तसेच इतरत्र उडालेले पसरलेले तुकडे.

५) जळालेले अर्धवट जळालेले फर्निचर/कागदाचे/सुतळीचे तुकडे इ.

६) स्फोटाचे गुन्हेस्थळावरील तुटलेल्या बॅटरी सेल/इलेक्ट्रॉनिक्स सर्कीट/इलेक्ट्रीकल तारा, डितोनेटरचे मोाबईलचे/धातूचे/पाईपचे/प्लस्टिकचे तुकडे, खिळे – स्क्रु इ.

७) स्फोटातील जखमी मृतकाचे कपडे.

८) गुन्हास्थळ वाहन वरून कापसाच्या बोळ्याने पुसून घेतलेले स्फोटक पदार्थांसारखे दिसणारे डाग.

# प्रकरण – १८

# लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम (पोक्सो ॲक्ट) – २०१२

## प्रस्तावना :

बलात्काराची व्याख्या भारतीय दंड विधान, १८६० कलम ३७५ मध्ये दिलेली असून या गुन्ह्यास भारतीय दंड विधान, १८६० कलम ३७६ प्रमाणे शिक्षा दिलेली आहे. बलात्काराच्या कलमात सन १९८३ मध्ये मूलभूत फरक केले आहेत. त्यावेळी ३७६ अ, ३७६ ब, ३७६ क, ३७६ ड, ही कलमे वाढविण्यात आली. दिल्ली येथे झालेला निर्भया सामूहिक बलात्कारासंदर्भात जनतेचा रोष रस्त्यावर आला होता. त्यामुळे सरकारने न्यायाधिश वर्मा यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. त्यानुसार फौजदारी कायदा (सुधारणा) अधिनियम, २०१३ (सन २०१३ चा अधिनियम क्र. १३) दिनांक १३/०२/२०१३ पासून अंमलात आला. यानुसार खूप महत्त्वाचे बदल करून शिक्षेची तरतूद वाढविण्यात आली असून, खटला जलदगतीने चालविण्याबाबत तरतूद केलेली आहे.

भारतात स्त्रियांवर अत्याचार प्राचीनकाळापासून होत आहे. भारतातील जवळ जवळ अर्धे मनुष्यबळ ह्या महिला आहेत. महिलांवरील अत्याचारामध्ये लहान मुलींपासून वरिष्ठ महिलापर्यंत बऱ्याच महिला अत्याचाराच्या बळी पडत आहेत यासाठी पोलिसांनी अत्यंत दक्ष राहून महिलांवरील अत्याचारास प्रतिबंध घातला पाहिजे.

## बलात्काराच्या गुन्ह्यात तपासाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाच्या सूचना :

तपास करणाऱ्या अधिकाऱ्याने काही मुद्दे विचारात घेणे आवश्यक आहेत.

- कायद्याच्या परिभाषेनुसार बलात्कार झालेला दिसत असलेल्या प्रकरणातील बलात्कारी स्त्री ही बाहेरख्याली व चारित्र्यहीनदेखील असू शकते. याबाबत गोपनीय माहिती मिळवणे आवश्यक आहे.
- जर ती स्त्री शिलवान असेल व बाहेरख्याली नसेल तर, घटना घडल्यानंतर संधी मिळताच तिने तक्रार केली आहे की नाही तसेच तिने शक्य तितका प्रतिकार करून मदतीसाठी आरडा–ओरड केली की नाही ही माहिती मिळविणे आवश्यक आहे.

## वैद्यकीय तपासणी अधिकाऱ्याला पुढील प्रश्नांची उत्तरे सुलभतेने देता येतील अशा पध्दतीने त्याने बलात्कार पीडितेची वैद्यकीय तपासणी करावी :

- आरोपासंदर्भात बळकटी देणारा वैद्यकीय पुरावा आहे का?
- नुकताच लैंगिक संभोग झाला आहे का?
- झटापटीच्या खुणा दर्शविणाऱ्या भौतिक बाबी आहेत का?
- शारीरिक तपासणीचे निष्कर्ष व सांगितलेला इतिहास सुसंगत आहे का?
- आरोप निश्चिती करणारे संबंधित सर्व नमुने घेतले आहेत का?

## वैद्यकीय तपासणीपूर्वी संमती :

बलात्कारित स्त्रीची वैद्यकीय शारीरिक तपासणी कशी करायची याकरिता फौजदारी प्रक्रिया संहिता १९७२ मध्ये नवीन सुधारणा कलम १६४ अ समाविष्ट केले आहे. तसेच कलम ५३ प्रमाणे अशी तपासणी केवळ नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी स्त्रीमार्फत किंवा तिच्या देखरेखीखाली केली पाहिजे. कलम ५३ अ प्रमाणे बलात्काराचा आरोप असलेल्या व्यक्तीची वैद्यकीय तपासणीबद्दल तरतूद केलेली आहे. तपासणी करणाऱ्या अधिकाऱ्याने पीडितेची संमती घेणे आवश्यक आहे. वयस्क पीडित स्वत: संमती देईल, तर अज्ञान, मानसिक विकलांग असेल, तर लिखित स्वरूपात परवानगी घेणे आवश्यक राहील. पीडिताच्या स्पष्ट संमतीशिवाय तपासणी करू नये, कारण कुठल्याही परिस्थितीत भारताचे कायदे त्याला मान्यता देत नाहीत. गुन्ह्यासंबंधी इतर पुरावा गोळा करीत असताना अशा गुन्ह्याच्या शाबितीसाठी स्त्री व आरोपी या दोघांची वैद्यकीय तपासणी करून घेणे अत्यंत आवश्यक आहे. या तपासणीचा हेतू बलात्कारी स्त्री, फिर्यादी व साक्षीदार यांच्या तोंडी पुराव्याला बळकटी आणणे हा आहे. याकरिता बलात्कारी स्त्रीची ताबडतोब वैद्यकीय तपासणी करणे आवश्यक आहे. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे स्त्रीच्या अंगावरील कपडे हेसुध्दा फिर्यादीचे तोंडी हकिकतीस दुजोरा देणारा पुरावा उपलब्ध करू शकतात. याकरिता बलात्कारी स्त्रीला दुसरे कपडे देण्याची व्यवस्था करून तिच्या अंगावरील कपडे स्त्री पंचाचे समक्ष जप्त करून ताब्यात घ्यावे व ते कपडे व्यवस्थित रितीने कागदात अगर प्लास्टिकच्या पिशवीत व्यवस्थित पॅक करून पंचाच्या व पोलिसांच्या सह्यांचे सील लावून त्याला न्याय सहायक प्रयोगशाळेत पाठवावे.

## सर्वसाधारण इतिहास :

रुग्णाकडूनच/पीडिताकडून अगोदरचे आजारपण, शस्त्रक्रिया, गंभीर अपघात याची संपूर्ण माहिती जाणून घेणे आवश्यक आहे. अगोदरच्या २४ तासात गुंगीकारक पदार्थ सेवन केले असल्यास त्याचीदेखील संपूर्ण माहिती घ्यावी.

## मासिक धर्म आणि ऑबस्टेट्रिक इतिहास :

मागील मासिक पाळी केव्हा आली होती त्या तारखेसह मासिक पाळीचा इतिहास नोंदविणे आवश्यक आहे. आरोप करण्यात आलेला प्रसंग काळजीपूर्वक नोंदवावा.

## कपड्यांची तपासणी :

घटना घडली तेव्हा घातलेल्या कपड्यांची महिला डॉक्टराच्या मदतीने तपासणी करावी. घटनेच्या वेळेचे कपडे तपासणीचे वेळी अंगावर असतील तर रुग्णालयातील परिचारिकेस काढण्यास सांगण्यात येऊ नये. ते पेशंटला महिला डॉक्टरांच्या उपस्थितीत काढायला सांगणे.

वस्त्राच्या प्रत्येक बाबीत तपासणी करून वस्त्र जर फाटले असेल किंवा माती लागली असेल तर त्याबाबतची नोंद करणे. तपासणी नंतर ते कपडे कोरडे असल्यास स्वच्छ कागदी बॅगमध्ये ठेवावेत, जर ओले असतील तर सुरक्षित ठिकाणी वाळवावेत. ओले वस्त्र पुढच्या प्रयोगशाळेतील चाचणीवर प्रभाव टाकू शकते.

कपड्यांवरील माती डॉक्टरांनी काढू नये. सर्वसाधारण वैद्यकीय तपासणी व संपूर्ण शरीराची तपासणी काळजीपूर्वक करणे हे गरजेचे आहे. जखमा, जुन्या जखमा, यासाठी ही तपासणी करणे आवश्यक असते. खोटा आरोप करण्याच्या दृष्टीने बनावट जखमा केलेल्या असल्यास न्यायवैद्यकीय तज्ज्ञांकडून मत मागविणे आवश्यक आहे.

ओरखडे दिसून आल्यास त्यांची साइज, आकार, शरीरावरची जागा काळजीपूर्वक नमूद करावी. मांड्यांचा वरचा भाग, लॅबिया काळजीपूर्वक तपासून जखमांची नोंद घेणे. मांडया आणि लॅबिया यावर नखांचे ओरखडे (अज्ञानाच्या

बाबतीत) बलात्कार दर्शवितात.

## बलात्काराच्या गुन्ह्याचा तपास :

**१) तक्रार दाखल करणे**

अ) पीडित ही घाबरलेली असते, मानसिक वेदना झालेल्या असतात. प्रथमतः तिला बसायला सांगणे, पाणी पाजणे आणि महिला पोलीस शिपाई किंवा महिला पोलीस अधिकारी तिच्याकडे बोलण्यासाठी व विचारपूस करण्याकरिता पाठविणे.

ब) महिला अधिकाऱ्याचा वापर करा, जेणेकरून पीडिताला आपलेपणा वाटेल.

क) महिला अधिकाऱ्याच्या मदतीने घटनेसंबंधी सर्व माहिती ऐकून घ्यावी.

ड) कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ या गुन्ह्यात तक्रार महिला पोलीस अधिकाऱ्याने नोंद करून घ्यावी. तक्रार नोंद करण्यासाठी विलंब होत असेल तर तक्रार नोंदविताना पीडित महिलेची महिला नातेवाईक किंवा मैत्रीण हजर ठेवावी.

**२) तपास :**

अ) महिला डॉक्टरांकडून वैद्यकीय तपासणी करून घेणे, स्वॅब, ओघळ व किटाळ केस, नखे इत्यादी गोळा करणे. आरोपी व पीडिताची डी.एन.ए. टेस्ट करून घेणे.

ब) डॉक्टरांकडून गोळा केलेले स्वॅब व इतर सॅम्पल व्यवस्थित पॅक करून तात्काळ सी.ए. अभिप्राय कामी पाठविणे. (त्याच दिवशी अथवा दुसरे दिवशी)

क) संशयित/आरोपीला पकडण्यासाठी एक किंवा अनेक पथके पाठवावीत.

ड) स्थानिक आदेश क्र. २/२००५ प्रमाणे घटनास्थळाचे संरक्षण करावे तसेच घटनास्थळास भेट द्यावी आणि सोबत न्यायवैद्यिक पुरावा गोळा करण्यासाठी घेऊन जावे.

इ) घटनास्थळावरून पीडितांचे कपडे जप्त करावेत व कपड्यावरचे डाग व्यवस्थितपणे मार्क करावेत. व्हिडिओग्राफी करावी.

फ) पकडलेल्या आरोपींची काळजीपूर्वक चौकशी करून त्याच्या अंगावरील (घटनेच्या वेळेस असलेले) कपडे जप्त करावेत.

ग) सेल फोन/सीसीटीव्ही माध्यमांद्वारे (घटनेच्या वेळेस असतील तर) पीडित व आरोपी घटनास्थळी हजर होते याबाबतचा पुरावा हस्तगत करता येईल.

ह) साक्षीदारांचे कलम १६४ सी.आर.पी.प्रमाणे जबाब नोंदवावेत.

प) पीडित अज्ञान (minor) असेल तर, तिच्या वयासंबंधी ग्रामपंचायत किंवा नगरपालिकेचे जारी केलेले वयाचे प्रमाणपत्र हस्तगत करावे. मा. न्यायालयाने यास ठोस पुरावा म्हणून मान्यता दिली आहे.

म) पकडलेल्या आरोपीची वैयक्तिक तपासणी करून तसेच डी.एन.ए. करून वैद्यकीय पुरावा हस्तगत करावा.

के) आरोपीच्या वयासंबंधीचा पुरावा वरीलप्रमाणे हस्तगत करावा.

र) अनोळखी आरोपीची ओळख परेड Home depart no. MIS 1054/84588 dt. 22-04-1955 and Circular no. PRO 2460/16653-IX dt. 16-08-1963 यात नमूद केलेल्या पद्धतीप्रमाणे करावी.

ल) कलम २७ भारतीय पुरावा अधि. १८७२ कायदाप्रमाणे पोलिसांच्या ताब्यात गुन्ह्याची कबुली दिली असेल तर जप्ती करावी, शक्यतोवर पंच व पोलीस पार्टी हजर असलेबाबत फोटोग्राफी करून घ्यावी.

व) आरोपी जर स्वेच्छेने कबुली जबाब देत असेल तर कलम १६४ सी.आर.पी.सी. प्रमाणे त्याचे जबाब न्यायालयासमोर नोंदवून घ्यावे.

**घटनास्थळावरून व आरोपीबाबत खालीलप्रमाणे वैद्यकीय पुरावा हस्तगत करता येतो.**

अ) Psychological profilling of the accused (मानसिक चाचणी)

ब) Layered Voice Analysis (आरोपी कुठे खोटे सांगत आहे काय? खरे लपवत आहे काय?

क) घटनास्थळावरून आरोपीच्या पाय, हात व पादत्राणाच्या निशाण्यावरून पुरावा गोळा करता येतो.

ड) Cell Phone वरून तसेच आरोपीच्या लाळ/थुंकीवरून आरोपीची हजेरीबाबतचा पुरावा गोळा करता येईल.

## महिलांवरील अत्याचाराविरुध्दच्या गुन्ह्यातील नवीन सुधारणा-२०१३

भारत सरकारने नुकत्याच दिल्ली येथे झालेल्या बसमधील अत्याचाराचे प्रकारानंतर देशभरातून विविध स्तरातून कायदा कठोर करणेबाबत व जास्तीत जास्त शिक्षा वाढविणेबाबत मागणी केली जात होती. त्यानुसार खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आलेल्या आहेत :-

### क्रि.पो.क.१५४ :

पोटकलम १ मध्ये असे की, महिलांचे विरुध्द भा.दं.वि. ३२६ ए, ३७५,३७६,३७६ए, ३७६ बी, ३७६ सी, ३७६ डी, ३७६ इ व ५०९ या कलमान्वये गुन्हा घडल्याबाबत माहिती/ या गुन्ह्याचा प्रयत्न केल्याबाबत माहिती देणयात आली असेल ती माहिती शक्यतो महिला पोलीस अधिकाऱ्यांनीच नोंदवावी आणि पीडित महिलेला न्यायिक मदत व आरोग्यविषयक मदत द्यावी.

अ) वरील कलमाखाली गुन्हा/ गुन्ह्याचा प्रयत्न ३२६ ए व ३२६ बी सोडून व्यक्ती कायमस्वरूपी-तात्पुरती शारीरिक व मानसिकदृष्ट्या विकलांग असेल तर पोलीस अधिकाऱ्याने सदर गुन्ह्याची त्या व्यक्तीच्या घरी जाऊनच/तिच्या पसंतीच्या ठिकाणी दुभाषी/ स्पेशल एज्युकेटर यांच्या उपस्थितीत नोंदवावी.

ब) सदर माहिती नोंदवित असताना त्याचे व्हिडिओ चित्रीकरण करू शकतात.

क) क्रि.पो.को.क. १६४ - ५ ए (ए) खाली न्यायदंडाधिकाऱ्याने नोंदविलेला त्या व्यक्तीचा जबाब शक्य तितक्या लवकर पोलिस अधिकाऱ्यांना दिला जावा (तो त्याला द्यायलाच पाहिजे) जबाबाचे वेळी जर दुभाषकाची मदत घेतली असेल तर त्याची व्हिडिओग्राफी करावी.

### क्र.पो.को.क. १६० :

पंधरा वर्षाखालील स्त्रियांऐवजी १८ वर्षाखालील किंवा ६५ वर्षावरील, किंवा शारीरिक/ मानसिकदृष्या विकलांग व्यक्ती.

### क्रि.पो.को.क. १६१ (३) :

साक्षीदाराचा जबाब दृकश्राव्य साधनाद्वारे नोंदवितांनाची व्हिडिओग्राफी :-

वरील कलमाखाली गुन्हा/गुन्ह्याचा प्रयत्न याबाबतीला पीडितेचा जबाब महिला पोलीस अधिकाऱ्यांनेच शक्य तितक्या लवकर नोंदवावा.

### क्रि.पो.क. १९८ :

बी) भा.दं.वि. ३७६ बी संदर्भात आरोपी/पीडित पती-पत्नी असतील तर प्रथमदर्शनी पत्नीने केलेल्या तक्रारीवरून समाधान झाल्याशिवाय कोर्टाने अपराधाची दखल घेऊ नये.

### क्रि.पो.को.क. २७३ :

लैंगिक हल्ला झालेली पीडित व्यक्ती १८ वर्षाखालील असेल/तिच्या संबंधात इतर लैंगिक गुन्हा

घडलेला असेल त्यावेळी आरोपीचा उलट तपासणीचा अधिकार बाधित होणार नाही आणि तो सदर पीडितेच्या समोर येणार नाही या दोन्हींचा समन्वय साधण्यासाठी न्यायालय आवश्यक पाऊले उचलू शकेल.

## भा.दं.वि. कलमाखालील सुधारणा :

## भा.दं.वि. १६६ ए :

लोकसेवक गुन्ह्याच्या तपासासाठी/इतर गोष्टीसाठी एखाद्या ठिकाणी हजर राहण्यास कायद्याच्या निर्देशाचे पालन न करणे.

बी) तपास कसा करावा याबद्दल स्पष्ट निर्देश कायद्यात दिलेले आहे हे माहीत असताना एखाद्या व्यक्तीला त्रास व्हावा यासाठी कायद्याच्या निर्देशाचे पालन न करणे.

सी) क्रि.पो.को.क. १५४ ए खाली माहिती न नोंदविणे आणि विशेषत: ती माहिती वरील कलमाखाली शिक्षा पात्र असलेल्या दखलपात्र गुन्ह्यासंदर्भात असेल तर एक वर्षापर्यंत शिक्षा/दंड/दोन्ही.

## भा.दं.वि. ३२६ ए :

ॲसिडचा वापर करून कायमस्वरूपी / काही प्रमाणात भाजणे/विकलांग करणे/ विद्रुप करणे.

जो कोणी ॲसिड फेकल्याने किंवा ॲसिड पाजल्याने शरीराच्या भागावर जबर दुखापत होईल, भाजली जाईल हे माहीत असतानासुद्धा असे कृत्य करेल त्यास कमीत कमी १० वर्षे व जास्तीत जास्त आजन्म कारावास आणि १० लाख रुपयांपर्यंत दंड अशी शिक्षा होईल. दंडाची रक्कम पीडितेला दिली जाईल.

## भा.दं.वि. ३२६ बी :- जाणीवपूर्वक ॲसिड फेकणे/प्रयत्न करणे :

कोणत्याही व्यक्तीवर फेकणे, फेकण्याचा प्रयत्न/पाजण्याचा प्रयत्न/ इतर साधनांचा वापर करण्याचा प्रयत्न त्यामुळे कायमस्वरूपी नुकसान, भाजणे, विकलांगता येणे, चेहरा विद्रुप होणे, जबर दुखापत होणे, शारीरिक निसामर्थ्य असे घडले तर कमीत कमी ५ वर्षे, जास्तीत जास्त ७ वर्षे अधिक दंड.

## भा.दं.वि. ३५४ ए :

यापूर्वी सदर कलमास फक्त दोन वर्षापर्यंत शिक्षा व दंड असे होते, परंतु नवीन सुधारणेप्रमाणे आता या कृत्यास लैंगिक छळ असे संबोधून कमीत कमी १ वर्षे व जास्तीत ५ वर्षे शिक्षा व दंड होईल.

स्पष्टीकरण :- १) शारीरिक संबंध २) विनंती/मागणी ३) अश्लील शेरेबाजी ४) जबरदस्तीने पोर्नोग्राफी दाखविणे ५) निंदनीय/नावडती शारीरिक, शाब्दिक, मुख लैंगिक वर्तवणूक.

## भा.दं.वि. ३५४ बी :

स्त्रीवर लैंगिक छळाच्या हेतूने हमला करणे/फौजदारी पात्र बलप्रयोग करणे/चिथावणी देणे तसेच सार्वजनिक ठिकाणी नग्न होण्यासाठी भाग पाडणे यासाठी शिक्षा कमीत कमी ३ वर्षे, जास्तीत जास्त ७ वर्षे दंड.

## भा.दं.वि. ३५४ सी : स्त्रियांचे एकांतातले फोटो काढणे/ त्यांना पाहणे :

१) ज्या ठिकाणी स्त्रीला प्रायव्हसी मिळणे अपेक्षित आहे. तिथे तिचे अंग उघडे आहे/ती प्रसाधनगृहाचा वापर करीत आहे/ जे सर्वसाधारण लोकांसमोर ती ते कृत्य करू शकत नाही ती करत असेल तर.

२) जेथे स्त्रीने फोटो काढण्यास परवानगी दिली आहे, पण ते फोटो दुसऱ्यास दाखविण्याची संमती नाही.

## भा.दं.वि. ३५४ डी. :- टॉकिंग करणे :

१) एखाद्या स्त्रीचा पाठलाग करणे/संपर्क करणे/करण्याचा प्रयत्न करणे, त्या व्यक्तीने स्पष्ट नाराजी दर्शविल्यानंतरसुध्दा इंटरनेट ई-मेल, इतर कुठल्याही इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे लक्ष ठेवणे की, ज्यामुळे त्या व्यक्तीला हिंसाचाराची

भीती निर्माण होईल, मानसिक शांततेमध्ये ढवळाढवळ होईल. शिक्षा कमीतकमी १ वर्षे व जास्तीत जास्त ३ वर्षे व दंड.

## भा.दं.वि. ३७५ लैंगिक हल्ला (अगोदर बलात्कार शब्द होता) :

१) जो कोणी त्या महिलेस स्वत: अगर दुसऱ्याकरवी लैंगिक हल्ला करेल किंवा त्यासंबंधीचे अनैसर्गिक कृत्य करेल त्यास कमीत कमी ७ वर्षे शिक्षा, जास्तीत जास्त आजन्म कारावास व दंड होऊ शकतो.

२) जो कोणी पोलीस अधिकारी लोकसेवक, सशस्त्र सेनादलाचा सदस्य/हॉस्पिटल मॅनेजमेंटचा प्रमुख या नात्याने त्याच्या अधिपत्याखाली महिलेवर लैंगिक हल्ला करेल त्यास कमीत कमी १० वर्षे शिक्षा, जास्तीत जास्त आजन्म कारावास व दंड होऊ शकतो.

## भा.दं.वि. ३७६ ए :

पीडित व्यक्ती मृत्यू पावल्यास-पीडित व्यक्तीवर लैंगिक हल्ला झाल्यानंतर तिला झालेल्या जखमानंतर तिचा मृत्यू घडून आला असेल तर अशा अपराध्यास २० वर्षांपर्यंत शिक्षा किंवा आजन्म कारावास किंवा मृत्यूदंड.

## भा.दं.वि. ३७६ बी :

विभक्त राहण्याचा हुकूमनामा मिळवून विभक्त राहणाऱ्या पत्नीवर तिच्या संमतीशिवाय लैंगिक हल्ला केल्यास पतीस कमीत कमी दोन वर्षे शिक्षा व दंड.

## भा.दं.वि. ३७६ सी :

अधिकारावरील व्यक्तीस शिक्षा- पदाचा दुरूपयोग करून लैंगिक हल्ला करणाऱ्या पदाधिकाऱ्यास कमीत कमी ५ वर्षे व जास्तीत जास्त १० वर्षे शिक्षा व दंड

## भा.दं.वि. ३७६ डी :

**गँग रेप** - अशा प्रकरणात एकापेक्षा जास्त व्यक्ती सामील असलेल्या स्त्री/पुरुष व गुन्हयाबद्दल दोषी आढळल्यास कमीत कमी २० वर्षापर्यंत व जास्तीत जास्त आजन्म कारावास तसेच पीडितास वैद्यकीय उपचार, पुनर्वसनाचा खर्च दंड म्हणून वसूल केला जाईल.

## भा.दं.वि. ३७६ ई :

दुसरा अपराध करणाऱ्यास शिक्षा- भा.दं.वि. ३७६, ३७६ ए, ३७६सी, ३७६डी प्रमाणे अगोदर शिक्षा झालेल्या व्यक्तीला पुन्हा याच प्रकारच्या गुन्ह्यात शिक्षा देताना आजन्म कारावास ही शिक्षा देण्यात येईल.

## भा.दं.वि. ५०९ :

अगोदर सदर गुन्ह्यास १ वर्षे कारावास व दंड अशा शिक्षा होत्या व आता ३ वर्षांपर्यंतचा कारावास व दंड अशा शिक्षा करण्यात आल्या आहेत.

# भाग - २

## Protection of Children from Sexual Offences Act-2012
## लैंगिक गुन्ह्यापासून मुलांचे/बालकांचे संरक्षण कायदा (२०१२)

POCSO Act २०१२ हा लोकसभेत २२ मे २०१२ रोजी मंजूर झाला. त्यापूर्वी १० मे २०१२ रोजी राज्यसभेत सदर कायद्याचा मसुदा मान्य झाला व अंमलबजावणी दि.१४ नोव्हेंबर २०१२ पासून सुरू झाली

आहे.

POCSO Act २०१२ हा मुलांचे लैंगिक पिळवणूक यापासून संरक्षण करण्यासाठी कायदेशीर तरतुदींना बळकटी आणण्यासाठी हा कायदा अंमलात आणला आहे. मुलांविरुध्दचे लैंगिक गुन्ह्याचा पहिल्यांदाच उल्लेख करणारा हा खास कायदा मंजूर करण्यात आला आहे.

POCSO Act २०१२ अन्वये बालक म्हणजे १८ वर्षे वयापेक्षा लहान अशी बालकाची व्याख्या केली आहे. १८ वर्षापेक्षा लहान सर्व बालकांचे लैंगिक अत्याचाराच्या हल्ल्याचे सर्व गुन्ह्यांपासून लैंगिक छळवणूक व लैंगिक संबंधाचे चित्रीकरण यापासून संरक्षण दिले आहे.

POCSO Act २०१२ गुन्ह्याच्या गंभीरतेवरून वर्गीकरण करून कडक शिक्षेची तरतूद केली आहे. साध्या तुरुंगवासापासून ते आजीवन तुरुंगवासाचे शिक्षेची तरतूद नमूद केली आहे. तसेच कोर्टाच्या आदेशाप्रमाणे शिक्षेसह दंडाची तरतूद केली आहे.

संरक्षण खात्याचे सदस्य, पोलीस अधिकारी, सरकारी नोकर ज्यांच्यावर बालकांचे संरक्षणाचा विश्वास व अधिकार दिला आहे. अशा व्यक्तीने गुन्हा केल्यास POCSO Act २०१२ प्रमाणे अॅग्रीव्हेटेड (गंभीर/अतिवाईट) गुन्हा समजला जाईल.

## या कायद्याप्रमाणे गुन्ह्यास शिक्षा :

कलम -३ :- इंद्रिय प्रवेशाचे लैंगिक अत्याचार/हल्ला केल्याचा गुन्हा.

कलम -४ :- कलम ३ प्रमाणे गुन्हा केल्यास कमीत कमी ७ वर्षापर्यंत तुरुंगवास व जास्तीत जास्त आजीवन कारावास व दंड.

कलम -५ :- गंभीर स्वरूपाचा इंद्रिय प्रवेशाचे लैंगिक अत्याचार/हल्ल्याचा गुन्हा.

कलम -६ :- कलम ५ प्रमाणे गुन्हा केल्यास कमीत कमी १० वर्षापर्यंत तुरुंगवास व दंड.

कलम -७ :- लैंगिक हल्ला.

कलम -८ :- कलम ७ चा गुन्हा केल्यास कमीत कमी ३ वर्षे व जास्तीत जास्त ५ वर्षापर्यंत कारावास व दंड.

कलम -९ :- गंभीर स्वरूपाचा लैंगिक हल्ला केल्याचा गुन्हा.

कलम -१० :- गंभीर स्वरूपाचा लैंगिक हल्ल्याचा गुन्हा केल्यास कमीत कमी ५ वर्षे व जास्तीत जास्त ७ वर्षापर्यंत कारावास व दंड.

कलम -११ :- बालकाची लैंगिक छळवणूक गुन्हा.

कलम -१२ :- कलम ११ प्रमाणे गुन्हा केल्यास ३ वर्षे कारावास व दंड.

कलम -१३ :- बालकाचा उपयोग लैंगिक संबंधाची चित्रफीत करण्यासाठी उपयोग केल्याचा गुन्हा.

कलम -१४ (१) :- कलम १३ प्रमाणे गुन्हा केल्यास ५ वर्षे कारावास व दंड व दुसऱ्या गुन्ह्यासाठी ७ वर्षे कारावास व दंड.

न्यायदानाचे प्रक्रियेतील प्रत्येक स्तरावर बालकाचे सर्वोच्च महत्त्व लक्षात घेऊन या कायद्यान्वये दाखल गुन्ह्याची सुनावणी करण्यासाठी खास न्यायालयाची स्थापना करण्याची तरतूद करण्यात आली आहे. (कलम -२८)

गुन्ह्याची नोंद करताना, पुरावे नोंदविताना, तपास करताना व गुन्ह्याचे सुनावणीचे दरम्यान बालकास मैत्रीपूर्ण वागणुकीचा अवलंब करण्याबाबत या कायद्यात तरतूद करण्यात आली आहे. ती पुढीलप्रमाणे (कलम २४) :-

१) कमीतकमी पोलीस उप - निरीक्षक दर्जाचे महिला अधिकाऱ्याने शक्यतो बालकाचे घरी किंवा त्यांच्या पसंतीच्या ठिकाणी जबाब नोंदवावेत. (कलम २४ (१))

२) कोणत्याही कारणास्तव बालकास पोलिस स्टेशनला नेऊ नये (कलम २४ (४)).

३) बालकाचा जबाब नोंदविताना पोलीस अधिकारी साध्या वेषात राहतील.

४) बालक जसे बोलेल तसाच जबाब नोंदवावा. (कलम १९(३)).

५) बालकाच्या गरजेनुसार संवाद साधण्यासाठी मध्यस्थ, दुभाषी किंवा विशेष तज्ञ व्यक्तीची मदत घ्यावी.

६) बालक अपंग (मुका/बहिरा) असेल तर खास प्रशिक्षित किंवा बालकाचे ओळखीच्या व्यक्तीची मदत घ्यावी. (कलम २६ (३)).

७) पालकांच्या उपस्थितीत अथवा बालकाचा ज्या व्यक्तीवर विश्वास आहे अशा व्यक्तीच्या उपस्थितीत वैद्यकीय तपासणी करावी.(कलम २७ (३)).

८) पीडीत बालक मुलगी असेल तर महिला डॉक्टरमार्फत वैद्यकीय तपासणी करावी. (कलम २७ (२))

९) गुन्ह्याच्या सुनावणीच्या दरम्यान बालकास अधुन-मधून मोकळीक वा सुटी द्यावी.

१०) बालकास वारंवार जबाब पडताळणीस बोलावू नये.

११) बालकाच्या भावभावनांना ठेस लागेल, असे आक्रमक प्रश्न विचारू नयेत.

१२) गुन्ह्याची सुनावणी इन-कॅमेरा करावी. (कलम ३७)

**गुन्हेगारास मदत करणे किंवा संगनमत करणे- व्याख्या (कलम १६):-** या कायद्यान्वये गुन्हा करणाऱ्यास मदत/संगनमत करणारी व्यक्ती ही गुन्हा करणाऱ्या व्यक्तिइतकीच शिक्षेस पात्र आहे (कलम १७)

गुन्ह्याचा उद्देश असणाऱ्या व्यक्तीचा गुन्ह्याचा प्रयत्न अयशस्वी झाला तरी तो शिक्षेस पात्र असल्याचे या कायद्यात तरतूद केली आहे. (कलम १८)

लैंगिक व्यभिचारासाठी मुलांचा व्यापार/वाहतूक करण्याचा समावेश होतो. या कायद्यान्वये नमूद सर्व अत्यंत हीन गुन्ह्यांच्या गुन्हेगारावर बर्डन ऑफ प्रूफ आहे. बालकाची संवेदनशीलता व निष्पापपणा लक्षात घेऊन ही तरतूद करण्यात आलेली आहे.

कायद्याचा गैरवापर टाळण्यासाठी खोटी तक्रार करणे, खोटी माहिती देणाऱ्यास या कायद्यान्वये शिक्षेची (६ महिने) तरतूद केली आहे. जर बालकाविरुध्द खोटी तक्रार केली असेल त्यास १ वर्षापर्यंत शिक्षा आहे. (कलम २२ (१))

गुन्ह्याची तक्रार विशेष बाल पोलीस पथक किंवा स्थानिक पोलिसांनी नोंदविल्यानंतर २४ तासांच्या आत बाल न्याय मंडळास बालकाच्या काळजी व संरक्षणासाठी अहवाल द्यावा. (कलम १९ (५))

गुन्ह्याची तक्रार विशेष बाल पोलीस पथक किंवा स्थानिक पोलीसांनी नोंदविल्यानंतर बालकास मदत व पुनर्वसनासाठी २४ तासात मदत द्यावी. ती मदत, काळजी व संरक्षणासाठी बालक ठेवलेल्या बालसंरक्षण गृहास किंवा हॉस्पिटलला द्यावी.

कायद्याच्या तरतुदींची प्रसिद्धी करण्याची जबाबदारी केंद्र सरकार व राज्य सरकारवर सोपविलेली आहे. जनतेमध्ये जागृती करण्यासाठी रेडिओ, दूरदर्शन व प्रसिध्दी माध्यमांची मदत घ्यावी. सामान्य जनता, मुले, त्यांचे आई-वडील व पालक यांना माहिती द्यावी.

केंद्रीय बाल संरक्षण आयोग व राज्य बाल संरक्षण आयोग हे प्रमुख अधिकारी म्हणून कायद्याच्या अंमलबजावणीवर देखरेख करतील.

बलात्काराचे गुन्हे नोंदविण्यापूर्वी व नंतर तपास करीत असताना विचारात घ्यावयाचे मुद्दे

| अ.न. | तपासातील मुद्दे | उविपोअ | अपर पोअ |
| --- | --- | --- | --- |
| १. | बलात्काराची खबर घेताना पिडीत व्यक्तीने दिली असलेस ती मुद्देसुद घ्यावी | | |

२. सदर पिडित व्यक्तीने खबर दिली नसेल तर ती का दिली नाही याचा फिर्यादीत उल्लेख करण्यात यावा.

३. पंचनामा करतांना सराईत पंच घेण्यात येवू नयेत.

४. पंचनामा करतांना गरज भासल्यास दुभाषी वापरण्यात यावा.

५. पंचनामा जबाब वाचून दाखवून स्वाक्षरी घेण्यात यावी.

६. फिर्यादीची फिर्याद घेताना आवश्यकतेनुसार दुभाषी वापरण्यात यावा.

७. फिर्यादीची घेतलेली फिर्याद वाचून दाखवून स्वाक्षरी घेण्यात यावी.

८. गुन्हेगारी पार्श्वभूमी असणारे पंच वापरण्यात येऊ नये.

९. घटनास्थळाचे निरीक्षण करतांना पंचासमक्ष घड्याळ्याच्या काट्याच्या दिशेने अथवा विरुद्ध दिशेने करून तपशीलवार पंचनामा करण्यात यावा.

१०. घटनास्थळाचा पंचनामा करतांना सदर ठिकाणी पुराव्याच्या दृष्टीने काही झटापटीच्या खुणा मिळून येतात का याची सखोल छाननी करावी.

११. झटापटीत बांगड्याचे तुकडे फाटलेली कपडे मिळून येतात का ते पहावे.

१२. पिडित व्यक्तीच्या अंगावर ओरखडे आहेत काय याची पाहणी करावी.

१३. पिडित व्यक्तीने घटनास्थळी आरडओरड केली असेल तर त्याची माहिती घ्यावी.

१४. पिडित व्यक्तीने आरडा ओरड केली असलेस तिचे मदतीस कोणी धावुन आले होते काय, याचा शोध घेवून पुरावे मिळवावेत.

१५. पिडित व्यक्तीकडे तिच्यावर किती लोकांनी अत्याचार केला याची विचारपुस करावी.

१६. पिडित व्यक्तीचा जन्म तारखेचा/शाळेचा दाखला तपासकामी मागवून घेणेत यावा.

१७. सदर घटनेची फिर्याद नोंदवून घेतलेनंतर संबंधीत कोर्टास, एफ.आय.आर ची प्रत पाठविणेत यावी.

१८. पिडीत व्यक्तीस वैद्यकीय तपासणीस ताबडतोब पाठविणेत यावे.

१९. पिडीत व्यक्तीचे अंगावरील कपडे, स्त्री पंचाकडून जप्त करून घ्यावेत.

२०. उघड्यावर अत्याचार झाला असल्यास विर्य व रक्ताचे डाग, गुन्ह्याचे ठिकाणी माती असे पुरावे मिळवावेत.

२१. आरोपीचे गुप्त भागावरील केस व पिडीत व्यक्तीचे गुप्त भागावर वा अंगावर चिटकलेल्याची खात्री करावी.

२२. केस चिकटलेचे मिळून आलेस त्याबाबत सविस्तर पंचनामा करणे.

२३. पंचनामा करून जप्त करेणत आलेल्या वस्तुंना पंचाच्या सह्याचे लेबल व लाखेचे सिल करण्यात यावे.

२४. विर्याचे डाग, रक्त तपासणीस पाठविणेपूर्वी सुरक्षित रहाणेच्या दृष्टीने विशेष खबरदारी घेण्यात यावी.

२५. गुन्ह्यांच्या ठिकाणी पंचनामा करतेवेळी सुक्ष्म निरीक्षण करण्यात यावे.

२६. गुन्ह्यांचे ठिकाण उघड्या जागेवर असेल तर त्या ठिकाणी झटापटीच्या काही खुणा, तेथील गवत, झाडेझुडपे हालली आहेत काय याबाबत खात्री करावी.

२७. गुन्ह्यांचे ठिकाणी कापडाची चिंधी, रक्ताचे डाग, सिगारेट विडी, अगर इतर वस्तू पडल्याबाबत कसून शोध घेण्यात यावा.

२८. पिडीत व्यक्तीवर घरात पलंगावर अत्याचार करण्यात आला असल्यास बिछाण्याचे निरीक्षण करणेत येवून पुरावे प्राप्त करावेत.

२९. आरोपी निष्पन्न असलेस त्याचा शोध घेण्यासाठी ताबडतोब शोध पथक पाठविण्यात यावे.

३०. या शोध पथकास तसा लेखी आदेश देवून स्टेशन डायरीत नोंद घेणेत यावी.

३१. आरोपी संशयित असल्यास त्याच्या नातेवाईकांतर्फे शोध मोहिम राबवावी.

३२. आरोपी मिळून आलेस त्यास वैद्यकीय तपासणीस पाठवून त्याच्या अंगावरील जखमा, ओरखडे अंगावरील कपड्याचे निरीक्षण करणेत येवून अटक/जप्ती पंचनाम्यात सविस्तर नोंदी घ्याव्यात.

३३. आरोपीचे कपड्यावर पिडित व्यक्तीचे अंगावरील केस, विर्याचे डाग, रक्ताचे डाग, कुंकू, लिपस्टीक, दागिने, या वस्तु पुराव्याकामी मिळून आल्यास जप्त कराव्यात.

३४. मिळालेल्या वस्तू खुलासेवार पंचनाम्याने तपासकामी जप्त करण्यात याव्यात.

३५. आरोपी अटक करतेवेळी मा. सर्वोच्च न्यायालयाचे मार्गदर्शक तत्वांचे पालन करावे.

३६. आरोपीस वैद्यकीय तपासणीस पाठवून त्याचे अंगावरील खाणाखुणा, वय, त्याची संभोग क्षमता, त्यास गुप्त रोग होता काय, याबबात अभिप्राय मिळवावेत.

३७. पिडित व्यक्तीच्या अंगावरील मिळून आलेले पुरावे हे गुन्ह्याचे ठिकाणी मिळून आलेले दुवे, आरोपीचे अंगावर मिळून आलेले दुवे, हे अे-बी-सी अशी वर्गवारी करून सी.ए. तपासणीस पाठविण्यात यावेत.

३८. जप्त केलेल्या मुद्देमालाची पावती फाडण्यात येवून ती कागदपत्रात समाविष्ट करावी.

३९. जप्त माल सीए तपासणीसाठी पाठवितांना त्या रिपोर्टाची सही शिक्क्याची प्रत कागदपत्रात समाविष्ट करावी.

४०. सी.ए. तपासणीला मुद्देमाल व रिपोर्ट घेवून पाठविलेल्या कर्मचाऱ्याचे तपास टिपण करून कागदपत्रात समाविष्ठ करणे.

४१. पिडित व्यक्ती व आरोपीचे नाते काय होते याची माहिती घेवून त्यांचे वयाचा व जातीचा दाखला कागदपत्रात सामील करावा.

४२. पिडित व्यक्तीचे अनुसूचित जाती, जमातीची असल्यास त्याबाबत वरिष्ठांना कळविण्यात यावे.

४३. पिडित व्यक्तीने तिच्यावर झाले अत्याचाराबाबत प्रथम कोणास सांगितले त्या साक्षीदाराकडे विचारपुस करणेत यावी.

४४. पिडित व्यक्तीचे व आरोपीचे पूर्वी काही अनैतिक संबंध होते काय याबाबत चौकशी करावी.

४५. पिडित व्यक्तीवर अत्याचार करण्यासाठी आरोपीने काय बहाणा केला होता याची माहिती घ्यावी.

४६. पिडित व्यक्तीवर अत्याचार करतेवेळी आरोपीने वाहनाचा वापर केला होता काय, याबाबत तपास करावा.

४७. अत्याचारी महिलेवर जर वाहनात अत्याचार झाला असेल तर तपासाच्या दृष्टीने वाहनाची तपासणी करावी.

४८. वाहन वापरले असल्यास ते वाहन जप्त करण्यात येवून कागदपत्रांची पडताळणी करण्यात यावी.

४९. निवेदन पंचनामा करतांना प्रत्येक वस्तू एकत्रित सील न करता वेगवेगळी सीलबंद करण्यात यावी.

५०. जप्त वस्तू कोणत्या ठिकाणाहून जप्त करण्यात आल्या हे तपशीलवार सुसंगतपणे पंचनाम्यात लिहिण्यात यावे.

५१. वैद्यकीय तपासणी सर्टिफिकेट कागदपत्रात सामील करावे.

५२. घटनास्थळाचा नकाशा काढून तो कागदपत्रात सामील करण्यात यावा.

५३ जप्त मुद्देमाल सीए तपासणी होवून आला असल्यास तो कागदपत्रात सामील करावा.

५४. कागदपत्राची छाननी करून वरिष्ठांचे तसेच सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता यांचे मार्गदर्शन घेण्यात यावे.

५५. मुदतीत दोषारोपपत्र न्यायालयात मुद्देमालासह सादर करण्यात यावे.

# प्रकरण – १९

# संगणकीय गुन्हे व तपास

## प्रस्तावना :

आज संगणकाचा वापर सर्वत्र केला जात आहे. विविध विषयांची माहिती त्यात साठवली जाते. कोणत्याही विषयावर त्वरित माहिती मिळवता येते. हे सर्व इंटरनेट संकेतस्थळे यामुळे शक्य होते. संगणक आणि इंटरनेट यांचे मानवाच्या जीवनातील महत्त्व गेल्या काही दशकात वाढले आहे. संपूर्ण जगातील अब्जावधी जनता त्यांचे दिवसातील कित्येक तास संगणकासमोर घालवते. जेथे ते ई–मेल रिसीव्ह करणे, वेब सर्फिंग करणे, माहिती नोंद करणे इ. क्रियांमध्ये सहभागी होतात.

जगातील ९२% माहिती आज इलेक्ट्रॉनिक स्वरूपात आहे. ३१ अब्ज ई–मेल मेसेज प्रत्येक दिवशी पाठविले जातात. संगणकीय क्षेत्रात वाढती क्रांती वाढत्या गुन्हेगारीलासुध्दा आमंत्रण देत आहे. सेलफोन, लॅपटॉप, संगणक आणि संगणकीय सेवा पुरविणारे यांच्या माध्यमातून गुन्हे केले जातात. संगणकीय गुन्हयांच्या वाढत्या प्रमाणामुळे कायद्याची अंमलबजावणी करणारी यंत्रणा आणि सरकारी वकील यांना संगणकातील साठविलेली माहिती आणि पुरावा कसा मिळवावा याचे ज्ञान असणे आवश्यक आहे. फौजदारी गुन्हयामध्ये संगणक जाळे, कॉग ई–मेल, वर्ड प्रोसेसिंग फाईल आणि जेपीजी फिक्चर फाईल याद्वारे कधी कधी आवश्यक असा महत्त्वाचा पुरावा मिळू शकतो.

**संगणक अपराध / (सायबर गुन्हे) :** म्हणजे संगणकाशी संबंधित गुन्हा. ज्यात गुन्ह्याचे साधन व बळी दोन्हीही संगणक असतात. अर्थात व्यक्तीलासुध्दा त्याचा त्रास होतो आणि गुन्हा करणारी ही व्यक्तीच असते. परंतु, साधन मात्र संगणक असतो. जेव्हा संगणकात साठवलेली माहिती चोरली जाते. तसेच बीभत्स भाषा वापरून महिलांना, मुलींना त्रास देणे, अश्लील मजकूर प्रसिध्द करणे, संगणक यंत्रणेचा भेद करणे (हॅकिंग), खासगीपणावर आक्रमण करणे, म्हणजेच गुप्त माहिती नाहीशी होते. एखादा अपराध करण्याकरिता पूर्वनियोजनासाठी संगणकाचा वापर केला जातो. संगणक अपराधाचे वर्गीकरण दोन भागात करता येईल. १. भौतिक /हार्डवेअर, २. डाटा आणि संबंधित पध्दती/ सॉफ्टवेअर अपराध.

**माहिती व तंत्रज्ञान अधिनियम, २००० (सुधारित २००८) :** हा भारताचा केंद्राचा कायदा असून त्यात संगणक अपराधासंदर्भात विविध तरतुदी केलेल्या आहेत. त्याची अंमलबजावणी दि.१७/१०/२००० पासून अंमलात आली आहे.

**कलम** ७५ प्रमाणे या कायद्यामधील अपराध जरी भारताबाहेर घडले तरी हा कायदा लागू आहे. इतकेच नव्हे तर कोणत्याही व्यक्तीला तिचे नागरिकत्व विचारात न घेता लागू आहे.

**कलम ७६ जप्त करणे** – कोणताही संगणक, संगणक यंत्रणा, फ्लॉपी, कॉम्पॅट डिस्क, टेप डिव्हाईस किंवा त्याच्याशी संबंधित इतर कोणत्याही इतर सहायक गोष्टी यांच्या संबंधातील या अधिनियमाच्या किंवा त्याखाली करण्यात आलेले नियम, आदेश किंवा विनियम याच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करण्यात आले असेल किंवा करण्यात येत असेल तर त्या जप्त करण्यास पात्र ठरतील.

परंतु असे की, असा कोणताही संगणक, संगणक यंत्रणा, फ्लॉपी, कॉम्पॅट डिस्क, टेप डिव्हाईस किंवा त्याच्याशी संबंधित इतर कोणत्याही इतर सहायक गोष्टी जिच्या ताब्यात, अधिकारात किंवा नियंत्रणात सापडली असेल ती

व्यक्ती या अधिनियमाच्या किंवा त्याखाली करण्यात आलेले नियम, आदेश किंवा विनियम यांच्या उल्लंघनास जबाबदार नाही. हे त्याबाबतचा निर्णय करणाऱ्या न्यायालयाचे समाधान होईल अशाप्रकारे सिध्द करण्यात आले तर, ते न्यायालय असा कोणताही संगणक, संगणक यंत्रणा, फ्लॉपी, कॉम्पॅक्ट डिस्क, टेप डिव्हाईस किंवा त्याच्याशी संबंधित इतर कोणत्याही इतर सहायक गोष्टी जप्त करण्याचा आदेश देण्याऐवजी या अधिनियमाच्या नियम, आदेश किंवा विनियम यांच्या तरतुदीप्रमाणे प्राधिकृत करण्यात आलेल्यापैकी त्याला योग्य वाटेल असा अन्य आदेश अशा उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीविरुध्द काढील.

**कलम ७६ अपराधांचे अन्वेषण करण्याचे अधिकार :** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी पोलीस निरीक्षक दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला कोणताही पोलीस अधिकारी या अधिनियमाखालील अपराधाचे अन्वेषण करू शकेल.

## सायबर गुन्ह्यांचे वर्गीकरण व तपास :

१) संगणक/नेटवर्कमध्ये अनधिकृत प्रवेश (हॅकिंग) व माहिती चोरणे (डेटा थेफ्ट)

२) इंटरनेटचा वापर करून खोटी ओळख दाखविणे, दुसऱ्याची ओळख दाखविणे (आयडेंटिटी थेफ्ट व फिशिंग)

३) ई-मेलचा वापर करून अश्लील ई-मेल पाठविणे किंवा धमकीचे ई-मेल पाठविणे.

४) इंटरनेट रिले चॅटचा वापर करून गैरप्रकार, अश्लील गोष्टी किंवा ड्रग्जसारख्या बेकायदेशीर प्रकारांची प्रसिद्धी करणे.

५) क्रेडिट कार्ड/ इंटरनेटवरील ई-बँकिंगचे गुन्हे.

६) फेसबुक/व्हॉटस्अप, इन्स्टाग्राम इत्यादी सोशल साईटस्वरील खोट्या नावाने अश्लील प्रोफाईल तयार करणे किंवा उत्तेजक चिथावणी देणारा, जनभावना दुखावणारा प्रोफाईल बनविणे.

७) मोबाईलसंबंधी गुन्हे :- हरवलेला/चोरी गेलेला मोबाईल शोधणे.

८) सायबर दहशतवाद :- संगणक व संदेशवहन यंत्रणेचा (ई-मेल/बेवसाईट/मोबाईल) वापर करून देशविघातक कारवाया करणे व समाजात घबराट पसरविणे.

१) **हॅकिंग गुन्हे** (Hacking Crimes)– इंटरनेटचा वापर करून अवैधरित्या दुसऱ्या संगणकाशी संपर्क प्रस्थापित करून त्यावर ताबा मिळविणे, तेथील माहिती चोरणे अथवा नष्ट करणे किंवा एखाद्या संकेतस्थळावर अनधिकृत प्रवेश मिळवून तिथे एखादा अश्लील अथवा प्रक्षोभक मजकूर प्रसिध्द करणे अशा गुन्ह्यांना हॅकिंग म्हणता येईल.

### ● तपास :

१) फिर्यादीच्या संगणकातील इव्हेंट लॉग, फायरवॉल लॉग, तो जर सर्व्हरशी जोडला असेल तर, सर्व्हर लॉग, यातून त्यावर हल्ला केलेल्या संगणकाचा आय.पी. ॲड्रेस (IP Address) मिळू शकतो.

२) तो मिळाल्यानंतर सदर आयपी www.domaintools.com किंवा whoisip.net या संकेतस्थळावर जाऊन कोणत्या आहे ते मिळविता येते. त्यानंतर मिळालेल्या आयपीची (IP) त्याच्या आयएसपी (ISP) कडून माहिती मागवावी.

३) फिर्यादी व आरोपी यांच्या संगणकाची हार्डडिस्क जप्त करून व्यवस्थित पॅकिंग, लेबलिंग करून विश्लेषणासाठी तज्ज्ञांकडे पाठवावी.

२) **फिशिंग / आयडेंटिटी थेप्ट गुन्हे (Phishing / Identity Theft Crimes) :**

फिशींग म्हणजे एखाद्या व्यक्तीची वैयक्तिक माहिती मागविणारे ई-मेल किंवा फोन करून माहिती गोळा करणे व तिचा गैरवापर करून गुन्हा करणे. या स्वरूपाच्या गुन्ह्यांचा वापर पुष्कळदा आर्थिक गुन्ह्यांसाठी होतो.

- **तपास :**

१) जर रक्कम ई - बँकिंगमधून काढली किंवा वळती केली असेल तर, ती कुठल्या खात्यावर जमा झाली त्याचे डिटेल्स काढता येतात व संबंधित बँकेकडून माहिती मिळवता येते.

२) ई - मेल ट्रेस करून काढावा, संबंधिताकडून संशयिताची माहिती घ्यावी.

३) **ई- मेल ट्रेसिंग (e-mail Tracing) (अश्लील / धमकीचे ई-मेल):**

बऱ्याच वेळा जसे वास्तविक जगात धमकीची पत्र येतात, तसेच इलेक्ट्रॉनिक्सच्या माध्यमातून म्हणजेच इंटरनेटचा वापर करूनही धमकीचे किंवा अश्लील ई-मेल पाठविले जातात.

- तपास :

१) सर्वप्रथम ई-मेल बॉक्समध्ये जाऊन आलेला ई-मेल अभ्यासावा. त्यासाठी त्याचे फुल हेडर (Full Header) हस्तगत करावे.

२) ई-मेल हेडर (Email Header) हे ई-मेलच्या शेवटी उजव्या बाजूला असते.

३) त्यातून मिळालेल्या लॉगचा (Log) अभ्यास करताना खालून वाचायला सुरुवात करावी. त्यातील खालून पहिला आपल्याला हवा असतो. त्यावरून वेळ व तारीख या महत्त्वाच्या गोष्टी मिळतात.

४) त्यानंतर आयपी ट्रेसिंग व आयएसपीचा पाठपुरावा करून संशयिताची माहिती मिळवावी.

५) काही ऑनलाईन साईट्स आहेत की ज्या ई-मेल हेडरमधून आयपी अॅड्रेस काढून देतात. ते खुपच सोपे ठरते.

उदा. www. whatismyipaddress.com/trace.email या संकेतस्थळावर जाऊन दिलेल्या रकान्यात हेडर कॉपी करून पेस्ट करावे व संबंधित IP Address मिळवावा.

४) **इंटरनेट रिले चॅट क्राईम्स (Internet Relay Chat Crimes) :**

या अंतर्गत चॅटिंगद्वारे अनैतिक व्यापार, अवैध व्यापार करणे, दुसऱ्याची वैयक्तिक माहिती प्रसारित करणे इ. स्वरूपाचे गुन्हे येतात.

- तपास :

१) चॅटिंग कुठल्या सॉफ्टवेअरमध्ये आणि कुठल्या चॅटरुममध्ये व सर्व्हरमध्ये केली ते तपासणे .

२) संबंधिताच्या चॅट सर्व्हरकडून लॉग (Log) मिळवावेत.

३) चॅट सर्व्हर (चॅट सर्व्हिस प्रोव्हायडर) कडून आयपी अॅड्रेस मिळवावे.

४) त्यानंतर आयएसपी ट्रेसिंग प्रक्रिया करावी व आयएसपीकडून संशयिताची माहिती मिळवावी.

५) **क्रेडिट कार्ड / ए.टी.एम कार्डसंबंधी आर्थिक गुन्हे (Credit Card/ATM Card Economical Crimes)**

क्रेडिट कार्ड हरविणे, चोरी जाणे किंवा त्याचे डिटेल्स दिल्यामुळे इंटरनेट बँकिंगमधून पैसे जाणे ई. गैरप्रकार.

- तपास :

१) सर्वप्रथम संबंधित व्यक्तीचे बँक रेकॉर्ड चेक करावे.

२) त्याने कोणाला क्रेडिट कार्डची झेरॉक्स कॉपी / डिटेल्स उदा. बर्थ डेट, सी.व्ही.व्ही. (C.V.V.) (एटीएम/

क्रेडिट कार्डचा पासवर्ड)पिन नंबर दिला आहे का किंवा कोणी मागितला होता का? हे तपासून पाहावे.

३) जर क्रेडिट कार्ड किंवा ए.टी.एम चा वापर मॉल, ज्वेलरी शॉप ई. ठिकाणी झाला असेल तर तिथे चौकशी करावी.

४) आजकाल सर्वच महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही लावलेले असतात. तेथून त्याचे काही रेकॉर्डिंग / फुटेज मिळतात का ते चेक करावे.

५) जर गुन्हा संगणकावरून झाला असल्यास बँकेच्या सर्व्हरचे लॉग आणि संशयिताचा आयपी ॲड्रेस मागवावा व पुढील कार्यवाही करावी.

## ६) फेसबुक / सोशल साईटस्वरील गुन्हे :

फेसबुक किंवा ऑर्कुटसारख्या सोशल नेटवर्किंग साईट्सवर मुली किंवा स्त्रियांचे अश्लील प्रोफाईल तयार केले जाते किंवा एखाद्या विषयाचे बदनामीकारक प्रोफाईल तयार केले जातात.

– **तपास :**

१) सदर प्रोफाईलचा यु.आर.एल आयडी (URL ID) मिळवावा. तो आयडी प्रोफाईल उघडल्यावर ॲड्रेस बारमध्ये (Address Bar) दिसतो.

२) संबंधित कंपनीकडून सदर प्रोफाईलची माहिती मागवणे. माहितीमध्ये कुठल्या ई- मेल आयडी वरून तो बनविला आहे व तो ई-मेल आयडी कुठल्या आयपी ॲड्रेसवरून बनविला आहे व वारंवार प्रोफाईल अपडेट केलेले आयपी ॲड्रेस मागवावे.

३) त्यानंतर पुढील आयपी ट्रेसिंगची कार्यवाही करावी.

## ७) मोबाईल संबंधित गुन्हे :

**अ) हरविलेला / चोरी गेलेला मोबाईल :**

– **तपास :**

१) ज्या व्यक्तीचा मोबाईल हरविलेला आहे त्या व्यक्तीकडून मोबाईल नंबर, मोबाईलची कंपनी, मॉडेल नंबर व आयएमईआय (**IMEI**) नंबर घ्यावा. आयएमईआय नंबर मोबाईल बिलावर लिहिलेला असतो.

२) सर्व मोबाईल सेवा देणाऱ्या कंपन्यांना पत्र पाठवून तो आयएमईआय नंबर ट्रेसिंगवर ठेवण्यास सांगावा जेणेकरून जरी समोरच्या संशयित व्यक्तीने सीमकार्ड बदलले तरी तो मोबाईल कुठल्या ग्राहकाकडे आहे ते ट्रेस होते व आपणास संशयिताची पूर्ण माहिती मिळू शकते.

३) परंतु त्याने जर सिमकार्ड बदललेच नसेल तर मात्र तो फोन ऑब्झर्वेशनवर ठेवून कोणाकोणाला कॉल करतो आहे ते समजेल कॉल केलेल्या व्यक्तीकडून आपणास संशयिताची माहिती मिळू शकेल.

## ब) अश्लील किंवा धमकीचे (SMS) चे गुन्हे :

अनेकदा मुलींना, स्त्रियांना अश्लील एसएमएस येतात किंवा अनेक व्यक्तींना धमकीचे किंवा लॉटरी लागल्याचे एसएमएस (SMS) येतात. या प्रकारच्या गुन्हयांसाठी पुढील पावले उचलावीत.

तपास

१) आलेल्या मजकुराची प्रिंटआऊट काढता आली तर ती काढावी अन्यथा मजकूर हाताने कागदावर लिहून घ्यावा.

२) एसएमएस (SMS) कुठल्या नंबरवरून आलेला आहे. त्याबद्दल संबंधित मोबाईल ऑपरेटरशी संपर्क करावा

व संशयिताची माहिती मिळवावी.

## ८) सायबर दहशतवाद :

सोशल नेटवर्किंगच्या माध्यमातून देशाच्या सार्वभौमत्वाला धोका पोहचविणे व दहशत पसरविणे किंवा एखाद्या विषयाला धरून समाजात असंतोष पसरविणे इ. गोष्टी यात येतात. तसेच देशाच्या सुरक्षा विभागाला किंवा महत्त्वाच्या शासकीय संकेतस्थळावर हल्ला करून देशाची व्यवहार तसेच दळणवळण यंत्रणा ठप्प करणे इ. प्रकार सुध्दा सायबर दहशतवादाचा भाग आहेत.

## गुन्ह्यातील संगणक जप्त करण्याच्या पद्धती (डिजिटल एव्हिडन्स) :

१) गुन्ह्याचे ठिकाण कळल्यानंतर तिथे पोहोचल्यावर सर्वप्रथम तिथल्या सर्व व्यक्तींना आहे त्या परिस्थितीमध्ये संगणक ठेवून तात्काळ बाजूला जाण्यास सांगावे.

२) संगणक तज्ज्ञांच्या मदतीने संगणकाचा पॉवरसप्लाय (विद्युत पुरवठा) बंद करून हार्ड डिस्क (Hard Disk) ताब्यात घ्यावी. तसेच सर्व वस्तूंची नोंद घेऊन संगणकाचे मागील सर्व कनेक्शन्स सील करावेत. हे करत असताना वेळोवेळी फोटो घ्यावेत.

३) संगणक जर बंद असेल तर तो चालू करू नये.

४) हातात ॲन्टीस्टॅटिक बेल्ट घालावा, तसेच स्टोअरिंग डिव्हाईस (हार्ड डिस्क) जवळ मोबाईल फोन किंवा मॅग्नेट ठेवू नये, नाहीतर डेटा नष्ट होऊ शकतो. तसेच जप्त केलेले स्टोअरिंग डिव्हाईसेस हे ॲण्टीस्टॅटिक बॅग्जमध्येच ठेवावेत.

## संगणक गुन्ह्यात झडती –जप्ती का आवश्यक आहे?

- ओळख पटविण्यासाठी,
- जप्त केलेली साधने जतन करणे,
- संगणकीय माहितीचा अन्वयार्थ लावणे, जप्त केलेला डाटा न्यायसहायक तज्ज्ञांना विश्लेषणासाठी आवश्यक भासू शकतो.

## काळजी घेण्याची आवश्यकता :

न्यायालयामध्ये सादर करण्यासाठी डाटा सुस्थितीत सांभाळणे आवश्यक आहे. हस्तगत केलेला डेटा महत्त्वाची लिंक देऊ शकतो.

## संगणकीय गुन्ह्याच्या तपासाचा अभ्यास करणे का आवश्यक आहे :

न्यायालयीन प्रक्रियामध्ये दाखल करण्यासाठी हस्तगत केलेला इलेक्ट्रॉनिक डेटा/पुरावा संबंधित तपासादरम्यान कशापध्दतीने गोळा करावा याचे तंत्रशुध्द प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे. संबंधित जागेची झडती घेण्याअगोदर त्याठिकाणी संगणक यंत्रणा गुन्हयाचे फळ (कोंट्राबॅन्ड) आहे का? किंवा संगणक यंत्रणा गुन्हयासाठी हत्यार म्हणून वापरली गेली का? हे निश्चित करण्यासाठी.

## झडती आणि जप्ती :

कोणत्या संगणकीय साधनांची झडती आणि जप्ती करावी हे निश्चित करणे आवश्यक आहे. कारण तपास करणाऱ्या संघाला त्यामुळे तपासात मदत होईल.

- हार्डवेअर जप्त करण्याची आवश्यकता आहे का?
- सॉफ्टवेअर जप्त करण्याची आवश्यकता आहे का?

- माहिती जप्त करण्याची आवश्यकता आहे का?
- सीपीयु स्पेअर पार्ट, हार्ड डिस्क, फ्लॉपी डिस्क, पेनड्राइव्ह इत्यादी साहित्य पोलिसांनी जप्ती करण्याची आवश्यकता आहे का?

## संगणकीय गुन्ह्यात खालील बाबींची ओळख पटविणे :

- यंत्रणेचा प्रकार
- वापरकर्त्यांची संख्या
- वापरण्याचा प्रकार
- गुन्हयाचा हेतू
- गुन्हे करणारी व्यक्ती/गट
- गुन्हेगार परंपरागत/पांढरपेशी

## झडतीची तयारी :

झडतीची तयारी यामध्ये पुढील बाबी आवश्यक आहेत.

- स्टील व्हिडिओ कॅमेरा
- हातमोजे
- पर्मनंट मार्कर
- सिलिंग मटेरिअल
- पॅकिंग मटेरिअल
- स्टेशनरी
- अंगुलीमुद्रा विकसित करण्याचे किट इ.

## झडती घेणे :

तपास करणाऱ्या संघाच्या प्रमुखाने विस्तृत योजना तयार करून संघाला इलेक्ट्रॉनिक पुरावे कशाप्रकारे सुरक्षित ठेवावेत, याबद्दल सूचना देणे. झडती घेण्याअगोदरची औपचारिकता पूर्ण करून घटनास्थळी गेल्यानंतर घटनास्थळ सुरक्षित ठेवावे व खालील महत्त्वाच्या बाबी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

- अंगुली मुद्रासाठी बोटांचे / पायांचे ठसे जेथे आहेत त्या भागाचे जतन करावे.
- संगणकात प्रवेशबंदी करावी.
- टेलिफोन लाईनपासून संगणक वेगळे करावे.
- संगणक 'ऑफ' असल्यास 'ऑन' करू नका.
- संगणक 'ऑन' असल्यास तज्ञांच्या मदतीने शट डाऊन करा.
- संगणक यंत्रणेचे घडयाळ जी तारीख, वेळ, दर्शविते ती नोंद करा.
- विशिष्ट यंत्रणा शटडाऊन कशी करावी हे कोणालाच माहिती नसल्यास- संबंधित स्थळाचे वायर कनेक्शनसह फोटो घ्या, नंतर पॉवर सप्लाय कट करा.
- डिसकनेक्ट करण्याअगोदर प्रत्येक वायरला लेबलिंग करा.
- रिकाम्या 'पोर्टला' 'व्हेकंट' असे लेबल लावणे.

स्टोरेज मीडियाची तज्ञांच्या साहाय्याने इमेज कॉपी घ्या. सिस्टिम सील करण्याअगोदर अनफॉरमेटेड रिकाम्या फ्लॉपी प्रत्येक ड्राईव्हमध्ये ठेवा. त्यांना ग्रुपमध्ये किंवा स्वतंत्ररित्या लेबलिंग करा व त्यांना नॉनप्लास्टिक कंटेनरमध्ये ठेवा.

ड्राईव्ह पेपर सीलसह सीलबंद करा. सर्व उपकरणांना लेबलिंग करा. झडती घेतलेल्या स्थळाचे फोटो घ्या. स्केच बनवा. उपकरण काळजीपूर्वक पॅक करा.

## नेटवर्क कॉम्प्युटर (सील) जप्त करण्यासाठीचे अतिरिक्त मुद्दे :

संगणक प्रकार ओळखा. झडती घेणाऱ्या संघासोबत तज्ज्ञ असणे आवश्यक आहे कारण त्याच्या मदतीशिवाय महत्त्वाचा पुरावा हाताळताना पुरावा नष्ट होण्याची शक्यता असते. संगणक एखाद्या व्यवसाय किंवा संस्था चालविण्यासाठी आवश्यक असतो अशा ठिकाणी जर गुन्हा घडला आणि संपूर्ण संगणक जप्त केला तर त्यांच्या कामावर परिणाम होऊ शकतो सोबत तज्ज्ञ असेल तर तो कोणती माहिती/ पुरावा म्हणून कॉपी करणे आवश्यक आहे, याबद्दल निर्णय घेऊन महत्त्वाचा डाटा/माहिती फ्लॉपी, सिडी, ऑप्टिकल डिस्क, झिप डिस्कपैकी कशात कॉपी करावी याबद्दल निर्णय घेईल.

## झडती /जप्तीदरम्यान घ्यावयाची काळजी :

- गुन्ह्याचे ठिकाण माहिती झाल्यानंतर तेथे पोहचल्यावर सर्वप्रथम तेथील सर्व व्यक्तींना आहे त्या परिस्थितीत संगणकापासून तत्काळ बाजूला जाण्यास सांगावे.
- संगणक तज्ञाच्या मदतीने संगणकाचा विद्युत पुरवठा बंद करून हार्डडिस्क ताब्यात घ्यावी. तसेच सर्व वस्तूंची नोंद घेऊन संगणकातील मागील सर्व कनेक्शन सील करावेत. हे करत असताना वेळोवेळी त्याची छायाचित्रे घ्यावीत.
- हातात अॅन्टीस्टेटीक बेल्ट घालावा तसेच स्टोरींग डिव्हाईस (हार्ड डिस्क) जवळ मोबाईल फोन किंवा मॅग्नेट ठेवू नये, नाहीतर डेटा नष्ट होऊ शकतो. तसेच जप्त केलेले स्टोरींग डिव्हाईसेस अॅन्टीस्टेटीक बॅग्जमध्येच ठेवावेत.
- घटनास्थळावरील सर्व कारवाईची नोंद लेखी स्वरूपात करा. त्यामध्ये त्या स्थळी केलेल्या फंक्शन/ऑपरेशन यांचे डिटेल्स घ्या.
- संशयित संगणकातील फ्लॉपी/स्टोरेज डिव्हाईस चेक करू नका.
- संगणक हाताळताना संशयिताची / मालकाची मदत घेऊ नका.
- पासवर्ड, युजरनेम यासाठी संशयितासह इतर व्यक्तींची तपासणी करा.
- ट्रॅश बॉक्स, किबोर्डच्या खाली, टेबल ड्रॉवर याखाली पासवर्डसाठी, युजरनेमसाठी झडती घ्या.
- प्रिंट आऊट, हस्तलिखित नोट ई.जे तपासासाठी अत्यंत महत्वाचे आहे त्या संपूर्ण स्थळाची झडती घ्या.
- संशयितासोबत असलेले सॉफ्टवेअर/प्रोग्रॅम यासाठी संपूर्ण भागाची झडती घ्या.
- केसच्या आवश्यकतेप्रमाणे संशयिताच्या आर्थिक व्यवहारांची त्या भागात झडती घ्या.
- गुन्हयाच्या अनुषंगाने संबंधित भागाची तेथे असलेल्या पुस्तकांसाठी झडती घ्या.

## जप्त केलेले संगणक पॅक करणे, वाहतूक करणे, स्टोअर करणे :

- माऊस आणि की बोर्डला पॉलिथीन कव्हरने झाका, संगणक खोक्यात ठेवा.
- प्रवासादरम्यान धक्के लागू नये म्हणून कारच्या मागच्या सीटवर ठेवा.

- धूळमुक्त व सुरक्षित ठिकाणी ठेवा.
- चुंबकीय क्षेत्रापासून स्टोरेज प्लेस लांब ठेवा.
- वेळ न दवडता जप्त केलेली संगणक साधनसामग्री तपासणीसाठी तज्ञांकडे पाठवा.

## इलेक्ट्रॉनिक पुरावा गोळा करण्यासाठी काय जप्त करावे :

- सीपीयु ज्यांना मॉनिटर आणि की बोर्ड जोडलेले आहे ते.
- विशिष्ट केसेसमध्येच की-बोर्ड, मॉनिटर जप्त करणे आवश्यक असते, कारण त्याच्यावर संशयिताचे बोटांचे ठसे मिळू शकतात.
- संगणकात फिट नसलेल्या हार्डडिस्क.
- कनेक्टर व जोडलेल्या वायरी
- मोडेम
- बाह्य उपकरणे व एक्स्टर्नल ड्रायव्हर
- वायरलेस नेटवर्क कार्ड
- डिजिटल कॅमेरा
- फ्लॉपी डिस्क / झिप ड्राइव्ह डिस्क
- बॅकअप टेप
- सिडी / डिव्हीडी / पेन ड्राईव्ह
- मेमरी कार्ड
- मोबाईल फोन
- संगणक कार्ड (सर्वसाधारणपणे वापरात नसलेले) इत्यादी

## उपकरणांच्या तपासणीमध्ये मदतपूर्ण बाबी :

- संगणक आणि सॉफ्टवेअर यांचे मॅन्युअल,
- पासवर्ड ज्यामध्ये आहे ते साहित्य,
- संगणक लॉक करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या 'कीज'

## जप्त केलेल्या प्रिंटआऊटच्या तुलनेसाठी :

- प्रिंटर, प्रिंटआऊट, प्रिंटिंग पेपर जे घटनास्थळावर सापडले त्याला आवश्यक असल्यास न्यायसहायक प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवावेत.
- सर्व पॉवर केबल, सॉफ्टवेअर सिडी जे PDA - (Personal Digital Asistant) सोबतचे/मोबाईल फोन सोबत असलेल्या.
- निगराणीसाठी तपासी अधिकारी मोबाईल चालू ठेवणे स्वीकारू शकतो.
- पुरावा मिळण्याची शक्यता असलेले सर्व इलेक्ट्रॉनिक उपकरणे
- मोबाईल फोन
- पेजर

- लँडलाईन फोन (मेमरी सुविधांसह)
- उत्तर देणाऱ्या मशीन
- फॅक्स मशीन
- डिजिटल कॅमेरा
- टेलिफोन इ-मेलर
- इंटरनेट कॅपेबल डिजिटल टीव्ही

## गुन्ह्यातील संगणक साधनसामग्री जप्त करणे व साठविण्याची पध्दत (डिजिटल एव्हिडन्स):

साठवणुकीमध्ये अडचणी येऊ नये म्हणून संगणक व इतर साधनसामग्री धूळ नसलेल्या खोलीमध्ये शक्य असल्यास वातानुकूलित खोलीत साठविणे. अनावश्यक संगणक साधनसामग्री जसे की, मॉनिटर, की -बोर्ड, माउस ई. जे पुराव्याच्या दृष्टीने आवश्यक नाही, त्याला ताब्यात घेऊ नये.

## अतिरिक्त काळजी घेणे का गरजेचे आहे?

संगणकीय वातावरणातील पुरावा 'सॉफ्ट' असल्याने सहज नष्ट होऊ शकतो किंवा त्याच्यात सहज बदल होऊ शकतो व त्यामुळे पुराव्याच्या दृष्टीने त्याचे महत्त्व कमी होऊ शकते.

## स्विच ऑफ मोडवर असलेले डेस्कटॉप आणि लॅपटॉप संगणक जप्त करणे :

- उपकरण असलेला भाग सुरक्षित व त्यावर नियंत्रण ठेवा.
- प्रिंटरला प्रिंटिंग पूर्ण करण्याची परवानगी द्या.
- संगणक व पॉवर सप्लाईजपासून लोकांना लांब ठेवा.
- संगणक 'ऑन' करू नका.
- संगणक 'स्विच ऑफ' असल्याची खात्री करा. कारण, काही स्क्रीनसेव्हर असे असतात की जे असे दर्शवितात की संगणक बंद आहे. परंतु संगणकाची सुरू असलेली लाईट हे दर्शविते की संगणक सुरू आहे.
- काही लॅपटॉपचे कव्हर ओपन केल्यावर ते चालू होतात तेव्हा काळजी घेणे आवश्यक आहे.
- लॅपटॉप संगणकाची बॅटरी काढा.
- सॉकेटमधून इतर संगणकीय साधनसामग्रीचे प्लग काढा.
- सर्व घटकांना लेबलिंग करा व छायाचित्र किंवा छायाचित्रिकरण करावे. कॅमेरा उपलब्ध नसल्यास सिस्टीमचे स्केच प्लॅन काढा.
- पोर्ट आणि केबल यांना लेबल करा जेणेकरून पुन्हा संगणक लावताना त्याची पुनर्रचना करता येईल.
- उपकरण काळजीपूर्वक काढा आणि मेन युनिट, स्क्रिन, की-बोर्ड यांचे युनिक आयडेंटीफायर नोंद करा कारण सर्वांचे युनिक आयडेंटीफायर वेगवेगळे असतात.
- सर्व उपकरणांवर लेबल लावून सह्या करा व त्यांना निशाणी द्यावी व त्याबद्दल शहानिशा करा. तसे न केल्यास वाद निर्माण होऊ शकतो व न्यायसहाय्यक परीक्षक त्याचे परीक्षण करण्यास नकार देऊ शकतात.
- डायरी, नोटबुक, पेपरचे तुकडे (ज्यावर पासवर्ड आहे) यासाठी झडती घ्या.
- वापरकर्त्याने (तेथे असल्यास) एखादा पासवर्ड सांगितल्यास तो काळजीपूर्वक नोंदवा.
- संगणक उपकरणांसंदर्भात घेतलेल्या प्रत्येक कृतीची नोंद घ्या.
- जोडलेले असेल तर मोडेम डिसकनेक्ट करा.

## 'स्वीच-ऑन' मोडवर असलेले डेस्कटॉप आणि लॅपटॉप संगणक जप्त करणे :

- संगणक 'नेटवर्क' असल्यास संगणक मालकाचा किंवा संगणक वापरकर्त्याचा सल्ला न घेता तज्ञांचा सल्ला घ्या.
- सर्व भागावर केबल लावा, फोटो घ्या, कॅमेरा उपलब्ध नसल्यास स्केच प्लॅन काढा, पोर्ट , केबल यांना लेबलिंग करा.
- इतर सर्व कनेक्शन काढून टाका.
- सर्व उपकरण काळजीपूर्वक काढा व युनिक आयडेंटीफायरची नोंद घ्या.
- सर्व उपकरणांना सह्या केलेले लेबल लावा व त्यांना निशाणी द्या. तसे न केल्यास वाद निर्माण होऊ शकतो व न्यायसहाय्यक परीक्षक त्याचे परीक्षण करण्यास नकार देऊ शकतात.
- तेथे वापरकर्ता असल्यास त्याला पासवर्ड विचारून तो काळजीपूर्वक नोंदवा.
- सर्व साहित्य थंड झाल्यावर काढावे.
- डायरी, नोटबुक, कागदाचे तुकडे (ज्यावर पासवर्ड आहे) यासाठी झडती घ्या.
- संगणक उपकरणासंदर्भातील केलेल्या सर्व कृतीची लेखी नोंद घ्या.
- स्क्रीनवर दिसणाऱ्या बाबी छायाचित्राद्वारे त्याचप्रमाणे लेखी नोंद घ्याव्यात.
- स्क्रीन रिकामी असेल किंवा त्यावर स्क्रीनसेव्हर असेल तर की-बोर्डला हात लावू नये किंवा माउसला क्लीक करु नये. तसे करणे आवश्यक असल्यास तज्ञाला विचारावे.
- असल्यास तपासी अधिकाऱ्याला स्क्रीन रिस्टोअर करायचे आहे का? याची तज्ञाला विचारणा करून त्याप्रमाणे कृती करणे. स्क्रीन रिस्टोअर केल्यास त्याच्या घटकाचे फोटो घेणे, त्याची नोंद घेणे.
- तज्ञाचा सल्ला उपलब्ध न झाल्यास संगणकाच्या पाठीमागून असलेला पॉवर सप्लाय काढून टाकावा, मात्र पॉवर सप्लाय काढतेवेळी प्रोग्रॅम, क्लोज डाऊन करू नये. संगणकाला जोडलेली बाजू काढावी, सॉकेटला जोडलेली काढू नये.

## रेकॉर्ड तपासणी :

घटनास्थळाची योजनाबध्द रितीने झडती घेण्यासाठी प्रत्येक कृतीची कार्यपध्दती ठरलेली आहे. चेकलिस्ट तयार करणे आवश्यक असते. जी तपासी अधिकाऱ्यास तपासादरम्यान नोट्स घेण्यास उपयुक्त ठरते. त्यावरून खालील बाबींसाठी ते उपयोगी ठरेल.

- घटनास्थळाची माहिती नोंद करणे - घटनास्थळावर कोण होते? कोण आहे? कोण निघून गेले? त्यांच्या कृतीचा घटनास्थळावर असेपर्यंतचा सारांश नोंदीमध्ये असावा.
- घटनास्थळाचे औपचारिक 'अधिकार हस्तांतरण व अधिकार ग्रहण'. उदा. प्रथम पोलीस अधिकाऱ्याकडून घटनास्थळ तपासी अधिकाऱ्याकडे किंवा घटनास्थळ व्यवस्थापक यांच्याकडे याची माहिती होईल.
- घटनास्थळावरील वातावरणाची स्थिती.
- घटनास्थळावरील क्रिया व निरीक्षण यांची यादी.
- निशाणी दिलेल्या वस्तुंची यादी.
- घटनास्थळाचे कच्चे स्केच.
- घटनास्थळावर घेतलेल्या छायाचित्रांची यादी.
- तपासणीमध्ये सहभागी तज्ञांची यादी आणि त्यांनी त्यासाठी खर्ची घातलेला वेळ.
- घटनास्थळी आलेल्या तज्ञाने घटनास्थळाची तपासणी व इतर तपासणी करून दिलेले प्राथमिक मत (इनिशियल फाईंडींग).

# प्रकरण – २०

# पुराव्यांचा तक्ता
# (कॅलेंडर ऑफ इव्हिडंस)

**कॅलेंडर ऑफ इव्हिडंस –**

**पुराव्याचा तक्ता – कोणत्या आरोपीविरुद्ध किती व काय पुरावा आहे याचा तक्ता.**

गुन्हा दाखल झाल्यानंतर फिर्यादी व साक्षीदारांनी केलेले आरोप व तपासामध्ये निष्पन्न झालेले आरोपी यांच्या विरोधात गुन्ह्या संदर्भाने भा.दं.वि. तसेच किरकोळ कायदेन्वये त्यांच्या विरोधात मिळालेले पुरावे याचे वर्गीकरण करून प्रत्येक आरोपीचा पुराव्याचा तक्ता तयार करणे म्हणजेच कॅलेंडर ऑफ इव्हीडंस होय.

## दस्ताऐवजी पुरावे

१) प्रथम खबर
२) घटनास्थळ पंचनामा (भौतीक, परिस्थितीजन्य पुरावा)
३) इक्वेस्ट पंचनामा
४) साक्षीदारांचे जबाब त्यानुसार गुन्ह्याचा अगर मालमत्तेचा गुन्हेगारासह लागलेला छडा.
५) घटनास्थळाचा नकाशा
६) मेमोरंडम पंचनामा
७) मृत्युपूर्व जबाब
८) कबुली जबाब
९) माफीचा साक्षीदार
१०) ओळख परेड
११) हस्ताक्षर तज्ञांचा अहवाल
१२) फिंगर प्रिंट तज्ञांचा ट्रेस मेमो
१३) शस्त्रास्त्र तज्ज्ञाचा अहवाल
१४) सीए तपासणी अहवाल
१५) विविध तज्ञांचे अहवाल
१६) वैद्यकीय अधिकाऱ्यांचे दाखले
१७) श्वान पथकाचा रिपोर्ट
१८) चोरीची मालमत्ता ज्यास विकली सोनार वगैरे साक्षीदार.
१९) फोटोग्राफी, व्हिडीओ शुटींग

.................... पो. ठाणे भाग – ५ गु.र.नं. ..................... भा.दं.वि.क.

मधील आरोपींविरुद्ध पुरावा तक्ता नमुना – अ (आरोपी प्रमाणे)

| अ.नं. | आरोपींचे नाव | कायदा कलम | थोडक्यात व्याख्या | कलमाप्रमाणे निष्पन्न कृती | आरोपी सिध्दकरण्याकामी उपलब्ध पुरावा | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | तोंडी पुरावा | दस्ताऐवजी पुरावा | परिस्थिती जन्यपुरावा | तांत्रिक पुरावा | वैद्य. पुरावा |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | | | | | | |

.................... पो. ठाणे भाग – ५ गु.र.नं. ..................... भा.दं.वि.क.

मधील आरोपीतांविरुद्ध पुरावा तक्ता नमुना – ब (आरोपी प्रमाणे)

| अ.नं. | कायदा कलम | थोडक्यात व्याख्या | कलमाप्रमाणे निष्पन्न कृती | आरोपी सिध्दकरण्याकामी उपलब्ध पुरावा | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | तोंडी पुरावा | दस्ताऐवजी पुरावा | परिस्थिती जन्यपुरावा | तज्ञांचा अभिप्राय | वैद्य. पुरावा |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |

# प्रकरण – २१

# दोषारोपपत्र (पोलीस तपासाचा अहवाल)

**Police Report of Investigation**
**(Cr. P.C. Sec. 173, 468, 469, 470, 472, 473)**

## उद्दिष्टे :

Cr. P.C. Sec. 173 – तपास पूर्ण झाल्यावर पोलीस अधिकाऱ्याचा अहवाल.
Cr. P.C. Sec. 468 – मुदतमर्यादा उलटून गेल्यानंतर दखल घेण्यास आडकाठी.
Cr. P.C. Sec. 469 – मुदतमर्यादेची सुरुवात.
Cr. P.C. Sec. 470 – विवक्षित प्रकरणी अवधी वगळणे.
Cr. P.C. Sec. 472 – सतत चालू राहाणारा अपराध.
Cr. P.C. Sec. 473 – विवक्षित प्रकरणी मुदत मर्यादा वाढवणे.

१. दोषारोपपत्र दाखल करताना कोणत्या गुन्ह्यात मंजुरी घ्यावी ते सांगू शकाल.

२. दोषारोप पत्रातील सर्व कॉलममधील माहिती अचुक व तंतोतंत भरल्यास आरोपीस निर्दोष सुटण्याकरिता फायदा कसा होत नाही हे सांगू शकाल.

३. कोणत्या गुन्हयात किती दिवसात दोषारोपपत्र दाखल करावे ते सांगू शकाल.

दखलपात्र गुन्हयाचा तपास संपल्यानंतर सी.आर.पी.सी. कलम १७३ (२) प्रमाणे तपासाचा अहवाल न्यायाधीशाकडे पाठविण्यात येतो. यात तपासाचा अहवाल म्हणजे दोषारोपपत्र व अखेरचा अहवाल यांचा समावेश होतो.

दोषारोपपत्र एका गुन्हयात कितीही दाखल करता येतात. यावर कायद्याचे बंधन नाही. प्रथम दाखल करण्यात येणाऱ्या दोषारोप पत्रास प्रोव्हिजनल चार्जशिट असे म्हणतात. व त्यानंतर दाखल करण्यात येणाऱ्या दोषारोपांना पुरवणी दोषारोपपत्र किंवा सप्लिमेंट्री चार्जशिट असे म्हणतात.

ज्या गुन्हयास १० वर्षाच्या आतील कैदेची शिक्षा सांगितलेली आहे अशा गुन्हयात आरोपी अटक केले दिवसापासून ६० दिवसांचे आत.

ज्या गुन्हयात १० वर्ष व त्यापेक्षा जास्त जन्मठेप अगर मृत्यूदंडाची शिक्षा दिलेली असेल अशा गुन्हयात आरोपीस अटक केल्याच्या दिवसापासून ९० दिवसांचे आत दोषारोपपत्र दाखल केले पाहिजे.

ज्या गुन्हयात ३ वर्षाच्या आत कैदेची शिक्षा सांगितलेली आहे. अशा गुन्हयात ३ वर्षाच्या आत दोषारोप पत्र दाखल केले पाहिजे. व ज्या गुन्हयात ३ वर्षापेक्षा जास्त कैदेची शिक्षा सांगितलेली आहे अशा गुन्हयात मर्यादा नाही. मुदतीत दोषारोपपत्र न पाठविल्यास आरोपीतास जामिनावर मुक्त होण्याचा अधिकार प्राप्त होतो.

तपासाअंती 'ब' वर्गात अखेरचा अहवाल सादर केल्यानंतर न्यायालयाने फिर्यादीस बोलावून त्याबाबतीत त्याचे म्हणणे ऐकून घेऊन व तशी कारणे नमूद करूनच 'ब' वर्गात अखेर सारांशरूपाने सर्व काही किंवा शेवटचा अहवाल मंजूर करणे गरजेचे आहे. याबाबतीत पाहा : के. पी. एस. गिल वि. रूपम देवल बजाज ए.आय.आर १९९६ सर्वोच्च न्यायालय.

सी.आर.पी.सी.कलम ४६८ प्रमाणे ठरवून दिलेल्या मुदतीत दोषरोपपत्र न चुकता न्यायालयात पाठवावे. जर तपास अपूर्ण असेल तर राहिलेला तपास पूर्ण करून त्या घटनेचे पुरवणी दोषारोपपत्र नंतर पाठवावे. बऱ्याच कागदपत्रावर तपासी अंमलदार व प्रभारी अधिकारी यांच्या स्वाक्षरी नसल्याने केसेस सुटतात. बऱ्याच दोषारोप पत्रामध्ये आरोपी अटकेचा अचूक दिनांक व वेळ लिहिलेली नसते म्हणून आरोपी निर्दोष सुटतात.

काही साक्षीदारांची नांवे जाणून बुजून किंवा विस्मरणाने साक्षीदारांच्या कॉलममध्ये लिहिली जात नाहीत. त्याउलट आरोपींची नावे साक्षीदारांच्या कॉलममध्ये व साक्षीदारांची नांवे आरोपींच्या कॉलममध्ये लिहिली जातात.

काही वेळेला पुराव्यासाठी आवश्यक असलेले कागदपत्रे जाणूनबुजून किंवा विस्मरणाने मूळ कागदपत्र जोडले जात नाहीत.

काही तपासी अंमलदार हेतूपुरस्कर गुन्हयाचे मूळ कागदपत्र गहाळ करतात. त्यामुळे त्याचा फायदा आरोपीस मिळत असतो.

घटनेप्रमाणे प्रत्येक मुद्यावर तपास पूर्ण करूनच दोषारोपपत्र पाठवावे. अपूर्ण पुरावा असलेले दोषारोपपत्र पाठवू नये.

आरोपीने गुन्हा केल्याचा प्रथमदर्शनी पुरावा नसतानासुध्दा दोषारोपपत्र पाठविण्यात येते. अशा खटल्यात आरोपी निर्दोष सुटतात. म्हणून अशा गुन्हयाचा ''अ'' वर्गात अखेर अहवाल पाठवावा. मात्र तपासी अंमलदार वरिष्ठांच्या भीतीमुळे अखेरचा अहवाल पाठविण्याचा धोका पत्करित नाहीत.

फिर्यादीमध्ये ३ आरोपींचा उल्लेख असताना फक्त दोन आरोपींना अटक केली व तिसऱ्या आरोपी बद्दल काय केले याबाबत तपासी अंमलदाराने न्यायालयास कोणतीच माहिती दिली नाही. या कारणास्तव आरोपींना निर्दोष सोडण्यात आले. म्हणून प्रत्येक आरोपी बाबत उपलब्ध पुराव्याप्रमाणे न्यायालयास अवगत करणे आवश्यक आहे.

सर्व शासकीय सेवकांविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याखालील गुन्हयात तसेच सरकारी काम करीत असताना घडलेल्या गुन्हयात दोषरोपपत्र दाखल करण्यापूर्वी त्यांचे सक्षम प्राधिकारी यांची पूर्वमंजुरी घेऊनच दोषारोपपत्र दाखल करावे.

इंडियन आर्मस् ॲक्ट खालील गुन्हयातसुध्दा खटला दाखल करण्यापूर्वी जिल्हा दंडाधिकारी / पोलीस आयुक्त यांची पूर्वमंजूरी घेवूनच खटला दाखल करावा. तसेच ज्या गुन्हयात शासनाची पूर्वपरवानगी घेऊन दोषारोप पाठविणे गरजेचे आहे अशा खटल्यात पूर्वपरवानगी घेतल्याखेरीज दोषारोप पाठवू नये. भा.दं.वि. कलम १२४, १५३ वगैरे.

## गुन्ह्याचा तपास पूर्ण करणे व त्याची विल्हेवाट

तपास पूर्ण झाल्यानंतर तपासी अधिकाऱ्याने त्याबद्दलचा अहवाल कार्यक्षेत्र असलेला न्यायालयाकडे पाठविला पाहिजे. एखाद्या गुन्ह्याची पूर्तता त्या अहवालांवर अवलंबून असते. हा अहवाल किती शास्त्रोक्त पध्दतीने तयार केला आहे, किती अचूक व परिणामकारकरित्या आहे, किती ग्राह्य पुरावा त्यात दिसून येतो हे महत्त्वाचे आहे.

खालील प्रश्नांची उत्तरे मिळाली की गुन्ह्याचा तपास पूर्ण झाला आहे असे म्हणता येईल

१. गुन्हा घडला आहे काय?

२. जर गुन्हा घडला असेल तर कोणी? केव्हा? कुठे? व कशा पध्दतीने गुन्हा केला आहे.

३. न्यायालयासमोर खटला पाठविण्याइतका पुरावा आहे काय?
जर तपासी अधिकारी तपास पूर्ण केल्यानंतर खालील निष्कर्षाप्रत आला.

१. कुठलाही गुन्हा घडलेला नाही.

२. गुन्हा घडला आहे; पण कोणी केला हे उघडकीस येऊ शकत नाही किंवा तपास पुढे चालू ठेवणे शक्य नाही. (आरोपी मृत पावला आहे.)

कलम १७३ क्रि.प्रो.कोड मध्ये असे नमूद केलेले आहे की, प्रकरण १२ क्रि.प्रो.कोड याप्रमाणे केलेला प्रत्येक तपास हा कारण नसतांना उशिरा केलेला नसेल आणि तपास पूर्ण करण्यात, आरोपपत्र पाठविण्यात व शेवटचा अहवाल (समरी) पाठविण्यात जर कारण नसतांना केलेला उशीर हा कायद्याचा मूळ तत्त्वाच्या विरुध्द आहे. सर्व तपास हे कलम ४६८ क्रि.प्रो.कोड मध्ये नमूद केलेल्या वेळेच्या बंधनातच पूर्ण केले पाहिजेत. नाहीतर कुठलेही न्यायालय या वेळेनंतर त्या गुन्ह्याची दखल घेणार नाही.

वेळेच्या बंधनाबाबत प्रकरण ३७, कलम ४६९ ते ४७२ क्रि.प्रो. कोड असे आहे.

१. ६ महिन्याचा अवधी जर गुन्ह्यास फक्त दंडाची शिक्षा असेल.

२. १ वर्षाचा अवधी जर गुन्ह्यास शिक्षा १ वर्षापर्यंत असेल.

३. ३ वर्षाचा अवधी जर गुन्ह्यास शिक्षा ३ वर्षापर्यंत असेल जर शिक्षा ३ वर्षापेक्षा जास्त असेल तर त्यास वेळेचे बंधन नाही.

वेळेच्या बंधनानंतर जर आरोपपत्र पाठविले तर सरकारी पक्षास उशिराचे कारण स्पष्ट करावे लागेल. न्यायालयाने उशीर होण्याबाबत कारणमिमांसा केली पाहिजे व त्याबाबत त्याचे समाधान झाले पाहिजे.

जरी कायद्याचे वेळेचे बंधन खूप शिथिल असले तरी याचा अर्थ असा नाही की, गुन्ह्यांची प्रकरणे शेवटच्या क्षणापर्यंत रेंगाळत ठेवावीत. अंतिम अहवाल लवकरात लवकर पाठविला पाहिजे.

कलम १६७(५) क्रि.प्रो.कोड प्रमाणे ज्यावेळी पोलीस अधिकारी एखाद्या इसमास समन्स केसमध्ये अटक करतात व जर तपास ६ महिन्यांचे आत पूर्ण झाला नाही तर असा इसम कोठडीत असो किंवा जामिनावर असो न्यायाधीश हे तपास बंद करण्याचा आदेश देऊ शकतात व अशा आदेशावर पुढील तपास करण्याचा हुकूम फक्त सत्र न्यायालयच देऊ शकते, म्हणून अशा गुन्ह्यामध्ये तपास त्या मुदतीतच पूर्ण होईल याची खात्री करावी. ज्या वेळी आरोपीस मुद्देमालासह रंगेहाथ पकडले जाते, अशा गुन्ह्यामध्ये सर्वसाधारणपणे आरोपपत्र पाठविण्यास उशीर होऊ नये. कलम १६७(२)(अ) क्रि.प्रो.कोड अन्वये जर आरोपपत्र ६० किंवा ९० दिवसांच्या आत (ज्याप्रमाणे गुन्ह्यासाठी मुदत असते) पाठविले नाही तर न्यायालयास आरोपीस जामिनावर सोडण्याचे अधिकार आहेत. म्हणून तपास अधिकाऱ्याने गुन्ह्याचा तपास ६० किंवा ९० दिवसांच्या आत (जशी मुदत असेल त्याप्रमाणे) मुदतीत पूर्ण करावा. जर या मुदतीत तपास पूर्ण झाला नाही तर आरोपी जामिनाचा हक्क प्राप्त होतो. म्हणून आरोपी कोठडीत राहावा यासाठी तपास गतीने करावा मात्र आरोपी कोठडीत राहावा म्हणून अर्धवट आरोपपत्र पाठवू नये.

कलम १७३ (८) क्रि.प्रो.कोड अन्वये पुरवणी आरोपपत्र पाठविण्याची तरतूद आहे. हा पर्यायी आरोपपत्र पाठविण्याची सोय नाही. या तरतुदीचा उपयोग फक्त जर नवीन व जादा पुरावा गुन्ह्यामध्ये मिळाला की जो पुरावा प्रथम आरोपपत्र पाठविताना माहीत नव्हता असा पुरावा सादर करण्यासाठी आहे.

तपास हा कारणाशिवाय उशीर न करता पूर्ण केला पाहिजे. तपास अधिकाऱ्याने पुराव्याचा अभ्यास करून स्वत: निर्णय घेऊन प्रत्येक आरोपीवरील जबाबदारी नक्की केली पाहिजे.

आरोपपत्र हे ठाणे अंमलदार / तपास अधिकारी यानेच तयार केले पाहिजे व न्यायालयासमोर दाखल केले पाहिजे; मात्र काही राज्यात इतर अधिकाऱ्यांना (सहा. उपनिरीक्षक) यांना काही ठराविक गुन्ह्यात आरोपपत्र

पाठविण्याची परवानगी दिलेली आहे. महाराष्ट्रात आरोपपत्र प्रभारी ठाणे अंमलदार व सहा. पोलिस आयुक्त यांचे मार्फतीने सादर केले जाते.

तपास अंमलदाराने तपास केलेल्या गुन्ह्याचा सविस्तर अहवाल तयार करून त्यात पुरावा कशा प्रकारचा आहे, प्रत्येक आरोपीवरील जबाबदारी किंवा इतर गोष्टी, सर्वसाधारण आरोपीचा बचाव काय असू शकतो आणि त्याची सत्यता इ.बाबत व शेवटी काय कारवाई करू शकतो याबाबत त्या अहवालात सविस्तर चर्चा करावी.

तपास केलेली प्रत्येक केस कोर्टासमोर पाठवायची तपास अधिकाऱ्याचे काम आहे व ते करताना फक्त टपालाची भूमिका घेऊ नये. त्याचबरोबर खटला चालू असताना ज्याप्रमाणे न्यायाधीश प्रत्येक पुराव्याची बारीकपणे तपासणी करतात, तसेही तपास अधिकाऱ्याने वागू नये. पुरेसा पुरावा उपलब्ध आहे याचा अर्थ आरोपीस शिक्षा होऊ शकते असा नाही. परंतु त्या पुराव्याच्या आधारावर आरोपीवर खटला चालविला जाऊ शकतो. ज्यावेळी कोणत्या पुराव्यावर विश्वास ठेवावा याबाबत संशय असेल अशा वेळी ठाणे अंमलदाराने न्यायालयासमोर प्रकरण पाठवावे कारण अशा तऱ्हेचा संशय दूर करण्याचा अधिकार न्यायालयाचा आहे. ज्यावेळी एखाद्या प्रकरणांत दोन मते शक्य असतात, तेव्हा प्रकरण खटला चालविण्यासाठी कोर्टासमोर पाठवावे. सर्वसाधारण पुराव्याचे आधारे खालील गुन्हे असतील तर त्या प्रकरणात आरोपपत्र पाठवावे.

अ) ज्यावेळी सकृतदर्शनी गुन्ह्याची शक्यता आहे.

ब) ज्यात काही प्रकारचा कायदेशीर पुरावा उपलब्ध आहे व ज्यामुळे गुन्ह्यास बळकटी येईल आणि जर त्यावर विश्वास ठेवला गेला तर शिक्षा होऊ शकेल.

क) ज्यावेळी पुराव्याची स्थिती अशी असेल की, साधारण संशयाचा फायदा आरोपीस मिळू शकेल-

तपास पूर्ण झाल्यानंतर ठाणे अंमलदार गुन्ह्याची सर्व कागदपत्रे सरकारी वकील / दुय्यम सरकारी वकील याच्याकडे पाठवून गोळा केलेला पुरावा हा आरोपपत्र पाठविण्यास पुरेसा आहे काय याबाबत मत घ्यावे. त्याचप्रमाणे स्वत: भेटून चर्चा करावी. सरकारी वकील सदर प्रकरणाचा अभ्यास करून त्याचे मत देतील. जर अधिक तपासाची गरज असेल तर मार्गदर्शन तत्त्वाप्रमाणे त्याचे मत देतील. जर पुरावा आरोपपत्र पाठविण्यास पुरेसा असेल तर आरोपपत्राचा काय मसुदा ठेवावा याबाबत मार्गदर्शन घ्यावे. सरकारी वकिलाकडून ही माहिती आल्यानंतर ठाणे अंमलदार आरोपपत्र पाठवतील किंवा सांगितल्याप्रमाणे अधिक तपास करतील. जर अधिक तपास सांगितला तर तो पूर्ण करून परत कागदपत्रे पुन्हा एकदा सरकारी वकिलांकडे आरोपपत्राचा मसुदा घेण्यासाठी पाठविली जातील. साध्या व लहान गुन्ह्यात ठाणे अंमलदार स्वत:च आरोपपत्र पाठवू शकतात; परंतु खटला सरकारी वकिलांनी यशस्वीरित्या व जबाबदारीपूर्वक चालवावा अशी ज्यावेळी पोलिसांची अपेक्षा असते त्यावेळी मात्र सरकारी वकिलांना अहवाल पाठविणे, मत घेणे इत्यादी पध्दत अनुसरली पाहिजे. मात्र सरकारी वकिलाचा सल्ला हा मानलाच पाहिजे असा नियम नाही व त्याचप्रमाणे सरकारी वकिलांनी दिलेल्या सल्ल्याप्रमाणे कारवाई केली पाहिजे अशी काही कायदेशीर बंधन नाही.

तपास पूर्ण झाल्यानंतर वर सांगितल्याप्रमाणे कागदपत्राची छाननी झाल्यानंतर कलम १७३(२) क्रि.प्रो.कोड प्रमाणे गुन्ह्यात तपासाअंती गुन्हा घडला असो अथवा नसो तरी पोलिसांनी आपला अहवाल सादर केला पाहिजे. ज्यावेळी गुन्हा घडण्याचा प्रकार दिसून येतो व आरोपीविरुध्द पुरावा असतो त्या अहवालास आरोपपत्र म्हणतात; ज्यात गुन्हा झालेला नाही असे दिसून येते त्या अहवालास माहितीसाठी अहवाल म्हणतात, तपासाचा शेवट हा कलम १७२(२) अन्वये न्यायालयात पाठविलेल्या अहवालाने होतो.

## आरोपपत्र :

आरोपाच्या मसुद्यावर संबंधित पक्षांची पूर्ण नावे व पत्ते, माहितीचे स्वरूप (फिर्यादीचे स्वरूप) साक्षीदारांची पूर्ण

नावे व पत्ते व काही गुन्हा निष्पन्न झाला आहे काय? असल्यास कोणी केला आहे इ. माहिती असणे आवश्यक आहे. या आरोपपत्रात आरोपीस अटक झाली आहे काय? त्यास कोठडीत पाठविले आहे काय? किंवा त्यास जामिनावर सोडले आहे काय? सोडले असल्यास स्वत:चे बंधनपत्रावर की जामीनदारावर इत्यादी माहिती दिली पाहिजे. आरोपपत्राच्या योग्य रकान्यांत जे आरोपी फरारी असतील त्याची नावे लाल शाईने लिहावीत. आरोपपत्रावरील सर्व रकान्यातील माहिती व्यवस्थित दिली आहे की नाही याची खात्री करून घ्यावी. कुठलाही रकाना रिकामा नसावा. आरोप हे थोडक्यात व स्पष्ट असावे. या आरोपात गुन्ह्याची तारीख, वेळ, जागा व कशा प्रकारे गुन्हा केला आहे हे नमूद करावे.

न्यायालयात आरोपपत्र पाठविताना त्याच्याबरोबर एक वेगळी यादी त्यात साक्षीदारांची नावे व पत्ते जे आरोपपत्रात नमूद केली आहेत ते व प्रत्येक साक्षीदार हा नेमका काय मुद्दा सिध्द करण्यासाठी बोलविला आहे याबाबत माहिती असावी. मूळ कागदपत्रे जर आरोपपत्रापूर्वी पाठविली नसतील तर ती आरोपपत्राबरोबर पाठविली पाहिजेत.

ठाणे अंमलदार हे ज्या कागदपत्रावर सरकारी पक्ष अवलंबून राहणार आहे अशा सर्व कागदपत्रांच्या नकला आरोपीस देतील. अशा प्रकारची कुठलीही प्रत / प्रती न देणे व त्यामुळे आरोपीस बाधा आणेल व सरकारी पक्षाची बाजूस धोका तयार करेल. जर कुठली कागदपत्रे नजरचुकीने दिली गेली नसतील तर ती नंतर आरोपीस देऊन, त्याचा अभ्यास करण्याची व उलट-तपासणी घेण्याची संधी त्यास उपलब्ध करून द्यावी.

जर तपास अधिकाऱ्याचे असे मत असेल, की जबाबातील काही भाग हा चौकशी किंवा खटल्याच्या मुद्याशी संबंधित नसेल, किंवा तो आरोपीस सांगणे / कळणे हे न्यायप्रक्रियेत गरजेचे नाही, किंवा जनतेच्या भल्यासाठी योग्य नाही, तर प्रत देतांना त्या प्रतितून तो भाग तो गाळेल व अशा परिस्थितीत त्या नकलांमधून / प्रतीतून तो भाग का गाळला आहे त्याची कारणे देऊन न्यायालयास चौकशी / खटला सुरू होण्याआधी तसा अहवाल सादर करतील. न्यायमूर्ती त्यानंतर गाळलेल्या भागाचे अवलोकन / अभ्यास करून व पोलीस अधिकाऱ्याने दिलेला अहवाल विचारात घेऊन योग्य तो निर्णय देतील आणि जर एखादा गाळलेला भाग किंवा त्याचा काही भाग त्यात योग्य वाटेल तितका आरोपीस न देण्याबाबत हुकूम देतील.

जर एखादा आरोपी आरोपपत्र पाठविताना फरारी असेल तर ठाणे अंमलदाराने आरोपपत्राबरोबर एक अहवाल पाठवावा व त्यांत न्यायाधीशांनी आरोपीविरुध्द अटकेसाठी आजामीनपत्र वॉरंट काढण्याबाबत विनंती करावी. जर योग्य वेळात हे आजामीनपत्र वॉरंट बजावता आले नाही तर, तपास अधिकाऱ्याने न्यायालयाकडे कलम ८२ व ८३ क्रि.प्रो. कोडप्रमाणे कारवाई करण्याबाबत पावले उचलावीत. जर असे सिध्द झाले की, कलम ८२,८३ क्रि.प्रो.कोडचे कारवाईनंतरसुध्दा आरोपीस अटक होणे हे नजीकच्या काळात शक्य नाही तर आरोपीचे गैरहजेरीत कलम २९९ क्रि.प्रो.कोडप्रमाणे सरकारी साक्षीदारांचे साक्षी नोंदवून घेण्याची कारवाई व्हावी, त्यानंतर न्यायालय सदर प्रकरणाची नोंद एका वेगळ्या नोंदवहीत "जास्त विलंबाची प्रकरणे" या मध्ये नोंदवावे. जर भविष्यात सदरहू आरोपीस अटक झाली किंवा तो न्यायालयासमोर हजर झाला तर ते प्रकरण नवा खटला प्रचलित कायद्यानुसार चालविला जाईल. अशावेळी पूर्वी आरोपीचे गैरहजेरीत नोंदविलेली साक्ष आरोपीस अटक झाल्यानंतर त्याचेविरुध्द चौकशीत किंवा खटल्यात पुरावा म्हणून सादर करता येईल. जर साक्षीदार मयत झाला असेल, किंवा साक्षीदार येण्यास असमर्थ असेल किंवा त्या साक्षीदाराची उपस्थिती विनाविलंब मिळविणे शक्य नसेल किंवा त्याला आणण्यासाठी होणारा खर्च, अडचणी जर त्या गुन्ह्याचे परिस्थितीत अयोग्य असतील तर.
ज्या इसमाचे विरुध्द अटक करण्याबाबतचे फर्मान (वॉरंट) न्यायालयाने दिले आहे त्याच्याविरुध्द कलम ८२ क्रि.प्रो. कोडप्रमाणे जाहीरनामा काढता येतो.

तपास अधिकाऱ्यास सदर आरोपीचे विरुध्द अटक फर्मान करता येत नाही व त्याबाबत केलेल्या कारवाईचा समग्र अहवाल व सदर इसम हा अटक टाळण्यासाठी कुठेतरी लपून बसला आहे इत्यादी मुळे आरोपीस अटक करता येत नाही, असा अहवाल देऊन न्यायालयाचे समाधान करावे लागेल आणि यासाठी तपास अधिकाऱ्यांस पुढाकार घ्यावा लागेल.

एकदा का जाहीरनामा जारी झाला की तो त्वरित प्रसिध्द करावा. फरारी घोषित करण्याचा जाहीरनाम्याबरोबरच कलम ८३ क्रि.प्रो. कोडप्रमाणे हजर होण्यासाठी ३० दिवसांची मुदत दिलेली असते. जे न्यायालय फरारी जाहीरनामा काढते तेच न्यायालय सदर फरारी आरोपीची स्थावर मालमत्ता जप्त करण्याबाबत कधीही हुकूम देऊ शकतात. फरारी घोषित केल्याचा जाहीरनामा योग्य तऱ्हेने दिल्यानंतर जप्तीचा हुकूम त्वरित अंमलात आणावा जेणेकरून आरोपीस ती मालमत्ता हस्तांतरित, ग्राह्य, लपवून ठेवणे किंवा दुसऱ्याचे स्वाधीन करण्यास वेळ मिळणार नाही.

कलम ८२ क्रि.प्रो.कोडप्रमाणे घोषित केलेला जाहीरनामा हा त्या कलमात नमूद केल्याप्रमाणे मुक्तपणे प्रसिध्द करावा. फरारी किंवा वॉरंट न बजावता परत आलेल्या आरोपींना पकडण्यासाठी त्यांना आसरा देणाऱ्या लोकांवर कडक निगराणी ठेवणे गरजेचे आहे. जे कोणी स्वत:च्या इच्छेने किंवा जाणूनबुजून अशा इसमास सहारा देतात त्यांच्यावर कलम २१६ भा.दं.वि.प्रमाणे कारवाई होऊ शकते. आणि म्हणून कलम ८२ क्रि.प्रो.कोडप्रमाणे जारी केलेल्या जाहीरनाम्यास खूप प्रसिध्दी देण्यात यावी. जेणेकरून त्यांना सहारा (मदत) करणाऱ्या विरुध्द कलम २१६ भा.दं.वि.प्रमाणे कारवाई करताना अशा लोकांना ही माहिती होती हे सिध्द करणे शक्य होईल.

## बाल गुन्हेगार (लहान मुले) :

ज्यावेळी कोणी बाल-गुन्हेगारास अटक केली जाते किंवा त्याच्यावर खटला भरला जातो त्यावेळी पोलीस अधिकाऱ्याने त्याच्या वयाबाबतची माहिती न्यायालयास न चुकता द्यावी, जेणेकरून न्यायालयास त्या बालगुन्हेगाराचे वय बालन्याय (लहान मुलांचे संरक्षण व कायदा) कायदा २००० अन्वये त्याचे वय ठरविता येईल.

## आरोपपत्रातील मजकूर :

आरोपपत्राचा मसुदा खालील मुद्यावरील माहितीसह काळजीपूर्वक भरला पाहिजे-

१. खटल्यातील पक्षकारांची नावे व गुन्हा घडल्याबाबतची सविस्तर हकिगत (उत्तर प्रदेश सरकार V/S आशानंद १९६२ (१) क्रि. लॉ. ज. ६२३ अलाहाबाद.)

२. माहिती देणाऱ्याचे नाव व माहितीचे स्वरूप. (ली v/s अधिकारी ३७ उ ४९).

३. आरोपीची संपूर्ण नावे व पूर्ण पत्ते.

४. जे आरोपी कोठडीत आहेत व जामिनावर आहेत ते वेगवेगळे दाखवावेत.

५. फरार / पळून गेलेल्या आरोपींची नावे लाल शाईत लिहावीत.

६. गुन्ह्यात दाखविण्यात येणारी जप्त केलेली मालमत्ता व त्या इसमांची नावे.

७. साक्षीदारांची संपूर्ण नावे, वडिलांची नावे व जर मालमत्ता ही कोणाचे ताब्यात दिली असेल तर त्याप्रमाणे त्याची माहिती.

८. पूर्वीच्या शिक्षेबाबत माहिती.

९. गुन्ह्याची माहिती सांघिक स्वरूपात व गुन्ह्याच्या पुराव्याबाबत माहिती. साक्षीदारांच्या म्हणण्याचा गोषवारा देण्याची गरज नाही. (बालसुंदरम १९३० १९१)

१०. तपास अधिकाऱ्याने आरोपपत्रावर आपला हुद्दा, सही व तारीख घालावी.

११. आरोपीस दिलेल्या कागदपत्राची यादी व ती मिळण्याबाबत आरोपीची सही याची यादीपण आरोपपत्राबरोबर द्यावी.

## आरोपपत्राबरोबर दस्ताऐवज :

आरोपपत्राबरोबर खालील कागदपत्रे जोडली गेली पाहिजेत.

१. सर्व कागदपत्रे ज्यावर सरकारपक्ष अवलंबून राहणार आहे.

२. चोरीस गेलेली मालमत्तेची यादी. (जर प्रथम खबरीमध्ये ती सविस्तर नसेल तर)

३. आरोपीकडे मिळालेल्या किंवा त्याचेकडून जप्त केलेल्या मालमत्तेची यादी.

४. आरोपीच्या पूर्व शिक्षेबाबतचा अहवाल. (जर जास्तीत जास्त शिक्षा व्हावी असे तपास अधिकाऱ्यास हवे असेल तर)

५. जामिनावर मुक्त केले असल्यास बंधपत्र व जामीनदाराची बंधपत्र.

६. आरोपपत्र दाखल करण्याबाबत परवानगी दिल्याबाबतचे हुकूम.आरोपपत्र म्हणजे तपासाचा कळस (शेवट) म्हणून ते तयार करताना काळजीपूर्वक तयार करून दाखल करावे. प्रतिवादी खालील मुद्यावर खटला उलटविण्याचा प्रयत्न करतील.

अ) गुन्हा घडलाच नाही.

ब) जरी गुन्हा घडला असला तरी तो वेगळ्या वेळी व जागी घडला आहे.

क) आरोपपत्रात नमूद केल्यापेक्षा इतर दुसराच गुन्हा घडला आहे.

ड) ज्याच्यावर आरोपपत्र दाखल केले आहे तो आरोपी निर्दोष आहे. गोळा केलेला पुरावा प्रतिवादीचे वरील मुद्यांना (समर्पक तोंड देतील) उलटवून लावतील (खोटे ठरवतील) असा असावा.

दंगलीसारख्या गुन्ह्यांतून जेथे पुरावा खात्रीपूर्वक नसतो अशा वेळी अनेक आरोपीवर सरसकट आरोपपत्र पाठविणे, काही घटना ओढून ताणून पुढे आणल्या असतात किंवा घडवून आणल्या असतात, अशा घटनांना ओढून ताणून पुरावा उभा करणे अशा गोष्टींना अजिबात संमती देऊ नये. कारण त्यामुळे आरोपपत्रावरील न्यायालयाचा विश्वास कमी होईल.

## पोलीस अहवालाबाबत काय करता येईल :

१. ज्यावेळी न्यायालय आरोपपत्राची दैनंदिन अहवालाबरोबर पडताळणी करतात व त्यांना असे आढळून येते की, काही आरोपीवर आरोपपत्र दाखल केलेले नाही तर अशा वेळी न्यायालय आरोपीची नावे आरोपपत्रावर वाढवू शकतात. कारण, न्यायालय हे संपूर्ण गुन्ह्याची दखल घेत असतात व फक्त आरोपपत्रावर नावे असलेल्या आरोपींचीच नाही.

२. ज्यावेळी गुन्हा 'खरा' पण उघडकीस न आलेला असा अखेरचा अहवाल पाठविला जातो व तो न्यायालय स्वीकारते याचा अर्थ तपास बंद केला आहे. नंतर भविष्यात जर तपास अंमलदारास महत्त्वाचा धागा किंवा पुरावा उपलब्ध झाला की, जेणेकरून तपास यशस्वीरित्या पुढे जाऊ शकतो तर न्यायालय अखेरचा अहवाल तपासून तपास अधिकाऱ्यास तपास पुढे चालू ठेवावयास परवानगी देतात.

३. जर गुन्ह्यात आरोपपत्र दाखल केले असेल तर न्यायालय पोलिसांना 'आखरी' (अंतिम) अहवाल पाठविण्यास सांगू शकत नाही. मात्र जर न्यायालयास वाटले की पुरावा हा पुरेसा नाही तर ते स्वत: आरोपीस दोषमुक्त करू शकतात.

४. जर 'आखरी' अहवाल पाठविला असेल तर न्यायालय आरोपपत्र पाठविण्यास सांगू शकत नाही; मात्र स्वत: लक्ष घालून अशा आखरी अहवालाची चौकशी सुरु करू शकतात.

५. ज्यावेळी न्यायालय आरोपपत्र स्वीकारते त्यावेळी खटल्याचे कामकाज सुरू होते.

## खटला भरण्यासाठी पुढाकार / परवानगी :

कोणीही इसम एखाद्या घटनेशी संबंधित असो किंवा नसो असा इसम गुन्हेगारी कायद्याची सुरुवात करू शकतो किंवा खटल्याबाबत हालचालीस सुरुवात करू शकतो. हा सर्वसाधारण नियम आहे. मात्र या नियमाचा नाजूकपणा लक्षात ठेवून काही अपवाद केले आहेत. ते अपवाद दोन प्रकारात मोडतात.

अ) काही ठराविक लोक काही ठरावीक गुन्ह्यांत जे कलम १९५, १९६, १९८ क्रि.प्रो.कोड यात नमूद केले आहेत अशांनाच न्यायालयात थेट तक्रार दाखल करता येते.

ब) सरकारी नोकर आणि न्यायव्यवस्थेचे अधिकारी यांनी त्याची कामगिरी करीत असताना किंवा त्या कामगिरीचा आविर्भाव करीत असता जर त्यांच्याकडून काही गुन्हा घडल्याबाबत तक्रार असेल तर क्रि.प्रो.कोड १९७ अन्वये आधी परवानगी घेतल्याशिवाय त्यांच्यावर खटला दाखल करता येऊ शकत नाही.

## 'अ' प्रकार :

कलम १७२ ते १८८ भा.दं.वि. यातील गुन्हे, त्या गुन्ह्यांना मदत करणे, त्या गुन्ह्याचा प्रयत्न करणे आणि असे गुन्हे करण्याचा कट रचणे या गुन्ह्याबाबत सरकारी नोकर किंवा ज्याचे हुकूम मानले नाहीत असे त्याचे वरिष्ठ अधिकारी हे न्यायालयात थेट तक्रार दाखल करू शकतात.

कलम १९३ ते १९६,१९९,२००, २०५, २११, २२८, ४६६, ४७१, ४७५, व ४७६ भा.दं.वि. ज्या न्यायालयाच्या कामकाजाबाबत गुन्हा घडला असेल अशा न्यायालयाने किंवा त्याच्यापेक्षा वरिष्ठ कोर्ट हे न्यायालयात थेट तक्रार दाखल करू शकतात.

कलम १७२ व २११ भा.दं.वि./जे खोटा पुरावा किंवा खोटा आरोप यासंबंधी आहेत असे गुन्हे जर तपास करताना उघडकीस आले तर पोलीस स्वत:च न्यायालयात तक्रार दाखल करू शकतात.

कलम १५३ ब किंवा ५०५ (२) किंवा (३) भा.दं.वि. त्याचप्रमाणे कलम १२० ब भा.दं.वि. ज्यात २ वर्षे पेक्षा कमी शिक्षा असलेला गुन्ह्याचा कट करणे अशा गुन्ह्यात सरकारची किंवा जिल्हा न्यायमूर्तींची परवानगी घेऊन तक्रार दाखल करता येईल.

कलम १५३ अ २९५ अ, ५०५ (१) भा.दं.वि. या गुन्ह्यांत, अशा गुन्ह्याचा कट करणे, मदत करणे इ. गुन्ह्यात केंद्रीय किंवा राज्य सरकार (जे योग्य असेल ते) याचेच परवानगीने खटला भरता येतो.

कलम ४९३ ते ४९८ भा.दं.वि. हे विवाह संबंधीचे गुन्हे आहेत. या गुन्ह्यात ज्या व्यक्तीवर अन्याय झाला आहे अशी व्यक्ती किंवा त्याचे पालक न्यायालयात थेट तक्रार करू शकतात.

कलम ४९८ अ भा.दं.वि. गुन्ह्याची तक्रार पोलीस अहवालानुसार किंवा दुखावलेली व्यक्ती किंवा त्या व्यक्तीचे आई / वडील किंवा पालक न्यायालयात करू शकतात.

## 'ब' प्रकार :

कलम १९७ क्रि.प्रो. कोड अन्वये जर कोणी सरकारी नोकराने किंवा न्यायमूर्तींनी किंवा न्यायाधीशांनी आपले कर्तव्य करीत असताना गुन्हा केला व अशा व्यक्तींना सरकारखेरीज इतर कोणीही नोकरीवरून काढून टाकू शकत नाही, त्यांच्यावर आरोपपत्र पाठविण्यापूर्वी सरकारची परवानगी जरुरी आहे. जरी वरील अधिकारी निवृत्त झाले असतील व त्यानंतर त्यांच्यावर खटला भरावयाचा असेल तरी सरकारची परवानगीची अट लागू आहे मात्र तो गुन्हा ते नोकरीत असताना केलेला पाहिजे.

काही इतर कायदे किंवा स्थानिक कायदे उदा. भ्रष्टाचारविरोधी कायदा, शस्त्राचा कायदा, स्फोटक पदार्थाचा कायदा, परदेशी नागरिकाबाबत नोंद कायदा १९३३ इ. कायद्या अंतर्गत त्या-त्या नेमलेल्या अधिकाऱ्यांचे

मंजुरीखेरीज आरोपपत्र दाखल करता येत नाही.

कलम ३५६ (५) क्रि.प्रो. कोड अन्वये केलेल्या नियमाचे उल्लंघन केल्यास पूर्वी शिक्षा भोगलेल्या इसमाविरुध्द खटला भरण्यापूर्वी पोलीस अधीक्षक किंवा उपअधीक्षक (SDPO) यांच्या मंजुरीची गरज आहे.

तपास अधिकाऱ्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की कोर्टाकडून दखल घेण्यासाठी या मंजुरीची (वर नमूद केल्याप्रमाणे) गरज असते. मात्र गुन्हा दाखल करणे त्याचा तपास करणे यात मंजुरीची गरज नाही.

जेथे खटला भरण्यासाठी मंजुरीची गरज आहे, अशा प्रकरणांत तपास अधिकाऱ्याने त्या गुन्ह्याची सर्व कागदपत्रे व इतर माहितीसह संपूर्ण केस मंजुरी देणाऱ्या अधिकाऱ्यासमोर ठेवावी. मंजुरी देणे ही कायद्याने यांत्रिक क्रिया नाही. मंजुरी देणाऱ्या अधिकाऱ्याने आपले मत लावून व विचारपूर्वक मंजुरी दिली पाहिजे व म्हणून संपूर्ण कागदपत्रे त्याच्यासमोर ठेवणे गरजेचे आहे.

जर जिल्हा न्यायाधीशांच्या मंजुरीची गरज असेल तर तपास अधिकाऱ्याने कागदपत्रांसह व इतर गोष्टीसह आपली विनंती जिल्हा न्यायाधीशांकडे योग्य त्या अधिकाऱ्यामार्फत पाठवावी. जर मंजुरी देणारे सरकार असेल तर याच तऱ्हेने पोलीस महासंचालकांमार्फत कागदपत्रे पाठवावीत.

जर आरोपपत्र पाठविण्याची मुदत संपली असेल तर त्या गुन्ह्यांची दखल न्यायालय घेऊ शकणार नाही आणि म्हणून मंजुरी घेण्यास होणारा विलंब / उशीर हा फार महागाचा ठरू शकतो. म्हणून जेथे जेथे मंजुरीची गरज आहे तेथे तेथे कारणाखेरीज कामकाज पध्दतीमुळे होणारा विलंब टाळावा.

## फायनल (शेवटचा) अहवाल :

काही वेळा तपासाअंती एखाद्या गुन्ह्यात आरोपपत्र पाठविण्यात येऊ शकत नाही व तपास बंद करावा लागतो अशा गुन्ह्यात कलम १७३ क्रि.प्रो. कोडप्रमाणे न्यायाधीशांकडे अहवाल पाठवून संमती घ्यावी लागते.

ज्यावेळी एखादा गुन्हा हा न्यायाधीशांकडे त्याचे संमतीसाठी व पुढील कारवाईसाठी अहवाल पाठविण्यात येतो त्यावेळी त्यांची संमती आवश्यक आहे. हे अहवाल निरनिराळ्या प्रकारचे असतात.

## अदखलपात्र (N.C.) :

जर गुन्हा हा तपासाअंती अदखलपात्र निष्पन्न झाला तर तपास अधिकाऱ्याने शेवटचा अहवाल 'अदखलपात्र' म्हणून पाठवावा अशा प्रकारचे गुन्ह्यात संबंधित पक्षकार हे न्यायालयात आपली बाजू मांडून भांडू शकतात किंवा युक्तिवाद करू शकतात त्याचप्रमाणे न्यायमूर्ती स्वत:च शेवटच्या अहवालानुसार विरोधकास समन्स काढून खटला सुरू करू शकतात. (इंडिया कॅरेट प्रा.लि.v/s कर्नाटक सरकार १९८९ क्रि.लॉ ज.९६३ SC)

## चुकीची माहिती – गैरसमजांमुळे माहिती :

ज्या वेळी गुन्ह्याच्या तपासास सुरुवात ही गैरसमजुतीच्या माहितीच्या आधारे होते व तपासअंती खरी वस्तुस्थिती उघडकीस येते अशावेळी गैरसमजुतीमुळे अशा तऱ्हेचा शेवटचा अहवाल न्यायाधीशाकडे प्रकरण रद्द करण्याबाबत पाठवावे.

## दिवाणी स्वरूपाचा (Civil) :

तपासाअंती जर सदर बाब दिवाणी (Civil) स्वरूपाची आहे व हा गुन्हा दिवाणी स्वरूपाच्या वादाचा आहे हे समजून आले तर शेवटचा अहवाल दिवाणी स्वरूपाचा (Civil) म्हणून पाठवावा.

## खोटा गुन्हा :

ज्यावेळी फिर्यादीने दिलेली तक्रार तपासाअंती खोटी असल्याचे निष्पन्न होते, त्यावेळी अशा खोट्या तक्रारीचे आधारावर कोणावरही खटला पाठविता येण्याचा प्रश्न येत नाही. अशावेळी खोटी तक्रार 'ब' समरी

म्हणून अहवाल पाठवावा. जर 'ब' स्वरूपाचा अहवाल पाठवितांना फिर्यादीचे विरुध्द खटला भरण्यासाठी कलम १८२ किंवा २२१ भा.दं.वि. अन्वये पुरेसा पुरावा असेल तर तक्रारदारांवर कायद्यानुसार खटला भरण्यासाठी पावले उचलावीत.

## उघडकीस न आलेला गुन्हा (True but Undetected) :

सर्व तऱ्हेचे प्रयत्न करूनही एखादा गुन्हा उघडकीस येऊ शकत नाही तर शेवटचा अहवाल 'उघडकीस न आलेला' हा न्यायालयाकडे पाठवावा. मात्र ज्यावेळी आरोपी मिळून येईल व त्यास अटक केली तर तपास पुन्हा सुरू करता येईल.

## आरोपपत्र पाठविण्याइतका पुरेसा पुरावा नसल्याचे गुन्हे

ज्यावेळी कलम १७२(२) क्रि.प्रो. कोड अन्वये शेवटचा अहवाल न्यायालयांत मंजुरीसाठी पाठविला जातो त्यावेळी न्यायाधीश तो अहवाल स्वीकारू किंवा नाकारू शकतात. जर अहवाल स्वीकारला तर तशी नोंद घेऊन सदरहू प्रकरण बंद केले जाईल. जर न्यायधीशांनी अहवाल नाकारला तर ते प्रकरण फेरतपासासाठी परत पाठवू शकतात व अशा वेळी ठाणे अंमलदार पुन्हा तपास करून अहवाल पाठवतील.

जर न्यायाधीशांनी आदेश दिल्याप्रमाणे पुढील तपास करूनही काही फरक पडला नाही तर परत त्याप्रमाणे अहवाल पाठवावा. मात्र न्यायाधीश हे आरोपपत्र पाठविण्याचे आदेश ठाणे अंमलदारास देऊ शकत नाही. ते स्वत: दखल घेऊन कारवाई करू शकतात.

ज्यावेळी ठाणे अंमलदार शेवटचा अहवाल न्यायाधीशांकडे पाठवितात तेव्हा फिर्यादीसही कारवाईबाबत कळविले पाहिजे. न्यायाधीश शेवटचा अहवाल आल्यानंतर फिर्यादीस लेखी समज देऊन अहवाल का मान्य करू नये याबाबत कारणे दाखविण्याबाबत सांगतील. शेवटच्या अहवालावर निर्णय झाल्यानंतर पोलीस किंवा फिर्यादी जो समाधानी नसेल ते वरिष्ठ न्यायालयात जाऊन फेरतपासणीसाठी अर्ज करू शकतात.

## गुन्ह्याचा तपास परत सुरू करण्याबाबत :

ज्यावेळी न्यायाधीशांनी फौजदारी गुन्ह्याचे तपासाचे प्रकरण तपासून बंद केल्याची संमती दिली आहे (मंजुरी दिली आहे) व त्यानंतर जर ठाणे अंमलदारास् काही विश्वासार्ह माहिती कळली किंवा पुढे आली तर तो अधिकारी त्या गुन्ह्याचा तपास परत सुरू करू शकतो मात्र यापूर्वी न्यायालयाची परवानगी घेतली पाहिजे.

## खोटी – फिर्याद देणाऱ्या फिर्यादीवर खटला भरण्याबाबत :

ज्यावेळी तपासाअंती एखाद्या गुन्ह्याबाबत शेवटचा अहवाल पाठवितांना फिर्याद हेतुपुरस्सर किंवा एखाद्यास त्रास देण्याच्या उद्देशाने खोटी दिली आहे असा अहवाल पाठवितांना पोलिसांनी ते त्याबाबत फिर्यादीविरुध्द कारवाई करणार आहे की नाही ते नमूद केले पाहिजे आणि जर करणार नसतील तर तसे न करण्याबाबतची कारणे दिली पाहिजेत.

■■■■■

# प्रकरण - २२

# मालमत्तेचे गुन्हे - तपासाबाबत काय कराल

## या गुन्ह्याबाबत / तक्रार माहिती मिळाल्यानंतर-

१. स्टेशन डायरीत नोंद.

२. प्रथम खबर घेऊन योग्य कलमे लावून गुन्हा दाखल करा. प्रथम खबरची मूळ प्रत न्यायालयामध्ये व वरिष्ठ अधिकाऱ्याकडे व मोफत प्रत फिर्यादीस.

३. वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती.

४. गुन्हे रजिस्टर व इतर पुस्तकांत जरूर त्या नोंदी.

५. प्रथम खबरीत काय हवे.

अ) गुन्हा घडल्याची तारीख व वेळ.

ब) गुन्ह्यांतील आरोपीची संख्या माहितीतली त्यांची नावे व जे माहीत नाहीत त्याची वर्णने.

क) आरोपी भाषा व बोलीभाषा कुठली बोलत होते?

ड) आरोपी गुन्ह्यांच्या जागी कसे आत आले व कसे बाहेर गेले?

इ) चोरीस गेलेल्या मालाचे वर्णन व ओळखण्याच्या खुणा.

फ) जर हत्याराचा वापर असेल तर त्याचे वर्णन व कशा तऱ्हेची.

६. खालील तज्ज्ञांना मदतीसाठी बोलवा.

अ) श्वानपथक.

ब) रासायनिक विश्लेषक.

क) छायाचित्रकार (फोटोग्राफर)

७. पोलीस ठाण्यातील कारवाई.

अ) सावधानतेचे इशारे सर्व पोलीस ठाण्यांना नजीकच्या जिल्ह्यांत व राज्यभर बिनतारी संदेशद्वारे, दूरध्वनीद्वारे कडक सावधानतेचे इशारे.

ब) खालीलवरून संभाव्य धागेदोऱ्यासाठी माहिती गोळा करा.

१. गुन्हे रजिस्टर (नोंद वही)

२. व्ही.एन.सी.बी.

३. गुन्हा पध्दतीबाबत इन्डेक्स.

४. पूर्व - इतिहास असलेला गुन्हेगारांचे नोंदीवरून.

५. पोलिस ठाण्याचे गुन्ह्याच्या पूर्वइतिहासाच्या नोंदवहीत.

क) तपासकामी जरुरी असलेले खालील साधने बरोबर घ्या.

१. बॅटऱ्या (विजेऱ्या)

२. रिकामी पाकिटे व कागद. (पॅकिंगसाठी)

३. रिकाम्या बाटल्या गोळा करण्यासाठी.

४. कॅमेरा (छायाचित्र घेण्यासाठी)

५. गुन्हे अन्वेषण पेटी.

६. मोजमाप करण्यासाठी टेप.

७. सील करण्याची साधने.

टीप- वरील साहित्याची यादी परिपूर्ण नाही पण सर्वसाधारण या गोष्टी बरोबर घ्याव्यात.

ड) आगाऊ पथक पाठवा किंवा स्वत: जा.

## घटनास्थळावर गेल्यानंतर काय कराल :

८. घटनास्थळी पोहचल्यावर त्या भागातील दोन सभ्य गृहस्थ पंच साक्षीदार म्हणून बोलावून पंचनामा करा. जर हा गुन्हा 'मालमत्तेसाठी खून' असेल तर प्रेताचा पंचनामा भरा. त्याचप्रमाणे झडत्या वा जप्तीसाठी या लोकांना बरोबर ठेवा.

९. रासायनिक विश्लेषण तज्ज्ञ, जीवशास्त्र तज्ज्ञ, रसायन तज्ज्ञ इ. जरुरी असेल तर बोलवा.

१०. घटनास्थळावरील भौतिक दुवे शोधण्यासाठी त्यास घेरा घालून सुरक्षित ठेवा खालील भौतिक दुवे बघा.

अ) पायाचे, बोटांचे ठसे किंवा हत्यारे.

ब) रक्त व इतर जीवशास्त्र विषयक दुवे.

क) आरोपीने इतर काही वस्तू सोडली असल्यास उदा. सिगारेट, विडी, थोटके इ.

ड) प्रेत किंवा इतर भौतिक दुवे हलविण्याचे आधी फोटो काढा. रेखाचित्र/प्लॅब तयार करा.

इ) भौतिक दुवे काळजीपूर्वक ताब्यात घ्या व्यवस्थितपणे बांधा व पंचाचे समक्ष ते सील करून त्यास लेबल लावा हे दुवे ताब्यात घेतांना एका साखळी पध्दतीने घ्या. (एका दिशेकडून दुसऱ्या दिशेकडे घडयाळाचे काट्याप्रमाणे)

फ) प्रत्येक भौतिक दुव्याची जागा व कुठून ताब्यात घेतली हे माहितीसाठी व्यवस्थित नोंदवा.

ह) प्रत्येक बांधलेल्या पाकिटास सील व पंच साक्षीदार व तपास अधिकाऱ्याच्या सहीने लेबल लावा.

## बळजबरीची चोरी, दरोडा व इतर चोरीचे गुन्हे :

११. घटनास्थळावर व साक्षीदारांकडे विचारपूस करून खालील माहिती गोळा करा. या माहितीचा आधार आरोपी शोधून काढण्यासाठी होईल.

अ) आरोपी कोणती भाषा बोलत होते, त्यांचा बांधा, कपडे काय घातले होते. इत्यादी बाबत.

ब) आरोपींनी वापरलेली वाहने.

क) आरोपीची काही खास वैशिष्ट्ये.

ड) आरोपीचे सखोल वर्णन.

इ) चोरलेल्या मालमत्तेचे वर्णन.

फ) भौतिक दुवे गोळा करा त्यात बोटाचे ठसे, पायांचे ठसे, हत्यारे, याच्या खुणा इ. जे आरोपीने जागेवर सोडलेले असतील.

ग) 'गुन्हा पध्दती' च्या रजिस्टरमधील फोटो साक्षीदारांना दाखविणे.

१२. आरोपीचे रेखाचित्र तयार करा.

१३. नजीकच्या बीट अंमलदारास सावध करून संशयितांचा शोध घेण्यास सांगा.

१४. नाकाबंदी लावा-

अ) आरोपी पळून गेल्याचा मार्ग ओळखून काढा.

ब) आरोपीने पळून जाण्यासाठी वापरलेली वाहनाची माहिती घेऊन ती शोधण्यासाठी लक्ष द्या.

क) नाकाबंदी दरम्यान वाहनामध्ये बसलेल्या इसमांची सन्मानाने चौकशी करा.

ड) आजूबाजूच्या पोलीस ठाण्यांना अशा तऱ्हेने नाकाबंदी सुरू करण्यास सांगा.

१५. गुन्हा रेकॉर्डवरून (MOB) गुन्हेगार शोधा त्यांना शोधून काढा व त्याच्या गुन्ह्यांतील सहभागाची चौकशी करा.

१६. तुरुंगातून सुटलेल्या गुन्हेगारांचा शोध घेऊन त्यांचा गुन्ह्यातील सहभाग याबाबत चौकशी करा.

१७. गुन्हेगारांच्या साधारणपणे राहण्याच्या जागा उदा. बस स्थानके, रेल्वे स्थानके, रेल्वेच्या आजूबाजूची झोपडपट्टी आणि इतर बदनाम जागा म्हणजे दारूचे, जुगाराचे, वेश्यांचे अड्डे इ. तपासा.

१८. बातमीदारांना माहिती काढण्यासाठी सांगा.

१९. चोरीचा माल विकत घेणाऱ्या लोकांवर लक्ष ठेवा.

२०. आजूबाजूच्या पोलीस ठाण्यांशी गुन्ह्याच्या माहितीबाबत देवाणघेवाण करा.

२१. आरोपी शोधून त्यास अटक करा. (उच्चतम न्यायालयाने दिलेले मार्गदर्शक तत्त्वे पाळा)

२२. जरूर असल्यास ओळख परेड करून घ्या.

२३. आरोपीकडे खोलवर चौकशी करा म्हणजे त्यांनी व त्याच्या टोळीने केलेले इतर गुन्हे उघडकीस आणता येतील.

२४. आरोपीने दिलेल्या कबुलीजबाबानुसार मालमत्ता शोधून ताब्यात घ्या.

२५. सरकारी वकील / वरिष्ठ अधिकारी यांच्याशी सल्लामसलत करून आरोपपत्र पाठवा.

२६. जर आरोपी सराईत गुन्हेगार असेल तर कलम ७५ भा.दं.वि.(जास्तीत जास्त शिक्षा देण्यासाठी) चा वापर करा.

## वाहनाच्या चोऱ्या – तपासाबाबत :

२७. गुन्हे प्रणाली शाखा (MOB) वरील गुन्हेगाराची आणि पूर्वीच्या गुन्हेगाराबाबत तपासणी करा.

२८. तपास करून कुठल्या टोळीचा हात असावा याची खात्री करून ती टोळी शोधण्याचा व अटक करण्यावर लक्ष केंद्रित करा. निरनिराळ्या तयार केलेल्या पथकाचे काम गुन्हा उघडकीस येईपर्यंत किंवा ती टोळी दुसरा गुन्हा करतांना पकडली जाईपर्यंत चालू ठेवा.

२९. निरनिराळ्या ठिकाणी गुन्हेगारांच्या ठेवलेल्या पोलीस ठाणे / जिल्हा गुन्हे क्राइम रेकॉर्ड- मध्यवर्ती गुन्हे रेकॉर्ड ब्रँच इ. ठिकाणांच्या फोटो बघून कोण संशयित आहेत याची खात्री करा.

३०. आजूबाजूच्या लोकांकडे चौकशी करून कोणी अपरिचित माणसाने भेट दिली काय हे शोधा.

३१. वाहनांसाठी निरनिराळी गॅरेजेस तपासून, संपर्क साधून माहिती घ्या.

३२. वापरलेल्या जुन्या वाहनांची खरेदी-विक्री करणाऱ्या लोकांना भेटून चोरीच्या वाहनाचा शोध घ्या.

३३. आरोपी मिळाल्यानंतर त्याची पध्दतशीरपणे चौकशी करा.

३४. गुन्हेगारावर गुन्हा केला आहे हे सिध्द करण्यासाठी पुरावा गोळा करा.

३५. ज्याकडे चोरीचे वाहन मिळून आले व जर तो सराईत चोरीची वाहने घेणारा आढळून आला तर कलम ४११ भा.दं.वि. प्रमाणे त्याच्यावर कारवाई करा.

३६. आरोपीकडून चोरीची मालमत्ता ताब्यात घेताना/शोधून काढताना दोन स्वतंत्र साक्षीदारांना त्यांना नोटीस देऊन त्यांच्या समक्ष माल जप्त करा.

३७. वाहनाची कागदपत्रे तपासा साधारणपणे आरोपी बनावट R.C.Book इ. तयार करतात.

३८. गाडीची / वाहनाची मालकी सिध्द करण्यासाठी पावत्या / इतर कागदपत्रे ताब्यात घ्या.

# दरोडा / जबरी चोरी :

**१. दरोड्याचे गुन्हे शाबीत करावयाचे मुद्दे**

१) पाच किंवा त्या पेक्षा जास्त लोक एकत्रीत येवून गुन्हा करतात.

२) त्यांचेशिवाय एक किंवा अनेक जबरी चोरी करतील किंवा प्रयत्न करतील.

३) त्यांच्याशिवाय जे जादा हजर असतील ते त्यांच्यात मिळतील किंवा जबरी चोरी करतील.

**दरोडा व जबरी चोरी चे गुन्हे नोंदविण्यापूर्वी व नंतर तपास करीत असताना विचारात घ्यावयाचे मुद्दे :**

| मुद्दा क्र. | तपास कामाची माहिती | उविपोअ | आर.पो.अ. |
|---|---|---|---|
| १. | प्राप्त खबरीची नोंद ठाणे दैनंदिनीत घ्यावी. | | |
| २. | नोंद खबरीमध्ये संशईत इसमाचे नांव, उपनांव, वय, वर्ण, शरीरयष्टी, अंगात घातलेल्या कपड्याचे वर्णन, पायातील वहाणाचा प्रकार इ. वर्णन घ्यावे. | | |
| ३. | गुन्हेगारांनी गुन्हा करताना वाहन वापरले होते काय? असल्यास कोणत्या प्रकारचे वाहन वापरले? वाहनांची संख्या? याबाबतची माहिती घ्यावी. | | |
| ४. | गुन्हेगारांनी गुन्ह्याच्यावेळी वापरलेल्या हत्याराचे वर्णन घ्यावे. | | |
| ५. | गुन्हेगारांनी फिर्यादीस अगर साक्षीदारास दमदाटी अगर मारहाण केली आहे का? असल्यास, त्यांची बोली भाषा व गुन्हेगारांचे वर्णन याबाबतची माहीती घ्यावी. | | |
| ६. | फिर्यादी अगर साक्षीदाराने आरोपीस पाहिले असल्यास माहीती घ्यावी. | | |
| ७. | गुन्हा घडतेवेळी आरोपीस फिर्यादी व साक्षीदार यांनी ओळखले असल्यास माहीती घ्यावी. | | |
| ८. | गुन्ह्याच्यावेळी गुन्हेगारावर साक्षीदारापैकी कोणी प्रतिहल्ला केला असल्यास त्यापैकी कोणी जखमी झाले असल्यास माहिती घ्यावी. | | |
| ९. | गुन्ह्याच्यावेळी गुन्हेगारांच्या वस्तू घटनास्थळी राहिल्या आहेत अगर कसे याची खात्री करावी. | | |
| १०. | फिर्यादीस गुन्ह्याच्या जागी गुन्हेगारांची चाहूल लागली असल्यास माहिती घ्यावी. | | |
| ११. | फिर्यादीच्या घरी गुन्ह्याचे वेळी इतर साक्षीदार निष्पन्न झाल्यास, सदरवेळी ते काय करत होते याची माहिती घ्यावी. | | |
| १२. | घरामध्ये दिवा लावलेला होता का? तो नेहमी लावलेला असतो का? याची माहिती घ्यावी. | | |
| १३. | चोरट्यांची संख्या किती होती? किती चोरट्यांनी घेरले? याची माहिती घ्यावी. | | |
| १४. | घटनास्थळी लोक मदतीस आले असल्यास माहीती घ्यावी. | | |
| १५. | चोरट्यांची व मदतीस आलेल्या लोकांची झटापट झाली असल्यास माहिती घ्यावी. | | |

१६. गुन्हेगार आलेल्याच मार्गाने गेले का? अथवा अन्य मार्गाने गेले, याबाबतची माहिती घ्यावी.

१७. गुन्हेगारांचा शोध घेण्यासाठी पोलीस पथक विनाविलंब पाठवावे.

१८. सदर बाबत वरिष्ठांना वायरलेसद्वारे अगर फोनद्वारे त्वरीत माहिती कळवावी.

१९. गुन्ह्याच्या संदर्भात विनाविलंब पोलीस यंत्रणेद्वारे (वायरलेस व अन्य माध्यम) आजुबाजूचे पोलीस ठाण्यांना कळवावे.

२०. फिर्यादी अगर साक्षीदार यांना गुन्हेगारांनी केलेल्या मारहाणीबाबत मेडिकल तपासणीसाठी त्वरित पाठवावे.

२१. जखमींना ज्याचेसोबत औषधोपचारासाठी पाठविले त्यासंबंधी स्टेशन डायरीत नोंद घ्यावी.

२२. जरुरीप्रमाणे गुन्ह्याचे जागी डॉग स्कॉड, फिंगर प्रिंट एक्सपर्ट, फोटोग्राफर यांना पाचारण करावे.

२३. घटनास्थळी जाताना क्राईम बॉक्स सोबत नेऊन वापरण्यात यावा.

२४. गुन्ह्याच्या ठिकाणी लायक पंचांना बोलावून उघड्या डोळ्यांनी पाहणी करावी.

२५. घटनास्थळी लाईटची योग्य व्यवस्था करावी.

२६. घटनास्थळाचे फोटो घेण्यात यावेत.

२७. घटनास्थळी इतर कोणी वस्तू हाताळणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

२८. घटनास्थळाचे निरीक्षण करताना पंचासमक्ष घड्याळ्याच्या काट्याच्या दिशेने अथवा विरुद्ध दिशेने करुन तपशीलवार पंचनामा करण्यात यावा.

२९. घटनास्थळी पंचनामा करताना चान्स प्रिंट, रक्त चप्पल, रुमाल, विडी, सिगारेट इ. आरोपींनी हाताळलेल्या/ पडलेल्या वस्तू मिळून आल्या असल्यास ताब्यात घ्याव्यात.

३०. घटनास्थळी मिळून आलेल्या वस्तू आरोपीच्या आहेत काय? याची खात्री करुन श्वानपथक मागविणेत यावे.

३१. घटनास्थळी झालेल्या हल्ला/ प्रतिहल्यात जखमींना मेडीकल ऑफिसर यांचेकडे पाठविण्यात येवून जखमांबाबतचे मेडिकल सर्टीफिकेट सत्वर मिळवण्यात यावे.

३२. घटनास्थळी रक्त, रक्त मिश्रीत माती, वस्तू, हत्यार, फिंगर प्रिंट या वस्तूंचा सविस्तर पंचनामा करुन पंचांसमक्ष ताब्यात घ्याव्यात.

३३ पंचनामा करतांना सराईत पंच न घेता प्रतिष्ठित / इज्जतदार पंच घ्यावेत.

३४. पंचनामा करताना आवश्यकतेनुसार दुभाषी वापरण्यात यावा.

३५. पंचांना पंचनामा/ जबाब वाचून दाखवून त्यावर स्वाक्षरी घेण्यात यावी.

३६. फिर्यादीची फिर्याद घेताना दुभाषी वापरण्यात यावा. (मराठी येत नसल्यास).

३७. फिर्यादीस त्याची घेतलेली फिर्याद वाचून दाखवून स्वाक्षरी घेण्यात यावी.

३८. गुन्हेगारी पार्श्वभुमी असणारे इसमांना पंच म्हणून घेण्यात येवू नये.

३९. पंचनाम्यात जप्त करण्यात आलेल्या वस्तूंचे सविस्तर वर्णन घेण्यात यावे.

४०. घटना घडत असतांना आरडा-ओरडा झाला असल्यास कोणी मदतीस आले होते काय ? त्यांनी मदत केली होती का? याबाबतची माहिती घ्यावी.

४१. घटनास्थळी जप्त करून ताब्यात घेतलेल्या वस्तुंना सील करण्यात यावे.

४२. जप्त करून ताब्यात घेतलेल्या वस्तू कारकुनाकडे जमा करून त्याची मुद्देमाल पावती घेवून गुन्ह्याच्या कागदपत्रात समाविष्ट करावी.

४३. गुन्हेगार हे ज्या मार्गाने जाण्याची शक्यता आहे. त्या मार्गावरील रेल्वे स्टेशन, एस.टी. स्टॅण्ड, टॅक्सी रिक्षा स्टॅण्ड, धर्मशाळा या ठिकाणी शोध घेण्यात यावा.

४४. आसपासचे पोलीस ठाणेंना वायरलेस यंत्रणा अगर फोन द्वारे तात्काळ कळविण्यात यावे.

४५. भटकणाऱ्या टोळ्यांची माहिती घेवून त्यांची झडती घ्यावी.

४६. शिंपी, सोनार, घाणवट माल घेणारे, स्थानिक सराईत व माहितगार संशयित यांची माहिती काढून त्यांच्यावर छापे टाकून झडत्या घ्याव्यात.

४७. घरझडतीत संशयास्पद माल मिळाला तर तो जप्त करून फिर्यादी व साक्षीदार यांच्याकडून ओळखून घ्यावा.

४८. घटनास्थळाचे आजुबाजूस मोठे धरण, रस्त्याचे काम अगर इमारतीचे काम चालू असल्यास तेथील मजुरांची चौकशी करावी.

४९. गुन्हा घडला त्यादिवशी अगर त्यापूर्वी कोर्टात अट्टल गुन्हेगार किंवा त्याचा साथीदार कोर्टामध्ये साक्षीसाठी आला होता काय? याची खात्री करावी.

५०. गुन्हा घडण्यापूर्वी कोणी संशयित टेहळणीसाठी वरचेवर त्या भागात येत होता काय, याची चौकशी करावी.

५१. गुन्हा घडणेपूर्वी व नंतर गुन्हेगार एकत्र कसे आले व कोठे गेले? याचा तपास श्वान पथक अथवा मागाकडे यांच्याद्वारे काढून माहिती हस्तगत करावी.

५२. दारुचे गुत्ते, जुगाराचे अड्डे, लॉजींग बोर्डींग, वेश्यागृहे, करमणुकीची केंद्रे, पानपट्टीची दुकाने या ठिकाणी संशयित इसम आले होते काय? याबाबत तपास करावा.

५३. नुकताच तुरुंगातून अशा प्रकारचे गुन्हे करणारा गुन्हेगार सुटला आहे काय? याची कोर्टातून खात्री करावी.

५४. गुन्ह्यात महिला आरोपी असल्यास स्त्री पंचाकडून तिची झडती घेण्यात यावी.

५५. गुन्ह्यांत आरोपी अटक असलेस त्याचेकडे विचारपूस करुन निष्पन्न झालेल्या इतर गुन्हेगारांना अटक केली आहे काय? तसेच त्यांच्या हालचाली तपासल्या आहेत काय? याची खात्री करावी.

५६. निवेदन पंचनामा करतांना प्रत्येक वस्तू ही एकत्रित सील न करता वेगवेगळी सीलबंद करणेत यावी.

५७. जप्त वस्तू ह्या कोणत्या ठिकाणाहून जप्त करण्यात आल्या हे तपशीलवार, सुसंगतपणे पंचनाम्यात लिहिण्यात आले असलेल्याची खात्री करावी.

५८. जप्त करण्यात आलेला माल सी.ए. अगर संबंधित तज्ज्ञांकडे अभिप्रायासाठी पाठविणेत यावा.

५९. जप्त माल तपासणीस पाठविणेत आला असल्यास त्याची स्थळप्रत कागदपत्रात समाविष्ठ करावी.

६०. सी.ए. तपासणीसाठी घेवून गेलेल्या पोलीस कर्मचाऱ्याचे तास टिपण कागदपत्रात समाविष्ट करावे.

६१. गुन्ह्यांतील साक्षीदार व पंचाचे पूर्ण पत्ते, पूर्ण नांव, फोन नंबर घेणेत यावेत.

६२ फिर्यादी व साक्षीदार यांनी गुन्हेगारांना गुन्हा करताना पाहिले असल्यास त्यांची ओळख परेड घ्यावी.

६३. आरोपीस अटक करताना सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी करावी.

६४. अटक करण्यात आलेल्या गुन्हेगारांची पूर्व शिक्षेची मागणी करावी.

६५. अटक आरोपींवर / गुन्हेगारांवर पूर्वी गुन्हे दाखल असलेस सी.आर.पी.सी. ७५ हे जादा कलम लावण्यात यावे.

६६. तपास पूर्ण झाल्यानंतर उप विभागीय पोलीस अधिकारी, सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता यांच्याकडून कागदपत्रांची पडताळणी करून घेवून त्यांचा अभिप्राय घेण्यात यावा.

६७. गुन्ह्याचा संपूर्ण तपास झाल्यावर पुराव्याची छाननी करुन आरोपींवर दोषारोप पत्र त्यांच्या अटकेनंतर ९० दिवसांच्या आत पाठवावे.

६८. दोषारोप पत्र पाठविताना त्याच्या सोबत गुन्ह्याच्या ठिकाणाचा नकाशा व मुद्देमाल कोर्टात पाठविल्याची खात्री करावी

**घरफोडी :**

**घरफोडीचे गुन्हे नोंदविण्यापूर्वी व नंतर तपास करीत असताना विचारात घ्यावयाचे मुद्दे :**

१. गुन्ह्याची फिर्याद घेताना गुन्हा कोणत्या तारखेस, वेळी, ठिकाणी, व कोणत्या पद्धतीने केला आहे हे फिर्यादीत नमुद करावे.

२. गुन्ह्याच्या ठिकाणी येण्यासाठी गुन्हेगाराने कोणता बहाणा केला याबाबतची माहिती घ्यावी.

३. घटनास्थळी गुन्हेगाराने हाताळलेल्या वस्तू मिळून येतात का? याची तपासणी करावी.

४. गुन्ह्यांत चोरीस गेलेल्या मालाचे सविस्तर वर्णन घ्यावे.

५. गुन्हेगाराच्या काही वस्तू गुन्ह्याच्या ठिकाणी मिळून आल्यास त्या जप्त कराव्यात.

६. गुन्हेगाराने गुन्ह्याच्या ठिकाणी विशेष काही कृत्य केल्याची खात्री करावी.

७. मालकी हक्क व ओळखण्याच्या खुणा मिळवाव्यात.

८. गुन्हा घडला त्यावेळेस घरात कोण हजर होते? याबाबतची माहिती घ्यावी.

९. गुन्हा घडला त्याठिकाणचे दरवाजे खिडक्या व दिवे केव्हा बंद केले होते ? याबाबतची माहिती घ्यावी.

१०. प्रकाशासाठी घरात दिवा ठेवला होता काय? याबाबतची माहिती घ्यावी.

११. पंचनामा करताना सराईत पंच घेण्यात येऊ नयेत.

१२. पंचनामा करताना गरज असल्यास दुभाषी वापरण्यात यावा.

१३. पंचांना पंचनामा/ जबाब वाचून दाखवून स्वाक्षरी घेण्यात यावी.

१४. फिर्यादीस त्याची फिर्याद वाचून दाखवून स्वाक्षरी घेण्यात यावी.

१६. गुन्हेगारी पार्श्वभूमी असणारे पंच वापरण्यात येवू नयेत.

१७. घटनास्थळ निरीक्षण करताना पंचासमक्ष घड्याळाच्या काट्याच्या दिशेने अथवा विरुद्ध दिशेने करुन तपशीलवार पंचनामा करण्यात यावा.

१८. पंचनामा कशाच्या प्रकाशात करण्यात आला याचा उल्लेख करण्यात यावा.

१९. गुन्ह्यांच्या अनुषंगाने फिंगर प्रिंट एक्स्पर्टना पाचारण करण्यात यावे.

२०. गुन्ह्याच्या अनुषंगाने श्वानपथक पाचारण करण्यात यावे.

२१. फिर्यादीचा अगर इतर शेजारी राहणाऱ्यांचा नोकर, घरगडी अचानक नोकरी सोडून गेला आहे काय? याची खात्री करावी

२२. गुन्हेगाराने खाण्यासाठी काही पेय पदार्थ दिला होता का याची खात्री करावी.

२३. गुन्हेगाराची माहिती जिल्हा गुन्हे कार्यप्रणाली व गणक यंत्र शाखेस पाठवावी.

२४. स्थानिक व जवळपासच्या पोलिस ठाण्यात चोरीस गेलेल्या मालाचे वर्णन ताबडतोब कळवावे.

२५. स्थानिक बातमीदारांना भेटून गुन्ह्यासंदर्भात माहिती देवून गुन्ह्यासंदर्भात माहिती मिळवण्यास सांगावे.

२६. रेल्वे स्टेशन बस स्टँड दारू गुत्ते, लॉजिंग बोर्डिंग, जुगार अड्डे, वेश्यावस्ती, पानपट्टी दुकाने व इतर करमणुकीच्या ठिकाणी गुन्हेगारांचा शोध घेणेत यावा.

२७. सराफ कट्टा गहाण व गहाणवट व्यवहार करणारे चोरीचा माल घेणारे यांच्यावर लक्ष ठेवण्यात यावे.

२८. अटक असलेल्या आरोपीकडे गुन्ह्यांबाबत कसून चौकशी करण्यात यावी.

२९. भटक्या टोळ्या उतरल्या आहेत का त्याचा शोध घेणेत यावा.

३०. आठवडा बाजार असल्यास त्या बाजारात नवखे कोणी आले असल्यास त्या अनुषंगाने तपास

करावा.

३१. घरगडी असल्यास त्याच्या वर्तनाची व संगतीची चौकशी करण्यात यावी.

३२. गुन्हे कार्यप्रणाली व गणक यंत्र शाखेकडून अशा प्रकारे गुन्हे करणारे संशयितांची नावे आली असतील तर त्यांच्या हालचालींवर फरक पडला असेल तर त्यांच्यादृष्टीने तपास करण्यात यावा.

३३. अटक आरोपी हा गुन्ह्यातील माल काढून देत असेल तर तो भारतीय पुरावा कायदा कलम २७ प्रमाणे पंचनामा करुन जप्त करून ताब्यात घेणेत यावा.

३४. निवेदन पंचनामा करताना प्रत्येक वस्तू ही एकत्रित सील न करता वेगवेगळी सीलबंद करण्यात आली असलेची खात्री करावी.

३५. जप्त वस्तू कोणत्या ठिकाणाहून जप्त करण्यात आल्या हे तपशीलवार, सुसंगतपणे पंचनाम्यात लिहिण्यात यावे.

३६. गुन्ह्यातील माल आरोपीकडून काढून घेत असताना आरोपीताने पंचासमक्ष निवेदन नोंदवून पंचनामा करून निवेदन पंचनाम्यावर आरोपीची स्वाक्षरी घेण्यात यावी.

३७. घरझडतीत गुन्ह्यातील चोरीस गेलेला माल मिळाला तर फिर्यादी व साक्षीदारास दाखवून ओळखल्याबद्दल पंचनमा करून जप्त करण्यात यावा.

३८. साक्षीदार व पंचांचे पूर्ण नांव, पत्ता व फो. नं. घेणेत यावा.

३९. गुन्ह्याच्या ठिकाणी पडलेल्या वस्तू या आरोपीच्याच आहेत का याची खात्री करुन तसा पुरावा गोळा करावा.

४०. पुराव्याची सविस्तर छाननी करुन संबंधित कोर्टात मुदतीत दोषारोपपत्र पाठवण्यात यावे.

४१. आरोपीवर यापूर्वी गुन्हे दाखल असलेल्या पुर्व शिक्षा मागवून घेऊन भा.दं.वि.कलम ७५ लवण्यात यावा.

■■■■■

# प्रकरण - २३

# मनुष्यवध

# तपासाकामी धागेदोरे - यादी

ज्या ठिकाणी प्रेत मिळालेले असते त्या ठिकाणापासून नेहमी तपास अधिकारी मनुष्यवधाच्या गुन्ह्याच्या तपासाला सुरुवात करतात. या ठिकाणाखेरीज इतरही जागा असू शकतात जेथे पुरावा उपलब्ध होऊ शकतो (मिळू शकतो) आणि म्हणून तपास अधिकाऱ्यांनी ही बाब लक्षात ठेवावी. इतर ठिकाणांची यादी खालीलप्रमाणे.

१. ज्या ठिकाणापासून प्रेत हलविले गेले असेल.

२. ज्या ठिकाणी हल्ला झाला (मारामारी झाली) ज्यामुळे मृत्यू ओढवला.

३. प्रेत घेऊन जाण्यासाठी वापरलेले वाहन किंवा ज्यांत प्रेत ठेवून नेले ती पेटी इ.

४. घटनास्थळावर आलेल्या व गेलेल्याची जागा.

५. पोलीस ठाण्याच्या डायरीत नोंद.

६. फिर्याद घेऊन योग्य ती कलमे लावून गुन्हा दाखल करणे, मूळ प्रत न्यायाधीशाकडे, वरिष्ठ अधिकाऱ्याकडे प्रत व एक प्रत फिर्यादीस विनामूल्य देणे.

७. वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळविणे.

८. संबंधित नोंद पुस्तकात नोंदी घेणे. (क्राईम रजिस्टर)

९. खालील लोकांना मदतीसाठी पाचारण करणे.

अ) कार्यकारी दंडाधिकारी. (लग्न झालेल्या स्त्रीचे प्रेताचा पंचनामा)

ब) रासायनिक न्याय विश्लेषण विभाग तज्ज्ञ. (केमिकल ॲनालायझर).

क) श्वान - पथक.

ड) छायाचित्रकार (फोटोग्राफर).

इ) बॉम्ब शोध व नाशक पथक (गरज असेल तर).

१०. खालील वस्तू घ्याव्यात.

अ) दोर

ब) बॅटऱ्या (विजेऱ्या)

क) बाटल्या नमुना घेण्यासाठी

ड) रिकामी पाकिटे

इ) कागद

फ) चिकटपट्टया (टेप) , अन्वेषण पेटी, वस्तू बांधण्याचे (पॅक) करण्याचे साधन, हातमोजे, कॅमेरा (छायाचित्रणे), मोजण्याचा टेप.

११. घटनास्थळ सुरक्षित ठेवण्यासाठी आगाऊ पथक पाठविणे किंवा स्वत: गेल्यावर व्यवस्था करणे.

१२. कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न व जमाव याबाबतचा अंदाज, गरज असल्यास जादा कुमक मागविणे.

१३. घटनास्थळाच्या सीमा ठरवा. जास्तीत जास्त भाग मोकळा करा. घटनास्थळ सुरक्षित ठेवण्यासाठी (राखण्यासाठी) दोर, अडथळे किंवा कर्मचारीची नेमणूक करा.

१४. जर इतर अधिकारी घटनास्थळी आधीच पोहचले असतील तर त्यांच्याकडून घटनेबाबत माहिति घ्या.

१५. जखमी माणसाचा श्वासोच्छ्वास, नाडी, डोळे बघून तो मृत्यू पावला आहे काय याची खात्री करा.

१६. जर जिवंत असेल तर दवाखान्यात पाठविण्याची व्यवस्था करून मृत्युपूर्व जबाब शक्यतो न्यायाधीशांकडून घेण्याबाबत व्यवस्था करा.

१७. घटनास्थळावर विशेषत: मोकळ्या जागेवर असणाऱ्या घटनास्थळावर हवामानामुळे, जागेवर असणारे धागेदोरे म्हणजे शरीरावरील द्रव, रक्त इ. विशेषत: पाऊस, हिमवर्षाव, वारा, सूर्यप्रकाश इ.मुळे नुकसान पोहचू शकते. म्हणून या पुराव्याचे रक्षण करण्यासाठी योग्य ती काळजी घ्या.

१८. घटनास्थळावरील पीडिताचे (जखमी, मृत) नातेवाईक आणि मित्र यापासून रक्षण करा, कारण नसतांना चौकशी करणारे बघे, इतर पोलीस अधिकारी यामुळे पुरावा नष्ट होऊ शकतो. जे तपासात सहभागी नाहीत त्यांना लांब ठेवा.

१९. घटनास्थळावरील खालील बार्बीबाबत सूक्ष्म निरीक्षण करा.

अ) बाहेरील हवामान, प्रेताची स्थिती, ओढल्याच्या खुणा इ.

ब) आतील दिवे जळत होते की बंद, दरवाजे, खिडक्या उघड्या, लावलेल्या किंवा कुलूप लावलेल्या इ. घरांतील टेबल, खुर्ची इ. सामान हलविले किंवा त्यास नुकसान झाले आहे किंवा कसे. शीत पेटी, पंखे, दूरदर्शन संच इ. बंद आहेत की चालू.

२०. जर मृत असेल तर नैसर्गिक मृत्यू आहे काय? असल्यास पुढे काही कारवाईची गरज नसते.

२१. जर मृत्यू अनैसर्गिक असेल तर अपघात आहे की मनुष्यवध की आत्महत्या.

२२. ज्यांनी ज्यांनी प्रेत पहिल्यांदा बघितले त्याच्याकडे विचारपूस करा.

२३. ज्या कोणी त्यास जिवंत असताना बघितले असेल त्या लोकांकडे विचारपूस करा आणि त्यांनी त्यास कोणत्या वेळी, कोठे, व केव्हा जिवंत बघितले इ. बाबतची व ज्यावेळी बघितले त्याची शारीरिक व मानसिक स्थिती कशी होती इत्यादींची माहिती घ्या.

२४. जर प्रेताची ओळख पटत नसेल तर खालील माध्यमातून प्रेताची ओळख पटवा.

अ) हरविलेल्या माणसांबाबतचा पोलिस ठाण्यांच्या, शेजारील पो.ठाण्याच्या किंवा बाजूच्या जिल्ह्याच्या पोलिस ठाण्यांच्या तक्रारी तपासून.

ब) प्रेतावर मिळून आलेल्या कपड्यांवरून व त्याच्या अंगावरील वस्तूवरून.

क) शिंपी, गोंदलेले यांच्या खुणा व बोटाचे ठसे.

ड) आजूबाजूच्या भागांतील लोकांच्या मदतीने.

फ) नातेवाईक व मित्र याचे मदतीने.

ग) जर प्रेत स्त्रीचे असेल तर बलात्कार झाला आहे का ते तपासा.

२५. घटनास्थळावर प्रेत होते की कोणी तेथे ते आणून टाकले ? जर उत्तर होय असेल तर मूळ घटनास्थळ शोधणे. घटनास्थळ एकच आहे की अनेक? प्रेत ओढून आणलेल्या खुणा अंगावर किंवा जमिनीवर आहेत काय?

२६. दोन प्रतिष्ठित साक्षीदार त्याच भागातील घेऊन प्रेताचा पंचनामा, झडत्या, वस्तू ताब्यात घेणे इ. करा.

२७. गरज असल्यास वैज्ञानिक विश्लेषण तज्ज्ञ, रसायनशास्त्र तज्ज्ञ इ. बोलवा.

२८. ज्या जागेची झडती घ्यायची आहे ती सुरक्षित करा व सखोल तपास खालीलप्रमाणे करा :-

अ) पायाचे ठसे, बोटाचे ठसे, गुन्ह्यातील हत्यार.

ब) रक्त व इतर जीवशास्त्राबाबत दुवे.

क) आरोपीने घटनास्थळावर मागे सोडलेल्या गोष्टी उदा. सिगारेटची थोटके इ.

ड) प्रेत किंवा इतर भौतिक पुरावे हलविण्यापूर्वी जागेचे छायाचित्रण करा व नकाशा तयार करा.

इ) जागेवरील भौतिक दुवे पॅक करून ताब्यात घेताना एकसारखी ठेवा.

फ) प्रत्येक भौतिक दुव्याची (ज्या जागेवरून ताब्यात घेतल्या) जागा व कशा अवस्थेत होता हे नमूद करा. (पंचनाम्यात)

ग) प्रत्येक दुव्याच्या ताब्यात घेतलेल्या वस्तू वेगवेगळ्या स्वच्छ व योग्य अशा भांड्यात (पेटीत, कागदात, बाटलीत इ.) ठेवून बांधा.

ह) प्रत्येक पाकिटावर (वस्तू पाकिटात ठेवून बांधल्यावर) ते सीलबंद करावे व त्यावर साक्षीदार पंच व तपास अधिकाऱ्याची सही असावी (गुन्हा क्र. तारीख व पो.ठाणे हे पण लेबलवर असावे), रक्त हे द्रवरूप (पातळ) स्वरूपात (बाटलीत) किंवा कापसाच्या बोळ्यावर गोळा करता येईल. रक्त नासू नये (खराब होऊ नये) म्हणून सोडियम ऑक्साईड किंवा EDTA (एक प्रकारचे औषध रासायनिक) वापरावे.

२९. गुन्ह्याचे स्वरूपावरून खालीलबाबत तपासणी वीर्य, लघवी, लाळ, उलटी (ओकारी), केस, काडतुसे, पुंगळ्या, लहान बंदुकीचे छरे, हत्यारे, अग्नी, कापडाचे तंतू, कापड, सिगारेटची थोटके, माती, वस्तू त्यावर करावयाची साधने व त्या साधनांच्या खुणा, वाहन, कपडे, कागदपत्रे, भांडे, बोटाचे ठसे, चावल्याच्या खुणा, काडतुसांमुळे झालेली भोके (छिद्र) इ.

३०. अधिकृत व योग्य अशा प्रयोगशाळांची उदा.१) नेहमीच्या तपासणीसाठी राज्य न्याय रासायनिक विश्लेषण प्रयोगशाळा २) कागदपत्रांसाठी (GEQD) ३) डी.एन.ए.फिंगर प्रिंटिंग (CDFD) इतर गोष्टीसाठी संबंधित प्रयोगशाळेची मदत घ्यावी.

३१. निरनिराळे पुरावे तपासणीसाठी (विश्लेषणासाठी) पाठविताना प्रयोगशाळेत खालील माहिती पाठवा.

१) गुन्ह्याची थोडक्यात हकिगत

२) एखादी खास तपासणी किंवा चाचणी गोळा केलेल्या भौतिक पुराव्याबरोबर करावयाची असल्यास.

३२. मृत पावल्यापासूनची वेळ, (मृत्यू केव्हा झाला असावा) याबाबत (स्नायूचा ताठरपणा व इतर पध्दतीवरून)

३३. प्रेताचा पंचनामा, मृत्यूचे कारण व इतर काही कारणे.

३४. खालील गोष्टी तपासा.

अ) प्रेताची स्थिती, लिंग (पुरुष /स्त्री) कशी दिसते, वय व बांधा.

ब) कपड्यांचे वर्णन.

क) अंगावर दागदागिने आहेत की नाहीत.

ड) अंगावर जखमा असल्यास त्या किती व त्याचे स्वरूप.

इ) प्रेताचे अंगावर काही झटापटीच्या (विरोध किंवा नकाराच्या) निशाण्या आहेत काय?

## प्रेताची स्थिती :

१. स्नायूचा ताठरपणा. (प्रेत कडक होणे)

२. सडलेले.

३. अंगावरील रक्त ओले की कोरडे. (सुकलेले)

४. किडे पडले आहेत का? स्वरूप

५. रक्ताच्या खुणांचे वर्णन व मोजमाप.

६. कपडे व चपला / बूट तपासून पुरावा मिळतो का ते बघा.

३५. खुनाचा उद्देश त्यामुळे गुन्हा उघडकीस आणण्याच्या दृष्टीने मार्ग दाखवू शकतो.

३६. खालील गोष्टी तपासा.

अ) स्वसंरक्षण.

ब) अकस्मात आणि गंभीर चिथावणी / चेतावणी.

क) काही उद्देश नसता केलेले खून. (दहशतवादी)

ड) मानसिक संतुलन बिघडलेला.

इ) शत्रुत्व (वैमनस्य) धंद्यावरून किंवा इतर कारणाने.

३७. मृत्यूचा प्रकार शोधा.

अ) गळा दाबणे, फासावर टांगणे, गुदमरणे आणि बुडणे.

ब) विषप्रयोग.

क) टोकदार हत्यार / तीक्ष्ण हत्यार.

ड) स्फोटके.

इ) भाजणे / जाळणे

३८. मृताच्या आणि कुंटुबियांच्या पूर्वइतिहासाची माहिती यावरून गुन्ह्याचा उद्देश शोधण्यास मदत होते.

३९. साक्षीदार, मृताचे नातेवाईक, मित्र यांच्याकडे विचारपूस व त्यांचे जबाब.

४०. वापरलेले हत्यार.

४१. वाहनाचा वापर आहे काय? त्या वाहनाचा क्रमांक, वाहक (ड्रायव्हर) व वाहनांत बसलेले लोक.

४२. ज्या ठिकाणी गुन्हा घडला तेथे कोण जा-ये करीत असत?

४३. गुन्हा करण्याची संधी कोणास होती?

४४. अटक व चौकशी.

४५. ओळख परेड घेणे गरजेचे असेल तर आरोपीचे चेहरे झाकणे.

४६. वापरलेल्या हत्यारांची जप्ती.

४७. हत्यारे कुठून मिळवलीत याचा शोध (परवानाधारक बंदूक इ.) असे असल्यास परवाना रद्द करण्याची कारवाई, जर स्फोटके असतील तर आरोपीने कोठून व कशी मिळविली याचा शोध.

४८. जर मृत्यू श्‍वसनाविरोधामुळे (श्‍वास बंद झाल्याने) म्हणजे गळफास, बुडणे, गळा आवळणे, गुदमरणे इ. तर खालील गोष्टी तपासा.

अ) आत्महत्येबाबत काही चिठ्ठी आहे काय?

ब) गळफास असेल तर तो मृत्युपूर्वी की मृत्यूनंतर ते तपासा.

क) जर गळफास असेल तर ज्या ठिकाणाहून फास लावून घेतला आहे तेथील उंची व ती उंची

जागेपासून फास लावून घेण्यास पुरेशी आहे काय? झाडावर चढून, छतावर चढून इत्यादी.

ड) गळफास लावून मृत्यू होण्यासाठी शरीर पूर्णपणे लोंबकळलेलेच पाहिजे असे नाही.

इ) शवविच्छेदनात गुरुत्वाकर्षणामुळे होणारा काळानिळापणा हातावर, पायाच्या खालच्या भागावर आणि फास लागलेल्या वरच्या बाजूस दिसून येईल.

ई) गळफासाच्या प्रकारांत पहिल्यांदा दिसणारी लक्षणे म्हणजे जीभ बाहेर येणे, लाळ गळणे, आणि फास लावण्यासाठी वापरलेल्या साधनामुळे पडलेला वळ (जखम) इत्यादी तपासा.

उ) गुदमरणे किंवा गळा दाबणे या प्रकारात अंगावरील जखमा तपासा, म्हणजे बोटाचे ठशांचे निशाण्या, मानेभोवती व तोंडाभोवती, गळा दाबल्याने मानेच्या, घशाचा व कंठ याचे आंतील बाजूस नुकसान होते (जखमा) त्या शवविच्छेदनात दिसून येऊ शकतात.

ऊ) झटापटीच्या खुणा शरीरावर किंवा जागेवर तपासा, बुडण्याच्या प्रकारात डायटोम चाचणी करून घ्या Diatom या चाचणीत काही तंतू मिळून येतात का हे पाहण्यासाठी घशाची तपासणी होते. तोंडात पांढरा (साबणासारखा) फेस आला आहे का ते बघा.

## भाजलेल्या – आगीमुळे :

१. मनुष्यवध (खून) करण्यासाठी व तो लपविण्यासाठी आग लावणे हे प्रचलित आहे.

२. प्रेताची स्थिती.

३. मृताने आग विझविण्याचा / मदतीसाठी ओरडण्याचा प्रयत्न केला काय ? हे घटनास्थळ तपासून शोधण्याचा प्रयत्न करा.

४. ज्वालाग्रही पदार्थाचा शोध घ्या व आग कुठून सुरू झाली ते बघा. शवविच्छेदन करताना वैद्यकीय अधिकाऱ्याने खालील गोष्टी तपासाव्यात.

अ) नाकाचे आजूबाजूस किंवा नाकात व श्वासनलिकेत धुराचे डाग आहेत काय?

ब) रक्तात कार्बन मोनॉक्साईड आहे काय?

ग) शरीराची स्थिती.

ख) मृत्युपूर्वी जबाब जर रुग्णालयात घेतला असेल तर.

## स्फोटकांचा वापर असेल तर :

१. गोळी आत जाण्याची व बाहेर पडल्याच्या जखमा

२. आंत जाण्याची जखम ही बाहेर पडण्याच्या जखमेपेक्षा लहान असते. रक्तस्राव थोडा असतो. आंत जाणारी जखम गोल बाजूने काळी पडलेली असते.

३. बाहेर पडणारी जखम, आत जाणाऱ्या जखमेपेक्षा बहुतेकवेळा मोठी असते. ही जखम घासलेली किंवा फाटलेली असते. आजूबाजूस तंतू बाहेर आलेले अशी असते.

४. डाग किंवा धूर यावरुन गोळी किती अंतराहून मारली असावी हे ठरविता येते.

५. गोळी कुठल्या दिशेने व किती अंतरावरून मारली असावी.

६. रिकाम्या पुंगळ्या शोधा व गोळा करा.

७. रिकाम्या पुंगळ्या व शरीरांत मिळालेली गोळी याची तुलना करा.

८. बॉम्ब व अग्निशस्त्रे तज्ज्ञांकडून तपासणी करून गुन्ह्यात वापरलेल्या शस्त्राबाबत पुरावा गोळा करा.

## विषप्रयोग

१. कातडी, नखे, जीभ व चेहरा यांचा रंग तपासा.

२. वास.

३. उलटी ओकारी / विष्ठा.

४. कुठलेही भांडे / बाटल्या / पट्ट्या इ. गोष्टी किंवा औषध आहे काय?

५. आत्महत्या केल्याबाबतची चिठ्ठी.

# खून / खुनाचा प्रयत्न :

## खुनाचे गुन्हे शाबीत करावयाचे मुद्दे :-

कोणत्याही मनुष्याचा मृत्यू झालेला असावा.

१) खालील कारणांने मृत्यू झालेला असावा.

अ) मनुष्याचा खून करण्याचा उद्देश असावा.

ब) आपण इजा करणार आहे त्याने मनुष्याचा मृत्यू होईल हे माहिती असूनही इजा करणे.

क) रोगी मनुष्यास इजा होईल अशा प्रकारे केलेली जखम आणि अशी जखम बहुधा त्याच्या मृत्यूस कारण होईल.

ड) एखादी कृती एवढी गंभीर आहे की, त्यामुळे मृत्यू येण्याची शक्यता आहे. तशी कृती आरोपीने केली व मृत्यू झाला किंवा वरील प्रमाणे एखादी जखम केली.

## खुनाच्या प्रयत्नाचे गुन्हे शाबीत करावयाचे मुद्दे :

१) खून करण्याचे उद्देशाने

२) खालील उद्देशाने की जे,

अ) सदर मनुष्यास अशा प्रकारे इजा करणे की, जी जवळ जवळ मृत्यूस कारणीभूत होईल.

ब) सदर मनुष्यास अशा प्रकारे जखमी करणे की, सदरची जखम सर्वसामान्य स्थितीतील मनुष्यास केल्यास मृत्यू येऊ शकेल.

क) अशा प्रकारे कृती करणे की, जो एवढा गंभीर होता की, ज्यामुळे मृत्यूस कारणीभूत होईल.

## खुन व खुनाच्या प्रयत्नाने गुन्हे नोंदविण्यापुर्वी व नंतर तपास करीत असताना विचारात घ्यावयाचे मुद्दे :

| मुद्दा क्र. | तपास कामाची माहिती |
|---|---|
| १. | खुनाच्या घटनेची फिर्याद सविस्तर व मुद्देसुद घ्यावी. |
| २. | मयताचे नांव माहित असलेल्या अगर नसलेल्या त्याचे वर्णन घेण्यात यावे. |
| ३. | आरोपी निष्पन्न असल्यास आरोपीचे नांव फिर्यादीत नमूद करावे. |
| ४. | आरोपीचे नांव निष्पन्न नसल्यास त्याचे वर्णन घेण्यात यावे. |

५. गुन्हा घडला ती तारीख, वेळ व दिवस याचा समावेश करण्यात यावा.

६. गुन्हा घडलेल्या ठिकाणचे वर्णन घेण्यात यावे.

७. गुन्हा कोणत्या हत्याराने/ माध्यमाने केला (गळा दाबून, फास लावून, विष देवून, बंदुक, कुऱ्हाड, चाकू, गुप्ती तलवार इत्यादींचा वापर करुन) त्याचे सविस्तर वर्णन घेण्यात यावे.

८. खून अगर खुनाचा प्रयत्न का केला याचे कारण फिर्यादीत नमूद करण्यात यावे.

९. गुन्हा घडला त्यावेळेस समक्ष पाहणारे साक्षीदार मिळवावेत.

१०. फिर्यादी व आरोपीचे संबंध कसे होते हे गुन्ह्याच्या तपासाच्या अनुषंगाने तपासण्यात यावेत.

११. आरोपीची गुन्हा केलेनंतरची वागणूक कशी होती? याबाबतची माहिती काढावी.

१२. खबर मिळण्यास विलंब झाला असल्यास त्या कारणाची माहीती घ्यावी.

१३. खुनाबरोबर चोरी झाली असल्यास चोरीस गेलेल्या मालाचे सविस्तर वर्णन घ्यावे.

१४. संशयितांची नांवे व त्याचे वर्णन घेण्यात यावे.

१५. गुन्हा खबरी बुकात दाखल करून त्याची प्रत मे. मॅजिस्ट्रेट यांना ताबडतोब पाठविणेत यावे.

१६. प्रथम खबरी पुस्तकात फिर्यादिला नक्कल देऊन खबरी पुस्तकात सही घेण्यात यावी.

१७. पंचनामा करताना सराईत पंच घेणेत आले नाहीत याची खात्री करण्यात यावी.

१८. पंचनामा करताना दुभाषी वापरण्यात यावा.

१९. पंचांना/ पंचनामा/ जबाब वाचून दाखवून स्वाक्षरी घेण्यात यावी.

२०. फिर्यादीची फिर्याद घेताना दुभाषी वापरण्यात यावा.

२१. फिर्यादीस घेतलेली फिर्याद वाचून दाखवून स्वाक्षरी घेण्यात यावी.

२२. गुन्हेगारी पार्श्वभूमी असणारे पंच वापरण्यात येवू नयेत.

२३. घटनेबाबत वरीष्ठांना बिनतारी संदेशाद्वारे अगर फोनद्वारे जलद माहिती देण्यात यावी.

२४. आरोपीने गुन्हा केला असल्यास तो स्वतः घटनेची माहिती पोलीस ठाण्यात देण्यास आला होता काय? याची खात्री करावी.

२५. गुन्ह्याची खबर मिळताच गुन्ह्याचे घटनास्थळ आहे त्या स्थितीत ठेवण्यास पोलीस कर्मचारी पाठवावेत.

२६. घटनास्थळी पोलीस पाठविला असल्यास त्याची स्टेशन डायरीत नोंद घ्यावी.

२७. आरोपी निष्पन्न असल्यास त्याला ताब्यात घेण्यासाठी पोलीस कर्मचारी पाठविण्यात यावा.

२८. घटनास्थळी जाताना क्राईम बॉक्स नेण्यात यावा.

२९. मरणोत्तर तपासणी फॉर्म भरण्यात यावा.

३०. पोलीस तपासासाठी लागणारा स्टाफ, हातकडी, काढणीसह रवाना करावा.

३१. सदर ठिकाणी फोटो ग्राफर, डॉग स्कॉड, फिंगर प्रिंट एक्सपर्ट यांना पाचारण करण्यात यावे.

३२. घटनास्थळी अ.नं. २० मध्ये नमूद केलेला कर्मचारी यांनी सदर ठिकाणी इतर कोणी व्यक्ती येऊन घटनास्थळाच्या वस्तू हाताळल्या होत्या काय? याची खात्री करावी.

३३. घटनास्थळाचे निरीक्षण करताना पंचासह घड्याळ्याच्या काट्याच्या दिशेने आणि उलट्या दिशेने तपशीलवार पंचनामा करण्यात यावा.

३४. मयत स्त्री असलेस घटनास्थळी २ स्त्री पंचास बोलावून घेवून प्रेताचा इन्क्वेस्ट पंचनामा, त्यांच्या अंगावरील खुणा, जखमा, चीज-वस्तुंसह सविस्तर करण्यात आला असलेची खात्री करावी.

३५. प्रेत अनोळखी असल्यास ते कोणी ओळखले आहे काय? याची खात्री करावी.

३६. प्रेत शवविच्छेदनासाठी पोलीस शिपाई यांचे ताब्यात दिल्याची पावती कागदपत्रात सामील करावी.

३७. प्रेताचे पोस्ट मॉर्टेमसाठी पोलीस शिपाई यांचे ताबेत दिल्याची पावती कागदपत्रात सामील करावी.

३८. प्रेताचे पोस्ट मॉर्टेम झालेनंतर पोलीस शिपाई यांनी प्रेत नातेवाईकांच्या ताब्यात दिलेची पावती घेतल्याची खात्री करावी.

३९. मयताचे अंगावरील जप्त केलेल्या कपड्याबाबत त्वरित मुद्देमाल पावती फाडण्यात यावी.

४०. सदर जप्त मुद्देमालाची पावती कागदपत्रात सामील करावी.

४१. पोस्ट मॉर्टेमसाठी शव घेवून गेलेल्या पोलीस कर्मचाऱ्याचे तपास टिपण करून ते कागदपत्रात सामील करावे.

४२. प्रेत अनोळखी असलेस त्याच्या दोन्ही बाजूने फोटो / शुटींग/ डीएनए/ घेण्यात यावेत.

४३. अनोळखी प्रेत असल्यास त्याची हाताच्या बोटांची कातडी काढून घेणे बाबत मेडीकल ऑफिसर यांना रिपोर्ट देण्यात येवून पूर्तता करून घ्यावी.

४४. प्रेत अनोळखी असल्यास त्याचे हाताच्या बोटाचे ठसे घ्यावेत.

४५. प्रेताच्या अंगावर वैशिष्टपूर्ण खुणा असलेची खात्री करून नोंदी घ्याव्यांत.

४६. जप्त मुद्देमाल सी.ए. तपासणीसाठी पाठविण्यात यावा.

४७. सी.ए. तपासणीसाठी मुद्देमाल घेऊन जाणाऱ्या कर्मचाऱ्याचा जबाब कागदपत्रात सामिल

करण्यात यावा.

४८. सी.ए. तपासणीस मुद्देमाल पाठविलेल्याची स्थळप्रत कागदपत्रात सामील करण्यात यावी.

४९. अनोळखी प्रेताच्या अंगावर असलेल्या कपड्यांवर (शर्ट, पँन्ट) धोब्याचे अगर टेलरचे मार्क आहेत काय? याची खात्री करावी.

५०. प्रेताच्या दाताची तपासणी करून एखादा दात चांदी, सोन्याने भरला आहे का अगर कवळी घातली आहे का? याबाबत छाननी करावी.

५१. अनोळखी प्रेताबाबत, आकाशवाणी, गावात दवंडी, दुरध्वनी वायरलेसद्वारे प्रसिद्धी करणेत यावी.

५२. अनोळखी प्रेताबाबत महाराष्ट्र पोलीस गॅझेटमध्ये प्रसिद्धी करण्यात यावी.

५३. घटनास्थळी जप्त करणेत आलेले रक्त, रक्तमिश्रीत माती व इतर संशयित वस्तू तपास कामी ताब्यात घेताना पंचनामा करण्यात यावा.

५४. पंचनामा करताना रात्र किंवा दिवस होता याचा उल्लेख करण्यात यावा.

५५. पंचनामा कशाच्या प्रकाशात करणेत आला हे नमूद करणेत यावे.

५६. प्रेत सापडलेल्या ठिकाणाशिवाय दुसऱ्या कोणत्याही ठिकाणी मयतास ठार मारले असल्यास त्याठिकाणाचा शोध लावून वस्तूजन्य पुरावा गोळा करण्यात यावा.

५७. जर खुन करून प्रेत पुरणेत आले असल्याबद्दलची खबर मिळाली असेल त्याबाबत संबंधित मॅजिस्ट्रेट यांना कळविणेत यावे.

५८. प्रेत पुरले असल्यास तपासकामी प्रेत उकरताना मॅजिस्ट्रेटची परवानगी घ्यावी.

५९. प्रेत सडलेले असल्यास मेडिकल ऑफिसर यांना त्याठिकाणी नेमण्यात यावे.

६०. मानवी हाडाचा सांगाडा मिळून आल्यास पंचनाम्याने तो जप्त करणेत यावा.

६१. जप्त करणेत आलेला सांगाडा तपासणीसाठी योग्य ती प्रश्नावली तयार करून ब्युरो ऑफ ॲनाटॅमी प्रयोगशाळेकडे पाठविण्यात यावा.

६२. सुपर इन्पोजिशन तंत्राद्वारे कवटीचे मानवी चित्र तयार करून प्रसारमाध्यमाद्वारे प्रसिद्धीस द्यावे. आवश्यक त्या केसमध्ये डीएनए टेस्ट करून घ्यावी.

६३. सांगाडा तपासणीस पाठविला असल्यास त्याबाबतचा अभिप्राय कागदपत्रात सामील करावा?

६४. संशयित आरोपींना अटक करतांना सर्वोच्च न्यायालयाच्या नियमांचे पालन केले आहे काय? तसेच त्याची वैद्यकीय तपासणी करण्यात आली आहे काय? याची खात्री करावी.

६५. आरोपीस अटक केले नंतर त्याच्या अंगावरील कपडे जप्त करण्यात यावीत.

६६. आरोपीने गुन्हा कबुल केला असल्यास व त्याने गुन्ह्यात वापरलेले हत्यार लपवून ठेवले असल्यास तसे त्याचे निवेदन घेण्यात यावे.

६७. निवेदन पंचनामा करताना प्रत्येक वस्तू एकत्रित सील न करता वेगवेगळी सीलबद्ध करण्यात यावी.

६८. जप्त वस्तू कोणत्या ठिकाणाहून जप्त करण्यात आल्या हे तपशीलवार, सुसंगतपणे पंचनाम्यात लिहिण्यात यावे.

६९. सदर निवेदनाचे वेळी दोन पंचाना सविस्तर हकीकत सांगून तसा पंचनामा करण्यात यावा.

७०. निवेदन पंचनाम्यावर आरोपीची सही घेण्यात यावी.

७१. आरोपीने गुन्ह्यात वापरलेले हत्यार काढून देत असल्यास तो भारतीय पुरावा कायदा कलम २७ प्रमाणे जप्त करण्यात यावे.

७२. महत्वाच्या प्रकरणांत निष्पन्न असलेले साक्षीदार भविष्यात फुटण्याची शक्यता दिसून येत असल्यास त्यांचे सीआरपीसी कलम १६४ प्रमाणे जबाब नोंदविण्याची कार्यवाही करावी.

७३. व्हिसेरा राखून ठेवला असल्यास त्वरीत सी.ए. तपासणीस पाठविण्यात यावा.

७४. गुन्ह्याच्या हेतू विषयी गुन्ह्याची तयारी, प्रयत्न व कृती याबाबत ठोस पुरावा हस्तगत करावा.

७५. कटाच्या गुन्ह्यामध्ये कट कोठे, केव्हा, कोणी, कसा, केला याबाबत साक्षीदाराकडे तपास करण्यात यावा.

७६. गुन्ह्यातील साक्षीदार व पंचाचे पुर्ण पत्ते, संपुर्ण नांव व फोन नंबर घ्यावेत.

७७. घटनास्थळाचा नकाशा मंडळ अधिकारी यांच्याकडून काढून घ्यावा.

७८. भारतीय हत्यार अधिनियमाखाली येणाऱ्या हत्याराने खुन करण्यात आला असल्यास दोषारोप पत्र पाठविण्यापूर्वी त्याबाबत जिल्हादंडाधिकारी यांच्या कडून परवानगी घ्यावी.

७९. मृत व्यक्तीस झालेल्या जखमा जप्त करण्यात आलेल्या हत्यारानेच झालेल्या आहेत काय? याबाबत वैद्यकीय अधिकारी यांना हत्यार दाखवून त्यांचे अभिप्राय घ्यावेत.

८०. आरोपी अटकेत असल्यास ९० दिवसाचे आत दोषारोपपत्र पाठविण्याची व्यवस्था करावी.

■■■■■

# प्रकरण - २४
# खास (स्पेशल) अहवालाबाबतचे गुन्हे

## खास अहवालाचे गुन्हे कोणते?

प्रत्येक गुन्ह्याचा तपास हा योग्य रितीने व खोलवर करणे ही पोलिसांची कायदेशीर जबाबदारी आहे. परंतु यातही काही गुन्हे हे गंभीर व महत्त्वाचे असतात म्हणून अशा गुन्ह्यांच्या तपासासाठी खास पध्दत दिली आहे. त्या गुन्ह्यांना सर्वसाधारणपणे खास अहवालाचे गुन्हे असे म्हटले जाते. मात्र काही राज्यात अशा गुन्ह्यांना गंभीर किंवा भयंकर स्वरूपाचे गुन्हे असे म्हटले जाते. अशा गुन्ह्यांच्या तपासासाठी खास पध्दतीच्या गरज असते कारण,

अ) पोलीस अधीक्षक यांनी तपासावर थेट निरीक्षण व ताबा ठेवला पाहिजे आणि,

ब) वरिष्ठांना याबाबतचे गुन्हे घडल्याची सतत माहिती देणे व तपासाची प्रगती कळविली पाहिजे.

## ढोबळपणे खास अहवालाच्या गुन्ह्यांचे वर्गीकरण :

खास अहवालाचे गुन्हे कोणत्या प्रकारचे असावेत किंवा कोणकोणते असावेत यात कोणत्या गुन्ह्यांचा समावेश असावा हे त्यावेळेचे गुन्ह्याचे गांभीर्यावर किंवा एखाद्या विशिष्ट पध्दतीचा गुन्ह्यामुळे जनप्रक्षोभ यावर अवलंबून असते. प्रत्येक राज्यांनी याबाबत आपापले हुकूम काढलेले आहेत व प्रत्येक शिकावू अधिकाऱ्याने या हुकूमाबद्दल आपापल्या राज्यातील माहिती करून घेणे आवश्यक आहे. सर्वसाधारण खालील प्रकारचे गुन्हे खास अहवालाचे गुन्हे या वर्गात येतात.

१. दरोडा व दरोडेखोरांनी पळवून नेण्याचे गुन्हे.
२. खंडणीसाठी किंवा भीक मागण्यासाठी अथवा वेश्या व्यवसायासाठी पळवून नेणे.
३. पोलीस कोठडीत मृत्यू अथवा बलात्कार.
४. खून, सदोष मनुष्यवध.
५. खुनाचा प्रयत्न.
६. द्रुतगती मार्गावरील जबरी चोऱ्या.
७. विशिष्ट रकमेच्या वरील जबरी चोऱ्या.
८. बलात्कार.
९. घरफोडी रु.७५,०००/- चे वरील.
१०. कुठलाही शांतता भंग, दंगल किंवा मारामारी - गंभीर स्वरूपाची.
११. रु. ३०,००० चे वरील चोरी.
१२. पोलीस अधिकाऱ्यास मारहाण.
१३. कलम ४०० व ४०१ भा.दं.वि. गुन्हे (टोळ्यांनी केलेले गुन्हे)
१४. कटाचे गुन्हे.
१५. रस्त्यावरील गंभीर अपघात.
१६. धंदेवाईक (गुन्हेगाराकडून) विषप्रयोग.
१७. लग्न झाल्यापासून ७ वर्षाचे आंत विवाहित स्त्रीने संशयितरीत्या केलेली आत्महत्या किंवा मरण.
१८. गुन्हा करण्यासाठी अंमली पदार्थ किंवा औषधे खाण्यास देणे.
१९. अवैधरित्या हत्यारे किंवा स्फोटक पदार्थ तयार करण्याबाबतचे गुन्हे.

२०. तांब्याच्या तारांची चोरी.

२१. सांस्कृतिक मालमत्तेची चोरी.

२२. बनावट नोटा तयार करणे.

२३. अंमली पदार्थाबाबतचे गुन्हे उदा. हेरॉइन / कोकेन इ.

२४. नागरी संरक्षणाबाबतचे गुन्हे आणि अनुसूचित जाती / जमाती प्रतिबंध कायद्यानुसार होणारे गुन्हे.

२५. स्त्रियांबाबतचे गुन्हे म्हणजे हुंडाबळी, सामूहिक बलात्कार इ.

## खास अहवालाच्या गुन्ह्यावर देखरेख करणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना त्वरित / तातडीच्या पध्दतीने कळविणे :

जे गुन्हे खास अहवालाचे गुन्हे या सदरात मोडतात असे गुन्हे घडल्याबाबत देखरेख करणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना त्वरित / तातडीच्या संदेशाने पोलीस ठाण्यांच्या प्रमुखाने माहिती दिली पाहिजे. हे कळविण्याबाबत निरनिराळ्या राज्यांच्या पध्दतीत फरक असेल. सर्वसाधारणपणे पोलीस ठाणे प्रमुखाने प्रथम खबरीची प्रत किंवा ज्यावेळी माहिती ही अर्धवट असेल व प्रथम खबर घेतली गेली नसेल तर ठाणे दैनंदिनीची प्रत विभागीय अधिकारी व पोलीस अधीक्षक यांना पाठवाव्यात. काही राज्यात अशा प्रति जिल्हाधिकारी, विभागीय उपमहानिरीक्षक (DIG) व महानिरीक्षक यांना पाठवितात. दरोडे इ. सारख्या काही गुन्ह्यात माहिती गुन्हे अन्वेषण विभाग मुख्य कार्यालय यांनाही कळवावे.

## खास अहवालात काय नमूद करावे :

याबाबतचा छापील नमुना प्रत्येक राज्यांचा वेगवेगळा असतो. मात्र या नमुन्यात सर्वसाधारणपणे खालील माहिती दिली जाते.

१. फिर्यादीचे किंवा माहिती देणाऱ्याचे नाव.

२. आरोपीचे नाव व पत्ता.

३. गुन्हा दाखल नंबर व कायद्याची कलमे.

४. घटनास्थळ, पोलीस ठाण्याचे नाव, पोलीस ठाण्यापासूनचे अंतर व कुठल्या दिशेस.

५. घटना घडल्याची तारीख व वेळ.

६. पोलीस ठाण्यास माहिती मिळाल्याची वेळ व तारीख व उशीर झाला असल्यास त्याची कारणे.

७. घटनास्थळी पोलीस पोहचल्याची वेळ व तारीख.

८. तपास अधिकाऱ्याचे नाव व हुद्दा.

९. चोरीस गेलेला व मिळालेला माल.

१०. आरोपी / संशयितांची संख्या.

११. अटक केलेल्या इसमांची संख्या.

१२. अटक न केलेल्या इसमांची संख्या.

१३. जामिनावर सोडलेल्यांची संख्या.

१४. शेरा.

## अ) खास अहवाल नं. १ :

पोलीस मुख्यालयास माहिती मिळल्याबरोबर लगेच पोलीस अधीक्षकांनी पहिला खास अहवाल

पाठवावा. बहुतेक वेळा या पहिल्या खास अहवालातील माहिती ही त्रोटक स्वरूपाची म्हणजे खास अहवालाचा गुन्हा घडला आहे आणि प्रथम खबरीत दिलेली हकीगत साधारण या अहवालात दिली जाते. दुसरा खास अहवाल (ज्याची माहिती खाली दिली आहे) हा सर्व माहिती आल्यावर लगेच पाठवावा. पोलीस अधीक्षक हा अहवाल विभागीय पोलीस उपअधीक्षक यांनी पाठविलेली सविस्तर माहिती व घटनास्थळाच्या भेटीनुसार पाठवितात.

## ब) प्रगती अहवाल (खास अहवाल नं.२) :

खास अहवाल नं. २ मध्ये गुन्ह्याच्या हकिकतीची थोडक्यात माहिती व तपासाच्या प्रगतीबाबत नमूद करावे. या अहवालात तपास अधिकारी, देखरेख करणारे अधिकारी याचे गुन्हेगारांबाबत अनुमान, त्या आरोपीचा सध्याचा ठाव ठिकाणा व त्यांना अटक करण्यासाठी काय पावले उचलावीत किंवा काय प्रयत्न केलेत याबाबतचा उल्लेख असावा. तपास अधिकारी व देखरेख करणारे अधिकारी यांनी पोलीस ठाण्याचे गुन्हे विषयक उपलब्ध माहिती (रेकॉर्ड) गुन्ह्याची पध्दत इ. बाबत सखोल अभ्यास करून संभाव्य आरोपीबाबतची माहिती करून घ्यावी. या अहवालात तपासाबाबतचा आराखडा, देखरेख करणाऱ्या अधिकाऱ्यांनी तपासांबाबत दिलेल्या सूचना यांचाही समावेश असावा. जर काही गोपनीय कारणासाठी पोलीस अधीक्षक ही माहिती अहवालात नमूद करू इच्छित नसतील तर ती माहिती त्यांनी एक गोपनीय पत्राद्वारे विशेष अहवालासोबत पाठवावा. वरिष्ठ अधिकाऱ्याने तपास अधिकाऱ्यास तपासाकामी केलेल्या / दिलेल्या सूचना या गुन्ह्याचे तपासाचे कागदपत्रांचा भाग म्हणून असावा आणि ही कागदपत्रे न्यायालय कधीही मागू शकते.

## खास अहवाल – नोंदणीपुस्तक (रजिस्टर) :

बहुतेक सर्व राज्यांतून अशा तऱ्हेचे खास अहवाल नोंदणी पुस्तक ठेवलेले असते त्यावरून नजर टाकताच एखाद्या गुन्ह्याच्या तपासाची सद्यस्थितीबाबत कल्पना येते. या नोंदणी पुस्तकात अनुक्रमाने नंबर, थोडक्यात हकीकत, शेवटी पाठविलेल्या तपासाबाबतची प्रगती, अहवालाची तारीख इ. माहिती असावी म्हणजे यावरून सर्व खास अहवालाचे गुन्हे हे अनुक्रमाने या नोंदणीपुस्तकात नोंदविले जातात. त्यानंतर पाठविलेले खास अहवालाची नोंद करताना खास अहवाल नं. १,२,३, याप्रमाणे वर्णन करावे. त्या प्रत्येक अहवालात त्यापूर्वीचा अहवालावर दिलेल्या सूचना / मार्गदर्शनबाबत केलेल्या कारवाईबाबत व त्याचे काय निष्कर्ष आहेत याची माहिती असावी. किती अंतराने हे खास अहवाल पाठवावेत याबाबत प्रत्येक राज्याची निरनिराळे अंदाज / पध्दती असतील. बहुतेक वेळा हे खास अहवाल प्रत्येक आठवड्यात किंवा पंधरवड्यात तपास संपेपर्यंत पाठविले जातात आणि जर एखाद्या गुन्ह्यात आरोपपत्र पाठविले तर पुढील अहवालात खटल्याची सद्यस्थितीची माहिती, काय निकाल लागला याची नोंदसुध्दा खास अहवाल नोंदणी पुस्तकात केली पहिजे व शेवटच्या खास अहवालांत नमूद करावी. जर गुन्हा शाबित झाला नाही व आरोपी निर्दोष सुटलेत तर त्याबाबतची कारणेसुध्दा या अहवालात व नोंदणी पुस्तकात नमूद करावीत.

विभागीय उप–महानिरीक्षकांकडे पाठविण्याचे अहवाल तयार करण्याचे काम आपल्या हाताखालील दुय्यम अधिकाऱ्याकडे न सोपवता पोलीस अधिकाऱ्याने स्वतः करावे.

## खास अहवालाबाबतच्या गुन्ह्याचा तपास :

खास अहवालाबाबतच्या गुन्ह्याची माहिती मिळताच पो.स्टे. प्रभारी अधिकारी यांनी त्वरित वेळ न घालवता स्टेशन डायरीत त्याची नोंद करून प्रथम खबर दाखल करावी व त्याची प्रत मंडलनिरीक्षक, उपअधीक्षक व पोलीस अधीक्षक याचेकडे खास दूतामार्फत किंवा बिनतारी संदेश (Wireless) द्वारे त्वरित पाठवावी व

आपण स्वत: घटनास्थळी रवाना व्हावे. खास अहवालाबाबतच्या गुन्ह्यांचा तपास हा पो.स्टे. प्रभारी अधिकाऱ्याने स्वत:कडे घ्यावा हे महत्त्वाचे आहे. कमीत कमी सुरूवातीचा तपास तरी त्यांनी करावा. अशा गंभीर गुन्ह्यांचे प्रकाराबाबत जनतेमध्ये विश्वास निर्माण झाला पाहिजे की अशा गुन्ह्यात वरिष्ठ अधिकाऱ्यांनी जातीने लक्ष घातले आहे आणि त्यासाठी हा तपास पो.स्टे. प्रभारी अधिकाऱ्याने स्वत: करणे गरजेचे आहे. ते जास्त अनुभवी असतात व ते अशा गुन्ह्याचा तपास नैपुण्याने (कुशलतेने) करू शकतात. मात्र तपासातील काही भाग पो.स्टे. प्रभारी अधिकारी हे आपल्या हाताखालील अधिकाऱ्यास सोपवू शकतात व अशा अधिकाऱ्याने त्या भागाचा तपास केल्यानंतर त्या तपासाबाबतचा अहवाल पो.स्टे. प्रभारी अधिकारी (मुख्य तपास अधिकाऱ्यास) द्यावा. हे अहवालसुध्दा तपासाच्या कागदपत्राचा एक भाग असेल.

## खास अहवालाच्या गुन्ह्याच्या तपासासाठी खास पथके

काही राज्यांतून गंभीर गुन्ह्याचे तपासासाठी खास पथके आहेत (खास तज्ज्ञ अधिकाऱ्यांचे). अशी पथके आहेत म्हणून पो.स्टे. प्रभारी अधिकारी ज्यावेळी आपल्या हद्दीत गंभीर प्रकारचा गुन्हा झाला तरी स्वत:ची जबाबदारी झटकू शकत नाही. त्याने स्वत: वेळ न घालवता कमीत कमी वेळात घटनास्थळी धाव घ्यावी व गुन्ह्याच्या प्राथमिक तपासास सुरूवात करावी. त्यानंतर खास तज्ज्ञ अधिकाऱ्याचे पथक आले की त्यांनी गुन्ह्याचा तपास त्याच्याकडे सुपूर्द करावा.

ज्या ठिकाणी खास तज्ज्ञ पथके नाहीत अशा ठिकाणी खास अहवालाचे गुन्ह्याचे तपासासाठी खास पथके निर्माण करण्याचा विचार करावा. खास पथकात काम करण्यासाठी नेमलेले अधिकारी हे त्याच्या तपासाच्या कौशल्याबाबत व त्या विभागाची व गुन्हेगारांची माहिती असलेले निवडक अधिकारी असावेत.

## फिरते न्यायविषयक औषधी – विश्लेषण शास्त्र पथक :

ज्या-ज्या ठिकाणी न्यायविषयक, रासायनिक विश्लेषणविषयक तपासणी करण्यासाठी पथके अस्तित्वात आहेत अशा पथकांना घटनास्थळी शक्य असेल तेथे तपासाकामी वैद्यकीय अधिकाऱ्यांना जागेवर बोलवावे.

## खास अहवालांच्या गुन्ह्यांच्या तपासावर देखरेख करणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची भूमिका

संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी म्हणजे मंडल निरीक्षक, उपअधीक्षक व पोलीस अधीक्षक यांनी न चुकता गुन्ह्याचे जागेस भेट द्यावी. त्यामुळे त्या अधिकाऱ्यांना तपासावर परिणामकारक देखरेख करता येईल कारण घटनास्थळास भेट दिल्याने त्यांना घटनास्थळाबाबत प्रत्यक्ष माहिती असेल, भेट दिल्याने ते तेथील लोकांना जे घटनेबाबत वस्तुस्थिती व परिस्थितीवर प्रकाश टाकू शकतील अशा लोकांच्या भेटी होतील. त्याखेरीज तेथील स्थानिक लोकांच्या सवयी व वागण्याच्या पध्दती याबाबत चांगली माहिती होईल व अशी माहिती गुन्ह्याचे तपासकामी खूप मदतीची असते. जास्त महत्त्वाचे म्हणजे घटनास्थळास भेट दिल्याने जागेवरील काही महत्त्वाचे धागेदोरे जे तपास अधिकाऱ्याकडून दुर्लक्षित झाले असतात ते मिळण्याची शक्यता असते. या पध्दतीने वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गुन्ह्याचा तपास हा योग्य तऱ्हेने चालू आहे याची खात्री करावी.

## देखरेख – काय परिणाम ?

वरील चर्चेवरून वरिष्ठ अधिकाऱ्यांची (मंडल निरीक्षक, उपअधीक्षक, अधीक्षक खास अहवालाच्या गुन्ह्याच्या तपासावर देखरेख असणे हे सर्वात महत्त्वाचे आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तपास अधिकारी / ठाणे अंमलदार यांना तपासाबाबत लेखी सूचना देताना त्या स्पष्ट, थोडक्यात व व्यावसायिक असाव्यात. कायद्याप्रमाणे तपास करावा अशा तऱ्हेची अर्थहीन मार्गदर्शन करण्याची सवय सोडून द्यावी. वास्तविक त्यांनी अगदी स्पष्ट, निश्चितपणे

तपासाकामी मार्गदर्शन करावे. वरिष्ठ आधिकाऱ्यांनी गुन्ह्याचा तपास हा हुशारीने, गतीने व कायदेशीरपणे होत आहे याकडे लक्ष द्यावे.

त्याचप्रमाणे कबुलीजबाब हे बेकायदेशीरपणे घेतले जात नाहीत, धागेदोऱ्याकडे दुर्लक्ष होत नाही व चौकशीची प्रत्येक पध्दतीत जी गोष्ट काही माहिती देऊ शकेल त्याचा योग्य तो पाठपुरावा करून शक्यता पडताळून पाहिली आहे की नाही याकडे लक्ष द्यावे आणि हाताखालचे कनिष्ठ अधिकारी हे आपल्या अधिकारांच्या अखत्यारीतच तपास करीत आहे आणि जनतेला त्रास देत नाही याकडे लक्ष द्यावे. हे काम निरीक्षणाबाबतच्या लेखी अहवालाद्वारे (चेक मेमो) किंवा ठाणे अंमलदारांशी चर्चा करून करावे.

वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तपास अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना गंभीर गुन्ह्यांच्या बाबतीत कोणत्या गोष्टीकडे लक्ष देणे गरजेचे आहे. ढोबळपणे वरिष्ठांनी खालील तत्त्वांचा अवलंब करावा.

अ) प्रथम खबर परिपूर्ण आहे की नाही, गुन्ह्यास योग्य ती कायद्याची कलमे आहे काय, प्रथम खबर देण्यास उशीर झाला आहे काय? व जर उशीर झाला असेल तर त्याची कारणे नमूद केली आहेत की नाही.

ब) घटनास्थळास भेट द्यावी आणि तपासाची पूर्ण नोंदी तपास अहवालात नोंदविला आहे की नाही व नोंदणी अहवालाच्या प्रती वेळेवर वरिष्ठाकडे पाठविल्या आहेत की नाहीत.

क) जे साक्षीदार आहेत ते १) स्वार्थी २) स्वतंत्र ३) निःस्वार्थी ४) फुटीर आहेत की काय.

ड) जर कोणास अटक केली असेल तर योग्य इसमास अटक केली आहे की नाही व कुठल्या परिस्थितीत अटक केली त्याबाबत माहिती.

इ) जर काही जप्त केले असेल तर त्याबाबत योग्य ती पध्दत अवलंबली आहे की नाही, जप्त केलेल्या वस्तू पोलीस ठाण्यास नेऊन मुद्देमालांत ठेवल्या आहेत की मागे सोडल्या आहेत, इत्यादी बाबत. वरील मुद्यांवरून मिळालेल्या किंवा घेतलेल्या माहितीचे आधारे आणि पोलीस ठाण्याच्या गुन्हेगारांच्या नोंदीवरून (रेकॉर्डवरून) स्वत:चे आराखडे / अंदाज तयार करा व त्यानंतर स्पष्ट व बरोबर सूचना द्या.

## खास अहवालाच्या (गंभीर) गुन्ह्याचे तपासाची खालीलप्रमाणे देखरेख करावी.

१. गुन्ह्याची माहिती प्रथम खबर, गुन्ह्याच्या नकाशांचा अभ्यास, टोळया, पूर्वीचे गुन्हे व त्यास जबाबदार असलेले गुन्हेगार यांची गुप्त माहिती गोळा करणे.

२. आरोपीबाबत माहिती आल्यावर अटकेसाठी आराखडा आखणे. कुठले गुन्हेगार शोधावयाचे आहेत, संशयित, आसरा देणारे, माल विकत घेणारे इ. बाबत आराखडा तयार करावा. संशयित, आसरा देणारे, माल विकत घेणारे यांचेवर निगराणी (वॉच) लक्ष ठेवणे, गस्त घालण्यासाठी आराखडे, जबाबदारीचे वाटप, जबाबदारी कोणाची हे नक्की करणे, वाहनाची व्यवस्था करणे. इ.

३. कारवाई – वरील माहितीचे आधारे कामाचे वाटप, एकेकाचे संपर्क व परिणाम या बाबतीत लक्ष देणे.

वरिष्ठांनी दिलेल्या सूचनांवर त्वरित कारवाई होणे व मधूनमधून तपासावर लक्ष ठेवणे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे तपासावर देखरेख करतांना जास्त देखरेखीमुळे तपास अधिकाऱ्याचा उत्साहावर पाबंदी येऊ नये, जेणेकरून पावलोपावली ते वरिष्ठांकडे मार्गदर्शनाची अपेक्षा करतील. काहीही असो मात्र पोलीस अधिकाऱ्यांनी गंभीर गुन्ह्यात ज्या काही सूचना दिल्या असतील त्याची पूर्तता त्वरित केली पाहिजे. तपासांच्या कुठल्याही टप्प्यावर पोलीस अधीक्षकांना अंधारात ठेवले जाऊ नये. पोलीस अधीक्षकांनीसुध्दा तपासाच्या प्रगतीबाबत नेहमी माहिती मिळत राहील यासाठी काही पध्दत अवलंबवावी. त्याच बरोबर गुन्ह्याचे तपासाबाबतचे प्रगती अहवाल पोलीस उप महानिरीक्षक / इतर वरिष्ठांना पाठविण्याबाबत पोलीस अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होऊ नये. खास अहवालांच्या गुन्ह्याचेबाबत पोलीस अधिकाऱ्यांनी स्थानिक गुन्हे शाखेची मदत घ्यावी.

# प्रकरण – २५

# अपील व रिव्हिजन

ज्या पक्षकारास न्यायालयाने दिलेल्या निकालामुळे अन्याय झाला आहे असे वाटेल तो पक्षकार आपली कैफियत (बाजू) कायद्याने सांगितलेल्या योग्य त्या न्यायालयासमोर उघड करू शकतो.

## न्यायालयाच्या निकालाविरुध्द वरच्या न्यायालयात अपील दाखल करणे व फेरतपासणी अर्ज यातील फरक :

१. निकालाविरुध्द वरच्या न्यायालयात अपील दाखल करणे हा कायद्याने दिलेला अधिकार आहे; पण फेरतपासणी अर्ज हा न्यायालयाच्या मर्जीनुसार दिलेली सवलत असते. (AIR 1968 sc 707 व 1973 2145)

२. जेथे निकालाविरुध्द अर्ज (अपील) असते तेथे फेरतपासणी अर्ज नसतो. (कलम ४०१ (४), ३९९(२) क्रि.प्रो.कोड)

३. फेरतपासणीबाबतची कक्षा ही निकालाविरुध्दच्या अर्जापेक्षा जास्त व्यापक असते.

४. फेरतपासणीबाबतचा निर्णय न्यायालय स्वत:हून घेऊ शकते; पण निकालाविरुध्दची कैफियत कुठल्यातरी पक्षाने ती दाखल केल्याशिवाय घेता येत नाही.

५. फेरतपासणी अर्ज संबंधित पक्षकारांचे म्हणणे न ऐकून घेतासुध्दा निकाली काढता येतो पण निकालाविरुध्दच्या अर्जावर संबंधित पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेतल्याशिवाय निकाली काढता येत नाही.

## खालील प्रकरणांत निकालाविरुध्द अपील दाखल करता येत नाही

१. ज्या गुन्ह्यांमध्ये आरोपी स्वत: गुन्हा कबूल करतो व त्यास शिक्षा होते त्या शिक्षेविरुध्द वरच्या न्यायालयात अर्ज दाखल करता येत नाही. (कलम ३७५ क्रि.प्रो.कोड)

२. खालील प्रकरणात शिक्षेविरुध्द अर्ज दाखल करता येत नाही.

अ) ज्यावेळी उच्च न्यायालय (हायकोर्ट) १००० रु. पेक्षा जास्त दंड नाही किंवा ६ महिन्यापेक्षा जास्त शिक्षा देत नाही अशा गुन्ह्यात.

ब) ज्यावेळी सत्र न्यायालय किंवा शहरी फौजदारी न्यायदंडाधिकारी २०० रु.जास्त दंड नाही किंवा २ महिन्यापेक्षा जास्त शिक्षा देत नाही अशा गुन्ह्यात.

क) ज्यावेळी प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी १०० रु. पर्यंत दंड साध्या खटल्यात किंवा २०० रु. पर्यंत दंड समरी खटल्यात करतात तेव्हा. (कलम ३७६ क्रि.प्रो.कोड)

## शिक्षेविरुध्द अपील (अर्ज) दाखल करण्याची न्यायालये(सत्र न्यायालय, उच्च न्यायालय व उच्चतम न्यायालय)

### १. सत्र न्यायालय :

अ) न्यायदंडाधिकारी (ज्युडिशियल न्यायाधीश) किंवा शहरी न्यायदंडाधिकारी (मेट्रोपोलीटन न्यायाधीश) यांनी दिलेल्या शिक्षेविरुध्द किंवा सहायक सत्र न्यायालयाने ७ वर्षापर्यंत किंवा कमी सक्तमजुरीची शिक्षा दिल्यास (कलम ३७४ क्रि.प्रो.कोड)

ब) अशा तऱ्हेची कैफियत (अपील) दाखल करण्याची मुदत ३० दिवसाची आहे (कलम ११५ (क) मुदतीचा

कायदा.

## २. उच्च न्यायालय :

अ) सत्र न्यायाधीश /सह सत्र न्यायाधीश त्यांनी दिलेल्या शिक्षेविरुध्द किंवा कुठल्याही न्यायालयाने ७ वर्षांपेक्षा जास्त दिलेल्या शिक्षेविरुध्द (कलम ३७४ क्रि.प्रो.कोड)

ब) अशा शिक्षेविरुध्द अर्ज दाखल करावयाची मुदत ३० दिवस (आर्टिकल ११५ (क) मुदतीचा कायदा आहे.

क) कुठल्याही कनिष्ठ न्यायालयाने योग्य (पुरेशी) शिक्षा न दिल्यास. (कलम ३७७ क्रि.प्रो.कोड)

ड) अर्ज करावयाची मुदत ३० दिवस. (आर्टिकल ११५ (क) मुदतीचा कायदा)

इ) कुठल्याही कनिष्ठ न्यायालयाने जर गुन्हेगारास निर्दोष सोडले तर (कलम ३७८ क्रि.प्रो.कोड)

फ) असा अर्ज उच्च न्यायालयाने परवानगी दिली तरच दाखल करून घेतला पाहिजे.

ग) परवानगीचा अर्ज दाखल करावयाची मुदत ६० दिवस असेल (कलम १७८ (५) क्रि.प्रो.कोड)

## सूचना :

आरोपीस निर्दोष सोडल्याबाबतचे निर्णयाविरुध्द अर्ज दाखल करावयाची एकूण मुदत ९० दिवसांची (Article ११४ मुदत कायदा)आहे. मात्र उच्च न्यायालयांमध्ये परवानगीसाठी केलेल्या अर्जावर परवानगी दिल्यानंतर पुढील ३० दिवसांत उच्च न्यायालयात याचिका दाखल करावी लागेल.

## ३. सर्वोच्च न्यायालय (सुप्रीम कोर्ट) :

अ) ज्यात मृत्युदंडाची शिक्षा उच्च न्यायालयाने दिली आहे किंवा उच्चतम न्यायालयात याचिका दाखल करण्यायोग्यबाबतचे प्रमाणपत्र उच्च न्यायालयाने दिले असेल. (कलम १३४ भारतीय राज्य घटनेनुसार)

ब) अशी याचिका दाखल करण्याची मुदत ६० दिवस (१३२, १३३, मुदतीचा कायदा) आहे.

क) शिक्षेविरुध्द याचिका दाखल करण्यासाठी परवानगी मिळविण्यासाठी उच्च न्यायालयाच्या कुठल्याही निकालाविरुध्द, हुकूमाविरुध्द किंवा शिक्षेविरुध्द जे कुठल्याही न्यायालयाने दिली असेल १३६ भारतीय घटना अन्वये करता येऊ शकते.

ड) खास परवानगीशिवाय उच्चतम न्यायालयात अर्ज दाखल करावयाची मुदत ९० दिवस. ( १३३ मुदतीचा कायदा)

## अर्ज करावयाच्या मुदतीची मोजणी :

अर्ज करावयाच्या मुदतीची मोजणी ही ज्या दिवशी हुकूम किंवा निकाल जाहीर झाला असेल त्या दिवसापासून मात्र या हुकुमाची / निकालाची अधिकृत प्रत मिळण्यासाठी जो कालावधी जाईल तो या मुदतीतून वगळण्यात येईल.

## अर्ज करावयास उशीर झाल्यास माफ करण्याबाबत :

खालच्या न्यायालयाचे निकालाविरुध्द याचिका मुदतीत दाखल न करता आल्यास, तो उशीर माफ करण्याबाबतचा अर्ज त्याच वरिष्ठ न्यायालयात दाखल करून याचिका दाखल करता येते. संबंधित न्यायालय झालेला उशीर योग्य असेल व त्याची कारणे पुरेशी असलीत तर उशीर माफ करू शकते.(कलम ५ मुदतीचा कायदा)

## फेरतपासणी अर्ज कुठे करता येतो.

अ) फौजदारी कनिष्ठ न्यायालयाने दिलेल्या शिक्षेचा निकाल व निष्कर्ष हे कायद्यावर आधारित आहे की नाही? समर्पक आहे काय? उचित आहे काय? आणि अचूक आहे काय? यासाठी सत्र न्यायालयात याचिका दाखल करून आव्हान देता येते. (कलम ३९७, ४०१ क्रि.प्रो.कोड)

ब) सत्र न्यायालयाने दिलेल्या शिक्षेस ती शिक्षा कायद्यास धरून, समर्पक किंवा उचित (योग्य) आहे काय हे उच्च न्यायालयात याचिका दाखल करून त्यास आव्हान देता येते. (कलम ४०१ क्रि.प्रो.कोड)

क) यासाठी ९० दिवसांची मुदत आहे (कलम १३१ मुदतीचा कायदा)

ड) मध्यस्थी या नात्याने दिलेल्या कुठल्याही न्यायालयाचे आदेशाविरुध्द फेरतपासणी अर्ज करून आव्हान देता येणार नाही.

इ) उच्च न्यायालयास कलम ४८२ क्रि.प्रो.कोड अन्वये असलेल्या खास अधिकाराअन्वये कुठल्याही कनिष्ठ न्यायालयाचा तात्पुरता निकाल किंवा शेवटचा निकाल रद्द करू शकते. उच्च न्यायालय खास अधिकाराचा वापर करून न्यायालयातील गफलत (चूक) थांबविण्यासाठी हुकूम देऊ शकते (क्रि.प्रो.कोड कलम ४८२)

फ) उच्च न्यायालय भारतीय घटना अधिकार २२७ मधील देखरेख करण्याचा अधिकार वापरून किंवा घटनेच्या कलम २२६ प्रमाणे एखादी गोष्ट अचूक पध्दतीने करा किंवा करू नका असा हुकूम देण्याचा अधिकार वापरून एखाद्या योग्य प्रकरणांत दुखावलेल्या पक्षकाराचा योग्य तो न्याय मिळण्यासाठी खालच्या न्यायालयाने दिलेला निकाल / हुकूम रद्द करू शकते किंवा त्यात बदल करू शकते.

■■■■■

# प्रकरण - २६

# केस स्टडीज

# Case Studies

## १) गुन्हयाचा प्रकार :- मकोका.

पोलीस स्टेशन :- कोतवाली पोलीस ठाणे.
तालुका :- अमरावती.
जिल्हा :- अमरावती शहर.

**तपासी अंमलदार :-** १) सहा. पो. आयुक्त श्री. श्रीकांत महाजन
२) पोलीस निरीक्षक श्री. शिरभाते

**गुन्हयाची प्राथमिक माहीती :-**

१) पोलीस स्टेशन :- कोतवाली, अमरावती शहर. गु.र.नं. ३२५/२०१० भा.द.वि.क. ३९५,३९७,४१२,४१४,१२० ब
महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी अधिनियम क.३,
भारतीय हत्यार कायदा क. ३ , ४ / २५

२) फिर्यादी :- किशोर पोहेकर - खंडेलवाल ज्वेलर्स येथे काम करणारा कर्मचारी

३) आरोपी :-१) दिलीप ऊर्फ दिल्या रामराव कोरडे वय ३०, धंदा - मजुरी, रा.भांडेगांव ताो.जि.हिंगोली
२) जन्या ऊर्फ जनार्दन रामराव वाघमारे ऊर्फ राजेश साने वय २७, धंदा मजुरी , रा.भांडेगांव ताो.जि.हिंगोली.
३) रफीक शेख नाबी शेख ऊर्फ शेखर प्रशांत पाटील ऊर्फ रॉबर्ट जॉन डिसुजा वय ३८ वर्ष ,धंदा- मजुरी, रा.राणीबेन्नुर ,जि.हावेरी, कर्नाटक राज्य.
४) अनिल भगवान मोहनकर वय २५ वर्ष, धंदा- मजुरी, रा.सिंधी कॅम्प जवळ,आर्वी ,जि. वर्धा
५) दिलीप ऊर्फ काल्या किसनराव वाघ वय ४० वर्ष,धंदा - मजुरी रा. सुलतानपुरा, मोर्शी, जि.अमरावती
६) ओमप्रकाश ऊर्फ ओम्या भारत भटकर वय २५ वर्ष धंदा -मजुरी ,रा. भगीरथवाडी, अकोला, ताो.जि.अकोला.
७) शिवाजी विठ्ठल भोसले ऊर्फ भोला वय २८ वर्ष,धंदा-मजुरी रा.बोरखेडी,ताो.शेणगांव, जि.हिंगोली
८) नसरीन बानो रफीक शेख वय ३५ वर्ष धंदा-मजुरी रा.गांधीनगर,हारीहर, धावलगीरी,कर्नाटक
९) शेख सलीम शेख फरीद वय ३९ वर्ष धंदा-मजुरी रा.गैबीपुरा रोड,रिसोड, जि.वाशीम
१०) सौ.अंजली ऊर्फ आरती जनार्दन वाघमारे वय २६ धंदा-मजुरी रा.भांडेगांव, ताो.जि. हिंगोली.
११) तान्या ऊर्फ तानाजी विठ्ठल भोसले ऊर्फ भोले वय २७ वर्ष धंदा-मजुरी रा.बोरखेडी ताो. शेणगांव जि.हिंगोली.

४) जखमी :- दिपक खंडेलवाल

५) अ.घ.ता.वे. :- दिनांक ३१/०८/२०१० रोजी १४ : ०० वा.
ठिकाण :- खंडेलवाल ज्वेलर्स, जय स्तंभ चौक, अमरावती.

६) थोडक्यात हकीकत :- वरील तारखेस वेळी व ठिकाणी अमरावती शहरातील खंडेलवाल ज्वेलर्स, शोरूमध्ये ज्वेलरी शॉपचे मालक दिपक खंडेलवाल हे त्यांचे कर्मचारी यांचे सह काम करीत असतांना तीन इसम ग्राहक म्हणुन दुकानात शिरले.त्यापैकी एक जण मोठे पोट असलेला व दाढी असलेला हा अंगठी घेण्याचे बहाण्याने ट्रायल घेत

होता.तेवढयात त्याने एक १० सेकंदाचा मोबाईल कॉल रिसीव्ह केला.कॉल संपताच इतर तीन इसम दुकानात येवुन एकाने गेटवरील व्यक्तीची मान दाबली, दुस-याने दुकान मालकावर चाकुचा वार केला. इतर दरोडेखोरांनी पिस्तोल व इतर शस्त्रांचा धाक दाखवुन ८२ सोन्याच्या बांगडया, अंदाजे ५० लाख रू.किं.चा माल लुटून दोन मोटर सायकलीवर पळुन गेले.

**तक्रार / फिर्यादीची थोडक्यात हकीकत :-**

दिनांक ३१/०८/२०१० रोजी १४:०० वा.चे सुमारास अमरावती शहरातील खंडेलवाल ज्वेलर्स या नावाने असलेल्या ज्वेलरी शॉप मध्ये ज्वेलरी शॉपचे मालक दिपक खंडेलवार हे त्यांचे कर्मचारी यांचे सह काम करीत असतांना तीन इसम ग्राहक म्हणुन दुकानात शिरले. त्यापैकी एक जण मोठे पोट असलेला व दाढी असलेल्या इसम ( जो तपासअंती आरोपी क्रमांक ३- रफीक शेख नाबी शेख ऊर्फ शेखर प्रशांत पाटील ऊर्फ रॉबर्ट जॉन डिसुजा वय ३८ वर्ष धंदा- मजुरी, रा.राणीबेन्नुर, जि.हावेरी,कर्नाटक म्हणुन निष्पण्ण झाला ) हा दुकानातुन अंगठी घेण्याच्या बहाण्याने ट्रायल घेत होता.तेवढयात त्याने १० सेकंदाचा एक मोबाईल कॉल रिसीव्ह केला.कॉल संपल्या नंतर इतर तिन इसम दुकानात आले. एकाने गेटवरील व्यक्तीची मान दाबली, दुस-याने दुकान मालकावर चाकुचा वार केला. इतर दरोडेखोरांनी दुकानात काम करणारे नोकर आणि दुकान मालक यांना पिस्तोल व इतर शस्त्रांचा धाक दाखवुन त्यांना दुकानातील शेजारच्या दुस-या खोलीत नेले.आणि ८२ सोन्याच्या बांगडया, अंदाजे ५० लाख रू.किं.चा माल लुटून दोन मोटर सायकलीवर पळुन गेले.

**तपासाचा आराखडा / क्रमवारी :-**

१) गुन्हा घडल्यानंतर लागलीच तपासी अंमलदार पोलीस निरीक्षक श्री.शिरभाते यांनी घटनास्थळाला भेट देवुन पंचनामा केला.घटनास्थळावरील सिसिटीव्ही फुटेज पाहुन चार संशयीत आरोपीतांचे स्थिरचित्र बनविले.

२) गुन्हा घडल्यानंतर लागलीच मोबाईल कंपन्यांकडुन घटनेच्या दिवसाचे सिडीआर घेण्यात आले. त्यात विशेषत १० सेकंदाच्या कॉलचा अभ्यास करून व्होडाफोन टॉवर आयडी २२२११ वरून घटनेच्या वेळी मोबाईल नंबर १) ७७९८० ६५१०६ मोबाईल नंबर २) ९५४५६ १५४१५ या दोन मोबाईल क्रमांकावर १० सेकंदाचा कॉल केलेला दिसुन आला.

३) त्याच प्रमाणे त्याच टावर अंतर्गत मोबाईल क्रमांक ७७९८० ६५१३४ या मोबाईल क्रमांकाचा वरील दोन्ही क्रमांकाबरोबर संपर्क होता.व घटना घडल्या नंतर लागलीच हे तिन्ही मोबाईल क्रमांक हे टावरच्या कक्षेच्या बाहेर होते. त्या तिन्ही क्रमांकाचे मेलद्वारे नाव, पत्ता, व सीडीआर प्राप्त केला.

४) या मोबाईल क्रमांकावरून आयएमईआय क्रमांक काढुन त्यांचे इतर आरोपी मोबाईल धारकांचे संबध व लोकेशन काढण्यात आले.व आरोपी ज्या दिशेन पळुन गेले त्या परिसरात आरोपींतांचा शोध घेण्यात आला.

५) हे तिन्ही मोबाईल फक्त एकमेकांशी व मोबाईल क्र.९७६३२ ८५२२९ या मोबाईल क्रमांकाशीच संपर्कात होते. व त्या वरून आरोपी क्रमांक ३ - रफीक शेख नाबी शेख ऊर्फ शेखर प्रशांत पाटील ऊर्फ रॉबर्ट जॉन डिसुजा वय ३८ वर्ष धंदा- मजुरी,रा.राणीबेन्नुर, जि.हावेरी,कर्नाटक हा निष्पण्ण झाला.

६) नमुद चारही मोबाईल क्रमांकाचे गुन्हयापुर्वी, गुन्हा करते वेळी, व गुन्हा घडल्या नंतर काही कालावधीकरीता चालु राहणे, व नंतर बंद होणे असे होत असल्याने संशय बळावला. म्हणुन या चारही क्रमांकाचे सीडीआर मधिल आयएमईआय नंबर वरून आरोपी १) दिलीप ऊर्फ किसनराव वाघ २) तानाजी विठ्ठल भोसले ऊर्फ भोले हे निष्पण्ण झाले. त्यांना ओळखणा-यांचे जबाब नोंदविण्यात आले.

७) तसेच सुरवाडी ता.तिवसा, जि.अमरावती येथे गेलेल्या तपास पथकाने आरोपी दिलीप ऊर्फ किसनराव वाघ याचे घरी जावुन त्याचा शोध घेतला.परंतु तो मिळुन आला नाही.त्याचे घरात एका मोबाईल हॅण्डसेटचा रिकामा बॉक्स मिळुन आला.त्याचे पत्नीस सीसीटीव्ही फुटेज दाखविले असता तिने पतीस ओळखले.पतीस आरोपी जनार्दन रामराव वाघमारे ऊर्फ राजेश साने रा.ता. भांडेगांव जि.हिंगोली हा सोबत घेवुन गेला असल्याचे त्यास ओळखल्याने त्या भागात गेलेल्या पोलीस तपास पथकात माहीती देण्यात आली. त्या अन्वये तेथुन आरोपी दिलीप रामराव कोरडे यास ताब्यात घेवुन सिसिटीव्ही.फुटेज दाखविले, असता त्याने उर्वरीत आरोपींची माहीती दिल्याने इतर दरोडेखोर निष्पण्ण झाले.

८) त्याअनुषंगाने कर्नाटक मधिल पथकाने आरोपी जनार्दन रामराव वाघमारे व रफीक शेख नाबी शेख यांना राणेबेन्नुर,जि.हवेली येथुन ताब्यात घेण्यात आले.त्या नंतर बुलढाणा येथुन अनिल भगवान मोहनकर ,आरोपी दिलीप किसनराव वाघ,आरोपी ओमप्रकाश भारत भटकर यांना ताब्यात घेण्यात आले.तपासाअंती त्यांचे कडुन अग्नीशस्त्र व एक जिवंत काडतुस जप्त करण्यात आले.

९) इतर आरोपीतांचा शोध पथकामार्फत तपास करण्यात येवुन विविध ठिकाणाहुन आरोपी व दरोडयातील लुटुन नेलेला माल हस्तगत करण्यात आला.

१०) दरोडयातील आरोपीतांना या स्वरूपाचे गुन्हे करण्याची सवय व सराईत असल्याची व काही आरोपीतांनी महाराष्ट्र राज्यात इतर ठिकाणी अशा प्रकारचे गुन्हे केलेले आहेत.व अशा गुन्हयांची संबंधीत न्यायालयाने दखल सुद्धा घेतली आहे.त्यांची गुन्हेगारी संघटना असल्याचे दिसुन आल्या वरून सदर गुन्हयात आरोपीतांविरूद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३ (प),(पप), ३(४),३ (५) हे वाढवुन लावण्याल आले.

११) ११) दोषारोप क्रमांक :- ३९ / २०११ दिंनाक ०४/०३/२०११

८) **कोर्टाचा निकाल :-**

१ ) मा.विशेष न्यायालय, अमरावती यांनी आरे ापी क्रमांक २- जनार्दन वाघमारे , आरोपी क्रमांक ३ - मोटे पोट असलेला व दाढी असलेला रफीक शेख, आरोपी क्रमांक ४ -अनिल मोहनकर, आरोपी क्रमांक ५- दिलीप वाघ, आरोपी क्रमांक ६- ओमप्रकाश भटकर, व आरोपी क्रमांक ११-तानाजी भोसले ऊर्फ भोले यांना दोषी ठरवुन महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३ (प),(पप), ३(२),३ (४) अन्वये व कलम ३९७, १२० ब प्रमाणे शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

२) आरोपी क्रमांक २, ३, ११ यांना महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३ (प),(पप) अन्वये दोषी ठरवुन १२ वर्ष कठोर कारावासाची शिक्षा व ५ लाख रूपये प्रत्येकी दंड व दंड न भरल्यास २ वर्षाच्या अधिकच्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

३) आरोपी क्रमांक ४ ते ६ यांना महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३ (प),(पप) अन्वये दोषी ठरवुन १० वर्ष कठोर कारावासाची शिक्षा व ५ लाख रूपये प्रत्येकी दंड व दंड न भरल्यास २ वर्षाच्या अधिकच्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

४) आरोपी क्रमांक २ ते ६, ११ यांना महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३ (२) अन्वये दोषी ठरवुन ०५ वर्ष कठोर कारावासाची शिक्षा व ५ लाख रूपये प्रत्येकी दंड व दंड न भरल्यास २ वर्षाच्या अधिकच्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

५) आरोपी क्रमांक ४ ते ६ यांना भारतीय हत्यार कायदा कलम ३, ४ / २५अन्वये दोषी ठरवुन ०१ वर्ष कठोर कारावासाची शिक्षा व ५ हजार रूपये प्रत्येकी दंड व दंड न भरल्यास २ महिने अधिकच्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

६) आरोपी क्रमांक ८ नसरीन बानो रफीक शेख यांना महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३ (५) अन्वये दोषी ठरवुन ०४ वर्ष कठोर कारावासाची शिक्षा व २ लाख रूपये दंड व दंड न भरल्यास ९ महिन्याच्या अधिकच्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

७) आरोपी क्रमांक १० अंजली जनार्दन वाघमारे यांना महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३ (५) अन्वये दोषी ठरवुन ०४ वर्ष कठोर कारावासाची शिक्षा व २ लाख रूपये दंड व दंड न भरल्यास ९ महिन्याच्या अधिकच्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

८) आरोपी क्रमांक १- दिलीप रामराव कोरडे, आरोपी क्रमांक ७- शिवाजी विठ्ठल भोसले ऊर्फ भोला तसेच आरोपी क्रमांक शेख सलीम शेख फरीद यांना महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३ (५) अन्वये निर्दोष सुटका करण्यात आली आहे.

**पुराव्याचे स्वरूप :-**

**१ ) साक्षिदार / तोंडी पुरावा Cr.P.C. १६४ प्रमाणे जबाब**

फिर्याद :- किशोर पोहेकर यांनी दरोडयाची दिलेली.

साक्षिदारांचे जबाब. फोटोग्राफर यांचा जबाब. फिंगर प्रिंट एक्सपर्ट यांचा जबाब.

**२) कागदपत्रीय पुरावा**

घटनास्थळाचा पंचनामा.

सिसिटीव्ही फुटेज व त्या वरून बनविलेले संशयीत आरोपीतांचे स्थिरचित्र.

ज्वेलर्स दुकानातील घटनेच्या दिवशीचा, दरोडयापुर्वी दुकानातील साठा व दरोडया नंतरचा साठा,

तसेच इतर ग्राहकांना विकलेला माल याचे संपुर्ण अभिलेख. फिंगर प्रिंट एक्सपर्ट यांचा अहवाल
दुकान मालक दिपक खंडेलवाल यांना दरोडेखोरांनी केलेल्या दुखापतीचे प्रमाणपत्र.
आरोपीतांकडुन जप्त करण्यात आलेले सोन्याचे दागिने,मालाचा जप्ती पंचनामा.
आरोपीतांनी गुन्हयात वापरलेली मोटर सायकलचा व पिस्तोलचा जप्ती पंचनामा.
सिसिटीव्ही फुटेजचे कॉम्प्युटरची हार्ड डिस्क. सिसिटीव्ही फुटेजचे रेकॉर्डेड सिडी कॉपी.
३) हस्ताक्षर तज्ञ अहवाल:- सिसिटीव्ही फुटेज मध्ये आरोपी ज्या ठिकाणी उभे होते,त्या ठिकाणचे घेण्यात आलेले फिंगरप्रिंट.

इतर पुरावे. :- कॅलेंडर ऑफ इव्हीडंस ( आरोपीताचा पुरावा तक्ता )

| अक्र | आरोपीताचे नाव | आरोपीचा गुन्हयातील सहभाग / कृती | आरोपी विरूद्ध पुरावा |
|---|---|---|---|
| १ | दिलीप ऊर्फ दिल्या रामराव कोरडे | आरोपी जन्या ऊर्फ जनार्दन रामराव वाघमारे याने लुटीचे मालाचे विक्रीचे पैशातुन दिलेल्या नगदी रकमेतुन साक्षिदार बळीराम जगताप याचे नावावर वाशीम येथील शोरूम मधुन नविन हिरो होंडा मोटर सायकल विकत घेतली. | १. साक्षिदार-बळीराम जगताप यांचा जबाब<br>२. मोटर सायकल खरेदीचे सर्व कागदपत्रे<br>३. विकत घेतलेली मोटर सायकल.<br>**निर्दोष** |
| २ | जन्या ऊर्फ जनार्दन रामराव वाघमारे ऊर्फ राजेश साने | गुन्हेगारी संघटना तयार केली. आरोपी क्रमंक ३ ते ६ व ११ यांचे सह कट करून खंडेलवाल ज्वेलर्स, येथे चाकु,पिस्तोल चा धाक दाखवुन दरोडा घातला.व दुकान मालक दिपक खंडेलवाल यांना गंभीर दुखापत केली. | १. सिसिटीव्ही फुटेज<br>२. साक्षिदारांचे जबाब.<br>३. जप्त अग्निशस्त्र पंचनामा. |
| ३ | रफीक शेख नाबी शेख ऊर्फ शेखर प्रशांत पाटील ऊर्फ रॉबर्ट जॉन डिसुजा | -- । ।-- | -- । ।-- |
| ४ | अनिल भगवान मोहनकर | -- । ।-- | -- । ।-- |
| ५ | दिलीप ऊर्फ काल्या किसन राव वाघ | -- । ।-- | -- । ।-- |
| ६ | ओमप्रकाश ऊर्फ ओम्या भारत भटकर | -- । ।-- | -- । ।-- |
| ७ | शिवाजी विठ्ठल भोसले ऊर्फ भोला | आरोपी क्र.९ यास चोरीच्या काही बांगडया गोंविद वर्मा नावाचे सोनाराला विकण्या साठी दिल्या. | **निर्दोष** |
| ८ | नसरीन बानो रफीक शेख | आ.क्र.३ ची पत्नी असुन दरोडयातीले लुटीचा माल जो आ.क्र.३ चे वाटयाला आलेला तो सोनाराकडे गहाण टाकला व काही सान्याचे बांगडया बनविले. | १. जप्त करण्यात आलेले सोन्याचे दागिने<br>२. ज्या सोनाराकडे दागिणे गहाण ठेवले त्या सोनाराचा जबाब.<br>३. गहाण ठेवलेल्या दागिन्यांवर दिपक खंडेलवाल यांचे दुकानाचे विशेष खुन असलेले चिन्ह. |
| ९ | शेख सलीम शेख फरीद | आ. क्र.७ याने चोरीच्या काही बांगडया गोंविद वर्मा नावाचे सोनाराला विकल्या. | **निर्दोष** |
| १० | सौ.अंजली ऊर्फ आरती जनार्दन वाघमारे | आ.क्र.२ ची पत्नी असुन दरोडयातीले लुटीचा माल जो आ. क्र.२ चे वाटयाला आलेला तो जमिनीत लपवुन ठेवला. सोन्याचे बांगडया बनविले. | १. जप्त करण्यात आलेले सोन्याचे दागिने |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | तान्या ऊर्फ तानाजी विठ्ठल भोसले ऊर्फ भोले. | आ. क्र.२ ते ६ यांचे सह दरोडयाचा कट करून खंडेलवाल ज्वेलर्स,येथे पिस्तोल चाकुचा , धाक दाखवुन दरोडा घातला.व दुकान मालक दिपक खंडेलवाल यांना गंभीर दुखापत केली. | १. सिसिटीव्ही फुटेज<br>२. साक्षिदारांचे जबाब.<br>३. जप्त अग्निशस्त्र पंचनामा. |

**गुन्हयाची सुनावणी प्रक्रीया :-**

१) फिर्यादी दिपक खंडेलवाल यांची साक्ष चांगली झाली.

२) ज्वलर्स दुकानातील काम करणारे नोकर यांनी CCTV फुटेज बघुन आरोपींताचे सांगितलेल्या वर्णनावरुन त्यांचे बनविण्यात आलेले स्थिरचित्रा वरुन आरोपीतांना त्यांनी ओळखल्याने त्यांची साक्ष महत्तवाची ठरली.

३) ज्वेलर्स दुकनातील सिसिटीव्ही फुटेज असलेली दुकानातील कॉम्प्युटरची हार्ड डिस्क ज्यात आरोपीतांनी दरोडा टाकतांना चित्रीत झालेले चित्रिकरण त्यांचे विरुद्ध पुरावा ठरला

४) सिसिटीव्ही फुटेजचे रेकॉर्डेड सिडी कॉपी तयार करुन मा.कोर्टात सादर करण्यात आली.

५) आरोपी ज्वेलर्सचे दुकानात ज्या ठिकाणी उभे होते त्या ठिकाणाचे फिंगर प्रिंट एक्सपर्ट यांचा अहवाल

६) इतर साक्षिदार असे एकुण सर्व ५५ साक्षिदार व सर्व पंचनाम्यातील पंच यांच्या साक्षी महत्तवाचे ठरल्या.

**तपासातील उणीवा दुर करण्यासाठी / मात करण्यासाठी केलेल्या उपाय योजना**

यातील आरोपी क्रमांक ७ शिवाजी भोसले आणि आरोपी क्रमांक ११ तानाजी भोसले हे नात्याने भाउ भाउ आहेत. आरोपी शिवाजी भोसले हा आरोपी क्रमांक ९ शेख सलीम यांचे कडे जाउन लुटीतील बांगडया दिल्या.व शेख सलीम याने गोंविद वर्मा या सोनाराला विकल्या.

**मात करण्यासाठी सुचना :-** सदरचा व्यवहार हा त्यांचे आपआपसात झाला असल्याने त्याबाबत काही एक पुरावा उपलब्ध झालेला नसल्याने भा.पु.का. क.२७ प्रमाणे आरोपीचे निवेदन घेवुन मेमोरंडम पंचनामा करता आला असत.

आरोपी जन्या ऊर्फ जनार्दन रामराव वाघमारे याने लुटीचे मालाचे विक्रीचे पैशातुन दिलेल्या नगदी रकमेतुन साक्षिदार बळीराम जगताप याचे नावावर वाशीम येथील सोहम अॅटोमोबाईल्स, शोरूम मधुन नविन हिरो होंडा मोटर सायकल विकत घेतली.

**मात करण्यासाठी सुचना :-** सोहम अॅटोमोबाईल्स,शोरूम मालकाचा व शोरूम मधिल इतर संबंधित कर्मचारी यांचा जबाब नोंदविता आला असता. तसेच त्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावलेले असतील तर मोटार सायकल घेण्यास कोण कोण आले होते,याबाबत माहीती मिळु शकली असती. सदरची मोटर सायकल आरोपी क्र.१ दिलीप रामराव कोरडे यानेच खरेदी केली होती काय ? या बाबत अधिक पुरावा उपलब्ध करता आला असता.

नमुद गुन्हयातील टोळी प्रमुख जान्या ऊर्फ जनार्दन रामराव वाघमारे ऊर्फ राजेश माने याने विलासनगर येथील बिच्छुनगर या भागात रूम भाडयाने घेवुन तिन साथिदारांसह राहु लागला.आरोपी रफीक नाबी शेख याने दुकानात जावुन रेकी केली.त्या करीता यवतमाळ व नागपुर येथुन दोन मोटार सायकल चोरून आणल्या.

**मात करण्यासाठी सुचना :-** आरोपी जनार्दन रामराव वाघमारे ऊर्फ राजेश माने याने ज्या ठिकाणी भाडयाने रूम घेवुन राहीला. त्या ठिकाणी असलेल्या पोलीस ठाण्यास संबंधित घरमालकाने घर भाडयाने दिल्याची माहिती पोलीस ठाण्यास देणे आवश्यक होते.तसेच शहर वाहतुक शाखा, स्थानिक पोलीस ठाणे कडील कर्मचारी यांचे सह गुन्हे शाखे कडील कर्मचारी यांचे मदतीने विविध ठिकाणी, वेगवेगळया दिवशी / वेळी नाकाबंदी लावण्यात यावी.

**तपासातील महत्त्वाचे मुद्दे / सबळ मुद्दे**

१ ) यातील फिर्यादी किशोर पोहोकार यांनी घटने नंतर दिलेली ०६ आरोपींनी ७९ सोन्याच्या बांगडया लुटुन नेल्याची फिर्याद न्यायालयात सिद्ध झाली.

२) तपासी अंमलदार पोलीस निरीक्षक श्री. शिरभाते यांनी तात्काळ घटनास्थळाला भेट देवुन घटनास्थळ पंचनामा तयार केला. घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज मध्ये हे सर्व सामिल असल्याने घटनास्थळ पंचनामा न्यायालयात सिद्ध झाला.

३) घटनेनंतर लागलीच पोलीस पोहोचल्याने सीसीटीव्ही फुटेज पाहुन संशयीतांचे स्थिरचित्र तयार करण्यात आली. व ती वेगवेगळया प्रकारात प्रकाशित करण्यात आली.

१) फुटेज मध्ये १० सेकंदासाठी आलेल्या फोन कॉल मुळे सर्व मोबाईल कंपन्यांचे संबंधित दिवसाचे घटनेच्या वेळेचे रेकॉर्ड मागविण्यात आले.त्यावरून आरोपीतांचा शोध घेवुन तपास करण्यात आला.व आरोपीतांना अटक करण्यात येवुन दरोडयातील लुटुन नेलेला माल हस्तगत करण्यात आला.

२) आरोपीतांचे घटनास्थळी घेतलेले चांस प्रिंट हे आरोपी घटनेच्या दिवशी ज्वेलर्सचे दुकानात होते हे फिंगरप्रिंटच्या अहवाला वरुन सिद्ध झाले.

३) १७ सीसीटीव्ही कॅमेरे मध्ये झालेले चित्रीकरणच्या फुटेज चा उत्तम पुरावा.ज्यात ज्वेलर्सच्या दुकानात प्रवेश करणा-या सर्व आरोपींना स्पष्टपणे त्यांच्या जवळच्या नातेवाईकांनी ओळखले.आणि हे न्यायालयात सिद्ध झाले.

४) खंडेलवाल ज्वेलसमधिल कॉम्प्युटरचा सीपीयु , हार्ड डिस्क, जप्त केल्याने घटनेच्या दिवशीची सीडी कॉपी करण्यात आली, त्यावेळी कॉम्प्युटर योग्य रितीने काम करीत होता.जप्त सीडी, हार्ड डिस्कच्या माहीतीशी जुळवुन पाहण्यात आली. त्यामुळे सीसीटीव्ही फुटेज पुरावा म्हणुन सर्व कायदेशीर पुर्तता केली गेली.

**तपासाचे विश्लेषण :-**

१) सुधारण्यासाठी सुचना :-

(१) घटनेच्या दिवशी सीसीटीव्ही फुटेज नुसार आरोपी क्रमांक २-जनार्दन वाघमारे,आणि आरोपी क्रमांक ८ ओमप्रकाश भटकर यांच्या हातात पिस्तोल होते,असे दिसले.त्यापैकी एकच पिस्तोल जप्त करण्यात आले.

२) तपास :- गुन्हा घडल्या नंतर लागलीच सेल आयडी. ट्रॅकरच्या मदतीने घटनास्थळावरील मोबाईल सेवा पुरविणा-या सर्व मोबाईल कंपन्यांचे टॉवर आयडी. घेण्यात आली.त्यावरून सर्व कॉलचे सीडीआर घेवुन त्यातील विशेषतः दुपारी ०२:०० ते ०३:०० वा.दरम्यान १० सेकंदाचा आलेला कॉलची माहीती काढण्यात आली.त्यात व्होडाफोन कंपनीचे टॉवर आयडी २२२११ वरून वरून घटनेच्या वेळी ज्वेलर्स शॉप दुकानात असलेले मोबाईल नंबर (१) ७७९८० ६५१०६ (२) ९५४५६१५४१५ या दोन मोबाईल क्रमांकवर १० सेकंदाचा कॉल दिसुन आल्याने मोबाईल क्रमांक (३) ७७९८० ६५१३४ याचा वरील दोन्ही मोबाईल क्रमांकाशी संपर्क असल्याचे आढळुन आले. तिन्ही क्रमांकाचे मेलद्वारे नाव, पत्ता, व सीडीआर प्राप्त केला. त्या वरून आरोपी क्रमांक ३ - रफीक शेख नाबी शेख ऊर्फ शेखु प्रशांत पाटील ऊर्फ रॉबर्ट जॉन डिसुजा वय ३८ वर्ष, रा. राणीबेन्नुर, जि. हावेरी, कर्नाटक हा निष्पण्ण झाला. सीडीआर मधिल आयएमईआय नंबर वरून आरोपी १) दिलीप ऊर्फ किसनराव वाघ २) तानाजी विठ्ठल भोसले ऊर्फ भोर्ले हे निष्पण्ण झाले. त्यांना ओळखणा-यांचे जबाब नोंदविण्यात आले. इतर आरोपीतांचा शोध पथका मार्फत तपास करण्यात येवुन विविध ठिकाणाहुन आरोपी व दरोडयातील लुटुन नेलेला मुददेमाल त्यांचेकडुन हस्तगत करण्यात आला. दरोडयातील काही आरोपी यांना या स्वरूपाचे गुन्हे करण्याची सवय व ते सराईत असल्याची माहीती मिळाली.तसेच त्यापैकी काही आरोपीतांनी महाराष्ट्र राज्यात इतर ठिकाणी अशा प्रकारचे गुन्हे केलेले आहेत.व अशा गुन्हयांची संबंधीत न्यायालयाने दखल सुद्धा घेतलेली आहे.त्यांची गुन्हेगारी संघटना असल्याचे दिसुन आल्यावरून सदर गुन्हयात आरोपीतां विरूद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३ (प), (पप), ३(४), ३ (५) हे वाढवुन लावण्याल आले

३) प्रतिबंधात्मक कारवाई :-

४) गुप्तवार्ता संकलन :-

## २) गुन्हयाचा प्रकार :- बालकांचा लैंगिक छळ

पोलीस स्टेशन :- शहापुर पोलीस ठाणे.
तालुका :- शहापुर.
जिल्हा :- ठाण.

**तपासी अंमलदार :- १) पोलीस निरीक्षक श्री. बी. एन. शिंदे**

**गुन्हयाची प्राथमिक माहीती :-**

१) पोलीस स्टेशन :- शहापुर पोलीस ठाणे, शहापुर गु र नं. १९९ /२०१४ भादविक.३७६ (२) सह लैंगिक अपराधापासुन बालकांचे संरक्षण अधिनियम सन २०१२ चे कलम ३

२) फिर्यादी :- सोन्या पागा कोरडे वय २५ धंदा मजुरी रा.आतकरपाडा, शहापुर, ता॰.शहापुर जि.ठाणे.

३) आरोपी :- अनिल रमेश कोल्हे वय २५ वर्ष रा. सिध्दार्थ नगर, कसारा, शहापुर, जि.ठाणे.

४) पिडीत :- कु.मनकी पागा कोरडे वय १७ वर्ष रा. आतकरपाडा, शहापुर, जि.ठाणे.

५) अ.घ.ता.वे. :- दि. ०२/०५/२०१४ रोजीचे ७ महिन्यापुर्वी नक्की तारीख वेळ माहीत नाही.
ठिकाण :- कसारा येथील पडीक रेल्वे कार्यालयात,कसारा.जि.ठाणे.

६) थोडक्यात हकीकत :- यातील फिर्यादी हे आतकरपाडा येथे त्यांचे मुले व दोन बहीणी राहत असुन त्यांची लहाण बहीण मनकी वय १९ ही मतिमंद असुन रागिट स्वभावाची आहे.तीला कोठे आहे बाबत विचारले असता, ती शिव्या देत असते.ती लोकल रेल्वेने वाशींद, कल्याण, ठाणे, येथे तसेच मुंबई नाशिक हायवेने जात येत असते.ती कोणाकडुनही मागुन खात असते.ती मतिमंद असल्याने तीचा विवाह झालेला नाही.घटनेच्या सात महिन्या अगोदर कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादीची बहीण मनकी हीचे बरोबर, ती मतीमंद आहे हे माहीत असल्याचा फायदा घेऊन तिच्यावर बलात्कार केला.

**तक्रार / फिर्यादीची थोडक्यात हकीकत :-**

दिनांक ०२/०५/२०१४ रोजी फिर्यादी सोन्या पागा कोरडे वय २५ धंदा मजुरी रा.आतकरपाडा, शहापुर, ता॰.शहापुर, जि.ठाणे यांनी फिर्याद दिली कि,वरील ठिकाणी माझे दोन बहीणी व मुलांसह राहतो माझी लहाण बहीण मनकी वय १९ वर्ष ही लहाणपणा पासुन मतीमंद असुन ती घरात राहत नाही.ती दिवसभर कोठेही फिरत असते.तसेच जेवणही बाहेरच कोणाकडुनही मागुन खाते.ती रागिट स्वभावाची आहे.तीला कोठे आहे बाबत विचारले असता, ती शिव्या देते. ती लोकल रेल्वेने वाशींद, कल्याण, ठाणे, येथे तसेच मुंबई नाशिक हायवेने जात येत असते. ती मतिमंद असल्याने तीचा विवाह झालेला नाही.

नमुद तारखेच्या दोन महिन्यापुर्वी फिर्यादीस त्याचे घरातील स्त्रियांनी त्यांना सांगितले कि, मनकीचे पोट दिसत आहे.म्हणुन दिनांक ०५/०५/२०१४ रोजी मनकीची सोनोग्राफी टेस्ट केली असता, ती ७ महिन्याची गरोदर असल्याचे समजले.गरोदरपणा बाबत तीला विचारले असता,त्याबाबत मनकीला काही एक सांगता येत नव्हते. कुमारी मनकी ही मतिमंद आहे हे माहीत असतांना कोणीतरी अज्ञात आरोपीताने तिचे मतिमंद असल्याचा फायदा घेऊन तिच्या संमतिशिवाय तिच्यावर बलात्कार केला.

**तपासाचा आराखडा / क्रमवारी :-**

१) गुन्हयातील आरोपी अज्ञात असल्याने तसेच पिडीत मुलगी ही मतिमंद असल्याने व तिंच्याकडुन अज्ञात आरोपी बाबत काही एक माहीती उपलब्ध झाली नाही.अज्ञात आरोपीताचा शोध घेणे कामी पडीत ज्या ठिकाणी जात होती,त्या विविध ठिकाणाचे रेल्वे स्टेशन, हायवे येथे अनेक लोकांकडे माहीती घेतली. परंतु काही एक उपयुक्त माहीती मिळुन आली नाही.

२) कु.मनकी ही STD बुथवरुन अनिल नावाच्या मुलास त्याचे मोबाईल फोनवर संपर्क साधत होती. अशी माहीती मिळाली. पिडीतास त्या बाबत विचारपुस केली असता,तिला अनिलचे पुर्ण नाव पत्ता सांगता येत नव्हता.तिला फक्त मोबाईल नंबर लिहीता येत होता.तो तपासी अंमलदाराने लिहुन घेतला.

३) त्यानंतर महीला पोलीस अधिकारी यांचे मार्फत VDO कॉन्फरन्सींगद्वारे पिडीत मुलीचा जबाब नोंदविण्यात आला.

४) आरोपीताचे मोबाईल नंबरवरुन त्याचा तपास करण्यात आला.सदर मोबाईल नंबर त्याचे नावावर

नव्हता.त्याचे मोबाईलचे कॉल डिटेल्स रेकॉर्ड वरुन त्याचे पर्यंत पोलीस पोहोचले.

५) आरोपी अनिल रमेश कोल्हे वय २५ वर्ष यास अटक करण्यात आली.

६) आरोपीतास घटने बाबत विचारपुस करण्यात आली.त्याने घटनास्थळ दाखविल्याने त्या ठिकाणचा घटनास्थळ पंचनामा करण्यात आला.

७) आरोपीताचे रक्ताचे नमुने, पिडीताचे रक्ताचे नमुने,तसेच पिडीत बाळंतिण झाल्यानंतर तिचे बाळाचे रक्ताचे नमुने केमिकल ॲनालायझर यांचे कडे पाठवुन रक्तगट व DNA बाबत अहवाल मागविण्यात आला.

८) केमिकल ॲनालायझर यांचा अहवाल प्राप्त केल्यानंतर त्यात आरोपी अनिल व लहान मुलाचे DNA जुळले.त्या वरुन अनिल पासुनच मनकी गरोदर असल्याचा पुरावा झाला.सिव्हिल हॉस्पिटल ठाणे येथे पिडीत मनकी ही किती टक्के मतिमंद आहे याबाबत वैद्यकीय मंडळापुढे हजर केले. वैद्यकीय मंडळाने ति ६० टक्के मतीमंद असल्याचे प्रमाणपत्र तपासी अंतलदार यांना दिले.

९) त्या नंतर जे.जे.हॉस्पिटल, मुंबई यैथे पत्र देऊन पिडीत ६० टक्के मतिमंद आहे. त्या वरुन तिचे मानसिक वया बाबत विचारणा केली असता पिडीत मुलगी ही १५ ते १७ वर्ष दरम्यानचे मुला प्रमाणे वागते असा अभिप्राय मिळाले.

१०) पिडीताचे मानसिक वयावरुन गुन्हयास आरोपी विरुद्ध बालकांचे लैंगिक अपराधा पासुन संरक्षण अधिनियम सन २०१२ चा कायदा लावण्यात आला.व दोषारोप पत्र पाठविण्यात आले.

११) दोषारोप क्रमांक :- १९ / २००९. दिनांक :- १० / ०७ / २००९

कोर्टाचा निकाल :- मा.न्यायालय यांनी आरोपी अनिल रमेश कोल्हे यास पिडीत मुलगी ही,मानसिक दृष्टया विकलांग होती व त्याचा फायदा आरोपीने घेतला आहे म्हणुन त्यास दोषी ठरवुन जन्मठेपेसह दंडाची शिक्षा ठोठावली आहे.

**पुराव्याचे स्वरूप :-**

१) साक्षिदार / तोंडी पुरावा Cr.P.C. १६४ प्रमाणे जबाब

फिर्याद :- सोन्या पागा कोरडे यांनी दिलेली.

फिर्यादींचे घरात राहणारे यांचेकडे चौकशी करून, त्यांचे नोंदविलेले जबाब.

घटनास्थळाचा केलेला पंचनामा.

२) कागदपत्रीय पुरावा.

१) साक्षिदारांचे जबाब २) सोनोग्राफी अहवाल.३) आरोपी वापरत असलेल्या मोबाईलचे कॉल डिटेल्स रेकॉर्ड ४) आरोपीताचे रक्ताचे नमुने, पिडीताचे रक्ताचे नमुने, तसेच पिडीताने जन्म दिलेल्या बाळाचे रक्ताचे नमुन्या वरुन आलेला DNA अहवाल ५)पिडीत मुलगी मतीमंद असल्याचे प्रमाणपत्र ६) पिडीत मुलीचे मानसिक वयाचे प्रमाणपत्र.

३) इतर पुरावे. :- कॅलेंडर ऑफ इव्हीडंस ( आरोपीताचा पुरावा तक्ता )

| अक्र | आरोपीताचे नाव | आरोपीचा गुन्हयातील सहभाग / कृती | आरोपी विरुद्ध पुरावा |
|---|---|---|---|
| १ | अनिल रमेश कोल्हे | कुमारी मनकी ही मतिमंद आहे हे माहीत असतांना आरोपी अनिल रमेश कोल्हे वय २५ वर्ष रा. सिध्दार्थ नगर, कसारा, शहापुर, जि.ठाणे याने तिचे मतिमंद असल्याचा फायदा घेऊन तिच्या संमतिशिवाय तिच्यावर बलात्कार केला. | १. आरोपीचे मोबाईलचे CDR रिपोर्ट<br>२. DNA आलेला अहवाल.<br>३. पिडीत मुलगी मतीमंद असल्याचे प्रमाणपत्र.<br>४.पिडीत मुलीचे मानसिक वयाचे प्रमाणपत्र. |

**गुन्हयाची सुनावणी प्रक्रीया :-**

फिर्यादी :- सोन्या पागा कोरडे यांची साक्ष महत्तवाची ठरली.

फिर्यादींचे घरातील लोकांचे जबाब हे फि र्यादीचे बाजुने पुरक ठरले.

पिडीत ज्या ठिकाणी जात होती त्या ठिकाणी लोकांना विचारपुस करुन नोंदविलेले जबाब.

घटनास्थळाचा केलेला पंचनाम्यातील पंच

VDO कॉन्फरन्सीद्वारे पिडीत मुलीचा नोंदविण्यात आलेला जबाब.

पिडीत मुलीची सोनोग्राफी करणारे डॉक्टर

गुन्हा दाखल करणारे पोलीस ठाणे अंमलदार

पोलीस तपासी अंमलदार पोलीस निरीक्षक श्री.बी.एन.शिंदे.

## तपासातील उणीवा दुर करण्यासाठी / मात करण्यासाठी केलेल्या उपाय योजना.

पिडीत मुलीचे वय १९ वर्ष आहे. तिच्या संमतीने आरोपीताने तिच्याशी संभोग केला आहे.त्याने कोणतीही बळजबरं केलेली नाही.

**उपाय :-** पोलीस तपासी अंमलदाराने पिडीताचे मानसिक वयाबाबत वैद्येकीय मंडळा कडुन घेतलेले प्रमाणपत्रामुळे पिडीत ही १५ ते १७ वर्षाच्या मुलां प्रमाणे वागते असा अभिप्राय मिळाला.तसेच तिची बौद्धिक पातळी ही १२ वर्ष वयाची असल्याचे प्रमाणपत्र जे.जे.हॉस्पिटल, मुंबई यांचे कडुन प्राप्त करुन घेतले.

आरोपी हा अज्ञात होता. तसेच सदर गुन्हयातील पिडीत ही मतिमंद होती. तिचा स्वभाग रागिट होता.

**उपाय :-** पिडीत ही मतिमंद असल्याने ति लोकल रेल्वेने व मुंबइ नाशिक हायवेने कोठेही फिरत असल्याने तपासी अंमलदार यांनी त्या त्या ठिकाणी जाऊन ल्लोकांशी संवाद साधला. पिडीत मुली कडुन कौशल्य वापरुन आरोपीताचा मोबाईल नंबर हस्तगत करुन आरोपीताची माहीती काढली.आरोपीतास अटक करुन त्याचे विरुद्ध लैंगिक अपराधा पासुन बालकांचे संरक्षण अधि.सन २०१२ चे क ३ सह कलम लावुन आरोपीतास शिक्षा मिळवुन आणली.

## तपासातील महत्त्वाचे मुद्ये / सबळ मुद्ये

१. सुरुवातीस अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल होऊनही तपासी अंमलदाराने STD बुध वरुन तपास सुरु केला.
२. आरोपीताचे मोबाईलचा CDR अहवाल मा.न्यायालयाने मान्य केला.
३. पिडीत मुलीचे वय १९ वर्ष असले तरी, ती १५ ते १७ वर्षाच्या मुलां प्रमाणे वागते असा अभिप्राय सिव्हिल हॉस्पि. चे वैद्यकीय मंडळा कडुन मिळाला.तसेच तिची बौद्धिक पातळी ही १२ वर्ष वयाची असल्याचे प्रमाणपत्र जे.जे. हॉस्पिटल,मुंबई यांचे कडुन मिळाल्याने मा.न्यायालयाने ती मतीमंद असल्याने तिची बलात्कारासाठी संमती नव्हती असे ग्राहय धरले म्हणुन आरोपीतास शिक्षा झाली.
४. पिडीत मनकी ही मतिमंद होती. ती गरोदर राहील्या नंतर तिने एका बाळास जन्म दिला.त्या बाळाचे रक्त आणि आरोपीताचे रक्ताचे नमुने DNA तपासणी साठी पाठविण्यात आले.त्यांचा रक्तगट एकच आला.त्यामुळे आरोपी हाच बाळाचा पिता असल्याचे निष्पण्ण झाले.

**तपासाचे विश्लेषण :-** तपास :-

१) पिड्डीत मुलीची केलली सोनोग्राफीचे कागदपत्रे हस्तगत केली.
२) साक्षिदारांचे जबाब नोंदविण्यात आले.
३) पिडीत ज्या ठिकाणी जात होती त्या ठिकाणी लोकांना विचारपुस करुन नोंदविलेले जबाब.
४) VDO कॉन्फरन्सीद्वारे पिडीत मुलीचा नोंदविण्यात आलेला जबाब.
५) आरोपी वापरत असलेल्या मोबाईलचे कॉल डिटेल्स रेकॉर्ड काढण्यात येऊन त्यास अटक करण्यात आली.
६) गुन्हयाचे घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला.
७) आरोपीताचे रक्ताचे नमुने, पिडीताचे रक्ताचे नमुने, तसेच पिडीताने जन्म दिलेल्या बाळाचे रक्ताचे नमुन्या वरुन DNA चा अहवाल मागविण्यात आला.
८) पिडीत मुलगी मतीमंद असल्याचे प्रमाणपत्र सिव्हिल हॉस्पिटलचे वैद्यकीय मंडळा कडुन घेण्यात आले.
९) पिडीत मुलीचे मानसिक वयाचे प्रमाणपत्र जे.जे.हॉसिपटल, मुंबई यांचे कडुन प्राप्त करुन घेतले

२) **प्रतिबंधात्मक कारवाई :-**

३) **गुप्तवार्ता संकलन :-**

## ३) गुन्हयाचा प्रकार :- रात्री घरफोडी.

पोलीस स्टेशन :- शिवाजी नगर पोलीस स्टेशन.
तालुका :- बीड.
जिल्हा :- बीड.

**तपासी अंमलदार :- १) पोलीस उप निरीक्षक श्री. बी. एस. वाकडकर**

**गुन्हयाची प्राथमिक माहीती :-**

७) पोलीस स्टेशन :- शिवाजी नगर, पोलीस ठाणे, बीड गु र नं. ३६ /२००९ ,भादविक.४५७, ३८०
२) फिर्यादी :- गणेश जनार्दन डोके वय ४८ वर्ष धंदा किराणा दुकान रा. १९, विदयानगर,बीड
३) आरोपी :- १) तक्षक मारोती डांगे वय २५ वर्ष रा.मोंढा नाका, बीड
२) ईस्माईल शेख वय १९ वर्ष रा. परभणी
४) पिडीत :- गणेश जनार्दन डोके वय ४८ वर्ष धंदा किराणा दुकान रा.१९ विदयानगर, बीड
५) अ.घ.ता.वे. :- दि.०७/५/२००९ रोजीचे २३:३० वा ते दि.०८/५/२००९ चे पहाटे ०५:३० वा.चे दरम्यान.
ठिकाण :- .विदयानगर,बीड

६) थोडक्यात हकीकत :- यातील फिर्यादी गणेश जनार्दन डोके हे दिनांक ०७/०५/२००९ रोजी घरातील सर्व कामे आटोपुन रात्री झोपी गेले.दिनांक ०८/०५/२००९ रोजी पहाटे ०५:३० वा.ते नेहमी प्रमाणे उठले असता, त्यांना त्यांचे घराचे दार उघडे दिसले. त्यांनी घरात जाऊन पाहीले असता, घरातील सर्व सामान अस्ताव्यस्त पडलेले होते.कपाटात ठेवलेले सोन्याचे लॉकेट, अंगठी, व गंठण तसेच टि.व्ही. असा एकुण ९०,०००/- रुपये किंमतीचा मुद्येमाल कोणीतरी अज्ञात चोरटयाने कुलुप उचकटुन घरात प्रवेश करुन घरफोडी चोरी करुन चोरुन नेला.

**तक्रार / फिर्यादीची थोडक्यात हकीकत :-**

यातील फिर्यादी गणेश जनार्दन डोके हे दिनांक ०७/०५/२००९ रोजी रात्री २३:३० वा. सर्व घरातील सर्व कामे आटोपुन, गप्पा टप्पा करुन , घरास कुलुप लावुन कुंटुंबासह घरा समोरील अंगणात झोपले होते. रोजच्या सवई प्रमाणे फिर्यादी दिनांक ०८/०५/२००९ रोजी पहाटे ०५:३० वा.ते उठले असता, त्यांना त्यांचे घराचे दार उघडे दिसले. त्यांनी घरात जाऊन पाहीले असता, घरातील सर्व सामान अस्ताव्यस्त पडलेले होते.बेडरुम सामान ही अस्ताव्यस्त पडलेले होते. एका कोप-यात ठेवलेले कपाटही उघडे दिसले. जवळ जावुन पाहीले असता कपाटाचे दाराचे कुलुप तोडुन, कपाटात ठेवलेले सोन्याचे लॉकेट, अंगठी, व गंठण तसेच टि.व्ही. असा एकुण ९०,०००/- रुपये किंमतीचा मुद्येमाल कोणीतरी अज्ञात चोरटयाने कुलुप उचकटुन घरात प्रवेश करुन घरफोडी चोरी करुन चोरुन नेले.

**तपासाचा आराखडा / क्रमवारी :-**

१) घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला
२) घटनास्थळावर तात्काळ डॉग स्कॉड व फिंगर प्रिंट एक्सपर्ट यांना पाचारण केले. फिर्यादीने घटनास्थळावर मिळालेले आरोपीताचे हाताचे ठसे घेण्यात आले.
३) लॅब्रॉडार डॉगला घटनास्थळावर मिळालेले रॉड व विडीच्या थोटकाचा वास देण्यात आला.त्याने दाखविलेल्या मार्गावरुन आरोपीतांचा शोध घेतला.तो घराच्या पाठी मागे असलेल्या वॉलकंपाउंडवरुन उडी मारुन रस्त्यावर जाऊन तिथेच थांबला.या वरुन चोरटयांनी घरफोडी चोरी करुन अज्ञात वाहना वरुन पळुन गेले.
४) घटनास्थळा वरुन मिळुन आलेले पुरावे - बिडीचे थोटके, पाण्याची बाटली, रॉड,इ. वस्तु स्वतंत्रपणे पॅकींग करुन त्यावर लाखेचे सिल करुन त्यावर पंचाच्या सहीच्या चिठठया लावुन तपासकामी ताब्यात घेण्यात आले.
५) फिर्यादी चे घरातील सदस्य व शेजारी राहणारे यांना विचारपुस करुन जबाब नोंदविण्यात आले. कोणीही गुन्हेगारांना पाहीले नसल्याचे सांगितले.
६) तपासात असतांना एका अज्ञात इसमाने नाव न सांगण्याचे अटीवर फोन करुन माहीती दिली कि, फिर्यादीच्या घराच्या पाठीमागे राहत असलेल्या पिंकु राठी नावाच्या एका १३ वर्षाच्या मुलीने आरोपींना पाहीलेले आहे.परंतु पोलीसांच्या भितीमुळे व घरातल्या मोठया लोकांच्या दडपणामुळे ती पोलीसांना माहीती देत नाही.
७) सदर माहीती मिळाल्याने साध्या कपडयात एका महीला पोलीस कर्मचारी सोबत घेवुन पिंकु राठीचे घरी गेले. तेथे त्यांना कोणतीही माहीती नसल्याचे सांगितले.परंतु त्यांचे किंवा त्यांचे मुलीचे कोठेही नाव येणार नाही, कोणालाही कळणार नाही, याची खात्री पटवुन शेजारधर्म व प्रकरणाचे गांभिर्याची जाणिव करुन दिल्या नंतर पिंकु राठी या मुलीने माहीती दिली कि,डोके मामाच्या घराच्या मागच्या रस्त्यावर दोन माणसे मोटर सायकल

वर टि.व्ही.घेऊन मोटर सायकल चालु करुन निघुन गेले.व त्या आरोपीतांचे वर्णन सांगितले.

८) पोलीस स्टेशनला जावुन हिस्ट्रीशिट मध्ये व आरोपीतांचे फोटोज वरुन माहीती घेतली.वर्णनाच्या आधारे दोन संशयीत इसमांना तपासले.

९) फिंगरप्रिंट एक्सपर्टचा अहवाला वरुन सदर घरफोडी करणारे आरोपी हे नवखे असल्याचे लक्षात आले.

१०) आरोपी नवखे असल्याने त्यांचे विरुदध आणखी पुरावा सापडतो का म्हणुन आरोपीतांनी फिर्यादीच्या घराच्या पाठीमागील वॉल कंपाउंड वरुन उडी मारुन गेले होते त्या ठिकाणी दोन पंचा समक्ष पुन्हा एकदा भेट देवुन पाहणी केली असता त्या ठिकाणी एका पाकीटात इस्माईल शेख वय १९ वर्ष या नावाचे ड्रायव्हींग लायसन्स, २५०/रु. व एक स्टॅम्प साईज फोटो मिळुन आला.

११) त्यावरुन आरोपीत इस्माईलचे राहते घरी जावुन शोध घेण्यात आला.परंतु तो तेथे मिळुन आला नाही.तो मोंढा येथे त्याचा मित्र तक्षक डांगे याचे कडे गेला असल्याचे त्याची आईने माहीती दिली.

१२) त्या नुसार त्याच रात्री तक्षक डांगे रा.मोंढा नाका, पेठबीड, बीड येथे छापा टाकला.आरोपी सोबत इस्माईल शेख हा सुदधा मिळुन आला.त्यांचे घराचा दोन पंचासमक्ष Cr.P.C.१०० प्रमाणे घरझडती घेण्यात आली. त्यात एक टि.व्ही.मिळुन आला.

१३) आरोपीताना अटक करुन पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आली.रिमांड मध्ये असतांना त्यांनी घरफोडी केल्याचे व दागिणे दाखवुन देण्याचे कबुल केल्याने पुरावा कायदा कलम २७प्रमाणे त्यांचे निवेदन घेवुन मेमोरंडम पंचरनामा करण्यात आला.आरोपी तक्षक डांगे याने त्याचे घरात जिथे दागिणे पुरुन ठेवले होते ती जागा दाखवुन त्याने दागिणे काढुन दिले.दारा बाहेर असलेली गुन्हयात वापरलेली मोटर सायकल दाखविल्याने ती तपासकामी जप्त करण्यात आली.

१४) जप्त केलेल्या मालाचा ओळख पंचनामा करण्यात आला.फिर्यादीने दिलेल्या फिर्याद प्रमाणे त्यांचे चोरीस गेलेले सर्व दागिणे व टि.व्ही.ओळखला.

१५) दोषारोप क्रमांक :- १९ / २००९ दिनांक :- १० / ०७ / २००९

**कोर्टाचा निकाल :-**

मा.न्यायालय, बीड यांनी आरोपी १) तक्षक मारोती डांगे वय २५ वर्ष रा.मोंढा नाका, बीड व आरोपी क्रमांक २) ईस्माईल शेख वय १९ वर्ष रा. परभणी यांना ०४ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा दिली आहे.

**पुराव्याचे स्वरूप :-**

१ ) साक्षिदार / तोंडी पुरावा Cr.P.C. १६४ प्रमाणे जबाब.

फिर्याद :- गणेश जनार्दन डोके यांनी दिलेली.

फिर्यादींचे घरात राहणारे, शेजारी राहणारे, यांचेकडे चौकशी करून, नोंदविलेले जबाब.

घटनास्थळाचा केलेला पंचनामा. पंचनाम्यात जप्त केलेल्या आरोपीतांचे वस्तु.

घटनास्थळी मिळुन आलेल्या आरोपीतांच्या हाताचे बोटांचे ठसे.व एका पाकीटात आरोपी इस्माईल शेख वय १९ वर्ष याचे ड्रायव्हींग लायसन्स, २५०/रु. व एक स्टॅम्प साईज फोटो.

आरोपीच्या घरी छापा टाकुन मिळालेला चोरीस गेलेल्या टि.व्ही.चा जप्ती पंचनामा.

आरोपीने भारातीय पुरावा कायदा कलम २७ प्रमाणे दिलेले निवेदन, व मेमोरंडम पंचनामा.

फिर्यादीचे चोरीस गेलेल्या सोन्याचे दागिणे व टि.व्ही. या वस्तु जप्त केल्या नंतर फिर्यादीने त्याच्या वस्तु ओळखल्या त्यांचा केलेला ओळख पंचनामा.

२) कागदपत्रीय पुरावा. :- साक्षिदारांचे जबाब.

३) इतर पुरावे. :- कॅलेंडर ऑफ इव्हीडंस ( आरोपीताचा पुरावा तक्ता )

| अक्र | आरोपीताचे नाव | आरोपीचा गुन्हयातील सहभाग / कृती | आरोपी विरूद्ध पुरावा |
|---|---|---|---|
| १<br>२ | तक्षक मारोती डांगे<br>ईस्माईल शेख | त्याचा मित्र इस्माईल शेख याचे सह संगनमताने , फिर्यादीचे राहते घरी, त्यांचे घराचे दाराचे कुलुप रॉडच्या सहाय्याने उचकटुन आत प्रवेश केला. घरातील कपाटाचे कुलुप रॉडच्या सहाय्याने उचकटुन कपाटात ठेवलेले दागिणे व बेडरुम मधिल टि.व्ही. असे फिर्यादीच्या संमती शिवाय लबाडीच्या इरादयाने घरफोडी चोरी करुन चोरुन नेले. | १. घटनास्थळी मिळुन आलेले इस्माईल शेख वय १९ वर्ष याचे ड्रायव्हींग लायसन्स,<br>२. आरोपीने भारातीय पुरावा कायदा कलम २७ प्रमाणे दिलेले निवेदन, व मेमोरंडम पंचनामा.<br>३. आरोपीतांच्या ताब्यातुन जप्त केलेल्या सोन्याचे दागिणे व टि.व्ही.चा जप्ती पंचनामा. |

## गुन्हयाची सुनावणी प्रक्रीया :-

१ ) साक्षिदारांची नावे :-

फिर्याद :- गणेश जनार्दन डोके यांनी दिलेली.
फिर्यादींचे घरात राहणारे, शेजारी राहणारे, यांचे जबाब.
घटनास्थळाचे पंचनाम्यातील पंच.
आरोपीने दिलेला कबुली जबाब.
गुन्हा दाखल करणारे पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस तपासी अंमलदार पोलीस उप निरीक्षक श्री.बी.एस.वाकडकर.

**तपासातील उणीवा दुर करण्यासाठी / मात करण्यासाठी केलेल्या उपाय योजना**

गुन्हा घटडल्यानंतर घटनास्थळी तपासी अंमलदार पोलीस उप निरीक्षक यांनी घटनास्थळाचा पंचनामा करण्यात केला.परंतु आरोपी ज्या मार्गाने भिंती वरुन उडी मारुन गेले.तेथे पुन्हा दोन पंचा समक्ष जावुन घटनास्थळाचा पंचनामा करावा लागला.

**सुचना :-** तपासी अंमलदाराने घटनास्थळाचे बारकाईने चौकस नजरेने निरीक्षण करावे. आरोपीताचा मार्ग काढत असतांना डॉग कोणकोणत्या मार्गाने जात आहे, त्या रस्त्यावरील आजु बाजुचे निरीक्षण करुन अंदाज करावा. व त्या मार्गाने तपासाची दिशा ठरवावी.व गुन्हा उघडकीस आणण्याचे दृष्टीने प्रयत्न करावेत.

आरोपीतांना गुन्हा करते वेळेस कोणीही प्रत्यक्ष साक्षिदारांनी पाहीले नसल्याने तसेच त्यांचे अगोदरचे रेकॉर्ड नसल्यने त्या बाबत आरोपीतांची माहीती काढण्यास अडचण निर्माण होते.

**सुचना :-** तपासी अंमलदार यांनी आपले स्वत:चे नेटवर्क / गुप्त बातमीदार तयार करावे.

## तपासातील महत्त्वाचे मुद्ये / सबळ मुद्ये

१ ) फिर्यादीचे घरात कोणीही व्यक्ती विडी पित नव्हता.घटनास्थळी मिळुन आलेले विडीचे थोटक्यांचा घटनास्थळ पंचनाम्यात उल्लेख करुन जप्त करण्यात आले.

२ ) फिर्यादीचे घराचे पाठी मागिल वॉल कंपाउंड च्या बाहेरील बाजुस मिळुन आलेले आरोपीताचे पाकीट, त्यात त्याचे ड्रायव्हिंग लायसन्स, स्टॅम्प साईज फोटो.

३) आरोपीचा भारतीय पुरावा कायदा कलम २७ प्रमाणेचे निवेदन व मेमोरंडम पंचनामा.

४ ) आरोपीताचे घरात मिळुन आलेले घरफोडी चोरीच्या गुन्हयातील सोन्याचे दागिणे, टि.व्ही. व गुन्हयात वापरलेली मोटर सायकल यांचा केलेला जप्ती पंचनामा.

५) फिर्यादीचे चोरी झालेला मालाचा त्यांनी ओळखल्याचा पंचनामा.

**तपासाचे विश्लेषण :-** सुधारण्यासाठी सुचना :-

१) रेकॉर्ड वरील घरफोडी करणारे गुन्हेगार यांचे फोटो, फिर्यादीस दाखवावे.
२) स्थानिक रेकॉर्ड वरील आरोपीतांची माहीती काढुन त्यांना वेळोवेळी चेक करावे.त्यांचे हालचालींवर गुन्हे शोध पथक मार्फत लक्ष ठेवावे. त्यांचे राहते घराची झडती घेवुन घरझडती पंचनामे करावेत.
३) आरोपीतांनी घरफोडी चोरी करुन नेलेले सोन्याचे दागिणे हे सोनाराचे दुकानात विक्री साठी आणतील, या दृष्टीकोनातुन तपासाकरीता शहरातील धर्म काटा /सराफ असोसिएशन यांना तपासी अंमलदाराने पत्र दयावे.
४) तसेच यासारखे गुन्हे नेहमी घडत असतात त्या करीता , टि.व्ही./ मोबाईल, कार टेप रिपेअरींग, भंगार दुकाने, जुने वाहन खरेदी विक्रीचे वाहन बाजार, यांना भेटी देवुन त्यांचेशी संपर्क वाढवावा.आरोपी व गुन्हया बाबत त्यांना माहीती दयावी. आरोपी बाबत काही एक माहीती मिळाल्यास पोलीस ठाणेस किंवा तपासी अंमलदार यांचे मोबाईल वर कळविणेस सांगावे.
५) गुन्हा उमाळीस आणण्याचे दृष्टीने प्रयत्न करण्यासाठी गुप्त बातमीदार यांची मदत घ्यावी.

तपास :-

१) गुन्हयाचे घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला.साक्षिदारांचे जबाब नोंदविण्यात आले.

२) गुन्हयाचे घटनास्थळी पुन्हा भेट देऊन आरोपी इस्माईल शेख याचे घटनास्थळी मिळुन आलेले ड्रायव्हिंग लायसन्स, स्टॅम्प साईल फोटो या मुळे आरोपी निष्पण्ण होऊन त्यांचे पर्यंत पोहोचता आले.

३) त्या नंतर सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करुन आरोपीतांना अटक करण्यात आली.आरोपीतां कडुन घरफोडी चोरीतला माल- सोन्याचे दागिणे, टि.व्ही. जप्त करण्यात आले.

१) **प्रतिबंधात्मक कारवाई :-** या गुन्हयातील आरोपी नविन असल्यामुळे त्यांचे रेकॉर्ड नसल्याने प्रतिबंधात्मक कारवाई होऊ शकली नाही.

२) **गुप्तवार्ता संकलन :-** गुन्हयाची उकल होण्यासाठी गुप्तबातमीदाराने फोन वरुन साक्षिदाराने आरोपीतांना टि.व्ही चोरुन घेवुन जातांना बघितल्याची माहीती दिली.

## ४) गुन्हयाचा प्रकार :- दुहेरी खुन ( गुप्तधनासाठी गळा कापुन खुन )

**पोलीस स्टेशन** :- **किल्लारी पोलीस ठाणे.**
**तालुका** :- **तालुका.**
**जिल्हा** :- **लातुर.**

**तपासी अंमलदार :- १) सहा. पोलीस निरीक्षक श्री. अनंत्रे.**

**गुन्हयाची प्राथमिक माहीती :-**

१) पोलीस स्टेशन :-किल्लारी पोलीस ठाणे, किल्लारी, जि.लातुर. गु.र.नं.८१ /२०११ , भादविक.३०२, २०१, ३४.
२) फिर्यादी :- विलास बाबुराव पांचाळ वय वर्ष धंदा- शेती रा.पांचाळ माळ,नणंद, ता.किल्लारी, जि.लातुर
३) आरोपी :- १) सुभाष गणेश गिर (महाराज ) वय रा.नणंद, ता. किल्लारी, जि.लातुर
२) सुभाष विरभद्रप्पा कुंभार वय रा. बस्वकल्याण, जि.बिदर, कर्नाटक
३) नंदकिशोर बालरेड्डी कोलथाने वय रा.सस्तापुर,(बस्व कल्याण) जि. बिदर, कर्नाटक राज्य
४) पिडीत :- १) विठ्ठल कांबळे २) सुरेखा शिवराज गोकुळे
५) अ.घ.ता.वे. :- दिनांक २३/१०/२०११ रोजी
ठिकाण :- १) समाधान बाबुराव पांचाळ यांचे शेतातील विहीरीत, पांचाळमाळ,नणंद, ता.किल्लारी,लातुर
२) लघु पाट बंधारे विभागाच्या तलावाच्या बांधा वरील पाणी सोडण्याचे चिमणी मध्ये, नणंद,

६) थोडक्यात हकीकत :- यातील मयत यांना कोणीतरी अज्ञात आरोपीताने अज्ञात कारणांसाठी अज्ञात पुरुषाचे डोके व दोन्ही हात हे कोणत्या तरी तिक्ष्ण हत्याराने धडा वेगळे करुन डोके व हात असे व धड हे वेगवेगळया ठिकाणी कोठे तरी टाकुन तसेच अज्ञात महिलेला अज्ञात कारणांसाठी, कोणत्या तरी हत्याराने गळा कापुन, मुंडके माने पासुन वेगळे करुन खुन करुन पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला.

**तपासाचा आराखडा / क्रमवारी :-**

१) किल्लारी पोलीस ठाण्यात नणंद गावातिल तंटा मुक्तीचे अध्यक्ष श्री.तानाजी शामराव पाटील यांनी फोनद्वारे माहीती दिली कि, समाधान बाबुराव पांचाळ यांचे शेतातील विहीरीत पोत्याचे गाठुडे तरंगत असुन त्यातुन मानव जातीचे पाय बाहेर आला आहे,असे कळविल्याने पोलीस तपासी अंमलदार यांनी स्टेशन डायरीला नोंद केली.

२) पोलीस तपासी अंमलदार हे तपास पार्टीसह घटनास्थळावर पोहोचल्या नंतर घटनास्थळाची बारकाईने पाहणी केली असात, विहीरीतील पाण्यावर एका रंगाचे पोत्याचे गाठुडयात मानवी प्रेत त्याचा एक पाय बाहेर अश्या अवस्थेत मिळुन आले.

३) पोलीस तपासी अधिकारी यांनी घटनास्थळावरुनच उप विभागिय पोलीस अधिकारी श्री.पंडीत नवसारे, व अप्पर पोलीस अधिक्षक श्री.श्रीकृष्ण कोकाटे यांना फोनद्वारे माहीती दिली.

४) पोलीस व साक्षिदार यांनी विहीरीतले पोत्याचे गाठुडे हे बाजेच्या सहाय्याने विहीरीच्या बाहेर काढले.प्रेताची परिस्थिती बघितल्या नंतर मा.वैदयकीय अधिकारी श्रीमती पठाण प्राथमिक आरोगय केंद्र,लामजना, यांना घटनास्थळ वर येवुन प्रेताचे पोस्ट मार्टम करण्या बाबत विनंती केली.

५) त्या दरम्यान स्टेशन डायरी नोंद वरुन प्रेताचे दिसती परिस्थितीचा दोन पंचा समक्ष इन्कवेस्ट पंचनामा करण्यात आला.पाण्यात प्रेत असल्याने विहीरीतील जलचर प्राण्यांनी जागोजागची प्रेताची चमडी खाल्लेली दिसत असल्याचे इन्कवेस्ट पंचनाम्यात तसा उल्लेख करण्यात आला.तसेच घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला.

६) मयताचे प्रेताचा वैदयकीय अधिकारी यांनी त्यांचे स्टॉफ सह हजर राहुन जागेवरच पोस्ट मार्टेम केले.व मयताचे मरणा बाबतचे प्राथमिक अहवाल जागेवरच दिला की, Body is higkly decomposed the exact cause of death can not be given how ever viseara is preserved for C.A.असा अभिप्राय दिला. मयताचे फोटो घेण्यात आले.मयताचे शरीर कुजल्याने व ठेवण्याचे स्थितीत नसल्याने ग्रामपंचायत नणंद यांना सदर प्रेताचे अंत्यविधीचे पत्र देवुन वनविभागाच्या वनिकरणात जेसीबीच्या सहाय्याने खड्डा खणुन अंत्यविधी करण्यात आला.

७) सदर गुन्हयाबाबत विलास बाबुराव पांचाळ यांनी फिर्याद दिल्याने पोलीस स्टेशनला गु र नं. ८१/२०११ भा.द. वि. कलम ३०२, २०१,३४ अन्वये अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला. साक्षिदारांना विचारपुस करुन जबाब नोंदविण्यात आले.आजुबाजुच्या गावा मध्ये सलग तीन ते चार दिवस दवंडी द्वारे माहीती देऊन मयताची ओळख पटविण्याचा व गुन्हयाशी संबंधीत माहीती मिळविण्याचा प्रयत्न केला.तसेच स्थानिक वर्तमानपत्रात सदर घटने बाबत बातमी देण्यात आली.

८) गुन्हयाचे घटनास्थळाचा डम्प डाटा सायबर सेल मार्फत काढयासाठी सांगितले.घटनास्थळी पुन्हा येऊन मयताचे डोके व हात शोधण्याचा प्रयत्न केला.त्यासाठी विहीरीतले पाणी इंजिन लावुन काढले असता मयताचे डोके व हात मिळुन आले नाही. मयताची ओळख काढणे साठी सर्व जिल्हयात व जिल्हा अंतर्गत पोलीस स्टेशनला तपासयादया पाठविण्यात आल्या.

९) सिमे लगतच्या गावा मध्ये, कर्नाटक मध्ये जाऊन हरविलेल्या व्यक्तींचे नोंदी बाबत मयताचे फोटो व तपासयादी दाखवुन माहीती घेतली.परंतु काही एक माहीती हाशिल झाली नाही.

१०) सदर गुन्हयाचे तपासात असतांना स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.हिरमुखे यांनी माहीती दिली की, नणंद जवळील तलावाचे चिमणी मध्ये एक स्त्री जातीचे प्रेत पाण्यात तरंगत कळविले वरुन पोलीस अधिकारी स्टाफसह घटनास्थळी हजर झाले.

११) अशा परिस्थितीत प्रेत बाहेर काढणे शक्य नसल्याने पोलीस अधिकारी यांनी व पाटबंधारे विभागाचे अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली लोकांच्या मदतीने चिमणीस एका बाजुने छिद्र पाडुन त्यातुन प्रेत काढण्यात आले.मयताचे माने पासुनच मुंडके वअंगावर साडी नव्हती.एक पाय घोटयात लहान होता.प्रेताचे इन्कवेस्ट पंचनामा करण्यात आला.तलावाच्या पाण्यात स्त्रिचे प्रेत मिळाल्याची बातमी पसरल्याने गडीगौडगांव, ताो. बस्वकल्याण,जि.बिदर,कर्नाटन येथल भरमशेटे राजकुमार हे त्यांचे मुलीस नणंद येथे सोडण्यास आले होते. त्यांनी प्रेत ओळखुन सांगितले कि,मयत ही सुरेखा शिवराज गोकुळे ही १८/१०/११ पासुन बेपत्ता आहे बाबत सांगितल्यावरुन मयताचे बहीण कमळाबाई गुरुनाथप्पा सुकणा व भाऊ- चंद्रकांतशरणप्पा शेटे यांना फोन करुन बोलाविले.त्यांनी प्रेत पाहुन ते त्यांची बहीण सुरेखा शिवराज गोकुळे हीचे असल्याचे ओळखले.

१२) वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र,लामजना यांना विनंती केल्याने त्यांनी मयताचे घटनास्थ ळीच पोस्ट मार्टम करुन अहवाल दिला.मा.अप्पा पोलीस अधिक्षक श्री. कोकाटे व उप विभागिय पोलीस अधिकारी श्री.नवसारे यांनी घटनास्थळी येऊन तपासा बाबत सुचना दिल्या. मयताचे मुंडके नसल्याने त्यांनी प्रेत ताब्यात घेण्यास नकार दिला. त्या मुळे वनविभागाच्या जंगलात खड्डा खणुन प्रेताचा अंत्यविधी करण्यात आला.मयताचे अंगावरील कपडे तपासकामी जप्त करण्यात आले.

१३) मयताचे नातेवाईकांना विचारपुस केली असता सुरेखा ही विठ्ठल कांबळे यांचेसोबत बस्वकल्याण,बिदर,कर्नाटक येथे राहत होती.व ते दोघेही बेपत्ता आहे.अशी माहीती दिली.त्या वरुन बस्वकल्याण येथिल ॲड. भास्करराव कांबळे यांना फोन करुन किल्लारी बोलाविले वरुन मयत पुरुषाचे फोटो पाहुन ते त्यांचे वडीलच असल्याची शक्यता व्यक्त केली.त्यांचे वडीलांबाबत विचारपुस करुन तसा त्यांचा सविस्तर जबाब नोंदविला.

१४) मयत विठ्ठल कांबळे व सुरेखा गोकुळे यांचे मोबाईलचे CDR व डम्प डाटा हस्तगत केला असता विठ्ठल कांबळे यांचे मोबाईलचे IMEI.च्या मोबाईल हॅण्डसेट मध्ये सुभाष गणेश गिर रा.नणंद यांचे पत्नीच्या नावे असलेले, वेगवेगळया नंबरचे दोन सिम कार्ड वापरल्याची सिम कार्ड वापरल्याची सिम कार्ड वापरल्याची निष्पण्ण झाले.

१५) गून्हयातील आरोपी सुभाष गणेश गिर(महाराज) यास पोलीस स्टेशनला आणुन त्यास विश्वासात घेवुन विचारपुस केली असता,त्याने गुन्हा कबुल केला. सदर गुन्हयात १) सुभाष विरभद्रप्पा कुंभार रा. बस्वकल्याण व २) नंदकिशोर बाल रेड्डी-कोलथाने रा.सस्तापुर यांचेसह तांदुळ ओढवुन गुप्तधन मिळवण्यासाठी पुरुष व स्त्रिचे मुंडक्याची पुजा करण्याची आवश्यकता वाटल्याने आम्ही त्यांचे मुंडके कापुन खुन केल्याचे कबुल केले.आरोपी सुभाष गिर यास

सोबत घेवुन इतर दोन्ही आरोपीतांना ताब्यात घेवुन येऊन त्यांना गुन्हयात अटक केली.त्या बाबत त्यांनी गुन्हा का केल्याचे कारण याबाबत वरिष्ठ अधिकारी यांना दुरध्वनी द्वारे माहीती दिली.

१६) दुसरे दिवशी आरोपीतांनी मयत पुरुष विठ्ठल कांबळे व स्त्रि सुरेखा गोकुळे यांचे मुंडके काढुन देण्याची तयारी दर्शविल्याने भारतीय पुरावा कायदा कलम २७ प्रमाणे दोन पंचासमक्ष आरोपीतांचे निवेदन व पंचनामा करुन दोन्हींचे मुंडके, धारदार सुरी तसेच त्यांचे अंगावरचे त्या वेळचे कपडे असे वेगवेगळया ठिकाणा वरुन जप्त करण्यात आले. वैद्यकीय अधिकारी यांना जागेवरच बोलावुन पोस्ट मार्टम करण्यात आले.त्यांचे DNA सॅम्पल काढुन घेण्यात आले नमुद दोन्ही घटनास्थळांचा वेगवेगळा पंचनामा करण्यात आला.मयताचे मुंडक्यांचे, व घटनास्थळावरुन जप्त केलेले वस्तुंचे वेगवेगळे फोटो काढण्यात आले.मयताचे नातेवाईकांना प्राथमिक आरोग्य केंद्र येथे बोलावुन मयताचे मुंडके दाखविण्यात आले.ते विठ्ठल कांबळे व सुरेखा गोकुळे यांचे मुंडके असल्याचे त्यांचे नातेवाईकांनी पाहुन ओळखल्या नंतर दोन्ही मुंडक्यांचे वनविभागाच्या जंगलात खड्डा करुन पुरुन त्यांची विल्हेवाट लावण्यात आली.

१७) तपास दरम्यान जप्त केलेल्या वस्तु CA अहवालासाठी औरंगाबाद येथे व DNA सॅम्पल मुंबई येथे पाठविण्यात आला.आरोपीतां कडुन मोबाईल हॅण्डसेट, गुन्हा करते वेळी त्यांचे अंगावरचे कपडे, पंचासमक्ष जप्त करण्यात आले मयत सुरेखा हिचे कानातील झुमके ज्या सोनाराला विकली होती त्या सोनाराकडुन पंचासमक्ष जप्त करण्यात आले.

१८) आरोपी हे शेवटी मयता सोबत बस स्टॅण्ड व इतर बसलेले असतांना साक्षिदारांनी पाहीले होते; त्या साक्षिदारांचे जबाब घेण्यात आले.आरोपी विरुद्ध भरपुर पुरावा झाल्याने त्यांचे विरुद्ध भा.द.वि.क.३०२,२०१,३४ प्रमाणे खटला पाठविला.

१९) दोषारोप :- ०७ / २०१२ दिनांक ३० / ०१ / २०१२

**कोर्टाचा निकाल :-** :- मा.सेशन कोर्ट, लातुर यांनी आरोपी १) सुभाष गणेश गिर ( महाराज ) यास भादवि. कलम ३०२ **प्रमाणे जन्मठेप** व ४०० रुपये दंड व दंड न भरल्यास ५ महीने कैद व भादवि.कलम २०१ प्रमाणे १ वर्ष कैद व १०० रुपये दंड. व दंड न भरल्यास १ महीना कैद अशी **शिक्षा ठोठावली.** तसेच आरोपी क्रमांक २) सुभाष विरभद्रप्पा कुभार व आरोपी क्रमांक ३) नंदकिशोर बालरेड्डी कोलथाने यांची **निर्दोष मुक्तता केली.**

**पुराव्याचे स्वरूप :-**

१ ) साक्षिदार / तोंडी पुरावा Cr.P.C. १६४ प्रमाणे जबाब.

फिर्याद :- विलास बाबुराव पांचाळ याची

मयताचे नातेवाईक, घटनास्थळी हजर असलेले यांचे जबाब

इन्कवेस्ट पंचनामे , घटनास्थळ पंचनामे, आरोपीतांचे कपडे जप्ती पंचनामे, दागिणे व इतर वस्तु जप्त केलेले पंचनाम्यामधिल सर्व पंच.

मयतांना आरोपीता सोबत शेवटचे पाहणारे यांचे जबाब.

२) कागदपत्रीय पुरावा

PM नोट्स, घटनास्थळावरील फोटो, मोबाईलचे C D R रेकॉर्ड, CA अहवाल, DNA अहवाल.

३) इतर पुरावे. :- कॅलेंडर ऑफ इव्हीडंस ( आरोपीताचा पुरावा तक्ता )

| अक्र. | आरोपीताचे नाव | आरोपीचा गुन्हयातील सहभाग / कृती | आरोपी विरूध्द पुरावा |
|---|---|---|---|
| १.<br>२.<br>३. | सुभाष गणेश गिर ( महाराज )<br>सुभाष विरभद्रप्पा कुभार<br>नंदकिशोर बालरेड्डी कोलथाने | विठ्ठल कांबळे व सुरेखा शिवराज गोकुळे यांना इतर दोन आरोपीतांचे मदतीने तांदुळ उडवुन गुप्तधनप मिळविण्याच्या लालसेपोटी त्यांचे मुंडके कापुन धडावेगळे करुन धड व मुंडके यांची वेगवेगळया ठिकाणी विल्हेवाट लावुन पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. | १. आरोपीतांचे कपडे जप्ती पंचनामे, दागिणे व इतर वस्तु जप्त केलेले पंचनामे<br>२. मोबाईलचे C D R रेकॉर्ड.<br>३. CA व DNA अहवाल. |

## गुन्हयाची सुनावणी प्रक्रीया :-

घटने दरम्यान प्रत्यक्षदर्शी साक्षिदार नसल्याने केस वस्तुजन्य पुरावे व परिस्थितीजन्य पुराव्या वर आधारीत आहे.

मयत विठ्ठल कांबळे याचे मोबाईलचे आय.एम.ई.आय.नंबर वरुन त्यांचे मोबाईल मध्ये कोणत्या कंपनीचे सिम कार्ड कोण वापरीत आहे, यांचे कॉल डिटेल्स रेकॉर्ड वरुन आरोपीतां पर्यंत पोहोचता आले. मोबाईल कंपन्यां कडुन प्राप्त सीडीआर रिपोर्ट संबंधित कंपन्यां कडुन प्रमाणित करुन घेतले.

दोन्ही प्रेताचे घटनास्थळी शवविच्छेदन करणारे डॉक्टरांनी मयताचे प्रेताची त्या वेळची परिस्थिती व त्यांचे मरणाचे कारणां बाबत पोस्टमार्टम नोट्स मध्ये नमुद केले.

केस मधिल साक्षिदार, मयताचे नातेवाईक, पंचनाम्यातील पंच, मयतास शेवटी बघणारे साक्षिदार यांची साक्ष, भौतिक पुरावे, न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोग शाळेतिल तंत्रज्ञांचे अहवाल व त्यांची साक्ष महत्तवाची ठरली.

## तपासातील उणीवा दुर करण्यासाठी / मात करण्यासाठी केलेल्या उपाय योजना

पांचाळ माळ शेतातील विहीरीत पोत्यामध्ये गाठुडयात मयत विठ्ठल कांबळे यांचे प्रेत तरंगत होते. सदरची विहीर २५ फुट व्यासाची व २४ फुट खोलीची १४ फुट पाणी असलेली बांधलेली नाही. गाठुडे विहीरी बाहेर काढणेस अडचण निर्माण झाली. त्यामुळे तपासात अडथळा निर्माण झाला.

**उपाय योजना** :- विहीरीत सोल बांधुन बाज सोडुन बाजेच्या सहाय्याने साक्षिदार व पोलीसांच्या मदतीने पोत्यांचे गाठुडे बाहेर काढले. त्या नंतर वैद्यकीय अधिकारी यांना घटनास्थळावर बोलावुन घेवुन जागेवरच प्रेताचे पोस्ट मार्टम करण्यात आले.

## तपासातील महत्त्वाचे मुद्दे / सबळ मुद्दे

१) मयत विठ्ठल कांबळे याचे मोबाईल मध्ये कोण व्यक्ती वापरत आहे या बाबत त्यांचे मोबाईलचे IMEI नंबर वरुन मोबाईल वापरत असलेल्या इसमाचा कॉल डिटेल्स रेकॉर्ड काढुन आरोपीताचा शोध घेण्यात आला .

२) आरोपीतांना अटक केल्या नंतर त्यांनी दोघांना का मारले या बाबत भारतीय पुरावा कायदा कलम २७ प्रमाणे दिलेले निवेदन, मयतांचा खुन केल्यानंतर त्यांच शिर, हात धडा वेगळे करुन पुरुन ठेवले त्या ठिकाणचा केलेला मेमोरंडम पंचनामा

३) न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोग शाळेतिल तंत्रज्ञ, पोस्ट मार्टम करणारे वैद्यकीय अधिकारी यांचे अहवाल.

४) केस चालु असतांना आरोपीच्या नातेवाईकांनी साक्षिदारांवर दबाव आणला.तेव्हा तपासी अंमलदार यांनी पोलीस अधिक्षक यांचे परवानगीने स्वतः हजर राहुन साक्षिदारांचे लक्ष विचलीत होवु दिले नाही. व त्या साक्षिदारांना फितुर / होस्टाईल होवु दिले नाही.

## सुधारण्यासाठी सुचना :

१) चोरुन नेलेल्या मोबाईलचे CDR, SDR,Tower Location,ची माहीती संबंधित मोबाईल कंपनी कडुन मागविण्यात आली. नंतर कंपनीचे नोडल अधिकारी यांचे कडुन CDR, SDR,Tower Location, चे प्रमाणपत्र भारतीय पुरावा कायदा कलम ६५ (ब) प्रमाणे घेणे आवश्यक आहे

२) गंभीर स्वरुपाचे गुन्हयात सरकारी पंच घेण्यात यावे. त्यामुळे दोषसिद्धिचे प्रमाण वाढते.

३) जप्ती पंचनाम्यात मयताचे अंगावरील कपडयांव रक्ताचे डाग कोठे आहेत, त्यांचे आकारमान, मार्कींग करणे गरजेचे आहे.

४) इन्कवेस्ट पंचनाम्यात जखमांचे प्रकार, स्वरुप तसेच मृत्युचे कारण त्रोटक स्वरुपात लिहु नये.

## तपासाचे विश्लेषण :- तपास

१) किल्लारी पोलीस ठाण्यात नणंद गावातिल तंटा मुक्तीचे अध्यक्ष श्री.तानाजी शामराव पाटील यांनी समाधान बाबुराव पांचाळ यांचे शेता मधिल विहीरीत पोत्याचे गाठुडे तरंगत असुन त्यातुन मानव जातीचा एक पाय बाहेर आला आहे,असे फोनद्वारे कळविल्याने तपासी अंमलदार यांनी स्टेशन डायरीला नोंद करुन ते स्टॉफसह घटनास्थळावर पोहोचले.

२) पोलीस तपासी अधिकारी यांनी घटनास्थळावरुनच उप विभागिय पोलीस अधिकारी श्री.पंडीत नवसारे, व अप्पर

पोलीस अधिक्षक श्री.श्रीकृष्ण कोकाटे यांना फोनद्वारे माहीती दिली.

३) स्टेशन डायरी नोंद वरुन प्रेताचे दिसती परिस्थितीचा पंचा समक्ष इन्कवेस्ट पंचनामा करण्यात आला.तसेच घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला.

४) मयताचे प्रेताचा वैदयकीय अधिकारी यांनी जागेवरच पोस्ट मार्टेम केले.मयताचे फोटो घेण्यात आले.मयताचे शरीर कुजल्याने व ठेवण्याचे स्थितीत नसल्याने अंत्यविधी करण्यात आला.

५) विलास बाबुराव पांचाळ यांनी फिर्याद दिल्याने गुरनं.८१/११ भादवि.कलम ३०२, २०१, ३४ प्रमाणे अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. साक्षिदारांना विचारपुस करुन त्यांचे जबाब नोंदविले. आजुबाजुच्या गावामध्ये सलग तीन ते चार दिवस दवंडी द्वारे मयताची ओळख पटविण्याचा व माहीती मिळविण्याचा प्रयत्न केला.तसेच स्थानिक वर्तमानपत्रात बातमी दिली.

६) गुन्हयाचे घटनास्थळाचा डम्प डाटा सायबर सेल मार्फत काढयासाठी सांगुन मयताचे डोके व हातशोधण्यासाठी विहीरीतले पाणी इंजिन लावुन काढले.मयताचे डोके व हात मिळुन आले नाही. मयताची ओळख काढणे साठी तपासयादया पाठविण्यात आल्या.

७) गुन्हयाचे तपासात असतांना गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.हिरमुखे यांनी माहीती दिली की, नणंद जवळील तलावाचे चिमणी मध्ये एक स्त्री जातीचे प्रेत पाण्यात तरंगत असुन त्यातुन दुर्गंधी सुटल्याचे कळविले वरुन पोलीस अधिकारी स्टाफसह घटनास्थळी हजर झाले.

८) घटनास्थळावरुन अशा परिस्थितीत प्रेत बाहेर काढणे शक्य नसल्याने लोकांच्या मदतीने चिमणीस एका बाजुने छिद्र पाडुन त्यातुन प्रेत बाहेर काढण्यात आले.मयताचे माने पासुनच मुंडके नव्हते. अंगावर साडी नव्हती.एक पाय घोटयात लहान होता.प्रेताचे दिसते परिस्थितीचा इन्कवेस्ट पंचनामा करण्यात आला. भरमशेटे राजकुमार प्रेत ओळखुन सांगितले कि,मयत ही सुरेखा शिवराज गोकुळे ही १८/१०/११ पासुन बेपत्ता असल्याचे सांगितल्यावरुन मयताचे बहीण - कमळाबाई गुरुनाथप्पा सुकणा व भाऊ-चंद्रकांत शरणप्पा शेटे यांना फोन करुन बोलाविले.त्यांनी प्रेत पाहुन ते त्यांची बहीण सुरेखा शिवराज गोकुळे हीचे असल्याचे ओळखले.

९) डॉक्टरांनी घटनास्थळीच पोस्टमार्टम करुन अहवाल दिला.मयताचे मुंडके नसल्याने नातेवाईकांनी प्रेत ताब्यात घेण्यास नकार दिला.त्यामुळे प्रेताचा अंत्यविधी करण्यात आला.मयताचे अंगावरील कपडे तपासकामी जप्त करण्यात आले.

१०) मयत विठ्ठल कांबळे व सुरेखा गोकुळे यांचे मोबाईलचे सीडीआर व घटनास्थळाचा डम्प डाटा हस्तगत केला. विठ्ठल कांबळे यांचे मोबाईलचे IMEI नंबर वरुन त्यांचे मोबाईलमध्ये सुभाष गणेश गिर रा.नणंद यांचे पत्नीच्या नावे असलेले,वेगवेगळया नंबरचे दोन सिम कार्ड वापरत असल्याचे आढळुन आले.

११) आरोपी सुभाष गणेश गिर (महाराज) यास पो.स्टे.ला आणुन विचारपुस केली.त्याने गुन्हा कबुल केला.तसेच सदर गुन्हयात १) सुभाष विरभद्रप्पा कुंभार २) नंदकिशोर बाल रेड्डी यांचेसह तांदुळ ओढवुन गुप्तधन मिळवण्यासाठी त्यांचे मुंडके कापुन त्यांचा खुन केल्याचे कबुल केले. सुभाष गिर यास व इतर दोन्ही आरोपीतांना ताब्यात घेवुन येऊन त्यांना गुन्हयात अटक केली.सदर आरोपीतांना अटक केल्याचे व त्यांनी गुन्हा कबुल करुन का केल्याचे कारण या बाबत वरिष्ठ अधिकारी यांना दुरध्वनी द्वारे माहीती दिली.

१२) दुसरे दिवशी आरोपीतांनी मयत पुरुष विठ्ठल कांबळे व स्त्रि सुरेखा गोकुळे यांचे मुंडके भारतीय पुरावा कायदा कलम २७ प्रमाणे दोन पंचासमक्ष आरोपीतांचे निवेदन व पंचनामा करुन दोन्हींचे मुंडके, धारदार सुरी तसेच त्यांचे अंगावरचे त्या वेळचे कपडे असे वेगवेगळया ठिकाणा वरुन जप्त करण्यात आले.डॉक्टरांनी जागेवरच पोस्ट मार्टम करण्यात आले.त्यांचे DNA सॅम्पल काढुन घेण्यात आले.दोन्ही घटनास्थळांचा वेगवेगळा पंचनामा करण्यात आला. मयताचे मुंडक्यांचे, व घटनास्थळावरुन जप्त केलेले वस्तुंचे वेगवेगळे फोटो काढण्यात आले. मयताचे नातेवाईकांना मयताचे मुंडके दाखविण्यात आले.ते विठ्ठल कांबळे व सुरेखा गोकुळे यांचे मुंडके असल्याचे त्यांचे नातेवाईकांनी पाहुन ओळखले.

१३) तपास दरम्यान जप्त केलेल्या वस्तु CA अहवालासाठी औरंगाबाद येथे व DNAसॅम्पल मुंबई येथे पाठविण्यात

आला.आरोपीतां कडुन मोबाई हॅण्डसेट, गुन्हा करते वेळी त्यांचे अंगावरचे कपडे, पंचासमक्ष जप्त करण्यात आले. मयत सुरेखा हिचे कानातील झुमके आरोपीतांनी ज्या सोनाराला विकली होती त्या सोनाराकडुन पंचासमक्ष जप्त करण्यात आले.आरोपी हे शेवटी मयता सोबत बस टॅण्ड व इतर बसलेले असतांना साक्षिदारांनी पाहीले होते, त्या साक्षिदारांचे जबाब घेण्यात आले.

## ५) गुन्हयाचा प्रकार :- बलात्कार

**पोलीस स्टेशन :- बिबवेवाडी पोलीस ठाणे.**
**तालुका :- पुणे.**
**जिल्हा :- पुणे.**

**तपासी अंमलदार :- १) सहा. पोलीस निरीक्षक श्री. अशोक शेळके.**
**२) सहा. पोलीस आयुक्त श्री. सोनवणे.**

### गु न्हयाची प्राथमिक माहीती :-

१) पोलीस स्टेशन :- बिबवेवाडी पोलीस ठाणे, पुणे. गु.र.नं. /२०११ ,भादविक.३०२, ३०७, ३९२, ३७६ (ई ) आर्म अॅक्ट कलम २५ (५), (अ), २७

२) फिर्यादी :- सौ.मनिषा विकास जाधव वय २३ वर्ष धंदा घरकाम रा.प्लॉट नं.१८/३, ३ री गल्ली, व्यंकटेश्वर कॉलनी,बिबवेवाडी, पुणे.

३) आरोपी :- १) संदेश ऊर्फ साईनाथ कैलास अभंग वय २७ वर्ष , धंदा -शेती रा.अवसरी खुर्द, ता. आंबेगांव जि.पुणे.

४) पिडीत :- १) सौ.मनिषा विकास जाधव वय २३ वर्ष धंदा घरकाम रा.प्लॉट नं.१८ / ३, ३ री गल्ली, व्यंकटेश्वर कॉलनी,बिबवेवाडी, पुणे.
२) श्रीमती विमल जाधव वय वर्ष धंदा घरकाम रा.प्लॉट नं.१८ / ३, ३ री गल्ली, व्यंकटेश्वर कॉलनी,बिबवेवाडी, पुणे. **( मयत )**

५) अ.घ.ता.वे. :- दिनांक १०/०९/२०११ रोजी सकाळी ०९ : ०० वा.
ठिकाण :- .प्लॉट नं.१८ / ३, ३ री गल्ली, व्यंकटेश्वर कॉलनी,बिबवेवाडी, पुणे.

६) थोडक्यात हकीकत :- फिा.चे पती हे किर्लोस्कर कंपनीत नोकरीस असल्याने ते नेहमी प्रमाणे सकाळी त्यांचे कामावर गेले.तेव्हा घरात फिर्यादी व त्यांचे आजेसासु असे दोघीच घरात होत्या.तेव्हा त्यांचे दारावरची बेल वाजल्याने फिर्यादीचे आजेसासुने दार उघडल्याने बाहेर उभा असल्याने व्यक्तीने " तुमची गाडी पंक्चर झाली आहे.तो पंक्चर काढायला मला बोलाविले आहे.घर मालकांना बोलवा " असे सांगितल्याने फिर्यादीने त्यांचे पतीस फोन लावला परंतु तो लागला नाही.तेव्हा दारात उभ्या असलेल्या व्यक्तीस घरात दोनच महीला असल्याचे लक्षात आल्याने तो अचानक घरात घुसला.व त्याचे जवळील कुकरी उगारून पैसे व दागीन्यांची मागणी केली. घरातील महीलांनी त्यास काय हवय ते घे.पण आम्हांला मारू नको,असे सांगुन देखिल त्याने फिर्यादीचे आजेसासुवर कुकरीच्या सहाय्याने वार करून जीवे ठार मारले. व फिर्यादी गरोदरअसतांना त्यांचे गळयावर कुकरी लावुन जीवे मारण्याची धमकी देवुन बलात्कार केला.

### तक्रार / फिर्यादीची थोडक्यात हकीकत :-

दिनांक १०/०९/२०११ रोजी दुपारी ०३:०० वा.चे सुमारास श्री. विकास मनोहर जाधव रा. प्लॉट नं.१८ /३, ३ री गल्ली, व्यंकटेश्वर कॉलनी, बिबवेवाडी, पुणे हे नेहमी प्रमाणे त्यांचे किर्लोस्कर कंपनीत कामास गेले. घरात त्यांची आजी श्रीमती विमल दत्ताजीराव जाधव व त्यांची पत्नी सौ.मनिषा विकास जाधव ( नाव बदलले आहे ) असे दोघीही एकटया असतांना, अज्ञात व्यक्तीने त्यांचे घराची बेल वाजविली. श्रीमती विमल जाधव यांनी दार उघडले तेव्हा अज्ञात व्यक्तीने " तुमची गाडी पंक्चर झाली आहे.तो पंक्चर काढायला मला बोलाविले आहे.घर मालकांना बोलवा " असे सांगुन घरातील रोख रक्कम व सोन्याचे दागिणे इत्यादी साहीत्य चोरी करण्याचे उददेशाने त्यांचे घरात घुसुन, कुकरी सारख्या दिसणा-या धारदार शस्त्राच्या सहाय्याने श्रीमती विमल जाधव यांचे वर हल्ला करून त्यांचा खुन केला व सौ.मनिषा यांचे मानेवार कुकरी लावुन, ती गरोदर आहे हे माहीत असतांना, बलात्कार केला.व त्यांचे पाठीवर कुकरीचे सपासप वार करून गंभीर जखमी करून जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला.

**तपासाचा आराखडा / क्रमवारी :-**

१) घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला.

२) घटनास्थळावर मिळालेले आरोपीताचे हाताचे ठसे घेण्यात आले.

३) फिर्यादीने फिर्याद मध्ये अज्ञात आरोपीताचे दिलेल्या वर्णनावरून त्याचे रेखाचित्र तयार करण्यात आले. सदर रेखाचित्र शहरात विविध ठिकाणी लावण्यात आले.तसेच स्थानिक वर्तमानपत्रातुन प्रसिदधी देण्यात आली.

४) आरोपीताचा शोध घेण्यासाठी तपास पथके तयार करण्यात आली.

५) आरोपीने लुटुन नेलेल्या माल मध्ये मोबाईल असल्याने त्यावरून त्याचे लोकेशन शोधण्याचा प्रयत्न केला गेला.

६) पुणे जिल्हा स्तरावर आरोपीताचे वर्णन, रेखाचित्र आणि इतर माहीती कळविण्यात आली.

७) फिर्यादीचे शेजारी राहणारे, तसेच कॉलनीत राहणारे लोक, दुकानदार, फेरीवाले, यांचे कडे चौकशी करण्यात आली.व त्यांचे जबाब नोंदविण्यात आले.

८) गुन्हयाचा तपास सहा.पोलीस आयुक्त श्री.सोनवणे यांचे कडे वर्ग करण्यात आला.

९) गुन्हयाचे ९ व्या दिवशी एका व्यक्तीने आंबेगांव पोलीस स्टेशन, जि. पुणे येथे हजर होऊन सदर गुन्हयातील आरोपी कोण आहे व तो कोठे लपुन बसला आहे याची माहीती दिली.आंबेगांव पोलीसांनी सदरची माहीती पोलीस आयुक्तालयद्वारे बिबवेवाडी पोलीस स्टेशनला कळविली.

१०) बिबवेवाडी पोलीसांनी त्याच रात्री सापळा रचुन गुन्हयातील आरोपी संदेश ऊर्फ साईनाथ अभंग यास अवसरी खुर्द ता.आंबेगाव, जि. पुणे येथे अभंग मळयातील राहत्या घरातुन अटक केली.आरोपीच्या ताब्यातुन दागिणे,रोख रक्कम, रक्ताचे डाग असलेले कपडे, गुन्हयात वापरलेली कुकरी, व फिर्यादीचा मोबाईल जप्त केले.

११) घटने नंतर आरोपीताने त्याचा मित्र प्रभाकर माने याचे जवळ " आत्ताच दोन बायकांना कापुन आलोय " असे बोलुन गुन्हयाची कबुली दिली होती त्याचा जबाब.

१२) आरोपीताची ओळख परेड घेण्यात आली. आरोपीताने कबुली जबाब दिला.

**पुराव्याचे स्वरूप :-** १) साक्षिदार / तोंडी पुरावा Cr.P.C. १६४ प्रमाणे जबाब

फिर्यादी :- सौ. मनिषा विकास जाधव यांनी दिलेली.

फिर्यादी शेजारी राहणारे, कॉलनीत राहणारे, आजुबाजुचे दुकानदार, फेरीवाले, यांचेकडे चौकशी करून, त्यांचे जबाब नोंदविण्यात आले.

आरोपीने दिलेला कबुली जबाब.

घटने नंतर आरोपीताने त्याचा मित्र प्रभाकर माने याचे जवळ " आत्ताच दोन बायकांना कापुन आलोय " असे बोलुन गुन्हयाची कबुली दिली होती त्याचा जबाब.

२) कागदपत्रीय पुरावा. १) PM नोट्स:- २) जखमी सौ. मनिषा विकास जाधव यांचा वैदयकीय तपासणी अहवाल

३) हस्ताक्षर तज्ञ अहवाल :- हस्ताक्षर तज्ञ यांचा जबाब व अहवाल

४) इतर पुरावे. :- कॅलेंडर ऑफ इव्हीडंस ( आरोपीताचा पुरावा तक्ता )

| अक्र | आरोपीताचे नाव | आरोपीचा गुन्हयातील सहभाग / कृती | आरोपी विरूद्ध पुरावा |
|---|---|---|---|
| १ | संदेश ऊर्फ साईनाथ कैलास अभंग | श्रीमती विमल दत्ताजीराव जाधव व सौ.मनिषा विकास जाधव असे दोघीही एकटया असतांना, आरोपीताने घराची बेल वाजवुन घरातील रोख रक्कम व सोन्याचे दागिणे इत्यादी साहीत्य चोरी करण्याचे उददेशाने घरात आत प्रवेश करुन कुकरी सारख्या दिसणा-या धारदार शस्त्राच्या सहाय्याने श्रीमती विमल जाधव यांचे वर हल्ला करून त्यांचा खुन केला व सौ.मनिषा यांचे मानेवार कुकरी लावुन,ती गरोदर आहे हे माहीत असतांना बलात्कार केला.व त्यांचे पाठीवर कुकरीचे सपासप वार करून गंभीर जखमी करून जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. | १. आरोपीने दिलेला कबुली जबाब.<br>२. प्रभाकर माने यांचा जबाब.<br>३. आरोपीता कडुन जप्त करण्यात आलेले चोरीचे दागिणे, मोबाईल, रोख रक्कम, रक्ताचे डाग असलेले कपडे, व गुन्हयात वापरलेले हत्यार यांचा जप्ती पंचनामा.<br>४. आरोपीताची ओळख परेड.<br>५. पोस्ट मार्टेम नोटस<br>६. पिडीताचे मेडीकल सर्टिफिकेट. |

## गुन्हयाची सुनावणी प्रक्रीया :-

१) फिर्यादी :- सौ. मनिषा विकास जाधव यांची साक्ष चांगली झाली.
२) फिर्यादींचे शेजारील , कॉलनीतील साक्षिदार यांनी दिलेल्या जबाबा प्रमाणे साक्ष दिली.
३) कॉलनीतील आजुबाजुचे दुकानदार, फेरीवाले यांचे जबाब.
४) इन्कवेस्ट पंचनाम्यातील पंच
५) घटनास्थळाचे पंचनाम्यातील पंच यांच्या साक्षी उत्तम झाल्या.
६) आरोपीने दिलेला कबुली जबाब.
७) घटने नंतर आरोपीताने त्याचा मित्र प्रभाकर माने याचे जवळ " आत्ताच दोन बायकांना कापून आलोय " असे बोलुन गुन्हयाची कबुली दिली होती त्याचा जबाब.
८) हस्ताक्षर तज्ञ यांचा अहवाल
९) PM नोट्स:- पोस्ट मार्टम करणारे वैदयकीय अधिकारी यांनी तयार केलेली.
१०) जखमी सौ. मनिषा विकास जाधव यांचा वैदयकीय तपासणी अहवाल ( मेडीकल सर्टिफिकेट )
११) गुन्हा दाखल करणारे पोलीस ठाणे अंमलदार
१२) पोलीस तपासी अंमलदार सहा.पोलीस निरीक्षक श्री.अशोक शेळके.व सहा.पोलीस आयुक्त श्री.सोनवणे यांच्या साक्षी त्यांनी केलेल्या तपासा प्रमाणे झाल्याने आरोपीला शिक्षा झाली.

### तपासातील उणीवा दुर करण्यासाठी / मात करण्यासाठी केलेल्या उपाय योजना

यातील आरोपी संदेश ऊर्फ साईनाथ कैलास अभंग याने त्याचा मित्र प्रभाकर माने याचे जवळ " आत्ताच दोन बायकांना कापुन आलोय " असे बोलुन गुन्हयाची कबुली दिली होती.सदर न्यायालया बाहेरचा कबुली जबाब, केव्हा ग्राहय धरता येतो. ?

**सुचना :-** भारतीय पुरावा कायदा नुसार गैरन्यायीक कबुली जबाब हा एक प्रकारे कबुली जबाबच असतो.तो फक्त दंडाधिकारी किंवा न्यायालया समोर नोंदविलेला नसतो.पण ज्या व्यक्ती पुढे दिला जातो ती व्यक्ती स्वत: न्यायालया समोर आरोपीने गुन्हयांची कबुली दिल्याचे सांगते त्या मुळे अशा व्यक्तीवर अविश्वास न दाखविता पुराव्यात जबाब ग्राहय धरता येते.

सदर गुन्हयात आरोपीताने **चोरी करतांना** मृत्यु किंवा दुखापत घडवुन आणली. तरीही पोलीसांनी सर्व प्रथम भा.द.वि.कलम ३९२ हे कलम वापरले.

**सुचना :-** गुन्हयाचा संपुर्ण तपास झाल्या नंतर पोलीस तपासी अंमलदार सहा.पोलीस आयुक्त श्री.सोनवणे यांनी भा.दं.वि.कलम ३९४ हे लावले आहे.

### तपासातील महत्त्वाचे मुद्दे / सबळ मुद्दे

१ ) फिर्यादीने आरोपीला ओळखले तेव्हा ती प्रचंड दबावाखाली होती.आरोपी संदेश ऊर्फ साईनाथ कैलास अभंग यास पाहुन मोठमोठयान ओरडल्याने चक्कर येवुन बेशुदध पडली. प्रत्यक्ष घटना बघणारा माफीचा साक्षिदार याची साक्ष चांगली झाली.

२ ) आरोपी संदेश ऊर्फ साईनाथ कैलास अभंग याने त्याचा मित्र प्रभाकर माने याचे जबव दिलेला कबुली जबाब.

३) आरोपीचा कबुली जबाब.

४ ) आरोपीताचे घटनास्थळी घेतलेले फिंगरप्रिंटचा अहवाल.

५) ओळख परेड घेणारे कार्यकारी दंडाधिकारी यांची साक्ष.

६) पोस्टमार्टेम करणारे ससुण रुगणालयाचे वैदयकीय अधिकारी यांची साक्ष.

७) फिर्यादी यांचेवर उपचार करणारे व मेडीकल सर्टिफिकेट तयार करणारे वैदयकीय अधिकारी यांची साक्ष.

८) तपसी अंमलदार सहा.पोलीस निरीक्षक व सहा.पोलीस आयुक्त यांची साक्ष.

### तपासाचे विश्लेषण :- सुधारण्यासाठी सुचना :-

१) सदर गुन्हयात आरोपीताने **चोरी करतांना** मृत्यु किंवा दुखापत घडवुन आणली. तरीही पोलीसांनी सर्व प्रथम भा.द.वि.कलम ३९२ हे कलम वापरले.वास्तविकता आरोपी चोरी करतांना शस्त्रांचा धाक दाखवुन लुटीच्या उददेशाने मारहाण करुन जखमी किंवा मृत्यु घडवुण आणतो, अशा वेळेस भा.द.वि.कलम ३९४ हे कलम इतर भा.द.वि.कलमांचे सह लावावे.

२) सदर गुन्हयात पिडीत ही गरोदर असल्याचे आरोपीतास माहीत असतांना सुदधा त्यांने तिच्यावर बलात्कार केला.म्हणुन त्याचे विरुदध भा.द.वि.कलम ३७६ (ई) हे कलम लावण्यात आलेले आहे.

१) गुप्तवार्ता संकलन - सदर गुन्हयाची उकल होण्यासाठी गुप्तबातमीदार यांची फार मोलाची मदत झाली आहे.

# प्रकरण – २७

# कोर्टात साक्ष कशी द्यावी

# पोलीस नियमावली भाग – ३ नियम २४४

१. पोलीस अधिकाऱ्याने कोर्टात साक्षीसाठी युनिफॉर्ममध्ये जावे.
२. साक्ष साठी केसची ज्या बाबतीत साक्षी घ्यायची तो अभ्यास करूनच जावे.
३. सरकारी वकिलाचे साक्षपूर्वी मार्गदर्शन घ्यावे.
४. कोर्टात वेळेवर साक्षसाठी हजर रहावे.
५. साक्षीदाराचे बॉक्समध्ये शिरण्यापुर्वी गुन्ह्यातील आरोपींची खात्री करा. आरोपी ओळखता आले पाहीजेत.
६. साक्षीदाराचे बॉक्समध्ये शिरतांना व ते सोडतांना कोर्टास अभिवादन करावे.
७. साक्ष देतेवेळी अस्वस्थ होऊ नका. नेहमी सावध असावे.
८. साक्ष देतांना शांत व शिस्तबद्ध साक्षी द्यावी. कोर्टावर छाप पडते.
९. साक्ष देताना डावी, उजवीकडे पाहू नका. सरळ कोर्टाकडे पहा.
१०. आरोपीच्या वकिलांनी प्रश्न केल्यास सरकारी वकिलाकडे पाहू नका.
११. प्रश्नाचे उत्तर प्रश्नाने देऊ नका.
१२. प्रश्न पूर्ण समजल्याशिवाय उत्तर देऊ नका. समजला नसेल तर सोप्या भाषेत विचारण्यास सांगा.
१३. एखादी गोष्ट आठवत नसेल तर तसे सांगा मोघम उत्तरे देवू नका.
१४. उलट तपासणीत प्रश्न विचारलेला आवडला नाही तर रागावू नका.
१५. तुम्हाला वैयक्तिक काय माहिती आहे व इतरांकडून काय माहिती मिळाली या बाबत फरक स्पष्ट करा.
१६. अनावश्यक प्रश्न विचारला असेल तर त्याबाबत कोर्टाचे संरक्षण घ्या.
१७. प्रश्नाचे उत्तर देतांना स्वतःहून काही माहिती देवू नका. उदा. एखाद्या वस्तूचा रंग पांढरा होता काय? तर नाही त्याचा रंग काळा होता असे उत्तर देण्याऐवजी फक्त नाही म्हणून सांगा.
१८. जेव्हा तुम्हाला वाटते की, उत्तरासाठी तुमचे स्पष्टीकरण आवश्यक आहे जे वकिलांच्या लक्षात आलेले नाही, तेव्हा दोन्ही बाजूंच्या विचारणा संपल्यावर कोर्टाला सांगू शकता.
१९. लक्षात घ्या कोर्टाला आरोपीचा दोष किंवा निरपराधीत्व किंवा अज्ञान याची माहिती हवी असते तुमची हुशारी नव्हे.
२०. गुन्ह्याची बातमी कोणाकडून मिळाली याबाबत सांगू नका फक्त बातमी मिळाल्यानंतर मी हे असे केले असे सांगा.
२१. साक्ष देतांना थोडक्यात उत्तरे द्या. पाल्हाळीक उत्तरांमुळे उलट तपासणीला अधिक वाव मिळतो.
२२. कोर्टाच्या परवानगीशिवाय कोर्ट सोडू नये.

# FIRST INFORMATION REPORT
## पहिली खबर
(Under Section 154 Cr. P.C.)
**(फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये)**

1. District ...................... * P.S. ...................... * Year ............. FIR No........... *Date...........
जिल्हा पोलीस ठाणे वर्षे पहिली खबर क्र. तारीख

2. (i) * Act .............................................. * Section ..............................................
अधिनियम कलम

(ii) * Act .............................................. * Section ..............................................
अधिनियम कलम

(iii) * Act .............................................. * Section ..............................................
अधिनियम कलम

(iv) * Other Acts and Sections ..............................................................................
इतर अधिनियम व कलमे

3. (a) * Occurance of Offence : * Day ................... Date From ............... Date To...............
अपराधाची घटना वार तारीख पासून तारीख पर्यंत

* Time Period............... Time From ......................... Time To .........
वेळेच्या अभावी पासून पर्यंत

(b) Information received at P.S Date : ................................... Time To .......................
पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याची तारीख वेळ

(c) General Diary Reference Entry No. (s) : .......................... Time To .............
सर्वसाधारण रोजनिशीचा संदर्भ क्रमांक वेळ

4. Type of Information : ........................................................ Written/Oral : ...................
माहितीचा प्रकार लेखी / तोंडी

5. Place of Occurrence : (a) *Direction and Distance from P.S. ............ *Beat No.: .............
घटनेचे ठिकाण पोलीस ठाणे पासून दिशा व अंतर वस्तूवेळा क्रमांक

(b) * Address : ..............................................................................................
पत्ता

.............................................................................................................

(c) In case, outside limit of the Police Station, then the ..............................................
या पोलीस ठाण्याच्या हद्दीच्या बाहेर असल्यास, त्या पोलीस ठाण्याचे नाव
Name of P.S. ........................................ District : ..........................................
पोलीस ठाणे जिल्हा

6. Complainant / Informant :
तक्रारदार/खबरी

(a) Name .........................................................................................
नाव

(b) Father's /Husband's Name : .................................................................
पित्याचे/पतीचे नाव

(c) Date/Year of Birth : ........................................ (d) Nationality : .......................
जन्मतारीख /वर्षे राष्ट्रीयत्व

(e) Passport No. : ................ Date of Issue : ................ Place of Issue :......................
पारपत्र क्र. दिल्याची तारीख दिल्याचे ठिकाण

(f) Occupation : .........................................................................
व्यवसाय

(g) Address : .........................................................................
पत्ता

.............................................................................................................

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars :

माहीत असलेल्या/संशयित/माहीत नसलेल्या आरोपींचा संपूर्ण तपशील :

(Attach separate sheet, if necessary)

(आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा)

..................................................................................................................................

..................................................................................................................................

Physical features, deformities and other details of the suspect :

संशयितांची शारीरिक ठेवण, व्यंग आणि इतर तपशील :

| *Sex लिंग | * Date/Year of Birth जन्मतारीख/वर्ष | *Build बांधा | * Height in Cms. उंची (सेमीमध्ये) | *Complexion वर्ण | *Identification Mark (s) ओळख |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| | | | | | |

| * Deformities/ peculiarities व्यंग/वैशिष्ट्ये | * Teeth दात | * Hair केस | * Eye डोळे | * Habit(s) सवयी | * Dress Habits पोशाखाच्या सवयी |
|---|---|---|---|---|---|
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| | | | | | |

| Languages/Dialect भाषा/बोली भाषा | PLACE OF | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | * Burn Mark भाजल्याची खूण | * Leucoderma कोड | * Mole तीळ | * Scar व्रण | * Tattoo गोंदण |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| | | | | | |

These fields will be entered only if complainant/Informant gives any one or more particulars about the suspect.

This will be used only for the purpose of Preliminary retrival to assist I.O.

जर तक्रारदार/खबरीने संबंधितांबद्दल वरील एक किंवा अधिक रकान्यातील माहिती दिली तरच भरावी. तपास अधिकाऱ्याने प्राथमिक पातळीवर तपास करण्यासाठी वरील माहिती समक्ष आणावी.

A database created will subsequently link one suspect in serveral cause, if any.

या अनुषंगाने तयार झालेल्या माहितीचा उपयोग संशयितांचा इतर गुन्ह्यातील सहभाग स्पष्ट करेल.

A cumprehensive and complete data on all fields will again be prepared when any accused is arrested irrespective of previous suspicion.

वरील रकान्यातील संपूर्ण माहिती ज्यावेळी संशयितास अटक करण्यात येईल त्यावेळी पुनश्च तयार करावी.

8. Reasons for delay is reporting by the Complainant/Informant :
तक्रारदाराने/खबऱ्याने तक्रार करण्यातील विलंबाची कारणे :

..............................................................................................................................

..............................................................................................................................

9. Particulars of properties stolen/involved (Attach separate sheet, if necessary) :
चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावेत.)

..............................................................................................................................

..............................................................................................................................

..............................................................................................................................

10. * Total value of properties stolen/involved : ..............................................................
चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य :

11. * Inquest Report/U.D. Case No. , if any : ...................................................................
मरणान्वेषण अहवाल/यु.डी. प्रकरण क्रमांक, जर असल्यास :

12. F. I. R. Contents (Attach separate sheets, if required) :
पहिल्या खबरीतील हकिकत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावेत) :

..............................................................................................................................

..............................................................................................................................

13. Action taken : Since the above report reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2, registered the case and took up the investigation/directed * ............................... Rank .................... to take up the investigation/Refused investigation/transferred to P.S. ...... on point of jurisdiction.

केलेली कार्यवाही : बाब क्रमांक २ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये अपराध घडल्याचे वरील अहवालावरून दिसून आल्यामुळे प्रकरण नोंदवले आणि तपासाचे काम हाती घेतले ........................................................................... पदनाम ...................... यांना तपासाचे काम हाती घेण्याचा निर्देश दिला/तपास करण्याचे नाकारले/अधिकारितेच्या मुद्यावर .................................. पोलीस ठाण्याकडे हस्तांतरित केले.

F.I.R. read over to the Complainant/Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/Informant free of cost.

पहिली खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली. बरोबर नोंदवली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला प्रत मोफत दिली.

14. Signature/ Tumb impresion
of the Complainant/Informant.
तक्रारदाराची खबरीची सही/अंगठ्याचा ठसा

Signature of the Officer-in-charge, Police Station
पोलीस ठाणे अंमलदाराची सही

* Name : ..............................................................
नाव

* Rank : ...................... No. : .........................
पदनाम क्रमांक

15. Date and Time of despatch to the Court : .....................................................................
कोर्टात पाठविल्याची तारीख व वेळ :

Form : 2 - A

# घटनास्थळ पंचनामा/ गुन्ह्याचा तपशिलाचा नमुना
# CRIME DETAILS FORM

1. राज्य.......... जिल्हा .............. पोलीस ठाणे............ वर्ष ............... पहिली खबर क्र. .......... दिनांक ..........
State District P.S. Year FIR No. Date

2. अधिनियम व कलमे ..................................................................................................
Acts and Sections

3. घटनेचे ठिकाण दाखविणाऱ्याचे नाव व पत्ता : ..................................................................
The Place of Occurrence shown by

नाव ................................................... पित्याचे/पतीचे नाव ..................................................
Name Father's/Husband's Name

पत्ता : घर नं. .............. गल्ली ................ रस्त्याचे नाव ........... . जवळचे प्रसिद्ध ठिकाण......................
Address : House No. Ward Name of road Nearest Identifiable Place

गाव ............. पोस्ट ................ पोलीस ठाणे ........... तालुका .......... जिल्हा ......... राज्य .............
Village Post P. Stn. Taluka Dist. State

४ गुन्ह्याचा प्रकार (गुन्ह्याच्या सर्व पद्धतीसह)
4. TYPE OF CRIME

गुन्ह्याचे मुख्य शीर्ष/मथळा ....................................गुन्ह्याचे मुख्यशीर्षचे वर्गीकरण ........................
(i) Crime Major Head Crime Minor Head

गुन्हा करण्याची पद्धत (१) ..........................................................................................
Method(s) (२) ..........................................................................................
(३) ..........................................................................................

(iv) गुन्ह्यात वापरलेली वाहने ...........................................................................................
Conveyance used

(v) केलेले वेशांतर/ बतावणी ..........................................................................................
Character Assumed

(vi) गुन्हा करताना वापरलेली भाषा ..............................................................................
Language/ Slang used

(vii) विशेष वैशिष्ट्य - १ ...............................................................................................
Special Feature - 1

विशेष वैशिष्ट्य - २ ...................................................................................................
Special Feature - 1

विशेष वैशिष्ट्य - ३ ...................................................................................................
Special Feature - 1

(viii) घटनेच्या ठिकाणाचा प्रकार व पत्ता :
Type of place of Occurrence

पत्ता : घर नं. .............. गल्ली ................ रस्त्याचे नाव ........... . जवळचे प्रसिद्ध ठिकाण......................
Address : House No. Ward Name of road Nearest Identifiable Place

गाव ............. पोस्ट ................ पोलीस ठाणे ........... तालुका .......... जिल्हा ......... राज्य .............
Village Post P. Stn. Taluka Dist. State

(xi) अंतर्भूत मालमत्तेचे प्रकार
Type of property invloved [Mejor head of the property to be filled] :

(१) .............................................. (२) ..............................................
(३) ........................................ (४) ..............................................

Form : 2 - B

5. गुन्ह्यात बळी पडलेल्या/पीडित व्यक्तींचा तपशील (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.)
Particulars of the victims (s) (Attach separate sheet, if required)

| Sr No. अ. नं. | Full Name पूर्ण नाव | Father's/ Huband's Name पित्याचे/ पतीचे नाव | Date/ Year of Birth जन्मतारीख/ वर्ष | Sex लिंग | National-ity राष्ट्रीय़त्व | Religion धर्म | Whether SC/ST/ OBC जाती/ जमाती | Occupa-tion व्यवसाय | Address पत्ता | Injury (Griev-ous/ Simple) दुखापत गंभीर/ साधी | Means of causing injury कशाने जखमी केले |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| | | | | | | | | | | | |

6. गुन्ह्या करण्याचा हेतू ..........................................................................................
Motive of Crime

7. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (योग्य नमुना वापरावा व सोबत जोडावा)
Details of properties Stolen/Involved [Use appropiate prescibed form (s) and attach]

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

8. घटनेच्या जागेचे वर्णन :
Description of the place of occurrence

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

8. घटनेच्या जागेचे वर्णन : (पुढे चालू)
Description of the place of occurrence (Contd.)

९. घटनेच्या ठिकाणचा नकाशा Sketch/Map of the place of occurrence :

10. घटनास्थळाचा नकाशा ड्रॅप्समन/आरेखक यांच्याकडून काढला काय : होय/नाही नाव : ..............................

Whether the Sketch/map prepared by draftsman : Yes/ No.

11. घटनास्थळाचा नकाशा ड्रॅप्समन/आरेखक यांचेकडून काढला काय : होय/नाही नाव : ..............................

Whether Photograph is taken ? If yes, Name & Address of Photographer Yes / No

12. तपासकामी प्रत्यक्ष पुरावा म्हणून गुन्ह्याच्या जागेवरून मिळविलेल्या/जप्त केलेल्या मालमत्तेचे वर्णन : (आवश्यकता असल्यास वेगळा कागद जोडावा)

Description of physical evidence from the scene of crime for the property recovered/seized for the pupose of investigation (Attached seperate sheet if required)

..................................................................................................................................................

..................................................................................................................................................

..................................................................................................................................................

..................................................................................................................................................

13. घटनास्थळाला भेट दिल्याची/पंचनाम्याची दिनांक व वेळ

Date and Time of visit to the place of occurrence

दिनांक : .............................. वेळ : ...................... ते ........................ पर्यंत.

Date Time to

(i ) पंचाचे नाव व सही ......................................................................

Witness Name & sign.

पत्ता : ..................................................................................................................................

Address

(ii ) पंचाचे नाव व सही ......................................................................

Witness Name & sign.

पत्ता : ..................................................................................................................................

Address

आरोपीची सही ( हजर असल्यास ): .........................................................

Sign of accused (if present)

तपासीक अंमलदाराची सही

Signature of Investigation Officer

नांव / Name .............................................................

ठिकाण / Place ................................................ हुद्दा / Rank .............................. कोड नं. / No. ...............

दिनांक / Date ................................................ Posting

पोलीस ठाणे ................

दिनांक :    /    / २०

प्रति,

मा. वैद्यकीय अधिकारी सो.

सिव्हिल हॉस्पिटल, ........................

विषय : ............................................. पो. स्टे. अ.मृ.रजि. नं.    / २०

क्रि.प्रो. कोड कलम १७४ मधील मयत इसम याचे प्रेतावर शव-विच्छेदन करून अहवाल मिळण्याबाबत.

रिपोर्ट : ...................................................................................

...................................................................................................

महोदय,

उपरोक्त विषयांन्वये सादर की, ....................................................... पो. स्टे. अ.मृ.रजि. नं.    /२०    क्रि.प्रो. कोड कलम १७४ प्रमाणे दिनांक    /२० रोजी दाखल झालेला असून यातील मयत पुरुष /स्त्री/ इसम नामे ............................................... ............................................. रा. .................................................. तालुका ............................... जिल्हा ................................. हा/ही असून यांतील मयत व्यक्तीचे मरणाचे निश्चित कारण समजून येण्याकामी व्यक्तीचे प्रेत शवविच्छेदन करणेकामी इकडील नेमणुकीचे पो. कॉ. ............................................ यांच्यासोबत पाठविले आहे. तरी सदर प्रेतावर शवविच्छेदन होऊन त्याबाबतचे ॲडव्हॉन्स सर्टिफिकेटस् मिळणेस विनंती.

यासोबत इक्वेस्ट पंचनामा व शवचिकित्सा फॉर्म जोडून पाठविला आहे.

आपला विश्वासू

............................... पो. स्टे.

जिल्हा ...............................

दिनांक :      /      / २०

# मरणोत्तर पंचनामा

१. पंच : ......................................................................................................

......................................................................................................

२. पंच : ......................................................................................................

......................................................................................................

मे. उपविभागीय दंडाधिकारी सो.

...................... भाग

यांचे सेवेशी

१) पोलीस स्टेशनचे नाव : .................................................... जिल्हा ...............

२) अ. मृत्यू रजि.नंबर व कलम : ......................................................................

३) प्रेत पाहिल्याचे/मिळाल्याचे ठिकाण व जागा : ......................................................................

......................................................................

४) प्रेत कोणी दाखविले : ......................................................................

५) प्रेत कोणी ओळखले : ......................................................................

६) प्रेत स्त्री/पुरुष जातीचे : ......................................................................

७) मयताचे नाव, वय, गाव: .................................................... वय :

८) मृत्यूची ता. व वेळ : दि.      /      / २० वेळ :

९) प्रेताची स्थिती दिशा : ......................................................................

१०) प्रेत थंड / गरम : ......................................................................

११) डोके : ......................................................................

१२) चेहरा : ......................................................................

१३) मान : ......................................................................

१४) छाती : ......................................................................

१५) पोट : ......................................................................

१६) उजवा हात : ......................................................................

१७) डावा हात : ......................................................................

१८) उजवा पाय : ......................................................................

१९) डावा पाय : ......................................................................

२०) प्रेताचा पाठीमागील भाग : ......................................................................

२१) गुप्त भाग : ......................................................................

२२) अंगावरील जखमा : ......................................................................

......................................................................

......................................................................

२३) अंगावरील कपडे व वस्तू : ......................................................................

......................................................................

........................................................................

२४) पंच व पोलीसांचा मृताविषयी अभिप्राय : ..............................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

२५) प्रेत कोणाबरोबर पाठविले : ..............................................................

२६) पंचनामा सुरू/संपला ता. वेळ : ..............................................................

सदरचा पंचनामा आज दिनांक रोजी वाजता सुरू

करून वाजता संपविला आहे.

समक्ष

पंचाच्या सह्या

ता. / /

पोउनि. सफौ. हे कॉ........................................ १. ....................................

पो. स्टे. .................................................... २. ....................................

## शव परीक्षेसाठी पाठविलेल्या प्रेताबरोबर जिल्हा शल्यचिकित्सकांकडे पाठवावयाचा पोलीस अर्ज

प्रश्न

१. मृत व्यक्तीचे नाव :
२. वय :
३. विवाहित, अविवाहित, विधवा किंवा विधूर.
४. मृत्यूचा दिनांक व वेळ (तास)
५. प्रेत सापडले त्यावेळची त्याची व्यवस्था स्थितीभोवतालची परिस्थिती आणि उपलब्ध असलेल्या मारहाणीच्या खुणा, रक्ताचे डाग किंवा वांतीबरोबर पडलेले पदार्थ यांचा तपशील द्यावा.
६. अहवाल पाठविणाऱ्या अधिकाऱ्याने प्रेत पाहिल्याचा दिनांक व वेळ (तास).
७. प्रेत सापडले त्यावेळी थंड होते की गरम?
८. मृत व्यक्तीला अलीकडे काही आजार झाला होता काय? असल्यास कोणता? आजारपणाचा कालावधी नमूद करा व माहितीप्रमाणे आजाराचा तपशील द्या.
९. मृत व्यक्तीला कोणत्याही प्रकारचा अपघात, दुखापत किंवा मारहाण झाली होती काय? असल्यास, त्याचा तपशील द्या.
१०. कपडे, हत्यारे, वांतीबरोबर पडलेले पदार्थ किंवा इतर वस्तू पाठविल्या असल्यास तसे का केले? त्याचा प्रकरणाची काय संबंध आहे ते लिहावे, त्याचा तपशील द्या.
११. मृत्यू नैसर्गिक कारणे, अपघात, आत्महत्या किंवा खून यापैकी कशामुळे घडला असे वाटते? काही संशय असल्यास, ते थोडक्यात स्पष्टपणे नमूद करा व कारणे द्या.
१२. विषप्रयोग केल्याचा संशय आहे काय? असल्यास, विशिष्ट विषाचा वापर केला असे वाटते काय? मृत व्यक्ती जिवंत असताना विषबाधा झाल्याची लक्षणे दिसून आल्याचे कळविण्यात आले होते काय? व विषबाधेबाबत मृत्यूनंतर दिसून आलेली चिन्हे नमूद करावी.
१३. स्त्रीच्या बाबतीत, ती गरोदर असावी किंवा अलीकडे प्रसूत झाली असावी असे वाटते काय?
१४. गर्भपात केला किंवा गर्भपात केल्याचा प्रयत्न केला याविषयी माहिती किंवा संशय आहे काय? गर्भपात केलेला असल्यास, गर्भ सापडला काय?
१५. ज्युरीचे निष्कर्ष (असल्यास) नमूद करावेत व निष्कर्षाबाबत त्यांनी काही कारणे दिली असल्यास, त्याचा निर्देश करावा.
१६. वरील प्रश्नात समाविष्ट न झालेली परंतु पोलीस अधिकाऱ्यांच्या मते जिल्हा शल्य-चिकित्सकांना मृत्यूच्या कारणाविषयी आपले मत बनविण्यास सहाय्यभूत होण्याचा संभव आहे अशी कोणत्याही प्रकारची माहिती या शीर्षाखाली द्यावी.

पोलीस कार्यालय ...........
दिनांक :    /    / २०

: आदेश :

पो. शि. ..........................................................................................

नेमणूक ............................................. पो. स्टे. जिल्हा ............................

...............................................................................................

आपणांस आदेश देण्यात येतो की, ............................................... पोलीस स्टेशन अ. मृ. रजि. नं. ............................... क्रि.प्रो. कोड कलम १७४ मधील मयत नामे .................................. रा. .................................................... हा असून त्याचे प्रेतावर आपणांस जाप्ता ड्युटी नेमण्यात आली आहे. तरी सदर मयताचे प्रेतावर पोस्टमार्टेम झालेवर सदरचे प्रेत वारसाचे ताब्यात देऊन त्या बाबतची वारसाची पावती व ॲडव्हान्स सर्टिफिकेट तसेच मयताचे कपडे पो.स्टे. ला हजर करावे.

कळावे.
दि.
पोउनि/ सफौ. हेडकॉ. ..........................
पोलीस स्टेशन ................................
जिल्हा ......................................

सिव्हिल हॉस्पिटल
दिनांक : / /२०

# प्रेत वारसाचे ताब्यात दिल्याची पावती

१) पावती लिहून घेणार : पो.कॉ. ........................................... ब.नं. ...................
: नेमणूक ....................................... पो.स्टे. जिल्हा ...............

२) पावती लिहून देणार : नांव ..........................................................................
रा. ................................................................................
......................................................................................

कारणे पावती लिहून देतो/देते की, ....................................................... पो. स्टे. अ.मृ. रजि.

नं. क्रि.प्रो कोड कलम १७४ मधील मयत नामे .........................

.................................. रा. ..................................................................

........................................... ही/ हा नात्याने/ माझे ............................................ असल्याने त्याचे प्रेतावर पोस्टमर्टेम झाल्यावर प्रेत पुढील धार्मिक अंत्यविधीसाठी माझ्या ताब्यात मिळाले. तसेच त्यांचे अंगावरील चीजवस्तू व कपडे ते सुद्धा ताब्यात मिळाले आहे. याबाबत माझी काहीएक तक्रार नाही.

ही पावती लिहून दिली.
दि.

समक्ष

पो. कॉ. ................................................. नाव : ...............................
................................................. पो. स्टे. सही : ...............................

## Accused Memorandum Form (आरोपीचे निवेदन पंचनामा)
## (Panchanama u/s 27 India Evidance Act, 1844 / कलम २७ भारतीय पुरावा कायदा १८४४)

1. State .................................. District ............................... P.S.....................................
   राज्य जिल्हा पो. स्टे.

FIR/Proceeding/G.D.No. ............................ Year ................... Date................................
पहिली खबर क्र./कार्यवाही क्र. वर्ष तारीख

2. Name of Accused (आरोपीचे नाव) : ..............................................................................
Age (वय) : ............................ Sex (लिंग) :
Address (पत्ता) :...............................................................................................
.......................................................................................................................

3. Date & Time of Arrest Date : ................................ Time : ................................
   अटकेची तारीख वेळ : दिनांक : वेळ :

4. Memorandum made by Accused (आरोपीचे निवेदन) :
.......................................................................................................................
.......................................................................................................................
.......................................................................................................................
.......................................................................................................................
.......................................................................................................................
.......................................................................................................................
.......................................................................................................................
.......................................................................................................................
.......................................................................................................................

5. Place of Memorandum (पंचनाम्याचे ठिकाण) :
पंचनाम्यातील तारीख वेळ Date (दिनांक) :...... /......../ ................... Time (वेळ) :
..................

6. Name & Address of panchas पंचाचे नाव व पत्ता : Signature सही
1) ............................................................... ......................................................
............................................................................ ......................................................
2) ............................................................... ......................................................
............................................................................

Signature of I.O. (तपासीक अंमलदाराची सही नाव व पत्ता)
Name (नांव) : ...............................................
Rank (दर्जा) : ...............................................
Posting/Address (पत्ता) : ....................................
.............................................................

7. Accused Signature and Thumb
   आरोपीची सही व अंगठा :

........................................................................................................................................

........................................................................................................................................

........................................................................................................................................

........................................................................................................................................

........................................................................................................................................

........................................................................................................................................

........................................................................................................................................

........................................................................................................................................

........................................................................................................................................

........................................................................................................................................

........................................................................................................................................

........................................................................................................................................

........................................................................................................................................

........................................................................................................................................

........................................................................................................................................

........................................................................................................................................

........................................................................................................................................

8. Date : ................................. Time : ................................ to .........................................

पंचनाम्याची तारीख वेळ :

9. Name & Address of Panchas :

पंचाची नावे व पत्ता

Name & Address

नांव व पत्ता

1) ...........................................................

...............................................................

2) ...........................................................

...............................................................

Signature of Panchas

पंचाची सही

1) ...........................................................

2) ...........................................................

Signature of Investigation Officer

तपासीक अंमलदाराचे नाव, पत्ता व सही

Name (नांव) : ..............................................

Rank (दर्जा) : ..............................................

Posting/ Address (पत्ता) : ..................................

...............................................................

10. Accused Signature and Thumb

आरोपीची सही व अंगठा

# CHARGE SHEET / FINAL REPORT FORM
## दोषारोप / अंतिम अहवाल
(Under Section 173 Cr. P. C.)
**(फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १७३ अन्वये)**

'IN THE COURT OF ..........................................................................................
न्यायालय

1. State .............. District ........... P.S.............. FIR/Proceeding/G.D.No. ...................... Year...... Date..........
राज्य जिल्हा पोलीस ठाणे पहिली खबर क्र./कार्यवाही क्र. वर्ष दिनांक

2. Final Report No. .......................... Charge-Sheet No ................... 3. *Date ......................
अंतिम अहवाल क्रमांक आरोपपत्र क्रमांक ३. तारीख

4 (i) Act .................................................. Sections ...................................
अधिनियम कलम

(ii) Act .................................................. Sections ...................................
अधिनियम कलम

(iii) Act .................................................. Sections ...................................
अधिनियम कलम

(iv) Act .................................................. Sections ...................................
अधिनियम कलम

5. Type of Final Report : Charge-Sheeted/Not Charge-Sheeted for want of evidence/FR Undetected.
अंतिम अहवालाचा प्रकार : आरोपपत्र दाखल केले / पुराव्याअभावी आरोपपपत्र दाखल केले नाही / तपास लागला नाही / शोध लागला नाही / आरोपी मरण पावला.

..................................................................................................................................

6. If FR. Unoccured : False /Mistake of Fact / Mistake of Law / No. Seizable / Civil Nature :
जर अंतिम अहवालाचा प्रकार घडलाच नाही : खोटी / वस्तुस्थिति अचूक / कायद्याची चूक / अदखलपात्र / दिवाणी स्वरूप.

..................................................................................................................................

7. If Charge-Sheeted (जर आरोपपत्र ठेवले) :
Original / Provisional / Supplementary (मूळ/तात्पुरते/पुरवणी) : ..........................................
* Name of the I. 0. : .......................................... Rank: .................. No.: ................
तपासणी अधिकाऱ्याचे नाव पदनाम क्रमांक

9. (a) Name of Complainant/Informant: ...................................................................
तक्रारदाराचे / खबरीचे नाव :

(b) Father's/Husband's Name : .......................................................................
पित्याचे / पतीचे नाव :

10. List of Accused Charge Sheeted in Court (with Absconder's if Any)
कोर्टात दोषारोप पाठविलेल्या आरोपितांची यादी (फरारीसह असल्यास)

| Sr. No. अनुक्रमांक 1 | Accused Full Name आरोपीचे संपूर्ण नाव 2 | Age वय 3 | Date of Arrest अटक दिनांक 4 | Date of Remand रिमांड दिनांक 5 | Remarks शेरा 6 |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

| Sr. No. अनुक्रमांक 1 | Full Name संपूर्ण नाव 2 | Date of Birth जन्मतारीख 3 | Occupation व्यवसाय 4 | Address पत्ता 5 | Type of Evidence to be rendered सादर करावयाच्यां पुराव्याचा प्रकार 6 |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

12. If F.I.R. is False, indicate action taken or proposed to taken u/s 182/211 I.P.C. : ...............................
पहिली, खबर खोटी असेल तर भारतीय दंड संहितेच्या १८२/२११ अन्वये केलेली किंवा करावयाची कार्यवाही नमूद करावी.

13. Result of Laboratory analysis : ..........................................................................................................
प्रयोगशाळा विश्लेषणाचे निष्कर्ष :

14. Details of Properties/Articles/Documents recovered/seized during investigation and relied upon (Separate list can be attached. if necessary)
तपासणीच्या वेळी परत मिळविलेल्या/जप्त केलेल्या आणि अवलंबून राहिलेल्या मालमत्तेच्या वस्तुंचा तपशील (आवश्यक असेल तर स्वतंत्र यादी सोबत जोडण्यात येईल.)

| Sr. No.<br>अ.क्र.<br>१ | Property Description<br>मालमत्तेचे वर्णन<br>२ | Estimated Value (in Rs.)<br>अंदाजित मूल्य (रुपयांत)<br>३ | P.S. Property Register No.<br>मालमत्ता नोंदवही क्रमांक<br>४ | From whom/where Recovered or Seized<br>कोणाकडून/कोठून परत मिळविली किंवा जप्त केली<br>५ | Disposal<br>विल्हेवाट<br>६ |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

15. Brief Facts of the Case (add separate sheet, if necessary).
प्रकरणाची थोडक्यात माहिती (आवश्यक असल्यास वेगळा कागद जोडावा.)

........................................................................................................................
........................................................................................................................
........................................................................................................................
........................................................................................................................
........................................................................................................................
........................................................................................................................
........................................................................................................................
........................................................................................................................
........................................................................................................................
........................................................................................................................
........................................................................................................................
........................................................................................................................
........................................................................................................................
........................................................................................................................
........................................................................................................................
........................................................................................................................
........................................................................................................................

.....................................................................................................................
.....................................................................................................................
.....................................................................................................................
.....................................................................................................................
.....................................................................................................................
.....................................................................................................................
.....................................................................................................................
.....................................................................................................................
.....................................................................................................................
.....................................................................................................................
.....................................................................................................................
.....................................................................................................................
.....................................................................................................................
.....................................................................................................................
.....................................................................................................................
.....................................................................................................................
.....................................................................................................................
.....................................................................................................................
.....................................................................................................................
.....................................................................................................................
.....................................................................................................................

16. Information Date Infomation of Complainant not given reason

कलम १७३ चा सूचना फॉर्म :......... बजावला दिनांक ..................... बजावला नाही कारण .....................

Outward No. ................................

जावक क्रमांक

17. Court C. C. No.

कोर्टाचा सी.सी. नं. : .....................................................................................................

18. Disposal of Court

कोर्टाचा निकाल : .........................................................................................................

19. Signature of Incharge P. Stn. Signature of Investigation Officer

प्रभारी अधिकाऱ्याची सही ................................ तपासीक अंमलदाराची नाव व सही .................

Name : .................................................. Name : ..................................................

नाव : नाव

Designation : ............................................ Designation : ............................................

पदनाम पदनाम

20. Particulars of accused persons charge-sheeted (use separate sheet for each accused) :
आरोपपत्र ठेवलेल्या आरोपीचा तपशील (प्रत्येक आरोपीसाठी स्वतंत्र कागद वापरावा)

i) Name ........................................................ Whether verified : ................................
नाव पडताळले किंवा काय

ii) Father's /Husband's Name : ..........................................................................................
पित्याचे/पतीचे नाव

iii) Date/Year of Birth (जन्मतारीख/वर्ष) ...........................................................

iv) Sex : ........................................................ (v) Nationality
लिंग राष्ट्रीयत्व

vi) Passport No. : ...................... Date of Issue : ......................... Place of Issue .....................
पारपत्र क्र. दिल्याची तारीख दिल्याचे ठिकाण

vii) Religion : ................................................ (viii) Whether SC/ST : ................................
धर्म अनुसूचित जातीचा/जमातीचा आहे का

ix) Occupation (व्यवसाय) : ..........................................................................................

x) Address (पत्ता) :
..........................................................................................................................
..........................................................................................................................
whether verified (पडताळला किंवा काय)

xi) Provisional Criminal No. (तात्पुरता गुन्हेगार क्रमांक) : ..............................................

xii) Regular Criminal No. (if Knows) नियमित गुन्हेगार क्रमांक (माहीत असल्यास): .......................

xiii) Date of Arrest (अटकेची तारीख) : ..........................................................................

xiv) Date of release on bail (जामीनावर सोडल्याची तारीख) : ..............................................

xv) Date on which forwarded to Court (न्यायालयाकडे पाठविल्याची तारीख): ................................

xvi) Under Acts and Sections : ...........................................................................................
कोणत्या अधिनियमाखाली व कलमांखाली

xvii) Name(s) of bailers/sureties and Address(es) : ......................................................
जामीनदारांची सही व पत्ते
..........................................................................................................................
..........................................................................................................................

xviii) Previous conviction with case references (प्रकरणांच्या संदर्भासह पूर्वीचे अपराधीपदी): ............
..........................................................................................................................
..........................................................................................................................

xix) Status of the accused (आरोपीची स्थिती) : ..........................................................

Forwarded/Bailed by Police/ In Police Custody/Bailed by Court/ In Judicial Custody/Absconding/Proclaimed Offender/ पुढे पाठवले/पोलीसांनी जामीनावर सोडले/पोलीस कोठडीत/न्यायालयाने जामीनावर सोडले/न्यायालयीन कोठडीत/फरारी/अपराधी :

# टिप्पणी

# संदर्भ सूची


- केंद्रीय गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय, कलकत्ता यांच्याकडील गुन्हे तपास या विषयावरील अभ्यासक्रम
- महाराष्ट्र पोलीस प्रबोधिनी, नाशिक येथील गुन्हे तपास या विषयावरील अभ्यासक्रम
- गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय, नाशिक यांची गुन्हे दोषसिद्धीचे प्रमाण वाढविण्याकरीता अभ्यासक्रम - २००८ अभ्यासक्रम पुस्तिका
- एन.सी.आर.बी. दिल्ली कडील फॉर्मचे नमुने
- भारतीय पुरावा अधिनियम, १८७२
- भारतीय फौजदारी प्रक्रिया संहिता, १८७६
- भारतीय दंड संहिता , १८६० कायदेविषयक पुस्तके